म. ग्रं. सं. ठाणें
विषय शास्त्र.
सं. नं. ९८१

ॐ तत्सत्

# जीवितशास्त्र

आणि

# संजीवन चिकित्सा-पद्धति



: लेखक :
यशवंत काशिनाथ परांजपे,
मा.ळंगे.

कार्तिक शु॥ १२ शके १८६८ (६-११-४६)

किंमत ४ रुपये

অশোক দত্ত

[illegible] ৩.৭। ৯২৩৪
৩৮২৭

[illegible]

২ [illegible]

[illegible]

ॐ तत्सत्

# जीवितशास्त्र

आणि

# संजीवन चिकित्सा-पद्धति



दा. क्र. ६७४९

: लेखक :

**यशवंत काशिनाथ परांजपे**

मावळंगे.

कार्तिक शु॥ १२ शके १८६८ (६-११-४६)

**किंमत ४ रुपये**

प्रकाशक :
**वा. वि. भट,**
अभिनव प्रकाशन
२३।३ अहमद सेलर बिल्डिंग
नांयगांव-मुंबई १४.

★

मुद्रक :
**न. वि. गोडसे,**
श्रीशिवाजी प्रिंटिंग वर्क्स,
४९५ शनवार पेठ,
पुणे २.

ॐ तत्सत

# जीवितशास्त्र आणि संजीवनचिकित्सा पद्धति



लेखक- यशवंत काशीनाथ परांजपे- मावळंगे.

# प्रथमावृत्तीची प्रस्तावना.

शरीर हें कोणत्याही प्रकारच्या सुखोपभोगांचें मुख्य साधन असल्यामुळें तें निकोप व निरोगी ठेवणें अत्यंत आवश्यक आहे. तथापि कोणत्या ना कोणत्या कारणांनीं त्यांत बिघडाबिघड होऊन निरनिराळे रोग अगर व्याधि उत्पन्न होत असतात; अशा व्याधींचे कार्यकारणभाव शोधून त्यांचा परिहार करणाऱ्या औषधीउपायांचा शोध फार प्राचीन काळापासून सुरू आहे. या शोधामुळेंच ॲलोपाथी, प्रचलित आयुर्वेदिक व युनानी पद्धति, होमिओ-पाथी, क्रोमोपाथी वगैरे निरनिराळ्या उपचारपद्धति हल्लीं प्रचारांत आहेत. तथापि या कोणत्याच पद्धतीला अद्याप पूर्णावस्था प्राप्त झालेली नाहीं; नवीन शोध अहर्निश चालू असून दिवसेंदिवस वैद्यकशास्त्राची प्रगति होत आहे. **संजीवन चिकित्सा** ही **श्री. परांजपे** यांनीं अनेक वर्षेंपर्यंत केलेल्या वैद्यकीय संशोधनाचें एक सुंदर फल आहे.

**संजीवन चिकित्सा** ही शास्त्रशुद्ध आणि संपूर्ण पद्धति असून या पद्धतींतील औषधांची संख्या फार मर्यादित म्हणजे फक्त १४ आहे व त्यांत संपूर्ण रोग व व्याधि नष्ट करण्याचें आणि शरीर सतेज व उत्साही बन-विण्याचें सामर्थ्य निःसंशय आहे, हें अनुभवानें सिद्ध झालें आहे. या औष-धांचा गुण फार त्वरित येत असून पुढें फार काळपर्यंत टिकतो. तसेंच रोग्याची **जीवनशक्ति** जोरदार व सकस बनून रोगाचा जोर कमी होणें व उत्साह वाढणें या दोन्ही क्रिया एकाच वेळीं घडत जातात; रोग नाहींसा होतांच शक्तिपात होत नाहीं व मागाहून 'पौष्टिक' मानलीं जाणारीं औषधें घ्यावीं लागत नाहींत. त्याचप्रमाणें या पद्धतीचीं औषधें मुख्यतः साखरेच्या गोळ्यांवर बनविलेलीं व सूक्ष्म प्रमाणाची असल्यामुळें बाळगण्यास सुटसुटीत, अल्प किंमतींत मिळणारीं, केव्हांही कोणालाही घेण्याला सुलभ व सोईचीं असून तात्काळ परिणामकारक अशीं आहेत व याचें मुख्य कारण **संजीवन चिकित्सेचीं मूलतत्त्वें हीं** इतर पद्धतींहून भिन्न आहेत.

अॅलोपाथी, प्रचलित आयुर्वेदिक व युनानी उपचारपद्धति यांत तत्त्वाच्या दृष्टीनें फार साम्य आहे; या पद्धतींचा मुख्य भर व्याधींचें दृश्य स्वरूप व लक्षणें कमी करण्याकडे असतो. शरीरघटकांची जी बिघडाबिघड झाल्याचें आढळेल तेवढ्यापुरती त्या ठिकाणची दुरुस्ती करण्याकरतांच मुख्यतः औषधांचा उपयोग केला जातो. परंतु शरीरघटकांहून भिन्न व अति सूक्ष्म अशी अदृश्य **जीवनशक्ति** हीच शरीरावर हुकमत चालवीत असते आणि विशेषतः तिला पोषक अशा औषधांचा उपयोग या चिकित्सापद्धतींत फारसा केला जात नाहीं.

वास्तविक शरीर निरोगी व कार्यक्षम असणें ही त्याची नैसर्गिक व स्वाभाविक अवस्था असून शरीरांतील जीवनशक्तीचें तें मुख्य कार्य आहे. निरनिराळ्या रूपांनीं जीं विजातीय व घातक द्रव्यें शरीरांत शिरतात, त्यांचें तावडतोब उच्चाटन करण्यांत जीवनशक्ति फार दक्ष असते. विजातीय द्रव्यें अल्प प्रमाणांत असतात तोंपर्यंत त्यांचें उच्चाटन न कळतां सहज रीतीनें केलें जातें; परंतु अशा घातक द्रव्यांची वाढ जास्त प्रमाणांत होऊं लागली म्हणजे जीवनशक्ति त्यांची हकालपट्टी जास्त वेगानें व तीव्रतेनें करीत असते. महायुद्धाचें वेळीं ज्याप्रमाणें राष्ट्रांतील प्रत्येक घटक हादरून जातो व युद्धाची थोडीफार झळ त्यास लागते त्याचप्रमाणें जीवनशक्तीनें वरील कार्य जोरानें सुरू केलें म्हणजे शरीराचे सर्व घटक हादरून जाऊन अस्वाभाविक लक्षणें उदाहरणार्थ वांति, जुलाब, ताप वगैरे होऊं लागतात. परंतु जीवनशक्तीनें **शरीर निरोगी राखण्याकरतां** विजातीय द्रव्यांबरोबर चालविलेल्या युद्धामुळें हे सर्व होतें हें तत्त्व वर लिहिलेल्या उपचारपद्धतींस फारसें पटत नाहीं आणि त्या अनुरोधानें उपाययोजना केली जात नाहीं. शिळे, तळलेले, भाजलेले, जड, कोठ्याला अपायकारक, न पचणारे असे निरनिराळे पदार्थ वारंवार खाण्यांत आले म्हणजे प्रथम प्रथम जीवनशक्ति ही त्यांचें उत्सर्जन स्वाभाविक मलोत्सर्गाचे मार्गानें करीत असते; परंतु पुढें वारंवार आंतड्यांवर एकसारखा फाजील ताण पडल्यानें आंतड्यांची शक्ति कमी कमी होत जाते व विजातीय द्रव्यें वाढत जातात आणि अखेर त्यांचे उत्सर्जन अस्वाभाविकपणें, जोरानें, सर्व शक्ति एकवटून ( जुलाब रूपानें ) जीवनशक्तीला करावें

लागतें; अशा वेळीं जीवनशक्तीला मदत करून आंतड्यांची शक्ति वाढवील व उत्सर्जनक्रिया सुरू ठेवूनच विजातीय द्रव्यांना शरीराबाहेर घालवून देईल असेंच द्रव्य औषध म्हणून दिलें पाहिजे. परंतु वरील आंग्ल, आयुर्वेदिक वगैरे पद्धतींप्रमाणें अशा वेळीं अफूसारखीं स्तंभक व उत्सर्जन बंद करणारीं व आंतड्यांना गुंगी आणणारीं औषधें दिलीं जातात व त्यांचा परिणाम म्हणजे आंतड्यांना जास्त अशक्तता येते. उत्सर्जन ( जुलाब ) कांहीं वेळ बंद झालें तरी पोट फुगतें व पुष्कळ वेळां कांहीं वेळानें पुनः जुलाब सुरू होतात. कांहीं वेळां झाले नाहींत तरी पोट फुगण्यावर दुसरें औषध द्यावें लागतें व त्याचे परिणाम शरिरांतील अन्य घटकांवर होतात. मग त्यांवर उपचार सुरू होतो. अशा प्रकारें विजातीय द्रव्यांची भर पडत जाऊन , रोगांची एक प्रकारची परंपरा सुरू होते व शक्ति क्षीण होत जाते. त्याकरितां ' पौष्टिक औषधें दिलीं जातात.

हॅानिमानच्या होमिओपॅथीचें मूलतत्त्व ' समःसमं शमयति ' म्हणजे रोगाला समान धर्माच्या परंतु अत्यंत सूक्ष्म प्रमाणांत दिलेल्या औषधांनीं व्याधिहरण करणें हें आहे.

टिशूरोमिडीज ( बाराक्षारपद्धति ) या पद्धतीची मूळ कल्पना म्हणजे शरीरांत बाराक्षार असतात, व त्यांचा योग्य प्रमाणांत बदल झाला म्हणजे होणाऱ्या न्यूनाधिक्यानें व्याधि उत्पन्न होत असतात. क्षारांची समता आणण्यास जरूर ते क्षार औषधी रूपानें दिले म्हणजे शरीरास नैसर्गिक निरोगीपणा येतो.

क्रोमोपॅथीची उभारणी सप्त रंगाचे कल्पनेवर केलेली आहे. म्हणजे शरीर घटक हे निरनिराळया रंगाचे असून रंगांत विषमता उत्पन्न झाली म्हणजे व्याधि उत्पन्न होतात व त्यांत जरूर त्या रंगाच्या बाटल्यांत शास्त्रोक्त तयार केलेल्या औषधांनीं भर घालून समता आणली म्हणजे सर्व रोग नाहींसे होतात.

वरील कोणत्याही पद्धतींत शरीराची अधिष्ठात्री जी जीवनशक्ति तिला फारसें महत्त्व नाहीं. त्याप्रमाणें प्राणिमात्रांत **प्रकृतिभेद** असतात व विशिष्ट प्रकारच्या ठेवणीच्या लोकांना विशिष्ट कारणांनीं रोग उत्पन्न होतात, व त्यांना

सजातीय अशाच औषधांनीं जीवनशक्तीला चटकन् मदत मिळून गुण येतो हें तत्त्वही मुळांत फारसें पटत नाहीं. वरील सर्व पद्धतींच्या तत्त्वाप्रमाणें मनुष्यप्राणि तेवढे इयून तियून एकच व औषधेंहि सर्व सारखींच असतात; केवळ औषधीच्या प्रमाणांत रोगाच्या लक्षणानुरूप फरक असतो.

लंघनचिकित्सेनें जीवनशक्ति मान्य केलेली असून तिला प्राधान्य दिलें आहे. "शरीर निर्कोप राखण्याकरितांच जीवनशक्ति विजातीय द्रव्यांचें जोरानें उच्चाटन करूं लागते व अस्वाभाविक लक्षणें उत्पन्न होतात; त्यासच रोग मानलें जातें. परंतु अशा वेळीं जीवनशक्तीला तिचें काम करण्यास पूर्ण वाव मिळावा व शरीर खरोखर ' जिवंत ' ठेवण्याकरितांच तिनें तांडवनृत्य केलें आहे व तो खेळ स्वस्थपणें पहात रहावें, अन्नाचा अगर अधिक विजातीय आंबुस, कडू, तुरट, खारट, अशा औषधांचा मारा शरिरावर करूं नये म्हणजे आपोआप नैसर्गिक आरोग्य कांहीं वेळानें प्राप्त होतें, हें लंघनचिकित्सेचें मूलतत्त्व आहे; या दृष्टीनें ती आंग्ल, आयुर्वेदिक वगैरे पद्धतींहून जास्त निर्दोष व सुकर आहे.

तथापि लंघनचिकित्सेंत प्रकृतिभेदाचें तत्त्व स्वीकारलेलें नाहीं. तसेंच जीवनशक्तीचें स्वाभाविक काम सुरू असतां म्हणजे रोगलक्षणें जाणवत असतां तिला तिच्या सजातीय सूक्ष्म द्रव्यांनीं मदत व जोर देऊन तिचें कार्य सुलभ केलें जात नाहीं; याचा परिणाम मुख्यतः फार थकवा येणें हा होतो. जीवनशक्तीला बाहेरून मुळींच मदत नाहीं; शरीररक्षणाचें व विजातीय द्रव्यांबरोबर **युद्धाचें** अशीं दोन कामें एकाच वेळीं जीवनशक्तीला करावीं लागतात, आणि त्याकरितां शरीरांत असलेली वसा, रक्त वगैरे द्रव्येंच दोन्ही कामास खर्च होत असतात व या दुहेरी भारामुळें शरीर क्षीण व दुर्बल होऊन अशक्तता फार येते.

अमेरिकेंत निघालेल्या 'आक्झीडोनार' वगैरेसारख्या व्याधिहरणाकरतां निघालेल्या उपकरणांस संपूर्ण चिकित्सा असें म्हणतां येणार नाहीं; तथापि त्यांत जीवनशक्ती व तिचें वर लिहिलेलें स्वाभाविक कार्य यांस मान्यता असून त्या शक्तीला जास्त जागृत करण्यानें सर्व रोगहरण होतें ही मूल कल्पना आहे. मात्र त्यांत जीवशक्ति जास्त जागृत होऊन तिला चांगली चालना

मिळते व ती जास्त कार्यप्रवृत्त होते. तथापि तिला सजातीय अशी मदत अगर जोर मिळत नाहीं.

चिकित्साशास्त्रांत कालगतीप्रमाणें उत्तरोत्तर सुधारणा होत असून आंग्लवैद्यक आयुर्वेदिक वगैरे पद्धतींहून उत्तरोत्तर निघालेल्या वरील पद्धति या जास्त निर्दोष आहेत. त्यांतील कांहीं प्रमेयें व तत्त्वें हीं पूर्वीच्या पद्धति आत्मसात् करीत चालल्या असून त्यांस अनुसरून उपचारांत दिवसेंदिवस सुधारणा होत आहे हें प्रगमनाचें लक्षण आहे.

जीवनशक्ति व प्रकृतिभेद या दोहोंचीही जाणीव इलेक्ट्रो होमिओपॅथिमध्यें कांहीं अंशीं आढळते, तथापि त्या दोहोंचा व औषधांचा पूर्ण मेळ घालण्याचें कार्य त्यांत केलेलें नाहीं. त्या पद्धतीचे प्रवर्तक कौंट मॅटी यांस प्रकृतिभेदाची व लक्षणांची कल्पना आली तरी त्यांचे कार्यकारणभाव व रहस्य यांचा नीट उलगडा झाला नाहीं; शिवाय अत्यंत महत्त्वाची बाब म्हणजे ज्या त्या प्रकृतीला पूर्ण सजातीय व जीवनशक्तिपूर्ण अशा स्वतंत्र वनस्पति त्यास मिळाल्या नाहींत; म्हणूनच जरी त्यांनीं चार प्रकृति मानल्या व त्यांचे गुणधर्मांचें आकलन केलें तथापि त्यांचे दसपट म्हणजे चाळीसपर्यंत औषधी-संख्या वाढवावी लागली. तथापि कोणत्याही पूर्वीच्या पद्धतीहून इलेक्ट्रो होमिओपाथि ही जास्त निर्दोष आहे.

## संजीवनीचिकित्सेचा पाया

**जीवनशक्ति** ही शरिराची सूत्रचालक असते, शरीरभेदानें ती कोणत्या तरी एका विशिष्ट प्रकृतिधर्माची असते व व्याधि उत्पन्न होतांच सजातीय

असें औषधीद्रव्य सूक्ष्म प्रमाणांत तिला ग्रहण करतां येईल असें मिळतांच व्याधिनाश त्वरित होतो. हें तत्त्व संजीवनचिकित्सेचा पाया आहे.

## प्रकृतिभेदाचें रहस्य

पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश या पंचमहाभूतांवरच साऱ्या जगाचा डोलारा उभारलेला असून त्यांच्याच घडामोडीनें चराचर सर्व वस्तु निर्माण होतात व नाश पावत असतात अगर त्यांचें रूपांतर होत असतें. या पंचमहाभूतांचा अन्योन्य संबंध अत्यंत निकट व परस्परावलंबी आहे. प्रत्येक वस्तु हें या महाभूतांच्या अणुपरमाणूंचें संमिश्रण असून त्यांच्याच आघात-प्रत्याघातानें त्याची वाढ व नाश म्हणजे रूपांतर होत असतें हा निसर्गाचा त्रिकालाबाधित नियम आहे. पशु, पक्षी, मनुष्य वगैरे सजीव प्राणी हें पंच महाभूतांच्या अणुपरमाणूंचें रासायनिक परंतु **जीवनशक्तियुक्त** मिश्रण आहे. हाडें वगैरे शरिराची जड घटना ही पृथ्वीतत्त्वाची असून, रक्त, चरबी वगैरे ओलांश हा प्रामुख्यानें जलतत्त्वाचा भाग आहे. उष्णता, जोम, उत्साह हीं तेजतत्त्वाचीं असून चलनवलन हें वायुतत्वाचें आहे व सर्व शरिरांतील विरलपणा, पोकळी ही आकाशतत्त्वाची आहे.

याप्रमाणें शरीर हें पंचमहाभूतांच्या संमिश्र रासायनिक क्रियेनें बनत असून **जीवनशक्ति** ही शरिराची सूत्रचालक असते. तथापि शरीर पंच-तत्त्वात्मक असलें तरी त्याच्या मूळ घटनेच्या वेळीं परिस्थित्यनुरूप ज्या तत्त्वाच्या घटकांचें आधिक्य असतें त्या तत्त्वाची त्याची **प्रकृति** बनत असते; शरिराची ठेवण त्या विशिष्ट तत्त्वाच्या आधिक्याची आढळून येते. त्या शरिराची जीवनशक्ति त्याच तत्त्वाची असून तिला पोषक असें सजातीय

द्रव्य ( औषध ) सूक्ष्म प्रमाणांत मिळाल्यास रोग्यास तावडतोब आराम व गुण वाटूं लागतो. जीवनशक्तीस आरोग्यरक्षणाचें काम त्वरित करतां येतें. तसेंच सबंध शरीर पंचतत्त्वात्मक असलें तरी त्यांत प्रत्येक तत्त्वाचें एक विशिष्ट मूलस्थान असतें. उ. पृथ्वीचें:— वसारस, वसाग्रंथी.

आंतडीं, जलतत्त्वाचें:—रक्त, हृदय ( हार्ट ); तेजाचें-यकृत; वायूचें:— फुफ्फुसें व प्लीहा; आकाशाचें:—शरिरांतील पोकळी व विरलपणा. शरिराच्या ज्या भागांत व्याधि उत्पन्न झाली असेल तें ठिकाण ज्या विशिष्ट तत्त्वाच्या आधिक्याचें असेल अगर मूलस्थान असेल त्या तत्त्वाचें औषधीद्रव्य पोटांत देतांच व प्रत्यक्ष त्या ठिकाणीं त्याच तत्त्वाच्या औषधांचा बाह्योपयोग करतांच तात्काळ गुण वाटतो. अशा रीतीनें ( १ ) मूळ जीवनशक्तीला सजातीय व पोषक आणि ( २ ) व्याधियुक्त ठिकाणाला सजातीय व पोषक असें जें द्रव्य तेंच खरें गुणकारी आणि योग्य औषध असतें. हा संजीवनचिकित्सेचा पाया व आधार आहे.

कोणत्याही शास्त्रांतील महत्त्वाचे व प्रचलित विचारक्रांति घडविणारे शोध आणि तत्त्वें यांचा उगम महानद्यांच्या उगमाप्रमाणें बहुधा अगदीं गैरमाहितीच्या व एकांत स्थळीं होत असतो. संजीवनीचिकित्सेचा जन्म हाही असाच अगदीं अप्रसिद्ध अशा रत्नागिरी तालुक्यांतील **मावळंगें** या लहानशा खेड्यांत झालेला आहे. या चिकित्सेचे प्रवर्तक व संशोधक हे पुस्तककर्ते श्री. **यशवंत काशिनाथ परांजपे** हे आहेत. इंग्रजी शिक्षणानंतर नोकरीसारख्या पेशांत कायमचें अडकून पडणें ही गोष्ट त्यांच्या स्वतंत्र व शोधक बुद्धीला पटणें शक्यच नव्हतें. निसर्गतःच वैद्यक विषयाकडे त्यांचे मनाचा ओढा होता, परंतु त्या विषयांतही केवळ प्रचलित पद्धतींचाच अवलंब करून वैद्यक विषय म्हणजे केवळ पोट भरण्याचें साधन या दृष्टीनें त्याचा धंदा म्हणून उपयोग करणें हेंही त्यांस स्वभावतःच चुकीचें वाटत असे. त्याचप्रमाणें केवळ औषधांची संख्या हेंच जर या शास्त्राच्या प्रगतीचें लक्षण मानावें तर

दिवसेंदिवस ती संख्या वाढत गेली व जात आहे आणि त्यानें रोगांची व रोग्यांची संख्या कमी होऊन सामान्यतः जनतेंत आरोग्याची वाढ व्हावयास पाहिजे. परंतु याच्या उलट परिस्थिति झाली आहे. याचें कारण काय ? तसेंच निसर्गानुसार ज्यांचें वर्तन असतें असे कांहीं (अपवादात्मक) लोक व विशेषतः पशुपक्षी यांमध्यें आरोग्य जास्त चांगलें असतें तें कां ? तसेंच त्यांनाही क्वचित् व्याधि होतात त्या वेळीं ते कांहीं तरी निसर्गसिद्ध व उपजत जाणीव झालेलें असे उपचार करतात त्यांचा काय परिणाम होतो ? केवळ लंघनानें शरीरावर कोणतें कार्य घडतें ? पूर्वीचे शेंकडों वर्षें जगणारे असें ज्या ऋषींचें वर्णन आहे ते तसे कोणत्या कारणानें जगत ? ऋषिप्रणीत आचारांचा शरिरावर काय परिणाम होतो ? वगैरे नाना प्रकारच्या प्रश्नांनीं व शंकांनीं श्री. **परांजपे** यांचे विचारांस चालना मिळाली. निरनिराळया चिकित्सापद्धतींचा व विशेषतः त्यांचे मलभूत तत्त्वांचा त्यांनीं तौलनिक दृष्टया विचार व अभ्यास केला. त्यांत त्यांस असें आढळून आलें कीं, निसर्गाची किल्ली पंचमहाभूतांत आहे. जीवनशक्ति ही शरीरयंत्रावरील सर्व सत्ताधीश आहे व या यंत्रांतील सर्व घडामोडी पंचमहाभूतांच्या तत्त्वांच्या घटकांचे फरकानें घडतात. जीवनशक्ति ही शरीररक्षणाचे बाबतींत फार दक्ष असते. जरूर तेव्हां तिला मदत करणें हाच आरोग्याचा खरा मार्ग आहे व त्या दृष्टीनें औषधीद्रव्यांची छाननी झाली पाहिजे. या तत्त्वानुसार श्री. **परांजपे** यांनीं खेड्यापाड्यांतील व गिरिकंदरांतील विशुद्ध वातावरणांतील निरनिराळया वनस्पतींचे गुणधर्मांचें संशोधन जारीनें सुरू केलें. त्यांत असें दिसून आलें कीं, कांहीं वनस्पती अत्यंत प्रभावी असून त्यांचे गुणधर्म फार व्यापक असतात व त्यांचें वर्गीकरण पंचमहाभूतांचे गुणधर्मांवरून साधर्म्यानें करतां येतें. त्या वनस्पतींचे सूक्ष्म घटक अगर अर्क हे विशिष्ट तत्त्वाच्या साधर्म्यानें त्या तत्त्वाच्या शरी-

राच्या जीवनशक्तीशीं चटकन् तादात्म्य पावतात व तिचें संवर्धन करून आणि, जरूर ती मदत तिला देऊन व्याधींचें शमन करूं शकतात. त्याचप्रमाणें शरिरांतील पंचतत्त्वांपैकीं विशिष्ट तत्त्वाच्या ठिकाणांतील नैसर्गिक कार्यशक्ति जागृत करून व वाढवून तें ठिकाण व्याधिमुक्त करूं शकतात. शरीरांतील पंचतत्त्वांची बिघडलेली समता कमी झालेल्या तत्त्वाची भर घालून व जास्त झालेल्याचें उत्सर्जन करून फारच थोड्या वेळांत निर्माण करतात, म्हणजेच **आरोग्यप्राप्ति** करून देतात. अशा निवडक प्रभावशाली वनस्पतींचें औषधीकार्य त्वरित आणि बिनचूक होऊन रोग्याची नैसर्गिक शक्ति कायम रहाते.

अशा प्रकारच्या निरनिराळ्या जातींच्या अनेक वनस्पतींचे शेंकडों प्रयोग निरनिराळ्या प्रमाणांत व परिस्थितींत प्रथम स्वतःवर व ते यशस्वी झाल्याचें आढळल्यास नंतर इतरांवर ह्याप्रमाणें फार काळपर्यंत करून श्री. परांजपे यांनीं पूर्ण निर्दोष, व्यापक गुणांच्या, जीवनशक्तिसंपन्न, पंचतत्त्वांशीं साधर्म्याच्या अशा वेंचक वनस्पति निश्चित केल्या व त्यांचीं प्रमाणें अनुभवानें बसविलीं. सूक्ष्म प्रमाणाकरतां होमिओपॅथीप्रमाणें साखरेच्या गोळ्यांवर वरील निवडक वनस्पतींच्या अर्कांचे संस्कार करून त्यांचा उपयोग ते करूं लागले. याप्रमाणें पोटांत घेण्याचीं औषधें निश्चित ठरवून विशेषतः बाह्योपयोगाकरतां पोटांतील औषधांना सजातीय अशीं पांच प्रवाही औषधेंही प्रत्येक तत्त्वाचें एकेक याप्रमाणें निश्चित केलीं आहेत. या दहांस पूरक म्हणून स्वतंत्र गुणधर्मांचीं अशी दोनतीन निराळीं औषधें तयार करावीं लागलीं आहेत. या औषधांचा उपयोग सतत दोन तपें केला जात असून अनुभवानें तीं पूर्ण यशस्वी ठरलीं आहेत. आणि आतां या चिकित्सापद्धतीचीं मूळतत्त्वें, वनस्पति

व योजना यांना निश्चित व संपूर्ण शास्त्राचें स्वरूप आलें आहे. वास्तविक यापूर्वीच संपूर्ण स्वरूपांत जनतेसमोर हें शास्त्र यावयाचें परंतु परतंत्र हिंदुस्थानांतील शोधकांचे बाबतींत नेहमीं अनुभावास येणाऱ्या अडचणींमुळें आजवर तो योग आला नाहीं. तथापि आतां प्रसिद्ध होत असलेल्या व बाल्यावस्था ओलांडून पुढें गेलेल्या या चिकित्सापद्धतीची सेवा जनतेनें करून घेतल्यास तिला पूर्णावस्था प्राप्त झाल्याचें श्रेय येईल व शोधकाचे शोधाचें चीज होईल.

रत्नागिरी
ता. १ एप्रील
१९३३.

स. ग. भिडे.
बी. ए. एल्. एल्. बी.

# संजीवन-चिकित्सापद्धतीचीं पुस्तकें व औषधें

| | | |
|---|---|---|
| | | रु. आ. पै |
| १. | संजीवनाचिकित्सापद्धति-दुसरी आवृत्ति | ४-० |
| २. | संजीवन चिकित्सापद्धति-माहितीपत्रक. | ०-८ |
| ३. | सं. चि. पद्धतीचीं औषधें-पेटी नं. १. ह्या पेटींत प्रथम ते सप्तम निष्पत्ति म्हणजे नं. १ ते ७; तृतीय ब=३ ब, विषहारिणी=नं. ८ मिळून ९, व चपला. ज्योतिष्मति, सुप्रभा, योगभाविनी व सौदामिनी अशा ५ विद्युत् मिळून १४ औषधें. प्रत्येक बाटली अर्ध्या ड्रामची असून तींत २०० ते २२५ गोळ्या असतात. सोबत माहितीपत्रकाची १ प्रत फुकट. | १७-० |
| ४. | सं. चि. पद्धतीचीं औषधें पेटी नं. २. या पेटींत वरील प्रमाणें सर्व औषधें पाव ड्रामप्रमाणें असतात. माहितीपत्रक फुकट. | ९-८ |
| ५. | सं. चि. पद्धतीचें वरीलप्रमाणें कोणतेंहि औषध अर्धा ड्रामची बाटली. | १-४ |
| ६. | वरील कोणत्याहि औषधाचें द्वितीय, तृतीय किंवा पुढील कोणतेंहि विलयन अर्धा ड्रामची बाटली. | १-४ |
| ७. | पांचहि विद्युत् व तृतीय ब यांचें तेल १ औंस बाटली | ०-८ |
| ८. | वरील कोणत्याहि औषधाची पाव ड्रामची बाटली | ०-१२ |

९. एकाच वेळीं १० हून जास्त बाटल्या घेतल्यास दर बाटलीस रु. १-२ या हिशोबानें दिलीं जातील.

वरीलपैकीं कोणतेंहि पुस्तक, पेटी किंवा फुटकळ औषध व्ही. पी. नें मिळेल. किंमतीशिवाय टपाल व पॅकिंग खर्च निराळा पडेल.

पुस्तकें व औषधें मिळण्याचीं ठिकाणें—

१. यशवंत काशिनाथ परांजपे, संजीवनचिकित्सामंदिर. मावळंगें, पोस्ट पूर्णगड, ता. रत्नागिरी.

२. रामचंद्र यशवंत परांजपे, संजीवन दवाखाना. मु. पो. जि. रत्नागिरी.

३. काशिनाथ यशवंत परांजपे, संजीवन औषधालय, पुणें २.

४. प. चिं. गद्रे-हिंद विद्यालय, आंग्रेवाडी, गिरगांव, मुंबई.

५. अ. प्र. जोशी, गंगाराम खत्र्याची चाळ, ठाकूरद्वार, मुंबई.

# द्वितीय आवृत्तीचें प्रास्ताविक निवेदन

सुमारें ३५ वर्षांपूर्वी या पद्धतीची कल्पना स्थूल मानानें सुचली व पंच-तत्त्वांपैकी, एकेका तत्त्वाच्या स्वतंत्र पूर्ण प्रभावी वनस्पति शोधून काढण्यांत कांहीं काळ गेला आणि निरानिराळे विकारांत अनेक रोग्यांना औषधें देऊन अनुभव घेत गेलों व त्यांची उपयुक्तता आणि प्रभाव व स्थूल मानानें ठरविलेली चिकित्सापद्धति यांची सांगड योग्य प्रकारें पडली व जास्त निश्चित-पणें या पद्धतीचीं प्रमेयें ठरलीं. याप्रमाणें बरींच वर्षें आम्ही स्वतः अनुभव घेतला. तसेंच ज्यांना अनुभव आला त्यापैकीं कांहीं जिज्ञासूंना ही पद्धति समजावून सांगितली व त्यांनींही स्वतः निरनिराळे अनुभव घेतले. अशा प्रकारें अनुभवाच्या कसोटीवर चांगलेपणानें उतरल्यानंतर सन १९३३ सालीं " संजीवन चिकित्सा पद्धति " हें पुस्तक प्रथम प्रसिद्ध केलें. त्यानंतर विष-हारिणी या औषधाचा शोध लागला; तसेंच पूर्वी पंचविद्युत् ह्या प्रवाही स्वरूपांत ठेवाव्या लागत त्या गोळयांच्या स्वरूपांत तयार करणें शक्य झालें, व या कारणासाठीं सन १९३५ सालीं लहान ' माहिती पत्रक ' प्रसिद्ध केलें

वरील पुस्तक वाचून वैद्यक व्यवसायांतील कांहीं लोक व घरगुती उप-योगासाठीं बरेच लोक औषधें वापरूं लागले व दरम्यानच्या काळांत त्यांपैकीं अनेकांनीं आपल्या शंका व औषधें वापरतांना येणाऱ्या अडचणी कळविल्या. तसेंच या चिकित्सेच्या आधारभूत तत्त्वांचें प्रथमावृत्तींत केलें आहे त्याहून जास्त सांगोपांग विवरण करावें आणि निरानिराळ्या रोगांची जास्त विस्तृत व उपयुक्त माहिती घालावी वगैरे सूचना कांहीं लोकांनीं केल्या. वास्तविक प्रथमावृत्तिचे वेळींच शास्त्रीयभाग सविस्तर व सांगोपांग लिहावयाचा. परंतु प्रथम सूत्ररूपानें व बेताचें विवरण करून या पद्धतीचीं प्रमेयें मांडावीं व

तीं लोकांना कितपत पटतात, या पद्धतींचा व औषधांचा प्रसार कितपत व कसा काय होतो हें पहावें व त्यानंतर सविस्तर पुस्तक लिहावें असें मनाशीं ठरविलें होतें. आतां पूर्वीची आवृत्ति संपली आहे व पूर्वसंकल्पाप्रमाणें औषधें वापरून अनुभव घेणाऱ्यांच्या सूचनांचा योग्य विचार करून जरूर तो खुलासा करावा या हेतूनें प्रथमावृत्तींत केवळ तात्पुरत्या सुधारणा न करता पुनरपि स्वतंत्रपणें जास्त विस्तृत व खुलासेवार असें या पद्धतीचें विवेचन करून हें पुस्तक लिहिलें आहे.

या पुस्तकांतील तात्त्विक विवेचन परिच्छेद १ ते १९८ हा यांतील महत्वाचा भाग आहे. नवीन शास्त्र म्हटलें म्हणजे कांहीं पारिभाषिक शब्द तयार करणें भागच असतें व त्याप्रमाणें केले आहेत. ही पद्धति समजण्यासाठीं कांहींशा सखोल अभ्यासू दृष्टीनें हा भाग वाचणें आवश्यक आहे. विकारांची माहिती हा भाग त्या मानानें खरोखर गौण आहे, मात्र त्याची आवश्यकता फार आहे, असें अनेक लोकांनीं कळविल्यामुळें विकारांचें दिग्दर्शन केलें आहे, तें ढोबळ व थोडक्यांत परंतु गरज भागावी अशा प्रमाणांत केलें आहे.

वेळोवेळीं आपुलकीनें ज्या ज्या लोकांनीं या पुस्तकाचे बाबतींत सूचना केल्या तसेंच या पद्धतीबद्दल शंका कळविल्या व औषधांबद्दल आपले अनुभव कळविले, त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानून ईशकृपेनें स्फुरलेले व निश्चित झालेले विचार जनताजनार्दनासमोर मांडले आहेत.

**य. का. परांजपे.**

# संजीवन-चिकित्सा-पद्धतिविषयीं कांहीं

# अभिप्राय

**श्रीमती सावित्रीबाई जोशी ( मिड् वाइफ् ) बनारस**–२० वर्षे मी नर्सचा व वैद्यकीचा धंदा करीत आहें. सुमारें ५।६ वर्षांपूर्वी मला संजीवन चिकित्सापद्धतीची माहिती कळली. तेव्हांपासून मी हींच औषधें वापरीत आहें. कित्येक असाध्य रोग व रोगी या औषधानें आश्चर्यकारक रीतीनें बरे झाले आहेत. (१) एक दिडदोन वर्षे संधीवातानें अंथरुणाला खिळलेलीबाई, हीं औषधें पोटांतून व बाहेरून सुरू केल्यावर ८।१० दिवसातच पलंगाला धरून उभी राहूं लागली व १८।२० दिवसांत घरांतल्या घरांत फिरूं लागली. २।३ महिन्यांत बाई खडखडीत बरी झाली. (२) एका आठ वर्षांच्या मुलीच्या उजेवे पायावरून वारें गेलें होतें. डॉक्टर-वैद्याचें मत पाय सुधारणार नाहीं असें होतें. परंतु ह्या औषधांनीं ती मुलगी चांगली बरी झाली. याच नमुन्याची दुसरी एक केस आहे. चार महिन्यांत ८।१० आणे गुण आहे. अशा रोग्यांना ज्ञानतंतु कार्यक्षम होण्याकरितां विद्युत्‌चा बाह्योपचार मात्र टेकींनें करावा लागतो. (३) एका बाईच्या अशुद्ध रक्तवाहिन्या वाढलेल्या, शरीरावर ठिकाठिकाणीं गांठी, सूज, ठणका विटाळ साफ न जाणें अशा प्रकारच्या अनेक तक्रारी १३।१४ वर्षांपासून होत्या. हें औषध सुरू केल्यावर, तिला प्रथम जुलाब सुरू झाले, पुढें आमांश झाला, कांहीं दिवसांनीं ताप येऊं लागला. खोकला सुरू झाला. कितीहि विकार वाढले तरी चिकित्सा न सोडण्याविषयीं बजावलें व त्या प्रमाणें रोग्यानें १॥-२ महिने व्यवस्थित औषध घेतल्यानें सर्व विकार शमन पावून, शक्ती, उत्साह वगैरे भरपूर वाढलीं आहेत. अशा रोग्यांनीं वर्षदीडवर्षसुद्धां औषध घेणें आवश्यक असतें. येथें कित्येक वर्षांचें जुनें रोगी या औषधांनीं बरे झालेले आहेत व त्यामुळें पुष्कळ लोकांचा विश्वास या पद्धतीवर बसला आहे. आपण हिंदीमध्यें सदरील पुस्तकांचें भाषांतर करावें म्हणजे बहुजनसमाजाला ह्या औषधांचा उपयोग करतां येऊं लागून त्यांना आरोग्यदान

दिल्याचें श्रेय आपणांला मिळेल. तरी आपण या गोष्टीचा अवश्य विचार करावा, ही विनंति.

श्री. **अनंतराव साठे** (र. मे. प्र. धन्वतरी औषधालय-मोडनिंब-सोलापूर.) आपलीं औषधें मी नुकतींच वापरण्यास सुरुवात केली आहे. परंतु या अल्पावधींत ज्या कांहीं विशेष रोगांवर व रोग्यांवर अनुभव आला तो देत आहें. (१) एका ६० वर्षें वयाच्या मराठा स्त्रीला प्लेगावर योग० व चपला घड्या व पोटांत नं. १,३, सुप्रभा यांचा आश्चर्यकारक त्वरित गुण दिसला. बाई ४।५ दिवसांत पूर्ण बरी झाली. (२) एका २२ वर्षें वयाच्या तरुणाला सर्पदंश झाला होता. तोंडांतून फेंस येत होता. हाताला दंशाचे दोन दांत स्पष्टच दिसत होते. दंशांवर विषहारणीच्या पट्टया व पोटांत नं. २ व विषहा० ४।४ गोळ्या १०।१० मिनिटांनीं देत होतो. रक्ताशयांवर सुप्रभा घड्या घातल्या ह्या उपचारांनीं हळूहळू आराम पडून रोगी पूर्ण बरा झाला. (३) प्लेगाच्या इंजेक्शननें दंडांत गांठ होऊन नंतर ती वहात होती. बरेच दिवस इतर उपचार करूनहि वाहाणें कमी होईना; परंतु सुप्रभा सौदा० च्या घड्या व पोटांत नं. १ व २ च्या विलयनानें १५।२० दिवसांत पूर्ण गुण आला. (४) एका बाईच्या पायाचे पिंढरीला कोणी तरी दंश केला. अर्ध्या तासानंतर तिला घेऱ्या येऊं लागल्यामुळें ती आमच्या दवाखान्यांत आली. दंशाची जागा सुजलेली व लाल दिसत होती. विषहा० च्या घड्या दंशाच्या जागीं व सुप्रभा मर्मस्थानीं ( रक्ताशयावर ) ठेविल्यानें व पोटांत विषहा०, सुप्रभा, नं. २ दिल्यानें अर्ध्यापाऊण तासांत पूर्ण बरें वाटलें. (५) विंचवाचे दंशावर १५।१६ रोग्यांना उपयोग करून पाहिला. दंशभागांवर विषहा० पट्टया व विषहा० ३।४ गोळ्या ५।५ मिनिटांनीं २।३ वेळ दिल्यानें जवळजवळ वेदना पूर्ण थांबल्याचें अनुभवास आलें. (६) पुरळ, गांधी, लाली, आग वगैरेंवर सुप्रभा-सौदा० आलटून पालटून बाहेरून वापरून उत्तम गुण येतो. (७) अजीर्ण, पोटदुखी हगवण वगैरेवर प्रथमनि० चा उत्तम अनुभव आला. (८) जखमांतील रक्तस्रावावर सुप्रभेचा बाहेरून आश्चर्यकारक गुण आला आहे.

**संजीवन आरोग्य मंडळ** ( रत्नागिरी ) " दवाखान्यांत सर्व प्रकारचे रोगी येतात. ज्यांना मुळींच गुण वाटत नाहीं असे रोगी अगदींच **थोडे.**

प्रत्येकाला थोडाफार गुण निश्चित वाटतो. कांहीं लोक पत्रव्यवहारानेंही औषधें मागवीत असतात. मुंबई, पुणें, इचलकरंजी, जमखिंडी, सांगली, सातारा वगैरे ठिकाणीं रोग्यांना नुसत्या पत्रव्यवहारानें औषधें पाठवून गुण आले आहेत. ( अर्थात् तशीं पत्रें आमचेजवळ आहेत. ) मुंबईहून एका **मधुमेहाच्या** रोग्याकडून पत्र आलें आहे. त्याचा उतारा " **आज ता. २९।६।४२ रोजीं २४ तासांची लघ्वी तपासली. डॉक्टरनें तपासून लघ्वी शुद्ध आहे म्हणून सांगितलें...मला बरें होण्याची आशा नव्हती, परंतु आपले गुणकारी औषधानें मी बरा झालों आहें...लघ्वीतून साखर जात नाहीं**". ( मि. सावंत मुंबई. ) रत्नागिरी येथें एका बाईला १० वर्षांपूर्वी उंदिराचा विषार झाला होता. तिनें पुष्कळ उपचार केले. सांधे दुखणें, थंडी वाजून ताप येणें असे विकार सारखे चालू होते. सदर बाई संजीवन औषधानें अवघ्या दीड महिन्यांत बरी झाली."

**श्री. रा. म. गोखले** ( मालाड ) " मला फेसियल ( तोंडाचा ) पॅरलिसिस ( अर्धांग ) झाल्यावर मी संजीवन चिकित्सा पद्धतीचीं औषधें व पुस्तकें मागविलीं. तत्पूर्वी बरेच इलेक्ट्रिक व डॉक्टरी उपाय केले, परंतु कांहीं एक उपयोग झाला नाहीं हीं औषधें सुरू केल्यावर ८।१० दिवसांत गुण वाटूं लागला व एक महिन्यांत उत्तम बरा झालों. तेव्हांपासून आपलीं औषधें ८।१० वर्षें वापरीत आहें व त्यांत आलेले विशिष्ट अनुभव खालीं देत आहें.

**अर्धांगाच्या** चारपांच केसिस (रोगी) बऱ्या केल्या. त्यांतील एक केस विचित्र होती. रोगी अंथरुणाला खिळला होता. जिभेवर मोठा काळा डाग पडला होता. रोग्याचा उच्छ्वासाबरोबर अत्यंत दुर्गंधी येत असे. डॉक्टरी सर्व उपाय करून थकल्यावर ही केस मजकडे आली. पंधरा दिवसांत तब्येत सुधारूं लागली व पुढील पंधरा दिवसांत रोगी झपाट्यानें सुधारला. **टायफॉईडच्या** २।३ केसिस अखेरचा उपाय म्हणून हातीं घेतल्या. ४।६ दिवसांत गुण वाटूं लागून पुढील ८।१० दिवसांत प्रकृत्या उत्तम झाल्या. पुढील ८।१० दिवसांतील गुण आश्चर्यकारक होता.

**श्री. वैद्य ना. श्री. वाटवे** ( गोल्ड मेडॅलिस्ट ) पुणें:—

" आम्हीं हीं औषधें आजपर्यंत कित्येक लोकांना दिलीं असून त्यांना उत्तम प्रकारें गुण येतो असा आमचा अनुभव आहे. ह्या पद्धतीचा दुसरा विशेष म्हणजे त्यांतील औषधें अत्यंत अल्प प्रमाणांत दिली असतांहि पुरतात. औषधांची संख्या इतकी अल्प असतांहि त्यांत सर्व रोग बरे करण्याचें सामर्थ्य आहे असा आमचा स्वतःचा अनुभवहि आहे. ह्या पद्धतीप्रमाणें औषधें दिलीं असतां व्याधिशमनाबरोबर रोग्याची प्रकृति सतेज बनत जाते. बाकीच्या पद्धतींत ज्या प्रमाणें रोगनाशानंतर रोग्याला क्षीणता वाटते व त्याला पौष्टिक औषधें द्यावीं लागतात तसा प्रकार या पद्धतींत नाहीं. कारण या पद्धतींत शरीरांतील शक्तींनाच प्रबल करून तद्द्वाराच रोगनिवारण साधण्यांत येत असतें. आज जगांत असलेल्या सर्व पद्धतींचा समावेश होऊनहि जी परमेश्वराप्रमाणें दशांगुलें उरते, अशी ही पद्धति आहे. हिचा जितका प्रसार होईल तितका इष्ट आहे. ही पद्धति जर एकाद्या युरोपियनानें काढली असती तर तिनें आजपर्यंत विलक्षण क्रांति करून सोडली असती असें आमचें निश्चित मत आहे. परंतु हा बिचारा संशोधक हिंदुस्थानांत जन्मला ! ह्यानेंच त्याचें संशोधन मातिमोल होऊं पहात आहे. तरी जनतेनें या गोष्टीचा विचार करावा अशी विनंति आहे. "

**श्री. मा. कृ. मराठे, शिक्षक-नेरूर**– ( सावंतवाडी ) " **दम्याचे** विकारावर आपल्या औषधाचा प्रथम आम्हांला चांगला अनुभव आला. प्रथम, द्वितीय व षष्ठ यांचें विलयन पोटांत, व बाह्योपचाराकरितां सौदामिनीचा उपयोग केल्यानें ३ महिन्यांत **दमा बरा झाला.**

याशिवाय मी अनेक अनुभव घेतले आहेत. तीन कष्टसाध्य सदरांत गेलेले **निमोनियाचे रोगी** बरे झाले. **मलेरियावर** तर या औषधांचा तात्काळ गुण येतो. मला आयुर्वेदाच्या औषधांचीहि माहिती आहे. **क्षयाच्या प्रथमावस्थेंतील चोरटा ताप व श्वास कास** यांवर या औषधांचा अप्रतिम उपयोग होतो. शरीराच्या अंतर्गत भागांत **गळवें** झाल्यामुळें होणारा **रक्तस्राव** सुप्रभेच्या २।२ गोळ्या देऊन २।३ तासांत बंद झाला आहे. आपल्या औषधांच्या गुणाविषयीं सर्वच माहिती देणें म्हणजे एक लहानसें पुस्तकच होईल. पत्रानें कळवितां येण्यासारखें नाहीं. "

# जीवितशास्त्रविचार आणि संजीवनचिकित्सापद्धति

रत्नागिरी जिल्ह्यांतील मौजे मावळंगें येथील श्री. यशवंत काशिनाथ परांजपे या संशोधक गृहस्थांनीं ' संजीवनचिकित्सापद्धति ' नांवाची एक वैद्यकीय पद्धति शोधून काढली आहे. या पद्धतीच्या माहितीचें एक पुस्तक प्रथमतः सुमारें १०।१२ वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालें होतें. आतां त्यांनीं त्या पद्धतीचें शास्त्रीय वर्णन करणारें पुस्तक सुधारून लिहिलें आहे. त्या पुस्तकाची प्रुफ कॉपी माझ्याकडे अभिप्रायार्थ आलेली आहे.

सदरील संजीवन चिकित्सेचा मला स्वतःला अनुभव नसला तरी माझे मित्र कै. नरहर सदाशिव अभ्यंकर वैद्य मुंबई हे याच पद्धतीचीं औषधें वापरून दवाखाना चालवीत असत. तसेंच माझे मित्र श्री. अनंतराव जोशी मुंबई हेहि याच पद्धतीचीं औषधें वापरीत असतात हें मला माहीत आहे. त्याचप्रमाणें संशोधकांचे चिरंजीव श्री. काशिनाथ यशवंत परांजपे हे गेलीं ७।८ वर्षें पुणें येथें याच पद्धतीचा दवाखाना चालवितात. वरील मित्रांचा अनुभव लक्षांत घेतां ही पद्धति नावीन्यपूर्ण, सुटसुटीत व साधारण सुशिक्षित मनुष्याला सहज शिकतां येण्याजोगी आहे असें माझें मत आहे.

या पद्धतीचीं औषधें होमिओ पॅथीच्या औषधांच्या धर्तीवर तयार केलेलीं असून त्यांच्या लहान लहान साखरेच्या गोळ्या असतात. सर्व औषधांची संख्या अवघी १४ असून या एवढ्या औषधांनीं सर्व प्रकारचे रोग बरे करितां येतात. या सर्व औषधांची सुबक लांकडी पेटी खिशांत राहील अशा बेताची केलेली असून तिची किंमतहि अल्प आहे. सोबत माहितीचें पुस्तक असतें; त्यावरून सुशिक्षित मनुष्यास औषधोपचार करितां येतात. त्यामुळें थोड्या किंमतींत मिळणारा हा खिशांतील दवाखानाच होय असें म्हणण्यास हरकत नाहीं.

प्रस्तुत पद्धति कोणत्या मूलतत्त्वांवर आधारलेली आहे याची सांगोपांग माहिती देणारें " **जीवित शास्त्र विचार आणि संजीवन चिकित्सा पद्धति** " नांवाचें वरील पुस्तक श्री. य. का. परांजपे यांनीं लिहिलें आहे. मूळ निराकार चैतन्यांतून पृथ्वी, आप, तेजादि पंचमहाभूतें व या पंचमहाभूतांतून अखिल सृष्टी कशी उत्पन्न होते. व यावर पंचमहाभूतांच्या आधारें मानवी शरीर कसें उत्पन्न होतें, त्यामुळें मानवी शरिरांत कांहीं विकृति किंवा रोग

उत्पन्न झाले तर त्याचा संबंध मुळांत त्यांच्या कमी जास्त प्रमाणांशीं कसा आहे, हें या पुस्तकांत शास्त्रीय पद्धतीनें व वेदांतदृष्टीनें उत्तम रीतीनें दाखविलें आहे. मानवी शरीर हें एक प्रकारचें पंचमहाभूतांचें मिश्रण असून त्या मिश्रणांत कमिजास्तपणा झाला म्हणजे रोग उत्पन्न होतात व तो कमिजास्तपणा ओळखून दूर केला म्हणजे रोग बरे होऊन आरोग्य प्राप्त होतें. असें या पद्धतीचें तत्त्व आहे. हें तत्त्व मान्य केलें म्हणजे, वनस्पतींतील पंचमहाभूतात्मक अंश, अर्करूपानें काढून त्यांच्या द्वारें मानवी प्राण्याला होणारे सर्व प्रकारचे रोग बरे करितां येतील हेंहि ओघानेंच सिद्ध होतें. या पद्धतीचा मूलाधार जी पंचमहाभूतात्मक सृष्टि, तिचा व मानवी देहाचा संबंध काय याचा उलगडा या पुस्तकांत शास्त्रीय पद्धतीनें चांगला केला आहे. सर्व विवेचन शास्त्रीय असल्यामुळें पुस्तक थोडें रुक्ष किंवा समण्यास कठीण असें झालें असलें, तरी सर्वसाधारण सुशिक्षित मनुष्याला या पद्धतीचा थोडक्यांत अभ्यास करून रोगनिवारण करून घेण्यास फारच उपयुक्त असें हें पुस्तक आहे.

मी स्वतः आयुर्वेदीय पद्धतीचा वैद्य असून मंत्रोपचार पद्धतीचा-प्रोफेसर स्पेशालिस्ट-आहे. औषधोपचारांनीं बरे न होणारे असाध्य रोग मी मंत्रोपचारांनीं बरे करितों. माझी मंत्रोपचारपद्धति ही वैदिक कालापासून म्हणजे अतिप्राचीन कालापासून चालत आलेली असून तीहि पंचमहाभूतांच्या तत्त्वावरच आधारलेली आहे. श्री. परांजपे यांच्या चिकित्सेंत मंत्रविद्येचा संबंध नसला तरी त्यांची पद्धति ही पंचमहाभूतांवरच आधारलेली असल्यामुळें ही पद्धति उपयुक्त आहे असें मला खात्रीपूर्वक वाटतें. या पद्धतीचा योग्य प्रसार झाल्यास प्रत्येक कुटुंबांत एक ' खिशांतील वैद्य ' ठेवून रोगनिवारण करणें सुलभ होईल.

अशा प्रकारची सुलभ, सुटसुटीत व स्वस्त पद्धति शोधून काढल्याबद्दल श्री. परांजपे यांचें अभिनंदन करणें योग्य आहे. अखिल हिंदी जनतेनें विशेषतः महाराष्ट्रीय जनतेनें त्यांना सक्रिय उत्तेजन दिलें पाहिजे, व या पद्धतीचा प्रचार खेडोपाडीं करून रोगनिवारण सुलभ केलें पाहिजे, असें माझें मत आहे.

**प्रोफेसर जे. गणपतराव**
स्पिरिच्युअल स्पेशालिस्ट मंत्रचिकित्सक-मोहन बिल्डिंग-मुंबई.

# अनुक्रमणिका

| परिच्छेद | विषय |
|---|---|
| १ | जिवंतपणाचीं बाह्य लक्षणें |
| २ | जिवंतपणाची अंतर्गत क्रिया |
| ३ | सहजक्रिया |
| ४ | संवर्धनक्रिया |
| ५ | शरीरसंवर्धन व जीवन शक्तिचें कार्य |
| ६ | अनिच्छित क्रिया व अंतःशक्तीचे प्रसादाचें कार्य |
| ७ | संपादन व संरक्षण यांत अंतःशक्तीचें महत्त्व |
| ८ | कर्मारंभ—कर्मप्रवृत्ति व तिचें कार्य |
| ९ | बीजाचें मूळ |
| १० | बीज व विकास |
| ११ | सृष्टीचा कार्यप्रवाह |
| १२ | गुणघटक |
| १३ | परब्रह्म गुणाधारतत्त्व—परमात्मतत्त्व |
| १४ | अनंतगुणसंपन्न परंतु एकरूप |
| १५ | घटनाविघटनाशक्ति; जीवनशक्ति व संहारशक्ति |
| १६ | स्थितिकारिणि शक्ति |
| १७ | आदिशक्ति चैतन्यशक्ति, घटना व विघटनाकारिणि शक्ति |
| १८ | इंद्रियशक्ति, सेंद्रिय शक्ति, निरिंद्रिय शक्ति, अतींद्रिय शक्ति व तिचें सामर्थ्य |
| १९ | जीवनशक्तीचें कार्य |
| २० | सृष्टिघटनासाहित्य आणि साहित्यघटना |
| २१ | शरीर आणि जीवित |
| २२ | जड व दृश्य आणि सूक्ष्म व अदृश्य घटना |
| २३ | गुणघटकांचें वर्गीकरण |
| २४ | सत्त्व व तम गुणघटकांचें कार्य |

| परिच्छेद | विषय |
|---|---|
| २५ | सत्त्व व रजोगुणघटकांचें कार्य |
| २६ | पंचमहाभूतें व त्यांचें कार्य |
| २७ | आकाशतत्त्व व कार्य |
| २८ | वायुतत्त्व व कार्य |
| २९ | तेजतत्त्व व कार्य |
| ३० | जलतत्त्व व कार्य |
| ३१ | पृथ्वीतत्त्व व कार्य |
| ३२ | पंचमहाभूतांचा व आपला संबंध |
| ३३ | पंचमहाभूतांच्या उपशक्ति व कार्य घटनाविघटनाशक्तीचें कोष्टक |
| ३४ | साहित्य व सृष्टिघटना |
| ३४ | घटनासाहित्य व स्थितिस्थापकत्व |
| ३५ | गुणघटकांचे साम्य व वैशिष्टय |
| ३६ | घटकांचें संवर्धन व इंद्रियघटक |
| ३७ | सेंद्रिय घटक व प्रकार |
| ३८ | जीवबीज |
| ३९ | बीज व मनुष्याची उत्पत्ति |
| ४० | जीवनशक्ति व संवर्धक संपादन व संरक्षण |
| ४० | संवर्धनात्मक जीवघटना |
| ४१ | संवर्धनकार्य |
| ४२ | जीवनशक्तीच्या उपशक्ति, कार्यशक्ति, कार्येंद्रिय व कार्यक्षेत्र |
| ४३ | जलतत्त्व व रसक्रिया |
| ४४ | प्राणक्रिया व पंचप्राण |
| ४५ | पृथ्वी व आकाशतत्त्वाचें घटनाकार्य |
| ४६ | जन्मापूर्वीचें व नंतरचें संवर्धनकार्य रसक्रिया विस्तार |
| ४६ | पृथ्वीतत्त्व अन्नरस |
| ४७ | अन्नरस, पृथ्वीतत्त्वावर जलतत्त्वाचा संस्कार पचनक्रिया |
| ४८ | वसारस |

| परिच्छेद | विषय |
|---|---|
| ४९ | पक्काशय व जाठररस |
| ५० | पित्तरस, स्वादुरस व आंत्ररस आणि त्यांचें कार्य |
| ५१ | वसाग्रंथि व वसावाहिन्या आणि त्यांचे कार्य |
| ५२ | पृथ्वी, कार्यशक्तीचे कार्येंद्रिय व कार्यक्षेत्र जलतत्त्व–वसारस |
| ५३ | जलशक्तीचें कार्य |
| ५४ | अशुद्ध रक्तरस |
| ५५ | जलशक्तीचें कार्येंद्रिय व कार्यक्षेत्र |
| ५६ | जलशक्तीचें संरक्षणकार्य व संरक्षक इंद्रियें तेजतत्त्व अशुद्धरक्त |
| ५७ | तेजशक्तीचें कार्य |
| ५८ | शुद्धरक्त, तेजशक्तीचें कार्येंद्रिय व कार्यक्षेत्र |
| ५९ | रसाक्रियेचें परावलंबी कार्य त्रिदोषांचें बीज वायुतत्त्व–शुद्धरक्त |
| ६० | ज्ञानरस |
| ६१ | वायुशक्तीचें कार्येंद्रिय व कार्यक्षेत्र आकाशतत्व–ज्ञानरस |
| ६२ | आकाशशक्तीचें केंद्रस्थान |
| ६३ | ज्ञानरस व जीवनशक्ति प्राणक्रिया विस्तार |
| ६४ | प्राणशक्ति; पंचवायु व्यान–आकाशाचा प्राण |
| ६५ | व्यान व त्याचें कार्य |
| ६६ | व्यानाचें कार्य प्राण वायु–वायुतत्त्वाचा प्राण |
| ६७ | प्राण व त्याचें कार्य |
| ६८ | प्राणवायूचें कार्य उदान–तेजतत्त्वाचा प्राण |
| ६९ | उदान व त्याचें कार्य |
| ७० | उदानाचें कार्य समान–जलतत्त्वाचा प्राण |
| ७१ | समान व त्याचें कार्य अपान–पृथ्वीतत्त्वाचा प्राण |
| ७२ | अपान व त्याचें कार्य ज्ञानेंद्रिय कार्यविस्तार |
| ७३ | इच्छित क्रियाकारक ज्ञानतंतु १श्रवणेंद्रिय २ स्पर्शेंद्रिय ३ चक्षुरिंद्रिय ४ रसनेंद्रिय ५ घ्राणेंद्रिय कर्मेंद्रिय-कार्यविस्तार |
| ७४ | कर्मेंद्रिय व त्यांचें कार्य; अंतःकरण संस्था |
| ७५ | अंतःकरणें |

| परिच्छेद | विषय |
| --- | --- |
| ७६ | अंतःकरण, बुद्धि, अंतःकरणांतील आत्मा, व चित्त, मन, अहंकार |
| ७७ | सहस्रदल ( शिरोब्रम्ह ) जीवनशक्तीचें केंद्रस्थान |
| ७८ | सुषुम्ना; वेणिस्थान |
| ७९ | इडा, पिंगला |
| ८० | आज्ञाचक्र |
| ८१ | स्मृतिपटल |
| ८२ | प्रयोगीमन, अहंकार, हृदयकमल |
| ८३ | जीवात्मा |
| ८४ | मेंदूचीं स्थानें व कार्य; प्रयोगी मनाची भूमिका |
| ८५ | प्रयोगी मनाचें कार्य |
| ८६ | सेव्य पदार्थांची निवडानिवड, व ती करण्याचें ज्ञान-पृथ्वी, जल |
| ८७ | सेव्य पदार्थ, तेज |
| ८८ | सेव्यपदार्थ, वायु |
| ८९ | सेव्यपदार्थ आकाश, निद्रा, विश्रांति |
| ९० | प्रयोगी मनाचें संरक्षककार्य |
| ९१ | जीवनशक्तीचें नियमबद्ध कार्य |
| ९२ | पिंडाची घटना व विकास |
| ९३ | प्रकृतिभेद |
| ९४ | आजार-रोग, विकार, व्याधि |
| ९५ | प्रकृतिवैशिष्ट्य—परिवर्तन |
| ९६ | प्रकृति कशी ठरवावी |
| ९७ | शीत प्रकृति, पृथ्वीतत्त्वप्रधान |
| ९८ | उष्ण प्रकृति, जलतत्त्वप्रधान |
| ९९ | पित्त प्रकृति, तेजतत्त्वप्रधान |
| १०० | वात प्रकृति, सुक्ष्मतेजतत्त्वप्रधान |
| १०० | मिश्र प्रकृति |
| १०१ | , शीतोष्ण प्रकृति |
| १०२ | शतिपित्त प्रकृति |

| परिच्छेद | विषय |
|---|---|
| १०३ | शीतवात प्रकृति |
| १०४ | ऊष्ण पित्त प्रकृति |
| १०५ | उष्ण वात प्रकृति |
| १०६ | वात पित्त प्रकृति |
| १०७ | मनुष्यांचें प्रकृतिभिन्नतेनुसारसामान्य प्रमाण |
| १०८ | शरीराचे वर्णाबद्दल विशेष टीप |
| १०९ | रोगनिदान |
| ११० | गर्भापासून आरोग्यहीनता |
| १११ | गर्भापासून जीवनशक्तीचें घटनात्मक व संरक्षणकार्य |
| ११२ | जीवनशक्तीचें नियुक्त कार्य, प्रयोगी व नियुक्त मंडळाच्या द्वारा |
| ११३ | संरक्षण कार्य—विजातीय द्रव्य |
| ११४ | आरोग्यनाशाचीं कारणें, आहारविषयक व इतर |
| ११५ | रोग म्हणजे खरोखर काय ? |
| ११६ | अविलंबी किंवा आशुकारि क्रिया, सौम्य, तीव्र |
| ११७ | विलंबि क्रिया |
| ११८ | विभेदक क्रिया |
| ११९ | संयोजक क्रिया |
| १२० | प्रासंगिक उत्सर्जनक्रिया |
| १२१ | संग्राहक क्रिया |
| १२२ | कष्टसाध्य व असाध्य स्थिति |
| १२३ | क्षयरूप क्रिया |
| १२४ | रोगसूचक लक्षणें |
| १२५ | उत्सर्जनक्रिया |
| १२६ | पृथ्वीतत्त्वावर भार |
| १२७ | जलतत्त्वावर भार |
| १२८ | तेजतत्त्वावर भार |
| १२९ | वायुतत्त्वावर भार |
| १३० | उपाययोजना |

| परिच्छेद | विषय |
|---|---|
| १३१ | पंचतत्त्वात्मक औषधि |
| १३२ | प्रथम निष्पत्ति–शीतप्रकृतिनियामक |
| १३३ | ,, पृथ्वीतत्त्वसहायक |
| १३४ | प्रथम निष्पत्ति ... मुख्य उपयोग |
| १३५ | ,, ... गरोदरपणांत |
| १३६ | ,, ... लहान मुलांना |
| १३७ | ,, ... सामान्य उपयोग |
| १३८ | द्वितीय निष्पत्ति... उष्णप्रकृतिनियामक |
| १३९ | ,, ... जलतत्व सहायक |
| १४० | ,, ... मुख्य उपयोग |
| १४१ | ,, ... सामान्य उपयोग |
| १४२ | तृतीय निष्पत्ति ... पित्तप्रकृति नियामक |
| १४३ | तृतीय ब निष्पत्ति मुख्य व सामान्य उपयोग |
| १४४ | तृतीय ब निष्पत्ति |
| १४५ | चतुर्थ निष्पत्ति वातप्रकृतिनियामक |
| १४६ | ,, मुख्य व सामान्य उपयोग |
| १४७ | पंचम निष्पत्ति गुणधर्म व उपयोग |
| १४८ | षष्ठ निष्पत्ति गुणधर्म व उपयोग |
| १४९ | सप्तम निष्पत्ति गुणधर्म व उपयोग |
| १५० | विषहारिणी |
| १५१ | प्राणशक्ति व विद्युत |
| १५२ | धन व ऋणविद्युत् |
| १५३ | व्यान प्राणशक्तीविशिष्ट चपला विद्युत् आकाश तत्व |
| १५४ | चपला उपयोग |
| १५५ | अपान प्राणशक्तिविशिष्ट ज्योतिष्मति, ऋणविद्युत् पृथ्वीतत्त्वी. |
| १५६ | ज्योतिष्मति–उपयोग |
| १५७ | समान प्राणशक्तिविशिष्ट–सुप्रभा. धनविद्युत् |
| १५८ | सुप्रभा–उपयोग |

| परिच्छेद | विषय |
|---|---|
| १५९ | उदान प्राणशक्तिविशिष्ट-योगभाविनी-समभावि विद्युत् तेजतत्त्वी. |
| १६० | योगभाविनी-उपयोग |
| १६१ | प्राण-प्राणशक्तिविशिष्ट-सौदामिनी-ऋणविद्युत्-वायुतत्त्वी |
| १६२ | सौदामिनी-उपयोग |
| १६३ | औषधें कशीं वापरावीं ? |
| १६४ | विलयनें करण्याची रीत |
| १६५ | विलयन-बाह्योपयोगासाठीं, विद्युतचें— |
| १६६ | शरीराचे मुख्य धन व ऋण भाग |
| १६७ | धन व ऋण भाग दाखविणारें चित्र |
| १६८ | चिकित्सा, प्रकृतिनियामक व सहाय्यक |
| १६९ | स्थूल व सूक्ष्म योजना |
| १७० | स्थूल योजना |
| १७१ | सूक्ष्म योजना |
| १७२ | सांथीचे अगर तीव्र आजारांत |
| १७३ | जीवनशक्तीला सहायक उपाय |
| १७४ | सुधारणेचा क्रम |
| १७५ | सुधारणा-विलंबि विकारांत |
| १७६ | औषधाचें प्रमाण वगैरेंत बदल |
| १७७ | औषध बदलणें |
| १७८ | रोगलक्षणें वाढण्याची कारणें व उपाय |
| १७९ | औषध तीव्र पडल्यास शमनार्थ योजना |
| १८० | गोळ्याच केव्हां द्याव्या |
| १८१ | औषधाचें प्रमाण व वेळा |
| १८२ | औषधानें प्रकृतीचा क्षोभ झाल्यास योजना |
| १८३ | मलमूत्रोत्सर्जनार्थ योजना |
| १८४ | एकाहून जास्त औषधें कशीं द्यावीं |
| १८५ | पोटांतील औषधास सहाय्यक योजना |
| १८६ | सुधारणेबरोबर औषधांत फरक |

15/180 27/2443


| परिच्छेद | विषय |
|---|---|
| १८७ | निकोप झाल्याचीं लक्षणें |
| १८८ | विद्युत्‌चा उपयोग |
| १८९ | विद्युत्‌चा उपयोग—धन व ऋण भागावर |
| १९० | इतर औषधें |
| १९१ | क्षोभशमन |
| १९२ | कुपथ्य |
| १९३ | शरीरांतील पंचतत्त्वांचें कार्य व संबंध |
| १९३ | आयुर्वेदाची मूलतत्त्वें व जीवित शास्त्र आणि संजीवन चिकित्सापद्धति |
| १९४ | आरोग्यासाठीं उपाययोजना |
| १९५ | पूर्वीच्या विवेचनाचा सारांश |
| १९५ | प्रयोगी मंडळ दुय्यम व जीवशक्ति प्रमुख |
| १९६ | जीवनशक्तीचें संरक्षणकार्य |
| १९६ | आरोग्याला बाधक गोष्टी उपाययोजनेचें स्वरूप |
| १९७ | आयुर्वेद म्हणजेच जीवितशास्त्र |
| १९७ | रोग म्हणजे काय व त्याला उपाय |
| १९८ | अयोग्य औषधाची कारण मीमांसा |
| १९९ | औषधाचें काम |
| २०० | अनेक विकार, प्रास्ताविक |
| २०१ | अनेक विकार व त्यांचीं नांवें |
| २०२ | सं. चि. पद्धति प्रमाणें रोगनिदान |
| २०३ | रोगाचें मूळ |
| २०४ | रोगबीज व रोगपरंपरा, उदाहरणें |
| २०५ | उपचाराविषयीं सामान्य सूचना |
| २०६ | अग्निमांद्य ( डिस्पेप्‌शिया ) |
| २०७ | अजीर्ण (तीव्र) मोडशी ( गॅस्ट्रायटिस्‌ ) |
| २०८ | अंडवृद्धि ( वृषणविकार ) |
| २०९ | अतिसार हगवण ( डायेरिया ) |

| परिच्छेद | विषय |
| --- | --- |
| २१० | अंतर्गळ–आंत्रवृद्धि ( हर्निया ) |
| २११ | अर्धशिशी सूर्यावर्त ( हेमिक्रेनिया ) |
| २१२ | अर्धांगवात ( पॅरॅलिसिस् ) |
| २१३ | अपतंत्रक गर्भाशयोन्माद ( हिस्टेरिया ) |
| २१४ | अपस्मार फेंफरें ( एपिलेप्सि ) |
| २१५ | अर्बुदें–ग्रंथि ( ट्यूमर्स ) |
| २१६ | अरोचक, अरुचि |
| २१७ | अलर्कविषबाधा ( हायड्रोफोबिया ) |
| २१८ | अवष्टंभ-बद्धकोष्ठ ( कॉन्स्टिपेशन् ) |
| २१९ | अशक्तता |
| २२० | अष्ठीलाविकार ( प्रोस्टेट ग्लँड ) |
| २२१ | अस्थिमार्दव-मुडदूस ( रिकेटस् ) |
| २२२ | आंकडी बालग्रह ( कन्व्हल्शन्स ) |
| २२३ | आगेरूं, अंग येणें ( रेक्टल प्रोलॅप्स ) |
| २२४ | आघात, मार बसणें, चेंचणें, खरचटणें, जखम |
| २२५ | आतपमूर्च्छा ( सनस्ट्रोक, हीटस्ट्रोक ) |
| २२६ | आंत्रपुच्छदाह ( अपेंडिसायटिस् ) |
| २२७ | आमवात, संधिवात ( ऱ्हूमॅटिझम् ) |
| २२८ | आमसंग्रहणी ( म्यूकस डायेरिया ) |
| २२९ | आम्लपित्त व परिणामशूल |
| २३० | आमांश ( डिसेंटरी ) |
| २३१ | आमाशयाधोमुखसंकोच |
| २३२ | आमाशयविस्तार ( डायलेटेशन ऑफ द स्टमक ) |
| २३३ | इसब ( एक्झिमा ) |
| २३४ | इन्द्रलुप्त, चाई |
| २३५ | उचकी हिक्का ( हिकाफ् ) |
| २३६ | उन्हाळें-मूत्रकृच्छ |
| २३७ | उदकमेह, सोमरोग ( डायाबिटीस इन्सिडिस् ) |

| परिच्छेद | विषय |
|---|---|
| २३८ | उदर ( असायटिस ) |
| २३९ | उपदंश ( सॉफ्ट शांकर ) |
| २४० | उवा |
| २४१ | उसण भरणें ( लंबॅगो ) |
| २४२ | कंठस्थपिंडविकार ( थॉयरॉईड् ग्लँडचा विकार ) |
| २४३ | कंठशालूक ( टॉंसिलॉयाटिस् ) |
| २४४ | कंपवात ( पॅरॅलिसिस् ॲजिटन्स् ) |
| २४५ | कफविकार |
| २४६ | कलायखंज ( लोकोमोटार ॲटॅक्सी ) |
| २४७ | कवळू, पानथरी, प्लीहा विकार ( स्प्लीनविकार ) |
| २४८ | कानाचे विकार ( कान वाहाणें, कानांत गळूं फोड वगैरे ) |
| २४९ | कांजिण्या ( व्हेरीसेला ) |
| २५० | कावीळ, कामला ( जॉंडिस ) |
| २५१ | काळपुळी, चाळणपुळी ( कार्बंकल ) |
| २५२ | कोड ( ल्यूकोडर्मा ) |
| २५३ | खरूज, खवडा, कंडू, गळूं वगैरे |
| २५४ | खोकला |
| २५५ | गजकर्ण |
| २५६ | गंडमाळा ( स्क्रॉफ्यूला ) |
| २५७ | ग्रंथिक सन्निपात ( प्लेग ) |
| २५८ | ग्रंथिक ज्वर ( ग्लँडयूलर फिव्हर ) |
| २५९ | गर्मी फिरंग रोग ( सिफिलिस् ) |
| २६० | गालगुंड, गालफुगी, पाषाण गर्दभिका ( मम्स् ) |
| २६१ | गिर्यतिसार ( हिल डायरिया ) |
| २६२ | गुदभेद ( फिशन ऑफ दी एनस ) |
| २६३ | गुल्म ( ॲब्डॉमि मिडियास्टॉनल टयूमर्स ) |
| २६४ | गोवर ( मीझल्स ) |
| २६५ | घटसर्प ( डिप्थेरिया ) |

| परिच्छेद | विषय |
|---|---|
| २६६ | घसा येणें ( फॅरिंजायटिस ) |
| २६७ | जंघापृष्ठशूल ( सायाटिका ) |
| २६८ | जंत कृमी ( वर्म्स ) |
| २६९ | डब्बा, ससणी उडतें ( ब्राकोन्यूमोनिय. ) |
| २७० | डांग्या खोकला ( हूपिंग कफ् ) |
| २७१ | डोकें दुखणें, शिरःशूल ( हेड अक ) |
| २७२ | डोळ्यांचे विकार ( आय डिसीजिस ) |
| २७३ | ताप, ज्वर ( फीवर ) |
| २७४ | तुंगाक्ष, गलगंड ( एक्सऑपथॅल्मिक गॉयटर ) |
| २७५ | तोतरेपणा |
| २७६ | दमा, तमक-श्वास ( अस्थमा ) |
| २७७ | दंतरोग |
| २७८ | देवी, मसूरिका, ( स्मॉल पॉक्स ) |
| २७९ | धांवरें, तांबडा, विसर्प ( एरिसिपेलस ) |
| २८० | नपुंसकत्व |
| २८१ | नवज्वर, तंद्रिक सन्निपात ज्वर ( टायफस ) |
| २८२ | नाकाचे विकार |
| २८३ | नारू ( गिनीवर्म ) |
| २८४ | नाळगूद |
| २८५ | पडसें, सर्दी |
| २८६ | पडशांची सांथ ( एन्फ्ल्यूएन्झा ) |
| २८७ | परमा ( गनोरिया ) |
| २८८ | पंडुरोग |
| २८९ | पित्ताशयविकार, पित्ताशयदाह, पित्तास्मरी |
| २९० | पैण, आगपैण |
| २९१ | पोटदुखी, पोटशूळ |
| २९२ | फुफ्फुसदाह श्वसनक ज्वर ( न्यूमोनिया ) |
| २९३ | फुफ्फुसावरणदाह ( प्ल्यूरसी ) |

| परिच्छेद | विषय |
|---|---|
| २९४ | ब्रॉकोन्यूमोनिया |
| २९५ | बेरिबेरी |
| २९६ | भगंदर ( फिश्चुला इन् एनो ) |
| २९७ | भोंवळ, चक्कर ( गिडिनेस ) |
| २९८ | मधुमेह ( डायाबिटिस मिलिटस ) |
| २९९ | मधुरा, विषम, आंत्रिकज्वर ( टॉयफॉइड ) |
| ३०० | मस्तिष्कज्वर, मेंदू ज्वर ( मेनिंजायटिस् ) |
| ३०१ | मास्तिष्कदौर्बल्य ( न्यूरास्थेनिया ) |
| ३०२ | मुखपाक, तोंड येणें |
| ३०३ | मुतखडा |
| ३०४ | मूळव्याध अर्श ( पाइल्स ) |
| ३०५ | मेदोरोग ( ओबेसिटी ) |
| ३०६ | यकृत विकार ( लिव्हर डिसीजिस ) |
| ३०७ | रक्तदाब विकार ( ब्लड प्रेशर ) |
| ३०८ | रक्तपित्त |
| ३०९ | रक्तपित्ती, वातरक्त, गलितकुष्ट, महारोग ( लेप्रसी ) |
| ३१० | रक्ताशयविस्तार |
| ३११ | रक्ताशय शूल ( अंजायना पेक्टोरिस ) |
| ३१२ | वसाग्रंथि वृद्धि ( लिंफॉडिनोमा ) |
| ३१३ | वसाधिक्य ( लिंफॅटिझम् ) |
| ३१४ | व्रण, क्षत ( अल्सर ) |
| ३१५ | वृक्कदाह, ( मूत्रपिंडदाह ) |
| ३१६ | वृक्कविद्रधी ( मूत्रपिंडांत पू होणें ) |
| ३१७ | वृक्काश्मरी, शर्करा ( रीनल कॅल्क्यूलस ) |
| ३१८ | विषूचिका, पटकी, महामारी ( कॉलरा ) |
| ३१९ | शीतज्वर, हिंवताप, पाळीचा ताप ( मलेरिया ) |
| ३२० | संग्रहणी ( स्प्रू ) |
| ३२१ | संतत ज्वर, पैत्तिक ज्वर ( रेमिटंट फीवर ) |

| परिच्छेद | विषय |
|---|---|
| ३२२ | सांधिक सन्निपात ज्वर ( डेंग्यू ) |
| ३२३ | स्नायुविक्षेप, कंप ( कोरिआ ) |
| ३२४ | स्वप्नावस्था ( वेट ड्रीम्स ) |
| ३२५ | सुषुम्नावरणदाह ( स्पायनल मेनिंजायटिस ) |
| ३२६ | स्वेद ( घाम ) विकार |
| ३२७ | क्षय, राजयक्ष्मा, शोष ( कन्झाम्शन ) |
| ३२८ | आंत्रक्षय |
| ३२९ | रक्तक्षय ( ॲनिमिया ) |
| ३३० | कफक्षय ( थायसिस ) |
| ३३१ | धातुक्षय |
| ३३२ | क्षयाचे इतर प्रकार व स्त्रियांचे विशिष्ट विकार |
| ३३३ | आर्तवाधिक्य |
| ३३४ | आर्तवाभाव, न्यूनार्तव |
| ३३५ | आर्तवशूळ, कष्टार्तव, पीडितार्तव |
| ३३६ | अंगावर दूध जास्त येणें किंवा कमी येणें |
| ३३७ | ताळू लागणें |
| ३३८ | थान पुळी |
| ३३९ | धुपणी, प्रदर |
| ३४० | नासावणें, गर्भपात |
| ३४१ | प्रसववेदना |
| ३४२ | बाळंतरोग, सूतिका रोग, बाळंत ताप |
| ३४३ | सल |
| ३४४ | गुरें ढोरें व इतर पाळीव जनावरें यांच्या रोगांवर उपाय |
| ३४५ | जीवित हेतु व आपली जबाबदारी |
| ३४६ | युक्त आहार |
| ३४७ | विश्रांति, निद्रा |
| ३४८ | हवा, सूर्यकिरण |
| ३४९ | पाणी |

| परिच्छेद | विषय |
|---|---|
| ३५० | पाणी किती प्यावें व कां ? |
| ३५१ | पाण्याची जरूरी |
| ३५२ | पिण्याचें पाणी कसें असावें |
| ३५३ | इतर पेय पदार्थ |
| ३५४ | आहारविषयक दिग्दर्शन |
| ३५५ | योग्य आहाराची निवड |
| ३५६ | सर्वांग पूर्ण आहार |
| ३५७ | आहार-जीवनशक्तियुक्त |
| ३५८ | षड्रस |
| ३५९ | खाद्य पदार्थ शिजवून अगर कच्चे खाणें |
| ३६० | प्राचीन आहारपद्धति |
| ३६१ | निःसत्त्व आहार |
| ३६२ | आहार व प्रकृतिधर्म |
| ३६३ | आहार, मित प्रमाण |
| ३६४ | आजाऱ्याचा आहार |
| ३६५ | आजाऱ्याला पौष्टिक ( टॉनिक ) |

## -: शुद्धिपत्र :-

ज्या अशुद्धामुळें फारच अर्थहानी होत आहे अशाच अशुद्धाचें शुद्धिपत्र दिलें आहे. ज्या चुका वाचतां वाचतां लक्षांत येण्यासारख्या आहेत त्यांच्या दुरुस्त्या दिल्या नाहींत.

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १२ | १७ | उत्सार्जन | उत्सर्जन |
| २१ | ३ | विटना | विघटना |
| ५१ | २१ | कर्णेंद्रियें | कर्मेंद्रियें |
| ५६ | २ | उरलेला | उतरलेला |
| ६९ | २७ | अस्वाभिक | अस्वाभाविक |
| ७१ | २२ | कडाव | कडवा |
| ९१ | १४ | ढळलून | ढकलून |
| १०३ | १६ | उपत्तीला | उत्पत्तीला |
| ११६ | ६ | दुसऱ्या | दुहेरी |
| १२४ | २१ | ह्या | ही |
| १२५ | ९ | विद्युत्च्या | विद्युत् |
| १३३ | ९ | विकृति | विकृत |
| १४४ | १ | जसा | जमा |
| १५४ | २३ | **मलः** | **मलाः** |
| १६३ | १७ | अग्निमांघ | अग्निमांद्य |
| १६७ | ५ | डागेरिया | डायेरिया |
| ,, | ३ | उंष्णंता | उष्ण |
| १७५ | ९ | बद्धकोष्ठे | बद्धकोष्ठ |
| १९९ | २५ | खुजमट | सुजमट |
| २१७ | १ | आवरवचा | आवत्वचा |
| २३४ | १४ | तोंडाचें | तोंडाचे |
| २३५ | ६ | कोन | कान |
| २४२ | १२ | तात्रि | तीव्र |
| २४२ | ११ | भथ्य | पथ्य |
| २५४ | १२ | घेण्याची | ठेवण्याची |

जीवितशास्त्र आणि संजीवन चिकित्सा-पद्धतीचे संशोधक



श्री. यशवंत काशिनाथ परांजपे

६७८४८

ॐ तत्सत्

# जीवितशास्त्रविचार आणि संजीवन-चिकित्सापद्धति

## जीवत्त्व आणि जीवितोपक्रम.

**जीवंतपणाचीं बाह्यलक्षणें**

१ प्राण्याचा जन्म शरीररूपानें होत असतो. परंतु त्या शरिरामध्यें जीवंतपणा असला तरच त्याला प्राणी किंवा जीव म्हणतात. प्राण्याचें शरीर निसर्गनियमानें तयार होऊन, त्याच्या जन्मानंतर दृष्टीस पडतें. त्याच्या ठिकाणीं, जीवंतपणा हा सुद्धां निसर्गतःच असावा लागतो. जन्म झाला म्हणजे शरीर दिसूं लागतें, परंतु त्यांत जीवंतपणा आहे कीं नाहीं हें प्रथम पहावें लागतें. श्वसनक्रिया सुरू होणें हें जीवंतपणाचें मुख्य असें बाह्यलक्षण आहे. तें झाल्याशिवाय, शरीर कितीहि उत्तम व सुरेख असलें, तरी त्याला सजीव-प्राणी म्हणतां येणार नाहीं. श्वसनक्रिया, म्हणजे बाहेरील वायू घ्राणेंद्रियाच्या द्वारा आंत घेतला जाणें आणि आंतील बाहेर सोडिला जाणें, ही क्रिया एकसारखी अहोरात्र चालत असते व ती तशी चालू असते तोंपर्यंतच प्राणी सजीवस्थितींत असतो. जीवंतपणा आणि श्वसनक्रिया हीं इतकीं एकरूप आहेत, कीं एकाशिवाय दुसरें असूं शकत नाहीं.

**जीवंतपणाची अंतर्गत क्रिया**

२ श्वसन हें मुख्य लक्षण सुरू झाल्यानें शरिरांतील रुधिराभिसरणादि दुसऱ्या क्रिया सुरू रहातात. शरीराच्या अंतर्गत भागांत त्या होत असतात, म्हणून त्यांना **अंतर्गत कर्में** असें म्हणणें अन्वर्थक होईल. अंतर्गत कर्में हीं आपोआप स्वाभाविकपणें, निसर्गधर्मानेंच, प्राणिपणानें जन्म होण्यापूर्वींच सुरू होतात. तीं करण्याला किंवा तीं व्हावीं अशी इच्छा करण्याला, आधीं प्राणिपणाच आलेला नसतो. अर्थातच तीं अनिच्छितपणानेंच होत असतात. श्वसन हें जीवंतपणाचें पहिलें मुख्य लक्षण; त्याप्रमाणेंच रुधिराभिसरणादि अंतर्गत कर्में होत रहाणें हीं दुसरीं लक्षणें होत.

प्राण्याच्या ठिकाणीं असणारा जीवंतपणा, ह्या लक्षणांनीं व्यक्त होत असला, तरी तो त्यांनीं येत नसून, जीवंतपणामुळें हीं लक्षणें होत असतात. व तीं जीवंतपणाचींच निदर्शक असतात. म्हणून शरिरामध्यें जीवंतपणा हा जन्मापूर्वींच असावा लागतो. तो तसा असेल तरच अनिच्छित अशा जीवितक्रिया सुरू होऊन जीवत्व म्हणजे जीवपणा प्राप्त होतो.

**सहजक्रिया**

३ अंतर्गत कर्मे सुरू राहिलीं म्हणजे सर्व शरीर आणि अवयव, यांना जीवितस्थैर्य प्राप्त होऊन, रडणें, हातपाय हालविणें, डोळे उघडणें व मिटणें, मलमूत्रांचा त्याग करणें इत्यादि व्यक्तपणें दृष्टोत्पत्तीस येणाऱ्या बाह्यक्रिया, क्रमाक्रमानें सुरू होतात. परंतु त्यांच्याशींहि जन्मलेल्या प्राण्याच्या इच्छेचा कांहींहि हेतुभूत संबंध नसतो. अंतर्गत कर्माप्रमाणेंच ह्या गोष्टीसुद्धां निसर्गधर्मानेंच म्हणजे अनिच्छितक्रियेनें होत असतात. प्राण्याला जीवत्व आणि जीवित हें ज्यामुळें प्राप्त होतें, त्याच चालकशक्तीच्या चालनेनें, ह्या अंतर्गत व बाह्यक्रिया होऊं लागतात. श्वासोच्छ्वास, रुधिरादि रसाभिसरण, क्षुधा, तृषा, निद्रा, जागृति, मलमूत्रोत्सर्जन, ह्या सर्व क्रिया, अनिच्छित रीतीनें म्हणजे प्राण्याच्या इच्छेशिवाय होणाऱ्या म्हणून अनिच्छित क्रिया होत. सजीवपणा आल्याबरोबर आणि जीवित असेंपर्यंत चालणाऱ्या ह्या क्रियांना **सहजकर्मे** असेंहि म्हणण्यांत येतें. ह्यांपैकीं कांहीं क्रिया होतात हें कळतें, पण उघड दिसत नाहींत, त्या **अदृश्य** आणि ज्या उघड दिसतात त्या **दृश्य** अनिच्छितक्रिया असें म्हणण्यास हरकत नाहीं. ज्या व्यक्तीमध्यें जीवंतपणा असेल त्या व्यक्तीच्या ठिकाणीं ह्या अनिच्छित क्रिया जीवंतपणाबरोबरच असावयाच्या म्हणून त्या जीविताच्या सहजक्रिया होत. ह्या क्रियांनींच जीवंतपणा व्यक्त होत असल्यामुळें, त्यांना जीवितक्रिया म्हणणें योग्य दिसेल.

**संवर्धनक्रिया**

४ जीवितक्रिया सुरू होणें आणि त्या विशिष्ट प्रकारें होत राहणें, ह्या गोष्टीला कांहीं तरी हेतु असला पाहिजे हें उघड आहे. ह्या क्रियांनीं जी विशिष्ट गोष्ट किंवा गोष्टी स्वाभाविकपणें घडून येत असतील, तोच त्यांतील हेतु असला पाहिजे, असें मानणें भाग आहे. अर्भकरूपानें जन्म झाल्यानंतर ह्या जीवितक्रियांनीं प्राण्याच्या शरीराची वाढ होत असलेली अनुभवास येत असते. जोंपर्यंत

२॥.७८७

शरीरामध्यें **जीवित** उदित असतें, तोंपर्यंत शरीराचें **संवर्धन** होत असणें हें कार्य मुख्यतः घडत असतें. रोगादिकांमुळें थोडीबहुत बिघडाबिघड होऊन मध्यंतरीं तें थांबलेलें दिसलें तरी पुन्हां **संवर्धनकार्यच** सुरू होतें.

५ एकाद्या जड पदार्थाची वाढ होण्याला त्यामध्यें त्याच पदार्थाची भर पडणें जरूरीचें असतें. तो पदार्थ अनेक पदार्थांचें मिश्रण असेल तर ते तितके पदार्थ, त्याच विशिष्ट प्रमाणांत मिश्र झाले पाहिजेत; तरच त्या पदार्थाचें **शुद्धत्व** व **वैशिष्ट्य** कायम राहील हें उघड आहे.

**शरीरसंवर्धन व जीवनशक्तीचें कार्य**

शरीराच्या वाढीला त्याचींच विशिष्ट घटकद्रव्यें मिळणें अवश्य असतें, व तीं बाह्य सृष्टींतून मिळावयाचीं असतात, शरीराच्या वाढत्या घटनेसाठीं अशा द्रव्यांची आवश्यकता उत्पन्न होते, त्या वेळीं क्षुधा, तृषा यांची जाणीव होते आणि त्या वेळीं खावें-प्यावें लागतें. क्षुधा-तृषा लागणें ही गोष्ट अनिश्चितपणें होत असते परंतु त्यामुळें खाणें व पिणें ह्या गोष्टींना इच्छित क्रियेचें रूप प्राप्त होतें, व त्या गोष्टी प्राणि प्रत्यक्ष करितो. ह्या गोष्टी करण्याची इच्छा किंवा स्फूर्ति आणि त्या ज्या इंद्रियांच्या किंवा अवयवांच्या द्वारा व्हावयाच्या, त्यांना त्या करण्याची शक्ति जीवनशक्तीनेंच प्राप्त होत असते. अशा रीतीनें जीवाच्या बाह्य कर्मांपैकीं इच्छित क्रियांचा भास होणाऱ्या क्रियांचा प्रारंभ अनिच्छित-क्रिया-चालकशक्तीकडूनच, शरीराला व जीवितक्रियेला आवश्यक असणाऱ्या द्रव्यांच्या संपादनासाठीं होत असतो. परंतु येथेंच मनुष्याच्या समजुतीच्या दिशाभुलीचाहि प्रारंभ होतो. आवश्यक संपादनाची इच्छा व तें संपादन करणें ही वास्तविक अनिच्छित क्रिया असते आणि प्रिय वाटेल तें खाणें पिणें, वगैरे गोष्टी करणें ही स्वतंत्र इच्छित क्रिया असते. आवडेल तें खाणें-पिणें, ह्या गोष्टी मनुष्य संवर्धनकार्याच्या हेतूनेंच करीत असतो असें नाहीं. आपल्याला सुख वाटावें, मजा व्हावी असा हेतु असतो. श्वासोच्छ्वास ही सुद्धां दिसणारीच क्रिया आहे. परंतु ती इच्छित क्रिया ठरत नाहीं. त्याप्रमाणेंच खाणें, पिणें, हगणें, मुतणें इत्यादि ज्या क्रिया अंतर्गत चालनेनें कराव्या लागतात, त्या करितांना इच्छा होणें हें कार्य घडत असलें तरी तें अनिच्छित क्रियेनेंच घडत असतें.

म्हणून त्यांचा सहज कर्मांतच अंतर्भाव होतो. फार तर ह्या क्रियांना **बाह्य सहज कर्म** किंवा **कर्तव्यकर्म** म्हणतां येईल.

६ मनुष्याचा जन्म झाल्यानंतर त्याला समजूं लागेपर्यंत, त्याच्या प्रत्येक बाह्येंद्रियाच्या कर्मांची व कर्मकर्तृत्वाची प्रवृत्ति कशी सुरू होते, व त्याची प्रगति कशी होत जाते, हें सूक्ष्मपणानें निरीक्षण केल्यानें सहज लक्षांत येईल.

**अनिच्छित क्रिया व अंतःशक्तीच्या प्रसादाचें कार्य**

ज्ञानेंद्रियांच्या ठिकाणीं ज्ञानग्रहणाचें आणि कर्मेंद्रियांच्या ठिकाणीं कर्में करण्याचें ज्ञान आणि सामर्थ्य मुळांत अन्य कोणाच्या शिकवणीनें किंवा कर्तृत्वानें अंकुरित होत नसतें. शरीराची व इंद्रियांची वाढती घटना सहजधर्मानें होत असतां, त्यांचे स्वाभाविक धर्म व कर्मशक्ति सूक्ष्मपणें अंकुरित होऊन विकास पावत असतात. बालकाचा जागृत असण्याचा काळ अहोरात्रांत अगदीं थोडा असतो; तरी त्या अल्पावधींत त्याची शुश्रूषा करणाऱ्या माणसांचा त्याला जो वारंवार स्पर्श होत असतो, त्यानें होणाऱ्या संवेदनेची जाणीव, अनेक वेळां एकाच प्रकारची होण्याचा अभ्यास अनायासें घडत असतो. ह्या अभ्यासानें, त्याला परिचित व अपरिचित मनुष्याचा स्पर्श ओळखितां येऊं लागतो, आणि त्यामुळें स्पर्शानें होणाऱ्या सुखाची किंवा दुःखाची जाणीव, दुसऱ्याच्या शिकवणीशिवाय, तें व्यक्त करून दाखवितें. ह्याप्रमाणेंच परिचित किंवा अपरिचित शब्द जाणणें, मनुष्य ओळखणें, एकादा नवशिका मनुष्य किंवा एकादी नवी वस्तु पाहून आनंद किंवा भीति वाटणें, खाण्यापिण्याच्या पदार्थांची बरीवाईट चव जाणणें, सुगंध-दुर्गंध जाणून आल्हाद किंवा तिटकारा येणें ह्या गोष्टी प्राण्याला कोणीहि न शिकवितां सहजधर्मानें होऊं व कळूं लागतात. परंतु त्या सर्वच जन्मतः त्याला अवगत नसतात. ह्या गोष्टींची जाणीव देणारीं इंद्रियें ( ज्ञानेंद्रियें) जन्मतः नसतात असें नाहीं. परंतु त्यांना आपापलीं कर्में करण्याची शक्ति व स्फूर्ति मिळालेली नसल्यामुळें तीं असून नसल्यासारखीं असतात. ज्ञानेंद्रियांप्रमाणेंच जीं कर्में कर्मेंद्रियांनीं करावयाचीं असतात, त्यांसंबंधींहि अशीच स्थिति आहे. केवळ अवयवांची घटना झालेली असली तरी अंतःशक्तीकडून प्रेरणा व शक्ति मिळाल्याखेरीज त्यांचेकडून त्यांचीं विहित कर्में होत नसतात. उदाहरणार्थ—पाय असूनहि मूल

चालूं शकत नाहीं; किंवा तोंड असूनहि बोलूं शकत नाहीं. त्याला उपडें वळण्याला शिकविण्याचे कोणी प्रयत्न केल्यास ते सर्व व्यर्थ जातील. परंतु योग्य काळीं अंतःशक्तीकडून त्याला चालना व शक्ति मिळतांच तें स्वयंस्फूर्तीनेंच, आपणच उपडे वळण्याचा अभ्यास करूं लागतें. याप्रमाणेंच प्रत्येक बाह्येंद्रियाला योग्य वेळीं कर्मे करण्याची स्फूर्ति व कर्तृत्व-शक्ति अंतःशक्तीकडून मिळत असते, व त्यामुळें तीं कर्तृत्वसंपन्न होऊन आपापलीं कामें करण्याचें कौशल्य संपादन करण्यास लायक होतात. परंतु कांहीं कारणानें जरूर तितका शक्तीचा पुरवठा अंतःशक्तीकडून मिळाला नाहीं तर तात्काळ तीं इंद्रियें दुर्बळ होऊन आपलीं कामें करण्यास असमर्थ होतात. ह्यावरून उघड दिसून येतें कीं, बाह्येंद्रियांची कर्मप्रवृत्ति आणि कर्तृत्व हीं अंतःशक्तीच्या प्रसादानें व्यक्त होत असतात.

**बाह्यकर्मांचें संपादन व संरक्षण यांत अंतःशक्तीचें महत्त्व**

७ हात, पाय, डोळे, कान वगैरे शरीराचीं बाह्य इंद्रियें किंवा अवयव यांच्या द्वारा होणारीं कर्मे तीं बाह्यकर्में होत. ह्यांचें **१ ज्ञानकर्में** आणि **२ कर्तृत्वाचीं कर्में** असे दोन प्रकार होतात. ज्ञानकर्मांमध्यें १ ऐकणें हा कानांचा, २ शीतोष्णादि स्पर्श जाणणें हा स्पर्शेंद्रियाचा (त्वचेचा), ३ दिसणें व पहाणें हा डोळ्यांचा, ४ चव जाणणें हा जिव्हेचा आणि ५ सुगंध किंवा दुर्गंध जाणणें हा घ्राणेंद्रियाचा स्वाभाविक धर्म आहे. असें भिन्न भिन्न प्रकारचें ज्ञान ग्रहण करण्याच्या धर्मांचीं निरनिराळीं स्वतंत्र इंद्रियें उत्पन्न करणें आणि त्यांना आपापलें कार्य करण्याचें ज्ञान, शक्ति व स्फूर्ति देणें हें कार्य **अंतःशक्तीकडूनच** होत असतें. ह्याप्रमाणेंच अर्भकपणांतच १ सुख, दुःख, भीति, आनंद, समाधान वगैरे व्यक्त करणारे शब्दोच्चार, आणि तोंडांत घातलेला पदार्थ चावणें, गिळणें किंवा थुंकून टाकणें इत्यादि तोंडाचीं कर्में; २ मुठी मिटणें किंवा उघडणें, वस्तु उचलणें व तोंडांत घालणें किंवा ती टाकून देणें इत्यादि हातांचीं कर्में; ३ रांगणें, चालणें इत्यादि पायांचीं कर्में; ४ मूत्राचें व ५ मलाचें उत्सर्जन करणें इत्यादि कर्में करण्यास प्रारंभीं त्याला कोणीहि शिकवीत नसतें. हीं जाणिवेचीं व कर्तृत्वाचीं कर्में करण्याची स्फूर्ति व शक्ति अंतःशक्तीकडूनच मिळत असते. अर्थात् ह्या बाह्यकर्माचें मुख्य सूत्र अंतःशक्तीच्या हातीं आहे.

ही गोष्ट उघडपणें अनुभवास येणारी आहे. ह्या बाह्यकर्मासाठीं इंद्रियघटना करण्याचा आणि त्यांच्याकडून तीं घडवून आणण्याचा अंतःशक्तीचा काय हेतु असला पाहिजे ही गोष्ट जीवितक्रियेशीं येणाऱ्या बाह्यकर्माच्या संबंधावरून ठरविली पाहिजे. अंतर्गतक्रियांनीं संवर्धन हें कार्य मुख्यतः घडत असतें, परंतु त्यासाठीं ज्या द्रव्यांचें संपादन करणें आवश्यक असतें, तें ह्या बाह्य कर्मांपैकीं कांहींनीं होत असतें; कांहींनीं शरिरांतील घाण बाहेर टाकण्याचें आणि कांहींनीं शरीराला अपायकारक गोष्टी पासून त्याचें संरक्षण करण्याचें कर्म घडत असतें. अर्थात बाह्यकर्में हीं संपादन व संरक्षण ह्या कार्यासाठीं अंतःशक्तीनें नियोजित केलेलीं आहेत. अंतर्गतक्रिया ह्या सर्वकाळ एकसारख्या चालू असतात. त्यांनीं एकसारखी शरीराची घडामोड होत असते आणि ती मुख्यतः संवर्धनात्मक असते. अंतःशक्तीचें तेंच ध्येय आहे व त्या ध्येयाच्या मार्गांत येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठीं बाह्येंद्रियांच्या कर्मांची आवश्यकता असते. म्हणून जरूरीच्या वेळींच बाह्येंद्रियांना स्फूर्ति व शक्ति तिच्याकडून प्राप्त होत असते, आणि तशी जरूर नसेल तेव्हां शक्तिप्रवाह बंद करून बाह्यकर्में थांबविलीं जातात. झोंपेची स्थिति हें या विषयींचें नित्य अनुभवास येणारें उदाहरण आहे. आजाराच्या स्थितींत बाह्यकर्तृत्व करितां न येण्याचेंहि वास्तविक हेंच कारण असतें. अंतर्गत कार्यानें शरिराची व इंद्रियांची वाढती व प्रगल्भ घटना होत जाते, तसतशी त्यांचें कार्य करण्याची शक्ति त्यांनां पुरविली जाते. ह्या योगानें सर्व बाह्येंद्रियें सामर्थ्यसंपन्न होतात आणि बाह्यकर्मप्रवृत्ति सर्वांगपरिपूर्ण होते. त्यामुळें मनुष्य इच्छेस येईल तें आवडतें कर्म करूं लागतो. परंतु हें सामर्थ्य बाह्यकर्मापुरतेंच असतें. शरीरघटनात्मक असें कोणतेंहि कार्य बाह्यकर्मानें प्रत्यक्ष होऊं शकत नाहीं. इच्छित क्रियेनें आपण जीवितक्रिया चालवितों, असें मानणाऱ्या मनुष्याला अंतर्गतक्रिया काय चालली आहे या विषयींचें ज्ञान केव्हांहि होत नसतें. तसेंच अंतर्गतक्रियांपैकीं एकादी क्रिया स्वतःच्या इच्छेनें त्याला चालवितां किंवा बंद करितां येत नाहीं. अर्थात् येथपर्यंत विचारांत घेतलेल्या गोष्टींवरून असें दिसून येतें कीं, **अंतर्गत कर्में** किंवा **अनिच्छित** क्रिया ह्याच जीवितविषयांत प्रमुख असून, **बाह्यकर्में** हीं साहाय्यक आहेत, आणि तीं अंतःशक्तीच्या नियंत्रणानें चालणारीं आहेत. अंतर्गतकर्माच्या स्थितीवर बाह्य

कर्माचें कर्तृत्व अवलंबून असतें, म्हणून बाह्य कर्मप्रवृत्ति ही मुख्य व स्वतंत्र नाहीं ही गोष्ट सिद्ध होते. बाह्य कर्मप्रवृत्ति गौण ठरल्यानंतर, तिचाच एक निराळा भाग असलेली **इच्छित क्रियाप्रवृत्ति** किती महत्त्वाची असणार !

## कर्मारंभ.

**कर्मप्रवृत्ति व तिचें कार्य**

८ बाह्य ज्ञानेंद्रियांच्या धर्मानें जी जाणीव होईल तेंच खरें मानणें हा प्राणिमात्राचा स्वभावधर्म आहे. ह्या नियमानुसार कर्माचा आरंभ जन्मानंतर सुरू होतो अशी सामान्य समजूत आहे. प्राण्याचें अस्तित्वच नाहीं तर त्याचें कर्म कसें संभवणार? ही समजूत बाह्य कर्मासंबंधानें बरोबर असते. परंतु अंतर्गत कर्म सुद्धां जन्मानंतरच सुरू होत असतें असें पुष्कळांना वाटतें. परंतु थोडासा विचार केल्यानंतर ही कल्पना चुकीची ठरते, प्राण्याच्या जन्मानंतर त्याच्या शरिराची जी वाढती घटना होत असते, तिला आहारविहार हें कर्म कारण असतें असें प्रत्यक्ष दिसत असतें. यावरूनच प्राण्याचें जीवित हें त्याच्या कर्माधीन आहे अशी सर्वसामान्य भावना दृढ झालेली आहे. परंतु वाढती घटना होणें हें जीवितक्रियेचें वैशिष्ट्य असून, तें कार्य अंतर्गत कर्मानें होत असतें. हें पूर्वी सिद्ध झालेंच आहे. वाढत्या घटनेचें हें कार्य, जन्मानंतर सुरू झालेलें किंवा होत असलेलें प्रत्यक्ष दिसत असलें, तरी प्राणी जन्म पावतो त्यावेळीं त्याचें जें शरीर दृष्टीस पडतें, तें गर्भामध्यें कांहीं नियमित काळपर्यंत वाढत्या घटनेनेंच तयार होऊन जन्म पावत असतें, ही गोष्टहि अनुभवसिद्ध अशीच आहे. गर्भामध्यें बीजारोपण झाल्यापासून, सर्व इंद्रियांसहित शरीराकार बनण्याची क्रिया कर्मप्रवृत्तीनेंच सुरू होत असते. अर्थात् ह्या ठिकाणीं बाह्य कर्मे करण्याची परिस्थितीच उत्पन्न झालेली नसल्यामुळें जन्म पावणाऱ्या प्राण्याच्या अंतर्गत कर्मानेंच त्याची जन्म पावण्याला लायक होण्याइतकी वाढती घटना होत असते. प्राण्याच्या जन्मानंतर काय किंवा त्यापूर्वी गर्भस्थितींत काय, वाढती घटना होणें हेंच कार्य घडत असतें व तें निसर्गधर्मानें म्हणजे अनिच्छित क्रियेनें—अंतर्गत कर्मानें—जीवितक्रियेनें होत असतें, मनुष्यप्राण्याची गर्भांतील जीवितक्रिया त्याच्या आईच्या

१ या प्रवृत्तीचें जास्त विवेचन परिच्छेदक ८५ मध्यें पहा.

जीवितक्रियेवर अवलंबून असते. जन्मानंतर ती स्वतंत्रपणें होऊं लागलेली दिसते; परंतु कांहीं काळपर्यंत ती आईच्या किंवा दाईच्या कर्मावर थोडीबहुत तरी अवलंबून राहते. तरी हें परावलंबन, संपादन व संरक्षण यापुरतेंच असतें, ही गोष्ट विसरतां कामा नये. त्याच्या **जीवितक्रिया** ह्या अंतर्गत अशा सहजधर्म किंवा कर्म, यानें होत असतात व त्या जन्मापूर्वीपासूनच सुरू झालेल्या असतात. सारांश, **कर्मप्रवृत्ति** ही प्राण्याच्या जन्मानंतर सुरू होणारी नसून ती त्याच्या जन्माला कारणीभूत होणारी आहे, व जन्म दिल्यानंतर त्याच्या जीवितक्रिया चालवून त्याचें अस्तित्व रक्षण करण्याचा भार तीच वहाते.

**बीजाचें मूळ**

९ वड, पिंपळ, आंबा वगैरे जे वृक्ष आपण पाहतों ते सर्व वाढत्या घटनेनेंच तयार झालेले असतात. अवाढव्य वाढ झालेला वृक्ष आपण पाहतों त्याची ही वाढ बीजापासून झालेली असते. परंतु तें बीजहि एकदम दृग्गोचर होत नसतें. आंब्याला मोहोर येऊन नंतर त्यांतून त्याचें फळ तयार होतें, व तें पिकतें त्यावेळीं बाठ हें त्याचें बीज तयार होतें. मोहोर फुलतो तेव्हां त्या फुलांतील आंबा किती बारीक असतो ! त्यांतील बाठ अर्थातच अत्यंत सूक्ष्म असणार ! ह्या बाठीचें मूळरूप किंवा तिचेंही बीज केवळ कल्पनागम्य इतकें अव्यक्त रूपामध्यें असतें. वाढत्या घटनेच्या क्रियेनेंच त्याला प्रथम बाठीचें व नंतर वृक्षाचें रूप प्राप्त होत असतें. ह्याच नियमाप्रमाणें मनुष्यशरिराचें गर्भस्थ बीज, हेंहि वाढलेलें रूप असून त्याचेंहि मूळरूप, त्याहून सूक्ष्म व अव्यक्त रूपामध्यें असणार, ही गोष्ट कल्पनेनें जाणतां येण्यासारखी आहे. तसेंच इतकें अव्यक्त असें त्याचें जें मूळ रूप, तेथूनच वाढती घटना होण्याचें कार्य सुरू झालेलें असलें पाहिजे हें उघड आहे.

## अव्यक्तत्व आणि व्यक्तघटना-जीवबीज.

**बीज व विकास**

१० सजीव प्राणी म्हटला म्हणजे त्याच्या ठिकाणीं **व्यक्तित्व** म्हणजेच **शरीर** आणि **जीवंत**पणा यांचा संयुक्तभाव दिसून येतो. ह्या दोहोंपैकीं, शरीर हें केवळ दिसणारें असतें. परंतु त्यामध्यें असणारा जीवंतपणा हा लक्षणांनीं जाणतां येणारा म्हणजे ज्ञेयगुण आहे. जी व्यक्ति व्यक्तकर्तृत्वयुक्त दिसते तिलाच

सजीव मानण्यांत येतें. कारण आपल्या ज्ञानेंद्रियांनीं जें ज्ञान होईल तेंच सत्य मानावयाचें हा मनुष्याचा स्वभावधर्म आहे. जी जी वस्तु दिसूं लागते ती आधीं दिसत नाहीं इतकी सूक्ष्म म्हणजे अव्यक्त रूपानें असते. ती वाढून मोठी होते तेव्हां व्यक्त दिसूं लागते. वस्तूचें जें अव्यक्तरूप, त्याला **घटक** असें म्हणतात. घटक हा अत्यंत सूक्ष्म वस्तु पाहाण्याच्या साधनांनीं दिसूं शकतो. तोहि एक वस्तुच असतो, व म्हणून तोहि अर्थातच त्याच्याहून सूक्ष्म व अव्यक्त अशा अनेक घटकांनीं बनलेला असतो. अशा घटकांना अणु व अणूंची ज्यांनीं घटना होते त्यांना परमाणु असें म्हणतात. एकादा परमाणु अशा रीतीनें वाढत जाऊन, त्याचा अणु बनणें आणि अनेक अणूंचा घटक बनणें ही गोष्ट वाढती घटना करण्याच्या धर्माशिवाय शक्य नाहीं. म्हणून ज्या अव्यक्त परमाणूंची अशी वाढती घटना होण्याची परंपरा सुरू होते तो परमाणु **जीवबीज** होय. हें बीज अर्थातच, मूळ **परमाणु घटक** आणि त्याची वाढती घटना करणारा जीवित धर्मरूप **ज्ञेय**[१] **शक्तिघटक** ह्या दोहोंचें संयुक्त रूप असतें. जीवित धर्मरूपघटक हा वस्तुतः वाढत्या घटनेनें विकासाचें कार्य करीत असतो. त्या कार्यासाठीं आकर्षणानें दुसरे घटक **संपादन** करून त्यांचें आपणा स्वतःशीं तादात्म्य करीत असतो. व रूपांतरानें वाढ घेत असतो. ह्याच क्रियेचें पर्यवसान अखेरीस प्राणिरूप पावण्यामध्यें होत असतें. तें पावल्यानंतरहि वाढत्या घटनेचेंच कार्य त्याच मूलभूत सहजधर्मानें घडत असतें. वाढत्या घटनेसाठीं आवश्यक द्रव्यें **संपादन** करण्याकरितां व त्या कार्याला बाधक होणाऱ्या द्रव्यांपासून **संरक्षण** करण्याकरितां बाह्य कर्मांची योजना होत असते.

## सृष्टीचा कार्यप्रवाह आणि उगम

११ ह्या विश्वामध्यें, आधीं ज्यांचा कांहीं मागमोसहि नसतो, किंवा ज्यांच्याविषयीं कांहीं कल्पनाहि करितां येणार नाहीं, अशा सृष्ट वस्तु दृग्गोचर होत असतात त्या अशा होतात, त्या अर्थी त्यांचें अव्यक्त अस्तित्व असलें पाहिजे हें निश्चित आहे. सृष्ट पदार्थांचें असें जें मूळ **अव्यक्त**

---

१ ज्ञेय म्हणण्याचें कारण---शक्ति कितीहि विकसित झालेली असली तरी ती तिच्या कार्यावरून जाणतां येत असते.

रूप असतें, त्याच्या अस्तित्वाची जाणीव किंवा कल्पना होण्याला, अथवा त्यांचें रूप उघडपणें प्रतीतीस येण्यासारखें होण्याला, त्याची वाढ किंवा विकास होणें आवश्यक असतें.

**सृष्टीचा कार्यप्रवाह**

ज्याला सृष्टपदार्थ असें नांव देतां येईल तो पदार्थ, मुळांत अव्यक्त असलेल्या घटकांचें एकीकृत रूप असतें. एकीकृत घटना होऊन अव्यक्त घटक व्यक्तपणास येत असतात. कालांतरानें विघटना होऊन पुन्हां ते विस्कळित व पृथक् पृथक् होऊन अव्यक्त होत असतात. अव्यक्ताला व्यक्तपणा येणें आणि व्यक्ताला पुन्हां अव्यक्तपणा येणें असा ह्या सृष्टीचा कार्यप्रवाह आहे.

**गुणघटक**

१२ विचारपूर्वक लक्षांत घेतलें असतां, असें दिसून येतें कीं, जीवकोटि किंवा जाति, ह्या दृष्टीनें साम्य दिसलें, तरी एकेका जीवकोटीपैकीं प्रत्येक व्यक्ति दुसऱ्या व्यक्तीहून गुणानें व रूपानें थोडी तरी भिन्न असते. ह्यावरून असें दिसतें कीं, त्या समान व्यक्तींतील, व्यक्तपणा पावणाऱ्या घटकांमध्यें साम्य असलें, तरी थोडें थोडें भिन्नत्व असतें. वाढत्या घटनेनें व्यक्तपणास येणारे अव्यक्त घटक, गुणानें थोडे थोडे भिन्न असल्यामुळेंच व्यक्तिवैचित्र्य दिसून येत असतें. प्रत्येक अव्यक्त घटक गुणानें थोडा थोडा भिन्न असतो म्हणून अशा प्रत्येक स्वतंत्र घटकाला **गुणघटक** असें म्हणण्यास हरकत नाहीं.

## गुणाधारतत्त्व—परमात्मतत्त्व

**परब्रम्ह**

१३ ह्या विश्वामध्यें व्यक्तपणास आलेली अनंत सृष्टि आपणांस दिसून येते. तिच्यामध्यें अनंत प्रकारें भिन्नत्व दिसून येतें. परंतु ह्या अनंतविध सृष्टीच्या ठिकाणीं अभिन्न असें जर कांहीं दिसून येत असेल तर तें **अस्तित्व** हेंच एक सर्वसामान्य आहे. व्यक्त स्थितींत काय, किंवा अव्यक्त स्थितींत काय, अस्तित्व हें सर्वत्र व सर्व काळ अगदीं अबाधित असतें. ह्या अस्तित्वाची कधीं वाढ होत नाहीं किंवा त्याचा कधीं नाशहि होत नाहीं. म्हणून प्राचीन आर्य तत्त्ववेत्त्यांनीं हें एक सर्वव्यापी, त्रिकालाबाधित, स्वतंत्र व स्वयंभू तत्त्व आहे असें ठरविलें आहे. ह्यालाच ते **परब्रह्म** किंवा **परमात्मतत्त्व** असें म्हणतात.

**अनंत गुणसंपन्न परंतु एकरूप**

१४ हें तत्त्व सर्वव्यापी असल्यामुळें सर्व गुणघटकांच्या ठिकाणीं तें भरलेलें आहे, व त्यामुळेंच त्यांना अविनाशित्व प्राप्त झालेलें आहे. सर्व गुणघटकांचें वसतिस्थानहि हेंच तत्त्व आहे. सर्व प्रकारच्या घटना व विघटना ह्याचेपासून होतात व याच्यामध्येंच त्या होत असतात. म्हणून हें सर्वांचें आधारस्थान आहे. ज्यांच्या योगानें परस्पर समान आणि परस्पर विरुद्ध धर्मांची सृष्टि उत्पन्न होते असे समान व विरुद्ध धर्मांचे सर्व गुणघटक, ह्या एका तत्त्वामध्यें नांदत असतात. याचें अस्तित्व अनंत गुणांनीं आपणांला प्रत्ययास येतें म्हणून या परमात्मतत्त्वाला अनंतगुणसंपन्न असें म्हणतात. त्याप्रमाणेंच विश्व हें त्याचेंच अनंत गुणघटकांनीं संघटित झालेलें व्यक्तरूप असल्यामुळें तें एकरूप आहे असेंहि दिसतें. ह्यावरून एकाच वेळीं एकरूपता आणि अनंतविधता असणें हा या तत्त्वाचा स्वभाव दिसून येतो.

## घटना विघटना शक्ति.

**जीवनशक्ति व संहारशक्ति**

१५ गुणघटक आणि परमात्मतत्त्व एवढ्यानेंच म्हणजे साहित्य व स्थान असण्यानें कोणतीहि घटना किंवा व्यक्त कार्य घडूं शकणार नाहीं. तें कार्य घडविणारें असें कांहीं तरी स्वतंत्र तत्त्व असलें पाहिजे हें उघड आहे. हें सर्व आपोआप होतें असें म्हणणारे कित्येक लोक आहेत. परंतु घटक ह्या साहित्याच्या ठिकाणीं घटना होण्याचा धर्म किंवा शक्ति आहे असें म्हणणें त्यांना भाग पडतें. अशी घटनारूप कार्य करणारी जी शक्ति, तिलाच उद्भवशक्ति किंवा उत्पत्तिकारिणी शक्ति असें म्हणतात. महाभूतादि संघात्मक अशी अनेकविध घटना करीत करीत अखेरीस जीवघटना करणें किंवा होणें, हें तिच्या कार्याचें मनुष्याला व्यक्तपणें दिसणारें किंवा ज्ञात होणारें पर्यवसान आहे. म्हणूनच ह्या शक्तीला **जीवभूता, जीवनकला** किंवा **जीवनशक्ति** असें म्हणतात. हिच्या कार्यानें जशा अनेक घटना होत आहेत त्याप्रमाणेंच त्यांचा नाश म्हणजे विघटना होणें हेंहि दुसरें एक कार्य घडत असतें. हें ज्या शक्तीचें कर्तृत्व आहे, तिला लयकारिणी किंवा संहारकारिणी शक्ति म्हणतात.

१६ वरील दोन्ही शक्तींनीं घडणारीं परस्पर विरुद्ध प्रकारचीं दोन्ही कार्यें प्रत्यक्ष अनुभवास येणारीं आहेत. घटनाशक्ति एकच एक कार्यकर्ती असती तर सर्व घटकांचें एकरूप मिश्रण होऊन एकच एक व्यक्त मूर्ति–पुतळ्यासारखी–उत्पन्न झाली असती विघटनाशक्ति जर एकच एक कार्यकर्ती असती तर सर्व घटक परस्परांपासून अगदीं दूरदूर पडून राहिले असते. ह्या दोन्ही शक्ति नसत्या तर केवळ स्तब्धता आली असती. ह्या दोन्ही शक्ति स्वतंत्र कार्यकर्त्या झाल्या तर परस्पर विरोधामुळें एक तर स्तब्धता मोडून कांहीं घटनाहि घडपणें नाहीं आणि विघटनाहि नाहीं अशी चमत्कारिक अवस्था झाली असती. परंतु प्रत्यक्ष अनुभवास येणारी गोष्ट ह्याहून वेगळी आहे. सर्व सृष्टिकार्य दोन्ही शक्तींच्या कार्यांनीं परस्पर विरोध न होतां चाललेलें आहे. यावरून उघड दिसतें कीं, ह्या दोन्ही शक्तींच्या कार्यांची अविरोध स्थिति ठेविणारी तिसरी एक शक्ति आहे. तिलाच **स्थितिकारिणी** असें म्हणतात. ह्या शक्तीच्या मध्यस्थीनें एकाच ठिकाणीं दोन्ही कार्यें बिनतक्रार घडूं शकतात. इतकेंच नव्हे तर कार्यें विरुद्ध असूनहि तीं परस्परांना साहाय्यकहि होतात. घटनाकार्य प्रामुख्यानें घडत असलेलें दिसतें त्या वेळीं विघटनारूपानें घाम, स्वेद, मलमूत्र इत्यादींतून विजातीय घटक उत्सार्जन पावत असतात. त्याप्रमाणेंच विघटनाक्रियेनें रक्तांतून वसावाहिन्यांमध्यें उत्सर्जन पावलेल्या द्रव्यांतून शुद्ध वसारूपानें कित्येक घटक पुन्हां रक्तामध्यें जाऊन घटना पावत असतात. अशा रीतीनें घटनाविघटना आणि विघटनाघटना या क्रिया एकाच ठिकाणीं ( शरीरांत ) व एकाच वेळीं चालत असतात व त्या एकमेकांस पोषक होत असतात हें दिसून येतें. अशा रीतीनें घटनाविघटना हीं दोन्ही कार्यें अविरोध चालू ठेवणें हें ह्या स्थितिकारिणी शक्तीचें कार्य व्यक्त दिसतें. जें कार्य प्रामुख्यानें होत असेल तें हिच्यामुळें विशेषस्थिति रूपानें दिसतें. दुसरें कार्य गौणपणानें चालत असतें म्हणून तें दिसलें तरी त्या व्यक्तीच्या ठिकाणीं ती स्थिति घटनेची किंवा विघटनेची, आहेशी भासत नाहीं.

**स्थितिकारिणी शक्ति**

## आदिशक्ति—चैतन्यशक्ति

१७ अनेक घटक एकीकृत झाले असतां एक विशेष आकार व्यक्त होतो हें अनुभवसिद्ध आहे. याच नियमाला अनुसरून **परमात्म** तत्त्वामध्यें अनंतगुण घटक एकत्रित असण्यानें जें कांहीं एक व्यक्त रूप होणें शक्य आहे तेंच **विश्वरूप** होय. तीच परमात्म्याची अनंतगुणसंपन्न एकरूपता होय. परस्पर समान व परस्परविरुद्ध असे अनंतावधि गुण, विश्वरूपानें आकर्षण करून धरण्याची, **परमात्म** तत्त्वाच्या ठिकाणीं शक्ति आहे. म्हणूनच विरुद्ध गुणहि अस्तित्वांत राहतात. परमात्मतत्त्व हें सर्व घडामोडींचें व घटकांचें आधारभूत असें आदितत्त्व असल्यामुळें त्याच्या ह्या शक्तीला **आदिशक्ति** असें म्हणतात. आंगीं कितीहि गुण असले तरी ते आंगच्या शक्तीनें प्रकाशित केल्याशिवाय असून नसल्याप्रमाणें असतात. त्यांना कांहींच महत्त्व येऊं शकत नाहीं. त्या प्रमाणेंच ते प्रकाशित न करण्यानें त्यांच्या शक्तीचेंहि अस्तित्व व महत्त्व दिसून येत नाहीं. ह्या तत्त्वाच्या ठिकाणीं जितके गुण अस्तित्वांत आहेत ते सर्व व्यक्त व प्रकाशित करणें ही गोष्ट ओघानेंच त्याच्या शक्तीचें कर्तव्य ठरतें. ह्या तत्त्वाची शक्ति हीच **आदिशक्ति** असल्यामुळें त्याचें वैशिष्ट्य सर्वस्व तिच्या ठिकाणींहि स्वाभाविकच परिपूर्ण आहे. ह्या शक्तीच्या व्याप्तीनेंच सर्व घटक आकर्षणांत राहिलेले आहेत. व्यापकतेनें गुणघटकांमध्यें असलेल्या शक्तीनें प्रत्येक गुणघटक शक्तियुक्त असतो. परंतु तो अव्यक्त व स्वतःच्या वैशिष्ट्यविशेषानें अलग असतो. सर्वांना व्यापून आधारभूत राहिलेल्या परमात्मतत्त्वाप्रमाणेंच, आदिशक्तिहि नियंतेपणानें त्या तत्त्वाशीं एकरूपतेनें आहे. ह्या नियंतेपणानेंच प्रत्येक गुणाश्रित शक्त्यंशाला, आपापल्या गुणाला व्यक्तपणानें प्रकाशित करण्याची चेतना ती देते. म्हणून तिला **चैतन्यशक्ति** असें म्हणतात. गुणांचें अनंतत्व व्यक्त करण्यासाठीं, ह्या आदिशक्तिकडून प्रत्येक गुणघटक पृथक् पृथक् करण्याची चेतना देणारी जी गति उत्पन्न होते, ती गतिरूप शक्तीच विघटनाकारिणी असून आपलें विघटनेचें कार्य ती करीत असते. त्याप्रमाणेंच अनेक घटकांच्या एकीकरणानें

**आदिशक्ति चैतन्यशक्ति**

**घटना व विघटना-कारिणीशक्ति**

गुणघटकांना व्यक्त रूप देण्याची म्हणजे एकरूपता व्यक्त करण्याची जी गति मिळते, तीच घटनाकारिणीशक्ति होऊन ती आपलें घटनेचें कार्य करीत असते. हीं दोन्ही कार्यें सतत चालू ठेविणारी व तीं एकमेकांस विरोधी न होतां पूरक व साहाय्यक होतील असें त्या दोहोंवर नियंत्रण ठेवणारी सर्व-व्यापक धर्मांची स्थितिरूप शक्ति ही चैतन्यशक्तीच होय.

१८ सृष्टिकार्य म्हणून स्वाभाविकपणें घडत असलेलें जें कार्य आपणांला दिसतें तें ह्या चैतन्यशक्तीच्या नियंत्रणानें व तिच्याकडून मिळालेल्या चेत-नेनें चालत असतें. शक्ति ही निराळी दाखवितां येणारी वस्तु नाहीं. ती ज्यामध्यें अधिष्ठित असते, त्या उपाधिरूप साधनानें घडणाऱ्या कार्यावरून जाणावयाची, अशी ती **संवेद्य** आहे. सृष्टिघटनाविघटनारूप जो कार्यप्रवाह सुरू झालेला आहे, त्यामध्यें घटनाशक्ति ही अनेक गुणघटकांचें एकरूप एकीकरण करीत जात असते व त्याचें पर्यवसान अखेरीस जीवशरीर उत्पन्न होणें हें दिसत असतें. जीव शरीर हें अनेक इंद्रियांनीं युक्त असतें. प्रत्येक इंद्रिय पृथक्कार्य-

**इंद्रियशक्ति**

कर्तृत्वशक्तिसंपन्न असतें. प्रत्येक इंद्रियाच्या ठिकाणीं असणाऱ्या कर्तृत्वशक्तीला **इंद्रियशक्ति** असें म्हणतात. जीवघटनाकारिणीशक्ति, ही इंद्रिययुक्त घटना करीत असते. म्हणजे इंद्रियें उत्पन्न करणें हा धर्म घटनाशक्तीच्या ठिकाणीं आहे. शरीराची वाढती घटना वगैरे कार्यें इंद्रियांच्या योगानें घडत असलेलीं अनुभवास येतात. परंतु शरीर हें व्यक्तरूप येईपर्यंत, इंद्रिययुक्त शरीरघटनेचीं कार्यें, गुणघटकांच्या ठिकाणीं असणारी घटनाशक्ति करीत असते. म्हणजे गुणघटकांनां घटनाशक्तीच्या कर्तृत्वानें इंद्रियत्व प्राप्त होऊन, तिच्यासह ते सेंद्रियता पावतात. म्हणून घटनाशक्तीला म्हणजेच जीवनशक्तीला, इंद्रिय-

**सेंद्रियशक्ति**

द्वारा कार्य करणारी म्हणून सेंद्रियशक्ति असें नांव दिलेलें आहे. ह्या शक्तीच्या कर्तृत्वानें ज्या घटकाला इंद्रियघटनेमध्यें स्थान मिळण्याची पात्रता आलेली असते तो इंद्रियघटक होय ( यालाच सेंद्रियघटक किंवा सेंद्रियपदार्थ म्हण-ण्याची रूढी पडली आहे. ) ज्यांच्या ठिकाणीं घटनाकार्य करण्याची किंवा एकाद्या घटनेमध्यें इंद्रियत्व किंवा इंद्रियघटकत्व पावण्याची शक्ति नाहीं, असे घटनाविरहित म्हणजे विस्कळित राहणारे जे घटक त्यांना निरिंद्रिय

घटक म्हणतात. हे घटक अर्थातच विघटनाशक्तियुक्त असतात. घटनेचा क्रम थांबला आणि वस्तूची विघटना होऊं लागली म्हणजे एकरूप एकीकरण नष्ट होऊन जे घटक पृथक् पृथक् व विस्कळित होऊन पडतात, त्यांचेंहि इंद्रियघटकत्व नष्ट झालेलें असतें. ही घटना कर्तृत्वशून्यता देणारी, म्हणजे घटनाशक्तीचा लय किंवा संहार करणारी जी शक्ति, तिला निरिंद्रियशक्ति असें म्हणतात. सेंद्रियत्व देणें किंवा निरिंद्रियत्व देणें हें कार्य गुणघटकांच्याच आश्रयानें म्हणजे उपाधीनें **जीवनशक्ति** व संहारशक्ति करीत असतात. परंतु उपाधींपासून अलग राहून, चेतनेनें ह्या गतिरूपशक्ति उत्पन्न करणारी परमात्मतत्त्वाची जी **आद्य** किंवा **चैतन्यशक्ति** तिला **अतींद्रियशक्ति** असें म्हणतात. कारण ती सर्वनियंत्रक असल्यामुळें दोहोंपैकीं कोणत्याहि शक्तीनें चाललेलें कार्य जास्त जोरानें चालविण्याची किंवा तें बंद पाडून एकदम त्या कार्याच्या उलट कार्य करण्याची चेतना देण्याचें तिच्या अंगीं सामर्थ्य आहे.

**निरिंद्रियशक्ति**

**अतींद्रियशक्ति व तिचें सामर्थ्य**

१९ जीवपणा हा जन्मानंतर येत असतो व त्यानंतर शरीराची वाढ आणि जीवितस्वास्थ्य ह्या गोष्टी आपण ज्या पोषक व संरक्षक अशा आहारविहारादि इच्छित क्रिया करितों त्यांच्या आधीन आहेत अशी सामान्य समजूत असते. परंतु खरोखर चैतन्यशक्तीच्या चेतनेनें उत्पन्न झालेल्या जीवनशक्तीनेंच जीवत्व आणि जीवित यांचा उपक्रम केलेला असतो. आणि तीच जीवनशक्ति, गुणघटकाचा परमाणु, आणि परमाणूंचा अणू व अणूचें जीवबीज अशीं वाढत्या घटनेनें तयार करिते व तीच जीवबीजाला जीवत्व व जीवंतपणा देत असते. इच्छितक्रिया करितां येण्याला उपयोगीं पडणारी बाह्य कर्तृत्व शक्ति, बाह्येंद्रियें उत्पन्न करून तिनेंच दिलेली असते. अशी जीवनशक्ति नियोजित शक्ति जीविताची नियंत्रक कशी होऊं शकेल ?

**जीवनशक्तीचें कार्य**

## सृष्टिघटनासाहित्य आणि साहित्यघटना

२० आपणांला जें जें सृष्टपदार्थरूपानें व्यक्तपणास आलेलें दिसतें, तें तें घटनेच्या क्रियेनें बनलेलें अनेक अव्यक्त घटकांचें एकीकृत रूप असतें. अर्था-

तच अव्यक्त असलेले अनंत गुणघटक, हें सर्व सृष्टीच्या घटनेचें साहित्य आहे हें उघड दिसतें. अनेक घटक एकत्र असले तरी त्यांचा वेगवेगळेपणा दिसतो; परंतु त्यांचें एकीकरण झालें म्हणजे तो स्वतंत्र व घटित असा एकच पदार्थ दिसतो व तो अनेक घटकांचे एकीकृत मिश्रण असतो. सृष्टीमध्यें अनेक **प्रकारचे** सृष्टपदार्थ घटना पावलेले दिसतात. यावरून उघड होतें कीं, अशा अनेकविध साहित्याचे समानतेच्या गुणधर्मानें जें वर्गीकरण होतें तीच **साहित्यरूप** घटना होय. सर्व गुणघटकांचें निरनिराळ्या अनेक प्रकारच्या घटनांना उपयुक्त होईल असें यथायोग्य वर्गीकरण करणें हें **चैतन्य शक्तीचें** अत्यंत चातुर्ययुक्त असें प्राथमिक घटनाकार्य आहे.

**साहित्यघटना**

२१ व्यक्त घटना पावलेले जे असंख्य सृष्टपदार्थ आपण पाहतों किंवा जाणतों, त्या सर्वांमध्यें मनुष्य प्राणि हा जास्तींत जास्त गुणसंपन्न पदार्थ होय, व त्याचाच विचार आपणांस प्रामुख्यानें करावयाचा आहे. ह्याच्या ठिकाणीं शरीर आणि जीवित (जीवंतपणा) ह्या दोहोंचें एकीकरण झालेलें व्यक्तपणें निदर्शनास येत असतें. ह्यांपैकीं शरीर हें उघड दिसणारें आणि जीवित हें लक्षणांनीं जाणतां येणारें आहे. शरीर हें जीवितरूप घटनाकर्तृत्वाशिवाय व्यक्तपणाला येत नाहीं आणि जीवित हें शरीराशिवाय ज्ञात होऊं शकत नाहीं. शरीर हें दृश्य व जड आहे आणि जीवित हें अदृश्य व सूक्ष्म आहे.

**शरीर आणि जीवित**

२२ सजीव प्राणिरूप घटना हें शक्तीचें कार्य आहे. परंतु शक्ति ही गुणाच्या आश्रयाशिवाय व गुण हे शक्तीशिवाय व्यक्त व प्रकाशित होऊं शकत नाहींत. शक्ति ही गुणाश्रयाशिवाय अव्यक्त असणारी आहे आणि सर्वहि गुणघटक स्वभावतः शक्तीनें एकीकृत घटना केल्याशिवाय अव्यक्तच असणारे आहेत. शरीर हें अनेक इंद्रियांनीं युक्त अशी जड व दृश्य घटना पावलेले गुणघटक आणि जीवित हें कर्तृत्वयुक्त अशी सूक्ष्म व अदृश्य घटना पावलेले गुणघटक, यांचीं एकीकृत रूपें असून, त्या दोहोंचेंहि एकीकृत मिश्रण असतें, तेव्हां त्याला सजीव प्राणी

**जड व दृश्य आणि सूक्ष्म व अदृश्य घटना**

ही संज्ञा प्राप्त होते. शरीर हें घटना पावणारें आहे; तें स्वतः घटना करूं शकत नाहीं, परंतु जीवित हें शरिराची घटना करीत असतें. त्याचें हें कार्य सूक्ष्म व अदृश्यपणानें चाललेलें असतें व मूळ जीवनशक्ति ही त्याची, कार्य करविणारी नियंत्रक शक्ति असते. अर्थात शरीरघटना करणारी जीवितरूप घटना ही अदृश्य व सूक्ष्म घटकांनीं बनणारी आणि शरीर ही घटना जड व दृश्य घटकांनीं बनणारी आहे असें ठरतें. अनंत गुणघटकांमध्यें परस्परविरुद्ध धर्मांचे गुणघटक असतात व ते परमात्मतत्त्वामध्यें म्हणजे एकाच ठिकाणीं असतात. प्राणिशरीरामध्येंहि जड व दृश्य आणि सूक्ष्म व अदृश्य घटना ह्या विरुद्ध धर्मांच्याच असून एकत्र दिसत असतात. शरीर आणि जीवित ह्यां-पैकीं जीवित नष्ट ( म्हणजे शरीरापासून निराळें ) झालें, म्हणजे नुसतें शरीर राहतें व त्याची विघटना होऊं लागते, आणि प्रत्येक घटक विस्कळित होत जाऊं लागतो. म्हणजे शरीररूपानें घटना पावलेले घटक संहारशक्तीच्या ताब्यांत जातात. प्राणिरूप घटना पावण्याच्या वेळीं जीवितघटनाशक्तीच्या आकर्षणानें, जे खेंचले जाऊन एकीकृत केले जातात, ते तिच्या आकर्षणां-तून सुटतांच, संहारशक्तीच्या ताब्यांत जाऊन पुन्हा विस्कळितपणा पावतात. यावरून उघड होतें कीं, शरीरघटकांचा एक आणि जीवितघटकांचा एक असे सर्व गुणघटकांचें मुख्य दोन वर्ग होतात. एकामध्यें जड व दृश्य धर्मा-च्या गुणघटकांचा आणि दुसऱ्या वर्गामध्यें सूक्ष्म व अदृश्य धर्मांच्या गुण-घटकांचा समावेश होतो. जड व दृश्य गुणघटकांचा वर्ग हा संहारशक्तीच्या ताब्यांतील म्हणजे सत्तेखालील ठरतो. आणि सूक्ष्म व अदृश्य धर्मांच्या गुणघटकांचा वर्ग हा जीवरूपानें शरीर व जीवित यांची संमिश्र घटना करणारा म्हणून घटनाकारिणी शक्तीच्या ताब्यांतील ठरतो.

**गुणघटकांचें वर्गीकरण**

२३ परमात्मतत्त्वामध्यें जे अनंत गुणघटक आहेत त्यांमध्यें एकरूपतेनें असण्याच्या धर्मांचे आणि निराळेपणानें असण्याच्या धर्मांचे अशा दोन प्रकारचे गुणघटक असल्यामुळें वरील दोन्ही वर्गांमध्यें ह्या दोन्ही प्रकारचे गुणघटक येतात. त्यामुळें सूक्ष्म व अदृश्य धर्मांच्या गुणवर्गामध्यें १ सूक्ष्म व अदृश्य-पणानें एकरूप होऊन असण्याच्या धर्मांचे व २ सूक्ष्म व अदृश्य असून निराळेपणानें असण्याच्या धर्मांचे, असे दोन प्रकार होतात.

त्याप्रमाणेंच जड व दृश्यधर्मांच्या गुणवर्गामध्यें ३ जड व अदृश्यपणानें एकरूपता पावण्याच्या धर्माचे व ४ एकरूपता न पावतां निराळेपणानें राहण्याच्या धर्मांचे असे दोन मिळून एकंदर चारप्रकार होतात. ह्यांपैकीं पहिल्या प्रकारच्या गुणघटकांच्या वर्गाला ( त्यांच्या ठिकाणीं सर्व गुणघटकांना व्यक्त व प्रकाशित करण्याचें सामर्थ्य असल्यामुळें उत्तमपणा असतो म्हणून ) **सत्त्वगुण**वर्ग असें म्हणतात; आणि चवथ्या प्रकारच्या गुणघटकांच्या वर्गाला ( स्वतः अप्रकाशित स्थितीमध्यें राहण्याच्या व एकरूप घटना होऊं न देण्याच्या धर्मामुळें ) **तमोगुण**वर्ग म्हणतात. दुसऱ्या व तिसऱ्या प्रकारचे गुणघटक सत्त्वाहून कनिष्ठ व तमाहून चांगले म्हणून मध्यम वर्गामध्यें येतात, ह्याला **रजोगुण**वर्ग म्हणतात.

**सत्त्व व तमोगुण घटकांचें कार्य**

२४ परमात्मतत्त्व हें सर्वत्र व सर्वव्यापकपणानें जडसूक्ष्मादिकाला अंतर्बाह्य व्यापून असणारें आधारभूत तत्त्व असून सर्वकाळ अभिन्नपणानें असणारें आहे. आदिशक्ति ही त्याच्याच सर्व गुणधर्मांनीं युक्त परंतु त्याच्याशीं एकरूप असून भिन्नपणानें प्रकाशित होण्याच्या धर्माची आणि त्यामुळें कमीअधिकपणानें व्यक्तता पावण्याच्या धर्माची आहे. गुणघटक हे चेतना घेणारे व शक्तीच्या योगानें प्रकाशित व व्यक्त होणारे आहेत. **परमात्म**तत्त्व केव्हांहि आणि कोठेंहि कांहीं एक बदल न होतां अस्तित्व ह्या धर्मानें असणारें म्हणून अव्यक्त, अदृश्य व सूक्ष्म धर्मांचें आहे. **आदिशक्ति** व गुणघटक हेहि मुळांत तसेच अव्यक्त, अदृश्य व सूक्ष्म असतात, परंतु **शक्ति** ही परमात्मतत्त्वाशीं एकरूप असून निराळेपणानें ज्ञात होणारी असते, आणि गुण हे तिच्याहून निराळेपणानें असणारे म्हणजे शक्तीचें कार्याखेरीज स्वतंत्रपणें आपलें वैशिष्ट्य दर्शविण्यास असमर्थ असतात. अर्थात् ह्या तिघांमध्यें थोडा थोडा फरक आहे. शक्ति ही ह्यामध्यें मध्यस्थ आहे. परमात्मतत्त्वाशीं एकरूप असणें हा तिचा सहजधर्म आहे. गुण हेहि या तत्त्वामध्येंच असून निराळेपणानें असतात. त्यांचा हा निराळेपणा नष्ट करून, स्वतःप्रमाणें त्यांना परमात्मतत्त्वामध्यें एकरूप करणें हें **एक** आणि त्यांचें वैशिष्ट्य व्यक्त व प्रकाशित करणें हें **दुसरें** कार्य तिला करावयाचें आहे. गुणांच्या ठिकाणीं स्वतः एकरूप होण्याचा धर्म नाहीं; तो त्यांच्या

 ग्रा ७६७

ठिकाणीं उत्पन्न करण्यासाठीं आणि त्या योगानें परमात्मतत्त्वाशीं एकरूप होण्याची पात्रता त्यांच्याठिकाणीं आणण्यासाठीं, ती त्यांच्याशीं एकरूप होण्याचें कार्य करीत असते. हें कार्य सहज व सुलभपणानें करितां येण्याला, गुणघटक हे तिच्याप्रमाणेंच सूक्ष्म व अदृश्य धर्माचे असतील तितके उत्तम होत. असे शक्तीशीं साम्य असणारे गुणघटक म्हटले म्हणजे **सत्त्वगुण**वर्गांतील होत. त्यांच्याशीं एकरूप होऊन **चैतन्यशक्ति** कार्योन्मुख होते आणि त्यायोगें गुणघटक कर्तृत्वशक्तियुक्त होतात.

**आदिशक्तीचें आत्मगुणधर्म-संस्कार कार्य**

सत्त्वगुणघटक आणि चैतन्यशक्ति यांची एकरूप घटना हीच सृष्टिकार्य व्यक्त व प्रकाशित करण्याचें केंद्रस्थान आहे. कोणत्याहि शक्तिरूप कार्याच्या प्रवाहाचें हें उगमस्थान आहे. गुणांशीं तादात्म्य पावून कार्योन्मुख झालेल्या ह्या शक्तीला **अतींद्रियशक्ति** ※ असें म्हणतात. ह्याच्या विरुद्ध जो **तमोगुण** वर्ग त्याच्या ठिकाणीं एकरूप न होणें हा मुख्य धर्म असल्यामुळें त्याच्या ठिकाणीं कोणतेंहि कर्तृत्व न होणें व होऊं न देणें अशी स्वयंशक्ति असते. म्हणून ह्या तमोगुणाधारशक्तीला **निरिंद्रिय**शक्ति म्हणतात. **रजोगुण**वर्गांतील गुणघटकांमध्यें कार्योन्मुख झालेल्या अतींद्रियशक्तीला घटनाकारिणी किंवा **जीवनशक्ति** म्हणतात आणि निरिंद्रिय शक्तीला विघटनाकारिणी किंवा संहारशक्ति म्हणतात.

२५ सत्त्वगुण घटक हे शक्तीपेक्षां थोडेसे जडधर्माचे असल्यामुळें, तिच्याशिवाय चैतन्य पावून आपलें वैशिष्ट्य व्यक्त करूं शकत नाहींत. शक्तीशीं तादात्म्य म्हणजे एकरूपता पावल्यानंतर ते कर्तृत्वयुक्त होतात. शक्तितादात्म्यामुळें दुसऱ्याशीं एकरूप होण्याचा धर्म व शक्ति यांना येते, व परमात्मतत्त्वाशीं एकरूप होण्याचा संस्कार घडूं लागतो. त्याप्रमाणेंच त्यांच्याशीं बरेंचसें साम्य असणाऱ्या गुणघटकांशीं एकरूप होण्याला व त्यायो-

**सत्त्व व रजोगुण घटकांचें कार्य**

---

※ एकाद्या वृक्षाचा शाखोपशाखांनीं विस्तार होत जातो त्याप्रमाणेंच ह्या अतींद्रियशक्तीच्या निरनिराळ्या प्रकारच्या घटना करणाऱ्या शक्तिरूप शाखा विस्तार पावतात. प्रत्येक शाखा आपल्या घटनाकर्तृत्वाचें वैशिष्ट्य रक्षण करून कार्य करीत असतात.

गानें घटना करण्याला हे गुण मध्यस्थ म्हणून शक्तीला उपयोगी पडतात. सत्त्वगुणघटकांशीं साम्य असणारे परंतु थोडेसे जड असे गुणघटक म्हणजे रजोगुणवर्गामध्यें समाविष्ट होणारा सूक्ष्म गुणघटकवर्ग होय. अतींद्रियशक्तियुक्त[1] झालेले सत्त्वगुणघटक, रजोगुणांतील सूक्ष्म गुणघटकांशीं एकरूप होऊन त्यांना शक्तिसंपन्न करूं शकतात; व ह्याच नियमानें व ह्याचप्रमाणें ते गुणघटक आपणाहून थोड्याशा जड गुणघटकांशीं एकरूप होऊन त्यांना शक्तियुक्त करूं शकतात. ह्याच क्रम पायरीपायरीनें केवळ जड व दृश्यधर्मी गुणघटकवर्गापर्यंत पोंचतो. यामुळें जवळजवळच्या वर्गांतील गुणघटकांची एकरूप घटना होण्याचा कार्यक्रम सुरू होतो.

**पंचमहाभूतें व त्यांचे वर्ग**

२६ सत्त्वगुणवर्गांतील गुणघटक अदृश्य व सूक्ष्म असल्यामुळें व तसें असणें हाच त्यांचा सहजधर्म असल्यामुळें ते दृश्यपणानें व्यक्त होत नाहींत. आणि सर्वच गुणघटक मुळांत अव्यक्तस्थितीमध्यें असल्याकारणानें व तमोगुणघटक हे स्वतः घटना न पावणारे असल्यामुळें व्यक्तपणें प्रकाशित होऊं शकत नाहींत. ह्या दोहोंमधील मध्यम असा जो रजोगुणवर्ग त्यांतील गुणघटकांची एकीकृत घटना व्यक्त होऊं शकते. ती तशी होण्याचा घटनाशक्तिप्रवाह वर सांगितल्याप्रमाणें सत्त्वगुणामधून उगम पावतो. ह्या रजोगुणवर्गामध्यें सूक्ष्म व अदृश्य धर्मांचे, आणि जड व दृश्य धर्मांचे अशा परस्परविरुद्ध धर्मांच्या गुणघटकांचें अस्तित्व आहे. ह्या दोहोंमध्यें असणारा विरोध नाहींसा करण्याचें कार्य चैतन्यशक्तीकडून घटनाकार्यानें घडत असतें. तें करितां येण्यासाठीं ह्या रजोगुणामधील गुणघटकांचें वर्गीकरण अधिकाधिक जडधर्मी गुणघटकांचा एकेक वर्ग या रूपानें व्यक्त झालेलें आहे. यांनाच महाभूतें म्हणतात. ह्या महाभूतांचे १ अदृश्य व सूक्ष्मधर्मी तत्त्वें आणि २ दृश्य व जडधर्मी तत्त्वें असे मुख्य दोन भाग होतात, व उभय म्हणजे वरील दोन्ही प्रकारच्या गुणांनीं युक्त अशा मिश्रधर्मीय तत्त्वांचा आणखी एक भाग पडतो. पहिल्या वर्गांत १ आकाश व २ वायु असे दोन; दुसऱ्या वर्गांत १ जल व २ पृथ्वी असे दोन; आणि उभयधर्मी असें १ तेजतत्त्व; असे हे महाभूतांचे पांच विभाग

---

१ हे घटकच अंतःकरणें होत असतात.

होतात, म्हणून यांना पंचमहाभूतें असें म्हणतात. ह्या प्रत्येक महाभूतामध्यें धर्मसाम्यानें समान असणाऱ्या गुणघटकांचा समावेश होतो.

२७ **आकाशतत्त्व**—सत्त्वगुणापेक्षां जड परंतु वास्तविक अदृश्य व सूक्ष्म असें हें पहिलें महाभूत आहे. परमात्मतत्त्वाप्रमाणें व्यापक व अंतहीन असें हे तत्त्व आहे. पोकळी ह्या रूपानें तें व्यक्त असें भासत असलें, तरी इंद्रियगम्य ज्ञानानें त्याचा आदि व अंत सांपडणें शक्य नाहीं. अत्यंत सूक्ष्म

**आकाशतत्त्व व कार्य**

अशा घटनाकारिणी शक्तीच्या कार्याला, कोठेंहि पोकळी, विरलता किंवा प्रवेशाला वाव करून देणें हा ह्या तत्त्वाचा भेदक व्यापक असा स्वभावसिद्ध **सहजधर्म** आहे. ह्या तत्त्वाचें जेथें अस्तित्व नाहीं तेथें कोणतीच घडामोड होणें शक्य नाहीं, आणि ह्याच्यामध्यें कितीहि घडामोडी झाल्या, तरी ह्या तत्त्वाची कांहींसुद्धां हालचाल होत नाहीं, व त्याची स्थिरता व अस्तित्व भंग पावत नाहीं. कोणत्याहि वस्तूचा विकास होण्याचें आधारस्थान असें हें तत्त्व आहे. आकाश म्हणजे पोकळी नाहीं अशा ठिकाणीं कोणतीच हालचाल होऊं शकत नाहीं. घटकाशीं घटक मिळून, किंवा त्यांचें एकरूप रासायनिक मिश्रण होऊन, कितीहि घनपदार्थ बनत असला तरी तो ह्या तत्त्वामध्येंच म्हणजे पोकळीमध्येंच बनत असतो, व म्हणून त्या घटित-स्थितींत कमीजास्त प्रमाणानें ह्यांचें पोकळपणा किंवा विरळपणा ह्या रूपानें अस्तित्व राहतें.

२८ **वायुतत्त्व**—आकाशतत्त्वाप्रमाणें अदृश्य व सूक्ष्म परंतु त्याच्याहून जड व प्रत्यक्ष अनुभवज्ञानानें व्यक्त भासणारें असें हें दुसरें महाभूत आहे. चैतन्यशक्ति ही परमात्मतत्त्वामध्यें एकरूपतेनें असतें त्याप्रमाणेंच हें तत्त्व

**वायुतत्त्व व कार्य**

आकाशामध्यें मिसळून असतें. आणि चैतन्यशक्तीच्या चेतनेनें जशी गुणघटकांची हालचाल सुरू होते, त्याप्रमाणेंच ह्या तत्त्वाची हालचाल सुरू झाली म्हणजे सृष्टींतील दृश्य घडामोडी सुरू होत असलेल्या दिसतात. मोकळ्या पोकळ जागेंत वाहून जाणें हा ह्याचा धर्म आहे. ह्याच्या वाहकगतीनें अनेक घट-कांची कमिजास्त प्रमाणानें हालचाल सुरू होते व त्यामुळें त्यांचें स्थलांतर व स्थित्यंतर होत असतें. वास, घाण, शीत व उष्णता, धूर, धुरळा वगैरे

अनेक हलके पदार्थ व त्याहूनहि सूक्ष्म असे घटक हे इकडून तिकडे व तिकडून इकडे वाहून नेतें. सजीव निर्जीव, वगैरे सर्व प्रकारच्या सृष्टीला अत्यंत आवश्यक असें हें तत्त्व आहे. त्याचें अस्तित्व नसेल तर घटनाविटना प्रमुख कोणतेंच कार्य घडूं शकणार नाहीं. वायु हा न मिळाल्यामुळें सजीव सृष्टीला मरण येतें, आणि हवाबंद पदार्थांची विक्रिया म्हणजे विघटनाहि थांबते. हें तत्त्व दृष्टीला दिसत नाहीं तरी स्पर्शानें व हालचालीच्या योगानें याचें अस्तित्व अनुभवास येतें. आकाशतत्त्वाशीं याचा निकट संबंध असल्यामुळें आणि पुष्कळसें सादृश्य असल्यानें याच्या प्रवाहगतीनें त्याचे थोडेसे धर्म व्यक्त केले जातात. कोंदट व दूषित जागेंत याच्या वाहण्यानें मोकळ्या जागेप्रमाणें हुषारी वाटते. निर्वात स्थितींतसुद्धां वायूचें चलन सुरू केलें असतां असेंच होतें. हें तत्त्व गतिमान असतें तेव्हां स्पर्शाला शीत म्हणजे थंड लागतें परंतु ओलावा नाहींसा करितें. यावरून ह्याच्या ठिकाणीं **शोषक** धर्म आहे असें दिसून येतें. तथापि सृष्टीचें—विशेषतः सजीव सृष्टीचें—अस्तित्व ह्याच्याशिवाय रहाणें शक्य नाहीं. म्हणून ह्या तत्त्वाला '**जगत्प्राणः** समीरणः" असेंहि म्हणण्यांत येतें. जल व पृथ्वी यांमधील घटकांना शोषकधर्मानें हलकें करून, स्वतःमध्यें मिश्र व एकरूप करून घेण्याचें कार्य ह्या तत्त्वानें घडत असतें. तसेंच तेज म्हणजे उष्णता व प्रकाश, विशेषतः सूर्यकिरण, यांतील तेजोमय घटकहि यांच्याशीं एकरूप होत असतात.

२९ **तेजतत्त्व**—सूक्ष्म व अदृश्य आणि जड व दृश्य अशा दोन्ही प्रकारच्या धर्मांनीं युक्त असें हें तिसरें महाभूत आहे. **स्थितिकारिणी** शक्ति ज्याप्रमाणें उत्पत्ति व संहारशक्तीच्या घटना व विघटना, अशा परस्पर विरुद्ध कार्यांची, अविरोध व परस्पर साहाय्यक स्थिति ठेविते, त्याप्रमाणेंच सूक्ष्म व जड अशा दोन्ही महाभूतवर्गांची अविरोध व साहाय्यक स्थिति ठेवणारें हें तत्त्व आहे. वायूप्रमाणें स्पर्शानें कळणारा उबारा आणि आकाशाप्रमाणें कल्पनेनें जाणता येणारें ओज किंवा तेजस्वीपणा हीं याचीं सूक्ष्म व अदृश्यधर्मी रूपें आहेत; आणि प्रकाशरूपानें जलाप्रमाणें दृश्य व अग्निरूपानें पृथ्वीप्रमाणें जड अशीं याचीं व्यक्त रूपें आहेत. तसेंच ज्योति हें याचें स्वतःचें मिश्रधर्मी असें मध्यस्थ रूप आहे. ह्या रूपामध्यें सर्व तत्त्वांचा प्रत्यय येतो.

**तेजतत्त्व व कार्य**

सूक्ष्म तत्त्वांच्या संयोगानें याचीं सूक्ष्म रूपें आणि जड तत्त्वांच्या संयोगानें जड रूपें प्रतीतीस येतात. ज्योति हें रूप सर्वांच्या संयोगानें प्रतीत होतें. ह्याच्या साहाय्यावांचून सृष्टींतील कोणतेंहि कार्य घडूं शकत नाहीं. सूर्य हा या तत्त्वाचा मुख्य खजिना आहे. त्यांतून ह्या तत्त्वाच्या घटकांचा नित्य पुरवठा होत असतो व प्रत्येक तत्त्वामध्यें तें समरस होत असतें.

३० **जलतत्त्व**— रजोगुणामधील जड व दृश्य गुणघटकवर्गापैकीं, परंतु त्यांतल्या त्यांत सूक्ष्म धर्माचें असें हें महाभूत आहे. तेजतत्त्वाहून हें जास्त जड व व्यक्त आहे. महासागरादिक अफाट असे जलाशय, ते ह्या तत्त्वाचे खजिने आहेत. वायु जसा आकाशाच्या आश्रयानें असतो, तसें हें पृथ्वीच्या आश्रयानें असतें. सूक्ष्म अदृश्य तत्त्वांतील वायु हा जसा वाहक आहे, तसेंच हें जड व दृश्य तत्त्वांतील प्रवाही आहे. कित्येक ओलसर घटकांना वायु हा शोषणानें हलकेपणा, शुष्कपणा व सूक्ष्मपणा देऊन स्वतः-मध्यें समरस करून घेतो, त्याप्रमाणेंच सूक्ष्म, शुष्क व हलक्या घटकांना हें द्रवरूपानें स्वतःशीं एकरूप करून घेतें. त्याच्या ह्या धर्माचा घटनेला उप-योग होतो. व तसाच विघटनेलाहि होतो. घटनेच्या कार्यामध्यें द्रवीभूत घटकांनीं एकादी घटना करून घेतां येते, आणि विघटनेच्या कार्यामध्यें विद्रावणक्रियेनें, असलेली घटना विस्कळित करितां येते. पृथ्वीतत्त्वविशिष्ट जडधर्मी घटकांमध्यें ओलसरपणाच्या रूपानें ह्याचें अस्तित्व असतें, तर वायु ह्या सूक्ष्मतत्त्वामध्यें तें सर्दपणाच्या रूपानें असतें. ह्याचें अशुद्धत्व जीवसृष्टीला बाधक व निर्जीव सृष्टीला साधक व पोषक होतें.

**जलतत्त्व व कार्य**

३१ **पृथ्वीतत्त्व** —रजोगुणामधील अगदीं जड व दृश्यधर्मी गुणघट-कांचा खजिना असें हें पांचवें महाभूत आहे. स्थिर, चर, सजीव, निर्जीव अशा अनेक प्रकारची जी व्यक्तसृष्टि उत्पन्न झालेली आहे व होत असते, तिची घन, जड व आकार-रूपघटना ह्या तत्त्वांतील घटकांनीं होत असते. कोणत्याहि घटनेला साधनीभूत होणारे जे दृश्य व जडगुणघटक, त्यांचा ह्या रजोगुणविशिष्ट पृथ्वीतत्त्वामध्यें अंतर्भाव होतो. मुख्यतः पृथ्वीचा पृष्ठभाग व कांहीं मर्यादित खोलीपर्यंतचा भाग ह्या घटकांनीं व्याप्त असतो. ह्या मर्या-

**पृथ्वीतत्त्व व कार्य**

दित भागापलीकडे तमोगुणाच्या निरिंद्रियताविशिष्ट गुणघटकांचा संग्रह असतो. सान्निध्यामुळें त्यांचा व रजोगुणघटकांचा थोड्याशा समानत्वामुळें संयोग घडत असतो. त्यामुळें घटनाविशिष्ट कार्यप्रवाहानें रजोगुणघटक एकत्रित केले जात असतां, त्यांच्या संयोगानें तमोगुणघटक भूपृष्ठावरील रजोगुणघटकांबरोबर घटनेमध्यें मिश्र होऊं शकतात, व त्यायोगानें पुष्कळ वेळां घटनाकार्याला व्यत्यय येऊन अडचण उत्पन्न होते, आणि त्यामुळें घटनेचें कार्य बिघडून जातें. यामुळें पृथ्वीतत्व हें दृश्य व जडघटनेचें मुख्य व उपयुक्त साधन असून विघटनाकार्यालाच अतिशय साहाय्यक होतें. जडपणा, घनपणा व स्वतः हालचाल न करणें म्हणजे अचेतनता व स्थिरपणा हा याचा स्वाभाविक गुणधर्म आहे.

**पंचमहाभूतांचा व आपला संबंध**

३२ आकाशापासून पृथ्वीतत्त्वापर्यंत जीं हीं पंचमहाभूतें, तीं अधिकाधिक जड व व्यक्त धर्मानें रजोगुणामध्यें समाविष्ट होणाऱ्या गुणघटकांचें पांच भिन्न प्रकारांनीं होणारें वर्गीकरण * होय. आपणांला व्यक्त दिसणारा किंवा ज्ञात होणारा प्रत्येक सृष्ट-पदार्थ, ह्या पांचहि तत्त्वांतील थोड्या थोड्या घटकांच्या एकीकृत मिश्रणानें बनलेला असतो. ह्या तत्त्वांमधील गुणघटकांच्या, प्रमाण, स्वरूप, रचना इत्यादींच्या वैचित्र्या नें आणि साम्यानें सृष्टिसाम्य दिसून येत असतें. आपण जी सृष्टि नित्य पाहतों व जिच्याशीं आपला नित्य संबंध येत असतो, आणि जिचा परिचय घडत असतो, ती सृष्टि व आपण अशीं सर्व, पृथ्वीच्या आधारानें नित्य रहात असतों. आपलें आधारस्थान पृथ्वी हें आहे आणि नित्य अवश्य लागणारें पाणि (आप-जल) प्रकाश व उष्णता (तेज) श्वसनादिकांसाठीं हवा (वायु) आणि मोकळी व खुली जागा (आकाश) यांची आपणांला वस्तुतः अनुभव-सिद्ध जाणीव आहे.

---

* रजोगुण हा अदृश्य व दृश्य दोन्ही प्रकारच्या गुणघटकांची एकीकृत घटना होण्याचें, ब्रम्हांडांतील स्थान किंवा कार्यक्षेत्र आहे, आणि अनंत असें जें आकाश-तत्त्व तें घटनासाहित्यांतील मुख्य महाभूत आहे. परमात्मतत्त्वाच्या ठिकाणीं असणाऱ्या अनंत गुणांच्या अनंत व्यक्त घटना ह्यामध्यें व्हावयाच्या असतात.

३३ घटनाकर्तृत्व हें अतींद्रियशक्तीच्या कर्तृत्वाचें म्हणजे सूक्ष्म गुणवर्गशक्तीचें आणि विघटनाकर्तृत्व हें संहारशक्तीच्या कर्तृत्वाचें म्हणजे जडगुणवर्गशक्तीचें, चैतन्यशक्तीनें नेमून दिलेलें नियुक्त कार्य आहे. रजोगुणवर्ग हा सूक्ष्म व जड गुणघटकांचा संयुक्त वर्ग असल्यामुळें, त्यांच्या स्वाभाविक धर्माला अनुसरून ह्या रजोगुणवर्गाची सत्ताधारिणी शक्ति घटनाविघटनारूप उभय कर्तृत्वधर्माची आहे. परंतु सर्व गुणघटकांची एकरूप घटना करण्यासाठीं हें वर्गीकरण झालेलें असल्यामुळें आणि तें एकरूप घटनेचें कार्य, सृष्ट पदार्थांच्या उत्पत्तिरूपानें, ह्या रजोगुणवर्गामध्यें व्यक्तपणानें घडत असलेलें दिसत असल्यामुळें ह्या वर्गाच्या शक्तीला **उत्पत्ति-कारिणी** शक्ति म्हणण्याचा किंवा मानण्याचा परिपाठ पडलेला आहे. वास्तविक पाहतां घटना आणि विघटना हीं दोन्ही कार्यें रजोगुणक्षेत्रामध्यें घडत असतात व तीं पंचमहाभूतरूप साहित्याच्या योगानें घडत असतात. प्रत्येक महाभूताचा घटनाविघटनाकार्याला साहित्यरूप उपयोग घडत असतो. प्रत्येक महाभूतावर स्वामित्व चालविणारी शक्ति ही उत्पत्तिकारिणीशक्तीची उपशक्ति होते व ती त्या त्या महाभूताच्या स्वाभाविक धर्मानुरूप भिन्न भिन्न धर्माची झालेली असते. रजोगुणवर्गाच्या सत्ताधारिणीशक्तीप्रमाणेंच तिची प्रत्येक उपशक्तिहि

**पंचमहाभूतांच्या उपशक्ति व कार्य**

---

गुणघटकांच्या धर्मभिन्नतेनें त्यामध्यें अनेक भेद आणि त्यांच्यांतील साम्यधर्मानुसार अनेक घटनासाहित्यसमूह होऊं शकतात. आपण राहतों हा भूलोक ह्या समूहांपैकीं आहे; व ह्या समूहापैकीं साहित्याचे जे पांच वर्ग तेच पंच-महाभूतें ह्या नावानें संबोधिलेले आहेत. अधिकाधिक जड ह्या तात्त्विक भेदानें हे पांच वर्ग पडलेले आहेत. ज्याच्यावर आपण राहतों त्या ह्या पृथ्वीगोलकाप्रमाणेंच, आकाशामध्यें जे अनंतविधि तारे चमकत असलेले पाहतों, ते पृथ्वी ह्या गोलकाहून थोड्या भिन्न आणि परस्परांहूनहि थोड्या थोड्या भिन्न भिन्न अशा धर्मांच्या गुणघटकांचे अनेक समूह आहेत. ह्या पृथ्वीवर जशा व्यक्त घटना व सृष्ट पदार्थ होत असतात, त्याप्रमाणेंच त्या प्रत्येक गोलकरूप समूहावर घटना होत असल्या पाहिजेत. पंचमहाभूतवर्गाप्रमाणेंच अधिकाधिक जड व दृश्य ह्या तात्त्विक भेदानें तेथील साहित्यघटनाहि होत असली

उभयधर्मीपणाचें प्रमाण मात्र, महाभूताच्या सूक्ष्मत्व व जडत्वाच्या मानानें निरनिराळें आहे. महाभूत जितकें जास्त सूक्ष्म तितकी घटनाशक्ति जास्त आणि तें जितकें जड तितकी विघटनाशक्ति जास्त अशा स्वरूपानें उपशक्तींचें त्या त्या तत्त्वावर प्रभुत्व असतें. आकाशतत्त्वापासून पृथ्वीतत्त्वापर्यंत घटनाशक्तीचें आणि पृथ्वीतत्त्वापासून आकाशापर्यंत विघटनाशक्तीचें प्रमाण एकेक कलेनें कमी होत जातें. यामुळें प्रत्येक महाभूताच्या ठिकाणीं घटना व विघटनाकर्तृत्वसामर्थ्य किती असतें तें पुढील कोष्टकावरून सहज ध्यानांत येण्यासारखें आहे.

| | आकाश | वायु | तेज | आप ( जल ) | पृथ्वी |
|---|---|---|---|---|---|
| घटनाशक्ति | ५ | ४ | ३ | २ | १ |
| विघटनाशक्ति | १ | २ | ३ | ४ | ५ |

अशा प्रकारें गुणघटकांचें साहित्यरूप वर्गीकरण होऊन त्यांपासून स्वतःचें वैशिष्टय व्यक्त व प्रकाशित करण्याला योग्य अशी त्याची शक्तियुक्त घटना चैतन्यशक्तीकडून करण्यांत आलेली आहे. सृष्टिघटनासाहित्याची ही प्राथमिक घटना होय.

## साहित्य आणि सृष्टिघटना

२४ आदिशक्तीच्या चेतनेनें पंचमहाभूतांची घटना ह्या रूपानें पदार्थघटनेचें साहित्य तयार झालेलें आहे. परमात्मतत्त्वाप्रमाणेंच त्याची शक्तिहि

---

पाहिजे. कारण अधिकाधिक जडधर्मानें येथील पंचमहाभूतांचें पृथ्वी तत्त्वा पर्यंत जे पांच वर्ग पडतात, त्यांपैकीं पहिला वर्ग जें आकाशतत्त्व तें ह्या सर्व गोलकांना आधारभूत असें एकच तत्त्व आहे. गोलकरूप प्रत्येक गुणघटकसमूहाचें अस्तित्व ह्यांतच आहे. हें तत्त्व वस्तुतः अव्यक्त आहे, आणि त्याच्या, मध्यें वायुतत्त्वापासून पुढें पृथ्वीतत्त्वापर्यंत मर्यादित व जास्त जास्त व्यक्तता परंतु कमी कमी व्यापकता, हीं क्रमानें होत जातात. एकाद्या वृक्षाला ज्याप्रमाणें फांद्या फुटतात, त्याप्रमाणेंच वायुतत्त्वापासून पृथ्वीतत्त्वापर्यंतची समूहरूपघटना ही एक फांदी आहे, व ती आकाशतत्त्वापासून पुढें फुटलेली आहे, प्रत्येक गोलकाला असेंच आकाशतत्त्वापासूनच शाखारूप आलेलें आहे, अर्थात् एका शाखेप्रमाणेंच दुसऱ्या शाखेचीहि ठोकळ स्थिति असली पाहिजे हें उघड आहे.

सर्वव्यापि असल्याकारणानें, एकरूपतेसाठीं घटनाविघटनात्मक चेतनेनें ज्या ज्या विशिष्ट घटना केल्या जातात, त्या प्रत्येकीला तिच्या आधारभूत व्यापकतेमुळें स्थितिस्थापकता प्राप्त होते. कारण प्रत्येक घटनेची घटितास्थिति सुरक्षित ठेवण्यासाठीं, त्या त्या घटनेला उपशक्तिरूप-आधारभूतपणानें व्यापून तिच्याशीं ती एकरूप राहते, आणि स्थितिस्थापक-कार्यप्रवृत्तीमुळें ती त्या त्या घटनेच्या विशिष्ट धर्माची बनते. प्रत्येक घटना-धारभूतशक्ति मूलशक्तीपासून स्वतंत्र झालेली, परंतु तिच्या घटनाकर्तृत्वाला साहाय्यक होणारी असते. प्रत्येक महाभूत अशा रीतीनें **स्थितिस्थापक-शक्तिपूर्ण** असें घटनासाहित्य होऊन राहिलेलें आहे.

**घटनासाहित्य व स्थितिस्थापकता**

३५ आपणांला जे असंख्य प्रकारचे सृष्ट पदार्थ दृष्टीस पडतात, त्या सर्वांची घटना, ह्या साहित्यरूप पंचमहाभूतांपैकीं प्रत्येकांतील घटक दुसऱ्या चार महाभूतांच्या घटकांशीं एकरूप होऊन झालेली असते. पांचहि तत्त्वांतील घटकांचें एकीकृत होण्याचें प्रमाण प्रत्येक घटनेमध्यें एकसारखेंच नसतें. तसें तें सारखेंच असतें तर निरानिराळ्या अनेक घटना झाल्या नसत्या. तसेंच प्रत्येक तत्त्वांतील सर्व घटकहि एकाच गुणधर्म-वैशिष्टयाचे नसतात. त्यांच्यापैकीं प्रत्येकाचें थोडेंथोडें भिन्न वैशिष्ट्य असतें. फक्त कोणत्या तरी एका समानवैशिष्टयामुळें त्यांचा एकेक वर्ग बनतो. उदाहरणार्थ—जडपणा ह्या समान वैशिष्ट्यामुळें पृथ्वीतत्त्व हा महाभूतवर्ग झाला आहे. परंतु ह्या एका गुणाखेरीज प्रत्येक गुणघटकाचें निराळें वैशिष्ट्य असतें व त्यामुळें तसेंच वैशिष्ट्य असलेल्या त्याच तत्त्वांतील दुसऱ्या घटकांशीं आणि तसेंच, तशाच प्रकारचें समान वैशिष्ट्य असलेल्या दुसऱ्या महाभूतांतील गुणघटकांशीं त्याचें एकीकरण होऊं शकतें. ह्याच नियमानुसार घटनाशक्तीच्या चालनेनें पंचतत्त्वांच्या एकीकृत मिश्रणाच्या भिन्न भिन्न घटना होत असतात.

**गुणघटकांचें साम्य व वैशिष्ट्य**

३६ कोणत्याहि तत्त्वाचा एकेक घटक, हा स्वतः स्वतंत्र कर्तृत्ववान नसतो. कर्तृत्वहीन घटकाला निरिंद्रिय घटक म्हणतात. आदिशक्तिमधून भिन्न भिन्न घटनावैशिष्टयपूर्ण असे जे शक्तिप्रवाह चालू झालेले आहेत, त्यामुळें अधिकाधिक वैशिष्टयपूर्ण घटना होत असतात आणि पंचमहाभूतात्मक

**घटकाचें संवर्धन व इंद्रियघटक**

प्राथमिक घटना जशी पुढील घटनेला साहित्यरूप किंवा साधनीभूत होतें, त्याप्रमाणेंच निरिंद्रियघटकांची आधीं होणारी घटना दुसऱ्या उच्च प्रकारच्या घटनेला साधनीभूत होते. ज्या वेळीं घटनाशक्तीचा प्रवाह कोणत्याहि तत्त्वाच्या घटकाशीं एकरूप होतो, त्यावेळीं त्याच्या ठिकाणीं घटना पावण्याचा धर्म उत्पन्न होतो. ह्या योगानें निरिंद्रियघटकाला **इंद्रियघटकत्व** ( तो ज्या तत्त्वाचा असेल त्या तत्त्वाचा ) म्हणजे एकाद्या इंद्रियाचा घटक बनण्याची लायकी प्राप्त होते. ही पात्रता आलेल्या पांचहि तत्त्वांच्या घटकांच्या एकीकृत मिश्रणानें इंद्रियघटना होऊं शकते. वरच्या सूक्ष्म तत्त्वाचा घटनाकर्तृत्ववान् घटक, खालच्या तत्त्वाच्या घटकांवर आपल्यासारखें सूक्ष्मत्व पावण्याचा संस्कार करून त्यांची आकर्षणानें स्वतःशीं एकीकृत घटना करून घेतो. त्यामुळें ते घटक मूळच्या सूक्ष्म घटकासह इंद्रिय बनतात व त्यामुळें तो इंद्रियघटक होतो. ह्या क्रियेनें जी घटना होते ती अशी होते कीं, मूळ घटक हा त्याच्याहून जड घटकांशीं एकीकरण पावल्यानें थोड्या जडपणांत जातो आणि जडघटक हें त्यानें केलेल्या सात्म्य देण्याच्या संस्कारानें सूक्ष्मत्व पावून एकीकरण पावतात. त्यामुळें वरच्या व खालच्या अशा दोन्ही प्रकारच्या घटकांचें मूळरूप नाहींसें होऊन, निराळेंच रूप पावून राहतात. असे निरिंद्रियस्थितींतून पुढें जाऊन इंद्रियत्व पावलेले घटक आणखी आणखी समान घटकांना सात्म्य देऊन संवर्धन पावतात, आणि मुळांत अव्यक्त म्हणजे न दिसण्याइतके सूक्ष्म असले तरी व्यक्त म्हणजे दिसण्यासारखे होतात. कोणत्याहि कारणानें त्यांचें संवर्धनकार्य बंद पडतें त्यावेळीं विघटनाक्रिया सुरू होऊन ती सर्व घटना विस्कळित होते व सर्व इंद्रियघटक निरिंद्रियघटकांमध्यें पडून जातात. परंतु त्यांच्यावर घटना पावण्याचा संस्कार झालेला असल्यामुळें दुसऱ्या एकाद्या घटनेला चटकन उपयोगी पडतात.

**सेंद्रियघटक व प्रकार**

३७ इंद्रियघटकाच्या घटनेच्या वरच्या पायरीची घटना म्हणजे सेंद्रियसृष्टिघटना होय. आकाश, वायु आणि सूक्ष्म तेज हीं तत्त्वें सूक्ष्मतेनें शक्तीला समानधर्माचीं आहेत, आणि त्यांच्या ठिकाणीं स्वाभाविकच घटनाशक्त्यंश जास्त आहे त्यामुळें ह्या घटकांच्या ठिकाणीं अल्पशी असलेली

१५१५०
२१।१२।५३

निरिंद्रियता घटनाशक्तिप्रवाहानें कुंठित होऊन ते घटक घटनाशक्ति-प्रबल होतात. आणि जडतत्त्वांवर सूक्ष्मतेचा संस्कार करण्याला व त्यांची एकीकृत घटना करून ती वाढविण्याला समर्थ होतात. इंद्रियघटकांची घटना म्हणजे विशिष्ट इंद्रियरूप घटना करण्याच्या आणि ती संवर्धित करण्याच्या शक्तीनें सामर्थ्ययुक्त असे हे घटक सेंद्रियघटक होत. पृथ्वी, जल वगैरे जडतत्त्वांच्या घटकांवर सूक्ष्मत्वाचा संस्कार करून त्यांना सात्म्य देतांना त्यांच्या ठिकाणीं असलेल्या निरिंद्रियतेचा प्रतिकार करण्यांत बरीच शक्ति वेंचिली जाते. त्यामुळें त्यांच्या ठिकाणीं इंद्रियघटकांना पूर्णपणें सूक्ष्मत्व देण्याचें सामर्थ्य रहात नाहीं. त्यामुळें साहित्यरूप अशा जडत्वविशिष्ट घटकांच्या प्राबल्यानें झालेली घटना, इंद्रियत्वानें कार्य करण्यालाच जास्त लायक होऊन राहते. कारण त्यांच्या ठिकाणीं घटनाकर्तृत्वाला दौर्बल्य आलेलें असतें. अशा रीतीनें सेंद्रिय घटकांमध्यें १ घटनाकर्तृत्वप्रबल आणि घटना साहित्यप्रबल म्हणजे—घटना करण्याला समर्थ आणि घटना पावण्याला समर्थ असे दोन प्रकारचे सेंद्रिय घटक उत्पन्न होतात. तसेच ते एकेका तत्त्वाच्या आधिक्यानें, एकेक तत्त्वविशिष्ट धर्माचेहि होतात.

२८ ह्या सेंद्रिय घटकांच्या घटनेच्या वरची पायरी म्हणजे पांचहि तत्त्वांच्या सेंद्रियघटकांची एकीकृत घटना होय. ह्या घटनांचें संवर्धन झाल्यानें त्यांचें जीवकोटीमध्यें पर्यवसान होतें. म्हणून अशा प्रकारच्या पंचतत्त्वात्मक सेंद्रिय घटना ह्या जीवकोटींचीं बीजें होतात. हीं बीजरूप घटना होतांनाहि त्यांचे दोन प्रकार होतात. पृथ्वी आप व जडतेज यांच्यापैकीं सेंद्रिय घटकांच्या आधिक्यानें झालेलीं बीजें **घटनासाहित्यप्रबल** आणि आकाश, वायु व सूक्ष्म तेज यांच्यापैकीं सेंद्रिय घटकांच्या आधिक्यानें झालेलीं बीजें **घटनाकर्तृत्व-प्रबल** होतात. ह्या दोन्ही प्रकारच्या बीजांच्या एकीकरणानें शरीर आणि जिवंतपणा यांनीं युक्त व संवर्धक घटना पावणारें बीज तयार होऊन वाढूं लागतें. ह्या उभय बीजांच्या मिश्रणामध्येंहि साहित्यप्रबल घटकांच्या बीजाचें प्राबल्य असल्यास मादी किंवा स्त्री, आणि कर्तृत्वप्रबलघटकांच्या बीजाचें

**जीवबीज**

१ ही घटना सेंद्रिय शक्तीला घटनेच्या कार्यांत साहित्यरूपानें घटकन उपयुक्त म्हणून तिला साहित्यप्रबल हें नांव अन्वर्थक होतें.

प्राबल्य असेल तर नर किंवा पुरुष, अशी घटना होऊन वाढ झाल्यानंतर जन्म पावणारा प्राणि मादी किंवा नररूपानें जन्म पावतो. घटनाकारिणी शक्तीच्या घटनाकर्तृत्वाचें पर्यवसान अशा रीतीनें उद्भिज्ज, स्वेदज, अंडज, जारज अशा जीवकोटींची उत्पत्ति होण्यामध्यें झालेलें आहे.

३९ मनुष्यप्राणि ह्या नामरूपानें आपण जी व्यक्ति जाणतों, ती शरीर आणि जीवंतपणा यांची संमिश्र घटितस्थिति आहे. व्यक्तिमात्राची जन्मतः दिसणारी ही व्यक्तघटना स्त्रियांच्या गर्भाशयामध्यें गर्भरूपानें होत असते. स्त्रीबीज आणि नरबीज यांचें गर्भाशयामध्यें एकीकरण होऊन गर्भसंभव होत असतो. स्त्रीबीजें गर्भाशयामध्यें असूनहि शरीररूपानें घटना पावूं शकत नाहींत. त्याप्रमाणेंच पुरुषबीजेंहि पुरुषांच्या शरीरामध्यें असूनहि शरीराकार पावत नाहींत. पुरुषशरीरामध्यें निसर्गतःच शरीरघटना होण्याची सोय केलेली नसते. ती सोय गर्भाशयरूपानें स्त्रीशरीरामध्यें असते व त्या ठिकाणींच उभय बीजें एकीकृत होऊन शरीरघटना होते. यावरूनच उघड होतें कीं स्त्रीबीज हें वस्तुतः देहबीज म्हणजे घटनासाहित्यप्रबल बीज आहे. म्हणून घटनाकर्तृत्वप्रबल बीजासाठीं घटना पावण्याचें कार्य अडून राहतें. त्याची प्राप्ति झाली म्हणजे घटनेचें कार्य सुरू होते. देहबीजाप्रमाणेंच शरीरघटना होण्याला स्त्रीच्या स्वतःच्या जीवितक्रियेनें तयार होणाऱ्या सेंद्रिय घटनासाहित्याचा गर्भाशयामध्यें पुरवठा होत असतो. त्याच्या योगानें अंतर्बाह्य सर्वेंद्रियसंपन्न पिंडघटना परिपूर्ण झाल्यानंतर प्राण्याचा जन्म होतो.

**बीज व मनुष्याची उत्पत्ति**

४० गर्भसंभवाचे वेळीं दोन्हीहि बीजें अणुप्रमाण सूक्ष्म असतात. तीं एकरूप होऊन त्यांचें संवर्धन होत असतें. जन्मानंतरसुद्धां मनुष्य वयामध्यें येईपर्यंत तरी त्याचें संवर्धन होत असलेलेंच दिसत असतें. अर्थात शरीर आणि जीवंतपणा ह्या संमिश्र स्थितीचा आदि अव्यक्त गुणघटक हा असून त्याच्या संवर्धनानें त्याला व्यक्तपणा येतां येतां प्राणिपणानें पूर्ण व्यक्तपणा येतो, आणि त्यानंतरहि त्याचें संवर्धन होत असणें हेंच व्यक्त कार्य घडत असलेलें दिसत असतें. जीवरूपानें घटनापर्यवसान करणारी **जीवभूता–जीवनकला**–किंवा **जीवनशक्ति** हिचें

**जीवनशक्ति व संवर्धन, संपादन व संरक्षण**

जीवंतपणासहित शरीराचें संवर्धन करणें हें व्यक्त कार्य असल्यामुळें त्याला तिचें **संवर्धनकार्य** हें यथार्थ नांव आहे. तें कार्य करण्यासाठीं घटना-साहित्याची आवश्यकता असते, म्हणून तें **संपादन** करण्याचें आणि विघटनाकारक, संहारशक्तियुक्त, निरिंद्रिय घटकांचा शरीराबाहेर त्याग करण्याचें म्हणजे **संरक्षणाचे** कार्य करणें अत्यंत आवश्यक असतें. हीं तिन्हीं कार्यें शरीर आणि जीवंतपणा यांच्या योगानें ती करीत असते. हीं कार्यें योग्य रीतीनें कारितां येण्यासारखी शरीरघटना जीवाच्या जन्मापूर्वींच अत्यंत चातुर्यानें ती करून ठेवीत असते.

## संवर्धनात्मक–जीवघटना

४१ शरीर आणि जीवंतपणा अशा संमिश्र स्थितीनें मनुष्यप्राणी जन्म पावतो, त्यावेळीं त्याचें सर्वावयवसंपन्न असें व्यक्तरूप दिसूं लागतें. ह्या रूपानेंच पुढें त्याची वाढती घटना होण्याचें **संवर्धन** कार्य सुरू होतें. जन्म पावण्याचें संवर्धनकार्य जसें अनिच्छित रीतीनेंच होत असतें, त्याप्रमाणेंच तें जन्मानंतरहि अनिच्छित रीतीनेंच होऊं लागतें. तें होण्याची सोय, शरीरामध्यें जन्माचे वेळींच तयार झालेली असते. त्या क्रिया करणारीं निरनिराळीं इंद्रियें शरीराच्या अंत-र्भागीं असतात. ह्या इंद्रियांच्या द्वारा कार्य करणाऱ्या शक्ति, शरीरघटनाकार्यनियंत्रक **जीवनशक्तीच्या** सहाय्यक उपशक्ति होत.

**संवर्धन कार्य**

४२ जीवघटनेमध्यें पांचहि महाभूतांपैकीं प्रत्येक तत्त्वाच्या वैशिष्ट्याचे अनेक सेंद्रियघटक समाविष्ट झालेले असतात. संवर्धनकार्यानें व साहित्यसंपादनाच्या योगानें, त्यांची आणखीं आणखीं भर पडत असते. त्यामुळें एकेका तत्त्वाच्या वैशिष्ट्याचा एकेक असे पांच घटकसंघ शरीरांत होतात. प्रत्येक संघांतील घटकांच्या, शरीरघटनेंतील उपयुक्त कार्याचें नियंत्रण, एकेक उपशक्ति करीतअसते. प्रत्येक तत्त्वाच्या घटनाकार्याचें नियंत्रण करून **जीवनशक्तीला** साहाय्य करणारी एकेका तत्त्वाची उपशक्ति म्हणजे प्रत्येक तत्त्वाची **कार्यशक्ति** होय. शरीरांतील ज्या केंद्रामधून म्हणजे

**जीवनशक्तिच्या उपशक्ति**

स्वतः विशिष्ट इंद्रियामधून तीजीवनशक्ति साहाय्यक कार्य करिते व सर्व शरीरभर पसरलेल्या स्वतःच्या घटकांचें नियंत्रण करिते, तें केंद्र किंवा इंद्रिय,

**कार्यशक्ति कार्येंद्रिय व कार्यक्षेत्र**

त्या कार्यशक्तीचें **कार्येंद्रिय** होय. आणि तिच्या नियंत्रणाखालील, तिनें स्वतत्त्वघटकांनीं केलेला घटनाविस्तार हें तिचें **कार्यक्षेत्र** होय. प्रत्येक कार्यशक्तीचें हें कार्यक्षेत्र सर्व शरीरभर पसरलेलें असतें. कारण शरीरांतील कोणताहि बिंदुमात्र भाग घेतला तरी त्याठिकाणीं पांचहि तत्त्वाचे घटक असल्याशिवाय घटना होणें शक्य नाहीं.

४३ वाढत्या घटनेच्या कार्यासाठीं पांचहि तत्त्वांच्या घटकांचें निरनिराळ्या रीतीनें संपादन करावें लागतें. सेंद्रिय शरीरघटकांत त्याचें रूपांतर करून सर्व शरीरघटनेमध्यें तें एकरूपतेनें मिसळून टाकावयाचें असतें, व त्यासाठीं त्यांना अत्यंत सूक्ष्मरूप देऊन, अगदीं अत्यंत सूक्ष्म ठिकाणींहि एकरूपतेसाठीं

**जलतत्त्व व रसक्रिया**

वाहून न्यावयाचें असतें. जडतत्त्वांपैकीं आप ( जल ) हें प्रवाहितत्त्व, प्रवाहरूपानें कार्य करण्यास आणि घटकांना स्वतःच्या रूपामध्यें मिश्र करून घेऊन अवश्य त्याठिकाणीं वाहून नेण्यास उपयोगी पडण्याच्या धर्मांचें आहे. म्हणून ह्या तत्त्वाच्या प्राधान्यानें **रसक्रिया**प्रमुख घटनाकार्याची योजना **जीवनशक्तीनें** केलेली आहे. त्यामुळें पंचतत्त्वाच्या धर्माचे पांच रस, रसक्रियेनें बनवून, त्यांच्या योगानें संवर्धकघटनाप्रवाह चालविण्याचें कार्य **कार्यशक्तींकडून** ती करून घेते.

४४ वायु हें सूक्ष्म तत्त्वांपैकीं प्रवाहक गुणधर्मांचें तत्त्व आहे. ह्या तत्त्वाच्या निरनिराळ्या प्राणकेंद्रांतून कार्यशक्तींना प्राणक्रियेनें साहाय्यक उपयोग

**प्राणक्रिया व पंचप्राण**

होण्याची व्यवस्था जीवनशक्तीनें केलेली आहे. प्रत्येक तत्त्वाच्या रसाची शुद्धता रक्षण करण्याचें व सेंद्रियशक्तिपूर्ण करण्याचें कार्य त्या त्या तत्त्वाचा प्राण करीत असतो. ह्यामुळेंच पंचप्राण रूपानें प्राणांचें पांच भिन्न गुणधर्मयुक्त कार्य स्वरूप झालेलें आहे. तेज हें स्वतंत्र तत्त्व नसून तें उभयसंयोगी आहे. त्यामुळें उभयधर्मीयत्वानें तें रसक्रिया व प्राणक्रिया ह्या दोहोंचा परस्परसाहाय्यक संबंध रक्षण करण्याचें कार्य करीत असते.

 ऑ. ९८७

४५ पृथ्वीतत्त्व हें स्वतः जड व अचेतन तत्त्व आहे. यामुळें तें स्वतः सचेतनकार्य करण्याला दुर्बल आहे. पृथ्वीतत्त्वविशिष्ट **कार्यशक्ति** आपल्या सजातीय घटकांना, जलतत्त्वाच्या साहाय्यानें, निरिंद्रिय स्थितींतून **इंद्रिय-घटकत्व** देऊं शकते. ह्या कार्यानें पृथ्वीतत्त्वविशिष्ट इंद्रियघटकांचा उपयोग शरीर आणि इंद्रियें यांचा पाया घालण्यालाहोतो. तसेंच शरीराचा व इंद्रियांचा आकार बनविण्याला व तो वाढविण्याला त्यांचा उपयोग होतो आणि इंद्रिय घटकत्व पावलेल्या शक्य तितक्या घटकांवर जास्त सूक्ष्मत्व देण्याचा संस्कार करण्याला जलादि कार्यशक्तींना साहाय्यक उपयोग होतो. याप्रमाणेंच **आकाश** हें तत्त्वहि स्वयंकर्तृत्ववान् नाहीं. परंतु सर्व घटना-कार्याला आंतून व बाहेरून पोकळीरूपानें वाव करून देणें आणि सर्व-व्यापकपणानें सर्व शरीरभर विरलता ठेवून अत्यंत घनस्थानीं म्हणजे टणक अस्थींमध्यें सुद्धां इतर तत्त्वांच्या घटकांचा प्रवेश होण्याला सच्छिद्रता ठेवणें हें अत्यंत महत्त्वाचें कार्य ह्या आकाशतत्त्वापासून होत असतें.

**पृथ्वी व आकाश तत्त्वांचें घटनाकार्य**

४६ गर्भावस्थेमध्यें पिंडघटना करीत असतांनाच जीवनशक्ति ही संवर्धन-कार्य चालविण्याला आवश्यक असलेल्या सर्व सोयींनीं परिपूर्ण अशी अंतर्गत सुव्यवस्थित घटना करीत असते, आणि ती करीत असतांनाच, तिच्याच द्वारा संवर्धनकार्य चालवीत असते. ह्या ठिकाणीं म्हणजे गर्भाशयामध्यें साहित्यसंपादनाचें कार्य मात्र परावलंबी असतें. गर्भिणी स्त्रीचाच एक अवयव अशा रीतीनें गर्भाचें पोषण होत असल्यामुळें त्याच्या वाढत्या घटनेला लागणारें साहित्य, तिच्या शरीरघटक साहित्यांतून त्याला परभारें मिळत असतें. स्वतंत्र रीतीनें जीविताक्रिया चालविण्यालायक पिंडघटना झाल्यानंतर त्याचा जन्म होत असतो, आणि संवर्धक असें पंचात्मक साहित्य संपादन करण्याचें कार्य स्वतंत्र रीतीनें सुरू होतें. तें करितां येण्या-साठीं शरीराच्या बाह्य भागीं हात, पाय, नाक तोंड वगैरे इंद्रियें उत्पन्न करून ठेवलेलीं असतात. संवर्धनाला आवश्यक व उपयुक्त साहित्याचा शरीराच्या अंतर्भागीं प्रवेश झाल्याबरोबर अंतर्गत क्रियांनीं त्याचें शरीरघटनेमध्यें रूपां-तर होण्याचें कार्य सुरू होतें. घटनासाहित्याचे जड व सूक्ष्म असे जे दोन वर्ग,

**जन्मापूर्वींचें व नंतरचें संवर्धनकार्य**

त्यांपैकीं पृथ्वीतत्त्वविशिष्ट अन्नमय आणि जलतत्त्वविशिष्ट प्रवाहि साहित्याचें शरीरांत प्रवेश करण्याचें मुख्य द्वार तोंड आणि सूक्ष्म तत्त्वांच्या प्रवेशाचें मुख्य द्वार नाक हें आहे. इतर बाह्येंद्रियांपैकीं कांहींचा संपादनाला आणि कांहींचा मलोत्सर्जक धर्मानें संरक्षण कार्याला व कांहीं संपादन व संरक्षण ह्या दोहोंनाहि उपयोग होत असतो. कोणत्या बाह्येंद्रियाचा कसा उपयोग होतो हें पुढें क्रमानें येणारच आहे. अंतर्गत इंद्रियांचें कार्य कसें चालतें तें आपणांला आधीं पहावयाचें आहे.

## रसक्रियाविस्तर–पृथ्वीतत्त्व–अन्नरस

**अन्नरस पृथ्वीतत्त्वावर जलतत्त्वाचा संस्कार**

४७ जीवनशक्तीकडून होणारें जीवसंवर्धन हें, शरीर आणि जीवंतपणा ह्या संमिश्र स्थितींचेंच व्हावयाचें असतें. ह्यांपैकीं शरीराच्या व इंद्रियांच्या वाढीला म्हणजे जड व व्यक्त घटनेला जडतत्त्वविशिष्ट साहित्याची आवश्यकता असते. या कार्याला उपयोगी पडणारें साहित्य इंद्रियघटकसंपन्न सेंद्रियत्त्वसंपन्न आणि जीवनशक्तियुक्त असावें लागतें. असें साहित्य म्हणजे खाद्यपेयस्वरूपाचें अन्नविशिष्ट ( एकदल किंवा द्विदल धान्यें, कंद, मुळें, फळें, भाजीपाला वगैरे ) पदार्थ होत. ह्यांची निपज जलावांचून होत नसते. ह्या पदार्थांची घटना पांचहि तत्त्वांनींच घटनाशक्तीकडून होत असते, आणि मुख्यतः जलतत्त्वाच्या योगानें रसक्रियेनेंच होत असते. त्यामुळें ह्या पदार्थांमध्यें स्वाभाविकच जल मिश्र झालेलें असतें. परंतु धान्यपदार्थांमध्यें पृथ्वीतत्त्वाच्या घटकाचें आधिक्य असतें. त्यामुळें ते पदार्थ जलमिश्रित करून ( शिजवून, भिजवून, फुगवून वगैरे ) घ्यावे लागतात.अन्नविशिष्ट पदार्थ हे उद्भिज्ज कोटींतील सृष्टीपैकीं असतात, व त्यांची घटना जलाच्या साहाय्यानें पृथ्वीतत्त्वाच्या घटकांनींच मुख्यतः झालेली असते. म्हणून पृथ्वीतत्त्वविशिष्ट घटक हेच अन्नरूप पावलेले असतात.अशा रीतीनें मनुष्य हा संवर्धनोपयोगी पृथ्वीतत्त्व अन्नरसरूपानें सेवन करीत असतो. ह्या अन्नरसरूपानें जडसाहित्याचे शरीरामध्यें प्रवेश करण्याचें मुख्य द्वार तोंड हें आहे. ओंठाच्या आंत अन्न गेल्याबरोबर, पृथ्वीतत्त्वाची कार्यशक्ति, त्याला शरीरघटनेमध्यें समरस करून घेण्यासाठीं, शरीर व इंद्रियघटकत्व आणि शक्य

तितकें सूक्ष्मत्व पावून सेंद्रियत्व पावण्याचे संस्कार घडवूं लागतें. जलतत्त्वाचें पृथ्वी-तत्त्वाशीं जडत्वधर्मानें साम्य व सजातीयत्व असल्यानें, वरच्या सूक्ष्मतत्त्वांकडे जाण्याची लायकी उत्पन्न होण्यासाठीं व त्यांच्यावर संस्कार घडविण्याचें रसक्रियाकर्तृत्व बजावण्यासाठीं, तें तिला साहाय्यक होऊन, तिचें कार्य सुलभ करितें. अन्नमय पदार्थ मुखामध्यें पडल्यापासून, त्याचें शरीरघटक-रसामध्यें रूपांतर करण्याचें जें हें कार्य सुरू होतें त्याला पचनक्रिया असें म्हणतात.

**पचनक्रिया**

४८ अन्न हें पंचतत्त्वांचेंच मिश्ररूप असतें. प्रत्येक तत्त्वाचे घटक आपापल्या कार्यक्षेत्रांत घटनेसाठीं उपयोगीं पडावयाचे असतात. यासाठीं अन्नांतील पांचहि तत्त्वांच्या घटकांवर आपापल्या तत्त्वाचें रसरूपवैशिष्ट्य पावण्याचे संस्कार घडाविण्यासाठीं पांचहि तत्त्वांच्या वैशिष्ट्याचे पाचक-रस क्रमाक्रमानें अन्नरसामध्यें मिश्र होऊन पचनक्रिया घडत जाते. पृथ्वीतत्त्वविशिष्ट अन्नरसापैकीं शक्य तितक्या घटकांचें पुढील तत्त्वामध्यें म्हणजे जलतत्त्वामध्यें रूपांतर व्हावयाचें असतें. रूपांतर पावलेल्या रसाला जलरस किंवा वसारस अथवा लसिका ( लिंफ् ) असें म्हणतात. तोंडांत अन्न घातल्यानंतर चर्वण होत असतां त्यामध्यें लाळ येऊन मिसळत असते. ही लाळ लालापिंडांमध्यें उत्पन्न होऊन, चर्वण होत असतांना, सूक्ष्म नलिकांच्या द्वारा तोंडांत येऊन अन्नामध्यें मिसळत असते. ह्या लालापिंडाच्या दोन जोड्या आहेत. एक जोडी हनुवटीजवळ असते. तिला हनुलालापिंड म्हणतात, आणि दुसरी कानांचे खालचे बाजूस असते, तिला कर्णलालापिंड म्हणतात. ह्या दोन प्रकारच्या लाळांपैकीं एक खारट व दुसरी तुरटसर असते. खारटपणा हा पृथ्वीतत्त्वविशिष्ट अन्नांशाचें सजातीयरूपांतर करण्यासाठीं आणि तुरटपणा हा **आकाश-तत्त्वाचा रस**, अन्नाचें घनत्व नाहींसें करून त्याला विरलत्व देण्यासाठीं उपयोगीं पडतो. ह्या क्रियेला चर्वणाचें फार सहाय्य होतें. जितकें उत्तम चर्वण होईल तितकें अन्नाचें उत्तम विद्रावण होऊं शकते, आणि लाळेचें त्याशीं एकरूप मिश्रण होऊं लागतें. तोंडांतील ह्या क्रियेनें कित्येक अन्नघटकांचें पूर्ण पचन होऊन, त्यांना जलरूप म्हणजे **वसारस**रूप प्राप्त होतें व बाकीचे

**वसारस**

अन्नघटक गिळले जाण्यासारखे लुबलुबीत होऊन पुढील पचनक्रिया घडण्याला लायक होतात. तोंडामध्यें असा तयार झालेला लगदा गिळीत असतां त्यामधील, लाळेनें जलरूप पावलेला भाग सूक्ष्मशोषक नलिकांनीं ( वसावाहिन्यांनीं ) शोषिला जाऊन तो रक्ताशयांत पोंचविला जातो. अन्नामध्यें मिसळणाऱ्या लाळेनें त्यांतील पिष्टमय पदार्थांची साखर बनते. चर्वण नीट न केल्यानें पिष्टमय व घनपदार्थ तसेच्या तसेच पोटांत जातात व त्यांचें जलरसामध्यें रूपांतर न होतां उलट ते पुढील पचनक्रियेला अडथळा मात्र उत्पन्न करितात.

४९ वरच्या टोंकास तोंड आणि खालच्या टोंकास गुदद्वार असलेली एक लांबच्या लांब नळासारखी पिशवी असून ती घशापासून छातींतून पोटापर्यंत सरळ उतरलेली आहे. शिंपीपोटाच्या डाव्या बाजूस तिचा एक लांबट आकाराचा फुगीर भाग आहे. मागील म्हणजे अन्नप्रवेशाच्या बाजूचा भाग मोठा असून पुढील मार्गाकडचा भाग आंवळता झालेला आहे. ह्या फुगीर पिशवीला म्हणजे आंतड्यांच्या भागाला पक्काशय किंवा आमाशय अथवा जठर असें म्हणतात. चावून गिळिलेलें अन्न ह्या ठिकाणीं येतें. ह्या जठराच्या बाजूंना पुष्कळ स्नायु असतात. जठरामध्यें अन्न आल्याबरोबर ते आळीपाळीनें आकुंचन व प्रसरण पावूं लागतात. त्यामुळें पक्वाशयाची वळवळ सुरू होऊन अन्नाचें मंथन सुरू होतें. तें सुरू होतांना जठरांतूनच जाठर रस किंवा आमरस नांवाच्या रसाचा स्राव होऊं लागतो; आणि मंथनानें अन्नाशीं ह्या रसाचे मिश्रण होऊं लागतें. हा रस अगदीं आंबट चवीचा आहे. ह्याच्या योगानें अन्नामधील मांसोत्पादक पदार्थांचें पचन होऊन त्यांना जलरसरूप प्राप्त होतें, व तें शोषक नलिकां ( वसावाहिन्यां ) कडून रक्ताशयामध्यें पोचतें होतें. ह्या आंबट रसामध्यें आणखी असा एक धर्म आहे कीं अन्नांतून जठरामध्यें येणाऱ्या रोगजंतूंचा तो संहार करितो.

**पक्काशय व जाठर किंवा आमरस**

५० पक्काशयामध्यें होणाऱ्या पचनक्रियेनें तयार झालेला रस शोषकनलिकांनीं—वसावाहिन्यांनीं—शोषून घेतल्यानंतर शिल्लक राहिलेल्या अन्नांशाचा मंथनानें गोळा बनून तो एका कूटव्दाराच्या वाटे आंतड्याच्या पुढील भागा-

मध्यें ढकलला जातो. हा भाग लहान म्हणजे बारीक आंतड्यांचा एक भाग आहे. ह्याला स्नेहपाचनी किंवा ग्रहणी असें म्हणतात. पक्काशयांतील जाठर–आमरस हा जलतत्त्वाचा रस आहे. त्यानें तेजतत्त्वविशिष्ट आणि वायुतत्त्वविशिष्ट पदार्थ पचविले न गेल्यामुळें ते ह्या ग्रहणीमध्यें येतात.

**पित्त, स्वादु व आंत्ररस आणि त्याचें कार्य**

ह्या ठिकाणीं उजव्या बाजूस बरगड्यांखालीं असलेल्या यकृत ( जरंडी ) नांवाच्या पिंडामध्यें तयार होऊन पित्ताशयामध्यें सांठलेला पित्तरस एका नळीनें पुढें येऊन, डाव्या बरगड्यांखालीं असलेल्या प्लीहा ( कवळू-पानथरी ) पिंडाच्या खालच्या बाजूस पोटांत असलेल्या स्वादु ( वक्रगंड ) पिंडांतील स्वादुरस दुसऱ्या नळींतून पुढें येऊन एका संयुक्त नलिकेमध्यें त्यांचें मिश्रण होतें व तें त्या अन्नावर पडत असतें. ह्या मिश्ररसाच्या योगानें अन्नांतील स्निग्ध पदार्थांचें व तसेंच हिरव्याकच्या आणि पूर्वीच्या पचनक्रियेनें न पचणाऱ्या अन्नाचें पचन होऊन जलरूपरस तयार होत जातो, तो सूक्ष्म नलिकांनीं शोषण केला जातो आणि तो यकृतामध्यें पोंचविला जातो. ह्या मिश्ररसांची पचनक्रिया पुरी झाली म्हणजे शिल्लक राहिलेल्या अन्नामध्यें लहान आंतड्यांतीलच कांहीं रसनलिकांमधून आंत्ररस नांवाचा रस येऊन मिसळत असतो. ह्या लहान आंतड्यांतून अन्न खालीं खालीं सरकून जात असतां ह्या आंत्ररसानें बनलेला जलरस शोषकनलिका शोषून घेतात आणि तो एका मोठ्या वसावाहिनीमध्यें सोडितात. ही वसावाहिनी त्याला एका अशुद्धवाहिनीमध्यें सोडून देते. ह्या आंत्ररसानेंहि न पचलेला भाग मोठ्या आंतड्यामध्यें ( नळामध्यें ) उतरतो आणि मलरूप पावून उत्सर्जित होतो.

५१. पचनाक्रियेनें रसरूप पावलेल्या पृथ्वीतत्त्वविशिष्ट अन्नरूप द्रव्याला शरीरघटकत्व प्राप्त होतें. शारीरिक क्रियाव्यापारांच्या योगानें ह्या घटकांची शक्ति खर्च होऊन ते दुर्बल होतात. पृथ्वीतत्त्व हें संहारशक्तीच्या आधिक्याचें असल्यामुळें त्या घटकांना दुर्बलता आल्यानें तिचें प्राबल्य वाढूं लागतें व ती पुर्णपणें प्रबल झाल्यास तिचें विघटनाकार्य सुरू होईल. म्हणून शक्य तितक्या अशा दुर्बल

**वसाग्रंथि, वसावाहिन्या व त्यांचें कार्य**

घटकांना पुन्हां संजीवित करण्यासाठीं आणि संहारप्रवृत्त झालेल्या घटकांना उत्सर्जित करण्यासाठीं सर्व शरीरभर संरक्षक सोय करून ठेविलेली आहे. शरीरामध्यें सर्वत्र अत्यंत सूक्ष्मशोषक रसवाहिन्या म्हणजे वसावाहिन्या पसरलेल्या आहेत. त्याप्रमाणेंच जागोजाग व सांध्यासांध्यांनीं लहान मोठ्या अनेक वसाग्रंथी उत्पन्न करून ठेविलेल्या आहेत. ह्या वसाग्रंथी आजूबाजूच्या वसावाहिन्यांचीं केंद्रें आहेत. रक्तमांसांतील दुर्बल झालेल्या घटकांना वसावाहिन्या शोषून घेतात आणि वसाग्रंथींकडे वाहून नेतात. ह्या ग्रंथींकडे जात असतां त्या दुर्बल घटकांवर पचनक्रियेप्रमाणेंच संस्कार घडून कांहीं अशुद्ध वसेला शुद्धत्व **प्राप्त** होतें व ती जवळच्या अशुद्ध ( रक्त ) वाहिनीमध्यें सोडून दिली जाते. वसाग्रंथीमध्यें येणाऱ्या अशुद्ध वसेवरहि असाच संजीवन पावण्याचा संस्कार होऊन, शुद्ध झालेली वसा, अशुद्ध रक्तामध्यें प्रविष्ट होते, आणि शुद्धत्व न पावलेली शिल्लक वसा घाम, स्वेद अशा रूपानें किंवा खरूज, फोड वगैरे मधून पू, लस इत्यादि रूपानें शरीराबाहेर उत्सर्जित केली जाते.

**पृथ्वीकार्यशक्तीचें कार्येंद्रिय व कार्यक्षेत्र**

५२ तोंडापासून सुरुवात होऊन लहान आंतड्याच्या शेवटापर्यंत अन्नविशिष्ट पदार्थांची पचनक्रिया होत असते, त्यांपैकीं शक्य तितक्या द्रव्याला रसरूप दिलें जातें. अन्न हें मुख्यतः पृथ्वीतत्त्वविशिष्ट असल्यामुळें आणि त्याला सेंद्रियरूप देण्याचें कार्य ह्या भागामध्यें होत असल्यामुळें, हा भाग **पृथ्वीतत्त्वविशिष्ट कार्यशक्तीचें कार्येंद्रिय** आहे हें उघड होतें. तोंड हें अन्नग्रहणाचें द्वार असून त्यांतून घांस घांस अन्न घेऊन ज्या मुख्य ठिकाणीं सांठविलें जाऊन त्याचें मंथनक्रियेनें मुख्य पचन होतें, तो **पक्काशय** किंवा जठर हें या कार्यशक्तीचें सहजच केंद्रस्थान आहे असें ठरतें. तसेंच शरीरभर असलेल्या वसावाहिन्या व वसाग्रंथी हें **पृथ्वीकार्यशक्तीचें** कार्यक्षेत्र ठरतें. ह्याप्रमाणेंच मोठें आंतडें व गुदद्वार आणि शरीराचा बाह्यभाग हीं निरिंद्रिय आणि घटनेला निरुपयोगी, अशा पृथ्वीतत्त्वाच्या द्रव्यांचे उत्सर्ज करण्याचे मार्ग आहेत.

## जलतत्त्व–वसारस

५३ सृष्टीमध्यें जलतत्त्व हें जसें पृथ्वीच्या आश्रयानें असतें तसेंच शरीरांतहि

तें त्या तत्त्वाच्याच आश्रयानें असतें. लाळ, जाठरस वगैरे जलरूप पाचक रसांच्या योगानें अन्नमय पृथ्वीतत्त्वाला वसारूप प्राप्त होतें हें पूर्वी सांगितलेंच आहे. हें जलतत्त्व अन्नरसाशीं मिश्र होऊन आणि पेयपदार्थ व प्रत्यक्ष पाणी पिणें, अशा रीतीनें, तोंडाच्याच वाटे मुख्यतः

**जलकार्यशक्तीचें कार्य**

( मुख्यतः म्हणण्याचें कारण–स्नान, हवेंतील ओलावा वगैरे रीतीनेंहि ) शरीरांत प्रविष्ट होतें. वसारसामधील प्रवाहिपणा या तत्त्वामुळेंच उत्पन्न झालेला असतो. अन्नरसाबरोबरच ह्या जलाच्या घटकांना सेंद्रियता प्राप्त होते. जलतत्त्वाच्या कार्यशक्तीला खालच्या जड अशा पृथ्वीतत्त्वाच्या घटकांनां सूक्ष्मपणा देऊन स्वतःशीं एकरूप करून घ्यावयाचें असते. तें कार्य पचन क्रियेला पाचक रसांचा पुरवठा करून ती करून घेते. त्याच्या योगानें तयार झालेला वसारस ती आपल्या कार्येंद्रियामध्यें म्हणजे रक्ताशयामध्यें पुढील संस्कारासाठीं घेते. रक्ताशयाला चार पुटें असतात. त्यांपैकीं उजवीकडील वरचें लहान व खालचें मोठें अशीं दोन पुटें आहेत. त्यांपैकीं वरच्या लहान पुटामध्यें हा वसारस प्रविष्ट होतो. याचा मूळचा रंग पाण्यासारखाच पण किंचित् पांढरा असतो. परंतु रक्ताशयामध्यें जातांच त्याला जांभळा रंग ( अशुद्ध रक्तासारखा ) प्राप्त होतो, आणि नंतर तो खालच्या महापुटांत उतरतो. ह्या स्थानामधून पुढील तेजतत्त्वाचे संस्कार घडविण्यासाठीं त्याची अशुद्धवाहिन्यांचा द्वारा फुप्फुसांमध्यें रवानगी होते.

५४ पचनक्रियेमध्यें, पक्काशयामधून जें न पचलेलें अन्न स्नेहपाचनीमध्यें उतरतें व तेथें त्याचें पचन होऊन जो वसारस बनतो, तोहि वास्तविक अन्नरसाचेंच प्रागतिक किंवा उत्क्रांतरूप असल्यामुळें तें रक्ताशायामध्येंच गेलें पाहिजे. परंतु तसें न होतां तो रस यकृतामध्यें जातो व अशुद्ध ( रक्त )रूपानें

**अशुद्ध रक्तरस**

तेथून परभाराच फुप्फुसांकडे जातो. ह्याचें कारण असें आहे कीं, पृथ्वीतत्त्वविशिष्ट द्रव्यांनां जलरूपामध्यें जावयाचें असतें; जलरूप म्हणजे वसारसरूप देण्याचें तें कार्य जलतत्त्वाच्या शक्तीला साहाय्यकपणानें करावें लागतें; व तें ती जाटररसाच्या पुरवठ्यानें करिते. परंतु जलतत्त्व व पृथ्वीतत्त्व ह्यांच्या वैशिष्ट्याचा जो अन्नरस असतो त्यावरच ह्या पाचकरसाचा परिणाम होतो,

आणि तेज व वायुतत्त्वविशिष्ट अन्नरस आणि जलतत्त्वांत न विरणारीं पृथ्वीविशिष्ट घनद्रव्यें यांच्यावर त्याचा पाचक परिणाम होत नाहीं, म्हणून तीं द्रव्यें स्नेहपाचनीमध्यें उतरतात. तेजतत्त्व हें उभयधर्मी व जडसूक्ष्मांना व्यापक तत्त्व असल्याकारणानें ह्या ठिकाणीं त्या तत्त्वाचे रस, म्हणजे पित्त हा जडतेजतत्त्वाचा आणि स्वादुरस हा सूक्ष्म तेजतत्त्वाचा रस, तेजविशिष्ट ह्या साधर्म्यानें एकत्र होऊन त्या अन्नाचें पचन करितात. पचून तयार होणारा वसारस हा जडद्रव्यांतील असल्यामुळें तो यकृतामध्यें म्हणजे जडतेजतत्त्वाच्या इंद्रियामध्यें घेतला जातो. यकृतामध्यें त्याचें पृथक्करण होऊन त्यांतील पित्तविशिष्ट द्रव्यें निराळीं काढून पित्ताशयामध्यें पुनः पचनाला उपयोगी पडण्यासाठीं व घटनेला निरुपयोगी असतील तीं मलाबरोबर उत्सर्जित होण्यासाठीं साठविलीं जातात; आणि बाकीचा रस अशुद्ध ( रक्त ) रूपानें फुप्फुसांमध्यें पाठविला जातो. आंत्ररस हा जो वायुतत्त्वविशिष्ट रस, तो तेजतत्त्वाच्या पचनक्रियेनंतर स्वतःच्या वैशिष्ट्याच्या द्रव्यांचें पचन करून, वसारस बनवितो व तो परभारा कोष्ठवाहिनीद्वारा अशुद्ध ( रक्ता )मध्यें सोडून देतो. अशुद्धवाहिनीमधून तो रक्ताशयामध्यें येऊन फुप्फुसांचा मार्ग धरितो. अशा रीतीनें अन्नरसाला पृथ्वीतत्त्वविशिष्ट वसारसरूप प्रथम येतें आणि नंतर अशुद्ध (रक्त) हें जलतत्त्वविशिष्ट रूप येऊन पुढील तेजतत्त्वविशिष्ट रूप पावण्यासाठीं तो फुप्फुसांमध्यें प्रवेश करितो.

५५ अशुद्ध (रक्त)वाहिन्या ह्याहि सर्व शरीरभर पसरलेल्या आहेत. वृक्षाचा जसा फांद्यांना फांद्या व डहाळ्यांना डहाळ्या फुटून विस्तार होतो, त्याप्रमाणेंच ह्याचा विस्तार आहे. ह्या अशुद्धवाहिन्यांतून अशुद्ध ( रक्त ) फिरत असतें, परंतु तें बारीक बारीक वाहिन्यांतून मागील मोठ्या वाहिनीमध्यें उलट जात असतें. अशा मोठ्या वाहिन्या त्यांच्याहून मोठ्या नळीला मिळतात. अशा रीतीनें शेवटीं शरीराच्या खालच्या भागांतून व वरच्या भागांतून रक्ताशयाकडे जाणारी एकेक मोठी नलिका किंवा शीर असते, त्यांमधून रक्ताशयाच्या उजवीकडील लहान पुटामध्यें, सर्व शरीरांतील अशुद्ध ( रक्त ) उलट गतीनें येत असतें, आणि त्यांतून मोठ्या पुटांत जाऊन त्यामधून फुप्फुसांत जातें. असा हा क्रम एकसारखा अहोरात्र चाललेला असतो. वसारसाचें

अशुद्ध ( रक्त ) बनविणें आणि शरीरांतील परत येणारें अशुद्ध ( रक्त ) ग्रहण करून तें फुफ्फुसांमध्यें पाठविणें, हें जलतत्त्वाच्या कार्यशक्तीचें काम आहे व तें करण्याचें मुख्य **कार्येंद्रिय** रक्ताशय हें असून त्याचा उजवा भाग हें तिच्या कार्याचें **केंद्रस्थान** आणि शरीरभर पसरलेल्या अशुद्धवाहिन्या हें तिचें **कार्यक्षेत्र** आहे.

**जलशक्तीचें कार्येंद्रिय व कार्यक्षेत्र**

५६ अशुद्ध (रक्त) हें पृथ्वीतत्त्वविशिष्ट द्रव्यांचें बनलेलें रसरूप असल्यामुळें तें शरीरांतून रक्ताशयाकडे परत येतांना शुद्ध रक्त बनण्याला नालायक असलेले रसांश निराळे काढून पृथ्वीच्या वसावाहिन्यांमध्यें ते सोडून दिले जातात. आणि वसावाहिन्यांतील शुद्धरक्तत्त्व पावण्याला लायक झालेले द्रव अशुद्धवाहिन्यांमध्यें घेतले जातात. ह्या रीतीनें अशुद्धाचें ( रक्ताचें ) जलतत्त्वविशिष्ट शुद्धत्व रक्षण करण्याचें कार्य जलतत्त्वाची **कार्यशक्ति** करीत असते. तसेंच शरीरामध्यें निरुपयोगी झालेल्या जलविशिष्ट द्रव्यांचें घटनासंरक्षणासाठीं उत्सर्जन करण्याचें कार्य मुख्यतः मूत्ररूपानें होत असतें. म्हणून मूत्रपिंड, मूत्राशय व मूत्रेंद्रिय हीं जलतत्त्वाच्या कार्यशक्तीचीं **संरक्षक** इंद्रियें आहेत.

**जलशक्तीचें संरक्षणकार्य व संरक्षक इंद्रियें**

## तेजतत्त्व—अशुद्ध (रक्त)

५७ अशुद्ध ( रक्त ) हा फुफ्फुसांमध्यें जाणारा रस, जडतत्त्वांच्या वैशिष्ट्याचा अर्थातच शरीरघटकद्रव्यांचा असतो. त्यावर तेजतत्त्वाचा संस्कार झाल्यानंतर घटनोपयोगी इंद्रियघटकत्व प्राप्त व्हावयाचें असतें. परंतु तें प्राप्त झालें तरी घटनेमध्यें एकरूपता पावण्याला त्याला सेंद्रियत्व येणें आवश्यक असतें, व तें सूक्ष्म तत्त्वांशीं एकीकरण झाल्यानें यावयाचें असतें. म्हणजे ह्या रसाला जड व सूक्ष्म मिळून पंचात्मक रूप येईल तेव्हांच तो शरीराशीं एकरूप होण्याला लायक असा सेंद्रियतासंपन्न होत असतो. तेजतत्त्व हें मध्यस्थ तत्त्व आहे आणि तें जड व सूक्ष्म तत्त्वांचा संयोग घडविणारें आहे. परंतु तें स्वतंत्र रीतीनें अस्तित्व असणारें नाहीं. उष्णता व प्रकाश आणि तेज अशा रूपानें

**तेजशक्तीचें कार्य**

जडामध्यें तें संमिश्रपणानें असतें. त्यामुळें अन्नामध्यें तें पित्तलद्रव्यरूपानें मिश्रित होऊन येतें; तसेंच सूक्ष्म तत्त्वांबरोबर वायूशीं तेज व उष्णता रूपानें मिश्र होऊन येतें. हें स्वतंत्र अस्तित्वरूप नसल्यामुळें वायूशीं संमिश्र अशा-स्थितीनें अशुद्ध ( रक्त ) ह्या रसाशीं त्याला एकरूप व्हावें लागतें. त्यामुळें ह्या सूक्ष्मतेजतत्त्वाच्या संस्काराच्या मिषानें जें मिश्रण बनतें तें साहजिकच पंचात्मक बनतें.

**शुद्धरक्त, तेज-शक्तीचें कार्येंद्रिय व कार्यक्षेत्र**

५८ नाक हें सूक्ष्म तत्त्वाचें मुख्य प्रवेशद्वार आहे. श्वसनक्रियेनें वायु हा शरीरामध्यें प्रविष्ट होतो. सूर्यकिरणांमधील उष्णता व तेज ग्रहण करून तेजसंपन्न झालेला वायु, आकाशतत्त्वाच्या, विरलता, व्यापकता वगैरे गुणधर्मांसह फुफ्फुसांमध्यें प्रविष्ट होतो. ह्या ठिकाणीं रक्ताशयामधून असंख्य अशुद्धवाहिन्यांच्या द्वारा जें अशुद्ध (रक्त) येत असतें त्यामध्यें हा तेजोरूप वायु मिश्र होतो. त्याच्यामुळें अशुद्ध ( रक्ताचा ) चा जांभळटपणा नाहींसा होऊन तें लालभडक असें **शुद्ध रक्त** बनतें. हें एकीकरण होतांना सेंद्रियत्व पावण्याला लायक असलेले घटक शुद्ध रक्तरूप पावतात आणि घटनेला नालायक असलेले निरिंद्रिय व बाधक घटक अशुद्धांतून आले असतील ते बहुतेक उच्छ्वासाबरोबर शरीराबाहेर घालवून दिले जातात.[1] ह्या क्रियेनें बनलेला रस म्हणजे शुद्ध रक्त, केशवाहिन्यांच्या द्वारा फुफ्फुसांतील शुद्ध रक्तवाहिनींतून रक्ताशयाच्या डावीकडील भागांतील वरच्या लहान पुटामध्यें व त्यांतून खालच्या मोठ्या पुटामध्यें जाऊन, त्यांतून मोठ्या मुख्य रक्तवाहिनींमधून बाहेर निघतें आणि शाखोपशाखांनीं शरीरभर सर्वत्र अभिसरण पावतें. अशुद्ध रक्ताला फुफ्फुसांमध्यें जो **लाल रंग** येतो तो **तेजाच्या** योगानें येत असतो, आणि त्याचें जें प्रवाहगतिनें **अभिसरण** होत जातें तो **वायुतत्त्वाचा** गतिरूप **गुण** आहे. शुद्ध रक्त हा तेजतत्त्वानें बनविलेला रस असून तो रक्ताशयाच्या डावीकडील भागामध्यें सांठविला जातो व तेथून शरीरभर पोंचविला जातो. म्हणून रक्ता-

१ परंतु शुद्ध रक्त न बनणारे आणि उच्छ्वासाबरोबरहि उत्सर्जित न होणारे घटक शिल्लक राहातात, ते कफ रूपानें उत्सर्जित होतात.

शयाची **डावी बाजू** हें तेजतत्त्वाच्या **कार्यशक्तीचें केंद्रस्थान** ठरत असून शुद्ध रक्तवाहिन्या हें तिचें **कार्यक्षेत्र** आहे. यकृत हें पित्तरूप जडतेजाचें **कार्यकारी इंद्रिय** आहे व प्लीहा हें सूक्ष्मतेजतत्त्वाचें गुणधर्मसंग्राहक असून ओज, कांति, उमेद, उत्साह, शक्ति, वीर्य, वगैरे जीवितदर्शक गुण-धर्मांचें नियमन करणारें **कार्येंद्रिय** आहे. शिवाय ह्या प्रकारच्या गुणधर्मांचे घटक अन्नरसांतून काढून घेण्यासाठीं पाचक स्वादुरस उत्पन्न होण्याचें कार्यहि तें घडवून आणितें. तेज हें जडसूक्ष्मतत्त्वाचें मध्यस्थ, संयोजक आणि एकी-करण करणारें असल्यामुळें, त्या एकीकृत स्थितीच्या संरक्षणाचाहि भार त्याच्यावरच असतो. त्यासाठीं तें सर्व शरीरभर अभिसरणानें शुद्धरक्तद्वारा सेंद्रियतासंपन्न घटकद्रव्यांच्या पुरवठा करून, जुनीं जीर्ण, घटनेला निरुप-योगी झालेलीं निरिंद्रियद्रव्यें परत आपल्या स्रोतामध्यें काढून घेऊन, अशुद्ध ( रक्त ) वाहिन्यांमध्यें, कांहीं उच्छ्वासामध्यें, कांहीं मलमूत्रामध्यें सोडून देऊन आणि ज्ञानतंतूंचा दाह ज्वर ह्या रूपानें उष्णता बाहेर टाकून संहार-शक्तिविशिष्ट द्रव्यें शरीराबाहेर घालवून **संरक्षणाचें** कार्य करीत असतें.

**रसक्रियेचें परस्परावलंबी कार्य– त्रिदोषाचें बीज**

५९ तेजतत्त्व हें स्वतंत्र तत्त्व नसल्यामुळें जडवर्ग व सूक्ष्मवर्ग ह्या दोन्ही प्रकारच्या तत्त्वांच्या कार्याला साहाय्यक कार्य करून आपलें पंचात्म-कता उत्पन्न करण्याचें संयोगी कार्य घडवून आणितें. शुद्ध रक्त हा त्याचा स्वतःचा रस आहे. परंतु तो फुप्फुसें ह्या **वायुतत्त्वाच्या कार्येंद्रियामध्यें** तें तयार करून घेतें. **जलतत्त्वाच्या कार्यशक्तीनें** अशुद्ध ( रक्त ) बनविण्याला वसारस रक्ताशयामध्यें घ्यावयाचा असतो, तो पचनक्रियेनें तयार करण्याला साहाय्य करून तो रसहि तें यकृतामध्यें घेतें, आणि त्याला आपणच अशुद्धाचें रूप देऊन फुप्फुसांमध्येंहि परभाराच पाठवितें. ह्या कामाच्या मोबदला **जलतत्त्वाच्या कार्यशक्तीला** रक्ताशयामध्यें स्वतःचा शुद्ध रक्त हा रस घ्यावयास आणि अभिसरणासाठीं तो रक्तवाहिन्यांमध्यें सोडून देण्यास लावितें. त्याप्रमाणें शुद्ध रक्त हा रस तेजतत्त्वानें तयार केल्यानंतर तो **वायुतत्त्वाच्या कार्यशक्तीनें** स्वतःच्या **कार्येंद्रियांत** घ्यावयाचा, परंतु त्याच्याकडून आपलें, अशुद्ध रक्त ग्रहण करण्याचें कार्य करवून तेथें शुद्ध रक्त बनविण्याचेंहि आपलें कार्य तें

उरकून घेतें. वायुतत्त्वाच्या **कार्येंद्रियाचा** म्हणजे **फुप्फुसांचा** असा उपयोग करून घेऊन त्याच्या मोबदला वायूला शुद्ध रक्तामध्यें मिश्र होऊन शुद्धरक्तवाहिन्यानामक स्वतःच्या **कार्यक्षेत्रामध्यें** अभिसरणक्रियेनें शुद्ध रक्तापासून वायुरूपरस बनविण्याचें कार्य त्याला करूं देतें. अशी अधिकाधिक सूक्ष्मत्व पावण्याची रसक्रिया थोडी थोडी परावलंबीपणानें होत असतें. आयुर्वेदामध्यें जे त्रिदोष म्हणून म्हटलेले आहेत त्यांचें बीज ह्या परस्परावलंबी कार्यांतच आहे. स्वतःचें कार्य स्वतः करणें जितकें व जसें निर्दोष होणें शक्य असतें तसें तें दुसऱ्यानें स्वतःचें कार्य सांभाळून करणें शक्य नसतें. त्यांत थोडें तरी व्यंग किंवा दोष राहूं शकतो. जलतत्त्व तेजतत्त्व व वायुतत्त्व यांपैकीं एकाद्या तत्त्वाची कार्यशक्ति दुर्बल झाली किंवा तिच्यावर कार्यांचा बोजा अधिक पडला तर ही परस्परावलंबी कार्यलयीची सुस्थिति बिघडते व त्यामुळें रसक्रिया सदोष होते. त्यामुळें संवर्धनक्रिया सुरळित चालण्याला अडथळा उत्पन्न होऊन तो दूर करण्याच्या संरक्षणकार्याचा प्रसंग उद्भवतो.

## वायुतत्त्व-शुद्धरक्त

६० वायु ह्या तत्त्वाचा नाकांतून श्वासनलिकांच्या द्वारा फुप्फुसांमध्यें प्रवेश होतो. शुद्ध रक्त ग्रहण करून त्यावर स्वतःच्या गुणधर्माचा संस्कार घडवून स्वतःच्या वैशिष्ट्याचा रस बनविणें हें ह्याचें मुख्य कार्य आहे. तें त्यानें फुप्फुसें ह्या आपल्या **केंद्रस्थानांत** करावयाचें, परंतु त्याच्या बरोबर आलेल्या तेजतत्त्वाची शुद्ध रक्त बनविण्याची क्रिया ह्या स्थानांत घडत असल्यामुळें तेजासह तो शुद्ध रक्तामध्यें मिश्र होऊन, तेजतत्त्वाच्या कार्यक्षेत्रामध्यें ( रक्तवाहिन्यांमध्यें ) जातो, आणि अभिसरणरूप प्रवाहगतीनें शुद्धरक्ताचें मंथन करून, त्यामध्यें तो आपला स्वतःचा रस बनविण्याचें कार्य करितो. वायुतत्त्वाच्या ह्या रसाला **ज्ञानरस** असें म्हणतात.

**वायूचें केंद्रस्थान व ज्ञानरस**

ज्यांमधून शरीरभर शुद्ध रक्त पसरत जातें, त्या रक्तवाहिन्यांचे फाट्यांना फांटे फुटत जाऊन केंसांपेक्षांहि अत्यंत सूक्ष्म अशा केशवाहिन्या सर्व शरीरभर पसरलेल्या आहेत. त्यांतून शुद्ध रक्त त्यांच्या अग्रापर्यंत जात असतें. तेथें त्यांची हद्द संपते. ह्या हद्दीवर म्हणजे रक्तवाहिन्या व केशवाहिन्या यांच्या अग्रभागीं ज्ञानतंतु आलेले असतात. ह्यांना सहानुभवज्ञानतंतु असें म्हणतात. ते रक्तांतील

वायुतत्त्वाचा वायुरूप **ज्ञानरस** तेवढा शोषून घेतात. तो त्यांनीं घेतल्यानंतर, शिल्लक राहिलेलें रक्त जांभळट रंगाचें अशुद्ध (रक्त) रूप पावून, अग्नीजवळील अशुद्ध रक्तवाहिन्यांमध्यें जातें. आणि पुन्हां शुद्ध रक्त बनण्याचा संस्कार घेण्यासाठीं रक्ताशयाचा मार्ग धरितें.

**वायुशक्तीचें कार्येंद्रिय व कार्यक्षेत्र**

६१ वायु हा श्वासनालिकांच्या द्वारा ज्या ठिकाणीं अशुद्ध (रक्ता) मध्यें संमिश्र होण्याचें कार्य करितो, तीं फुफ्फुसें हें वायुतत्त्वाचें **कार्येंद्रिय** आहे. तेथें संमिश्र झालेल्या वायूच्या योगानें उत्पन्न झालेल्या रक्ताभिसरणाच्या गतीमध्यें, त्याच्या संस्कारानें बनलेला ज्ञानरस जे ज्ञानतंतू शोषून घेतात त्या सहानुभव ज्ञानतंतूंच्या शरीरांत सर्वत्र असलेला विस्तार व त्यांचीं जागोजाग असलेलीं केंद्रें हें वायुतत्त्वाच्या कार्यशक्तीचे **कार्यक्षेत्र** आहे. ह्यामध्यें संग्रहित होत जाणारा ज्ञानरस **मेंदु** ह्या आकाशतत्त्वाच्या **केंद्रांकडे** पाठविण्यांत येतो.

## आकाशतत्त्व–ज्ञानरस

**आकाशशक्तीचें केंद्र कार्येंद्रिय व कार्यक्षेत्र**

६२ आकाश हें सूक्ष्म तत्त्वांपैकीं सूक्ष्म आणि पृथ्वीतत्त्वापासून शेवटचें पांचवें तत्त्व आहे. अन्नरसावर वायुतत्त्वापर्यंत चारहि तत्त्वांच्या कार्यशक्तीचे सूक्ष्मत्वाचे व एकीकरणाचे संस्कार घडत जाऊन, तयार झालेला, वायुतत्त्वाच्या कार्यक्षेत्रामधील ज्ञानरस, आकाशतत्त्वाचे संस्कार ग्रहण करण्यासाठीं, ज्ञान तंतूंमधून, **शतदल** नामक मेंदूमध्यें प्रविष्ट होतो. **शतदल** किंवा **धाकटा मेंदू** हें आकाशतत्त्वाच्या **कार्यशक्तीचें** केंद्रस्थान आहे. ह्या ठिकाणीं त्या शक्तीच्या संस्कारानें ज्ञानरसाला पंचात्मक असें सेंद्रियशक्तिपूर्ण रसरूप प्राप्त होतें. हें सेंद्रियशक्तिमय रसरूप घटनानियामक **जीवनशक्तीचें** सजातीय रसरूप असल्यामुळें, तेथून **जीवनशक्तीच्या केंद्रामध्यें**, **सहस्रदल** नामक मेंदूमध्यें त्याची रवानगी होते. आकाशतत्त्वाच्या शक्तीच्या संस्कारानें ज्ञानरसाला जीवनशक्तीचें सजातीय रसरूप, प्राप्त होण्याचें स्थान असा **शतदल** मेंदू हें आकाशशक्तीचें **कार्येंद्रिय** असून, ज्या ज्ञानतंतूच्या द्वारा तो रस सहस्रदलामध्यें पाठविला

जातो आणि संवर्धनकार्यकरणाऱ्या कार्यशक्तींनां पुरविण्यासाठीं, जीवनशक्तीकडून सहस्रदलांतून मिळणारा शक्तिरूप रस **शतदला**मध्यें परत घेतला जातो, ते ज्ञानतंतू आकाश**कार्यशक्तीचें** कार्यक्षेत्र होय.

६३ आकाशतत्त्वाच्या संस्कारकार्यापर्यंत जी ही सेंद्रियरसरूप पंचात्मक संघटना होत जाते, ती रजोगुणामधील गुणघटकाची, सत्त्वगुणामधील गुणघटकांमध्यें समाविष्ट होण्याच्या लायकीची होत असते.

**ज्ञानरस व जीवनशक्ति**

आकाशादि रजोगुणसाहित्यक्षेत्रांत, सत्त्वगुणघटकांच्या द्वारा, **जीवनशक्ति** आपला कार्यप्रवाह सुरू करिते. ते सत्त्वगुणघटक ज्या विशिष्ट प्रकारचे असतील त्या प्रकारचें सत्त्वगुणवैशिष्ट्य शतदलामध्यें ज्ञानरसाला प्राप्त होत असतें. म्हणून त्यांतून तो मुख्य मेंदूमध्यें जीवनशक्तीशीं समरस होण्याला घेतला जातो. ह्या ठिकाणीं त्या रसाच्या ग्रहणानें, त्याशीं एकरूप होऊन संवर्धित झालेली **जीवनशक्ति** शरीरसंवर्धन करण्याला सामर्थ्यसंपन्न होत असते. अशा रीतीनें संग्रहित होणाऱ्या शक्तीपैकीं अवश्य तितकी शक्ति संवर्धनात्मक कार्य करणाऱ्या कार्यशक्तींना पुरविण्यासाठीं जीवनशक्तीकडून आकातत्त्वाच्या केंद्रामध्यें म्हणजे शतदलामध्यें पोंचविली जाते.

## प्राणक्रिया–विस्तार

६४ जीवनशक्तीकडून कार्यशक्तींना पुरविण्यासाठीं शतदलामध्यें येणारा शक्तिप्रवाह आकाशतत्त्वाच्या समानधर्माचा असतो. परंतु तें स्थिरतत्त्व असल्यामुळें त्याच्या खालच्या म्हणजे सूक्ष्मवर्गापैकीं वायु ह्या वाहकतत्त्वावर पृथ्वीतत्त्वाच्या कार्यशक्तीपर्यंत प्रत्येक तत्त्वाच्या कार्यशक्तीला, तिच्या समानधर्माची शक्ति पोंचविण्याची कामगिरी पडते. हें कार्य करण्याची जबाबदारी पडलेलें वायुतत्त्व ज्ञानरसामध्यें संमिश्र झालेलें असतें, त्यामुळें कार्यशक्तींकडे पोंचविण्यासाठीं निघालेल्या शक्तीमध्येंहि तें एकरूपतेनें संमिश्र असतें. वायूला प्राण हें नांव पडलेलें असल्यामुळें त्याच्या द्वारा येणाऱ्या ह्या शक्तीला **प्राणशक्ति** असें म्हणतात. शतदलामध्यें आलेली ही प्राणशक्ति पंचात्मक असते. पृथ्वीतत्त्वापर्यंत प्रवाहगतीनें जातांना आकाशापासून एकेका तत्त्वाची सजातीय शक्ति पृथक् करून त्या त्या तत्त्वाच्या कार्यशक्तीला द्यावयाची

**प्राणशक्ति** (side heading)

असते. त्यामुळें ह्या प्रवाहगतीमध्यें एकेका तत्वाची शक्ति कमी होत जाण्यानें अवशिष्ट प्राणशक्तीचें स्वरूप व गुण बदलत असतात. या कारणामुळें प्रत्येक तत्त्वाच्या प्राणशक्तीला भिन्न भिन्न अन्वर्थक नावें पडलीं आहेत. ही प्राणशक्ति वायुरूपानें प्रवाहित असल्यामुळें **आकाशतत्त्वाचा** प्राण **व्यानवायु, वायूतत्वाचा** प्राण–**प्राणवायु, तेजतत्वाचा** प्राण **उदानवायू, जलतत्वाचा** प्राण–**समान** वायु आणि **पृथ्वी**तत्त्वाचा प्राण **अपान**वायु ह्या नांवानीं ओळखिली जाते.

## व्यानव्यायु–आकाशाचा प्राण

६५ रसक्रियेनें आकाशतत्त्वाच्या शक्तीशीं सात्म्य व सेंद्रिय पावलेला ज्ञानरस जीवनशक्तीच्या केंद्रामध्यें ( सहस्रदल नामक मेंदूमध्यें ) जात असतो. त्यामधून स्वतःच्या वैशिष्ट्याची शक्ति ग्रहण करून **जीवनशक्ति** संवर्धित होते, आणि बाकी शिल्लक राहिलेला ज्ञानरस परत शतदलामध्यें पाठविते. ह्या परत येणाऱ्या रसाबरोबरच, ती कार्येंद्रियांकडे कार्यशक्तींना पुरविण्यासाठीं संचितशक्तिमधील शक्ति शतदलामध्यें पाठविते. हें शक्तिरूप द्रव्य आकाशकार्यशक्तीच्याच वैशिष्ट्याचें असतें. कारण तें तिनेंच बनविलेलें असतें. शतदलामध्यें येणारा जो हा शक्तिप्रवाह त्यालाच तो वायुरूप सूक्ष्म असल्यामुळें **व्यान** असें म्हणतात. हा प्राण पांचहि तत्त्वांच्या कार्यशक्तींनीं युक्त असा असतो. आकाश हें सर्वसंग्राहक तत्त्व असल्यामुळें पांचहि तत्त्वांचें सेंद्रियशक्तिरूप द्रव्य रसरूपानें एकत्रित होतें, त्याप्रमाणेंच शक्तीचा पुरवठा करणाऱ्या प्राणक्रियेमध्येंहि पांचहि तत्त्वांच्या शक्ति **व्यान**रूपानें एकत्रित असतात. हा **व्यान**, आकाशतत्त्वाचा प्राण असल्यामुळें शरीरसंवर्धन प्रमुख सर्व जीविताक्रियांना शक्य तितकी पोकळी उत्पन्न करून देण्याचें कार्य करितो आणि त्या पोकळीमध्यें सर्वसंग्राहक गुणानें राहतो. ह्यामुळें रोमरंध्रांतूनसुद्धां हवा, पाणी वगैरे सूक्ष्म द्रव्यें शरीरामध्यें शिरूं शकतात. पांचहि कार्यशक्तींना जीवनशक्तीकडून शक्तीचा पुरवठा करणें, सर्व इंद्रियांकडे जीवनशक्तींचे आपापलीं कामें करण्याचे हुकूम पोचविणें, शरीरांतील स्थितीची ( कोणत्याहि ठिकाणची ) खबर जीवनशक्तीला पोंचविणें वगैरे जीवनशक्तीच्या संवर्धन-

**व्यान व कार्य**

कार्यसंबंधीं जबाबदारीचीं कामें ह्या व्यानाकडून व्हावयाचीं असतात. शरीरांतील सांध्याच्या ठिकाणीं राहून त्यांची हालचाल करणें हें ह्यांचे मुख्य दृश्य कार्य आहे.

६६ ज्या अनिच्छावर्ति सहानुभव ज्ञानतंतूंमधून शतदलामध्यें ज्ञानरस पोंचविला जातो, त्यांमधूनच हा व्यान-प्राण शक्तिरूपानें सर्व शरीरभरप्रविष्ट होतो. शतदलांतील **कार्य**शक्तीला संजीवित करून ज्ञानतंतूंत उतरतांना, ज्या ज्ञानरसाला तेथें आकाशगुणविशिष्ट शक्तिरूप पावतां आलेलें नसतें, त्याला परत घेऊन येतो. अशा रीतीनें आकाशकेंद्रामधील शक्तिहीन ज्ञानरसाचें उत्सर्जन होऊन तें कार्येंद्रिय (शतदल) कर्तृत्वक्षम होतें. परत येणारा हा ज्ञानरस वायुतत्त्वाच्या शक्तीनें बनविलेला असल्यामुळें तो ग्रहण करणाऱ्या ज्ञानतंतूंना तो विजातीय होत नाहीं. येथें पुन्हां सूक्ष्मत्वाचे संस्कार घेऊन शतदलाकडे जाण्याची लायकी त्याला येऊं शकते.

**व्यानाचें कार्य**

## प्राणवायु—वायुतत्त्वाचा प्राण

६७ ज्ञानतंतूंमधून आपल्या व्यापक व संग्राहक वगैरे धर्मानें व्यानवायु आपल्या क्षेत्रामध्यें जातो तेव्हां, वायुतत्त्वाचा प्राण **प्राण**वायु हा सर्व शरीरभर पसरलेल्या ज्ञानतंतूंमध्यें शिल्लक राहतो. त्याच्या योगानें ते ज्ञानतंतु शक्तिसंपन्न होऊन शुद्धरक्तांतील ज्ञानरस शोषून घेण्याला आणि रक्ताला योग्य गति देण्याला ताजेतवाने होतात. प्राणक्रियेचा प्रवाह अखंड चालू राहण्याला व्यानवायूच्या धर्मानें वातावरणांतील वायु दररोज २१६०० वेळां श्वसनद्वारा फुफ्फुसांमध्यें प्रविष्ट होतो, आणि रक्तामध्यें मिसळतो. त्यामुळें रसक्रियेला चालना मिळून पंचप्राणक्रियाहि अखंड चालू राहतात. फुफ्फुसें हें ह्या प्राणवायूचें **केंद्रस्थान** आहे. ह्या ठिकाणीं **कार्यशक्तिला** संजीवित करून, ज्ञानरस बनण्याला नालयक असलेलें रक्तांतील विजातीय घटक घेऊन तो उच्छ्वासानें बाहेर पडतो.

**प्राण व त्याचें कार्य**

६८ प्राणवायु हा सर्व कार्यशक्तींना व इंद्रियशक्तींना शक्तीचा पुरवठा

करणारा आणि शरीरांतील सर्व ज्ञानतंतूंच्या कार्यांचें नियमन करणारा मुख्य प्राण आहे. सर्व ज्ञानतंतूंवर मुख्य सत्ता याची असते. ज्ञानेंद्रियांच्या कार्यांचें नियंत्रण मुख्यतः यानेंच करावयाचें असतें, म्हणून शिरोभाग व छाती ह्या भागांवर व त्यांतील इंद्रियांवर याचा जागरूक अम्मल असतो. त्यामुळें झोपेमध्यें असतांनाहि विशेष प्रकारच्या शब्द, स्पर्श वगैरे विषयांचें ज्ञान होऊन मनुष्य चटकन् जागा होतो.

**प्राणवायूचें कार्य**

## उदानवायु—तेजतत्त्वाचा प्राण.

**उदान व त्यांचें कार्य**

६९ उदानवायु हा तेजतत्त्वाचा प्राण आहे. जीवनशक्तीच्या संवर्धक घटनाकार्याला उपयुक्त व योग्य असा एकीकृत पंचात्मक रस बनविणें हें ह्याचें कार्य आहे, व तें बिनचूक करण्याकरिता येण्यासाठीं ह्या प्राणाचा पुरवठा जीवनशक्तीकडून तेजतत्त्वाच्या कार्यशक्तीला होत असतो. कंठप्रदेश हें ह्याचें केंद्रस्थान आहे. कारण ह्या स्थानामधून श्वासनलिकेच्या द्वारा तेजतत्त्व हें वायुमध्यें मिश्र होऊन फुप्फुसांमध्यें जात असतें. तेथें येणारा अशुद्ध ( रक्त ) हा रस घटनासाहित्यरूप पाऊन आलेला असतो. परंतु त्यामध्यें प्रविष्ट होणारा वायु व त्याच्याबरोबर आलेलें तेजोद्रव्य निरिंद्रिय स्थितीमध्यें असतें. म्हणून रसक्रियेची पूर्तता होण्यासाठीं **उदान-वायु** हा बाहेरील वायु श्वासनलिकेमध्यें शिरतानांच त्यामध्यें शक्तिरूपानें मिश्र होऊन त्या निरिंद्रियद्रव्याला सेंद्रिय करितो. त्या योगानें त्या सेंद्रिय झालेल्या वायूच्या मिश्रणानें, अशुद्ध रक्ताचें लालभडक असें शुद्ध रक्त बनतें. त्या शुद्ध रक्ताबरोबर हा उदानप्राण रक्ताशयामध्यें येतो व त्या कार्येंद्रियाला शक्तिसंपन्न करितो, आणि ज्ञानरसरूप न पावल्यामुळें कच्चें राहिलेलें रक्ता-मधील तेजोरूप द्रव्य घेऊन त्यावर सूक्ष्मत्व पावण्याचे संस्कार करण्यासाठीं प्लीहा या सूक्ष्म तेजाच्या पिंडामध्यें जातो. ज्ञानरसरूप न पावण्याइतकें जडत्व असलेल्या तेजरूप द्रव्याला सूक्ष्म रसरूप देण्याचें कार्य प्लीहेमध्यें करून, त्याला स्वादुरसरूपानें स्वादुपिंडामध्यें संग्रहित केलें जातें; व पचन-क्रियेच्या वेळीं अन्नरसामध्यें मिश्र होऊन, त्याला वर जाण्याची गति मिळते.

ज्या वेळीं प्लीहेमध्यें अशीं अपक्व तेजद्रव्यें जास्त प्रमाणामध्यें जमूं लागतात, त्या वेळीं त्या पिंडावर-कामाचा जास्त बोजा पडून त्याच्या आकारामध्येंहि फेरफार झालेले उमगण्यांत येतात.

**उदानाचें कार्य**

७० जीवितक्रियाव्यापार उत्तम रीतीनें चालू राखण्याची जबाबदारी ह्या उदानावर जास्त असते. हा मध्यस्थधर्मांचा असल्यामुळें, आपल्या संस्कारानें जलतत्त्वाच्या अशुद्ध (रक्ताचा) घनपणा घालवून त्याला अत्यंत सूक्ष्म प्रवाहीपणा, स्वस्तःची उष्णता, आणि वायूची प्रवाहगति देऊन, जड व सूक्ष्म ह्या दोन्ही गुणधर्मांचें ऐक्य घडवून आणितो. आणि अभिसरणक्रिया घडविल्यानंतर पुन्हां वायुतत्त्वाचा रस ज्ञानतंतूंमध्यें आणि जलतत्त्वाचा रस अशुद्धवाहिन्यांमध्यें सोडून देऊन समता उत्पन्न करितो. जल व वायु यांची ऐक्यता आणि समतोत्पादक विभागणी असें मध्यस्थपणाचें महत्त्वाचें कार्य हा करीत असतो. ह्या प्रमाणेंच शरीरव्यापारांच्या कार्यकारी इंद्रियांची परस्पर सहकारिता ठेवून शरीर आणि जीवंतपणा यांची संमिश्रस्थिति रक्षण करण्याचें कार्य ह्या उदानाच्या कर्तृत्वावर अवलंबून असतें.

## समानवायु—जलतत्त्वाचा प्राण

**समानवायु व त्याचें कार्य**

७१ ज्या वेळीं उदान हा ज्ञानरसाला ज्ञानतंतूंमध्यें लोटून अशुद्धाला अशुद्धवाहिन्यांमध्यें सोडितो त्या वेळीं अशुद्धाबरोबर रक्तांतील अशुद्ध जडद्रव्यें घेऊन हा समानवायु अशुद्ध रक्ताचें जलतत्त्वविशिष्ट शुद्धत्व रक्षण करीत रक्ताशयाकडे येतो. ह्या प्रवासामध्यें तो जडद्रव्यें वसावाहिन्यांकडे जाण्यासाठीं काढून देतो, आणि वसावाहिन्यांतील स्ववैशिष्ट्याचा वसारस ग्रहण करीत असतो. अशा रीतीनें जलतत्त्वाच्या कार्यशक्तीला साहाय्यक क्रिया करून तिला हा संजीवित करितो. पचनादि क्रियासांठीं निरनिराळे जलविशिष्ट द्रव तयार करण्याचें व योग्य वेळीं त्यांचा स्राव किंवा उत्सर्जन करण्याचें कार्य ह्या समान वायुकडूनच होत असतें. नाभिप्रदेश हें ह्याचें केंद्र आहे. मूत्रादिरूपानें शरीरामधून जें जलरूप द्रव्याचें उत्सर्जन होतें तेंहि ह्या समानाचेंच कार्य आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे ग्रं. क्र. ६७४८

## अपानवायु—पृथ्वीतत्त्वाचा प्राण.

७२ पृथ्वीतत्त्वाच्या कार्यशक्तीला संजीवित करून तिच्या कार्याला सहाय्य करणें आणि पृथ्वीतत्त्वविशिष्ट निरिंद्रिय द्रव्यांचें शरीराबाहेर उत्सर्जन करणें हें ह्या **अपान**वायूचें कार्य आहे. ज्या वेळीं समानवायु अशुद्धांतून जडद्रव्यें वसावाहिन्यांकडे पाठविण्यासाठीं निराळीं काढितो, त्या वेळीं हा अपानवायु समानापासून शक्तिरूपानें निराळा होऊन, त्या वसाद्रव्यासह वसावाहिन्यांमध्यें प्रविष्ट होतो, आणि शक्य तितका वसारस संजीवित करून पुन्हां अशुद्धवाहिन्यांत पाठवितो. शरीरघटनेला निरुपयोगी जडद्रव्यें स्वेद, घाम, लस, पू वगैरे रूपांनीं उत्सर्जित करून शरीरांत संहारशक्तीचें प्राबल्य न वाढेल अशी संरक्षक क्रिया करणें, हें ह्याचें मुख्य कार्य असून त्यासाठीं शरीरांतील सर्व वसाग्रंथी व वसावाहिन्या कार्यक्षम ठेवणें ही जबाबदारी ह्याच्यावर असते. अन्नामधील टाकाऊ भाग पचनाक्रियेनंतर निराळा होऊन राहिलेला असतो व तेंच मुख्य उत्सर्जनीय द्रव्य असतें. त्यामुळें मोठ्या आंतड्यामध्यें याची कामगिरी जास्त महत्त्वाची असल्यामुळें तें ह्या अपानाचें **केंद्रस्थान** आहे. जलतत्त्वाच्या शक्तीपासून ह्याची उत्पत्ति होत असल्यामुळें जलाचे अभावीं याचें काम अडतें.

**अपान व त्यांचें कार्य**

## ज्ञानेंद्रियकार्यविस्तार

७३ रसक्रिया आणि प्राणक्रिया ह्यांच्या योगानें जसें वाढत्या घटनेचें अंतर्गतकार्य घडत असतें, तसेंच शरीराच्या बाह्य भागामध्यें असणाऱ्या पंचज्ञानेंद्रियें व पंचकर्मेंद्रियें यांच्या योगानें सर्वांना परिचित व उघड रीतीनें समजणारीं निरनिराळीं बाह्यकर्में घडत असतात. हीं कर्में मुख्यतः खाद्यपेयादि पोषक द्रव्यसंपादक आणि घटनासंरक्षक असतात. ह्यांपैकीं पांच ज्ञानेंद्रियांच्या ठिकाणीं पंचमहाभूतांच्या पांच भिन्नभिन्न **विषयांचें** ज्ञान ग्रहण करण्याचा धर्म आहे. ह्यांनीं संपादन केल्या जाणाऱ्या ज्ञानाचा, संपादक व संरक्षक जीवितक्रियाव्यापारांना अतिशय उपयोग होत असतो. ह्यांचीं कार्यें ज्ञानतंतूंच्या योगानें होत असतात. पंचकर्मेंद्रियांच्या कार्यानाहि ज्ञानतंतूंच्या

**इच्छितक्रियाकारक ज्ञानतंतु**

द्वाराच चेतना मिळत असते. ह्या दहा इंद्रियांशीं संबंध असलेल्या ज्ञानतंतूंना इच्छित क्रियाकारक ज्ञानतंतु म्हणतात.

(१) **श्रवणेंद्रिय**– हें आकाशतत्त्वाचें ज्ञानेंद्रिय असून **शब्द** किंवा **ध्वनिज्ञान** हा याचा विषय आहे. भाषाविषयक आणि इतरहि परिस्थितिसूचक ध्वनि किंवा कसलाहि आवाज होतांच मनाला त्याचें ज्ञान देणें हें ह्याचें मुख्य कार्य आहे.

(२) **स्पर्शेंद्रिय**– किंवा त्वगिंद्रिय हें वायुतत्त्वाचें ज्ञानेंद्रिय असून **स्पर्शज्ञान** हा त्याचा विषय आहे. हें इंद्रिय त्वचारूपानें सर्व शरीरभर पसरलेलें आहे, तरी कपोल हें ह्याचें मुख्यस्थान आहे. शरीरावर कोठेंहि एकादें केर पडलें तरी त्वचेच्या द्वारा त्याचें मनाला ज्ञान होतें. ह्याच्या योगानें शीतोष्णादि सुखदुःखसंवेदक कोणत्याहि पदार्थाचा अंतर्बाह्यतः शरीराला स्पर्श झाला असतां तें मनाला तात्काळ समजतें.

(३) **चक्षुरिंद्रिय**– डोळे हें तेजतत्त्वाचें ज्ञानेंद्रिय आहे. **रूपज्ञान** हा ह्याचा विषय आहे. ह्याच्या टप्यांत येणाऱ्या कोणत्याहि पदार्थाचें छायाचित्र हें मनावर तात्काळ उमटवितें. हें ज्ञानेंद्रिय तेजतत्त्वाचें असल्यामुळें अत्यंत सूक्ष्म तेजस्वी कणसुद्धां दिसूं शकतो.

( ४ ) **रसनेंद्रिय**— जिव्हा हें जलतत्त्वाचें ज्ञानेंद्रिय आणि खारट, तिखट वगैरे **रसज्ञान** हा ह्याचा विषय आहे. सेवन करावयाच्या पूर्वी तोंडांत गेलेल्या पदार्थाची चव काय काय आहे याविषयींची जाणीव हें इंद्रिय मनाला देत असतें.

( ५ ) **घ्राणेंद्रिय**— नाक हें पृथ्वीतत्त्वाचें ज्ञानेंद्रिय असून **गंधज्ञान** हा याचा विषय आहे. हवेमधून मिश्र होऊन येणारा सुगंध किंवा दुर्गंध आणि खाद्यपेय अथवा जवळपास, स्वाभाविक रीतीनें संबंध येणाऱ्या पदार्थांच्या गंधाचें ज्ञान, ह्याच्या द्वारा मनाला होत असतें.

## कर्मेंद्रिय–कार्यविस्तार.

७४ पंचज्ञानेंद्रियांकडून होणारीं ज्ञानग्रहणाचीं कार्यें ज्याचीं त्यालाच समजत असतात. परंतु पंचकर्मेंद्रियांकडून जीं कार्यें होतात तीं दुसऱ्यांनाहि उघड दिसणारीं असतात; आणि त्यांच्या योगानें, प्राण्याचा स्वभाव, कर्तृत्व

व महत्त्व ह्या गोष्टी व्यक्त होत असतात. ( १ ) **वागिंद्रिय**–तोंड हें आकाशतत्त्वाचें कर्मेंद्रिय आहे. शब्द हा आकाशाचा विषय आहे. ह्या कर्मेंद्रियाच्या योगानें शब्दोच्चार करून आपले विचार दुसऱ्याला कळवितां येतात. आकाशतत्त्वाच्या संग्राहक गुणानें खाद्यपेयादि पदार्थांचें ग्रहण करण्याचेंहि कार्य हें करीत असतें. (२) **हात**– हें दुसरें व वायुतत्त्वाचें कर्मेंद्रिय आहे. देणेंघेणें वगैरे व्यवहाराचीं व कर्तृत्वाचीं सर्व कार्यें मुख्यतः ह्या इंद्रियाकडून केलीं जातात. पोकळी असेल तेथें प्रवेश करणें हा जसा वायूचा गुण आहे त्या प्रमाणेंच याच्या कर्तृत्वाचें क्षेत्रहि अमर्याद आहे. मानवी कर्तृत्वाच्या कार्यांत हेंच मुख्य इंद्रिय आहे, असें म्हणणें गैर होणार नाहीं. ( ३ ) **पाय**– हें तेजतत्त्वाचें कर्मेंद्रिय आहे. जाणेंयेणें ह्या रूपानें शरीराला वाटेल तेथें वाहून नेण्याचें कार्य हें करीत असतें. ( ४ ) **मूत्रेंद्रिय**– हें जलतत्त्वाचें कर्मेंद्रिय असून शरीरांतील अशुद्धप्रवाही द्रव्यांचें उत्सर्जन मूत्ररूपानें करणें हें ह्याचें कार्य आहे. ( ५ ) **गुद**– हें पृथ्वीतत्त्वाचें कर्मेंद्रिय मलविसर्जनक्रियेनें संरक्षकाक्रिया करणारें आहे.

**कर्मेंद्रियें व त्यांचें कार्य**

## अंतःकरणसंस्था

७५ अंतर्गत व बाह्य इंद्रियांच्या व्यापारांनीं प्राण्याच्या जीवितक्रिया घडत असतात, आणि हे व्यापार त्या इंद्रियांवर स्वामित्व असणाऱ्या,त्यांच्या तत्त्वविशिष्ट सेंद्रिय शक्तींच्या योगानें चालत असतात. **पांच** रसक्रियाकारक **कार्येंद्रियशक्ति** व **पांच** प्राणक्रियाचालक **प्राणशक्ति** अशा दहा **अंतर्गत** व अनिच्छितक्रियाकारक **शक्ति** आहेत, आणि **पांच ज्ञानेंद्रियशक्ति** व **पांच कर्मेंद्रिय**शक्ति अशा **दहा बाह्यकर्मशक्ति** आहेत. ह्या अंतर्गत दहा व बाह्य दहा इंद्रियशक्तींचें नियंत्रण करणाऱ्या व त्यांना चालना देणाऱ्या अशा ज्या मुख्य शक्ति आहेत, त्यांना अंतःकरणें असें म्हणतात. ह्या अंतःकरणांच्या द्वारा **जीवनशक्ति** आपलें कार्यकरून आपलें घटनाकर्तव्य बजावीत असते. हीं अंतःकरणेंहि पंचतत्वांच्या वैशिष्ट्यांचीं पांच आहेत.

**अंतःकरणें**

७६ आदिशक्ति ही सर्वव्यापक असल्यामुळें तिला जसें कोणत्याहि गुण-धर्मरूप घटकांचें अंतर्बाह्य ज्ञान असतें, त्याप्रमाणेंच जीवघटनेमध्यें असणारी तिचीच अंशभूत जीवनशक्तिसुद्धां त्या ज्ञानानें संपन्न असते. अनेक गुण-घटकांची एकरूप घटना आणि त्यांचे गुणधर्म व्यक्त व प्रकाशित करण्याच्या कार्याला प्रवृत्त होतांना, ती स्वतःच्या समान वैशिष्ट्याच्या सत्त्वगुणघटकांपैकीं सर्वप्रकाशक अशा तेजरूप सत्त्वगुणघटकांशीं एकरूप होते. हा घटक तिच्या कार्याला आधारभूत असें मुख्य अंतःकरण आहे. गुणघटकांचें अंतर्बाह्य स्वरूप आणि त्यांनीं होत असलेल्या घटनादि कार्यांची अंतर्बाह्य स्थिति ह्यांचें ज्ञान प्राप्त करून देणाऱ्या म्हणजे **बोधदायक** अशा ह्या अंतःकरणाला **बुद्धि** असें नांव दिलेलें आहे. ह्या तेजधर्मी बुद्धिरूप अंतःकरणाशीं एकरूप होऊन कार्यप्रवृत्त झालेली **जीवनशक्ति** पुढील वाढत्या घटनेला उपयुक्त अशी दोन प्रकारची **बीजघटना** करिते. त्यांपैकीं घटना**शक्तिप्रबल**बीज हें सूक्ष्मतत्त्वविशिष्ट घटकांच्या प्रामुख्यानें बनलेलें असतें. त्यामुळें सूक्ष्मापैकीं सूक्ष्म, असा आकाशतत्त्वाचा सत्त्वगुणरूप पावलेला घटक आणि जडापैकीं

**अंतःकरणवुद्धि**

सूक्ष्म अशा जलतत्त्वाचा सत्त्वगुणरूप पावलेला घटक, हे कर्तृत्वप्रबल असतात व तेच घटक त्या घटनेचे मूळ घटक असल्यामुळें तेच अंतःकरणरूप होतात. ह्यांपैकीं आकाशाचें **आत्मा** व जलाचें **चित्त** हीं त्यांच्या अंतःकरणांचीं नांवें आहेत. दुसरें जें साहित्यप्रबलबीज त्यामध्यें सूक्ष्मांपैकीं जड अशा वायुतत्त्वाचा सत्त्वगुणरूप घटक **मन** हें अंतःकरणरूप आणि जडापैकीं जड असा पृथ्वीतत्त्वाचा सत्त्वगुणरूप घटक **अहंकार** हें अंतःकरणरूप पावतो. घटनाशक्तिप्रबलबीजांपैकीं सूक्ष्म तेजधर्मी आणि साहित्यप्रबलबीजांपैकीं जड तेजधर्मी सत्त्वगुणरूप घटक, उभय बीजांच्या एकीकरणक्रियेनें **बुद्धि** ह्या तेजरूप अंतःकरणाचें हस्तकरूपी, प्रकाशक केंद्ररूप पावतात. नरबीजापैकीं सूक्ष्मतेजघटक अंतर्गतकार्यप्रबोधक, आणि साहित्यबीजापैकीं जडतेजघटक बाह्यज्ञानप्रबोधक, कार्यवाहक बुद्धिरूप पावतात. चित्त व आत्मा हीं अंतर्गत कार्यनियामक अंतःकरणें अंतर्ज्ञान-प्रबोधक बुद्धीसह संघरूपानें वाढत्या घटनेच्या कार्यामध्यें एका क्षणाचाहि

**अंतःकरणांतील आत्मा व चित्त; मन व अहंकार**

विसांवा न घेतां अहोरात्र गुंतलेलीं असतात. आत्मा हा आकाशघटक असल्यामुळें सर्व घटनेशीं व्यापकतेनें एकरूप असतो. प्रत्यक्ष कर्तृत्व चित्त ह्या अंतःकरणाकडे असतें. खंड न पाडितां कार्यतत्पर मनाला चित्त असें नांव प्राचीन आर्यतत्ववेत्त्यांनीं दिलेलें आहे. आधुनिक पाश्चात्य विद्याविभूषित विद्वान् याला अंतर्मन असें म्हणतात. परंतु ह्या नांवानें संबोधण्यापेक्षां अखंड कर्तृत्वधर्माला अनुरूप असें नित्ययुक्त म्हणून **नियुक्तमन** असें आम्हीं म्हणतों. आणि जीवनशक्ति व मूळ बुद्धि, यांच्या नियंत्रणाखालीं कामें करणाऱ्या चित्त म्हणजे **नियुक्तमन**प्रमुख अंतर्गत कार्यनियामक अंतःकरणसंघाला **नियुक्तमंडळ** असें म्हणतों. तसेंच संपादनप्रमुख कार्य करणाऱ्या, **बाह्य-मन** व अहंकार यांना **प्रयोगीमंडळ** म्हणतों.

७७ जीवघटनात्मक अंतःकरणांची घटना सत्त्वगुण साहित्यघटकांच्या योगानें होत असते, यामुळें त्यांच्या कर्तृत्वाला अवश्य असणारी इंद्रियघटना सत्त्वगुणविशिष्ट घटकांपासून होणें अवश्य असतें, म्हणून ती रसक्रियेनें रजोगुणांतील सत्त्वगुणविशिष्टरूप पावून त्यांना सजातीय झालेल्या घटकांपासून केली जाते. बीजापासून वाढत्या घटनेचें कार्य सुरू झाल्यानंतर, पंचतत्त्वांचे जे घटक संस्कारानें सूक्ष्मत्व पावत जाऊन सत्त्वगुणवैशिष्ट्य पावण्याला लायक होतात, त्यांनीं ह्या इंद्रियघटना होत जातात व वाढतात. मेंदु किंवा मज्जा-

**सहस्रदल-शिरोब्रम्ह–जीवन शक्तीचें केंद्रस्थान**

रूप घटना ही अंतःकरणाची इंद्रियरूप घटना असून ज्ञानतंतु किंवा मज्जातंतु यांच्या द्वारा ती अंतर्बाह्य इंद्रियांच्या क्रियाव्यापारांचें नियंत्रण करीत असते शिरोभागीं, अगदीं वरच्या बाजूस, टाळूच्या कवचीच्या आंत मुख्य व मोठा मेंदु असतो. त्याला **सहस्रदल** किंवा **शिरोब्रम्ह** म्हणतात. हा ज्ञानपिंड मूळ बुद्धीचें मुख्य इंद्रिय आहे. जीवाचा अंतर्बाह्यतः ज्या ज्या गोष्टींशीं संबंध येईल त्या सर्वांचें शक्य तितकें, अंतर्बाह्य गुणधर्म व स्थिति, यांचें ज्ञान ग्रहण करून तें **स्मृति**-रूपानें संग्रहित करून, सर्व अंतःकरणांना व त्याच्या कार्याना अवश्य तें ज्ञान प्रकाशित करणें हें कार्य ह्या इंद्रियाच्या योगानें **बुद्धि** करीत असते. हें सर्व ज्ञानप्रबोधक इंद्रिय **जीवनशक्तीचें** केंद्रस्थान आहे. येथून बुद्धीच्या द्वारा अंतर्गत व बाह्य कर्मनियामकमंडळाचें नियंत्रण तिला करतां येतें.

७८ सहस्रदल मेंदूमधून मागील बाजूनें पाठीच्या कण्याच्या मणक्यांमधील नळींतून, माकडहाडापर्यंत एक ज्ञानरज्जू (ज्ञानतंतूंचें जुंबाड) उरलेला आहे, त्याला **सुषुम्ना** असें म्हणतात. मोठ्या मेंदूचीच ही शेपटी आहे व तिच्या ठिकाणींहि ज्ञानग्राहक व प्रबोधक गुणधर्म आहेत. मोठ्या मेंदूच्या मागील भागाखालीं, लहान किंवा **शतदल** मेंदू असून त्याचा वरचा भाग मोठ्या मेंदूशीं संबंधित आहे. अनिच्छित असे, अंतर्गत कार्योपयोगी, सहकारी किंवा **सहानुभव ज्ञानतंतु** शतदलाशीं व त्याच्या द्वारा सहस्रदलाशीं संबंधित आहेत. सुषुम्नेच्या दोहोंबाजूनीं ह्या ज्ञानतंतूंच्या रांगा, खालीं उतरलेल्या आहेत. दुसऱ्या प्रकारचे म्हणजे इच्छितक्रियाकारक ज्ञानतंतु हे उजवीकडचे डावीकडे व डावीकडचे उजवीकडे असे वळून, वरील सहकारी ज्ञानतंतूंशीं वेणीसारखी गुंफण होत जाऊन खालीं उतरतात. यांचा संबंध वेणीस्थानाशीं व मेंदूशीं असतो. सुषुम्नेचा जेथें प्रारंभ होतो तेथून तिचें वरचें टोंक मध्यमेंदूला टेंकलेलें आहे. त्याला **वेणीस्थान** किंवा सुषुम्नाशीर्ष असें म्हणतात. येथूनच ज्ञानतंतूंची वेणीसारखी गुंफण पडते म्हणून याला वेणीस्थान हें नांव पडलेलें आहे. ह्या ज्ञानतंतूंकडून स्पर्शादि बाह्यज्ञान होतें, आणि बाह्येंद्रियांकडून त्यांचीं कर्में करवून घेतलीं जातात. अंतर्गत क्रियांशीं त्यांचा कांहींहि प्रत्यक्ष संबंध नसतो.

**सुषुम्ना वेणीस्थान**

७९ सुषुम्नेच्या दोहों बाजूंनीं सहानुभव ज्ञानतंतूंच्या ज्या दोन मालिका उतरलेल्या आहेत, त्यापैकीं उजवीला **इडा** व डावीला **पिंगला** नाडी असें म्हणतात. ह्या दोन्ही मालिकांना वरपासून खालपर्यंत जागोजागीं ग्रंथियुक्त कमलाकार जाळीं बनलेलीं आहेत; यांना ज्ञानकेंद्रें किंवा केंद्रकमलें म्हणतात. ह्यांमधून फुटणाऱ्या तंतूंचा संबंध जवळपासच्या इंद्रियांशीं असतो. इच्छित क्रियातंतूंचीहि यांच्याशीं गुंतागुंत होत असते. अंतर्गत असें वाढत्या घटनेचें व संरक्षणाचें कार्य करणाऱ्या नियुक्तमंडळापैकीं चित्त ऊर्फ **नियुक्तमन** हें कर्तृत्वप्रधान अंत:करण असून पांच कार्यशक्ति व पंचप्राणशक्ति यांच्याकडून त्यांचीं कर्तव्यें करून घेण्याचें जें नियंत्रक कार्य तें करीत असतें, तें शतदलांमधून, सहकारी ज्ञानतंतूंच्या द्वारा करीत असतें. कारण शतदल

**इडा व पिंगला**

हें नियुक्तमनाच्या कर्तृत्वाचें केंद्र आहे. अंतर्गत कार्य हें ज्ञानपूर्ण चातुर्याचें कार्य असल्यामुळें प्रबोधक बुद्धीशीं याचा निकट संबंध आहे; आणि म्हणूनच लहान व मोठा मेंदू हे एकमेकांशीं दृढसंबंध आहेत. घटनात्मक क्रियेनें सत्त्वरूप पावलेले घटक मोठ्या मेंदूकडे पाठविले जाऊन, त्याची वाढ होण्याला हें **शतदल** उपयोगी पडतें. बाह्य कर्तृत्वाला उपयुक्त अशी ज्ञानतंतुमय व इतर इंद्रियघटनासुद्धां ह्याच्याच कर्तृत्वानें होत असते, आणि प्रयोगी मनाच्या कर्तृत्वाला उपयुक्त साधनें तयार होत असतात. ह्या अंतःकरणाच्या ताब्यांतील सहकारी ज्ञानतंतूंचीं कमळें जशीं कण्याच्या बाजूनें असतात, तशींच शरीराच्या कोनाकोपऱ्यांतसुद्धां तीं बनत असतात. त्यामुळें शरीरामधील सर्व भागांतील स्थितीचें योग्य ज्ञान, त्यांच्या द्वारा बुद्धीला व जीवनशक्तीला होऊं शकतें व त्या योगानें घटनात्मक कार्य करण्याला, कार्यशक्तींना शक्य तितका शक्तीचा पुरवठा करून ती प्रबोधित करिते.

८० शरीर व जीवंतपणा ही संमिश्र घटना सुदृढ करण्यासाठीं सृष्टींतील पंचतत्त्वात्मक साधक साहित्याचें संपादन आणि बाधक साहित्याचा त्याग किंवा त्यांपासून घडणाऱ्या अपायांचें निवारण करण्याचें कार्य, बाह्येंद्रियांकडून करून घेण्याची कामगिरी, प्रयोगीमंडळाकडे संपविलेली असते. बाह्येंद्रियांपैकीं पंचज्ञानेंद्रियांकडून स्वतःच्या प्रत्यक्ष कर्तृत्वानें असें प्रयोगी मनाला फारसें काम करून घ्यावयाचें नसतें. कारण आपापल्या विषयाचें ज्ञानग्रहण करण्याचा धर्म ज्ञानेंद्रियांच्या ठिकाणीं सहजधर्मानें ठेविलेला आहे. त्यामुळें स्वविषयाचें ज्ञान ग्रहण करून, संपादन केलेले ज्ञानघटक सहस्रदलामध्यें बुद्धीकडे सरळ पोंचते होतात. परंतु त्यांच्या इष्टानिष्टपणाचें, ग्राह्याग्राह्यतेचें वगैरे जें कार्य करावयाचें असतें तें करितां येण्यासाठीं त्याची जाणीव मनानें घ्यावयाला पाहिजे असते. बुद्धीकडून ही जाणीव देण्याचें आणि मनाकडून ती घेतली जाण्याचें स्थान, कपाळाचे आंतले बाजूस, मेंदूच्या पुढच्या भागामध्यें असलेलें **आज्ञाचक्र** हें आहे. पंचज्ञानेंद्रियांनीं

**आज्ञाचक्र**

ज्ञात होणाऱ्या ज्ञानाची आणि अंतर्गत कार्यासाठीं कराव्या लागणाऱ्या खाद्यपेयादि **संपादनाची** किंवा **संरक्षक** कार्य करण्याची जाणीव, बुद्धीकडून ह्या ठिकाणीं मनाला दिली जाते. ही जाणीव देणें, म्हणजे आपलें कर्तव्य बजावण्याची आज्ञाच होत

असल्यामुळें ह्या स्थानाला **आज्ञाचक्र** हें नांव दिलेलें आहे. ही आज्ञा मिळाल्यानंतर शरीराची व इंद्रियांची हालचाल करून मनाला आपलें काम करावें लागतें. त्यासाठीं लागणारी शक्ति व ती वाहून नेणारे ज्ञानतंतू यांवर मनाला स्वतंत्र ताबा **वेणीस्थाना**मध्यें दिलेला असतो, म्हणून तें मनाचें केंद्र आहे.

८१ ज्ञानेंद्रियांच्या योगानें मिळालेल्या ज्ञानाची जाणीव, बुद्धि बोधरूपानें घेते आणि ती मनाला देते, त्या वेळीं मेंदूच्या ज्या भागामधून ही देवघेव होते, त्या ठिकाणीं स्मृतिरूपानें मेंदूच्या जडघटनेशीं, बोधरूप सत्त्वघटकांचें एकीकरण होऊन, त्याला स्मृतिदायक इंद्रियत्व प्राप्त होतें. मेंदूच्या ह्या भागाला **स्मृतिपटल** असें म्हणतात. त्यामुळें स्मृतिरूपानें स्मृतिपटलामध्यें एकीकृत घटना पावून राहिलेलें ज्ञान, कालांतरानेंहि प्रकाशित होऊं शकतें. मनुष्याच्या अंगीं विद्वत्तादिक गुणांची वाढ ह्या स्मृतिपटलाच्या प्रभल्भतेवरच अवलंबून असते. स्मृतिपटल हा मन आणि बुद्धि यांना जोडणारा दुवा आहे.

**स्मृतिपटल**

८२ मनाचा मूळ सहज स्वभाव पाहिला तर असा आहे कीं, एकाद्या कार्याची, शक्तीच्या पुरवठ्यासह आज्ञा झाल्याशिवाय, तें कांहीं हालचाल करावयाचें नाहीं, किंवा कर्तृत्वासाठीं मिळालेली शक्ति शिल्लक असली, तर अनवश्यक गोष्टीहि आज्ञेशिवाय करीत राहील. आज्ञेनें नियोजित केलेल्या कामाशिवाय, स्वतंत्रपणेंच व स्वेच्छेनेंच कांहीं तरी काम करीत असावयाचें व त्याचा इष्टानिष्ट परिणाम काय होईल याविषयीं बुद्धीचा अभिप्राय जाणून घेतल्याशिवाय किंवा बुद्धीनें तें न करण्याचा इशारा दिला असला तरीहि तें करावयाचें हा मनाचा स्वभाव आहे. स्वेच्छेनें असें काम करणें व त्याचा काय परिणाम होतो, तो पाहाण्यासाठीं तें करणें, म्हणजे प्रयोग करून पाहणें हा त्याचा स्वभाव असल्यामुळेंच आम्ही त्याला **प्रयोगीमन** हें नांव दिलें आहे. त्याच्या ह्या प्रयोगी कर्मामुळें, आवश्यक कर्माची आज्ञा झाली असतांहि, तें काम अर्धवट टाकून तें प्रयोगी कर्माला प्रवृत्त होतें. म्हणून त्याच्याकडून नियोजित आवश्यक कामें करवून घेण्यासाठीं अहंकाराला उत्तेजन देण्यांत येतें.

**प्रयोगी मन,**
**अहंकार**
**हृदयकमल**

ग्रा. ९८९

मनाचें कार्य मुख्यतः घटनासाहित्य संपादन करणें हें असतें; व अहंकार-हा साहित्यप्रबल घटनेंतील अंतःकरण असल्यामुळें त्यांची गट्टी जमते. शरीर हें पृथ्वीतत्त्वाच्या आधिक्याचें असतें, त्यामुळें त्याच तत्त्वाच्या धर्मांच्या ह्या अंतःकरणाची, ह्या शरीराच्या ठिकाणीं, स्वीयभावना स्वाभाविक असते. त्याच्या सुदृढतेसाठीं, व सुस्थितीसाठीं, मनाला कोणत्याहि कार्याची आज्ञा झालेली असते, म्हणून हा अहंकार त्याला प्रयोगी कर्मांपासून परावृत्त करून नियोजित कार्य आपलेपणानें करावयास लावितो. सहकारी तंतूंचीं जीं कमलाकार जाळीं पाठीच्या कण्याच्या दोहों बाजूंकडे असतात, त्यांमधील, छातीखालील मध्यपटलाच्या खालीं आणि बेंबीच्या वरच्या बाजूस पोटाखालीं कण्याच्या दोहों बाजूंच्या कमलांचें एकीकृत व विस्तृत झालेलें एक कमल आहे. ह्यामध्यें मेंदूप्रमाणेंच पांढरा व करडा मगज असतो व त्याचे व्यापारहि मुख्य मेंदूसारखेंच असतात, असें पाश्चात्य पंडितांनींहि ठरविलें आहे. याला ते ( सोलर प्लेक्सस ) **सूर्यकमल** किंवा ( ॲब्डॉमिनल ब्रेन ) कुक्षिस्थ मेंदु असें म्हणतात. आपल्या प्राचीन तत्त्ववेत्त्यांनीं ज्याला **हृदयकमल** असें म्हटलें आहे, तेंच हें **अहंकाराचें** स्थान आहे. मन जरी एकाद्या कामामध्यें गढलेलें असलें, तरी इंद्रियचालनेनें संरक्षणाचें, साधारण असें काम, हें परभारेंच करूं शकतें. कारण ह्याला मनाचें कार्य करून घेण्याची शक्ति मिळालेली असते. एकाद्या लहान मुलानें (मोठ्या माणसानेंहि) त्याला सांगितलेलें काम नीट रीतीनें पार पाडलें, तर आपण त्याला शाबासकी देतों. ती देतांना आपण त्या मुलाच्या पाठीवर, बरोबर ह्या कुक्षिस्थ मेंदूवरच हात मारितों. शाबासकीमुळें अहंकाराला उत्तेजन मिळतें व तेवढ्या उत्तेजनामुळें अहंकाराचा झालेला शक्तिक्षीण भरून निघतो व तो पुन्हां प्रफुल्लित होतो. मनुष्याप्रमाणेंच पशूंनाहि शाबासकी दिली असतां ते प्रफुल्लित होतात.

८३ पांचवें अंतःकरण **जीवात्मा** हा ह्या घटनात्मक खटाटोपाचा मुख्य घटक आहे. आकाशतत्त्ववैशिष्ट्यानें ह्याचे ठिकाणीं व्यापकता हा धर्म आहे, त्यामुळें तो सर्व शरीर व्यापून असतो. परंतु घटनाकर्तृत्वाचें मुख्य **केंद्र** किंवा शरीररूपी फळाचा देंठ, असें जें **जीवनशक्तीचें** मुख्य स्थान, तेंच त्याचें प्रथमतः प्रमुख स्थान असतें. ह्या ठिकाणीं त्याच्याशीं सर्व शरीर व जीवितघटकं एकरूपतेनें संबद्ध होतात आणि त्या योगानें परमात्मतत्त्वाचा

अनंत गुणसंपन्न एकरूपतेचा संस्कार देण्याचें कार्य केलें जात असतें. हा संस्कार दृढ होण्यासाठीं, घटनेशीं संबद्ध होणाऱ्या सर्व गुणधर्मरूप घटकांचें अंतर्बाह्य ज्ञान होणें आवश्यक असतें. ते दृढपणानें होण्याचे संस्कार घेतां येण्यासाठीं, सहस्रदलामध्यें त्याच्या अधिष्ठानाचें स्वतंत्र कमलकेंद्र तयार केलेलें असतें, व ह्या ठिकाणीं बुद्धि व मन ह्यांच्या देवघेवीच्या व्यापारांनीं अंतर्बाह्य स्थितीचें ज्ञान त्याला होत असतें. सुस्थितीच्या जाणीवेनें **जीवात्मा** आनंदवृत्तीनें स्वस्थ असतो. क्षुधातृषादिकांनीं सुस्थितीमध्यें बदल झाला म्हणजे मनाला संपादनादिकाची जाणीव दिली जाते. त्या जाणिवेनें तो दुःखित होतो. संपादनादि क्रियेनें सुस्थिति प्रस्थापित झाल्याच्या जाणीवेनें पुन्हां सुखी होतो. अशा रीतीनें निरनिराळ्या विषयांच्या

**जीवात्मा व स्थान**

ज्ञानानें व प्रसंगानें, सुखदुःखाची जाणीव त्याला होते व ती मनाच्या व्यापारांनीं होते. विशेषतः विषयग्रहणानें सुख प्राप्त होतें, ह्या जाणिवेनें तो मनाधीन होत जातो; आणि देहाचा अभिमान म्हणजे देहाचे ठिकाणीं आपलेपणाची भावना दृढ करीत जातो. यामुळें बोधदायक बुद्धीची संगति सुटत जाऊन, मन व अहंकार यांची संगति वाढत जाते. ह्यामुळें त्याचें सहस्रदलस्थ कमलकेंद्र सुटत जाऊन, हळूहळू **अहंकाराच्या हृदयकमला**-मध्यें तो अधिष्ठित होतो. या गोष्टीला एक प्रत्यंतर आढळतें, तें असें कीं, जन्मतः **शिरोब्रम्ह** किंवा सहस्रदल मेंदु, याचा ऊर्ध्व भाग कवचीनें बंद झालेला नसतो. लहान मुलांची टाळू म्हणतात ती रंध्ररूप खळगी फक्त त्वचाच्छादित असते, व ती एकसारखी उडत (वरखालीं होत) असते. तसेंच ह्या ठिकाणीं पाणी, दूध, तूप किंवा तेल घातलें असतां तें शोषून घेतलें जात असते. जन्मानंतर श्वसनक्रियेपूर्वीच मेंदूवरील ही क्रिया सुरू झालेली असते. जन्मलेल्या मुलांच्या मनोव्यापारांनीं होणाऱ्या ऐच्छिक क्रिया सुरू होऊन त्यांचें निरनिराळ्या विषयांकडे लक्ष वेधूं लागून त्याच्या खेळाडू चळवळी सुरू झाल्यानंतर ही टाळूची खळगी वर कवची वाढत जाऊन, बुजून जाते. ज्या मुलाच्या ह्या चळवळी सुरू होण्याला उशीर लागतो. त्याची टाळू बंद होण्यास उशीर लागतो. जीवात्मा हा आकाशविशिष्ट सत्त्वगुणघटक असल्यामुळें ह्या महारंध्रद्वारा त्याचा विश्वाकाशाशीं संबंध रहात असतो, व

(सूर्य आत्माजगतः तस्थुषश्च) जगताचा आत्मा असा जो सूर्य, त्याच्या योगानें तेजसंपन्न झालेला वायु ह्या द्वारानें सहस्रदलामध्यें शोषिला जात असतो, व अशा रीतीनें त्याचा व जगदात्मा जो सूर्य, त्याचा परस्पर संबंध रहात असतो. परंतु मनाधीन होऊन, आत्म्याची त्याच्याशीं गट्टी जमत चालली म्हणजे त्याचा अंतर्ज्ञानप्रकाशक बुद्धीशीं व जगदात्म्याशीं असलेला निकट संबंध दुरावत जातो; आणि सत्त्वगुणाचा संबंधहि त्यामुळें सुटून रजोगुणसाहित्य-संपादक प्रयोगी मंडळाशीं संबंध जुळत जातो. त्यामुळें तो आपलें सहस्र-दलस्थ स्थान आणि विश्वाकाशाशीं असलेला संबंध सोडून हृदयकमलामध्यें अधिष्ठित होऊं लागतो. त्यामुळें टाळूचें रंध्र—महारंध्र—आवश्यकता न राहिल्या-मुळें व त्याच्या द्वारा क्रियाव्यापार करणाऱ्या अंतःकरणाचें ( आत्म्याचें ) त्यावरील स्वामित्व सुटल्यामुळें घटनाशक्तीकडून बंद केलें जातें. तसेंच सह-स्रदलामध्यें जीवात्म्याच्या अधिष्ठानासाठीं कमलाकार घटनेनें जें स्थान तयार होत असतें, तेंहि अनवश्यक ठरल्यामुळें, त्याला तंतु फुटून त्याची होणारी वाढती घटनाहि बंद होते. म्हणून मेंदूमध्यें तें टाकाऊ स्थितींत असलेलें आढळतें.

**मेंदूचीं स्थानें व कार्य**

८४ मेंदु किंवा मज्जामय घटना हें अंतःकरणांचें इंद्रिय आहे. ह्या घट-नेपैकीं **मध्यमेंदु** हें जीवात्म्याचें इंद्रियस्थान आहे. हा मेंदु सहस्रदलाचा खालचा भाग होय. एकाद्या फुलाच्या पाकळ्यांच्या बुंधाचा भाग जसा कर्णिका-रूपानें असतो, तसाच हा भाग **—मेंदु—** सहस्रदल-कमलकार्णिकारूप आहे. **सहस्रदल** हा वरच्या बाजूस विस्तार पावतो; **शतदल** हा मागील बाजूस आणि **वेणीस्थान** हा मेंदु ह्याला लागून खालच्या बाजूस असतो. **कुक्षिस्थमेंदु** हा **पृथ्वीतत्त्व**विशिष्ट म्हणजे तमोगुणांपैकीं सत्त्वविशिष्ट म्हणून जडधर्मी मेंदु सुषुम्नेच्या मध्यभागीं, पाठीच्या कण्यांत असतो. हा कुक्षिस्थ मेंदु म्हणजे **हृदयकमल** हें **अंहकाराचें, वेणीस्थान** हें वायुतत्त्वाच्या **प्रयोगी** मनाचें, **शतदल** किंवा धाकटा मेंदु हें जलतत्त्वाच्या **नियुक्तमन** अथवा चित्ताचें, आणि **सहस्रदल** हें सर्व प्रकाशक तेजतत्त्वाच्या **बुद्धि** ह्या अंतःकरणाचें इंद्रियस्थान असून त्यांचा सर्वांचा मध्यमेंदूशीं निकट संबंध जुळलेला आहे. आत्मा हा स्वयंकर्तृत्ववान् नसून सर्वांचा द्रष्टा

आहे, असें वेदांतानें प्रतिपादन केलेलें आहे. मध्यमेंदूकडूनहि स्वयंकर्तृत्वाचें असें विशेष कार्य घडत असलेलें दिसत नाहीं, तथापि द्रष्टेपणाला म्हणजे पाहण्याला आवश्यक अशा दर्शनेंद्रियाच्या ज्ञानतंतूंचा आणि दृष्टीच्या हालचालीला आवश्यक व उपयुक्त अशा तंतूचा निकट संबंध ह्या मध्यमेंदूशींच असून सहस्रदलामध्यें रद्द होऊन राहिलेलीं जीं कमलें आढळतात तीं ह्या दर्शनेंद्रिय चालक तंतूंवरच असतात. ह्यावरून उघड होतें कीं, द्रष्टेपणानें अंतर्बाह्य ज्ञानग्रहणाचें कार्य करितां येण्यासाठीं, ही कमलाकार ज्ञानग्राहक घटना होत असते; परंतु जीवात्म्यानें आपलें अधिष्ठानाचें केंद्र बदलून हृदयकमलामध्यें तें हालविल्यामुळें ही घटना विकास पावण्याची थांबते आणि हृदयकमलाचा विकास होत जातो. ह्या ठिकाणीं जीवात्म्याला अवश्य तितकें ज्ञान ग्रहण करितां येण्यासाठीं दोन्ही प्रकारच्या सरणीमधील ज्ञानतंतु यांच्याशीं निगडित केलेले आहेत, आणि मेंदूमधील ज्ञानद्रव सुषुम्नेमधील ज्ञानद्रवाशीं संबद्ध असल्यामुळें, सहस्रदलांतील ज्ञानग्रहणाची सोय ह्या ठिकाणींहि घडविलेली आहे; म्हणूनच हृदयकमलामधून मुख्य मेंदुमय इंद्रियाप्रमाणेंच कार्यें, परंतु दुय्यम रीतीनें, घडत असतात.

**प्रयोगी मनाचें कार्य**

८५ घटनाकारिणी **जीवनशक्तिच्या** कर्तृत्वानें मनुष्यप्राणि जन्मास येत असतो. त्याची उत्पत्ति किंवा घटना मातेच्या शरीरघटक साहित्याच्या ग्रहणानें होत असते व जन्मानंतर स्वतंत्रपणें जीवितक्रिया सुरू होऊन वाढत्या व सुदृढ घटनेचें कार्य सुरू होतें. ह्या कार्याला अन्नपानादि पंचात्मक घटनासाहित्याची आणि शीतोष्णादि उपाधींपासून बाह्यतः रक्षणाची आवश्यकता असते व ती बाह्येंद्रियांच्या द्वारा भागवावयाची असते. परंतु हें काम ज्याचें त्याला करितां येण्यासारखी, बाह्येंद्रियांना कार्यक्षमता येईपर्यंत दुसऱ्या आप्तेष्टादिकांनाच तें करावें लागतें. कांहीं दिवसांनंतर एकेका बाह्येंद्रियाला कार्यक्षमता व शक्ति, जीवनशक्तीकडून मिळत जाते, तशी तशी प्रयोगी मनावर संपादक व संरक्षक कर्मांची जबाबदारी येत जाते. हा कार्यभार अर्थातच वाढत्या व सुदृढ घटनेला आवश्यक कर्में करण्यासाठीं प्रयोगी मनावर पडत असतो. सृष्टपदार्थांमधून वाढत्या घटनेला पोषक आणि संरक्षक साहित्य, बुद्धीच्या सल्ल्यानें त्याची इष्टानिष्टता, योग्यायोग्यता, साधक-

बाधकता वगैरे गोष्टींचें ज्ञान करून घेऊन, संपादन करावाचें असतें. तें योग्य प्रकारें करितां येण्यासाठींच बाह्येंद्रियांमध्यें पंचज्ञानेंद्रियांची घटना व योजना केलेली असते. क्षुधा, तृषा, थंडी, उष्णता वगैरेंची जाणीव आणि निवारक कर्मांची आज्ञा किंवा प्रेरणा, प्रयोगी मनाला, अंतर्गत रीतीनें जीवनशक्ती-कडून झाल्यानंतर, कर्म करण्याची तें इच्छा करितें, व नंतर कर्म करूं लागतें. तें कर्म करण्यालाहि कर्मेंद्रियांना शक्तीचा पुरवठा **जीवन**शक्तीकडूनच व्हावयाचा असतो व होत असतो. कोणत्याहि सृष्ट पदार्थांचा उपयोग करून घेण्यापूर्वी, प्रयोगी मनानें, त्याच्या योग्यायोग्यतेची तपासणी करून घ्याव-याची असते.

**सेव्य पदार्थांची निवडानिवड व ती करण्याचें ज्ञान. सेव्य–पृथ्वी-जल**

८६ शरीरपोषणासाठीं, सेव्यपदार्थांतील पहिलें पृथ्वीतत्त्व– त्याचें अन्न वगैरे पदार्थ तोंडांत घालण्यापूर्वी हातांच्या ठिकाणीं असणाऱ्या स्पर्शज्ञानेंद्रियानें, तो थंड आहे कीं उष्ण आहे? मऊ आहे कीं टणक आहे? हलका आहे कीं जड आहे? या विषयींचें ज्ञान करून घेतां येतें. पदार्थांच्या स्वाभाविक उष्णतेवरून त्यामधील सेंद्रि-यता अजमावितां येते. तो गारठलेला असेल तर त्या-मध्यें निरिंद्रियता वाढूं लागली आहे, व जीवनशक्त्यंश अल्प आणि संहारशक्त्यंश वाढलेला आहे हें लक्षांत घेतां येतें. तो मऊ किंवा टणक असेल त्या मानानें त्याची रस बनण्याची पात्रता व हलका किंवा जड असेल त्यावरून तो सूक्ष्मतत्त्वविशिष्ट आहे कीं जडतत्त्वविशिष्ट आहे, हें ठरवितां येतें. अशा परीक्षणानें त्याची सेव्यासेव्यता समजून येते. दृष्टि ह्या ज्ञानेंद्रियाच्या योगानें, पदार्थ मलिन किंवा घाणेरडा दिसेल तर तो अपायकारक आणि स्वच्छ, सतेज असेल तर उपयुक्त होईल हें ठरवितां येतें. घ्राणेंद्रियाच्या योगानें, तो दुर्गंधयुक्त असेल तर त्याज्य ठरवितां येतो. जिव्हे-च्या योगानें त्याची चव जाणून घेऊन सेव्यासेव्यता समजून घेतां येते. दुसरें जलतत्त्व –प्रत्यक्ष जल म्हणजे पाणि किंवा इतर पेयपदार्थ वगैरे, यांचीहि ज्ञानेंद्रियांकडून अशाच रीतीनें परीक्षा करून ते सेवन करण्याला पात्र कीं अपात्र आहेत तें ठरवितां येतें.

८७ तिसरें तेजतत्त्व—याचेंहि, शरीर व जीवित यांच्या स्वास्थ्यासाठीं सेवन करण्याची आवश्यकता असते. यासाठीं त्याचें परीक्षण करावें लागतें.

**सेव्य पदार्थ तेज**

जगाला प्रकाश देणाऱ्या सूर्यापासून तेजाची प्राप्ति होत असते. सूर्योदय होतांच सर्व प्राणि उल्हसित होऊन आपले क्रियाव्यापार सुरू करितात. निरभ्रस्थितींतील उन्ह कडक असलें तरी जसें सोसवतें तसें अभ्राच्छादित स्थितींतील उन्ह कडक नसतांहि सोसवत नाहीं. दिव्याचा प्रकाश किंवा विस्तवाची उष्णता सौर तेजाइतकी सुखकर व हितकर होत नाहीं. उष्णतेचें सेवन सुखकर किंवा त्रासदायक होईल त्या मानानें स्वास्थ्याला त्याची आवश्यकता व उपयुक्तता किती आहे हें ठरवितां येतें. तेजाच्या योगानें सचेतन होत असल्यामुळें सर्व जड व सुक्ष्म वस्तु चैतन्ययुक्त होतात. पृथ्वीतत्त्वविशिष्ट पदार्थ तेजतत्त्वानें पित्तकर धर्माचे होतात. जलतत्त्वविशिष्ट पदार्थ उष्णरूप होतात. वायुतत्त्वविशिष्ट ( सुक्ष्मतत्त्वविशिष्ट ) पदार्थ प्राणरूप तेजतत्त्वयुक्त होतात. स्वाभाविक सौरतेजदर्शनाला व स्पर्शाला जसें सुखकर वाटतें तसें जडतत्त्वाश्रित तेज वाटत नाहीं. कारण तेज हें उभयधर्मी असल्यामुळें जडाशीं संयुक्त झाल्यानें त्याचें संहारशक्तिवैशिष्ट्य वाढवितें, व दृष्टीला, स्पर्शाला व परिणामालाहि त्रासदायक होतें. ज्या पृथ्वीतत्त्वविशिष्ट वस्तु तेजतत्त्वाचें जास्त प्रमाणांत ग्रहण करितात, त्या पित्तकर व कडू होतात. ज्यांच्यामध्यें पित्तद्रव्य बेताचें असतें, ते पदार्थ खाण्याला रुचिकर लागतात. तेजाच्या योगानें निरनिराळ्या तत्त्वविशिष्ट पदार्थांच्या चवी व गुणधर्म भिन्न प्रकारचे होत असतात. ज्ञानेंद्रियांच्या योगानें ते संवर्धनानुकूल आहेत कीं प्रतिकूल आहेत हें ठरवितां येतें. मात्र हें ठरविणारें मन, बुद्धीच्या सल्ल्यानें वागणारें असलें पाहिजे, प्रयोगी बनलेलें असतां कामा नये.

८८ सूक्ष्म अशा वायुतत्त्वाचें ग्रहण करितांनाहि असेंच परीक्षण केलें जातें. वायुमध्यें पृथ्वीतत्त्वविशिष्ट जडधर्म मिश्र झालेले असतात त्या वेळीं तो स्पर्शाला जड, हिंवस लागतो. जलयुक्त असेल तर आर्द्र व हिंवस वाटतो. तेजमिश्रित असेल तर उबारा देणारा व आल्हादक वाटतो. उष्णतायुक्त असेल

**सेव्यपदार्थ वायु**

तर दाह करितो. स्ववैशिष्ट्ययुक्त असतो तेव्हां त्याच्या स्पर्शानें मनाला हुषारी वाटते. आकाशविशिष्ट असेल

 ग्रा ९८७

तेव्हां प्रकृतीला अगदीं मोकळें व हलकें वाटतें. संहारशक्तीच्या द्रव्यांनीं मिश्रित वायु दुर्गंधयुक्त कोंदट लागून गुदमरल्यासारखें वाटतें. अशा वेळीं नाक दाबून धरणें व स्थलांतर करणें हे उपाय आपोआप सुचतात. तो जड व कोंदट असतो त्या वेळींहि खुल्या जागेकडे जाण्याची बुद्धि होते. तो सर्द असेल तेव्हां त्याच्या रोमरंध्रांतूनसुद्धां शरीरांत प्रवेश न व्हावा आणि शरीरांतील उष्णता त्यानें शोषून न घ्यावी म्हणून तें वस्त्रादिकांनीं आच्छादित करण्याची किंवा कृत्रिम उष्णतेनें त्याला उष्ण बनविण्याची बुद्धि सुचते. उष्ण वायूच्या स्पर्शानें अंगाची आग होऊन घामाच्या रूपानें शरीरांतील जलांश बाहेर पडून कमी होतो, म्हणून स्नान किंवा जलपान करणें आणि थंडसर ठिकाणीं जाणें अवश्य वाटूं लागतें. अशा गोष्टी शारीरिक क्रियांची समता राखून, जीवनशक्तीच्या कार्याला साहाय्यक होण्यासाठींच प्रयोगी मनाला बुद्धि ही सुचवीत असते.

**सेव्यपदार्थ आकाश— निद्रा-विश्रांति**

८९ शरीरांतील **आकाश**तत्त्वाची व्याप्ति—पोकळी—भरून काढण्यासाठीं मनाला व बाह्येंद्रियांना विश्रांति किंवा निद्रा घ्यावी लागते; कारण अन्नादिकांच्या ग्रहणानें आणि इतर बाह्य व्यापारांनीं कांहीं इंद्रियांवरच कार्यभार पडून, त्यांतील रसवाहिन्या वगैरेमधील पोकळी, विषम स्थितींत येत असते. अंतर्गत कार्यप्रवाहाला त्यामुळें अडथळे उत्पन्न झालेले असतात. संवर्धक व संरक्षक कार्यें चांगल्या रीतीनें चालवितां येण्यासाठीं, शरीरांतील कार्येंद्रियें व कार्यक्षेत्रें यांमधील पोकळींत उत्पन्न झालेलें वैषम्य नाहींसें करून पुन्हां पोकळीची योग्य ती समता आणणें आवश्यक असतें. प्रयोगी मनाचे ऐच्छिक व्यापार चालूच असतात. म्हणून ते बंद करण्यासाठीं, नियुक्त मंडळाकडून, मन व बाह्येंद्रियांना मिळणारा शक्तिप्रवाह बंद केला जातो. त्यामुळें त्यांची कर्तृत्वशक्ति क्षीण होते व विश्रांति घेणें भाग पडतें. विश्रांति व निद्रा यांनीं अंतर्गत कार्यांना अवसर सांपडतो, शक्तीचा तुटवडा भासत नाहीं आणि कार्यांची योग्य व्यवस्था लागून शक्तिसंग्रह करितां येतो. त्यामुळें पुन्हां बाह्य कर्मांसाठीं शक्तीचा योग्य पुरवठा करितां येतो. यासाठीं निद्रा हेंच आकाशतत्त्वाचें ग्रहणद्वार ठरविलेलें आहे. अन्नादि पदार्थ सेवन करितांना त्यांतील पोकळपणाची(विरळपणाची)तपासणी

केली जाते, तीहि अंतर्गत पोकळीची स्थिति शक्य तितकी रक्षण करण्यासाठींच असते. जडान्न किंवा अधिक अन्न सेवन केल्यानंतर निद्रा येऊं लागते, याचें कारण पक्वाशयांतील कमी झालेली पोकळी भरून काढणें हेंच असतें.

९०अन्नादि पदार्थ सेवन करण्यापूर्वीं, ते संवर्धनानुकूल आहेत कीं नाहींत, हें ज्ञानेंद्रियांच्या साहाय्यानें ठरविण्यासाठीं प्रयोगी मनानें कशा प्रकारें दक्षता घ्यावयाची असते, याविषयींचें सामान्यतः दिग्दर्शन झालें. ज्ञानेंद्रियांच्या सहजधर्मानें होणाऱ्या ज्ञानग्रहणाचा, संवर्धनानुकूल संरक्षक परिणाम होण्याच्या कामीं, प्रयोगी मनानें कशा प्रकारची दक्षता घेणें आवश्यक आहे तें पाहूं. ज्ञानग्रहणासाठीं ज्ञानेंद्रियांना मुद्दाम कांहींहि हालचाल करावी लागत नाहीं. श्वसनेंद्रियाच्या द्वारा सुगंध किंवा दुर्गंध, रसनेंद्रियाच्या द्वारा इष्टानिष्ट चव, दृष्टीच्या योगानें समोर येणाऱ्या वस्तूचें मोहक किंवा भयप्रद दर्शन, स्पर्शेंद्रियानें शीतोष्णादि इष्टानिष्ट स्पर्श आणि श्रवणेंद्रियानें मधुर किंवा कर्णकटुध्वनि, यांची प्रयोगी मनानें जाणीव घ्यावयाची व बुद्धीच्या साहाय्यानें त्यांची ग्राह्याग्राह्यता समजून घेऊन, तदनुसार कर्मेंद्रियांकडून, योग्य तें कर्म करून घ्यावयाचें असतें. याप्रमाणेंच मलमूत्रादिकांचें उत्सर्जन करण्याची जाणीव अंतर्गत चालनेनें मनाला मिळत असते. ह्याप्रमाणें प्रयोगी मनाकडून दहा इंद्रियांच्या द्वारा आत्मसंरक्षक क्रिया घडविण्याची योजना, जीवनशक्तीनें घटनापूर्वक केलेली आहे. ह्या योजनेनुसार त्यानें बुद्धीच्या सल्ल्यानें आपली कामगिरी दक्षतापूर्वक बजाविली म्हणजे संरक्षणाचा बोजा अंतर्गत कार्यशक्तींवर फारसा पडत नाहीं. परंतु प्रयोगी मन स्वेच्छाचारी झालें म्हणजे जीवनशक्तीवर संरक्षणाचा फाजील भार पडूं लागतो. यासाठीं मनुष्यानें प्रयोगी मनाला बुद्धीच्या सल्ल्यानें वागण्याची संवय लावणें किती हितकर आहे याचा विचार केला पाहिजे, व तशी संवय लावली पाहिजे. अशी ती न लाविल्याचा काय परिणाम होतो तें व्याधि व तिचीं कारणें, स्वरूप व बाह्य लक्षणें वगैरे गोष्टींचा विचार करतांना पुढें पाहूं.

**प्रयोगीमनाचें संरक्षणकार्य स्वाभाविक**

# जीवनशक्तीचें स्वरूप किंवा प्रकृतिभिन्नत्व.

[ आतांपर्यंत परमात्मतत्त्व, जीवबीज, मानवी शरीराची घटना, चैतन्यशक्तीचा अखंड प्रवाह, जीवनशक्ति व तिचें शरीरांतील कार्य व सत्ता, रसक्रिया व प्राणक्रिया व तसेंच पंचमहाभूतांचा व मानवी शरीराचा संबंध, त्यांच्या अंशाअंशापासून जीवनशक्तीकडून होणारें घटनेचें, संवर्धनाचें, संपादनाचें व संरक्षणाचें कार्य, यांचें विवेचन झालें. संजीवनाचिकित्सापद्धतीचा शास्त्र ह्या दृष्टीनें, तो खऱ्या अर्थानें पाया आहे. परंतु शरीराची निरोगी, जोमदार व कर्तृत्वक्षम स्थिति राखणें हा या शास्त्राचा हेतु आहे. शास्त्रशुद्ध नैसर्गिक जीवन चालत राहिल्यास, रोग किंवा विकार होण्याची धास्ती क्वचितच असते हें खरें आहे; परंतु कांटेतोल योग्य आहारविहार होत नाहींत. तसेंच इतर आनुषंगिक गोष्टी, कीं ज्यांवर आपला ताबा नसतो, अशा प्रत्यहीं घडत असतात व अनेक कारणांनीं विकार उद्भवतात. ज्याला आपण विकार, आजार, व्याधि असें म्हणतों तें खरोखरच जीवनशक्तीचें संरक्षण कार्य असतें. परंतु त्या विषयाचा विचार अन्यत्र करूं. असे विकार होतात तेव्हां औषधयोजना करणें अपरिहार्य असतें. ती करितांना मनुष्यांमनुष्यांतील **प्रकृतिभेद** जाणणें व त्याप्रमाणें भिन्न भिन्न औषधांची अनुरूप योजना करणें हें संजीवनचिकित्साशास्त्रांतील मुख्य इमारतीप्रमाणें आहे. ज्या प्रकारची प्रकृति असेल त्याला साम्य असलेलें सजातीय औषध दिलें असतां, त्या प्रकृतीची जीवनशक्ति सतेज, बलवान् व कार्यक्षम होते व विकाराचें उच्चाटन करण्यांत जीवनशक्तीला मदत होऊन ताबडतोब विकाराचें व लक्षणांचें शमन होतें. परंतु त्यांतूनहि महत्त्वाची गोष्ट म्हणजे शरीरांतील कोणत्याहि भागांत इतर विजातीय द्रव्यें किंवा अन्य विकारांचीं बीजें सूक्ष्म रूपांत असल्यास, त्यांचीहि हकालपट्टी त्याच वेळीं होते, हें ह्या औषधांचें महत्त्व आहे. ह्यासाठीं प्रकृतिभेद जाणणें इष्ट, उपयुक्त व जरुरीचें आहे. म्हणून त्याचा ह्या प्रकरणांत विचार करावयाचा आहे. ]

९१ मागील भागामध्यें जीवितशास्त्राचा मीमांसात्मक उहापोह केलेला

आहे. त्यांत दर्शविल्याप्रमाणें (परि० १३), परमात्मतत्त्व हें सर्वव्यापी असल्यामुळें, प्रत्येक गुणघटकामध्यें त्याचें आस्तित्व आहे. त्याच्याशीं अभिन्नपणानें असणारी त्याची शक्ति (परि. १५), मूल प्रकृति किंवा जीवनकला-जीवभूता—हिचेंहि त्याच्याच प्रमाणें साहजिकच त्यांत अस्तित्व असतें. ही शक्ति गुणघटकाला व्यक्तरूप देऊन, त्याचें वैशिष्ट्य प्रकाशित करण्याचा उपक्रम करिते, आणि त्यासाठीं दुसरे अनेक घटक आकर्षण करून घेऊन त्यांचें एकीकरण करिते, त्या वेळींच त्या गुणघटकाला जीवरूप पावण्याचा संस्कार सुरू होतो. ह्या कार्यासाठीं ती शक्ति परमात्मतत्त्वांशासह, त्या गुणघटकाशीं एकरूप होऊन जीवभूत होते. हिलाच **जीवनशक्ति** असें म्हणतात. अनेक गुणघटकांच्या एकीकरणानें जीवरूप घटना करणें हें हिचें प्रमुख कार्य आहे. गुणघटकांच्या वैचित्र्यामुळें व्यक्तिवैचित्र्य दिसून येत असलें, तरी अंशाविभागानें भिन्न जीवरूपें धारण करणारें परमात्मतत्त्व व जीवनशक्ति, मुळांत भिन्न नसल्यामुळें, जीवसृष्टीच्या ठिकाणीं जीवनशक्तीचें घटनाकार्य अभिन्न रीतीनें म्हणजे एकसारखेंच नियमबद्ध चालत असतें.

**जीवनशक्तीचें नियमबद्ध कार्य**

९२ हिचें मूलस्वरूप घटनाकर्तृत्वप्रधान असल्यामुळें, हिच्या संस्कारानीं गुणघटकाला घटनाकर्तृत्वशक्तिप्रधान बीजरूप प्राप्त होतें. याचा घटनासाहित्यप्रधान बीजाशीं संयोग होऊन त्याच्या एकीकरणानें व्यक्त जीवरूप पावणारा बीजरूप पिंड तयार होतो, त्याची गर्भामध्यें पूर्ण जीवरूपघटना होऊन, तो जगांत व्यक्तरूपानें जन्म पावत असतो. पिंडाचें व्यक्त रूप पंचात्मक घटनासाहित्यानें तयार होत असतें. गर्भधारणेच्या वेळीं, घटनासाहित्यामध्यें पंचमहाभूतजन्य घटक, ज्या विवाक्षित प्रमाणांत मिश्र झालेले असतील, त्यांनींच पिंडबीजघटना झालेली असते आणि **जीवनशक्तीहि** त्याशींच तादात्म्य पावलेली असते; यामुळें पंचमहाभूतघटकांचें तेंच विशिष्ट प्रमाण, त्या पिंडाचें वैशिष्टयदर्शक होत असतें. पिंडाची वाढ होउन, त्याचा विकास व्हावयाचा व तो पूर्ण व्यक्तरूप पावावयाचा हें कार्य सुरू झालेलें

**पिंडाची घटना व विकास**

असतें. यासाठीं त्याच्या संवर्धनाला जें घटनासाहित्य आवश्यक असतें, तें बीजघटनेच्या वेळच्या प्रमाणांतच पाहिजे असतें.

**प्रकृतिभेद**

९३ घटनासाहित्यबीज हें पंचतत्त्वात्मक असलें (परि० ३७।२), तरी त्यामध्यें पृथ्वी, आप व तेज ह्या दृश्य व जड तत्त्वांच्या सेंद्रियघटकांचें आधिक्य असतें; परंतु तिन्ही तत्त्वांचे हे घटक, समप्रमाणांतच मिश्र झालेले असणें, सर्व काळ व सर्व ठिकाणीं शक्य नसतें. ह्यांपैकीं एकाचें किंवा दोहोंचें आधिक्य, दोहोंचें समानत्व तर तिसऱ्याचें न्यूनत्व किंवा आधिक्य अथवा एकाहून दुसऱ्याचें व त्याहून तिसऱ्याचें न्यूनत्व किंवा आधिक्य, असें असण्याचा संभव असतो. ज्या तत्त्वाच्या सेंद्रियघटकांचें आधिक्य असेल, त्या तत्त्वाच्या गुणधर्मानुसार प्राण्याच्या पिंडाची व शरीराची, अंतर्बाह्य इंद्रियांची, अवयवांची वगैरे सर्व घटना, त्या तत्त्वाच्या आधिक्यानें झालेली असते. या प्रमाणेंच इतर तत्त्वांचें जें प्रमाण मुळांत असतें, तीच प्रमाणबद्धता सर्व अंतर्बाह्य इंद्रियादि घटनेमध्यें असते. कामेंद्रियें, अंतःकरणें व त्यांचे क्रियाव्यापारहि, तसेंच प्रमाणबद्ध, वैशिष्ट्यदर्शक बनत असतात. अशा प्रकारचें वैशिष्ट्यदर्शक जीवभूतरूप, हेंच व्यक्तपणानें प्रतीत होणारें, **जीवनशक्तीचें** स्वरूप होय. जीवमात्रांच्या ठिकाणीं अशा प्रकारें दिसून येणारी भिन्नता किंवा प्रकृतिभेद होत.

**आजार, रोग, विकार, व्याधि**

९४ अशा प्रमाणबद्ध, वैशिष्ट्यप्रधान प्रकृतिधर्मानें **जीवन**शक्तीला संवर्धनप्रमुख कार्य करावयाचें असतें. तें ती संपादन केल्या जाणाऱ्या द्रव्यांनीं करीत असते. आपलें प्रकृतिवैशिष्ट्य रक्षण करण्यासाठीं, प्रमाणबाह्य असलेलीं व घटनेला निरुपयोगी आणि दुरुपयोगी द्रव्यें, कार्येंद्रियांच्या द्वारा निराळीं काढून तीं उत्सर्जनमार्गास लावणें आणि उपक्रियेनें युक्त द्रव्यांनीं वाढती सुदृढ घटना करणें, हें तिचें नित्य व स्वाभाविक कार्य आहे. हें कार्य सुव्यवस्थित चालल्यानें, प्रकृतिस्वास्थ रहात असतें. परंतु प्रतिकूल आहारविहारादिकांमुळें, संरक्षणाचें प्रासंगिक कार्य करणें भाग पडतें, त्या वेळीं जीवनशक्तीला, नित्य व स्वाभाविक क्रियांहून भिन्न, अशा अस्वाभिक संरक्षक घडामोडी कराव्या लागतात. त्या होत असतां, दाहशूलादि जीं लक्षणें होतात, त्यालाच **आजार** किंवा **रोग** म्हणतात. या वेळीं, जीवनशक्तीला

नित्याहून अधिक शक्ति खर्चावी लागते. कार्येंद्रियांच्या व्यापारांत बदल होतो. जें तत्त्व प्रकृतिवैशिष्ट्य-प्रधान असतें, त्या तत्त्वाच्या कार्यशक्तीवर, कार्येंद्रियावर, कार्यक्षेत्रावर व क्रियाव्यापारांवर, ह्या कार्यांचा मुख्य भार पडत असल्यामुळें, थोड्याशा संरक्षक कार्यांच्या वेळींहि, त्यांच्याच स्थितींत व व्यापारांत बदल होत असलेला आढळतो. वारंवार होणाऱ्या अशा लक्षणांवरून, प्रकृतिवैशिष्ट्य अचुक ओळखून काढणें सुलभ होतें. मनुष्याची प्रकृति कोणत्यातत्त्वाच्या वैशिष्ट्याची आहे हें ओळखितां येण्यासाठीं, एकेकतत्त्व-प्रधान व मिश्रतत्त्वप्रधान प्रकृतिलक्षणें सामान्यतः पुढें दिलीं आहेत. आकाश व वायु हीं सूक्ष्म तत्त्वें असल्यामुळें, त्यांच्या आधिक्यानें शरीरघटना होणें शक्य नसतें; म्हणून ह्या दोन तत्त्वांचें प्राधान्य असलेल्या प्रकृतीचीं माणसें सांपडणार नाहींत. पुढें जी वातप्रकृति म्हणून वर्णन दिलें आहे, ती सूक्ष्मतेज-तत्त्वप्रधान आहे; परंतु सूक्ष्मतेजाचें आधारस्थान-भूत, असें जें वायुतत्त्व, त्याच्याशीं तिचा निकट संबंध असल्यामुळें तिला वातप्रकृति असें म्हटलेलें आहे.

९५ **प्रकृतिवैशिष्ट्यपरिवर्तन** — कित्येकदां परिस्थित्यनुरूप, नित्य-नियमित आहारविहार, हवापाणी, यांमध्यें कित्येक दिवस सतत, प्रकृति-वैशिष्ट्य बिघडविण्याला कारणीभूत असा थोडा बहुत फरक होतो. विशेषतः देशांतर हें ह्याला कारण होतें. ह्यामुळें प्रथम कांहीं दिवस **संवर्धनकार्य** बंद किंवा मंद होऊन, **संरक्षणकार्य** सुरू होतें. त्यामुळें अस्वाभाविक लक्षणें, नियमित व नित्य होऊं लागतात. परंतु कारणीभूत परिस्थिति, दीर्घ काळपर्यंत कायम राहिली, म्हणजे जीवनशक्तीला संरक्षणकार्याची आवश्यकता कमी होऊं लागते. पचनादि रासायनिक क्रिया-कारक जे रस, कार्यशक्तींकडून नित्य तयार केले जात असतात, ते बदललेल्या परिस्थितींतलि, नित्य मिळणाऱ्या पोषक द्रव्यांपासून व्हावयाचे असतात. अर्थात् बदललेल्या परिस्थितीप्रमाणें, चालू असलेल्या खाद्यपेयादि द्रव्यांच्या समान धर्मांचेच ते होऊं लागतात.त्यामुळें **संरक्षक** क्रियेचें रूपांतर, हळु-हळू **संवर्धन**क्रियेमध्यें होउन, अस्वाभाविक लक्षणांचें आपोआप शमन होतें. परिस्थितीनें व बदललेल्या नित्य नियमित आहारविहारांमुळें असें **परिवर्तन** होतें.

**प्रकृतिवैशिष्ट्य परिवर्तन**

९६ एकाद्या शरीराची घटना, कोणत्या एका किंवा एकाहून अधिक तत्त्वांच्या आधिक्यानें झालेली आहे, हें त्या तत्त्वाच्या गुणधर्मवैशिष्ट्यानुरूप बनणारा शरीराचा आकार, वर्ण, रूप, स्वभाव, आवडीनावडी व जीवितक्रियाव्यापारांची नैसर्गिक सहजस्थिति यांवरून ठरावितां येतें.

**प्रकृति कशी ठरवावी**

## शीतप्रकृति–पृथ्वीतत्त्वप्रधान.

९७ पृथ्वी हें जडतत्त्वांपैकीं मुख्य जडतत्त्व आहे. धान्याविशिष्ट पिष्टमय पदार्थ, याच्या आधिक्यानें होत असतात. मनुष्याच्या वाढत्या घटनेला याची अन्नरूपानें आवश्यकता असते. रसक्रियेनें रूपांतर पावून, ह्याचे घटक शरीरभर पसरावयाचे असतात. पचनेंद्रिय हें याचें कार्येंद्रिय आहे. जडवर्गांतील पण याच्याहून हलकें व प्रवाही असें जें जलतत्त्व, त्याच्या योगानें याला रसरूप यावयाचें असल्यामुळें, त्याच्याशीं याचा निकट संबंध असतो, त्यामुळें ह्या प्रकृतिधर्मामध्यें शीत धर्म असतो. पृथ्वीतत्त्वानुरूप शीतप्रकृतिविशिष्ट मनुष्याचें शरीर वजनदार, स्वाभाविकपणें स्थूल, व आडव्या वळणाचें असतें. त्वचा दिसण्यामध्यें जाडसर, वर्ण काळसर, केंश विरळ पण रांठ आणि स्नायु कमजोर असतात, पण हाडें मजबूत असतात. अंग मऊ असतें. ह्या प्रकृतींत पृथ्वीतत्त्वाच्या कार्यशक्तीचें प्राधान्य असतें. कारण ह्या प्रकृतीच्या मनुष्यांची **जीवनशक्ति** पृथ्वीतत्त्वाचें गुणधर्मवैशिष्ट्य रक्षण करण्याच्या धर्माची असते. यामुळें पचनक्रिया स्वाभाविकपणें उत्तम असते व मलोत्सर्जनासंबंधींहि कधीं तक्रार नसते. भूक चांगली लागते. अन्नविशिष्ट जडपदार्थसेवन ह्या प्रकृतीला हितावह असतें. तांदूळ, ज्वारी, उडीद, कडाव, वरणा, कांदा, बटाटा, अलकोल, काळा भोपळा, चिबूड, (सातपुती) घोसाळें, केळें, अळूं, माठ, पोकळा, तूप, दही दूध हे पदार्थ तसेंच फणस, आंबा, चिंच, पेरू अशा प्रकारचे पदार्थ ह्यांना पोषक असतात. यांना यांपैकीं बऱ्याच पदार्थांची व सकस, विद्राव्य व मऊसर पदार्थांची, स्वाभाविक आवड असते. लालापिंड वगैरे पाचकग्रंथींत पाचक रस भरपूर असतो. त्यामुळें पचनक्रिया उत्तम होते आणि रसक्रियेनें बनणारा वसारस चांगला बनतो. वसावाहिन्या व वसाग्रंथी मजबूत व पुष्ट

**शीतप्रकृति पृथ्वीतत्त्वप्रधान**

असतात. कारण सर्व शरीरांतील जीर्ण झालेले घटक व विजातीय द्रव्य, अशु-द्धांतून ग्रहण करून, शक्य तितकी त्यांची शुद्धवसा बनवून पुन्हां अशुद्धांत सोडण्याचें आणि टाकाऊ झालेलीं द्रव्यें, शरीराबाहेर टाकून देण्याचें कार्य त्यांच्यावर असतें. यांची नाडी भरलेली पण संथ असते व उष्णताहि त्याच मानानें ९७ ते ९७॥ डिग्रीपर्यंत असते. हीं माणसें हुषार व बहुधा विद्या-व्यासंगी असतात. तशींच युक्ति योजण्यांत चतुर व गुणग्राहक, प्रौढी सांगणारीं, हास्यविनोदप्रिय असतात. आळस, भित्रेपणा, मवाळपणा, भोळे-पणा हा यांच्या स्वभावाचा विशेष धर्म असतो. स्वभाव शांत व थंड असतो, शक्य तितका बसून होईल तो व्यवसाय करण्याकडे यांची प्रवृत्ति असते. हिंडण्याफिरण्यापेक्षां झोंपाळ्यावर बसून झोंके घेणें किंवा यानांतून फिरणें आव-डतें. हास्यविनोदानें यांना मजा वाटते. वसंतऋतु यांना प्रिय असतो. व थंडीच्या दिवसांत उन्हांत बसण्याची आवड असते. अहंकार हें पृथ्वी-तत्त्वाचें अंतःकरण आहे व तदनुरूप यांच्या ठिकाणीं, कर्तृत्वाचा अभिमान जास्त असतो. शीतप्रकृतीच्या मनुष्याच्या आरोग्याचा बिघाड होण्याला, मुख्यतः पृथ्वीतत्त्वविशिष्ट पदार्थांचें आधिक्य किंवा न्यूनत्व, जुनें निःसत्व झालेलें अन्न किंवा त्यांतून निरिंद्रिय घटकांची मिसळ आणि आहारविहारांचा अनियमितपणा, अशा प्रकारचीं कारणें होतात. त्या-मुळें क्षुधामांद्य, बद्धकोष्ठ, संग्रहणी, आमांश, जंत, पोटांत वात धरणें, पोट फुगणें किंवा दुखणें, सांधे धरणें, ओली खरूज, लाळ गळणें, सुस्ति येणें असे विकार वारंवार होण्याची प्रवृत्ति असते. **लहान मुलें**— यांच्यामध्येंहि हीं लक्षणें साधारणतः दिसण्यांत येतात. विशेषतः झोंपेची प्रवृत्ति जास्त, उचलूं लागलें तर कल्पनेपेक्षां जडपणा, चंचळपणा कमी, अंग मऊ व विळविळीत, भुकेमुळें रड, एरवीं शांतपणा, ओली खरूज व लाळेचा स्राव होणें हीं लक्षणें विशेषत्वानें आढळतात. स्त्रियांमध्यें ह्या प्रकृतीचीं माणसें पुरुषांपेक्षां कमी असतात. आर्तव कमी व तो साफ न जाणें आणि पांढरी धुपणी, हे विकार त्यांना स्वाभाविक असतात. या प्रकृतीच्या स्त्रियांना रजोदर्शन, इतर प्रकृ-तीच्या स्त्रियांपेक्षां उशीरां होतें. संजीवनचिकित्सापद्धतीची **प्रथम निष्पत्ति** ही पृथ्वीतत्त्वाच्या जीवनशक्तीचें संजीवन करिते. म्हणून ती ह्या **शीत-प्रकृतीची नियामक** निष्पत्ति होय.

## उष्णप्रकृति–जलतत्त्वप्रधान

९८ ह्या प्रकृतीच्या मनुष्यांच्या शरीरघटनेंत शरीरसंवर्धक रसक्रियेचें कारक असें जें जलतत्त्व, त्याचें आधिक्य असतें. म्हणून ह्यांची **जीवनशक्ति** जलतत्त्वाचें गुणधर्मवैशिष्ट्य रक्षण करण्याच्या धर्माची असते. त्यामुळें त्या तत्त्वाच्या कार्यशक्तीवरच सर्व शारीरिक क्रियाव्यापारांचा भार असतो. रक्ताशय हें जलतत्त्वाच्या कार्यशक्तीचें मुख्य कार्येंद्रिय असून, पचनक्रियेनें तयार होणारा वसारस आणि सर्व शरीरांतील अशुद्ध, हीं रक्ताशयामध्यें ग्रहण करून त्यांना फुफ्फुसांमध्यें तेजतत्त्वांकडे पाठविणें आणि तेजतत्त्वानें बनविलेलें शुद्ध रक्त ग्रहण करून, सर्व शरीरांत पोंचविण्यासाठीं, तें रक्तवाहिन्यांमध्यें सोडून देणें, ह्या कारणानें जलतत्त्वाचा तेजतत्त्वाशीं दृढ संबंध येत असतो. त्यामुळें ह्या प्रकृतीच्या मनुष्यांमध्यें, तेजाच्या उष्णपणाचे गुणधर्म प्रतीत होतात; तसेंच पृथ्वीतत्त्वविशिष्ट घनद्रव्यांचें प्रमाण कमी असतें. त्यामुळें यांचा बांधा सडपातळ व नाजूक असून, ठेवण व्यवस्थित असते. यांच्यामध्यें नीटनेटकेपणा व सुरेखपणा असून, अंगकांति सतेज असते; वर्ण तांबूस गोरा; जलाच्या धर्माप्रमाणें त्वचा तुकतुकीत व कोमल; केंस नरम व तजेलदार; आणि डोळे सतेज व तरतरीत असतात. यांचीं सुदृढतायुक्त संवर्धनादि सर्व कार्यें, जलतत्त्वाच्या वैशिष्ट्यानें व्हावयाचीं असल्यामुळें आणि अभिसरणादि प्रवाहक कार्यच प्रमुख असल्यामुळें, ह्या मनुष्यांना, तीं कार्यें सुव्यवस्थित होण्यासाठीं, शुद्धजलाची व तत्सम रसयुक्त पदार्थांची, भरपूर प्रमाणांत आवश्यकता असते. जिव्हा हें जलतत्त्वाचें ज्ञानेंद्रिय असल्यामुळें, हीं माणसें चव जाणण्याच्या कामीं कुशल असतात. चवदार पदार्थ खाण्याकडे यांचा ओढा असतो व रुचिकर पदार्थ यांना जास्त प्रिय असतात. तांदूळ, गहूं, ज्वारी, तूरडाळ, कुळीथ, मूग, मटकी, काकडी, पडवळ, भेंडा, तोंडलीं, वांगीं, केळीं, मुळा, माठ, तांदुळजा, चाकवत, ओली मिरची, टोमॅटो, अळूकांदा, सुरण, कासाळुकांदा, कांदा, गाजर, रताळें, आंबा, संत्रीं, मुसुंबी डाळिंब, द्राक्षें, अंजीर, करवंदें, अननस, ऊस, कालिंगड, खारीक, खजूर या पदार्थांचा उपयोग करणें हितावह असतें. दूध, ताक, तूप हेंहि चांगलें मानवतें. जलतत्त्वाच्या रक्त ह्या रसावर आणि रक्ता-

शयाच्या सुस्थितीवर यांचें स्वास्थ अवलंबून असतें. यासाठीं वारंवार शुद्ध व ताजें पाणी आणि पेय पदार्थ, यांची यांना आवश्यकता असते व तें पिण्याकडे त्यांची स्वाभाविकच प्रवृत्ति असते. हीं माणसें मनाचीं कोमल व लाजवट, वृत्ति उल्हासी पण चंचल, स्वभाव विनयशील पण तापट असतो. विद्याविषयक कोणत्याहि विषयांत यांची गति होते. कलाकौशल्याच्या कामांची स्वाभाविक आवड असते. तसेंच मनोरंजक गोष्टींचाहि नाद असतो. चित्त हें ह्याचें मुख्य अंतःकरण असल्याकारणानें यांचे हेतु गुप्त असतात व ते तडीस नेण्याच्या कामीं दक्षता व चिकाटी असते, त्यामुळें ह्यांचे ठिकाणीं हट्टीपणा दिसून येतो. कर्मेंद्रियधर्मानुरूप, स्पर्शसुखाची लोलुपता असते. शृंगार, हास्यमय विषय यांना करमणुकीचे असतात. हिंडणें फिरणें, उघड्या जागीं खेळणें अशा प्रकारचा व्यायाम प्रिय असतो. नद्या, तलाव, बागबागाईत पाहून यांना आनंद होतो. हिंवाळा व पावसाळा यांना सुखकर वाटतो. रक्ताभिसरणक्रिया हीच यांच्यामध्यें प्रमुख असल्याकारणानें, यांची नाडी मजबूत व सणसणीत असून, तिची दर मिनिटास ८० ते ९५ पर्यंत ठोके असून ( मध्यम वया-मध्यें ) उष्णतामान सामान्यतः ९८।९८॥ पर्यंत असतें. ह्यांच्या आरोग्यांत बिघाड होण्याला, रक्तामधील जलांशाचें प्रमाण कमी होणें, हें मुख्यतः कारण होत असतें. ह्या कारणामुळें रक्तामध्यें घनत्व येऊन, रुधिराभिसरण करण्याला, रक्ताशयाला अधिक श्रम पडून, तो अशक्त होतो. बाह्यश्रमा-दिकांमुळें, शरीराच्या एका भागाकडे रक्तप्रवाह जास्त होतो व दुसरीकडे तो कमी होतो. त्यामुळें ह्या प्रकृतीच्या माणसांत, थोड्याशा मेहनतीनें सुद्धां हृदयकंप, हृदयसंकोच, हृदयशूल हे विकार होण्याची प्रवृत्ति असते. अभि-सरणातिरकामुळें उष्णता वाढते व अंगाचा दाह, निद्रानाश, मस्तकभ्रमण, डोकें दुखणें, छातींत धडधडणें, घसा धरणें, घसा सुकणें, हिरड्या सुजणें, गुणगुणा फुटणें, दांतांतून रक्त येणें, डोळे लाल होणें किंवा त्यांची आग होणें, पडसें येणें, आंतडीं सुजणें, मलावष्टंभ, लघ्वी उष्ण व आरक्त होणें, उन्हाळें, गळूं, उठाणूं, मूळव्याधि, हातपाय वळणें, अशुद्ध-रक्तसंचयामुळें एखादा भाग सुजणें, धांवरें वगैरे रक्तदोषजन्य विकार वारंवार होण्याकडे प्रवृत्ति असते. **ह्या प्रकृतीचीं लहान मुलें**—चपळ, सुटसुटीत गुटगुटित, खेळाडू, गोजिरवाणीं व हुषार असतात. यांना भूक चांगली लागते.

झोंप बेताची असते. उजेड, पाणी, झाडेंझुडपें पाहण्याची आवड दिसून येते. ताप, डांग्या खोकला, पडसें, सुका खोकला, खेंस लागणें, पडजीभ वाढणें, कान फुटणें, मळाची खडी होणें, पैण, गळवें होणें अशा प्रकारच्या विकारांची प्रवृत्ति असणारीं आढळतात. ह्या प्रकृतीच्या स्त्रियांना रजोदर्शन अल्पवयांत होतें. आर्तव बहुधा जास्त प्रमाणांत जातो. तांबडी घुपणी लागण्याची प्रवृत्ति असते. पुरुषांपेक्षां स्त्रियांमध्यें ह्या प्रकृतीचीं माणसें जास्त आढळतात. (शीतवात अशा मिश्र प्रकृतीच्या माणसामध्येंहि, बहुतेक उष्ण प्रकृतीसारखीं लक्षणें आढळतात. परंतु बाकीचीं लक्षणें तशीं असलीं, तरी त्यांना हृदयकंप होत नाहीं.) संजीवन चिकित्सापद्धतीची द्वितीयनिष्पत्ति जलतत्त्वाच्या जीवनशक्तीचें संजीवन करिते. म्हणून ती ह्या **उष्णप्रकृतीची नियामक** निष्पत्ति आहे.

## पित्तप्रकृति—तेजतत्त्वप्रधान.

**पित्तप्रकृति तेजतत्त्वप्रधान**

९९ तेज हें जड व सूक्ष्म ह्या दोन्ही प्रकारच्या तत्त्वांचें मीलन करणारें, समभावी किंवा योगवाही तत्त्व आहे. जडतत्त्वाशीं मीलन पावण्यानें, पित्त ह्या जडरूपानें, शरीरामध्यें याचें अस्तित्व व्यक्त होत असतें. ज्या शरीराची घटना याच्या आधिक्यानें होते, त्याला **पित्तप्रकृति**प्रधान समजतात. पित्तप्रकृतीच्या माणसांचा, प्रत्येक घटक तेजतत्त्वाच्या आधिक्याचा असतो. यांची **जीवनशक्ति**, तेजतत्त्वाच्या गुणधर्मांचें वैशिष्ट्य रक्षण करण्याच्या धर्माची असते. त्यामुळें या तत्त्वाच्या कार्यशक्तीवरच, सर्व शारीरिक क्रियाव्यापारांचा भार असतो व यकृत हें या प्रकृतीच्या माणसांचें **मुख्य कार्येंद्रिय** असतें. शरीरघटनोपयुक्त **प्रत्येक** घटक, तेजतत्त्वाच्या आधिक्याचा असावा लागतो. त्यामुळें खाद्यपेयपदार्थ, पित्तविशिष्ट असावे लागतात. त्यांचें पचन करण्यालाहि, पित्तरूप पाचकरसाची आवश्यकता असते. तो यकृत ह्या कार्येंद्रियाकडून, पित्ताशयामध्यें संचित केला जातो. तो पचनेंद्रियामध्यें पचनासाठीं सोडून, त्या योगें तयार झालेला पित्ताधिक्याचा वसारस, यकृत आपल्याकडे घेतें व पाचक पित्त निराळें काढून पित्ताशयांत आणि बाकीचा वसारस अशुद्ध रूपानें फुफ्फुसांत सोडतें. हें कार्य यकृताला

प्राधान्यानें करावें लागत असल्यामुळें या प्रकृतीच्या मनुष्यांचें यकृत मजबूत व भक्कम असतें. शरीराचा बांधा नीटनेटका व मजबूत, स्नायु मजबूत, हाडें भक्कम व कणखर असतात. हातपाय पिळदार व जोरदार असतात. उंची मध्यम पण शरीर स्थूळ नसतें व कृशहि नसतें; वर्ण पिंवळसर, केस रांठ व काळे-भोर असतात, दृष्टि तीक्ष्ण व भेदक असते. यांना भूक उत्तम लागते व पचनशक्तीहि तीव्र असते. तांदूळ, गहूं, बाजरी, वरी, चणा, वाटाणा, वरणा, उडीद, अळसुंदा, भुईमूग हीं धान्यें; पडवळ, भेंडा, कारलें, दोडका, गोवारी, शेवगा, वांगीं, कोहाळा, काळा भोपळा, चुका, चाकवत, अळूं, मुळा, मेथी, कोबी, अलकोल, कांदा, बटाटा, सुरण, इत्यादि भाज्या; तेल, तूप, गूळ, साखर यांनीं बनविलेलीं पक्वान्नें, तिखटमिठाचे मसालेदार तळलेले पदार्थ, हे फार करून आहारोपयोगी असतात व त्यांची आवडहि असते. आंबा, फणस, पोपया, रामफळ, पेरू, केळें, चिकू, चिबूड अशीं घनफळें यांना उप-युक्त असतात. तसेंच खजूर, बदाम, अक्रोड यांसारखीं तेलट खाद्येंहि यांना हितकर असतात. भाजीपाल्यामध्यें लवंग मिरी, हळद, खोबरें यांचा उपयोग करणेंहि हितकर होतें. **पित्त** ह्या पाचक रसाच्या आधिक्यावरच, प्रकृति-स्वास्थ्य अवलंबून असल्याकारणानें, स्वाभाविकच तयार असलेल्या पित्तरसाचा योग्य उपयोग होईल अशा प्रकारचें स्निग्ध व जडान्न खाण्याची इच्छा ह्या प्रकृतीच्या माणसांना होत असते. यांचा स्वभाव शीघ्रकोपी, उमेदी व करारी असतो. अंगमेहनतीचीं व शक्तीचीं कामें करण्यांत यांचा पाय पुढें असतो. धाडसाचीं व शौर्याचीं कामें करणें हा गुण यांच्यामध्यें फार असतो. आळस यांच्या गांवींहि नसतो. आंगची शक्ति आणि बुद्धीची योजकता यांच्या योगानें, अंगीकृत कार्य तडीस नेण्याची यांच्यामध्यें फार चिकाटी असते. बुद्धी हें यांचें मुख्य अंतःकरण असल्यामुळें, ती स्वाभाविकच तीव्र असते. आणि म्हणून कोणताहि विषय यांना अवघड होत नाहीं. तालीम करणें, पोहणें हें यांना फार आवडतें. कोणताहि ऋतु यांना अप्रिय असा होत नाहीं. यांची **नाडी** मजबूत, जोरदार, सशक्त, निश्चल आणि सणसणीत वाहते व उष्णता ९७॥ ते ९८॥ असते. भूक लागली असतां खाण्याचे पदार्थ न मिळणें, उपाशीपणीं मेहनतीचें काम पडणें, अशा कारणानें यांच्या आरोग्याचा बिघाड होतो. यामुळें डोकें दुखणें, डोळे, हातपाय यांची आग

होणें, पित्ताची वांति, मस्तकशूळ, भोंवळ, घशाशीं जळजळणें, डोळ्यां-समोर काजवे येणें, थकवा वाटणें, क्षुधानाश किंवा जेवल्यानंतर थोड्याच वेळांत पुन्हा भूक वाटणें, मळाची खडी किंवा जुलाब होणें, कधीं बद्धकोष्ठ तर कधीं आकस्मिक जुलाब, तेलकट पदार्थ न सोसणें; तसेंच मूलदाह, धातुस्थानीं कडकी, स्वप्नावस्था, ढांस, कोरडा खोकला, श्वास किंवा दमा, दाहयुक्त ज्वर, आंग रसरशीत असणें हे विकार होण्याची सामान्यतः प्रवृत्ति असते. यकृतामध्यें व पित्ताशयामध्ये जडपणा, ताठपणा, शूल, वेदना, यकृत्संकोच किंवा वृद्धि हे विकार साध्या कारणानेंहि होण्याचा संभव असतो. **ह्या प्रकृतीचीं मुलें**—यांच्यामध्येंहि वरील लक्षणेंच दिसून येतात. यांचें अंग स्वाभाविकच चिवट व सराईत दिसतें. धीटपणा, कशालाहि न भिणें हा गुण विशेष असतो. यांचें यकृत उपजतच स्थूल व मजबूत असतें व त्यामुळें तें विकृत आहे किंवा काय ? अशी शंका उत्पन्न होते. खाणें, पिणें व मलोत्सर्जन व्यवस्थित न झाल्यास, अपस्मार, आंकडी हे विकार होतात. ह्या प्रकृतीच्या स्त्रियांचा बांधा वगैरे सर्व पुरुषांप्रमाणेच असतें. यांच्या ठिकाणीं लाजवटपणा कमी असतो. कामधंद्याची हौस असते; तेलकट, तळलेले व शिळेहि पदार्थ खाण्याची आवड असते. तांबडी धुपणी किंवा मूळव्याधि हा विकार बहुधा अशक्त स्थिति असतां असण्याची प्रवृत्ति असते. ह्या प्रकृतीचीं माणसें शीत किंवा उष्ण प्रकृतीपेक्षां कमी आढळतात. संजीवन चिकित्सापद्धतीची तृतीय निष्पत्ति तेजतत्त्वाच्या जीवनशक्तीचें संजीवन करिते म्हणून ती **पित्तप्रकृतीची नियामक** निष्पत्ति आहे.

## वात्तप्रकृति—सूक्ष्मतेजतत्त्वप्रधान.

१०० जड व सूक्ष्मवर्गांतील तत्त्वांचें, मीलन किंवा रासायनिक एकीकरण करणारें, जें मध्यस्थ समभावि तेजतत्त्व, तें जडाशीं मीलन पावून जसें पित्तरूपानें व्यक्त होतें, त्याप्रमाणेंच वायु व आकाश यांच्याशीं मीलन पावून सूक्ष्म वायुरूप ज्ञेयधर्मानें प्रतीत होतें. सौरतेज हें याचें उगमस्थान असून, सूर्यकिरणांमधून हें वायूशीं मिश्र झालेलें असतें. तें श्वसनक्रियेनें फुफ्फुसांमध्यें गेल्यानंतर, अशुद्धामध्यें मिसळून, शुद्ध रक्त

**वातप्रकृति सूक्ष्मतेजतत्त्व-प्रधान**

हें रासायनिक द्रव्य तयार होतें. अशुद्ध हें पृथ्वी, आप व जडतेज यांचें मिश्रण असतें. त्याचें शुद्धरक्त तयार करितांना हें सूक्ष्म तेज, वायूचा प्रसारक धर्म आणि आकाशाचा विरलता व व्यापकता धर्म, यांसह संमिश्र होतें. त्यामुळें शुद्धरक्त हें पांचहि तत्त्वांचे एकीकृत रासायनिक मिश्रण, तेजरूप उदान वायूकडून केलें जातें. सर्व शरीराची वाढती घटना व संरक्षण, या रक्ताच्या योगानेंच, प्रामुख्यानें व्हावयाचीं असतात. ज्यांच्या शरीरघटनेमध्यें ह्या सूक्ष्मधर्मी तेजतत्त्वाचें व उदानवायूचें आधिक्य व प्राबल्य असतें ते **वातप्रकृति** होत. जडतेजाच्या पित्ताचें कार्य, पक्वाशयांत (पृथ्वीच्या कार्येंद्रियांत) होतें, त्याप्रमाणें सूक्ष्म तेजाचें संस्कारकार्य, फुप्फुसें ह्या वायूच्या कार्येंद्रियांत होत असतें. याच्या उलट मोबदला म्हणून तेज-तत्त्व, हें रक्तवाहिन्यांमध्यें (परि० ५९।६० ) वायूचा ज्ञानरस बनण्याची क्रिया करून, तो ज्ञानतंतूंमध्यें सोडून देतें आणि जडतेज जसें पित्तरूपानें यकृत ह्या कार्येंद्रियामधून घटनाकार्याला सहाय्य करितें, त्याप्रमाणें हें सूक्ष्म-तेजतत्त्व, **प्लीहा** ह्या पिंडामधून, ( आपल्या कार्येंद्रियामधून, ) ओज, क्रांति, उमेद, उत्साह, शक्ति, वीर्य वगैरे जीवितदर्शक गुणधर्मांचें नियमन करीत असतें. ह्या प्रकृतीचे सर्व अंतर्बाह्य क्रियाव्यापार, सूक्ष्मतत्त्वांच्या आधिक्यानें व्हावयाचे असल्यामुळें, त्यांची **जीवनशक्ति**, सूक्ष्मतत्त्वांचें गुणधर्मवैशिष्ट्य रक्षण करण्याच्या धर्माची असते, म्हणून फुप्फुसें व प्लीहा, ह्या सूक्ष्म तत्त्वांच्या कार्येंद्रियांचें व कार्यशक्तीचें प्राधान्य असतें. सूक्ष्मतेजाचा पुरवठा मुख्यतः वायूमधून व्हावयाचा असतो. ऋतुमानपरत्वें हा पुरवठा कमिअधिक होत असतो. देशाकालानुसारहि असें होऊं शकतें. त्यामळें ह्या प्रकृतींत, वाताव-रणाच्या स्थित्यनुरूप, शारीरिक स्थिति बरी किंवा वाईट होत असते. कारण ज्ञानरसाचा पुरवठा वातावरणाच्या स्थितीवर अवलंबून असतो. ह्या प्रकृतीच्या मनुष्यांचा बांधा व ठेवण सामान्यतः मध्यम, वर्ण फिकट व रुक्ष असतो. त्वचा पातळ व नाजुक, परंतु खरखीत असते. केंस विरळ व नरम आणि बहुधा भुरकट किंवा पिंगट असतात. ह्या प्रकृतीच्या मनुष्यांची क्षुधा व पचनशक्ति, वातावरणाच्या स्थितीप्रमाणें उत्तम, मध्यम, किंवा विकृत असते. ऋतुमानप्रमाणें होणारे खाद्यपेयविशिष्ट अन्नमय पदार्थ, यांना चांगले मान-वतात. आहारोपयोगी पदार्थ स्वभावतः पचनाला जितके हलके, मोकळे, व

खुसखुशीत असतील, तितके हितकर होतात. तांदूळ, गहूं, तूर, मसूर, मूग, चवळी, कुळीथ, कडवा हीं धान्यें; पडवळ, भेंडा, वालपापडी, वालीच्या शेंगा, मुळयाच्या शेंगा, शेवग्याच्या शेंगा, मुळा, अळूं, केळफूल, कोबी, अलकोल अशा प्रकारच्या भाज्या; आंबा, सीताफळ, चिकू, मुसंबा डाळिंब द्राक्ष, सोनकेळें, कलिंगड अशीं रसदार व रुचिकर फळें; तसेंच खारीक, बेदाणा, मनुका अशीं सुकीं फळें यांना उपयुक्त असतात. दूध, ताक, लोणी, तूप यांचा अन्नामध्यें उपयोग करणें चांगलें. दूध, ताक इतर वेळीं पेय म्हणून उपयुक्त असतात. मन हें वायूचें अंतःकरण आहे. त्याच्या धर्माप्रमाणें स्वभाव चंचल, त्रासिक व क्षोभी असतो व पुष्कळ वेळां शांतहि असतो. तेजाचें अंतःकरण बुद्धि हें आहे. तिच्या धर्मानुरूप ज्ञानार्जनाची आवड असून वृत्ति अभ्यासू असते. यांची बुद्धि कोणत्याहि विषयांत चालूं शकते. हीं माणसें केव्हां विचारग्रस्त तर केव्हां आनंदित व केव्हां खिन्न तर केव्हां प्रफुल्लित असतात. उघड्या व मोकळ्या जागीं फिरण्याची आवड असते. अंगमेहनतीच्या कामांचा यांना कंटाळा असतो. गायनवादनादि करमणुकीचे विषय प्रिय असतात व विषयवासना तीव्र असते. यांची नाडी सूक्ष्म व चंचल असते. मनाच्या चंचलतेबरोबर नाडींत अकस्मात फरक पडतो. उष्णतामान सामान्यतः ९७° ते ९८° असतें व नाडीची गति दर मिनिटास ७० ते ८० ठोकेपर्यंत असते. विशेषतः मानसिक श्रम किंवा मनोविकार यांच्या-मुळें आणि आहारविहारांच्या अतिरेकामुळें, शरीरस्वास्थ्य रक्षण करण्याच्या कामीं शक्तीचा व्यय होतो आणि वातावरणाच्या अनियमित परिस्थितीमुळें, सूक्ष्म तेजाचा योग्य पुरवठा होणें व ज्ञानरसद्वारा तो भरून निघणें पुष्कळ वेळां अशक्य होतें. याचा परिणाम मुख्यतः घटनाविशिष्ट तत्त्वांच्या म्हणजे पृथ्वी, आप व तेज ह्यांच्या कार्यशक्तींवर व कार्यक्षेत्रांवर घडतो. त्यामळें ह्या प्रकृतींत शीत, उष्ण व पित्त ह्या प्रकृतींमध्यें होणाऱ्या विकारांचीं लक्षणें, शरीरांत बिघडाबिघड झाली असतां सामान्यतः होतात. विशेषतः शीतप्रकृतीचे विकार जास्त आढळून येतात. शक्ति, उमेद वगैरे ज्यामुळें यावयाची तो ज्ञानरस कमी झाल्यामुळें, डोकें हलकें झाल्यासारखें वाटणें, कलकलूं किंवा दुखूं लागणें, असें होतें. त्यावेळीं स्वस्थ पडून राहण्यानेंहि आराम वाटतो. कारण कर्तृत्वाकडे व्यय पावणारी शक्ति थोड्या प्रमाणांत तरी मेंदू-

मध्यें संग्रहित होते. ह्या प्रकृतीच्या मनुष्यांना सामान्यतः अपचन, अग्निमांद्य क्षुधानाश, पोटशूळ, हातांपायांची व डोळ्यांची आग, हातपायांना मुंग्या येणें किंवा भिरंभिरी येणें, कंप, भीति वाटणें, वीर्यनाश, अशक्तता, जीर्णज्वर, दमा, प्लीहावृद्धि किंवा आकुंचन, वातगुल्म वगैरे विकारांची प्रवृत्ति जास्त असते. निव्वळ वातप्रकृतीची माणसें फार कमी आढळतात. **या प्रकृतीचीं मुलें**—अशक्त, निस्तेज, किंडसुळीं असतात. हवेच्या बदलाप्रमाणें त्यांच्या स्थितींत बदल होत असतो. त्यांच्या स्थितींत व हुषारींत घटकोघटकीं बदल झालेला आढळतो. ह्या प्रकृतीच्या स्त्रियांना अशक्तपणा व नीरक्तपणा या विकारांचा संभव असतो. संजीवनचिकित्सापद्धतीची चतुर्थ निष्पत्ति या तत्त्वाच्या जीवनशक्तीचें संजीवन करते. म्हणून ती **वातप्रकृतीची नियामक** निष्पत्ति आहे.

## शीतोष्ण प्रकृति.

१०१ ह्या प्रकृतीचीं माणसें क्वचित अढळतात. ह्यांच्या शरीरांत पृथ्वी व आप ह्या जडतत्त्वांचें आधिक्य असतें व त्यांची जीवनशक्तीहि ह्या तत्त्वांचें गुणधर्मवैशिष्ट्य रक्षण करण्याच्या धर्माची असते व तदनुसार त्या तत्त्वांच्या कार्यशक्ति व कार्येंद्रियें यांवरच संवर्धनादि सर्व क्रियाव्यापारांचा भार असतो.

**शीतोष्ण प्रकृति**

हीं माणसें शरीरानें उष्ण प्रकृतीप्रमाणें उंच व शीत प्रकृतिप्रमाणें जाडजूड किंवा लठ्ठ असतात. नाडी स्पर्शाला भरलेली पण उष्णप्रकृतीसारखी सणसणीत असते. स्वभाव प्रेमळ; बोलणें, चालणें अघळपघळ असतें; भोळेपणा हा गुण यांच्या ठिकाणीं विशेष असतो. हीं शारिरीक श्रम करणारीं पण चेंगट असतात. प्रकृतिबिघाडाचा परिणाम आंतडीं व रक्ताभिसरण यांवर झालेला आढळतो. अग्निमांद्य, पोटांत वात धरणें, ढेकर येणें, सांधे धरणें, पायांना सूज येणें, लर्ष्वीतून खर पडणें, वीर्यविकार, मेदोवृद्धि हे विकार बहुधा होण्याची प्रवृत्ति असते.

## शीतपित्त प्रकृति

१०२ ह्या प्रकृतीचीं माणसें पुरुषांमध्यें अधिक आढळतात. या प्रकृती-

च्या शरीरघटनेंत पृथ्वी व जडतेज यांचें आधिक्य असतें व जीवशक्तीहि त्यांचेंच वैशिष्ट्य रक्षण करणाऱ्या धर्माची असते.

**शीतपित्त प्रकृति**

त्यामुळें पचनेंद्रियें, व कार्यशक्ति, प्रमुख कार्यवाहक असतात. हीं माणसें शरीरानें सुदृढ व धिप्पाड असतात. हाडें व स्नायु मजबूत, वर्ण बहुधा काळसर किंवा काळासांवळा केश विरळ असले तरी लांबलचक असतात. नाडी भरलेली, जोरदार व सणसणीत असते. स्वभाव उमेदी, कांटक व कर्तृत्ववान् असतो. हीं माणसें धैर्य-शौर्यवान् व वीरवृत्तीचीं असतात. यांच्या ठिकाणीं शीघ्रकोप व आततांईपणा बराच असतो, पण मग पश्चात्ताप होतो. परिस्थित्यनुरूप बुद्धिमत्ता व कर्तृत्व यांचा विकास होतो. हीं माणसें फार करून निरोगी असतात; कारण व्यवस्थितपणा व टापटीप हे गुण यांच्या आंगीं असतात. बिघाडाचे वेळीं मस्तकशूळ, एकाएकीं जुलाब होणें, पोटशूळ, आम्लपित्त, अग्निमांद्य, उन्हाळे ह्या विकारांची विशेष प्रवृत्ति असते.

## शीतवात प्रकृति.

१०३ ह्या प्रकृतीचीं माणसें कमी असतात. यांच्या शरीरघटनेमध्यें, पृथ्वी व सूक्ष्मतेज ह्यांचें आधिक्य असतें. त्यामुळें यांची **जीवनशक्ति**, त्या तत्त्वांचें गुणधर्मवैशिष्ट्य रक्षण करण्याच्या धर्माची

**शीतवात प्रकृति**

असते व त्यामुळें त्या तत्त्वांच्या कार्यशक्ति व कार्येंद्रियें हीं प्रमुख असतात. ह्यांचा बांधा स्थूलच असतो; वर्ण काळसर असतो. थोड्याशा श्रमानेंहि हीं दमतात व हांव लागते. इतर लक्षणें उष्ण प्रकृतीसारखींच असतात. परंतु ह्या प्रकृतीच्या लोकांत हृदयकंप मात्र आढळत नाहीं. शौचाला साफ न होणें, पोटांत वात धरणें, आंग गार असणें, क्षुधेचा अनियमितपणा, घाम येणें व तहान लागणें, हातापायांना सूज येणें, मेद वाढणें हे विकार असण्याची प्रवृत्ति असते. दुसऱ्यांकडून कामें करवून घेऊन आपलें बुद्धिकौशल्य व वर्चस्व दाखविण्याचा स्वभाव यांच्या ठिकाणीं असतो.

## उष्णपित्त प्रकृति.

१०४ ह्या प्रकृतीचीं माणसें बरींच असतात. स्त्रियांमध्येंहि यांचें प्रमाण

अधिक असतें. यांच्या शरीरघटनेंत जल व तेजतत्त्व यांचें आधिक्य असल्यामुळें, त्या तत्त्वाचें वैशिष्ट्य रक्षण करण्याच्या धर्मांचीच **जीवनशक्ति** असते, व त्या तत्त्वांच्याच कार्यशक्ति व रक्ताशय आणि यकृत ह्या कार्येंद्रियांवर, सर्व शारिरिक क्रियाव्यापार चालविण्याचा मुख्य भार असतो. या प्रकृतीचीं माणसें अति स्थूल नसतात, परंतु दाणगट व धिप्पाड असतात. वर्ण क्वचित् गोरा, परंतु साधारणतः काळसर गोरा किंवा तांबूसगोरा असतो. हीं माणसें बुद्धिवान् व हुषार असतात. स्वभाव उमेदी, धाडसी व तापट असतो. ह्यांपैकीं बरींच माणसें धैर्य-शौर्यवान् असतात; परंतु आतताईपणा मात्र सहसा करीत नाहींत. हीं माणसें पुष्कळशीं आंतल्या गांठीचीं असतात. बिघाडाचे वेळीं रक्तदोषजन्य व पित्तविकार होण्याची प्रवृत्ति असते. यांची नाडी स्थिर व जोरदार असते. या प्रकृतीच्या स्त्रियांना सुपणी लागण्याची खोडी असते. एकाद्या आजारानंतर वागणूक अव्यवस्थित झाल्यास रक्तक्षय ( ॲनिमिया ) होण्याचा संभव असतो.

**उष्णपित्त प्रकृति**

## उष्णवात प्रकृति.

· १०५ ह्या प्रकृतीचीं माणसें जल व सूक्ष्मतेज यांच्या आधिक्याचीं असतात. यांची **जीवनशक्ती**, ह्या तत्त्वांचे गुणधर्मवैशिष्ट्य रक्षण करण्याच्या धर्माची असून, त्याच तत्त्वांच्या कार्यशक्ति व कार्येंद्रियें, यांवर संवर्धनादि क्रियांचा सर्व भार असतो. शरीराची ठेवण उष्ण प्रकृतीप्रमाणेंच असते, परंतु वर्ण वातप्रकृतीप्रमाणें जरा फिकट, रूक्ष व क्वचित काळासांवळा असतो. स्नायु कमजोर असतात व केंश विरळ असतात. बुद्धिमत्ता उत्तम असते. विद्याव्यासंगाची व कर्तृत्वाची उमेद असून, अशक्तपणामुळें हुरूप नाहींसा होतो. यांची नाडी स्पर्शाला सूक्ष्म व चंचळ लागते. बिघाडाचे वेळीं आंगाची आग, पाठीचा कणा व हातपाय गरम होणें, मुंग्या येणें; डोळे निस्तेज होणें, अशक्तपणा, दम लागणें हीं लक्षणें ह्या प्रकृतींत विशेष आढळतात. भूक व तहान यांची जाणींव, या प्रकृतीच्या लोकांना कमी असते, परंतु पेयद्वारा घटनाद्रव्याची यांना जास्त आवश्यकता असते व त्यासाठींच, **बरेच वेळां**

**उष्णवात प्रकृति**

खाणें, अवश्य असतें. यांना हलका व प्रवाही आहार हितकर असतो. वर सांगितलेली दाहकर लक्षणें खाण्याच्या हेळसांडीमुळेंच उद्भवतात. याच कारणामुळें पोटांत दुखणें, बद्धकोष्ठ, खडी धरणें, व लघ्वी साफ न होणें हे विकार जडतात. ह्या प्रकृतीच्या लोकांना व्यायाम बाधक होतो.

## वातपित्त प्रकृति

**वातपित्त प्रकृति**

१०६ या प्रकृतीच्या माणसांची शरीरघटना, जड व सूक्ष्म तेज, अशा दोहोंच्याहि आधिक्यानें झालेली असते. त्यांची जीवनशक्ति, त्यांचेंच वैशिष्ट्य व्यक्त करण्याच्या धर्माची असते व तेजतत्त्वाची कार्यशक्ति व कार्येंद्रियेंच, संवर्धनादि मुख्य कार्यवाहक असतात. हीं माणसें शरीरानें उंच व दांडगट असतात; हाडें व स्नायु मजबूत व कणखर असतात; यांची शक्ति असामान्य असते; मेहनतीच्या, वजन उचलण्याच्या, धावण्यापळण्याच्या किंवा खादाडपणाच्या गोष्टींत, कोणालाहि हार न जाणारीं असतात. अंगीकृत असें कितीहि धाडसाचें काम तडीस नेण्याच्या कामीं जीवाची पर्वाहि न बाळगणारीं, परंतु स्वतःच्या कामांत चंचलपणानें पहिलीं कामें तडीस नेण्याऐवजीं दुसरीं नवीं नवीं कामें उपस्थित करण्याची प्रवृति असणारीं अशीं ह्या प्रकृतीचीं माणसें असतात. हीं बुद्धीमान्, हुषार, ज्ञानलोलुप प्रामाणिक व इमानी असतात. स्वभाव सामान्यपणें शांत व विनयशील, पण प्रसंगानुरूप तापट व अतिक्रोधी असतो. बिघाडाचे वेळीं हातापायांचा दाह किंवा मुंग्या येणें, भोंवळ किंवा घेऱ्या येणें, डोळ्यांपुढें काजवे येणें, पोटांत आग पडणें, शोष पडणें हे विकार सामान्यतः होण्याची प्रवृत्ति असते. यांची नाडी जोरदार व दणदणीत असते. या प्रकृतीचीं माणसें फार कमी आढळतात.

**मनुष्यांचें प्रकृतिभिन्नतेनुसार सामान्य प्रमाण**

१०७ मानवी शरीरप्रकृतीचे मुख्य चार प्रकार होतात व बाकीचे वरील मिश्र आहेत. यांपैकीं शुद्ध शीतप्रकृतीचीं माणसें कमी व पुरुषांपेक्षां स्त्रियांत फारच कमी; उष्णप्रकृतीचीं माणसें बरींच असतात. पण त्यांची संख्या स्त्रियांमध्यें जास्त असते, पित्तप्रकृतीचीं उष्णप्रकृतीपेक्षां कमी दिसतात; वातप्रकृतीचीं तर त्याहून कमी आढळतात. मिश्रप्रकृतीच्या माणसांचें प्रमाण जास्त असतें. त्यांच्यामध्यें

लक्षणें मिश्रपणानें आढळतात. शीतपित्त व उष्णपित्त ह्या प्रकृतींची संख्या अधिक असते.

१०८ **विशेष टीपः**— येथपर्यंत वर्णिलेल्या प्रकृतिभिन्नतेच्या लक्षणांमध्यें, शरीराच्या वर्णासंबंधींचा प्रत्यय, सर्वत्र येणें शक्य नाहीं. कारण देशपरत्वें, ऋतुपरत्वें आणि व्यवसायपरत्वें, वर्णामध्यें फरक पडतो. शरीराची ठेवण वगैरे गोष्टींत असा फरक दिसणार नाहीं.

**शरीराचे वर्णाबद्दल विशेष टीप**

# संजीवनचिकित्सापद्धति.

## रोग–निदान.

१०९ सेवन केलेल्या खाद्यपेयादि पदार्थांचें उत्तम रीतीनें पचन होणें; रक्ताभिसरणादि अंतर्गतक्रियाव्यापार सुव्यवस्थित रीतीनें होत असणें; मलमूत्रादिकांचें नित्यनियमितपणें उत्सर्जन होऊन, भूक चांगली लागणें; स्वस्थपणें झोंप येणें; बाह्येंद्रियांना आपापलीं कामें करण्याला सामर्थ्य व हुषारी असणें हें आरोग्यसंपन्नतेचें लक्षण आहे. आरोग्यस्थितींत होणाऱ्या अशा स्वाभाविक लक्षणांमध्यें कमीअधिक प्रमाणांत बिघडाबिघड होऊन, दुसरीं अस्वाभाविक अशीं दाहशूलादि लक्षणें उत्पन्न होणें, हें आरोग्यस्थितीच्या बिघाडाचें म्हणजे रोगग्रस्ततेचें लक्षण आहे. हा बिघाड कसा, कोठें, किती, व कशामुळें उत्पन्न झाला आहे, यासंबंधींच्या परिज्ञानाला **निदान** असें म्हणतात. हें निदान जितकें बरोबर करितां येईल, तितकी उपाययोजना म्हणजे **चिकित्सा** बिनचूक व योग्य परिणामकारक करितां येणें शक्य असतें.

**रोगनिदान**

११० संवर्धकघटनाकर्तृत्वानें अव्यक्तगुणघटकाला वैशिष्ट्यपूर्ण, व व्यक्त असें जीवरूप देणें, आणि त्याचें सुव्यवस्थितपणें सुदृढतायुक्त संवर्धन करीत असणें हें जीवनशक्तीचें नियुक्त-कार्य आहे. त्यासाठीं खाद्यपेयादिद्वारा पंचात्मक घटनासाहित्य संपादन केलें जाणें तिला आवश्यक असतें. तें

**अनारोग्याचें बीज**

वा. ७८९

जितकें सेंद्रियशक्तिसंपन्न असेल तितकें संवर्धकघटनेला उपयुक्त होऊन प्राण्याच्या शरीराला अंतर्बाह्य सुस्थिति व आरोग्य प्राप्त होऊं शकतें, आणि तें जर घटनेला निरुपयोगी व बाधक असेल तर रोगग्रस्ततेला कारणीभूत होत असतें. अर्थात् आरोग्य किंवा अनारोग्यस्थिति ही शरीरघटना-साहित्याच्या योग्यायोग्यतेवर अवलंबून असते. संवर्धनक्रियेनें घटना होते, त्यावेळीं त्यांच्या घटनेला उपलब्ध झालेलें घटनासाहित्य त्या बीजांच्या सुस्थितीला बाधक अशा घटकांनीं दूषित झालेलें असेल, किंवा उभय बीजांच्या संयोगानंतर गर्भाशयामध्यें होणारा संवर्धकसाहित्याचा पुरवठा बाधक द्रव्यांनीं दूषित असेल तर त्या पिंडाला आरोग्यसंपन्नस्थिति न येतां गर्भांतच रोगग्रस्तता येण्याला कारण होतें.

**गर्भावस्थेपासून घटनात्मक व संरक्षक कार्य**

१११ घटनाकारिणीशक्ति मुळांत ज्या वेळीं एकाद्या अव्यक्त गुणघटकाला व्यक्तपणा देण्याचा उपक्रम करिते, त्या वेळीं त्याच्याशीं गुणधर्मसाम्य असलेले दुसरे घटक आकर्षण करून घेऊन, त्यांची त्यांच्याशीं एकरूप घटना करीत असते व तसें साम्य नसलेले घटक दूर लोटून किंवा टाकून देत असते. घटनाकारिणीशक्तीचा घटना-कार्यांतील हा पहिला व मुख्य नियम आहे. ह्याच नियमानुसार मुळांत अव्यक्त असलेल्या घटकाला, गर्भामध्यें जीवरूपी व्यक्तपणा येऊन, त्याचा जन्म होत असतो, आणि त्याच्या संवर्धनात्मक जीवितक्रियाहि त्याच नियमानुसार चालत असतात. जीवपिंडरूपानें, उभय बीजांचें एकीकरण होण्यापूर्वी, बीज-रूपानें निरनिराळ्या दोन घटना संवर्धित झालेल्या असतात. पिंडरूप घटनेनें त्यांचा निरनिराळेपणा जाऊन, त्यांची एकरूप घटना होत असते. अशा प्रकारें पिंडरूपघटनेनें जीवभूत झालेल्या जीवनशक्तीला संवर्धक घटनेनें त्याच ( पिंडरूपानें ) जीवरूपानें संवर्धित व्हावयाचें असतें, म्हणजे उभय बीजांच्या संयोगानें बनलेल्या पिंडाचें वैशिष्ट्य रक्षण करणें ह्या नियमाचें पालन करा-वयाचें असतें. हें पिंडवैशिष्ट्य म्हणजे—उभय बीजें हीं पंचात्मक साहि-त्यानें बनलेलीं असतात व त्यांचें एकीकरण होऊन त्याला जें पिंडरूप येतें, तें त्या दोहोंच्याहि साहित्याची एकरूपता होऊन येत असतें. ह्या एकीकर-णामध्यें पांचहि तत्त्वांचे घटक ज्या प्रमाणांत एकीकृत होऊन **पिंडघटना**

झाली असेल, **ती प्रमाणबद्धता,** हें पिंडाचें **घटनावैशिष्ट्य** किंवा **प्रकृतिविशिष्टरूप** होय. पिंडसंवर्धक जीवनशक्ति, गर्भामध्यें ह्या नियमानुसार प्रकृतिवैशिष्ट्यरूप प्रमाणबद्धता रक्षण करून त्याचें संवर्धन करीत असते. गर्भवतीस्त्रीच्या शरीरसंवर्धक रसरूपसाहित्यांतूनच पिंडसंवर्धनाच्या साहित्याचा पुरवठा होत असतो. गर्भिणीची व गर्भस्थ पिंडाची संवर्धनप्रमुख कार्य करणारी जीवनशक्ति ही व्यक्तिभिन्नतेमुळें भिन्न असली, तरी मूळची अभिन्न म्हणजे एकच असते, आणि त्या पिंडाचा स्वतंत्र जीवपणानें जन्म होईपर्यंत, गर्भाशयामध्यें तो गर्भिणीचाच एक अवयव अशा रीतीनें वाढत असतो. त्यामुळें त्या दोघांच्याहि जीवनशक्ति भिन्न असून एकरूपतेनें कार्य करीत असतात. म्हणूनच पिंडाच्या वाढत्या घटनेची पंचात्मक प्रमाणबद्धता रक्षण करण्यासाठीं, आवश्यक व उपयुक्त असेंच रसरूपसाहित्य गर्भाशयामध्यें पोंचविण्याची दक्षता घेतली जाते. यामुळेंच पिंडाच्या वाढीला अवश्य अशाच प्रकारचें साहित्य मिळविण्यासाठीं व अनवश्यक साहित्याची भर टाळण्यासाठीं गर्भिणीला डोहाळ्यांच्या रूपानें पुष्कळ वेळां स्वभावतः अप्रिय असलेले पदार्थ प्रिय होतात व प्रिय असलेले अप्रिय होतात. स्वैर आहारविहाराच्या संवयीमुळें अथवा प्रतिकूल परिस्थितीमुळें, डोहाळे पाळले गेले नाहींत, तर आवश्यक द्रव्यांचा अभाव व अनवश्यक द्रव्यांचा पुरवठा होत जाऊन, पिंडाची घटना प्रकृतिवैशिष्ट्यपूर्ण व व्यवस्थित न होतां, ती दूषित होते. त्याच्या घटनेला बाधक असणाऱ्या द्रव्यांचा त्याग करण्याच्या कामीं जीवनशक्ति व कार्यशक्ति खर्ची पडून दुर्बळ होतात आणि त्यामुळें प्राण्याचा जन्म दुर्बल व रोगग्रस्त स्थितीनें होतो. कित्येकदां तर बाधक द्रव्यांच्या आधिक्यामुळें जीवनशक्तीचा ऱ्हास होऊन पिंडसंवर्धन अशक्य होतें व गर्भांतच त्याला मृतावस्था येऊन त्याचा पात होतो.

**जीवनशक्तीचें नियुक्त कार्य**

११२ सर्व इंद्रियें व अवयवादिक यांनीं युक्त, अशी शरीराची अंतर्बाह्य सुव्यवस्थित घटना पूर्ण झाली म्हणजे प्राण्याचा जन्म होतो व तेव्हांपासून त्याच्या जीवितक्रिया स्वतंत्र रीतीने सुरू होतात. ह्या क्रियांनीं जीवनशक्तीला त्याच्या शरीराचें संवर्धन, अंतर्बाह्य इंद्रियावयवादिकांसह, अधिकाधिक सुदृढ, कार्यक्षम, शक्तिसंपन्न व प्रमाणबद्ध असें करावयाचें

असतें. तें ती अंतर्गत-कार्य-व्यवस्थेनें, नियुक्तमंडळाकडून व अतंर्गत कार्यशक्तींकडून दक्षतेनें करून घेत असते. परंतु संवर्धक घटना करण्याला आवश्यक असलेलें, अन्नादिपंचात्मक साहित्य बाह्यसृष्टींतून संपादन करावयाचें असतें. प्रयोगी मंडळाची योजना या कार्यासाठींच केलेली असून, ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें हीं योग्य अशीं उपयुक्त साधनें, त्यासाठींच त्याच्या सत्तेखालीं दिलेलीं आहेत. खाद्यपेयादि संपादनाची, बुद्धीच्या द्वारा आज्ञाचक्रांतून सूचना मिळत जाईल, त्या प्रमाणें वागण्याची प्रयोगी मनानें दक्षता ठेविली म्हणजे जीवनशक्तींचें नियुक्त कार्य सुव्यस्थित चालू राहून मनाला व शरीराला सुखस्वास्थ्य लाभतें.

११३ प्रयोगीमंडळाकडून अन्नपानादि संपादन-प्रमुखकार्यें योग्य व व्यवस्थितपणें केलीं गेलीं, म्हणजे अंतर्गतक्रियाहि सुव्यवस्थित चालू शकतात.

**संरक्षणकार्य**
**विजातीय द्रव्यें**

पृथ्वीतत्त्वादि प्रत्येक कार्यशक्ति, आपापल्या कार्येंद्रियाच्या द्वारा, आपापल्या तत्त्वाचे सजातीय घटक रसाक्रियेनें निराळे काढून घेऊन, घटनासंवर्धनासाठीं व सुदृढतेसाठीं आपापल्या कार्यक्षेत्रभर नेतात; वरील सूक्ष्मतत्त्वाचे घटक त्या कार्यशक्तीकडे पाठवितात; आणि संस्कारानेंहि आपणांशीं सात्म्य न पावणारे घटक प्राणाक्रियेच्या साहाय्यानें संशोधन करून, खालील जडतत्त्वाच्या कार्यशक्तीकडे पाठवितात. अशा रीतीनें शरीरघटनेंमध्यें समाविष्ट केले न जाणारे घटक, घटनेला निरुपयोगी व बाधक होणारे असल्यामुळें, कार्यशक्तींकडून शरीराबाहेर उत्सर्जित केले जातात. अशा टाकाऊ ठरलेल्या द्रव्यालाच विजातीय द्रव्य म्हणतात. उपयुक्त द्रव्यांनीं घटनासंवर्धन आणि बाधक द्रव्यांच्या उत्सर्जनानें तिचें संरक्षण करणें ही क्रिया अंतर्गत कार्यशक्तींकडून अहोरात्र चालत असते, व ती व्यवस्थित चालण्यानें आरोग्यसंपन्नस्थिति रहात असते आणि आरोग्यदर्शक स्वाभाविक लक्षणांनीं ती प्रतीत होत असते.

११४ वरील स्वाभाविक लक्षणांहून निराळीं अशीं अस्वाभाविक लक्षणें होणें हें उघडच आरोग्याच्या बिघाडाचें निदर्शक असतें. अंतर्गत क्रियांची सुसंगत स्थिति बिघडून, अस्वाभाविक घडामोड करण्याची परिस्थिति उत्पन्न

होणें हें ह्या बिघाडाचें कारण असतें. खाद्यपेयादि संपादित द्रव्यांमध्यें एकाद्या तत्त्वाच्या द्रव्याचें आधिक्य किंवा न्यूनत्व झालें, तरीहि प्रकृतिविशिष्ट प्रमाणबद्धता बिघडते. त्यामुळें ती रक्षण करण्यासाठीं एकाद्या तत्त्वाचें न्यूनत्व झालें असल्यास तें भरून काढण्यासाठीं त्या तत्त्वाच्या द्रव्याच्या संपदनाची आवश्यकता उत्पन्न होते. अन्नांश (पृथ्वीतत्त्व) कमी झाल्यास अवेळीं पुन्हां क्षुधा लागणें, जलांश कमी झाल्यास तहान लागणें अशीं लक्षणें होतात. एकाद्या तत्त्वाच्या द्रव्याचें आधिक्य झालें असलें तर क्षुधानाश, अजीर्ण, मलमूत्रादि उत्सर्जक क्रियांची वृद्धि इत्यादि अस्वाभाविक लक्षणें साहाजिकपणें होतात. अशीं अधिक झालेलीं द्रव्यें, मानवी घटनेला उपयुक्त असलीं, तरी प्रमाणबद्धता रक्षण करण्यासाठीं, तीं उत्सार्जित करून टाकणें हेंच जीवनशक्तीला आवश्यक असतें. ह्या कामीं कार्येंद्रियाला शीण होतो, आणि उत्पन्न झालेल्या अस्वाभाविक लक्षणांमुळें मनाला अस्वाथ्य व निरुत्साह हीं प्राप्त होतात. एकाद्या वेळीं घडलेल्या अशा गोष्टींमुळें होणारा दुष्परिणाम घालविण्याला व झालेला शक्तिक्षय भरून काढण्याला फारसा वेळ व आयास पडत नसले, तरी असे प्रसंग वारंवार येत गेले तर त्यामुळें जीवनशक्ति व कार्यशक्ति दुर्बल होत जाऊन सर्व विजातीय द्रव्य उत्सर्जन करणें त्यांना अशक्य होऊं लागतें, आणि शरीरांत विजातीय द्रव्याचा संचय होऊं लागतो. रसाक्रियाप्रमुख अंतर्गत क्रियांना त्याचा अडथळा होऊं लागतो व संहारशक्तीचें प्राबल्य वाढण्याला अवसर सांपडतो. म्हणून जीवनशक्तीला शरीरांत संचित झालेली विजातीय द्रव्यरूप आपत्ति, बाहेर काढून लावण्याचें जोराचे प्रयत्न करणें भाग पडतें. आपलें शक्तिसर्वस्व खर्च करून ती तें करूं लागते व त्यामुळें दाहशूलादि असह्य लक्षणें उत्पन्न होऊन त्यांनीं प्राणी हैराण होऊन जातो. अशा प्रकारें शरीरघटकद्रव्येंहि प्रमाणबाह्य झालीं तर तीं आरोग्यनाशाला कारण होतात. मनुष्याला आपली जीवितयात्रा चालवितांना आहारविहार, उद्योगधंदा इत्यादि अनेक गोष्टी कराव्या लागतात. या कारणानें खाण्यापिण्यांतून, हवेंतून, दुसऱ्याच्या संसर्गानें, स्नानादिकासाठीं उपयोगांत आणिलेल्या पाण्यांतून, वस्त्रपात्रादिकांतून, लहानमोठ्या कृमिकीटकांदिकांच्या संसर्गानें किंवा दंशानें, इत्यादि अनेक रीतींनीं

**आरोग्यनाशाचीं कारणें**

शरीरघटनेचा व अंतर्बाह्य क्रियाव्यापारांचा बिघाड करणारीं अशीं १ घटनेला अनवश्यक म्हणजे उन्माद किंवा ग्लानिकारक वगैरे प्रकारचीं २ निरिंद्रिय ३ कोणतीहि तत्त्वविशिष्ट शक्तिहीन ४ तत्त्वविशिष्ट शक्तियुक्त असून प्रमाणबाह्य ५ सेंद्रियशक्तियुक्त असून स्वतंत्र घटनोपक्रमी ( कृमि, रोगजंतु इत्यादी ) ६ जीवितक्रियानिरोधक किंवा विरोधक ७ संहारशक्तियुक्त इत्यादि प्रकारचीं विजातीय द्रव्यें शरीरामध्यें प्रविष्ट होतात व तीं अंतर्गत रसक्रियांच्या कार्यप्रवाहाबरोबर, त्यांच्या तत्त्वविशिष्ट धर्मानुसार, कार्यक्षेत्रामध्यें प्रसृत होत जातात. ज्ञानतंतूंकडून ज्ञानरसद्वारा जीवनशक्तीला अशा परिस्थितीचें ज्ञान होतांच, त्यांचें उत्सर्जन करण्याची संरक्षक क्रिया ती सुरू करिते. त्यामुळें अस्वाभाविक लक्षणें होण्याला सुरुवात होते. अशा प्रकारच्या विजातीय द्रव्यांचें प्रमाण अल्प असेल तर थोड्याशा वेळांत तिला सर्व स्थिरस्थावर करितां येतें आणि अस्वाभाविक लक्षणें नष्ट होऊन पुन्हां स्वास्थ्य उत्पन्न होतें.

**आरोग्यनाशाचीं कारणें, मानसिक वगैरे**

११५ विजातीय द्रव्यांचें प्रमाण जर अधिक असलें, त्यांच्या ठिकाणीं संहारशक्तीचें प्राबल्य असलें, अथवा ज्या तत्त्वांच्या कार्यक्षेत्रांमध्यें त्यांचा प्रसार झाला असेल, त्या तत्त्वांच्या कार्यशक्ती त्यांचें उत्सर्जन करण्याला दुर्बल असतील तर शरीराच्या निरनिराळ्या भागांमध्यें, तें कमीअधिक प्रमाणांत शिल्लक राहतें. त्यांचें समूळ उच्चाटन करण्याकरितां जी शक्तीची उणीव पडते, ती भरून काढण्यासाठीं जीवनशक्तीला नित्यक्रियाव्यापारांचें नियमन करावें लागतें. त्यामुळें नित्य स्वाभाविक लक्षणांमध्यें बदल होऊन अस्वाभाविक लक्षणें होऊं लागतात. एकाद्या भयोत्पादक वस्तूचें दर्शन किंवा भीतिदायक ध्वनि, गुदमरून टाकणारा दुर्गंध किंवा दर्प, किंवा शरीराला इजा करणाऱ्या पदार्थादिकांची किंवा त्याच्या आघाताची भीति, यांनीं प्रयोगीमन योग्य प्रकारें प्रतिकार व संरक्षणोपाय करण्याऐवजीं, गोंधळून मागें बुद्धीकडे धांवतें. त्यामुळें त्याला स्वाभाविक मिळालेला शक्तिप्रवाहहि मागें वळतो. त्याचा दाब ज्ञानरसवाहिन्यांवर पडून अंतर्गत व्यापारांची सुसंगता बिघडते. मनाकडून योग्य कर्म करवून घेण्यासाठीं त्याला जादा शक्तिप्रवाह व चेतना द्यावी लागते, त्यामुळें अंतर्गत क्रियांची सुसंगति

बिघडून अंतर्गत इंद्रियें व कार्यक्षेत्रें यांमध्यें अस्वाभाविक स्थिति उत्पन्न होते. याप्रमाणेंच क्रोधादि मनोविकारांनींहि शक्तीचा फाजील व्यय व अंतर्गत-क्रियांची संगति बिघडविली जाऊन, जीवनशक्ति व कार्यशक्ति दुर्बल होतात व संहारशक्तीचें प्राबल्य वाढूं लागते. या प्रमाणेंच चेतना मिळाली असूनहि उत्सर्जक कर्में मनानें वेळींच केलीं नाहींत तर तेंहि संहारशक्तीचें प्राबल्य वाढण्याला कारण होतें, व जीवनशक्तीला संरक्षणकार्य सुरू करावें लागतें. त्याच्या स्वरूपाला स्थान व लक्षणपरत्वें निरनिराळीं रोगसंज्ञक नांवें दिलीं जातात. प्रकृतिविशिष्ट घटनेमध्यें उत्पन्न झालेलें **विजातीयत्व हाच खरोखर रोग असून त्याचें लक्षणांनीं ज्ञात होणारें स्वरूप** हें जीवनशक्तीनें सुरू केलेलें, सुस्थितिप्रस्थापक **संरक्षणकार्य** आहे. परिस्थित्यनुरूप त्या कार्याच्या पूर्ततेला कमीअधिक कालावधि लागतो व संरक्षक क्रियेचे प्रकारहि भिन्न भिन्न होतात.

**अविलंबीक्रिया सौम्य**

११६ विजातीय द्रव्यांचें, शक्य तितक्या लवकर उत्सर्जन करून, पुन्हां सम स्थिति आणण्याची जी संरक्षक क्रिया, तिला अविलंबी किंवा आशुकारि म्हणतात. ह्या क्रियेमध्यें १ सौम्य व २ तीव्र असे दोन प्रकार होतात. १ ज्या वेळीं विजातीय द्रव्याचें प्रमाण अल्प, किंवा अधिक असूनहि दुर्बल परंतु अंतर्गत क्रियांना अडथळा उत्पन्न करणारें असतें, त्या वेळीं त्या द्रव्याचें उत्सर्जन सहज व अल्प काळांत केलें जातें. एकादा पदार्थ सेवन केल्यानंतर, थोड्याच वेळांत पोटांत दुखणें, कळमळणें, वांति अथवा पोटांत घळघळून जुलाब होणें, घाम सुटणें आणि लवकरच पुन्हां आराम वाटणें अशा प्रकारचे विकार सौम्य व अविलंबी स्वरूपाचे असतात. २ विजातीय द्रव्य जीवनशक्तीहून प्रबल व त्यामुळें घातकारक स्वरूपाचें असतें, त्या वेळीं त्याचें शक्य तितक्या लवकर उच्चाटन करण्यासाठीं, सर्व सामर्थ्य एकवटून, **जीवनशक्ति** संरक्षक क्रिया सुरू करिते. त्यामुळें एकाएकीं भयंकर व असह्य लक्षणें होऊं लागतात. पटकी, विषबाधा, अशा प्रकारचे विकार तीव्र क्रियेमध्यें होतात.

**तीव्र अविलंबी**

११७ एकाद्या कार्येंद्रियामध्यें व कार्यक्षेत्रामध्यें, तत्त्वविशिष्ट साम्यतेमुळें,

रसक्रियेनें प्रसृत झालेलें विजातीय द्रव्य, जीवनशक्तीच्या व कार्यशक्तीच्या दौर्बल्यामुळें आणि उत्सर्जनाला आवश्यक अशा जलादि साहित्यसंपादनाच्या न्यूनतेमुळें, तात्काळ व पूर्णपणें उत्सार्जित केलें जात नाहीं. त्यामुळें जीवनशक्तीला, नित्य क्रियाव्यापारांचें नियम करून, घटना सुरक्षित करून घेण्यास विलंब लागतो. अशा प्रकारच्या विकारांना विलंबिक्रिया म्हणण्यांत येतें. अग्निमांद्य, आम्लपित्त, जीर्णज्वर, इसब, दमा, पांडुरोग, मधुमेह हे विलंबी विकार होत.

**विलंबी किंवा चिरकारीक्रिया**

११८ खाद्यपेयादिकांतील, नवे परंतु शरीराच्या वाढत्या घटनेला निरुपयोगी असलेले, किंवा जुने व जीर्ण असे, जीवनशक्तिहीन होऊन संहारशक्तियुक्त बनलेले व त्यामुळें घटनेला विजातीय झालेले घटक, ज्या तत्त्वाच्या वैशिष्ट्याचे असतील, त्या तत्त्वाच्या कार्यक्षेत्रांत, जीवनशक्तीकडून, टाकाऊ म्हणून उत्सर्जनासाठीं ढकलून दिले जातात. ज्ञानतंतूंतील विजातीय घटक, ज्ञानरसांतून शुद्ध रक्तवाहिन्यांत, शुद्ध रक्तांतील अशुद्ध रक्तवाहिन्यांत, अशुद्धवाहिन्यांतील वसावाहिन्यांत, अशा रीतीनें उत्सर्जन गति घेत घेत, घाम, स्वेद, श्लेष्म, कफ, पू, लस, कांटवणी, अशा प्रकारच्या कोणत्या तरी रूपानें शरीराबाहेर उत्सर्जित होत असतात. रोमरंध्रें, नाक इत्यादि नैसर्गिक द्वारानें त्यांचें उत्सर्जन होण्यासारखें नसतें त्या वेळीं फोड, खांडूक, खरूज, गळूं, उठाणूं अशा रूपांनीं शरीराच्या बाह्य भागामध्यें, नवीं उत्सर्जनद्वारें तयार करून आणि कित्येकदां आमांश, मूळव्याधि इत्यादि रूपांनीं अंतर्भागामध्यें उत्सर्जनद्वारें तयार करून, त्यांतून जड विजातीय द्रव्यें उत्सर्जित केलीं जातात. सुकी खरूज, कंडु, नायटे, गजकर्ण, शिबें, इसब इत्यादि हीं सूक्ष्मधर्मी विजातीय द्रव्यांच्या उत्सर्जनासाठीं, उत्सर्जनद्वारें तयार होत असतात. ह्या प्रकारच्या क्रियेनें सुसंघटित भागाचें विभेदन केलें जातें, म्हणून तिला **विभेदक** क्रिया असें नांव दिलेलें आहे. देवी, गोंवर, कांजिण्या, वळत्या यांचाहि ह्या विभेदकक्रियेंतच अंतर्भाव होतो.

**विभेदक क्रिया**

११९ शस्त्रानें किंवा दुसऱ्या कशानेंहि झालेली जखम, अथवा विभेदक

क्रियेनें झालेला व्रण किंवा क्षत, यांच्यामुळें, रक्तादिरसांच्या अभिसरणानें होणाऱ्या अंतर्गत क्रियांचा मार्ग विभेदित झालेला असल्याकारणानें, त्या क्रियांना व्यत्यय येतो. त्यामुळें त्या भागांतील नित्य घटनाकार्य अडून राहतें.

**संयोजक क्रिया**

तें सुरू करण्यासाठीं, जीवनशक्तीकडून ती जखम भरून काढण्याची क्रिया सुरू होते. बारीकसारीक जखम थोड्याच वेळांत आपोआप भरून आलेली दिसते ती यामुळेंच. शरीराच्या अंतर्बाह्य भागांत, कोठेंहि झालेली अशी जखम भरून, सांधून काढण्याची जो क्रिया ती **संयोजक क्रिया** होय.

१२० शरीराची वाढती व सुदृढ घटना करीत असण्याचें **जीवनशक्तीचें** कार्य सतत चालू असतें. त्यामुळें जुने, जीर्ण झालेले, शक्तिहिन घटक, उत्सर्जित करून टाकण्यासाठीं, निराळे काढण्याच्या क्रियेनें एक प्रकारें नित्य **विभेदक** कार्य आणि त्याचप्रमाणें, नव्या, सकस व शक्तियुक्त घटकांनीं संयोजक कार्य, सतत चालूच असतें. ह्यासाठींच खाद्यपेयादिक निर्वाहक संपादनाची आवश्यकता असतें. त्यांपैकीं उपयुक्त घटक

**प्रासंगिक उत्सर्जन क्रिया**

रसक्रियेनें ग्रहण करून, निरुपयोगी द्रव्याचें, मलमूत्ररूपानें नित्य उत्सर्जन होत असतें. परंतु कित्येकदां पचनेंद्रियाच्या धारणाशक्तीहून अतिरिक्त, पचनशक्तीच्या सामर्थ्याबाहेर जडान्नमय, अतिपित्तकर, अगदीं निरुपयोगी किंवा दुरुपयोगी खाद्यपेय पदार्थ सेवन केले तर वांति, जुलाब अशा रीतीनें उत्सर्जित केले जातात. प्रकृतिविशिष्ट प्रमाणबाह्य, पित्तमय, वातविशिष्ट, तेलकट, तिखट वगैरे पदार्थ सेवन केले गेले तर रसक्रियाद्वारा, घटनेमध्यें त्या बाधक द्रव्यांचा प्रवेश होतो. जीवनशक्तीला तेथून त्यांचें उत्सर्जन करण्याचें कार्य करावें लागतें. त्यामुळें डोकें दुखणें, चक्कर येणें, मळमळणें, ताप येणें, दाह होणें इत्यादि लक्षणें होतात व तीं उत्सर्जनक्रियेमुळें होत असतात. दूषित हवेंतून श्वसनद्वारा, स्नानादिकाच्या पाण्यांतून, दुसऱ्यांच्या संसर्गानें किंवा डांस इत्यादींच्या दंशानें, घटनेला अपायकारक द्रव्यें शरीरांत प्रविष्ट होऊन रसक्रियेच्या ओघाबरोबर शरीरामध्यें प्रसृत होतात. त्यांचें उत्सर्जन करण्याचें कार्य **जीवनशक्तीला** स्वतंत्रपणेंच करणें आवश्यक पडतें. कारण हीं सूक्ष्म विजातीय द्रव्यें असल्यामुळें तीं ज्ञानतंतु व त्यांमधून मेंदूपर्यंतहि प्रसृत होत जात

असतात व तेथूनच त्यांना उत्सर्जनीयरूप देण्याची क्रिया तिला सुरू करावी लागते. त्यासाठीं स्वशक्ति व कार्यशक्ति खर्च कराव्या लागतात, त्यामुळें तिला नित्य क्रियांचें नियमन करावें लागतें. त्यामुळें प्रारंभीं नित्याहून शक्तिमांद्य, थोडें अस्वास्थ्य, क्षुधामांद्य व हळुहळु कमिजास्त मुदतीचे दाह, ज्वर, मस्तकशूळ, सर्व आंगांत किंवा इंद्रियांत वेदना किंवा शूल, जडपणा, कफ, खोकला इत्यादि लक्षणें जीवनशक्तीच्या दौर्बल्याच्या मानानें, दीर्घकालिक व त्रासदायक होतात. अशा लक्षणांनीं,जरी एकादा रोग म्हणून ओळखिला जात असला, तरी वास्तविक ही **प्रासंगिक उत्सर्जनक्रिया** आहे.

१२१ रसक्रियेनें रक्तामध्यें मिसळून शरीरांत प्रसृत झालेले कांहीं घटक, शरीरघटनेंमध्यें त्यांना घटकभूतपणानें स्थान न मिळाल्यामुळें शिल्लक राहतात, आणि शक्तिदौर्बल्यामुळें व संपादनद्वारा त्यांच्या उत्सर्जनाला आवश्यक असलेल्या द्रव्यांचा पुरवठा न झाल्यामुळें, जीवनशक्तीकडून तिच्या नित्य क्रियाव्यापाऱ्यांना अडथळा न होईल अशा ठिकाणीं कोठें तरी संग्रहित केले जातात. शरीरघटनेला उपयुक्त असून किंवा निरुपयोगी अथवा दुरुपयोगी असून, घटनाबाह्य असलेले घटक, अनुकूल परिस्थिति प्राप्त होईपर्यंत, एके ठिकाणीं संग्रहित करून ठेवण्याची जी अशी क्रिया जीवनशक्तीला करावी लागते, ती **संग्राहक-क्रिया**—होय. १ शरीराच्या घटनेला व सुदृढतेला आवश्यक अशीं इंद्रियघटक द्रव्यें, रसक्रियेनें सजातीय तत्त्वविशिष्ट कार्यक्षेत्रांत प्रविष्ट होतात. परंतु त्यांना सेंद्रियत्व देण्याला जीवनशक्तीच्या संग्रहस्थानांत, त्या तत्त्वाच्या वैशिष्ट्याची शक्ति शिल्लक नसल्यामुळें आणि तत्त्वविशिष्ट शक्तिपूर्ण द्रव्यें संपादित करण्यांत न आल्यामुळें, त्यांना घटनेला उपयुक्त असें रासायनिक रूप प्राप्त होत नाहीं. यामुळें ह्या कार्यशक्तीच्या रसाला तीं विजातीय होऊन त्यांचा घटनाकार्याला अडथळा उत्पन्न होतो. परंतु तीं सेंद्रियशक्तिसंपादित झालीं तर, घटनेला उपयुक्त होणारीं असल्यामुळें उत्सर्जित न करण्यासारखीं व संग्राह्य असतात. मेद, हत्तीरोग, स्थूलता, वाळूक अशा प्रकारच्या घटना ह्या प्रकारांत मोडतात. २ खाद्यपेयादिकांतील, मानवी शरीरघटनेला उपयुक्त परंतु प्रकृतिवैशिष्ट्याला बाधक म्हणून विजातीय अशीं द्रव्यें रसक्रियेनें रक्तादि रसामध्यें प्रविष्ट होतात. तीं उत्स-

र्जित करण्यासाठीं, शरीराच्या एकाद्या भागामध्यें संग्रहित केलीं जातात. उत्सर्जक कार्यशक्तीच्या क्षेत्रांत जाऊन तीं उत्सर्जनमार्गास लागत तोंपर्यंत वळ, वाघणा, धांवरें, गालगुंड किंवा एकाद्या अवयवाला किंवा शरीराच्या एकाद्या भागाला सूज येणें अशा रूपानें संग्रहित झालेलीं दिसतात. ३ कित्येकदां लस, पू अशा प्रकारच्या उत्सर्जक रूपानें उत्सार्जित करण्यासारखें विजातीय द्रव्य शरीरामध्यें जमतें व त्यामुळें नित्य क्रियांना अडथळा उत्पन्न होतो. अशा वेळीं तें रक्तांतून अशुद्धवाहिन्यांमध्यें व त्यांतून वसावाहिन्यांमध्यें सोडून देण्याची क्रिया सुरू होते, व फोड, खांडूक, गळूं, उठाणूं इत्यादि आकाररूपानें तें संग्रहित होत असतें आणि विभेदक क्रियेनें उत्सार्जित होतें. ४ एकाद्या वेळीं एकाद्या कार्यक्षेत्रांत प्रसृत झालेलें विजातीय द्रव्य, उत्सार्जित केलें जाण्यास आवश्यक असलेल्या जलादि रसाची व अवश्य तितक्या शक्तीची वाण पडल्यामुळें, आणि प्रयोगी मनाच्या प्रयोगी समजुतीनें, आवश्यक अशीं जलादि द्रव्यें बाधक होतील म्हणून किंवा त्याला अप्रिय म्हणून सेवन करण्याची त्यानें टाळाटाळ केल्यामुळें त्याला जें उत्सर्जनीयरूप देणें आवश्यक असतें तें रूप जीवनशक्तीला देतां येत नाहीं. त्यामुळें तें द्रव्य शरीराबाहिर टाकून देणें अशक्य होतें. म्हणून तें एकाद्या भागांत संग्रहित करून ठेविलें जातें. पुन्हां केव्हां तशाच प्रकारचें विजातीय द्रव्य उत्सार्जित करणें अशक्य झालें तर तेंहि त्याच ठिकाणीं जमविलें जातें. अशा रीतीनें शरीरांत एकादें स्थान, विजातीय द्रव्याचें संग्रहस्थान होऊन राहतें. हा संग्रह वाढत जाऊन त्याची नित्य क्रियाव्यापारांना अडचण उत्पन्न झाली म्हणजे तीव्र रोगरूप प्राप्त होतें. गुल्म, मुतखडा अशा प्रकारचे विकार ह्या प्रकारांत मोडतात. ५ एकाद्या वेळीं खाद्यपेयादिकांच्या द्वारा, सेंद्रियशक्तिसंपन्न घटकांचा शरीरांत प्रवेश होतो. तत्त्वसाम्यतेमुळें एकाद्या तत्त्वाच्या कार्यक्षेत्रांत, ते रसक्रियेनें प्रविष्ट होतात. परंतु त्यांच्या ठिकाणीं असलेली सेंद्रियशक्ति, प्रकृतिविशिष्ट जीवनशक्तीच्या किंवा कार्यशक्तीच्या समान वैशिष्ट्याची नसते. त्यामुळें जीवनशक्तीशीं किंवा कार्यशक्तीशीं एकरूप होऊन त्यांना संवर्धित करण्याला ते उपयुक्त न होतां, उलट आपल्या भिन्न वैशिष्ट्यामुळें ते विजातीय व नित्य क्रिया व्यापारांना अडथळा उत्पन्न करणारे होतात. अशा विजातीयशक्तियुक्त घटकांचें

शरीराबाहेर उत्सर्जन करणें जीवनशक्तीला आवश्यक असतें. परंतु ते सेंद्रिय-शक्तिसंपन्न असल्यामुळें, त्यांचें उच्चाटन करण्याला आवश्यक असते तितकी शक्ति नित्य क्रियाव्यापार चालवून खर्च करण्याला पुरेल इतकी शिल्लक नसते. यामुळें नित्यक्रियांचें नियमन करून, त्या कामीं खर्च होणाऱ्या शक्तींपैकीं शक्य तितकी शक्ति उवारीस काढणें आणि ती त्या विजातीय द्रव्यांच्या शरीरभर होत जाणाऱ्या प्रसाराचा प्रतिकार करण्याच्या कामीं खर्च करण्याची क्रिया करणें जीवनशक्तीला भाग पडतें. यामुळें त्यांचें उत्सर्जन करण्याचें कार्य सुरू होईपर्यंत तीं विजातीय द्रव्यें शरीरांत स्वाभाविकच संग्रहित करून ठेवावीं लागतात. मलेरिया, टायफॉइड इत्यादिकांसारख्या रोगजंतूंचा शरीरांत प्रवेश होऊन संग्रहित होणाऱ्या द्रव्यांचा या प्रकारांत अंतर्भाव होतो. कृमि, नायटा, गजकर्ण, किडवळ इत्यादि विकारहि अशाच सेंद्रियशक्तियुक्त घटकांच्या संग्रहानें होत असतात.

१२२ संग्राहक क्रियेचा प्रसंग वारंवार किंवा नित्य येत गेला, म्हणजे जीवनशक्ति व कार्यशक्ति दुर्बल होत जातात आणि तितक्या प्रमाणानें संहारशक्ति प्रबल होत जाते व संग्रहस्थानांत विजातीय द्रव्याचा अधिकाधिक संचय होत जातो. याचें पर्यवसान नित्य क्रियाव्यापाऱ्यांना अडथळा उत्पन्न होण्यांत होतें. शक्तीचा तुटवडा व आवश्यक साधनांचा आभाव, यामुळें विजातीय द्रव्यांना उत्सर्जनीय रूप देतां येत नाहीं.

**कष्टसाध्य व असाध्यक्रिया**

प्रसंगवशात् अशा साधनांचा अल्पसा पुरवठा झाला व त्या द्रव्याला उत्सर्जनीय रूप देतां आलें, तरी तें उत्सर्जन करण्याला मार्ग नाहीं अशी परिस्थिति उत्पन्न होते. अशा वेळीं तें संग्रहित विजातीय द्रव्य शरीराबाहेर काढून टाकलें जाण्याचा उपाय झाला तरच जीविताचें रक्षण होणें शक्य असतें. अशी जी स्थिति होते तीच **कष्टसाध्य** स्थिति होय. ही स्थिति अर्थातच परावलंबी असते. अॅपेंडिसायटिस, यकृतांत पू होणें, अंतार्विद्रधि इत्यादि हे कष्टसाध्य व परावलंबी विकार होत. परंतु अंतर्गत कार्यशक्तींपैकीं एकादी कार्यशक्ति अगदीं दुर्बल झाली, आणि ती संवार्धित व कार्यक्षम होण्याला, तिचें सजातीय व शक्तिसंपन्न द्रव्य वेळींच सेवन केलें गेलें नाहीं तर किंवा ह्या परिस्थितीचा

फायदा घेऊन, संहारशक्तीनें आपलें विघटनाकार्य सुरू केलें असलें तर शस्त्र-क्रियादि उपाय करूनसुद्धां जीवितरक्षण असाध्य होतें.

१२३ जीवनशक्तीचें योग्य संपादन न होतां, संरक्षण कार्यासाठीं तिचा व्यय मात्र होतो. जीवनशक्तीवर वरील अनेक कारणांनीं जास्त ताण पडतो.

**क्षयरूप क्रिया**

तिचें संपादन योग्य प्रकारें न होतां, संहारशक्ति आणि जीवनशक्ति यांपैकीं संहारशक्तीचें प्राबल्य होऊं लागतें. त्या वेळीं आवश्यक घटक आणि जीवनशक्ति यांचें साम्य राखण्यासाठीं कांहीं शरीरघटकांना निर्जीव करून, त्यांचें उत्सर्जन करावें लागतें. ह्या कामीं होणाऱ्या शक्तिव्ययानें पुन्हां साम्य बिघडतें व तें रक्षण करण्यासाठीं पुन्हां पुन्हां तीच तीच क्रिया करावी लागते. अशा रीतीनें शक्ति व घटक यांचा जो क्षय होत जातो, ती **क्षयरूप** संरक्षक क्रिया होय. ह्या प्रसंगाच्या घटनेचा उपक्रम, निरनिराळ्या कारणांनीं होऊं शकतो. जुनें, शिळें व निःसत्त्व अन्न व भाजून, तळून निःसत्त्व केलेलें अन्न, वारंवार भक्षण करणें, भूक व पचनशक्ति असेल त्याहून फाजील प्रमाणांत अन्न सेवन करणें, किंवा भूक, तहान लागली असतांहि ती मारणें, शक्ति असेल तीहून जास्त श्रम करणें, आणि योग्य विश्रांति न घेणें, आहारादि द्वारा प्रकृतीला न सोसणारीं अशीं जडवर्गातील व श्वसनद्वारा किंवा संसर्गानें सूक्ष्म-वर्गातील विजातीय द्रव्यें शरीरांत प्रविष्ट होणें, दुर्व्यसनें, चिंता, काळजी, असमाधानवृत्ति इत्यादि मानसिक विकार, अशा प्रकारच्या निरनिराळ्या कारणांनीं, एका किंवा अनेक कार्येंद्रियांच्या क्रियाशक्तींत दुर्बलता आलेली असते. अर्थात् जें कार्येंद्रिय जास्त दुर्बल असेल, त्या तत्त्वाच्या गुणधर्मा-नुसार, विकाराला तशा तऱ्हेचें स्वरूप प्राप्त होतें. विजातीय द्रव्योत्सर्जनाचा भार पृथ्वीतत्त्वाच्या कार्येंद्रियावर पडला म्हणजे आंत्रक्षय, जलतत्त्वाच्या कार्यें-द्रियावर पडला म्हणजे कफक्षय, तसेंच रक्तक्षय, धातुक्षय वगैरे निरनिराळे क्षयाचे प्रकार होतात. अशा वेळीं विलंबी स्वरूपाचें संरक्षणकार्य चालू असेल त्या वेळीं प्रकृतिधर्मविशिष्ट व दुर्बल कार्येंद्रियविशिष्ट शक्तिमय अशी साहा-य्यकारी सूक्ष्म चिकित्साच हितकर असते. पण विषदंश, कॉलरा, सांथीचे विकार, अशा प्रसंगीं शरीरघटनेचा व शक्तीचा क्षय झपाट्यानें सुरू झालेला असतो. म्हणून अशा विकारांत स्थूल चिकित्सा करावी व मधून मधून

सुप्रभा विद्युत् परिस्थित्यनुरूप वारंवार पोटांत देणें हितकर असतें. क्षयरूप कार्य चालू असेल तेव्हां नेहमींच्या आहारांत येणारे पदार्थ शक्य तितके जीवनशक्तियुक्त व माफक प्रमाणांत देणें व तेहि पचनास सुलभ जातील अशा रूपानें देणें, आणि भरपूर विश्रांति देणें हितकर असतें. अशा रीतीनें युक्त, सजातीय, सत्त्वगुणघटक, उत्साहक आहार व योग्य जीवनशक्तिवर्धक उपाययोजना केली तर, आरोग्याचा गेलेला तोल, जीवनशक्ति सांभाळूं शकते व पुनः आरोग्यसंपन्न स्थिति प्राप्त होते. मात्र त्याकरितां विजातीय द्रव्यांहून दुर्बल असलेल्या जीवनशक्तीला, जीवितरक्षणासाठीं, आवश्यक व शक्य त्या ( वर सांगितलेल्या ) क्रियांचें अवलंबन करावें लागतें. अशा वेळीं तिला साहाय्यक व संजीवक उपाययोजना करणेंच जरुरीचें असतें. म्हणून ती करण्यापूर्वी १ विजातीय द्रव्याचें स्वरूप व प्रमाण, २ त्यानें दूषित केलेलें कार्यक्षेत्र, त्याचा विशिष्ट भाग किंवा कार्येंद्रिय, ३ संरक्षक क्रियेपैकीं विभेदनादि प्रकार, ४ संरक्षकक्रिया करण्यांत कोणत्या कार्यशक्तीवर प्रत्यक्ष भार पडला आहे वगैरे परिस्थिति विकाराच्या लक्षणावरून आधीं लक्षांत घेतली पाहिजे.

## रोगलक्षणें

१२४ कोणत्याहि कारणानें संरक्षणकार्याची आवश्यकता उत्पन्न झाली म्हणजे मनुष्याची बाह्य क्रियाव्यापार करण्याची हुषारी व शक्ति मंद होते. याचें पहिलें कारण असें आहे कीं, अशा प्रसंगीं जीवनशक्तीकडून इंद्रियशक्तींना होणारा शक्तीचा पुरवठा कमी केला जातो; कारण अंतर्गत इंद्रियांकडे संरक्षणकार्यासाठीं तो खर्च करावा लागत असतो. आणि दुसरें, विजातीय द्रव्यामुळें, अंतर्गतघटनाकार्यांत उत्पन्न झालेला अडथळा नाहींसा होईपर्यंत आहारादिद्वारा संवर्धक संपादनाची नित्याप्रमाणें आवश्यकता नसते. ह्या कारणांमुळें हुषारी व शक्ति मंद होणें हें दाहशूलादि लक्षणें होण्यापूर्वीचें **रोगोद्भवसूचक** लक्षण आहे. असें लक्षण होतांच प्रकृतिधर्माला समान अशा म्हणजे प्रकृतिनियामक निष्पत्तीचा स्थूल प्रमाणानें उपयोग करणें आणि रसक्रियांना व पृथक्करणक्रियेला ( प्राणक्रियेला ) साहाय्यक उपाय म्हणून भरपूर पाणी पिणें व चलनवलनादि क्रियांकडे आणि कोणत्याहि प्रकारचे

**रोगसूचक लक्षणें**

विचार करण्याकडे शक्तीचा व्यय न करितां स्वस्थ पडून राहणें हितकर आहे.

१२५ थोड्याबहुत प्रमाणांत थंडी वाजणें, उष्णता वाढणें, डोळ्यांची आग होणें वगैरे ज्वराच्या लक्षणांचा भास किंवा प्रत्यक्ष ज्वर येणें, हें विजातीय द्रव्यांचें पृथक्करण करून, शरीराची प्रकृतिविशिष्ट रासायनिक घटना संरक्षित करण्याची क्रिया सुरू झाल्याचें लक्षण आहे. ह्या लक्षणांनीं विजातीय द्रव्य ज्या तत्त्वाच्या जातीचें असेल त्या तत्त्वाच्या कार्यक्षेत्रांत ढकलण्याची क्रिया सुरू होते, व त्या तत्त्वाची कार्यशक्ति आपल्या रसाचें व क्षेत्रघटनेचें सजातीयत्व रक्षण करण्यासाठीं आपल्या नित्य संवर्धकक्रिया मंद किंवा बंद करून त्या विजातीय द्रव्यांचें उत्सर्जन करण्याची तयारी व क्रिया सुरू करिते. ही कार्यशक्ति दुर्बल असेल त्या वेळीं नजीकच्या कार्यशक्तींवर थोडाबहुत कार्याचा भार पडतो. व त्यांनाहि आपल्या नित्य क्रिया मंद कराव्या लागतात. अशा रीतीनें ज्या कार्यशक्तींवर संरक्षकक्रिया करण्याचा प्रसंग येतो, त्यांच्या स्वाभाविक धर्माप्रमाणें निरनिराळे रोग व लक्षणें उद्भवूं लागतात.

**उत्सर्जनक्रिया**

१२६ संरक्षकक्रियेचा भार पृथ्वीतत्त्वाच्या कार्यशक्तींवर पडला म्हणजे, पचनक्रिया मंद होते, पोट भरलेलें असल्यासारखें वाटतें, केव्हां केव्हां अपक्व अन्न, आंबटवणी किंवा फेंस यांची वांति होते, शौचास साफ होत नाहीं किंवा अजीर्ण होऊन शौचाची घाई होते; आंतडीं फुगतात किंवा सुजल्यासारखीं होतात. शरीराला व अवयवांना जडत्व व सुस्ति येते; स्नायूंची शक्ति क्षीण होऊन अंग व मांस दुखूं लागतें, कफ होतो, लघ्वी थोडे वेळां होते व तींतून खर पडते; तेजतत्त्वाचें यकृत हें कार्येंद्रिय, पृथ्वीतत्त्वाच्या कार्यशक्तीचें साहाय्यक असल्यामुळें त्यावरहि त्याचा परिणाम घडून, पित्ताशयामध्यें पित्तसंचय होतो; कित्येकदां वाघणे ( वसाग्रंथी ) वाढून, ओली खरूज किंवा खांडुकें होतात; आंगावर मळी जमते; घाम, उच्छ्वास, यांना दुर्गंधी येते; जिभेवर व दांतांवर बुरशी जमते; नाडी जड व सुस्त लागते; वृत्तीमध्यें आळस व विचारशून्यता येते. ही लक्षणें प्रकृतिभिन्नत्व आणि विकाराची तीव्रता, यांच्या मानानें कमिजास्त प्रमाणानें आढळतात. प्रथमनिष्पत्ति ही या कार्यशक्तीची संजीवक असल्यामुळें, तिच्या योगानें, तिचें

**पृथ्वीतत्त्वावर भार**

सामर्थ्य वाढत जाऊन रोगलक्षणें नष्ट होत जातात, आणि नित्य क्रिया-व्यापार क्रमानें सुरू होतात. (परिच्छेद १३२ पहा.)

१२७ जलतत्त्वाच्या कार्यक्षेत्रांत विजातीय द्रव्यांचा संचय होऊन, त्या कार्यशक्तीवर संरक्षकक्रियेचा भार पडला, म्हणजे जडद्रव्यांना पचनक्रियेनें रसरूप देण्याच्या कार्मी, पाचक रसरूपानें साहाय्य करणें व रसग्रहण करणें, ह्या नित्य संवर्धक कार्याकडील शक्तीचा पुरवठा मंद किंवा बंद करावा लागतो. त्यामुळें जिव्हेचा चव जाणण्याचा धर्म बिघडतो. तोंडाला, जिभेला व घशाला कोरड पडते; लाळ व थुंकी बंद होते; हिरड्या सुजतात किंवा दुखूं लागतात; पडजीभ वाढते; घसा दुखूं लागतो; डोळे सुजल्यासारखे होतात; पडसें येतें; कफ व खोकला होतो; डोळ्यांची व हातापायांची आग होते; अंग धम-धमतें किंवा ज्वर येतो; विकाराचें स्वरूप तीव्र असेल तेव्हां हीं लक्षणें जास्त होतात. शोष लागतो, थंडी भरते; लघ्वी थोडी व उष्ण होते किंवा जास्त प्रमाणांत होऊं लागते; छातींत धडधडूं लागतें; डोकें दुखूं लागतें. **विलंबी** विकारांत जीर्णज्वर, संधिवात, सांधे सुजणें, मूत्रपिंड सुजणें, हातपाय वळणें, यकृत सुजणें, अंतर्गत किंवा बाह्य भागावर गळवें होणें, शरीराचा एखादा भाग सुजमट होणें, व त्याचा व्याप इतरत्र वाढत जाणें, धांवरें होणें, छातींत धडधडणें, हृदयकंप इत्यादि लक्षणें होतात. शरीराची उष्णता व नाडीची गति यांमध्यें विषमता उत्पन्न होते. नाडी स्पर्शाला जड, भरलेली व अशक्त लागते. स्वभाव रागीट व तिरसट होतो व चलनवलन करण्याची हुषारी नष्ट होते. द्वितीय निष्पत्ति (परि. १३८) ही या कार्यशक्तीची संजीवक असल्यामुळें तिच्या योगानें हिचें सामर्थ्य वाढत जाऊन, रागलक्षणें नष्ट होत जातात, आणि नित्य-क्रियाव्यापार क्रमानें सुरू होतात.

**जलतत्त्वावर भार**

अशुद्ध ह्या जलतत्त्वाच्या रसामध्यें घनत्व उत्पन्न झाल्यामुळें जडद्रव्याचें पृथक्करण करून त्यांचें उत्सर्जन करणें कठीण पडतें. म्हणून पाणी भरपूर प्रमाणांत पिणें ही गोष्ट अत्यंत आवश्यक व हितकर असते.

१२८ तेजतत्त्वाच्या कार्यक्षेत्रांत विजातीय द्रव्यांचा संचय झाला म्हणजे शरीरसंवर्धक कार्य थांबून संरक्षणकार्याचाच प्रसंग उत्पन्न होतो. त्यामुळें सर्व शारीरिक क्रियांना मंदत्व येतें. शरीराची उष्णता व रक्ताभिसरणाची

गति वाढते. **जडतेज**तत्त्वाच्या विजातीय द्रव्याच्या घडामोडींत **आशुकारि**क्रियेमध्यें, डोकें दुखणें, भोंवळ करणें, पित्ताची वांति, जुलाब किंवा खडी होणें, सर्वांगाचा संताप, डोळे लाल किंवा पिंवळसर, तोंड कडवट, जिभेला कोरड पडणें, लघ्वी आरक्त, जळजळीत व थोडी होणें किंवा उन्हाळे होणें, यकृत वाढणें व दुखणें, अंगावर गांधी उठणें, ताप भरणें, बडबड सुरू होणें व भ्रमिष्टपणा येणें, श्वासोच्छवास जोरानें चालणें, दम लागल्यासारखें वाटणें, नाडी भरलेली, उष्ण व सणसणीत अशा प्रकारचीं लक्षणें होतात. पित्ताधिक्य असेल तर कावीळ होते.

**तेजतत्त्वावर भार**

**विलंबी**स्थितींत अरोचक, अग्निमांद्य, जीर्णज्वर, निरुत्साह, फिकटपणा, नीरक्तता, मलावष्टंभ किंवा संग्रहणी, मधून मधून भोंवळ चाळवणें, लघ्वी वारंवार होणें किंवा दिवसांतून एकादवेळच होणें इत्यादि प्रकारचीं लक्षणें होतात. **सूक्ष्म**धर्मीय विजातीय द्रव्याचा परिणाम असेल तेव्हां, **आशुकारि**क्रियेमध्यें वरीलप्रमाणें ज्वरादि लक्षणें होतातच; परंतु तापाचें स्वरूप तीव्र, नाउमेद, शक्तिपात, मूर्च्छा किंवा बेशुद्धि (वात), आंग शुष्क व रखरखीत, मस्तक अतिशय तापणें व हातपाय गार असणें, फुफ्फुसदाह, श्वासनलिकादाह, कफ होऊन तो शुष्क असणें, हृदयकंप, प्लीहावृद्धि, आंतड्यांचा दाह, नाडीची गति वाढलेली परंतु चंचल व सूक्ष्म आणि वृत्ति चिंताक्रांत असते. **विलंबी**स्थितीमध्यें शक्तिक्षीणता व क्षयाचीं पूर्वलक्षणें, पोटांत वात धरणें, पोटशूळ, स्वप्नावस्था होणें इत्यादि लक्षणें असतात. तृतीय[1] निष्पत्ति ही ह्या कार्यशक्तीची संजीवक असून, जडतेजाच्या विकारांमध्यें, **प्रथम**[2] निष्पत्तीचा फारच साहाय्यक उपयोग होतो. सूक्ष्मतेजाच्या विकारांमध्यें, **द्वितीय**[3] निष्पत्तीचा फारच साहाय्यक उपयोग होतो. **सूक्ष्मतेज** म्हणजे वायुरूप तेजाच्या विकारांत जलतत्त्वाची कार्यशक्ति दुर्बल ठरते. त्यामुळें वायु होणें वगैरे लक्षणें होतात. म्हणून समता उत्पन्न करण्यासाठीं, जलतत्त्वाच्या कार्यशक्तीचें संवर्धन केल्यानें ( द्वितीय निष्पत्तीनें ) सर्व प्रकारचे वातविकार नष्ट होतात व संवर्धक रसक्रिया सुरू होतात.

१२९ वायुतत्त्वाच्या ठिकाणीं विजातीयत्व संभवत नाहीं. सूक्ष्म विजातीय

१ परि० १३२ पहा. २ परि० १३३ पहा. ३ परि० १३९ पहा.

द्रव्यें त्यामध्यें मिश्र होत असतात. अर्थात् त्यामध्यें मिश्रित असणारें विजातीय द्रव्य इतर तत्त्वांच्या धर्माचें असतें. तें उत्सर्जित

**वायुतत्त्वावर भार**

करून, ज्या त्या तत्त्वाच्या कार्यशक्तीकडे, प्राणक्रियेनें ज्ञानरसद्वारा पोंचविण्याचें कार्य ज्ञानतंतूंना करावें लागतें; परंतु तें द्रव्य वायुरूप असल्यामुळें, त्या कार्यशक्तींना आपल्या सजातीय रसांत त्यांचें रूपांतर करून घेण्याला, ज्या प्रकारच्या घटकद्रव्यांची आवश्यकता असते, त्यांचें संपादन होणें जरूरीचें असतें. अंतर्गत प्रेरणेनें तशा पदार्थांचें सेवन करण्याची इच्छा झाली, तरी ते पदार्थ प्रिय नसतात म्हणून किंवा बाधतील या शंकेनें सेवन केले जात नाहींत. त्यामुळें तें द्रव्य ज्ञानतंतूंमध्यें शिल्लक रहात जातें. त्यामुळें ज्ञानरसाची स्थिति व ज्ञानतंतूंची घटना दूषित होते. तें विजातीय द्रव्य ज्या ज्या ठिकाणीं घटनेचा बिघाड करूं लागतें, त्या त्या ठिकाणीं कळ उठणें, वेदना होणें, शक्तिक्षीणतेमुळें कित्येकदां त्या असह्य होणें, अस्वस्थता उत्पन्न होणें, त्या द्रव्याच्या तत्त्वविशिष्ट धर्मांप्रमाणें दाह होणें, जडत्व येणें, सूज येणें, ज्ञानतंतूंचा दाह व क्षोभ होणें, फुप्फुसांचा दाह, दमा लागणें अशा प्रकारचीं लक्षणें होतात व याचा परिणाम ज्ञानतंतूंचें केंद्र व मेंदूवर घडूं लागून, भोंवळ, मूर्च्छा, बडबड, बेशुद्धि, शक्तिपात, अर्धांगादि वात होणें असे प्रकार होतात. स्पर्शज्ञान हा वायूचा धर्म असून त्वचा हें त्याचें ज्ञानेंद्रिय आहे. म्हणून इसब इत्यादि त्वग्रोग हेहि ह्या प्रकारांतच येतात. वायुतत्त्वाच्या कार्यक्षेत्रांतील अशा बिघाडामध्यें नाडीची गति, विकाराच्या परिणामाच्या मानानें सूक्ष्म होते. त्याचप्रमाणें उत्साह आणि सहनशीलता नष्ट होऊन, वृत्तींत तिरसटपणा व एकलकोंडेपणा येतो. झोंप नीट लागत नाहीं. ज्ञानतंतूंना संजीवक म्हणून **चतुर्थ** निष्पत्तीचा ( परि० १४५ ) हितकर उपयोग होतो. परंतु पृथ्वी, जल किंवा तेज ह्यांपैकीं ज्या तत्त्वाच्या समान स्वरूपाचीं लक्षणें असतील, त्या तत्त्वाच्या संजीवकनिष्पत्तीची साहाय्यक योजना केल्याशिवाय विकाराचें शमन सुलभ होत नाहीं.

# संजीवनचिकित्सापद्धति.

## औषधोपचार-योजना

**उपाययोजना**

१३० खाणें, पिणें, हवा वगैरे मधून प्रकृतीला सजातीय व शरीराला उपयुक्त, असे घटक आकर्षण करून घेऊन, शरीराची वाढ करणें व त्याचें आरोग्य आणि सुस्थिति रक्षण करणें, हें जीवनशक्तीचें अव्याहत चालणारें कार्य आहे. तें ती नियुक्तमंडळाकडून अनिच्छित क्रियांच्या योगानें सामान्यतः करून घेते. हें कार्य योग्य प्रकारें करितां येण्यासाठीं, प्रयोगी मंडळाकडून बाह्यतः संरक्षक व उपयुक्त साहित्यसंपादन व्हावयास पाहिजे असतें. परंतु प्रयोगीमनाच्या, स्वतःला आवडेल तें कार्य करण्याच्या प्रवृत्ती-मुळें आणि विषयलोलुपतेमुळें, त्याच्याकडून प्रतिकूल आहारविहारादि-कांनीं अपायकारक द्रव्यांचें संपादन केलें जातें. त्यामुळें जीवनशक्तीला प्रासं-गिक संरक्षणकार्य—सामान्य प्रचारांतील भाषेंत रोग म्हणतात—तें सुरू करावें लागतें. घटनेमध्यें प्रविष्ट झालेलें विजातीय द्रव्य उत्सार्जित करून टाकण्यासाठीं कार्यशक्ति व कार्येंद्रियें, यांच्यावर नित्यक्रियाव्यापारांशिवाय, हा प्रासंगिक कार्याचा बोजा अधिक पडतो. त्यामुळें त्यांना नित्याहून अधिक शक्ति खर्च करावी लागते. यामुळें त्यांना क्षीणता व दुर्बलता प्राप्त होते. विजातीय द्रव्याचें प्रमाण, त्याचा प्रसार व त्याच्या अंगची विरोधी व अपायकारक शक्ति जितकी अधिक तितकी जीवनशक्ति व कार्यशक्ति जास्त क्षीण होत जातात. अशा संरक्षक कार्यांपायीं एकादी कार्य-शक्ति व कार्येंद्रिय जरी शक्तिहीन झालें तरी तेवढ्यानें **जीवन**शक्तीचा कार्य-प्रवाह तितक्या प्रमाणांत अडतो; आणि संहारशक्तीचें प्राबल्य वाढून, तिच्या विघटनाकार्याचा पाया पडतो व रोगाचीं लक्षणें कमीजास्त प्रमाणांत होऊं लागतात. ह्या संहारशक्तीबरोबर झगडण्यांत, जीवनशक्तीला योग्य उपायांची जोड मिळून, सजातीय मदत मिळाल्यास, तिचा जय होऊन मनुष्य बरा होतो. परंतु झगडून झगडून अखेर संहारशक्तीच प्रबल ठरून जीवनशक्तीचें कार्य मंद मंद होत तें बंद पडण्याचा प्रसंग आला तर प्राण्याला

मृत्यु येतो. ह्यासाठीं अस्वाभाविक स्थिति व लक्षणें दिसूं लागतांच, **प्रकृतिविशिष्ट जीवनशक्ति** आणि ज्या तत्त्वाच्या कार्यशक्तींच्या नित्यक्रियाव्यापारांत फरक पडलेला दिसत असेल, त्या कार्यशक्ति यांची क्षीणता नष्ट होऊन, त्या सतेज व कार्यक्षम होण्यासाठीं, त्यांना त्यांच्या तत्त्वविशिष्ट शक्तीचा आणि संरक्षणानुकूल साहित्याचा पुरवठा होईल, अशा स्वरूपाची उपाययोजना करणें हें **जीवितशास्त्र**दृष्ट्या आवश्यक व हितकर आहे.

**पंचतत्त्वात्मक औषधि**

१३१ घटनाविघटनाकारिणी चैतन्यशक्तीच्या विघटनाकार्यानें, गुणघटकांचें पृथक्करण होऊन घटनाक्रियेनें, पृथ्वीआदिकरून पंचमहाभूतरूपानें, निरिंद्रियद्रव्यरूप म्हणजेच निर्जीव सृष्टिरूप घटना, प्रथम झालेली आहे. निरिंद्रिय घटकांना घटनाशक्तीकडून सेंद्रियत्व प्राप्त होऊन, पुढें जीवन प्राप्त होण्यांत घटनाक्रियेचें पर्यवसान झालेलें आहे. अगदीं जड अशा पृथ्वीतत्त्वाच्या निरिंद्रियघटकांना जीवन देण्याचें कार्य उद्भिज्जसृष्टिरूपानें व्यक्त झालेलें आहे. ही प्राथमिक जीवसृष्टि, इतर जीवांप्रमाणें, जीवनव्यवसायासाठीं जगांत फिरूं शकत नाहीं. परंतु तिच्या जीवितक्रियाव्यापारांचा व्याप मात्र प्रतीत होत असतो. इतर जीवसृष्टीच्या उपत्तीला व अस्तित्वाला ही उद्भिज्ज सृष्टीच आधारभूत आहे. सर्व जीवसृष्टीची, ही उद्भिज्ज सृष्टीच मुख्यतः पोषक आहे. गुणघटकांमध्यें परस्परविरुद्ध धर्मांचे घटक असतात व त्यांच्या भिन्न घटना होत असतात, त्याप्रमाणेंच उद्भिज्ज सृष्टीमध्येंहि परस्परविरोधी गुणधर्मांच्या घटना झालेल्या आहेत. कांहीं उद्भिज्जें मनुष्यादि प्राण्यांना मृत्युदायक अशीं विषमय आहेत; कांहीं मध्यम प्रकारचीं, कांहीं साधक व कांहीं बाधक गुणांचीं आहेत, तर कांहीं निर्वाहोपयोगी म्हणजे बाधक नाहींत अशा प्रकारचीं आहेत. ज्याप्रमाणें कांहीं उद्भिज्जें प्राणघातक विषरूप आहेत, त्याप्रमाणेंच कांहीं मानवी जीवनशक्तीच्या समान गुणधर्मवैशिष्ट्यानें संपन्न अशीं आहेत. पंचमहाभूतांपैकीं प्रत्येकाची एकेक विशिष्ट सूक्ष्म शक्ति असते; त्या शक्तीनें परिपूर्ण असे विशिष्ट घटक असतात; अशा घटकांना आकर्षण करून घेऊन त्यांचें संपादन व संवर्धन करील अशी त्यांच्या ठिकाणीं अंगभूत शक्ति असते व अशी व्यापक, प्रभावी, विशिष्ट शक्ति असणाऱ्या प्रत्येक तत्त्वाच्या कांहीं वन-

स्पति असतात. अशा वनस्पतींच्या शक्ति, अत्यंत सूक्ष्म उपाधिग्रहणानें, कार्यप्रवाहदर्शक असतात. त्यामुळें अशा वनस्पतींचे गुणधर्म, स्थूलोपाधिद्वारा किंवा स्थूल प्रमाणांत, प्रभावी होत नाहींत. त्यांचे गुणधर्म, सूक्ष्म प्रमाण व शक्य तितक्या सूक्ष्म उपाधीच्या द्वारा प्रतीत होत असतात. **संजीवनचिकित्सापद्धतीचीं औषधें अशा प्रभावी वनस्पतींपासून तयार केलेलीं आहेत.** एकेक औषध एकेका तत्त्वविशिष्ट शक्तीनें संपन्न असल्याकारणानें, तें त्या त्या तत्त्वाच्या **जीवनशक्ती**च्या समानगुणधर्मांचें व त्याचप्रमाणें त्या त्या तत्त्वाच्या कार्यशक्तीच्या समानगुणधर्मांचें असल्यामुळें, त्यांना शक्तिसंपन्न करणारें आहे. मागें परि० ९३ मध्यें प्रकृतिभेदाचीं कारणें सांगितलीं असून

**औषधें--**
**प्रकृतिनियामक**

परि० ९७ ते १०६ मध्यें निरनिराळ्या प्रकृतींच्या माणसांचीं सामान्य लक्षणें दिलीं आहेत. तसेंच आजार, विकार, किंवा रोग अथवा व्याधि या खरोखर जीवनशक्तीचें संरक्षककार्य चालू असतांना दिसणारीं बाह्य लक्षणें आहेत हेंहि सांगितलें आहेच. प्रत्येक मनुष्याची जीवनशक्ति, हीच त्याच्या संवर्धक व संरक्षक अशा सर्व क्रियाव्यापारांची **नियामक** मुख्य शक्ति असल्यामुळें, अशा संरक्षणकार्यांत म्हणजे रोगलक्षणें दिसत असतात तेव्हां, रोगग्रस्त मनुष्याच्या विशिष्ट प्रकृतीच्या **नियामक जीवनशक्तीला,** जी क्षीणता येत असते, ती नष्ट करून तिला सतेज व सामर्थ्यसंपन्न करितील आणि तिच्या संरक्षणकार्यांत तिला साहाय्य करितील अशींच औषधें अत्यंत युक्त होत. वर लिहिल्याप्रमाणें एकेका महाभूताच्या विशिष्ट शक्तीच्या जीवनशक्तिसंवर्धक, व्यापाक व प्रभावी गुणाच्या वनस्पतीपासून सं. चि. पद्धतीचीं औषधें बनविलेलीं असल्यामुळें, ज्या प्रकृतिवैशिष्ट्याचा मनुष्य असेल, त्या तत्त्वाचें औषध हें त्याचें **प्रकृतिनियामक** असतें व तें त्याच्या जीवनशक्तीला सामर्थ्यसंपन्न करीत असल्यामुळें, कोणताहि विकार असो, त्यांत तें गुणकारक असतें प्रकृतिधर्म ओळखणें व त्याला अनुसरून **प्रकृतिनियामक** औषधीयोजना करणें हें सं. चि. पद्धतीचें **वैशिष्ट्य** आहे. परंतु त्याच्याचबरोबर, इतर तत्त्वांच्या कार्यक्षेत्रांत व कार्येंद्रियांत अनेक वेळां बिघाड झालेला असतो,

त्या वेळीं किंवा प्रकृतीची नीट जाणीव होत नाहीं अशा वेळीं, ज्या कार्यक्षेत्रांत व कार्येंद्रियांत बिघाड झालेला आढळेल, त्याची सजातीय ( मग प्रकृति कोणत्याहि तत्त्वाची असो ) जीवनशक्तिवर्धक उपाययोजना करणें याला **स्थानिक** उपाययोजना म्हणतात. शरीर हें सर्व तत्त्वांचा योग्य समन्वय करून पंचात्मक व एकरूप मिश्रण असल्यानें एकाद्या तत्त्वाचें आधिक्य असलें व जीवनशक्ति तत्तत्त्वप्रधान असली तरी देखील, विकार होतो तेव्हां प्रकृतिविशिष्ट तत्त्वाप्रमाणें इतर तत्त्वांच्या घटनेंतहि एकाच वेळीं कमीजास्त प्रमाणांत बिघाड होत असतो. म्हणून **प्रकृतिनियामक** हें सर्वशक्तिमान म्हणून व **स्थानिक** हें त्याला पूरक म्हणून किंवा दुय्यम म्हणून, अशा दोन्ही उपायांची योजना एकाच वेळीं करावी लागते.

**स्थानिक उपाय**

१३२ **प्रथमनिष्पत्ति-नंबर १**—ही निष्पत्ति पृथ्वीतत्त्वविशिष्ट जीवनशक्तीच्या समान व सजातीय गुणधर्माची आहे. शुद्ध शीतप्रकृतीच्या मनुष्याचें शरीरसंवर्धन करणें व उत्सर्जनादि क्रियांनीं संरक्षण करून, त्यांना सुदृढ व बलवान् करणें आणि आरोग्याच्या सर्व क्रियाव्यापारांचें नियमन करणें, हें कार्य पृथ्वीतत्त्वविशिष्ट जीवनशक्तीच करीत असते. त्यामुळें ह्या औषधाच्या योगानें, **शीतप्रकृती**च्या मनुष्याच्या शरीरांत उत्पन्न झालेले सर्व आरोग्यविघातक दोष, शक्य तितक्या त्वरित व सहजरीतीनें नष्ट करून, पुन्हां आरोग्य प्राप्त करून देण्याला या निष्पत्तीचा उत्तम उपयोग होतो. त्याप्रमाणेंच **कोणत्याहि** मनुष्याची पृथ्वीतत्त्वविशिष्ट कार्यशक्ति, म्हणजे अन्नपचनादि रसक्रिया करणारी, वसाशुद्धीकरणाच्या योगानें, शरीराची जड घटना सुदृढ, शक्तिसंपन्न व कार्यक्षम ठेवणारी आणि पृथ्वीतत्त्वविशिष्ट विजातीय व शक्तिहीन आणि निरिंद्रिय व संहारशक्तियुक्त द्रव्यांचें उत्सर्जन करून, शरीर सुस्थितींत ठेवण्याचें कार्य करणारी जी शक्ति, तिला आपलीं नियुक्त कार्यें करण्याला सामर्थ्यसंपन्न करणारी ही निष्पत्ति आहे. दांत, लालापिंड, जठर, पक्वाशय, लहान आंतडीं, मोठीं आंतडीं हें मुख्य, आणि यकृत व पित्ताशय आणि प्लीहा व स्वादुपिंड हें पचनादि क्रियासाहाय्यक धर्मानें, पृथ्वीतत्त्वाचें कार्येंद्रिय आहे. त्यामुळें,

**प्रथम निष्पत्ति शीतप्रकृति-नियामक**

ह्यांच्या ठिकाणीं उत्पन्न झालेले दोष नष्ट करून त्यांची बिघडलेली स्थिति सुधारणें म्हणजे लाळ वगैरे सर्व दूषित झालेले पाचक रस उत्सर्जित करून, नवे, शुद्ध व पचनाला योग्य असे बनविणें, पचनेंद्रिय शक्तिमान करून पचनक्रिया योग्य व उत्तम रीतीनें होण्याला सहाय्य करणें, शरीरघटनेला योग्य असा शुद्ध व शक्तिपूर्ण वसारस तयार करून तो जलतत्त्वाच्या कार्येंद्रियांत पोंचविणें, शरीरांतील निःशक्त व दुर्बल झालेल्या वसाग्रंथी आणि वसावाहिन्या शक्तिपूर्ण करून शरीरांतील दुर्बल झालेल्या पृथ्वीतत्त्वविशिष्ट घटकांना सामर्थ्यसंपन्न करणें, आणि अनवश्यक, शक्तिहीन, व घटनाविघातक, जडघटकांचें योग्य मार्गानें उत्सर्जन करणें अशा प्रकारचीं घटनाकारक, घटनासंवर्धक व घटनासंरक्षक कार्यें करितां येण्याची, पृथ्वीतत्त्वविशिष्ट कार्यशक्तीची कर्तृत्वक्षमता वाढविणें, ह्या कामीं या प्रथमनिष्पत्तीचा उत्तम उपयोग होतो.

१३३ अस्थि, स्नायु वगैरे शरीराची सर्व जडघटना, पृथ्वीतत्त्वविशिष्ट घटकांनीं झालेली असते. त्यांचें संवर्धन, सुदृढता आणि कोणत्याहि कारणानें त्यांची स्वाभाविक स्थिति बिघडली असतां, ती पुन्हां सुधारणें हें कार्य पृथ्वीतत्त्वाच्याच कार्यशक्तीचें असल्याकारणानें ह्यासंबंधींच्या विकारामध्येंहि हीच **निष्पत्ति** अत्यंत **उपयुक्त** होते. अन्नमय पदार्थांतील शरीरपोषक रसरूप न पावलेले, पृथ्वीतत्त्वविशिष्ट असे पुष्कळसे उत्सर्जित व्हावयाचे असलेले; रसरूप पावलेले असून घटनेमध्यें एकीकृत न केले गेल्यामुळें उत्सर्जनीय झालेले जुने व जीर्ण असे जलतत्त्वविशिष्ट उत्सर्जनीय द्रव्यांत मिश्र होऊन मूत्रपिंडांमध्यें व त्यांच्या द्वारा मूत्राशयामध्यें उत्सर्जित होण्यासाठीं जावयाचे असलेले; त्याचप्रमाणें शरीरांतील निरनिराळ्या भागांमध्यें उत्सर्जनीय झालेले जडघटक, मल, मूत्र, पू, लस वगैरे रूपांनीं, पृथ्वीतत्त्वाच्या कार्यक्षेत्रांतून व पृथ्वीतत्त्वाच्याच कार्यशक्तीकडून उत्सर्जित व्हावयाचे असतात. त्या कामीं होणारा त्या कार्यशक्तीचा व्यय भरून काढण्याला आणि मलाशय, मूत्रपिंड, मूत्राशय, वसाग्रंथी व वसावाहिन्या यांना येणारें दौर्बल्य नाहींसें करून, त्यांची कार्यक्षमता वाढविण्याला ह्या निष्पत्तीचा उत्तम साहाय्यक उपयोग होतो.

**प्रथमनिष्पत्ति पृथ्वीतत्त्व-साहाय्यक**

१३४ पृथ्वीतत्त्व हें शरीरघटनेचें मुख्य साहित्यद्रव्य असल्यामुळें त्या तत्त्वाची कार्यशक्ति ही शरीरघटनेची मूलाधार शक्ति आहे. शरीर व इंद्रियांची घटना न ढासळणें हें सर्व आरोग्यरक्षक क्रियांचें मर्म आहे. घटनाकारक व संवर्धक रसक्रियांचा प्रारंभ, ह्या तत्त्वाच्या कार्यशक्तीपासून व्हावयाचा असतो. ह्या कारणांमुळें कोणत्याहि स्थितींत ही कार्यशक्ति सामर्थ्यवान् असणें अवश्य असतें. म्हणून ह्या निष्पत्तीचा मधून मधून उपयोग करीत असणें सर्वांनांच हितकर असतें. त्यांतल्या त्यांत एकाद्या सांथीचे वेळीं किंवा एकाद्या आजाराचा प्रादुर्भाव होत असलेला उमगतांच प्रकृतिवैशिष्ट्य व रोगनिदान ठरण्याच्याहि पूर्वी, ह्या निष्पत्तीचा उपयोग केल्यास शरीरधारणाशक्तीला रोगप्रतिकारक्षमता प्राप्त होते; तिचा कांटकपणा वाढतो आणि उत्पन्न होणाऱ्या रोगाची तीव्रता कमी होऊन, शिवाय त्याच्या तीव्रतेच्या मानानें रोग्याला दौर्बल्य न येऊं देण्याच्या कामीं फार उपयोग होतो. नित्योपयोगासाठीं २।३ दिवसांनीं जेवणापूर्वी किंवा नंतर २।३ गोळ्या घेत जावें आणि आजारीपणाची शंका उत्पन्न होतांच प्रारंभीं ४।५ प्रमाणें १।१ तासाच्या अंतरानें २।३ वेळां नुसत्या गोळ्या घेऊन वर भरपूर पाणी प्यावें व नंतर ह्या निष्पत्तीचेंच प्रथम विलयन करून ३।४ तासांच्या अंतरानें घेत जावें.

**प्रथमनिष्पत्ति मुख्य उपयोग**

१३५ **स्त्रियांना**— गरोदरपणीं कोणत्याहि प्रकृतीच्या स्त्रियांना, पिंडघटना सुदृढ व बलवान् करणें हें पृथ्वीतत्त्वाचें मुख्य कार्य आहे. त्यामुळें, प्रसूति होईपर्यंत होणाऱ्या कोणत्याहि विकारांत ह्या औषधाचा उत्तम उपयोग होतो. कळमळणें, वांति होणें, चक्कर येणें, अपचन, शौचास साफ न होणें, अस्वस्थपणा वगैरे विकार सौम्य असल्यास जेवणापूर्वी व नंतर २।२ गोळ्या घेण्यानें शमन होतात. हे विकार तीव्र असले तर दिवसांतून ४।५ वेळां २।२ गोळ्या व पिण्यास भरपूर पाणी दिल्यानें शमन पावतात. गरोदरपणीं विलयन रूपानें किंवा २।२ गोळ्या दररोज २।३ वेळां घेत गेल्यास गर्भाची वाढ उत्तम प्रकारें होऊन योग्य वेळीं कांहींहि त्रास न होतां अगदीं सुलभ रीतीनें प्रसूति होते. गरोदरपणीं केव्हांहि पोटांत दुखूं

**प्रथमनिष्पत्ति गरोदरपणांत**

लागलें तर ह्याच्या २।२ गोळ्या १०।१५ मिनिटांच्या अंतरानें ३।४ वेळां दिल्यानें थंडी, वारा, अजीर्ण इत्यादि कारणांनीं तें दुखत असल्यास, थांबून आराम वाटतो व अकालीं गर्भपात होण्याची भीति नष्ट होते. परंतु प्रसूति-संबंधानेंच दुखूं लागलें असलें, तर वेणा जोरानें येऊं लागतात व सुलभ प्रसूति होते. कित्येकदां पुरे दिवस भरलेले असूनहि सुरू झालेल्या वेणा व पोटांत दुखण्याचें थांबतें. अशा वेळीं वरीलप्रमाणें २।२ गोळ्या किंवा ८।१० गोळ्यांचे विलयनापैकीं थोडें थोडें औषध १०।१५ मिनिटांच्या अंतरानें देत राहून मध्यंतरीं भरपूर पाणी पिण्यास देत जावें म्हणजे पुन्हां जोरानें वेणा सुरू होऊन सुखप्रसूति होते. प्रसूतीनंतर हें औषध सुरू ठेविल्यास वायुगोळ्याचा वगैरे कसलाहि त्रास होत नाहीं व झाला तरी अगदीं अल्प प्रमाणांत होतो व थोड्याच वेळांत शमन पावतो. **धुपणी** ( पांढरी व तांबडी ) पुष्कळ स्त्रियांना हा विकार असतो. परंतु त्या बोलत नाहींत व उपचार केले जात नाहींत. अशक्तपणा वाढत जातो व चेहऱ्यावर फिकटपणा दिसूं लागतो. पांढऱ्या धुपणीस २।२ गोळ्या किंवा विलयन दिवसांतून ४।५ वेळां दिल्यानें ३।४ दिवसांत विकार मोडतो. जास्त दिवसांचा विकार असला तर औषध जास्त दिवस दिलें पाहिजे. धुपणी तांबडी असली तर ह्याचे जोडीस सुप्रभा १।१ गोळी द्यावी.

१३६ **लहान मुलें**—दूध पचत नाहीं, ओकून पडतें किंवा हगवण लागते, गचकन घशाशीं येतें; पोटाला फुगवटी येते; दांत येतांनाहि याप्रमाणेंच वांति व जुलाब होऊं लागतात, लव्वी पांढरी होते व खर पडते, मुलें आंग धरीत नाहींत. अशा विकारांचा प्रतिकार होऊन मुलें आरोग्य-संपन्न होण्यास ह्या औषधाची दिवसांतून २।३ वेळां १।१ किंवा विकाराच्या तीव्रतेच्या मानानें २।२ किंवा ३।३ गोळ्या देऊन वर पाणी पाजीत गेल्यानें हे विकार शमन होतात व मुलांची सुदृढपणानें उत्तम वाढ होऊं लागते. शिवाय पोटांत जंत किंवा कृमि वगैरे विकार होत नाहींत. जंत किंवा कृमि झाले असल्यास ४।५ दिवस दररोज ३।४ वेळां ह्या औषधाच्या व ज्योतिष्मतीच्या ८।८।१०।१० गोळ्या देत गेल्यानें जंत मरून कुजून पडतात.

**प्रथमानिष्पत्ति लहान मुलांस**

१३७ **कॉलरा**—पटकीचे जुलाब व वांति यांवर १०।१५ मिनिटांच्या अंतरानें ५।६ गोळ्या व भरपूर पाणी पिण्यास देण्यानें २।३ वेळां दिल्यानंतर जुलाब व वांति थांबतात. **क्वचित्** अतितीव्र विकारांत एवढ्यानें गुण न वाटल्यास २०।२५ पर्यंत सुद्धां गोळ्या द्याव्या लागतात. मागाहून ४।५ दिवस रोग्याला अन्न वगैरे न देतां अल्प व प्रवाही अन्नावर ठेवणें आवश्यक असतें. अजीर्णादिकांनीं होणाऱ्या वांतीवर हें अप्रतिम औषध आहे. नारू झाला असल्यास पोटांतून ह्या औषधाचें विलयन आणि बाह्यतः नारू झाला असेल त्या ठिकाणीं, १ तोळा पाण्यांत ३।४ गोळ्या या प्रमाणांत मिश्रण करून त्यानें भिजविलेली घडी ठेवावी व वारंवार ती बदलावी म्हणजे तो मरून कुजून जातो. याशिवाय अपचन, अग्निमांद्य, आमांश, अंतर्गल, आम्लपित्त, उचकी, कावीळ, रक्तपित्ताची वांति, क्षुधानाश, क्षुधाधिक्य, खरूज, खोकला, गंडमाळ, पोटशूळ, बद्धकोष्ठभोंवळ, न कळतां लघ्वी होणें, मूतखडा, वांति, संधिवात, अर्धांगवात, क्षय इत्यादि रोगांवर ह्याचा उत्तम उपयोग होतो.

**प्रथमनिष्पत्ति सामान्यतः उपयोग**

१३८ **द्वितीयनिष्पत्ति–नंबर २**–हें औषध जलतत्त्वाच्या मनुष्याच्या शरीरांतील सर्व क्रियाव्यापारांचें सूत्रचालकपणानें जलतत्त्वविशिष्ट जीवनशक्तिनियंत्रण करीत असल्यामुळें, तिला कार्यक्षम करण्याला या निष्पत्तीचा उत्तम उपयोग होतो. तसेंच कोणत्याहि मनुष्याची शरीरघटना, व संवर्धन आणि विजातीय द्रव्याच्या उत्सर्जनादि क्रियांनीं आरोग्यरक्षण ह्या सर्व क्रिया जलरूप रसक्रियांच्या योगानें जलतत्त्वविशिष्ट कार्यशक्तीकडून होत असल्यामुळें, तिला सामर्थ्यसंपन्न आणि कार्यक्षम करण्याला ह्या औषधाचा अप्रतिम उपयोग होतो. त्यामुळें उष्णप्रकृतीच्या मनुष्याला होणाऱ्या कोणत्याहि विकारांचें, आणि कोणाच्याहि शरीरांतील जलतत्त्वाच्या कार्यक्षेत्रांत व रसांत बिघडाबिघड झाल्यामुळें, उत्पन्न झालेल्या विकारांचें ह्या औषधानें निर्मूलन होतें. **रक्ताशय** हें जलतत्त्वाच्या कार्यशक्तीचें मुख्य कार्येंद्रिय व अशुद्धवाहिन्या हें कार्यक्षेत्र आहे. ह्याच कार्येंद्रियाच्या द्वारा तेजतत्त्वाच्या शुद्धरक्तरूप रसाचें शरीर-

**द्वितीयनिष्पत्ति उष्ण प्रकृति-नियामक**

भर अभिसरण व्हावयाचें असतें. आरोग्यसंपन्न आणि सुदृढ असें शरीरसंवर्धन होण्याला उपययुक्त होईल इतकें, शुद्धरक्त हें निर्दोष बनलेलें असावयास पाहिजे असतें. तसें तें बनविलें जाणें ही गोष्ट, रक्ताशयाकडून फुफ्फुसांमध्यें जाणाऱ्या अशुद्ध (रक्त) ह्या रसाच्या निर्दोषपणावर अवलंबून असते. अशुद्ध हा जलतत्त्वाचा रस असून त्यानें तो असा निर्दोष बनवून फुफ्फुसांमध्यें तेजतत्त्वाकडे पाठवावयाचा असतो. तो तसा बनविण्यासाठीं, पचनेंद्रियांमध्यें उत्तम व निर्दोष पाचकरस तयार करून पाठविणें आणि त्यांच्या योगानें तयार झालेला निर्दोष वसारस रक्ताशयामध्यें घेऊन त्याला अशुद्ध (रक्त)-रूप देणें; शरीरभर पसरलेल्या अशुद्धवाहिन्यांमध्यें, शुद्ध रक्तवाहिन्यांमधून येणाऱ्या अशुद्ध रक्तांतील, उत्सर्जनीयद्रव्यें वसावाहिन्यांमध्यें लोटून निर्दोष केलेलें अशुद्ध आपल्या कार्येंद्रियांत घेणें आणि तें फुफ्फुसांमध्यें पाठविणें हीं कार्यें मुख्यतः जलतत्त्वाच्या कार्यशक्तीला करावयाचीं असतात. म्हणून ही कार्यशक्ति पूर्ण सामर्थ्यसंपन्न असेल तरच तिला अशुद्ध (रक्त) हा रस पूर्णपणें निर्दोष बनवितां येणें शक्य आहे. ह्या कार्यशक्तीच्या दुर्बलतेमुळें प्रथम अशुद्धांमध्यें तेथून शुद्धरक्तामध्यें, त्यांतून ज्ञानतंतूंकडून शोषिल्या जाणाऱ्या ज्ञानरसामध्यें व सर्व घटनेमध्यें दूषितपणा राहात जातो; आणि त्यामुळें कोणत्याहि प्रकृतीच्या मनुष्याला, निरनिराळे रक्तदोषजन्य विकार उत्पन्न होत असतात. रक्ताशय हें कार्येंद्रिय दुर्बल व विकृत होतें आणि अशुद्धवाहिन्यादि विजातीय द्रव्यांचें पृथक्करण करून, तीं वसावाहिन्यांत लोटून देण्याला असमर्थ होतात. द्वितीय निष्पत्ति किंवा नंबर २ हें औषध जलतत्त्वाच्या कार्यशक्तीला संजीवित करून, रक्तदोषजन्य, नवे-जुने सर्व विकार निर्मूल करण्याला कार्यक्षम करूं शकतें.

**द्वितीयनिष्पत्ति जलतत्त्वसाह्यक**

१३९ सर्व शारीरिकक्रियाव्यापार मुख्यतः रक्ताभिसरणाच्या योगानें चालावयाचे असतात. त्यासाठीं अत्यंत सूक्ष्म अशा केशवाहिन्यांतून सुद्धां सहज रीतीनें अभिसरण पावेल इतका प्रवाहीपणा रक्तामध्यें असणें आवश्यक असतें. जलाची न्यूनता झाल्यानें तो तसा रहात नाहीं. त्यामुळें रक्ताभिसरण व्यवस्थित होत नाहीं; विजातीय द्रव्यांचें पृथक्करण नीटपणें केलें जात नाहीं; त्यामुळें रक्तांत दूषितपणा रहाण्याला व तो वाढत

जाण्याला कारण होतें. भागवत्यामुळें येणारा ताप, पडसें वगैरे विकारांना पाण्याचें न्यूनत्व हेंच कारण मुख्यतः घडत असतें. तापाच्या उष्णतेमुळें रक्तांतील जलद्रव्य शोषिलें जाऊन, रोग्याला शोष उत्पन्न होतो, आंगाचा दाह होतो, लघ्वी थोडी व आरक्त होते. अशा वेळीं व एरवींहि रक्ताचा प्रवाहीपणा उत्तम रहाण्यासाठीं भरपूर प्रमाणांत पाणी पिणें आवश्यक असतें. फक्त तें स्वच्छ,शुद्ध व ताजें असलें पाहिजे. पाणी प्याल्यानें रक्तांतील विजातीय द्रव्यांचें स्वाभाविक उत्सर्जन होऊं लागतें व थोडींफार अस्वाभाविक लक्षणें जाणवतात. यामुळें हा पाण्याचा बाधक परिणाम आहे, अशी भ्रामक समजूत झालेली आहे. पाणी कमी झाल्यामुळें रक्ताला घनत्व येऊन रक्ताशयावर अभिसरणाचा फाजील ताण पडतो आणि त्याचे निरनिराळे विकार उत्पन्न होतात; ते सर्व ह्या द्वितीय निष्पत्तीनें समूळ नष्ट होतात.

**द्वितीयनिष्पत्ति मुख्य उपयोग**

१४० शरीरामध्यें शुद्ध रक्ताचें अभिसरण होत असतां, निसर्गानुसार दोन प्रकारचीं कार्यें घडत असतात. पहिलें रसक्रियेचें कार्य—शुद्ध रक्ताचें अभिसरण होत असतांना, त्यामध्यें रासायनिकरीत्या एकरूप झालेला वायु आपल्या वैशिष्ट्याचा ज्ञानरस बनविण्याचें (परि० ६०) कार्य करीत असतो. रक्तवाहिन्यांच्या व केशवाहिन्यांच्या अग्रभागांतून ज्ञानतंतू तो शोषून घेतात, व आकाशतत्त्वाच्या मेंदु ह्या कार्येंद्रियाकडे तो पोंचवितात. दुसरें कार्य—अभिसरण होत असतां नवे शक्तिसंपन्न घटक घटनेमध्यें समाविष्ट करून, जुने, शक्तिहीन, जीर्ण आणि घटनेमध्यें प्रविष्ट होऊन संचित झालेले घटनाविघातक धर्मांचे विजातीय घटक, रक्तवाहिन्यांमध्यें उत्सर्जनासाठीं परत घेतले जात असतात. त्याप्रमाणेंच मेंदूतून उत्सर्जित झालेले, आणि आकाशतत्त्वाचें वैशिष्ट्य पावण्याला अपात्र, म्हणून ज्ञानतंतूंमध्यें संचित होणारे, उत्सर्जनीय ज्ञानरसरूप घटकसुद्धां शुद्धरक्तवाहिन्यांमध्यें परत सोडून दिले जात असतात व त्यांतून ते सर्व, अशुद्धवाहिन्यांमध्यें जात असतात, असा हा नित्याचा कार्यक्रम आहे. परंतु कित्येकदां विषमय, रोगजंतुमय किंवा प्रकृतिवैशिष्ट्यविघातक अशीं वायुसमान सूक्ष्म विजातीय द्रव्यें, खाद्य, पेय, हवा, संसर्ग इत्यादि कारणांनीं रक्तामध्यें शिरून शरीरामध्यें प्रसृत होतात. त्यांपैकीं कित्येक वायु व आकाश यांच्या समान

गुणधर्मांचीं असल्याकारणानें, ज्ञानरसरूपानें ज्ञानतंतूंमध्यें प्रविष्ट होतात आणि मेंदूमध्यें आकाशतत्त्वाच्या कार्यशक्तीपर्यंत जाऊन पोहोंचतात. परंतु त्यांच्या विजातीयत्वामुळें **जीवन**शक्तीकडून तीं परत ज्ञानतंतूंमध्यें, उत्सर्जित करण्या-साठीं सोडून दिलीं जातात. ज्ञानतंतूंकडून हा विजातीयद्रव्यरूप ज्ञानरस रक्तवाहिन्यांमध्यें परत सोडून दिला जाऊं लागतो. त्याप्रमाणेंच शरीरघटनेमध्यें प्रविष्ट झालेले असेच दोषरूप विजातीय घटकहि उत्सर्जनासाठीं परत रक्ता-मध्यें येत असतात. या कारणानें रक्तवाहिन्यांतील रक्तामध्यें विजातीय द्रव्यांची खेंचाखेंच होऊन त्याला घनत्व येतें. त्याचा स्वाभाविक प्रवाही-पणा बदलतो. अशुद्धवाहिन्यांमध्यें नित्याहून अधिक घनास्थितींत तें जाऊं शकत नाहीं. ज्ञानतंतू व शरीरघटना यांमधून रक्तामध्यें अधिकाधिक भर पड-तच असते. परंतु संचित झालेलीं द्रव्यें उत्सर्जनमार्गास ( अशुद्धवाहिन्यांत ) लागेपर्यंत, रक्तवाहिन्यांना नवीन भर घेतां येणें अशक्य असतें. त्यामुळें ज्ञान-तंतूंमध्यें विजातीय ज्ञानरस संचित होऊन राहतो व त्यांना आपलें स्वाभाविक कार्य करितां येत नाहींसें होतें. याचा परिणाम, जीवनशक्तीला शारीरिक क्रियाव्यापारांना चालना देण्याच्या कार्यांत अडथळा येणें हा होतो. अशी परिस्थिति उत्पन्न झाली म्हणजे जी शारीरिक व मानसिक दुरवस्था प्राप्त होते तिला **वात झाला** असें म्हणतात. सन्निपातासारखे दोषी व जोराचे ताप अशाच कारणानें उत्पन्न होतात आणि **वात** होण्यामध्यें त्याचें पर्यवसान होतें. रक्तामध्यें अधिकाधिक संचित होत जाणाऱ्या विजातीय द्रव्यांचें उत्सर्जन कर-ण्याच्या कार्याचा बोजा जलतत्त्वाच्या कार्यशक्तीवर पडलेला असतो. तिला तें कार्य करितां येण्याला, शक्तीचा आणि रक्ताला प्रवाहीपणा येण्यासाठीं पाण्याचा पुरवठा व्हावयास पाहिजे असतो. तो न झाल्यामुळें वात होण्याची दुरवस्था प्राप्त झालेली असते. अशा वेळीं पोटांत द्वितीय निष्पत्तीचें विलयन आणि पाणी ५।५ मिनिटांनीं देत राहिल्यानें, जलतत्त्वच्या कार्यशक्तीला कार्यक्षमता प्राप्त होऊन, बहुतेक बंद झालेल्या चलनवलनादि शारीरिकक्रिया सुरू हो-ऊन अवघ्या २।३ तासांच्या अवधींत रोगी चांगला शुद्धीवर येतो. हेम-गर्भाच्या मात्रेनेंहि वात न उतरलेले कित्येक रोगी ह्या औषधानें चांगले बरे झालेले आहेत .कोणत्याहि प्रकारच्या तापामध्यें दररोज २।३ वेळां तरी ही द्वितीयनिष्पत्ति पोटांत दिली असतां, व लागेल तितकें पाणी पिऊं दिलें

असतां, वात होण्याला कारणच राहूं शकत नाहीं. अशाच कारणानें म्हणजे रक्ताभिसरणाच्या सदोषतेमुळें उत्पन्न झालेल्या कोणत्याहि वातविकारामध्यें द्वितीय निष्पत्तीच अत्यंत उपयुक्त आहे.

१४१ ह्या निष्पत्तीनें कोणत्याहि प्रकृतीच्या मनुष्याचे, नवे किंवा जुने, रक्तदोषामुळें उत्पन्न झालेले सर्व विकार नष्ट होतात. अपस्मार, अतिस्थूलता, अर्धशिशी, मज्जातंतुशूल, अर्धांगादिवात, आंकडी, उन्मादवात, उसण, कपाळशूळ, कमर दुखणें, गुंगी किंवा सुस्ती येणें, दाहजन्यविकार, धांवरें, मादक पदार्थांचे दुष्परिणाम, मूळव्याधि, वेड, संधिवात, सर्दीचे व थंडीचे विकार, हत्तीरोग, गळूं, खरूज, इसबादि त्वग्रोग, कावीळ, रक्तस्राव, रक्ताची वांति, रक्तजमूर्च्छा रक्तसंकोचजन्यविकार, रक्तक्षय, जलोदर, नालगुद; ठेंचणें, मुरगळणें वगैरे कारणांनीं आलेली सूज; घसा दुखणें किंवा सुजणें इत्यादि सुजेचे इतर विकार; दमा; डांग्या खोकला, कांजिण्या, गोवर, देवी इत्यादि इतर सांथीचे सर्व विकार; कान फुटणें किंवा वाहणें; भाजणें, पोळणें;क्षयांचे विकार इत्यादि रक्त किंवा रक्ताभिसरण यांच्या दूषितपणामुळें होणाऱ्या विकारांवर ह्या निष्पत्तीचा उत्तम उपयोग होतो.

**द्वितीयनिष्पत्ति सामान्यउपयोग**

**आंकडी, अपस्मार, बेशुद्धपणा,** उन्हाळी झळ किंवा अतिउष्ण हवा अथवा अन्य कारणांनीं येणारी **मूर्छा,** चक्कर येऊन डोकें गरगरणें, भोंवळ येणें, **छातींत धडधडणें** यासारखे विकार होतांच ताबडतोब ह्या औषधाच्या ४।४ गोळ्या १०।१५ मिनिटांचे अंतरानें द्याव्या. ह्याचे जोडीस सुप्रभेच्या २।२ गोळ्या ३।४ वेळां द्याव्या. सुप्रभा विलयनाची घडी रक्ताशयावर वारंवार बदलून ठेवावी. कपाळ, टाळू, आंख, मानेच्या पोंढीपासून पाठीचा कणा, तळहात, तळपाय वगैरे मर्मस्थानांवर तेंच विलयन वरचेवर लावावें म्हणजे ताबडतोब मनुष्य शुद्धीवर येतो. **काळपुळी – चाळणपुळी** – हा रोग भयंकर व बहुधा असाध्य मानिला जातो. परंतु नं. २ व बाहेरून सुप्रभाविलयन यांचा उपयोग केल्यानें फारच त्वरित गुण येतो, असा अनेक वेळां अनुभव आलेला आहे. **पडसें** –हा विकार क्षुल्लक वाटतो पण पुष्कळदां तापाचें पूर्वलक्षण असतें. नं. २ व योगभाविनीचे प्रथम विलयन किंवा २।३, गोळ्या ४।५ वेळां तासातासानें घेतल्या व वर भरपूर पाणी

प्यालें तर, तत्काळ पडसें थांबतें व ताप वगैरे सहसा येत नाहीं. **झोंप न येणें**- निजण्यापूर्वी नं. २ च्या २।२ गोळ्या घ्याव्या. विकार जुना असला तर कदाचित् यानें झोंप न आल्यास डोक्यावर सौदामिनीच्या घड्या घालाव्या म्हणजे स्वस्थ झोंप लागेल. **खुपऱ्या, सारा,** व इतर **नेत्ररोग** — पोटांत व डोळे धुण्यास या औषधाचा उपयोग केल्यानें सर्व नेत्ररोग बरे होतात. डोळे धुण्यास १५ तोळे कोमट पाण्यांत ५।६ गोळ्या घालाव्या.

१४२ **तृतीयनिष्पत्ति –नंबर ३–पित्तप्रकृतिनियामक**––हें औषध तेजतत्त्वाच्या शक्तीनें संपन्न आहे. पित्तप्रकृतीच्या मनुष्याच्या शरीरांतील सर्व क्रियाव्यापारांचें तेजतत्त्वविशिष्ट जीवनशक्ति नियंत्रण करीत असते. तिला

**तृतीयनिष्पत्ति पित्तप्रकृति- नियामक**

आणि इतरांच्या शरीरांतील **तेजतत्त्व**विशिष्ट कार्यशक्तीला सामर्थ्यसंपन्न करण्याच्या कामीं ह्या निष्पत्तीचा उत्तम उपयोग होतो. यकृत व पित्ताशय हें जड तेजाचें आणि प्लीहा व स्वादुपिंड हें सूक्ष्म तेजाचें मुख्य कार्येंद्रिय आहे; त्याप्रमाणेंच रक्ताशय व फुफ्फुसें हीं साहाय्यक कार्यानुबद्ध इंद्रियें आहेत; रक्तवाहिन्या हें कार्यक्षेत्र आहे; आणि शुद्ध रक्त हा तेजतत्त्वाचा – पांचहि तत्त्वांच्या रासायनिक मिश्रस्थितीचा रस आहे. **शुद्धरक्त** ह्या रसाच्या निर्दोष स्थितीवर, मनुष्याचें आरोग्य, बऱ्याच अंशीं अवलंबून असतें. तो शुद्ध व जीवनशक्तिसंपन्न असा, सर्व शरीरभर पुरविला जाणें, ही गोष्ट कार्येंद्रियांच्या अविकृत स्थितीवर व कार्यक्षमतेवर अवलंबून असते. त्यांची अशी स्थिति व कार्यक्षमता, ही कार्यशक्तीच्या सामर्थ्यावर अवलंबून असते. पांचहि तत्त्वांचें, सर्वकाळ, प्रकृतिवैशिष्टयरक्षक-प्रमाणबद्ध, असें संपादन केलें जाणें बऱ्याच वेळां कठीण असल्याकारणानें, ह्या वैशिष्टयरक्षणाच्या कार्याचा भार तेजाच्या कार्यशक्तीवर व कार्येंद्रियांवर पडतो. हा भार अधिक पडला म्हणजे कार्यशक्तीला दौर्बल्य येऊन, कार्येंद्रियें विकृत होतात. त्यामुळें आरोग्यांत बिघाड उत्पन्न होतो. तृतीयनिष्पत्तीच्या सेवनानें तेजतत्त्वाच्या जीवनशक्तीला व कार्यशक्तीला आपलें काम करण्याचें सामर्थ्य प्राप्त होतें, व त्यायोगें, मुख्य व साहाय्यक कार्येंद्रियांचे विकार नष्ट होऊन, निर्दोष शुद्धरक्त तयार होऊं लागून, पुन्हां आरोग्य प्राप्त होतें. ह्या कार्यशक्तीच्या दुर्बलतेमुळें, मुख्यतः

यकृत व प्लीहा यांमध्यें बिघाड होऊन उत्पन्न होणाऱ्या विकारांत **तृतीय** निष्पत्तीबरोबर प्रकृतिनियामक निष्पत्तीचा उपयोग केल्यानें, विकारांचें त्वरित व उत्तम रीतीनें निर्मूलन होतें.

**तृतीयनिष्पत्ति मुख्य व सामान्य उपयोग.**

१४३ तापाचे जितके प्रकार व जाति आहेत त्या सर्वांचें ह्या निष्पत्तीनें निवारण होतें. तापावर ह्यासारखें दुसरें औषधच नाहीं. हिंवताप, मलेरिया ह्यासारख्या, विषारी हवेमुळें रक्तामध्यें ज्वरबीज दृढमूल होऊन बसलेल्या विकारांमध्यें, रक्ताच्या शुद्धीसाठीं **द्वितीय**निष्पत्ति आणि मेंदु व ज्ञानतंतूवर परिणाम घडला असेल तर **चतुर्थ**निष्पत्तीचाहि याचे जोडीस उपयोग करावा लागतो. याप्रमाणेंच विषम सन्निपात वगैरे मुदतीच्या व घातक तापांत, उत्सर्जनक्रिया योग्य रीतीनें चालण्यासाठीं **प्रथम**निष्पत्ति व वातादि विकार न होण्यासाठीं आणि झालेले असल्यास ते नष्ट करण्यासाठीं, **द्वितीय**निष्पत्ति किंवा दुसऱ्या योग्य त्या निष्पत्तीचा उपयोग करावा लागतो. **हाडीताप – जीर्णज्वर,** हा पुष्कळ स्त्रियांना असतो. हलके हलके तो वाढत जाऊन त्याचें क्षयामध्यें रूपांतर होतें. क्षीणता आलेली असेल त्यामानानें **तृतीय** व **प्रथम** निष्पत्तीचें द्वितीय किंवा तृतीय विलयन दररोज ५।६ वेळां देत गेल्यानें थोड्याच दिवसांत जीर्णज्वर नाहींसा होतो. हा ज्वर फार दिवसांचा असेल तर त्याचा रक्तावर वाईट परिणाम घडलेला असतो. त्यामुळें छातींत धडधडणें, चक्कर किंवा भोंवळ वाटणें व शक्तिपात होणें अशीं लक्षणें असल्यास द्वितीय निष्पत्तीच्या तृतीय विलयनाचा यांचे जोडीस उपयोग करावा लागतो. **लघ्वीचे दोष**–कडकपणा लाली, लघ्वी थोडीथोडी, थेंबथेंब, होणें, तिडीक मारणें, धातुस्थानीं कडकी, वगैरे विकार नं. ३ नें लवकर मोडतात. लहान मुलांना लघ्वीचे वेळीं तिडीक येते; त्यांना नं. ३ च्या व योगभाविनीच्या २।२ गोळ्या द्याव्या म्हणजे तात्काळ गुण येतो. याप्रमाणेंच यकृत व प्लीहा यांना होणारे सर्व विकार, मेह, उन्हाळे पित्तामुळें वांति किंवा जुलाब होणें, गांधी उठणें, कडकी, कावीळ, स्वप्नावस्था वगैरे, पित्ताच्या न्यूनाधिक्यतेमुळें होणारे सर्व विकार ह्या निष्पत्तीच्या योगानें नष्ट होतात. **स्त्रियांना गरोदरपणीं** उन्हाळें, लघ्वी अडणें, शौचास साफ न होणें अशा प्रकारचे विकार झाले

असतां ते ह्या औषधानें दूर होतात. दूषित हवेच्या ठिकाणीं व तापसरीच्या हंगामामध्यें ह्या निष्पत्तीचा प्रतिबंधक उपयोग सुद्धां होतो.

१४४ **तृतीय ब निष्पत्ति-नं. ३ ब**–ही निष्पत्ति तृतीय निष्पत्तीची साहाय्यकारिणी आहे. हिचा उपयोग मुख्यतः बाह्यतः करावयाचा असतो.

**तृतीयबनिष्पत्ति तृतीयनिष्पत्तीची साहाय्यकारिणी**

ह्या निष्पत्तीच्या ३।४ गोळ्या पंधरा ते २० तोळे स्वच्छ पाण्यांत विरघळल्यानंतर, त्यांत दुसऱ्या फडक्याच्या घड्या भिजवून त्या यकृत व प्लीहा यांवर ठेविल्या असतां, तेजाच्या कार्यशक्तीनें, रक्तांतून शोधन करून काढिलेलें विजातीय द्रव्य शोधन करून घेऊन तें उत्सर्जन मार्गास लावण्यास, त्यांना मदत होते. तापामध्यें याचा तात्काळ अनुभव येतो. एक दिवसपर्यंत तृतीय निष्पत्तीच्या सेवनानंतर दुसरे दिवशीं किंवा पुन्हां ताप पुरा भरल्यानंतर वरीलप्रमाणें घड्या ठेवतांच १० मिनिटांच्या अवकाशांत आंगाची उष्णता कमी होऊं लागते. घड्या ठेवणारानें रोग्याजवळ बसून, त्या तापतांच काढून दुसरीकडे पिळून घ्याव्या व पुन्हां त्या औषधानें भिजवून ठेवाव्या. ह्याप्रमाणें त्या तापण्याची क्रिया कमी होईपर्यंत बदलीत असावें. ५ मिनिटांहून जास्त वेळ किंवा ती सुकेपर्यंत ठेऊं नये. ४।५ घड्या ठेविल्यानंतर त्या तापेनातशा होतात व तापहि सुमारें २ अंश तरी कमी होतो. पुन्हां ताप भरेल त्या वेळींहि तो पुरा भरल्यानंतर पुन्हां याप्रमाणेंच करावें. यकृत किंवा प्लीहा यांच्या इतर विकारांतहि, तृतीय-निष्पत्ति पोटांत सुरू असतां याप्रमाणें सायंकाळीं घड्या ठेवीत गेल्यास, गुण लवकर येतो. झोंप येत नसेल किंवा डोकें त्रासलें असेल, तर निजतांना मस्तकावर याची घडी घालावी म्हणजे झोंप चांगली लागेल. ( यकृत व प्लीहा आणि मस्तक यांवर एकाच वेळीं मात्र ठेऊं नयेत. ) घड्या ठेवावयाच्या त्या यकृत व प्लीहा या दोहोंवरहि ठेवाव्या. यकृत किंवा प्लीहा यांपैकीं एकावरच ठेविल्यास दोषाचें स्थानांतर होऊन दुसऱ्याची स्थिति बिघडेल व त्याला विकृतपणा येईल. मलेरियासारख्या हट्टी किंवा विषमासारख्या तापामध्यें जरूर वाटल्यास एकादे वेळीं ही निष्पत्ति पोटांत देण्यास हरकत नाहीं. जडान्नसेवन झालें असल्यास ह्याच्या ३।४ गोळ्या पोटांत घेतल्यानें पचन चांगलें होतें. ब्लडप्रेशरच्या रोग्यांनां ह्या औषधाच्या विलयनाच्या घड्या

मस्तकावर घालण्याचा फारच उत्तम उपयोग होतो असा अनुभव आलेला आहे.

१४५. **चतुर्थनिष्पत्ति–नंबर ४-वातप्रकृतिनियामक**-वातप्रकृतीच्या मनुष्याची जीवनशक्ति सूक्ष्मतेजसंपन्न वायुतत्त्वाची असते. **चतुर्थ** निष्पत्ति हें औषध, त्याच शक्तिवैशिष्ट्याचें असल्याकारणानें तिला आणि इतर कोणाहि मनुष्याच्या प्रकृतीमधील वायुतत्त्वाच्या कार्यशक्तीला सामर्थ्यपूर्ण करणारी आहे. फुप्फुसें व शरीरभर पसरलेल्या सहानुभव ज्ञानतंतूंच्या द्वारा, शुद्ध रक्तांतील ज्ञानरस शतदलांमध्यें जेथें संग्रहित होत असतो तें ह्या जीवनशक्तीचें व कार्यशक्तीचें मुख्य कार्येंद्रिय असून प्लीहा हें साहाय्यक इंद्रिय आहे व सहानुभव ज्ञानतंतू व फुप्फुसें हें कार्यक्षेत्र आहे. ऋतुमान आणि वातावरणांतील फेरफार, ह्या कारणांमुळें, ह्या शक्तीला आरोग्यरक्षणाच्या कामीं अनियमित ताण पडून दौर्बल्य येत असतें; तें घालवून तिला सामर्थ्यवान् करण्याला ह्या निष्पत्तीचा उत्तम उपयोग होतो.

**चतुर्थ निष्पत्ति-वातप्रकृति-नियामक**

१४६ वायुतत्त्वाच्या ह्या कार्यशक्तीकडून आकाशतत्त्वाच्या धर्मांचा मूळ जीवनशक्तीच्या वैशिष्ट्याचा रस तयार होऊन मेंदूमध्यें जीवनशक्तीकडे जावयाचा असतो. परंतु ह्या वायुतत्त्वाच्या कार्यशक्तीमध्यें कोणत्याहि कारणानें दुर्बलपणा आल्यास तो जरूर तितक्या प्रमाणांत व निर्दोष स्थितींत जाऊं शकत नाहीं. यामुळें मेंदूचे व ज्ञानतंतूंचे निरनिराळे विकार उत्पन्न होतात. प्लीहा व फुप्फुसें, कमकुवत व विकृत होतात; त्यामुळें कांति व ओज नष्ट होऊन प्लीहापिंडाची वृद्धि किंवा आकुंचन होतें. फुप्फुसांची शक्ति कमी होऊन, दम, श्वास वगैरे विकार उत्पन्न होतात. चतुर्थनिष्पत्तीच्या योगानें ही कार्यशक्ति सामर्थ्ययुक्त होऊन सर्व विकार नष्ट होतात. वातप्रकृतीच्या माणसांच्या आंगची दुर्बलता ह्या औषधानें नाहींशी होते. मेंदूचे सर्व प्रकारचे विकार, मनोदौर्बल्य, अपस्मार, फेंफरें, मज्जातंतूंचे विकार, कंप, वेड, अप्रबुद्धपणा, निद्रानाश, मस्तकशूल, डोकें कलकलणें, शोष, बद्धकोष्ठ, तापांतील बडबड, कारणपरत्वें उत्पन्न

**चतुर्थनिष्पत्ति मुख्य व सामान्य उपयोग**

झालेलें नपुंसकत्व, नायटे, इसब, श्वेतकुष्ठ, मानसिक त्रासाचीं कामें करणाऱ्या लोकांना उत्पन्न झालेला थकवा व निरुत्साहीपणा यांवर ह्या निष्पत्तीचा उत्तम उपयोग होतो. ह्या औषधामध्यें दंशजन्यविषनाशक धर्महि आहे.

१४७. **पंचमनिष्पत्ति—नंबर ५**—मिश्र प्रकृतिधर्मांच्या माणसांची जीवनशक्ति सामर्थ्यवान् करण्याला हिचा फार उपयोग होतो. ज्या वेळीं एकाद्या मनुष्याचें प्रकृतिवैशिष्ट्य ओळखितां येत नाहीं, तेव्हां या निष्पत्तीचा उपयोग सुरुवातीला केला असतां, त्याची जीवनशक्ति सतेज होत जाते. त्यामुळें त्याचीं प्रकृतिवैशिष्ट्यदर्शक लक्षणें व्यक्त होऊं लागतात. आणि प्रकृतीचें निदान करणें सुलभ होतें. मागील चारहि निष्पत्तींमध्यें असलेले गुण हिच्या ठिकाणीं सौम्यपणांत आहेत. फक्त तृतीय निष्पत्तीचा ज्वरनाशक गुण मात्र हिच्या आंगीं नाहीं. प्रथम व द्वितीय निष्पत्तीचा बहुतेक मुख्य गुण हिच्या आंगीं असल्यामुळें, त्यांच्या आभावीं हिचा उपयोग करितां येतो. चतुर्थनिष्पत्तीचेहि कांहीं गुण हिच्या ठिकाणीं आहेत. त्यामुळें मज्जातंतू, फुफ्फुसें यांच्या दाहजन्यविकारांत हिचा उपयोग करणें फायदेशीर होतें. आंकडी, फेंफरें, आमांश, धुपणी या विकारांत प्रथमनिष्पत्तीचें जोडीनें दिल्यास गुण फार त्वरित येतो. इन्फ्लूएंझाच्या तापांत किंवा मलेरियाच्या तापांत तृतीयनिष्पत्तीबरोबर दिवसांतून ३।४ वेळांहि दिल्यानें रोग्याची हुषारी वाढते.

**पंचमनिष्पत्ति गुणधर्म व उपयोग**

१४८ **षष्ठनिष्पत्ति–नंबर ६**— ही निष्पत्ति प्रकृतिनियाक निष्पत्तींना साहाय्यक आहे. फुफ्फुसें, वीर्यस्थान व मेंदु या ठिकाणीं किंवा यांपैकीं एकाद्या ठिकाणीं विकार होऊन, त्याचा दुसऱ्या ठिकाणीं परिणाम घडून रोग उत्पन्न होतो. त्या वेळीं प्रकृतिनियामक औषधाचा त्वरित गुण येण्याला, ह्या निष्पत्तीचें फार साहाय्य होतें. ह्या औषधानें **कफ** पातळ होऊन भराभर सुटूं लागतो व त्रासदायक खोकला नाहींसा होतो. लहान मुलांना कफविकार होण्याची भीति असते. त्यांना ४।२ दिवशीं हें देत गेल्यास ती भीति रहात नाहीं. याचे जोडीस मुलांना द्वितीयनिष्पत्ति व योगभाविनी देत गेल्यास **डबा** वगैरे विकार होत नाहींत. श्वास, कास,

**षष्ठनिष्पत्ति गुणधर्म व उपयोग**

दमा, खोकला, कफ, कफक्षय, फुफ्फुसदाह, फुफ्फुसांत व्रण होणें वगैरे फुफ्फुसविकार, लघ्वीचा कडकपणा, वीर्य पातळ होणें, स्वप्नावस्था, लघ्वींतून धातु जाणें, शुक्रस्रावामुळें अशक्तता, कटिशूळ इत्यादि विकार या निष्पत्तीनें बरे होतात.

१४९ **सप्तम निष्पत्ति—नंबर ७**—ही निष्पत्तीहि साहाय्यकारिणीच आहे. तात्कालिक किंवा जुने मुरलेले अथवा आनुवंशिक रीतीनें शरीर घटनेमध्यें भिनून राहिलेले, उपदंश ( गरमी ) किंवा त्याच्याच सारखे, परमा वगैरे विषजन्य विकार ह्या औषधानें थोडयाच दिवसांत साफ नाहींसे होतात. रक्तांतील जुनाट दोष नाहींसे करून, रक्तशुद्धि करणें हा हिचा मुख्य धर्म आहे. रोग्याचे प्रकृतिनियामक औषधाबरोबर हें आळीपाळीनें किंवा मिश्रपणानें द्यावयाचें असतें. पारा वगैरेंच्या औषधांनीं मनुष्याला दुसरे कांहीं तरी विकार जडतात. तसा ह्या औषधाचा कांहींहि दुष्परिणाम घडत नाहीं. ज्याच्या आंगामध्यें हा उपदंश विकार मुरून राहिलेला असतो, त्याला इतर कोणत्याहि आजारांत, औषधाचा यावा तसा गुण येत नाहीं. अशा वेळीं त्याच्या जोडीस हें औषध दिवसांतून १।२ वेळां दिल्यानें त्वरित गुण येऊं लागतो. लवकर बरी न होणारी व त्रासदायक खरूज, कंडुरोग, गळवें, खांडकें, गजकर्ण, इसब या विकारांतहि मधून मधून हिचा उपयोग करणें हितावह होतें.

**सप्तमनिष्पत्ति गुणधर्म व उपयोग**

१५० **विषहारिणी— नंबर ८**— चतुर्थनिष्पत्ति व सौदामिनीविद्युत् ह्यांच्यामध्यें दंशजन्य विषाचा प्रसार न होऊं देण्याचा धर्म आहे. परंतु ह्या निष्पत्तीच्या आंगीं दंशापासून होणाऱ्या प्राणघातक परिणामापासून, त्वरित मुक्तता करण्याचा विशेष गुण आहे. सर्प, कांडर, घोणस, फुरसें यांसारख्या विषारी प्राण्यांच्या दंशामुळें असह्य वेदना होऊं लागतात. दंश झालेल्या रोग्याला, १५।२० तोळे पाण्यात १५।२० गोळ्या घालून—विरघळवून—त्या पाण्यानें भिजविलेली स्वच्छ फडक्याची दुहेरी किंवा चव्हेरी घडी चिबाचिबीत अशी दंशाच्या जागीं ठेवावी. ५।५ मिनिटांनीं ती बदलित जावें. पोटांतहि ह्यापैकीं तोळातोळा औषध ( तयार केलेलें पाणी ) ५।१०

**विषहारिणी गुण धर्म व उपयोग**

मिनिटांच्या अंतरानें ५।६ वेळां द्यावें व वर पिण्यास पाणीहि भरपूर द्यावें. याचप्रमाणें मस्तकावर व पाठीच्या कण्यावर सुद्धां, ह्या औषधाच्या विलयनामध्यें भिजविलेल्या घड्या, लक्षणें शमन होईपर्यंत ठेवीत असावें. लक्षणें शमन पावल्या-नंतर २।३ वेळां तासातासानें व पुढें २।२, ४।४ तासांच्या अवकाशानें पोटांतून व बाहेरून, विषाचीं लक्षणें पूर्णपणें शमन पावतेतोंपर्यंत उपयोग करीत असावें. विंचू, कोळी, भुईकोळी, मधमाशी, गांधीलमाशी यांच्या दंशावरहि याचा उपयोग होतो. कित्येकदां विषारावरील प्रचलित असलेल्या औधांनीं प्राणघात टळला तरी त्या विषाराचा किंवा औधाचा परिणाम त्रास-दायक होतो. तसेंच कित्येकदां मंत्रोपचारानेंहि प्राणघात टळला तरी अंगांत विष मुरून रहातें व त्यामुळें पुढें कित्येक व्याधि उत्पन्न होतात. त्याहि या औषधाच्या विलयनानें १०।१५ दिवसांत निःशेष नाहींशा होतात. या औषधाचा मांजर, पाल वगैरे प्राण्यांच्या विषावरहि उपयोग होतो. हें औषध स्वाभाविक विषरूप नसल्यामुळें एकाद्यानें चुकून पोटांत घेतलें तरी कांहींहि दुष्परिणाम होत नाहीं. पोटशूल, मस्तकशूल किंवा दुसऱ्या असह्य विकाराचें वेळीं या औषधाच्या गोळया किंवा विलयन दिलें असतां त्या वेदना सहन करण्याइतक्या सौम्य होतात. नंतर योग्य त्या निष्पत्तीचा उपयोग केल्यानें रोग्याला आराम वाटून हुषारी येते.

**प्राणशक्ति व विद्युत्**

१५१ शरीराची घटना करून, त्याचे पोषण, वाढ व संरक्षण करण्याचें कार्य जीवनशक्ति ही पंचमहाभूतात्मक पांच कार्यशक्तीकडून करून घेत असते. प्रत्येक कार्यशक्तीचें काम, सूक्ष्म रसक्रिया योग्य प्रकारें चालू ठेवणें, रसांचें शुद्धत्व राखणें, व त्यासाठीं खालच्या तत्त्वांच्या कार्यक्षेत्रांत विजातीय द्रव्यांचें उत्सर्जन करून संरक्षणकार्य व संवर्धनकार्य अखंड चालू ठेवणें हें आहे. त्यांच्या ह्या कार्याला, त्या त्या तत्त्वाच्या प्राणानें साहाय्य करावयाचें असतें. **कार्यशक्तींची** कर्तृत्वक्षमता व रसक्रियांचा सुव्यवस्थितपणा, ज्याप्रमाणें खाद्यपेयविशिष्ट जीवनशक्तियुक्त अन्नरसावर अवलंबून असतो, त्याप्रमाणेंच पंचप्राणांची कर्तृत्वक्षमता, श्वसनानें प्राप्त होणाऱ्या वातावरणांतील वायूच्या स्थितीवर अवलंबून असते. विजातीय द्रव्याची हकालपट्टी करण्याचा भार एकाद्या प्राणाच्या स्वाभाविक शक्तीपेक्षां अधिक झाला तर शक्तीच्या कमीपणामुळें

त्या तत्त्वाच्या कार्यक्षेत्रांतील विजातीय द्रव्य पूर्णपणें उत्सर्जनमार्गास न लागतां शिल्लक राहतें. त्यामुळें कार्यशक्ति सामर्थ्यसंपन्न असली तरी तिचें उत्सर्जनकार्य लंगडें पडतें; शारिरीक क्रिया सुरळीतपणें चालू राहण्यास अडथळा उत्पन्न होतो; व तो नाहीसा होईपर्यंत दाहशूलादि यातना सोसण्याचा प्रसंग येतो. कित्येकदां तर त्या अगदीं असह्यहि होऊं लागतात. ह्या कारणासाठीं कार्यशक्तीप्रमाणेंच, प्राणशक्तींनाहीं, कोणत्याहि विकाराच्या वेळीं सामर्थ्य प्राप्त होणें आवश्यक असतें. म्हणून आकाशादि प्रत्येक तत्त्वाच्या प्राणशक्तिपूर्ण वनस्पतींपासून, व्यानादि प्रत्येक प्राणाला सामर्थ्य-संपन्नता देणारें एकेक अशीं पांच निरनिराळीं औषधें तयार केलेलीं आहेत. आकाशापासून पृथ्वीतत्त्वापर्यंत गतिरूप शक्तीनें खालच्या तत्त्वाकडे विजातीय द्रव्य लोटीत जाणें हें कार्य प्राणशक्तींनीं करावयाचें असतें. एकाद्या प्रवाहक साधनाच्या आधारानें, देवाणघेवाण स्वरूपानें वाहणाऱ्या गतिरूप शक्तीला **विद्युत्** असें म्हणण्यांत येतें. प्राणशक्ति ह्याहि आकाशतत्त्वापासून पृथ्वीतत्त्वापर्यंत **विद्युत्** प्रमाणेंच देवघेवीच्या स्वरूपानें गति पावत असतात म्हणून त्यांना सामर्थ्यवान् करणाऱ्या औषधांनाहि **विद्युत्** हें अन्वर्थक नांव दिलेलें आहे.

**धन व ऋण विद्युत्**

१५२ ग्राहकशक्तियुक्त साधनाशिवाय एकाद्या पदार्थांमधील शक्ति गतिमान् होऊं शकत नाहीं. गतिमान् शक्तींना **धनशक्ति** आणि तिच्या ग्राहक शक्तींना **ऋणशक्ति** असें म्हणतात. शक्तियुक्त पदार्थांमधील विद्युत्प्रवाह अल्पशक्तिकाकडे जात असतो. त्यामुळें शक्त्याधिक पदार्थ **धनशक्ति**-प्रधान आणि अल्पशक्तिक हा **ऋणशक्ति**प्रधान असतो. ह्या नियमानुसार प्राणशक्तिप्रवाह आकाशतत्त्वापासून पृथ्वीकडे जात असल्यामुळें, आकाशाचा व्यान हा प्राण धनप्रधान आणि पृथ्वीचा अपान हा प्राण ऋणप्रधान होतो. हा गतिप्रवाह सूक्ष्मधर्मीय तत्त्वांमधून क्रमानें जडवर्गीय तत्त्वाकडे जात असतो. सूक्ष्म तत्त्वांतील वायु हें तत्त्व *आकाशाहून एका कलेनें, अल्पशक्तिक असल्यामुळें प्रवाहग्राहक धर्मानें ऋण-

| * | आकाश | वायु | तेज | जल | पृथ्वी | |
|---|---|---|---|---|---|---|
| जीवनशक्ति | ५ | ४ | ३ | २ | १ | कला-प्रमाण |
| संहारशक्ति | १ | २ | ३ | १ | ५ | |

प्रधान होतें. म्हणून वायुतत्त्वाचा प्राण हा ऋणप्रधान होतो. त्याप्रमाणेंच जल हें पृथ्वीपेक्षां एका कलेनें शक्त्यधिक असल्यामुळें व पृथ्वीतत्त्वाचा प्राण ऋणप्रधान असल्यामुळें, जलतत्त्वाचा समान हा प्राण **धन**प्रधान होतो. तेज हें दोन्ही वर्गातील तत्त्वांचें मध्यस्थ तत्त्व असल्याकारणानें समानधर्मी म्हणजे समभावी किंवा योगवाहि विद्युत्प्रधान आहे. तें गतिप्रवाहाला साहाय्यक होत असतें. ऋणशक्ति ही धनशक्तींचा ग्रास करूं लागल्यानें गतिप्रवाह उत्पन्न होतो;तो दोन्ही समबल होऊन साम्यस्थिति येईपर्यंतच असतो. प्राणशक्ति वैशिष्ट्यांची जीं पांच औषधें आहेत, त्यांच्या ठिकाणीं हेंच **विद्युत्** शक्तिधर्म आहेत. त्यामुळें जीविताक्रियाव्यापारांमध्यें उत्पन्न झालेली, भिन्न कार्यशक्तींमधील विषमता नष्ट करून, शक्तिसाम्य उत्पन्न करण्याला त्यांचा उत्तम उपयोग होतो. ज्या तत्त्वाची प्राणशक्ति दुर्बल झाली असेल, त्या तत्त्वाच्या विद्युत्‌चाच उपयोग करावयाचा असतो. शक्तींचें जें कलात्मक प्रमाण आहे, त्याप्रमाणें पाहिलें तर दुर्बल शक्तीच्या विरोधी शक्तींचें, संहारशक्तिकलात्मक प्रमाण, शरीरामध्यें किंवा एकाद्या विवक्षित ठिकाणीं वाढलेलें असतें. त्या वाढलेल्या शक्तीच्या विरुद्ध साम्योत्पादनासाठीं दुर्बल झालेल्या शक्तिविशिष्ट शक्तीच्या औषधाचाच उपयोग करावयाचा असतो. उदाहरणार्थ आकाशाचें जीवनकला ५+संहारकला १ असें कलात्मक प्रमाण आहे; तें ४+२ असें झालें म्हणजे व्यानशक्ति दुर्बल होते. अशा रीतीनें जीवनशक्तीचें दौर्बल्य आणि संहारशक्तीचें प्राबल्य वाढल्यामुळें प्राणशक्तीचें उत्सर्जक गतिकार्य अडलें जाऊन अस्वास्थ्यकारक स्थिति उत्पन्न झालेली असते. यासाठीं अडलेला शक्तिप्रवाह, शक्तिसंवर्धनानें त्वरित सुरू करण्यासाठीं, ह्या औषधांचा मुख्यत्वेंकरून बाह्यतः उपयोग करावयाचा असतो.

१५३ **चपला + धनविद्युत्**--आकाशतत्त्वाची व्यान ही प्राणशक्ति गतिप्रवाहानें शरीरांत उष्णता उत्पन्न करिते. ह्याच्या उलट पृथ्वीतत्त्वाची अपान ही प्राणशक्ति उष्णतेचा ग्रास करून शीतपणा उत्पन्न करीते. ह्या परस्परविरुद्ध शक्तिधर्मांनें, शरीराची उष्णता विशिष्ट समप्रमाणामध्यें राहते. चपलेच्या आंगीं आकाशाच्या धर्माप्रमाणें विरलता उत्पन्न करणें व शक्तिप्रवाहानें उष्णता उत्पन्न करणें हे गुण

**व्यानप्राणशक्ति विशिष्ट चपला विद्युत्**

आहेत. त्यामुळें रसक्रिया व प्राणक्रिया यांच्या प्रवाहगतीचा मार्ग मोकळा करून देण्याला, पृथ्वीतत्त्वविशिष्ट व संहारशक्तियुक्त द्रव्यांच्या ग्रासकतेमुळें उत्पन्न झालेला जडपणा व शीतपणा नष्ट करण्याला आणि संहारशक्तीच्या आधिक्यामुळें, दुर्बल झालेल्या शरीरघटकांना, शक्तियुक्ततेनें पुन्हां घटनोपयोगी होण्याला, ह्या चपलाविद्युत्‌चा फार उपयोग होतो. शरीराच्या एकाद्या भागामध्यें रक्ताभिसरणाचा निरोध व त्यामुळें विजातीय द्रव्यांचा संचय किंवा रक्तादि रसांचा संचय किंवा संकोच होऊन, एकादा भाग किंवा अवयव जाड किंवा सुजमट होतो.अशा वेळीं त्या ठिकाणीं ह्या विद्युत्‌चा उपयोग केला असतां अभिसरणक्रिया योग्य प्रकारें सुरू होऊन, झालेली अनिष्ट स्थिति नष्ट होते.

**चपला उपयोग**

१५४ वसाग्रंथी सुजणें किंवा वाढणें, गालगुंडें, लालापिंड सुजणें, गळूं किंवा उठाणूं, धांवरें यांचा उपक्रम दिसतांच त्यांवर ही विद्युत् लाविली असतां, तेथील बिघडलेलें बहुतेक रक्त व वसा शुद्ध होऊन, त्यांचा आंवर कमी होतो, व रक्त फांकून जाते. अगदींच बिघडलेलें व टाकाऊ झालेलें अशुद्धरक्त, वसा वगैरे विजातीय द्रव्य असेल तर तेवढ्याचाच पू किंवा लस तयार होऊन विभेदक क्रियेनें त्याचें उत्सर्जन होतें. ठेंचल्यामुळें लचकल्यामुळें, मुरगळल्यामुळें किंवा अन्य कारणानें सुजलेल्या भागावर ही लाविली असतां तेथील दूषित रक्त शुद्ध होऊन फांकून जातें व सूज नाहींशी होते. सांधे सुजणें किंवा धरणें, संधिवात, उसण भरणें, यांवरहि असाच उपयोग होतो. तसेंच घट्टा, पेरें, हिंगुरडें, भोंवरी, वाळूक, टेंगूळ, चामखीळ, हत्तीरोग हे विकार सुद्धां ह्या विद्युत्‌नें साफ नाहींसे होतात; परंतु औषधाचा उपयोग बरेच दिवस करावा लागतो. डोळ्यांत फूल, वडस वगैरे विकारांत ( डोळ्यांत लाली नसतां ) व खुपऱ्या झाल्या असतां, खालची व वरची पापणी, आंख व भिंवया यांवर ही विद्युत् दिवसांतून ५।६ वेळां लावावी म्हणजे हे विकार नष्ट होतील. ही विद्युत् लावीत असतां, दिवसांतून एकदां तरी, ती साफ सुकल्यानंतर त्याच ठिकाणीं ज्योतिष्मति लावावी. शरीरव्यापी असें अर्धांगवातासारखे विकार, संधिवात, रक्ताभिसरणाची गति मंद होऊन, त्यामुळें

आंगांत जडपणा वाढणें, सुस्ती येणें, अंगाला किंवा अवयवांना शुद्धि नाहीं-शी होणें, झांपड येणें, स्नायूंची आकुंचनप्रसरण पावण्याची शक्ति नष्ट होणें, मेद किंवा चरबी वाढणें ह्या विकारांत ह्या विद्युत्चा बाह्योपयोग उत्तम गुणकारक ठरलेला आहे. सर्व शरीराला असा उपयोग करितां येणें कठीण असतें, परंतु मुख्यतः मानेची पोंढी, माकडहाडापर्यंत पाठीचा सर्व कणा यांवर ५।५ मिनिटांनीं दुहेरी फडक्याच्या घड्या भिजवून ५।६ वेळां बदलून ठेविल्यानें कार्यभाग होतो. दिवसांतून २।३ वेळां असा उपयोग केला पाहिजे. सर्व शरीरांत शक्तिप्रवाह पोंचविण्याचीं, ज्ञानतंतूंचीं केंद्रें पाठीच्या, कण्यामध्यें असतात. म्हणून कण्यावर ही विद्युत् लावणें किंवा तिच्या घड्या ठेवणें, वरील कोणत्याहि विकारांत उपयुक्त असतें. जुनाट विकारामध्यें हा उपाय बरेच दिवस करावा लागतो. अशा प्रकारच्या विकारांमध्यें ह्या औषधाच्या गोळ्या पोटांतहि घेण्याचा त्वरित गुण येण्याला उपयोग होतो. गोळ्या पोटांत घेतल्यानंतर सुमारें अर्ध्यातासापर्यंत तरी पाणी किंवा गोळ्या घेऊन लगेच पाणी प्याल्यानें खडी होण्याचा संभव असतो. म्हणुन पोटांत घेणें त्या सुक्या गोळ्याच घ्यावा. **ऋतुपालटाच्या**, थंडी वाऱ्याच्या, आणि हवा दूषित होऊन, टायफॉइड, प्लेग वगैरे सारख्या सांथीच्या विकारांच्या उद्भव होतो त्या वेळीं प्रत्येक वेळीं ३।४ प्रमाणें दिवसांतून २।३ वेळां ह्याच्या गोळ्या घेतल्यानें रोगप्रतिकारक शक्ति उत्पन्न होते. कित्येक मुलें माती खातात त्यामुळें संग्रहणी अतिसार वगैरे विकार होतात. पृथ्वी ही संहारशक्तिप्रबल असल्यामुळें घटनेला नको असते म्हणून तिचें संहारप्राबल्य कमी करण्यासाठीं ह्या विद्युत् पोटांत देण्यानें उत्तम उपयोग होतो. मातीचे झालेले दुष्परिणाम नष्ट होतात. **शीतप्रकृतीच्या** मनुष्यांनीं हें औषध मधून मधून घेणें हितकर होतें. शीतप्रकृतीच्या मनुष्यांना ही पोटांत दिली असतां त्यांच्या पचनादि क्रिया सुधारतात. **इतर** कोणत्याहि **प्रकृतीच्या** मनुष्याला खरोखर थंडी झाली असेल तर विकाराचे जागीं लावून, शिवाय कपाळाचा वरचा भाग व मानेचीं पोंढीं यांवर ही विद्युत् लावावी. ( शरीराचे धन व ऋण भाग पुढें परि० १६६ मध्यें पहा. ) शरीराच्या ऋणभागावर लावली असतां शारिरिकक्रियांची समता उत्पन्न करण्याला उपयोग होतो. पाठीचा कणा हा धन व ऋण भागांनीं संबद्ध आहे. त्यावर

ही व ज्योतिष्मति आळीपाळीनें लावावी म्हणजे समता उत्पन्न होईल. शारिरिकक्रियांची समता उत्पन्न करण्यास बहुतेक विकारांत पाठीचे कण्यास चपला व ज्योतिष्मति यांचा फारच उपयोग होतो. **संग्राहक संरक्षण कार्य** ह्या स्वरूपाच्या कोणत्याहि विकारामध्यें, **चपला** विद्युत्‌चा अत्यंत उपयोग होतो. जलोदर म्हणजे पोटांत पाणी होतें, त्यावर हिच्या घडया घालण्यानें लघ्वीचें प्रमाण वाढून विकार नष्ट झाल्याचा अनुभव आहे. ह्या विद्युत्‌चा उपयोग विशेषतः ऋण भागावर हिचें विलयन लावून करावयाचा असतो.

१५५ **ज्योतिष्मति–ऋणविद्युत्.**—अपानप्राणशक्तिविशिष्ट ज्योतिष्मति ही विद्युत्‌च्या उलट धर्माची म्हणजे उष्णतेचा ग्रास करून शीतपणा उत्पन्न करणारी आहे. शरीर विद्युत्प्रवाहाच्या उष्णतेचा ग्रास करून, पृथ्वीतत्त्वविशिष्ट

**अपानप्राणशक्ति-विशिष्ट ज्योतिष्मति विद्युत्**

शक्तिसंपन्न घटकांनीं, व्यानशक्तीनें शरीरघटनेमध्यें उत्पन्न करून दिलेल्या पोकळीमध्यें, शारिरिकक्रियोपयुक्त, घनघटना करणें आणि शक्तिहीन व उत्सर्जनीय विजातीय द्रव्यें उत्सर्जक इंद्रियांकडे व शरीराच्या बाह्य भागाकडे लोटून, वसावाहिन्यांच्या कार्याला साहाय्य करणें, हें ह्या अपानप्राणशक्तीचें कार्य आहे. ज्या भागामध्यें ह्या प्राणशक्तीचें दौर्बल्य असेल त्या भागांत उष्णतेची वाढ, दाह, संतप्तता, आग, दाहक वेदना अशीं लक्षणें होतात. त्या ठिकाणीं ह्या विद्युत्‌चा बाह्यतः उपयोग करणें हितावह असतें. डोकें तापणें, झोंप न येणें, डोळ्यांची आग होणें ह्या विकारांतहि डोकीवर व कपाळावर हिच्या विलयनाच्या घड्या ठेविल्यानें किंवा तें वारंवार लाविल्यानें थंडावा येऊन आराम वाटतो.

१५६ मुरगळलेला किंवा ठेंचलेला भाग, घांवरें, गळूं, उठाणूं किंवा अन्य प्रकारें एकाद्या ठिकाणीं सूज येऊन, त्यांत उष्णता वाढली असेल तर

**ज्योतिष्मति उपयोग**

तेथें थंडावा आणण्यासाठीं, ह्या **विद्युत्‌चा उपयोग करण्यापूर्वी चपलेचा** उपयोग करून पहावा. त्यानें दाह, तप्तता, उष्णता व वेदना वाढल्या अशी पक्की खात्री झाली तर मग त्या ठिकाणीं ज्योतिष्मतीचा उपयोग करावा आधीं करूं नये. कारण पुष्कळदां अशा ठिकाणीं असलेलें अशुद्धरक्त व विजातीय द्रव्य उत्सर्जनमार्गास लावण्यासाठीं, जीवन-

शक्तीकडून शुद्ध रक्ताचा पुरवठा करण्याची क्रिया सुरू झालेली असते व त्यामुळें ती उष्णता वाढलेली असते. ज्योतिष्मति लाविल्यानें त्या कार्याला विरोध होण्याचा संभव असतो. चपलेनें तप्तता वाढली तर ज्योतिष्मतीची आवश्यकता असल्याचें सिद्ध होतें व चपलेनें वाढलेली उष्णताहि नष्ट होऊन थंडावा येतो व आराम वाटतो. चपला ही धनप्रधान असल्यामुळें तिच्या उपयोगानें कोठेंहि उष्णता वाढली असेल, तेथें ज्योतिष्मति लावावी. आणि ज्योतिष्मतीनें शीतपणा व जडत्व वाढलें असेल तेथें चपला लावावी. तसेंच शरीरांत कोठेंहि शारीरिक उष्णतेची समता उत्पन्न करण्यासाठीं चपला ज्योतिष्मति ह्या दोहोंपैकीं जरूर तिचा उपयोग करावा. एकीचा अधिक उपयोग केला असेल त्या ठिकाणीं मागाहून दुसरीचा एकवार तरी उपयोग करावा म्हणजे शक्तींची समता उत्पन्न होऊन चटकन् आराम वाटतो. **कामधंदा** इत्यादि नित्य व्यवसायांच्या परिस्थितीच्या मानानें शरीराच्या मस्तकादि वरील भागांत रक्तप्रवाहाचें प्रमाण अधिक आणि पाय वगैरे खालील भागांत तें कमी होतें. किंवा याच्याविरुद्ध वरील भागांत कमी व खालील भागांत अधिक होतें. त्यामुळें डोकें तापणें, पाय वळणें किंवा गारठणें असे किंवा डोकें जड होणें व पाय तापणें असे विकार पुष्कळांना होतात. नित्य अशीं लक्षणें होण्याचा परिणाम एकादा त्रासदायक विकार होण्यांत होत असतो. म्हणून तो टळण्यासाठीं उष्णता वाढत असेल त्या भागांस ज्योतिष्मति आणि जडत्व व गारठपणा येत असेल त्या भागांस चपला विद्युत्चा उपयोग करावा. **लहान मुलांना** माती खाण्याची इच्छा होऊं लागली असतां त्यांना ज्योतिष्मतीच्या २।२ गोळ्या दररोज २।३ वेळां खाण्यास द्याव्या. पृथ्वीतत्त्वाच्या जीवनशक्तियुक्त घटकांची शरीरघटनेला आवश्यकता असल्यामुळें अशी इच्छा उत्पन्न होत असते. ७।८ दिवसांत ती ह्या औषधानें नष्ट होते. दांत येतांना मुलांना हगवण व ओक लागते, त्या वेळींहि हिच्या गोळ्या देण्यानें आराम वाटतो. जंताचा विकार झाला असतां ह्या विद्युत्च्या ८।१० गोळ्या व प्रथमनिष्पत्तीच्याहि ८।१० गोळ्या दिवसांतून ३।४ वेळां याप्रमाणें ५।६ दिवस दिल्या असतां जंत मरून सडून पडतात. **बद्धकोष्ठ** असेल त्यांनीं हें औषध पोटांत घेतल्यास शौचास साफ होऊं लागतें. जंत झाले असतां मुलांना हें औषध पोटांत देत असतां, ह्याच्या

विलयनाच्या घड्या बेंबी व पोटाचा खालचा भाग यांवर घातल्या असतां जास्त उपयोग होतो. मलशुद्धि नीट न झाल्यामुळें फुगवटी आली असल्यास याप्रमाणेंच पोटावर घड्या घालाव्या म्हणजे फुगवटी मोडून कांहीं वेळानें शौचास होतें. ही विद्युत् पोटांत घेण्यानें व कपाळावर कांहीं दिवस घड्या घालण्यानें दांत मजबूत होतात. दांत थोडे हलूं लागले किंवा पू होऊं लागला तरी थोड्या दिवसांत पू बंद होऊन दांत हलेनातसे होतात. तसेंच कांहीं विकारांत हाडें दुर्बल किंवा नरम होतात, तींहि ह्या औषधानें कणखर बनतात. मात्र त्यासाठीं याचा बरेच दिवस उपयोग करावा लागतो. बरेच दिवस ह्याच्या विलयनाच्या घड्या कपाळावर घातल्यास व गुळण्या केल्यास पायोरिया व दांतांचे इतर विकार साफ बरे होतात.

१५७ **सुप्रभा +धनविद्युत्**–जीवनशक्तीच्या घटनासंवर्धक व आरोग्यसंरक्षक कार्याला उपयुक्त असें रसक्रियाप्रमुख कार्य करणें हें जलतत्त्वाच्या कार्यशक्तीचें कार्य असून, समान ही प्राणशक्ति त्या कार्यांत तिला सहाय्य करणारी आहे. सुप्रभा ही विद्युत् त्याच समानप्राणशक्तिविशिष्ट धर्माची आहे; त्यामुळें ही प्राणशक्ति दुर्बल झाली असेल तर तिला सामर्थ्यसंपन्न करण्याला या विद्युत्चा फार उपयोग होतो. शरीरांतील सर्व अंतर्गतक्रिया रसक्रियेनें सुव्यवस्थित चालत असल्या, म्हणजे जीवनशक्तीचें संवर्धन होतें व अंतर्बाह्य क्रियांना शक्तीचा पुरवठा होतो. रसक्रियेमध्यें बिघडाबिघड झाली असतां जीवनशक्तिसंवर्धन मंद किंवा बंद होऊन, शारीरिक क्रियाव्यापारांवर त्याचा दुष्परिणाम घडतो. तो ह्या सुप्रभेच्या उपयोगानें नाहींसा करितां येतो. रसक्रियेनें उत्पन्न होणारी जीवनविद्युत् (ज्ञानरस) ज्या ज्ञानतंतूंच्या (सहानुभव ज्ञानतंतु) द्वारा मेंदूमध्यें पोंचविली जाते, व अंतर्गत क्रियांसाठीं प्राण (शक्ति) रूपानें उलट पुरविली जाते, त्या शतदलाशीं संबंधित असलेल्या ज्ञानतंतूंना हिच्या योगानें जरूर त्या ठिकाणीं, बाह्योपयोगानें शक्तीचा पुरवठा करितां येतो. त्यामुळें कार्यकर्त्यांना, झालेली बिघडाबिघड नाहींशी करण्याला तात्कालिक मदत होते; संग्रहित जीवनशक्तीचा व्यय थांबून तिचें संवर्धन होऊं लागतें व कर्मेंद्रियें आणि ज्ञानेंद्रियें यांनाहि शक्तीचा योग्य पुरवठा होतो. अशा रीतीनें

**समानप्राण शक्तिविशिष्ट सुप्रभाविद्युत्**

अंतर्गत क्रियांना प्रत्यक्षरीतीनें शक्ति पुरविण्याचें कार्य ह्या विद्युत्च्या उपयोगानें घडून येतें. अशुद्ध हा जलतत्त्वाचा रस आहे. भिन्नभिन्न कारणांनीं शरीराच्या निरनिराळ्या भागांत या रसामध्यें विजातीय द्रव्य जमत जातें. कार्यशक्ति दुर्बल असली म्हणजे तिला त्याचें योग्य प्रकारें उत्सर्जन करितां येत नाहीं, त्यामुळें रक्तदोषजन्य विकार उत्पन्न होतात. त्याचा परिणाम रक्ताशय ( हृदय )—क्रिया व रक्ताभिसरण आणि मेंदु यांवर घडतो. अशा कारणानें-विकृत झालेल्या ठिकाणीं ही विद्युत् लाविली असतां शरीरघटनेला उपयुक्त अशा घटकांना सेंद्रियरसरूप गति देऊन विजातीय घटकांना उत्सर्जनीय रूप देते.

**सुप्रभा उपयोग**

१५८ आरोग्यविघातक अशा विजातीय व निर्जीव घटकांना, **जीवनशक्ति** अशुद्धामध्यें लोटून देउन एकाद्या ठिकाणीं जमविते आणि गळूं, उठाणूं, पू होण्यासारखी सूज, खरूज, फोड, खांडूक वगैरे उत्सर्जन स्वरूपाचें किंवा अशुद्ध रक्त सांचून एकादा भाग सुजमट, होणें किंवा सुजणें वगैरे प्रकारचे विकार होतात. कांटा मोडणें, कसूं किंवा एकादा पदार्थ बोंचून मोडून राहणें अशा कारणांनीं त्या ठिकाणीं पू होण्याची क्रिया सुरू होते. अशा प्रकारांनीं विकृत झालेल्या स्थानांतील विजातीय घटकांचें उत्सर्जन होण्याला शरीरजीवनविद्युत्च्या स्थितीच्या मानानेंच ते विजातीय घटक आपल्या संसर्गानें आजूबाजूच्या घटकांना दूषित करून शरीरघटनेला व धारणेला निरुपयोगी बनवीत असतात. त्यामुळें विकाराचा आवर वाढत जातो. उद्भिजादि सजीव सृष्टीला संवर्धनानुकूल साहाय्य करणें आणि निर्जीव झालेल्या सृष्टीला नासून, कुजवून मातींत मिसळून देणें हें जलाचें निसर्गसिद्ध कार्य आहे. मनुष्यशरीरामध्येंहि ही विद्युत् असेंच कार्य घडवून आणिते. ज्या ठिकाणीं वर सांगितल्याप्रमाणें गळूं वगैरे विकार होऊन त्यांचा त्रास होत असतो, त्या ठिकाणीं ही सुप्रभाविद्युत् लाविली असतां केवळ शक्तिहीन, निर्जीव व विजातीय अशाच घटकांचा पू किंवा लस तात्काळ बनून, शस्त्रक्रियेवांचून विभेदक क्रियेनें त्याचें सहज रीतीनें उत्सर्जन होतें, आणि संसर्गानें पूर्ण शक्तिहीन न झालेले घटक पुन्हां शक्तियुक्त व सजीव होऊन विकाराचा आवर नाहींसा होत जातो व जखम फारच जलद

भरून येते. शस्त्रादिकांनीं झालेल्या जखमेंतून किंवा शारीरिक विकारामुळें **रक्तस्राव** होत असेल तर त्या ठिकाणीं आणि आजूबाजूच्या मर्मस्थानीं या विद्युत्चें विलयन लावावें किंवा घडी ठेवावी म्हणजे रक्तस्राव बंद होतो. रक्तस्राव जोराचा असेल तर विलयन लावण्यापेक्षां घडी ठेवणेंच उत्तम असून ती वारंवार बदलावी व रक्ताशयावरहि जरूर तर ५।७ मिनिटें घडी ठेवावी. **शस्त्रानें** किंवा अन्य कारणानें जखम होते व रक्तस्राव होऊं लागतो त्या वेळीं प्रथम **सुप्रभा**विलयनानें जखम स्वच्छ धुवून जखमेचें तोंड नीट मिळवून घ्यावें व नंतर वर घडी ठेवावी. पांच मिनिटांनीं ती हळूच काढून घ्यावी व दुसरी ठेवावी. विलयनानें जखम धुतांच स्राव बंद होत येतो. घड्या ठेविल्यानंतर तो थांबतो. जखम मोठी असल्यास, औषध ओतण्याला वाव ठेऊन, ती तोंड मिळवून बांधून टाकावी. वाव ठेविलेल्या जागीं ३।४ वेळां ५।५ मिनिटांनीं घड्या ठेवाव्या किंवा विलयन घालावें. नंतर २।३ तासांनीं वर औषध सोडीत असावें. दिवसांतून २ वेळां ती विलयनानें स्वच्छ धुवून बांधावी. दिवसांतून ५।६ वेळां तरी वर विलयन सोडीत असावें. ५।६ दिवसांत जखम साफ बरी होते. मोठी जखम होऊन एकादी शीर तुटली असल्यास रक्ताची धार लागते अशा वेळीं तिच्या मागील संधिभागावर व रक्ताशयावरहि सुप्रभेच्या घड्या ठेवाव्या. म्हणजे ८।१० मिनिटांच्या आंतच रक्तस्राव थांबतो. अशा वेळीं पोटांतहि सुप्रभाविलयन किंवा गोळ्या द्याव्या. झाडावरून पडून झालेल्या जखमा, कुऱ्हाडीच्या घावानें तुटलेले पाय, बंदुकीची गोळी लागून झालेली जखम, अशा प्रकारच्या जखमा ह्या औषधानें ४।८ दिवसांत बऱ्या झालेल्या आहेत.

शरीराच्या संवर्धक व संरक्षक घडामोडी शुद्ध रक्त ह्या रसाच्या योगानें होत असतात. जलतत्त्वाच्या कार्यशक्तीच्या दुर्बलतेमुळें ( पित्तकर पदार्थांच्या पचनानें बनणाऱ्या अशुद्धामध्यें मिसळलेलें पित्त, शुद्ध रक्तांतून शरीरभर पसरून ज्याप्रमाणें कावीळ झालेली दिसते, त्याचप्रमाणें ) तिला अशुद्धवाहिन्या ह्या कार्यक्षेत्रांतील अशुद्धामधील, शरीराला अपायकरक व विजातीय द्रव्यांचें उत्सर्जन करून, अशुद्ध हा रस पूर्णपणें शुद्धरक्त बनण्यालायक, असा निर्दोष करितां येत नाहीं. त्यामुळें विजातीय द्रव्याच्या स्वरूपाप्रमाणें

शुद्धरक्तामध्यें दूषितपणा वाढत जाऊन क्षयासारख्या नाना प्रकारच्या रोगाचें बीज उत्पन्न होऊन वाढत जातें. हा परिणाम टाळण्याला व झाला असतां तो नाहींसा करण्याला ही विद्युत् प्रकृतिनियामक निष्पत्तीच्या विलयनांतच ४।६ गोळया मिश्र करून दिली असतां कार्यशक्तीला अशुद्ध हा रस विजातीयद्रव्यहीन करून फुफ्फुसांत पाठवितां येऊं लागतो; कार्यशक्तीची दुर्बलता नष्ट होत जाऊन, रक्ताशय ह्या कार्येंद्रियाचे विकारहि नाहींसे होतात; व तें शक्तिपूर्ण होतें. शुद्ध-रक्त—वाहिन्यांवर शुद्ध रक्तांतून दूषित घटक वाहून नेण्याचा बोजा पडून घडलेला दुष्परिणाम घालविला जाऊन त्याहि शक्तिपूर्ण होतात. **जलतत्त्वाची** कार्यशक्ति हीच उष्णप्रकृतीच्या मनुष्याची **प्रकृतिनियामक** जीवनशक्ति असते. म्हणून त्यांना ही विद्युत् समान व सजातीय धर्मामुळें फारच उपयुक्त आहे. व्रण, जखमा, मूळव्याधि, उष्णतेमुळें घसा दुखणें, डोकें दुखणें, घेरी येणें, वांति, कोरडा खोकला, छातींत दुखणें, रक्तमिश्रित आमांश, शूल, वेदना, उसण भरणें, लचकणें, गालगुंड, गंडमाळ वगैरे विकारांमध्यें रक्ताशय, काळीज यांवर आणि विकाराच्या जागीं व (परि. १६६ मध्यें दिलेले) नजीकच्या मर्मस्थानीं लाविल्यानें तात्काळ आराम वाटतो. शूल वगैरे बंद होईपर्यंत, त्या त्या स्थानीं ती पुन्हां पुन्हां लाविली पाहिजे. अशा वेदना केव्हां केव्हां एका भागांतून कमी होऊन, दुसऱ्या भागांत उद्भवतात; म्हणजे त्या ठिकाणातून निघालेला दोष दुसऱ्या अशक्त भागांत जातो व तेथें वेदना होऊं लागतात. अशा वेळीं त्या ठिकाणींहि तसाच प्रयोग करावा. तेथून तिसरे ठिकाणीं गेल्यास तेथें व जेथें जेथें जाईल तेथें तेथें ही विद्युत् लावून शरीरांतील वेदना नष्ट केल्या पाहिजेत, म्हणजे तें रोगबीज शरीराबाहेर जातें. (हृदयकंप, हृदयसंकोच,) रक्ताशयकंप, रक्ताशयसंकोच हे विकार झाले असतां, त्या स्थळीं ह्या विद्युत्चें विलयन लावावें किंवा घडी ठेवावी म्हणजे त्या विकाराचें तात्काळ शमन होतें. थंडीपासून होणारे विकार, पडसें, खोकला, स्त्रियांचे आर्तवसंबंधीं दोष, वांतींतून, मळाबरोबर, लघ्वींतून, नाकांतून, कानांतून, दांतांतून वगैरे कोणत्याहि भागांतून होणारा रक्तस्राव, डबा, तीव्र ज्वर ह्या विकारांत हिच्या ५।६ गोळया पाण्यांतून किंवा दुधांतून दिल्या असतां ते विकार शमन पावतात. सं. चि. पद्धतीचें दुसरें

औषध सूरू असतांहि रोग्याची शक्ति कायम ठेवण्यासाठीं, दिवसांतून एकादे वेळीं ही पोटांत द्यावी. त्या योगानें चालू औषधाला रोगनाशनकार्यांत चांगली मदत होते. दाढा किंवा हिरड्या सुजल्या अथवा त्यांवर गळूं किंवा दाढवळ झाला तर औंसभर पाण्यांत १०।१२ गोळ्या विरघळवून त्यांत कापूस भिजवून तो त्या जागीं ठेवावा म्हणजे ठणका थांबतो. कांहीं वेळानें तो काढून टाकून दुसरा भिजवून ठेवावा. २।३ वेळां ठेविल्यावर सूज कमी तरी होईल किंवा पू होऊं लागेल. पुन्हांपुन्हां कापूस भिजवून ठेविल्यानें तें पिकून फुटून जाईल व चटकन् बरें होईल. **तोंड** आलें असल्यास कपभर पाण्यांत ५।६ गोळ्या विरघळवून, त्याच्या गुळण्या कराव्या. डोळे येणें, फूल, सारा, दृष्टिमांद्य, खुपऱ्या वगैरे नेत्रविकारांत वरीलप्रमाणेंच विलयन करून ठेवावें व तें वारंवार पापण्या व आंख यांवर लावावें. मनुष्य एकाएकीं बेशुद्ध पडल्यास किंवा चक्कर आल्यास, धडकी भरल्यास, गुदमरल्यासारखें झाल्यास, नाडीमध्यें चलबिचल झाल्यास, रक्ताशयावर सुप्रभा विलयनाच्या घड्या वारंवार ५।४ मिनिटांनीं पिळून पुनःपुन्हां भिजवून ठेवाव्या; आणि मस्तक, कपाळ, मानेची पोंढी यांवर तेंच विलयन वारंवार चिबचिबित लावीत जावें व पोटांतहि द्यावें म्हणजे तो त्वरित शुद्धीवर येतो. शुद्धीवर येतांच पिण्यास थंड पाणी द्यावें. ह्याबरोबर नंबर २ च्याहि गोळ्या पोटांत द्याव्या. थकवा, सुस्ति वाटल्यास किंवा थंडीमुळें मनुष्य गारठला असल्यास द्वितीय निष्पत्ति व सुप्रभा यांचें विलयन १५ मिनिटांच्या अवकाशानें ३।४ वेळां द्यावें किंवा गोळ्या द्याव्या. तात्काळ हुषारी वाटते. ठणका, ठुसठूस लागणें, उसण, मुरगळणें, ठेंचणें वगैरेमुळें होणाऱ्या वेदना, यांवर विकृत भागीं सुप्रभाविलयनाची घडी ४।६ वेळां ठेविल्यानें आराम वाटतो. **चाळणपुळी—काळपुळी** व दुसरे पुळीचे विकार सुप्रभाविलयनाच्या घड्या ठेवीत गेल्यानें त्वरित बरे होतात. पुळीचा पू वगैरे घाण धुवून टाकण्यासहि सुप्रभाविलयनाचा उपयोग करावा.

१५९ **योगभाविनी—समभावी विद्युत्**—ही उदानप्राणशक्तिविशिष्ट विद्युत्, तेजतत्त्वाच्या कार्यशक्तीला साहाय्यक असल्यामुळें सर्व प्रकारच्या प्रकृताना उपयुक्त आहे. रक्त व ज्ञानतंतु यांवर कार्य घडविण्याचा गुणाहि

हिच्यामध्यें सुप्रभेप्रमाणेंच आहे. एकाद्या विशिष्ट प्रकारच्या मनुष्याला एकाद्या विशिष्ट विकारांत हिचा उपयोग झालेला दिसला नाहीं तरी कांहींहि अवगुण होण्याची मुळींच भीति नाहीं. तापाचीं किंवा दाहाचीं लक्षणें वाटतांच हिच्या ५।६ गोळ्या पाण्यांतून किंवा दुधांतून दिल्या असतां त्याची गति लगेच मंद होते व त्या विकाराचें स्वरूप सौम्य होतें.

**उदानप्राणशक्ति-विशिष्ट-योग भाविनीविद्युत्**

१६० वाधणे येणें, गांठी सुजणें, घसा धरणें, स्नायूंचा दाह, मज्जातंतूंचा क्षोभ किंवा शूल, वेदना, उचकी वगैरे विकारांवर बाहेरून व पोटांतून हिचा चांगला उपयोग होतो. दिवसांतून ५।६ गोळ्या याप्रमाणें ३।४ दिवस पोटांत दिल्यास हे विकार नष्ट होतात. मेंदूच्या विकारांत मानेची पोंढी व कणा आणि डोक्याचा वरचा भाग यांवर हिचें विलयन लाविल्यास किंवा घड्या घातल्यास आणि पोटांतहि दिवसांतून ४।५ वेळां याप्रमाणें दिल्यास मेंदूचे सर्व विकार, मेनिंजायटिस, कंप, बेशुद्धि, भ्रम हीं ताबडतोब बरीं होतात. मस्तक, पोट, गर्भाशय व ढुंगण यांतील वातविकारांवर याचा फार त्वरित गुण येतो. लहान मुलांचा कफ दाटणें, कफाचें जाळें धरणें, डबा, सुशी ह्या विकारांवर हें अप्रतिम औषध आहे. एकाद्या वेळीं हे विकार फार तीव्रतेनें वाढतात, तेव्हां १५।१५ मिनिटांनीं ४।४ गोळ्या ३।४ वेळां द्याव्या, म्हणजे तात्काळ विकार हटतो व ४।८ दिवसांत तो निःशेष होतो. त्वरित गुण येण्यासाठीं ह्याचे जोडीस नं. १ व नं. २ हीं औषधें द्यावीं. ह्यांच्या विलयनाच्या घड्या पोटावर ( दोन्ही बाजूंवर) ठेविल्यास जास्त लवकर बरें वाटतें. जरंडी ( यकृत ) कवळू ( प्लीहा ) यांच्या विकारांत पोटांतील औषधांच्या जोडीस ह्या औषधाच्या बाहेरून घड्या ठेविल्यास फार जलद गुण येतो. मेंदु अशक्त झाला असल्यास याच्या विलयनाच्या घड्या डोकीवर घालाव्या व मानेची पोंढी व कणा यांवर तेंच विलयन लावावें म्हणजे मेंदु सतेज होऊन हुपारी वाटते. लहान मुलांना याचा असाच उपयोग केला असतां, अप्रबुद्ध व मतिमंद मुलें चांगलीं हुषार होतात, स्मरणशक्ति वाढते, दृष्टि तीव्र होते आणि कानाचे विकार बरे होतात. माल

**योगभाविनी उपयोग**

अशा मुलांस हा बाह्योपयोग बरेच दिवस करावा लागतो. त्याप्रमाणेंच पोटांत त्याच्या प्रकृतीला सजातीय असेल तें नं० १, २, ३ पैकीं औषध दिल्यास चांगला गुण येतो.

१६१ **सौदामिनी-ऋणविद्युत**—ही विद्युत् वायुतत्त्वाच्या कार्यशक्तीच्या समान व सजातीय गुणधर्माची आहे व गतिरूप सूक्ष्म धर्मानें ऋणशक्तिप्रधान आहे. सहस्रदलामधील संचित जीवनशक्तीकडून स्पर्शज्ञानतंतूंकडे वेणीस्थानांतून जो शक्तिप्रवाह बाह्यक्रियाव्यापारांसाठीं दिला जातो त्यानें ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें शक्तियुक्त होऊन आपापलीं कामें बजावूं शकतात. परंतु अंतर्गतक्रियेंत बिघडाबिघड झाली म्हणजे, शक्तिसंचय मंद किंवा बंद होतो आणि शिवाय तो बिघाड नाहींसा करण्याकडे, संचितशक्ति खर्च करण्याचा प्रसंग येतो. अशा वेळीं वेणीस्थानांत केला जाणारा शक्तीचा पुरवठा, जीवनशक्तीला मंद किंवा बंदहि करावा लागतो. त्यामुळें बाह्य क्रियाव्यापारांचें नियामक अंतःकरण जें प्रयोगी मन, तें दुर्बलपणामुळें कासावीस व घाबरें होतें. त्यामुळें कित्येक प्रसंगीं मूर्च्छा, बरळणें, बडबड, बेशुद्धपणा, ज्ञानधर्म नष्ट होणें, चलनवलनक्रिया थांबणें वगैरे स्वरूपाचे विकार होतात. तसेंच कपाळ दुखणें, चैन न पडणें, चिंता उत्पन्न होणें, ग्लानी येणें, कांहीं सुचेनासें होणें, गडबड, गलबला किंवा बोलणेंहि सहन न होणें किंवा निश्चेष्टपणा येणें असे प्रकार होतात. अशा प्रकारचे परिणाम मनावर झाल्यामुळें, शक्ति मिळविण्यासाठीं त्याच्या इच्छाशक्तीचे सहस्रदलावर आघात होत जाऊन, त्याचा परिणाम अंतर्गत क्रियेकडे जाणाऱ्या शक्तिप्रवाहाचें आंदोलन व न्यूनाधिक्य होण्यांत होऊन रोगलक्षणांची तीव्रता होण्यांत त्याचें पर्यवसान होतें. अशा वेळीं ह्या विद्युत्‌ची घडी कपाळावर आणि विकाराची तीव्रता असेल त्या ठिकाणीं ठेविली असतां, तात्काळ शक्तीचा पुरवठा होऊन व्याधिशमन आणि प्रयोगी मनाला स्वास्थ्य प्राप्त होऊं लागतें.

**प्राण प्राणशक्ति-विशिष्ट सौदामिनि विद्युत्-वायूतत्त्वी**

१६२ फुफ्फुसें हें वायुतत्त्वाचें कार्येंद्रिय असल्यामुळें, अशा स्वरूपाच्या

आजारांत तीं अशक्त होतात व त्यांचा दाह होऊन रक्तशुद्धीच्या कार्याचा भार त्यांच्यानें सोसवत नाहीं; त्यामुळें त्यांच्यानें रक्तशुद्धीचें कार्य नीट होत नाहीं. तेथें कफ होतो व श्वासोच्छवासानें व ज्वरादिकांच्या उष्णतेनें तो शुष्क होत जाऊन फुफ्फुसें विकृत होत जातात, व **न्यूमोनिया** होतो. त्यामुळें रक्ताशय ( हृदय )—क्रियेवरहि दुष्परिणाम होऊं लागतो

**सौदामिनी उपयोग**

अशा वेळीं फुफ्फुसांचे भागावर व कपाळावर ह्या विद्युत्च्या विलयनाच्या ( १५ तोळे पाण्यांत १५।१८ गोळ्या ) घडया लागोपाठ ५।५ मिनिटांत बदलून ठेवीत गेल्यानें, तेथें जमलेली व तापाची उष्णता कमी होत जाऊन कफ पातळ होऊन सुटूं लागतो, फुफ्फुसांना शक्तीचा पुरवठा होऊन तीं रक्तशुद्ध करण्याचें कार्य करण्यास समर्थ होत जातात आणि विकाराचें शमन होत जातें. विकार जोराचा असल्यास, घडया घालाव्यात व शिवाय पोटांतहि सौदामिनीच्या २।२ व त्याचे जोडीस नं. ६ च्या १।२ गोळ्या ३।४ वेळां द्याव्या. म्हणजे कफ त्वरित पातळ होऊन सुटूं लागतो. ह्या न्यूमोनियाच्या आजारामध्यें रोग्याची छाती शेकल्यानें त्याला फार थकवा येतो व कफ पातळ होण्यास वेळहि लागतो. परंतु ह्या औषधानें रोग्याला तसा थकवा न येतां, घडयांच्या योगानें कफ फारच त्वरित पातळ होतो व थंडावा येऊन हुपारीं वाटते. **ताप** वाढला म्हणजे डोकें भणभणतें, दुखूं लागतें व वात होण्याचा संभव असतो. अशा वेळीं मेंदु शांत राहणें अत्यंत आवश्यक असतें व त्यासाठीं डोकीवर बर्फ, कोलन वॉटर वगैरेंचा उपयोग केला जातो. त्याचेऐवजीं सौदामिनीचें वरीलप्रमाणें विलयन करून त्याच्या घडया कपाळपट्टीं व टाळू यांवर ठेवाव्या, १।२ मिनिटांत उष्णता शोषण केल्यामुळें घडी तापते व सुकूं लागते, ती काढून पिळून टाकून पुन्हां विलयनानें भिजवून ठेवावी. याप्रमाणें ८।१० घडया घालतांच डोकें शांत होतें व तापहि कमी होऊं लागतो. शक्तीचा पुरवठा करणें हा गुण ह्या औषधामध्यें विशेष असल्यामुळें बर्फ किंवा कोलोन वॉटर यांहून जास्त गुणावह आहे. ह्या औषधाचा ज्ञानतंतूंवर तात्काळ शक्तिदायक इष्ट परिणाम घडत असल्यामुळें, वात, चक्कर येणें, बेशुद्धि, अस्वस्थपणा वगैरे विकारांत वरील प्रमाणेंच घडया घालाव्या म्हणजे तात्काळ आराम वाटतो. या औषधानें ज्ञानतंतु शक्तियुक्त

९५१७८२ / २७।१२।५७

होऊन वातविकारामुळें नष्ट झालेलें स्पर्शज्ञान पुन्हां चालू होतें, ज्ञानेंद्रियांची दुर्बलता नष्ट होते, व चलनवलनक्रियाकारक स्नायूहि सशक्त होतात. संधिवात किंवा संधिभागांतील ठुसठूस, सूज, ठणका, हाडीव्रण, गळूं, उठाणूं यांतील त्रासदायक वेदनाही वर लाविल्यानें कमी होतात. संधिवाताच्या किंवा आमांश व आमवाताताच्या विकारांत हिचें विलयन पोटांत दिलें असतां गुण चांगला येतो. क्वचित् एकाद्या रोग्याला हिच्यांतील विद्युद्वेग सहन होत नाहीं असें झाल्यास, विलयनाच्या पद्धतीप्रमाणें, त्याला सोसेल तें विलयन द्यावें. आंतडयांत किंवा शरीराच्या अंतर्भागांत होणाऱ्या गळूं, उठाणूं, व्रण वगैरे विकारांत हिचें विलयन पोटांत देण्यानें चांगला गुण येतो. शरीराच्या बाह्य भागावरील गळूं, उठाणूं, व्रण, क्षत वगैरे विकारहि ही लाविल्यानें बरें होतात. त्याप्रमाणेंच खरूज, खवडा, पैण, आगपैण; सुकी खरूज, कंडुरोग, इसब वगैरे त्वग्विकारांवरहि हिचा चांगला उपयोग होतो. ह्याशिवाय हिच्या आंगीं विषनाशक धर्म आहे. सर्प, कांडर फुरसें, विंचू, कोळी, मधमाशी, गांधीलमाशी, वळविंच वगैरेंच्या दंशांवर घडी ठेविल्यास त्यांतील वेदना नष्ट होतात, परंतु अशा वेळीं विषहारिणीचाच उपयोग तात्काल गुणाकरितां करावा व जरूर तर त्याचे जोडीस सौदामिनी वापरावी. सुप्रभा ही जडवर्गीय व धनशक्तिप्रधान आणि सौदामिनी ही सूक्ष्म वर्गीय व ऋणशक्तिप्रधान अशा धर्मानें परस्पर विरोधी आहेत. त्यामुळें आळीपाळीनें लाविल्या असतां किंवा पोटांत घेतल्या असतां प्रकृतींत शक्तीची समता उत्पन्न होते. पोटांतून किंवा बाहेरून उपयोग केल्यामुळें सुप्रभेनें उत्पन्न झालेला क्षोभ सौदामिनी नाहींसा करिते व तसाच सौदामिनीच्या उपयोगानें झालेला क्षोभ सुप्रभा नाहींसा करिते.

## औषधें कशीं वापरावीं.

१६३ औषधांच्या व त्याप्रमाणेंच विलयनांच्या बाटल्या सुगंध किंवा दुर्गंधयुक्त आणि गरम किंवा सर्दट व कोंदट ठिकाणीं ठेवूं नयेत. जरूर तितकें औषध काढून घेतल्याबरोबर, बूच लावून बाटली बंद करून ठेवावी. सर्द हवेनें गोळ्या ओलसर किंवा चिकट होतात. परंतु त्या सुगंध किंवा दुर्गं-

धयुक्त पदार्थांनीं दूषित झालेल्या नसतील तर गुणानें कमी होत नाहींत. तसेंच तयार केलेलें विलयनसुद्धां पाणी स्वच्छ वापरलें असतां कित्येक महिने-पर्यंत गुणानें कमी होत नाहीं. **विलयनासाठीं** जें पाणी घ्यावयाचें तें शक्य तितकें ताजें व स्वच्छ घ्यावें. कांचेच्या बाटलींत किंवा ग्लासांत विलयन करावें. बाटलीला बूच लावावयाचें तेंहि न वापरलेलें, स्वच्छ व गंधहीन असावें. तसें न मिळाल्यास स्वच्छ कागदाचें लावावें. ग्लास असल्यास त्यावरहि असेंच स्वच्छ झांकण ठेवावें. विलयनासाठीं जें भांडें घ्यावयाचें तें पूर्वीं स्वच्छ करून घ्यावें. तें स्वच्छ करण्यास साबण वगैरेचा उपयोग करूं नये. कारण पुष्कळ वेळां त्याचा थोडा तरी अंश भांड्याला चिकटून राहाण्याचा संभव असतो. भाताचें तूस, गव्हांचा कोंडा किंवा खसखसशीत धान्य व तें वर खालीं हालविलें जाईल इतकें माफक पाणी प्रथम घालून बाटली चांगली हालवावी व नंतर ३।४ वेळां पुन्हां पुन्हां पाणी घालून हालवून धुवावी. **औषधाच्या गोळ्यांची बाटली उघडून** ती **हुंगून** पाहाण्याची कित्येकांना इच्छा होते. पण तसें करूं नये व दुसऱ्या कोणालाहि **हुंगूं देऊं नये. कारण** हुंगून पाहातांना तींत उच्छ्वासाचा घाणेरडा वायु जाऊन औषध दूषित होतें व त्यांतील सर्दपणामुळें गोळ्या ओलसर होऊं लागतात.

१६४ **विलयनें करण्याची रीति – प्रथम विलयन.** सहा औंस म्हणजे १५ तोळे किंवा कच्चा अर्धाशेर स्वच्छ पाणी घेऊन त्यांत कोणत्याहि

**पोटांत घेण्यासाठीं**

निष्पत्तीची १ गोळी घालून, चांगली हालवून विरघळवावी, म्हणजे प्रथम विलयन होतें. याचे २४ भाग करावे. म्हणजे प्रत्येक भाग पाव औंसाचा होतो. म्हणजे जवळ जवळ अर्धाअधिक किंवा पाऊण तोळा औषध प्रत्येक वेळीं द्यावें. सोईसाठीं आठ किंवा दहा औंस

---

१ पंधरा वर्षांपूर्वींच्या गोळ्या वापरून पाहिलेल्या आहेत, त्यांतील गुण कमी झालेला नाहीं असा अनुभव आला.

२ तीन वर्षांपूर्वींचें विलयन वापरून पाहिलें, गुण कमी झालेला नाहीं. बाटलींत केल्यानंतर २।३ दिवसांनीं त्यांत पापुद्रे धरलेले दिसतात तो पाण्यांतील गाळ असतो म्हणून तें स्वच्छ व घट्ट फडक्यावर गाळून घेऊन पुन्हां भरून ठेवावें लागतें.

पाणी घेतलें तरी हरकत नाहीं पण मग त्यांत दोन गोळ्या घालाव्या. विद्युत्चें विलयन करावयाचें असेल तर सहा औंस पाण्यांत तीन गोळ्या घालाव्या. निष्पत्ति व विद्युत् अशा दोहोंचाहि पोटांत उपयोग करावयाचा असेल तर त्यांचें विलयन एकाच बाटलींत व सहा औंस पाण्यांतच एकत्र करण्यास हरकत नाहीं. तसेंच एका मनुष्याला २।३ निष्पत्तींचा उपयोग करावयाचा असेल तर त्याहि अशाच मिश्र करण्यास हरकत नाहीं. **कोणत्याहि दोन विद्युत् मात्र केव्हांहि एकत्र मिश्र करावयाच्या नाहींत.**

**द्वितीयविलयन**– प्रथम विलयनाचा एक भाग म्हणजे पाव औंस ( २४ वा भाग ) घेऊन तो सहा औंस पाण्यांत घालून हालवून मिश्रण करावें म्हणजे द्वितीय विलयन होतें.

**तृतीय विलयन**– द्वितीय विलयनाचा एक भाग घेऊन तो पुन्हां दुसऱ्या ६ औंस पाण्यामध्यें हालवून मिसळावा म्हणजे तृतीय विलयन होतें. प्रथम विलयनाचे ५ थेंब घेऊन ते सहा औंस पाण्यांत चांगले हालवून मिसळण्यानेंहि एकदम तृतीय विलयन तयार होतें. **चतुर्थ, पंचम** इत्यादि पुढील विलयनेंहि याचप्रमाणें पुर्वीच्या विलयनापैकीं १ भाग म्हणजे पाव औंस औषध सहा औंस पाण्यांत मिसळीत गेल्यानें तयार होत जातात.

१६५ **बाह्योपयोगासाठीं विद्युत्चें विलयन**–चपलाआदि कोणत्याहि विद्युत्चें विलयन करावयाचें असेल तेव्हां १ औंसभर पाण्यांत ३ गोळ्या घालून विरघळवाव्या व तें मिश्रण नीट हालवून नंतर त्याचा उपयोग करावा. कितीहि औषध करावयाचें असेल तें १ औंसभर पाण्यास ३ गोळ्या या प्रमाणांत तयार करावें. बाह्योपयोगासाठीं **तृतीय** बचें विलयन मात्र ६ औंस पाण्यांत ३।४ गोळ्या या प्रमाणांत करावें.

**बाह्योपयोगी विद्युत्विलयन**

**बाह्योपयोगासाठीं विद्युत्चें तेल**–एकाद्या मनुष्याला कित्येक दिवस विद्युत्चा बाह्योपयोग करावयाची जरूर असते. परंतु थंडीचे दिवस असले तर किंवा अन्य कांहीं कारणामुळें घड्या ठेवणें त्रासदायक किंवा गैरसोयीचें होतें. अशा वेळीं तेलाचा उपयोग करणें सोयीचें होतें. असें तेल करावयाचें असेल तेव्हां, निर्भेळ गोडें किंवा खोबऱ्याचें तेल उपयोगांत आणावें. एका स्वच्छ बाटलींत ( बेताच्या ) तीन किंवा चार **थेंब** पाणी घालावें व ज्या

विद्युत्चें तेल करावयाचें असेल त्या विद्युत्च्या ३०-३५ गोळया घालाव्या. सुमारें पंधरा वीस मिनिटांनीं त्या विरघळून जातील. नंतर तींत १ औंस तेल घालून तिला घट्ट बूच लावून ती बाटली चांगली गदगदून हालवावी. ज्या वेळीं तेलाचा उपयोग करावयाचा असेल त्या वेळींहि आधीं हालवून घेऊन उपयोग करावा.

**घडी**—घडी ठेवण्यासाठीं उपयोगांत आणावयाचें वस्त्र स्वच्छ व बिनरंगाचें असें घ्यावें. घडी नेहमी दुरी केलेली असावी व ज्या भागावर ती ठेवावयाची असेल तेवढ्याच बेताची करून घ्यावी. यकृत् व प्लीहा यांपैकीं एकावरच घडी ठेऊं नये. या पिंडापैकीं एकच विकृति असला तरी घड्या दोहोंवरहि ठेवाव्या व या एकाच वेळीं ठेवाव्या. ५।५ मिनिटांनीं किंवा झणझणीत तापल्यास आधींहि त्या काढून पिळून घेऊन, पुन्हां औषधांत भिजवून घालाव्या. घड्या औषधांतच पिळूं नयेत किंवा घड्या पिळून निघालेलें पाणीहि औषधांत मिसळूं नये. यकृत्प्लीहांवर ठेवावयासाठीं घडी घ्यावयाची ती प्रत्येक ४।५ अंगुलें रुंद व ६।७ अंगुलें लांब अशी घ्यावी आणि औषधामध्यें चिबचिबित भिजवून अर्धी बरगडीवर व अर्धी पोटावर येईल अशी ठेवावी. दोहोंचा सांधा शिंपीच्या मध्यावर यावा.

## शरीराचे मुख्य धन व ऋण भाग आणि मर्मस्थानें

१६६ कपाळ, छाती व पोट यांचा पुढील व मागील, उजवीकडील भाग ऋण व डावीकडील धन आणि शक्तिप्रधान आहे.

**शरीराचे मुख्य धन ऋण, भाग**

२ हात व पाय यांची आंतील बाजू ऋण व बाहेरील बाजू धनशक्तिप्रधान आहे. ३ पाठीचा कणा व शिरोभागाच्या अग्रापर्यंतचा भाग, यांत धन व ऋण भाग एकापुढें एक असे एकमेकांस चिटकून् आहेत.


**शरीरसंवर्धक व संरक्षक कार्य-केंद्रें—मर्मस्थानें**

१ टाळू—सहस्रदल.
२ कपाळ व भ्रूमध्य. ( आज्ञाचक्र )
३ भुंवया व वरच्या पापण्या.
४ खालच्या पापण्या.
५ आंख—(डोळा व कान यांमधील भाग—खळगी. )

६ कर्णमूळ–( कानाखालीं जबड्याचा सांधा. )
७ हनुवटी–( खालची बाजू )
८ घसा–( शंख )
९ शतदल–( मानेची पोंढी व वरील उंचवटा )
१० मानेचा वरचा मणका.
११ ऊर–( छातीचा मध्य, उंचवटा )
१२ फुफ्फुसें–( छातीचा डावा व उजवा भाग )
१३ रक्ताशय–( हृदय, हार्ट )
१४ काळीज– हृदय-सोलर प्लेक्सस व शिंपीपोट.
१५ यकृत्–( जरंडी-लिव्हर ) व प्लीहा ( कवळू, पानथरी स्प्लीन. )
१६ नाभीप्रदेश–( बेंबी )
१७ उसेपोट–( बस्ती )
१८ कण्याचा मध्य–( शिंपीपोटामागें )
१९ मूत्रपिंड
२० कण्याचा खालचा मणका व माकड हाड.
२१ फर-( कुल्याची पोंढी. )
२२ श्रोणिमज्जा–( कुला व मांडी यांचा संधिभाग )
२३ ढोंपर–( सांधा--मागें व पुडें )
२४ घोडशीर–( खोटेच्या वरील भाग )
२५ पावलांचा सांधा ( पुढील भाग )
२६ खांदा ( बावसा )
२७ कोंपर
२८ मनगट

पुढील रेखाचित्रामध्यें शरीराचीं मुख्य मर्मस्थानें आकड्यांनीं दाखविलीं आहेत. तसेंच धनभाग सबंध रेषांनीं व ऋणभाग तुटक रेषांनीं दाखविले आहेत.

# संजीवन-चिकित्सा-पद्धती.



# चिकित्सा करितांना लक्षांत ठेवण्याच्या मुख्य गोष्टी.

**चिकित्सा प्रकृति-नियामक व साहाय्यक**

१६८. कोणत्याहि विकारामध्यें उपाययोजना करणें ती आजाऱ्याची जन्मसिद्ध प्रकृति आणि प्रत्यक्ष संरक्षक क्रिया करण्याकडे खपत असलेली कार्यशक्ति, यांना साहाय्यक निष्पत्तीची योजना करावी. उदाहरण–शीतप्रकृतीचा मनुष्य असून, ताप आला असेल तर प्रथम व तृतीय निष्पत्ति; उष्ण प्रकृतीचा मनुष्य असून त्याला आमांश किंवा आम्लपित्त झालें असेल तर प्रकृतिनियामक द्वितीय व कार्यशक्तिसाहाय्यक प्रथम निष्पत्तीची योजना करावी लागते.

**स्थूल व सूक्ष्म योजना**

१६९. जीवनशक्ति ही अन्नादि द्रव्यांतून रसक्रियेनें, सर्व कार्यशक्तीच्या गुणधर्मांनीं युक्त अशा स्वरूपानें, ज्ञानरसांत मिश्र होऊन तेथून तीं शतदलांत प्रविष्ट होते व तेथून सहस्रदलांत संग्रहित होऊन प्राणरूपानें कार्यशक्तीकडे रवाना होते. सं. चि. च्या निष्पत्ति निरनिराळ्या तत्त्वांच्या जीवनशक्तीनें युक्त आहेत. त्यामुळें कोणतीहि निष्पत्ति गोळ्यांच्या रूपानें किंवा विलयन रूपानें पोटांत जातांच रसरूपानें तात्काळ जीवनशक्तिशीं मिश्र होऊन तिचें संवर्धन करितात. गोळ्या किंवा त्यांचें प्रथम विलयन, यांतही शक्ति जास्त म्हणजे स्थूल रूपांत असते. त्यामुळें तिच्या सजातीय शक्तीला स्थूलरूपानें पुरवठा होतो व सहजच त्या शक्तीचा शरीराच्या ज्या भागांत, आरोग्यरक्षणासाठीं प्रवाह चालू असेल त्या भागांत त्याच रूपानें संवर्धित शक्तीचा प्रवाह जातो. रसवाहिन्या ह्या मुळांत स्थूल असून त्यांच्या केंसापेक्षांहि सूक्ष्म असतात. संवर्धित शक्तिप्रवाह त्यांना असमान व असह्य होतो. त्यामुळें त्यांचा क्षोभ होऊन, आजाऱ्याला तो असह्य होण्याचा संभव असतो. त्याप्रमाणेंच आजाऱ्याची प्रकृतीच क्षीण झालेली असल्यास, त्याच्या स्थूलनलिकांनाहि, अशक्तपणामुळें जोराचा शक्तिप्रवाह सोसवत नाहीं व तो क्षोभकारक होतो. म्हणून आजाऱ्याचें शक्तिमान पाहून कोणतें विलयन त्याला समान शक्तीचें होईल व दुरुस्तीच्या कार्याचें स्वरूप किती सूक्ष्मपणाचें आहे हें लक्षांत घेऊन त्या मानानें विलयन कोणतें द्यावें तें ठरवावें.

गोळ्या व प्रथम विलयन हीं स्थूल, द्वितीय विलयन सामान्य; आणि तृतीय, चतुर्थ अशीं विलयनें हीं अधिकाधिक सूक्ष्म होत.

**स्थूलयोजना**

१७० आजारी मनुष्य सशक्त व अल्प वयाचा असेल, संरक्षक क्रिया एकाद्या कार्येंद्रियांत घडत असेल किंवा कार्यक्षेत्रामध्य, कार्येंद्रियाला जवळ अशा भागांत घडत असेल, विकाराचें स्वरूप आशुकारि (अविलंबी) असेल आणि रोगलक्षणें तीव्र स्वरूपाचीं असतील त्या वेळीं स्थूल चिकित्सा करावी.

**सूक्ष्म योजना**

१७१ जीवनशक्ति व कार्यशक्ति जितक्या क्षीणबल, रोगी अशक्त, विकारलक्षणें मंद, विकाराचें स्थान कार्येंद्रियापासून दूर, विकार विलंबी स्वरूपाचा व बरेच दिवसांचा असेल त्या वेळीं सूक्ष्म विलयनाची योजना करावी.

**सांथीच्या किंवा तीव्र आजारांत योजना**

१७२ सांथीचे आजार--उदाहरणार्थ, इन्फ्लूएंझा, देवी, गोंवर, कांजिण्या, कॉलरा ( पटकी ) इत्यादि आणि ज्या आकस्मिक होणाऱ्या विकारांची वाढ जोराची व अल्प काळांत जीविताचा नाश होण्यासारख्या तीव्र स्वरूपाची असेल, अशा कोणत्याहि विकारांत प्रथम विलयनापेक्षां सुद्धां स्थूल म्हणजे प्रत्येक वेळीं ५।१० गोळया देणें सुद्धां जरुरीचें व फायदेशीर असतें. विकाराची वाढ व तीव्रता थांबल्यास औषधाच्या अतिरेकानें होणारा क्षोभ नाहींसा करण्यासाठीं सूक्ष्म विलयनाचा उपयोग करावा. ज्या शहरांतील हवा व पाणी नेहमींच दूषित असतात अशा ठिकाणच्या आजाऱ्यांना प्रथम विलयन १ गोळी घालूनच न करितां ५ ते १० गोळ्या घालून करावें. अशा दूषित हवेंतून इतर ठिकाणीं आलेल्या रोग्यांनांहि स्थूल विलयनच उपयुक्त असतें.

**जीवनशक्तीला साहाय्यक उपाय**

१७३ विजातीय द्रव्याचा प्रवेश होऊन संरक्षणकार्याचा उपक्रम सुरू होतांना बाह्य कर्में करण्याची हुषारी व शक्ति क्षीण होते. हें लक्षण झाल्याबरोबर प्रकृतीला सजातीय, निमायक निष्पत्तीचा स्थूल प्रमाणांत उपयोग केला असतां जीवनशक्ति सतेज होऊन तिचें कार्य सुलभ होतें. विजातीय द्रव्याचें पृथक्करण करून त्याच्या उत्सर्जनाची व्यवस्था

जीवनशक्तीकडून लागेपर्यंत, खाद्यपेयग्रहणादि संपादक क्रिया आणि उत्सर्जक क्रिया प्रायः बंद होतात. अशा वेळीं त्या सुरू करण्यासाठीं क्षुधाप्रदीपक आणि उत्सर्जक उपाय करण्याकडे मनुष्याची प्रवृत्ति होते. परंतु ती क्रिया करण्याची तयारी जीवनशक्ति करीतच असते. म्हणून असे उपाय न करितां प्रकृति व कार्यशक्तिसंजीवक उपायच सुरू ठेवावे. विजातीय द्रव्याच्या पृथक्करणाची व त्याच्या उत्सर्जनाची व्यवस्था लावून जीवनशक्तीकडून संपादक व उत्सर्जक क्रिया सुरू होऊं लागतात. विजातीय द्रव्याचें प्रमाण अल्प किंवा जास्त असेल त्या मानानें मलमूत्ररूपानें किंवा घामादि रूपानें उत्सर्जन होऊं लागतें. अशा वेळीं अवरोधक किंवा प्रतिबंधक उपाय करावेसे वाटतात. परंतु तसें केल्यानें विजातीय द्रव्याचा संचय होऊन राहतो व तें दुसऱ्या प्रकारच्या रोगाला कारण घडतें. उत्सर्जन क्रिया करण्यामध्यें खर्च होणारे जीवनशक्तीचें व कार्यशक्तीचें सामर्थ्य रक्षण करण्यासाठीं, त्यांना संजीवक निष्पत्तीचें साहाय्य चालू ठेवावें. विजातीय द्रव्याचा संचय नाहींसा झाला म्हणजे उत्सर्जनक्रिया स्वाभाविकपणेंच नित्य प्रमाणावर येतात.

**सुधारणेचा क्रम**

१७४ ज्या मानानें शरीरामध्यें विजातीय द्रव्यांचा संचय आणि त्याच्या जीवनशक्तीच्या दुर्बलतेमुळें वाढ होऊन, रोगरूपानें शरीरामध्यें बिघडाबिघड होऊन, ज्या सूक्ष्म रसापर्यंत त्यांचा अनिष्ट परिणाम घडत गेला असेल, त्या रसाच्या शुद्धीकरणापासून सुधारणेचा क्रम सुरू होत असतो. त्या रसांतील विजातीय द्रव्यें खालच्या तत्त्वाच्या कार्यक्षेत्रांत उत्सर्जित करून, जीवनशक्ति ही सुधारणा करीत असते. अशा रीतीनें ज्ञानतंतूंतून शुद्ध रक्तवाहिन्यांतून अशुद्धवाहिन्यांत, अशुद्धवाहिन्यांतुन वसावाहिन्यांत व वसावाहिन्यांतून घामादि रूपानें शरीराच्या बाह्य भागांत टाकण्याची क्रिया करिते. अशा क्रमानें कार्यशक्तींना व त्यांच्या साहाय्यक रसवाहिन्यांना त्यांची धारणशक्ति व कर्तृत्वशक्ति यांनीं सुलभपणें करितां येईल अशा रीतीनें रसशुद्धि करून, केवळ शरीराबाहेरच उत्सर्जित केले पाहिजेत अशा घटकांचें उत्सर्जन, शुद्ध रक्तांतून अशुद्धवाहिन्यांत लोटून जीवनशक्ति करीत असते. शुद्धरक्तवाहिन्या व अशुध्दवाहिन्या यांचा अग्रभागामध्यें संगम होत असतो. त्यामुळें विजातीय द्रव्याचा अशुध्दवाहिन्यामध्यें प्रवेश होण्यापूर्वी तीं रक्तवाहिन्यांच्या अग्रभागांकडे

जसा होतात, व त्यामुळें हातपाय वगैरे अग्रभागांना सूज आलेली आढळते. ज्या प्रमाणानें व क्रमानें टाकाऊ भाग वसावाहिन्यांमध्यें टाकून अशुद्ध (रक्त) शुध्द होण्यासाठीं फुप्फुसांकडे जाईल त्या मानानें ही सूज कमी होत जाते. शरीरामध्यें विजातीय द्रव्यांचें प्रमाण बरेंच असलें तर सूज कमी व जास्त होण्याचा क्रम कित्येक दिवसहि चालू राहतो. फुप्फुसांमध्यें अशुद्धाचें शुद्ध रक्त बनतांना, शुद्ध रक्त होण्यास नालायक अशा रसाचा तेथें कफ बनून त्याचें खोकल्याच्या योगानें उत्सर्जन होतें.

**सुधारणा-विलंबी विकारांत**

१७५ विलंबी स्वरूपाच्या विकारांत सुधारणेचा क्रम कांहीं दिवस वाढत्या प्रमाणांत दिसतो व शरीराचे अंतर्बाह्य क्रियाव्यापार कांहीं विशिष्ट प्रमाणांत चालू होऊन तो क्रम तितकाच थांबतो व औषधाचा परिणाम घडत नाहीं असें वाटूं लागतें. परंतु औषधोपचार बंद केले तर पुन्हां रोगलक्षणें वाढूं लागतात. याचें कारण असें आहे कीं, संरक्षक कार्याचा बोजा बराच कमी झाला म्हणजे जीवनशक्ति तें कार्य तितकेंच थांबविते व शरीराच्या सुदृढतेचें कार्य चालू करिते आणि शक्तिसंग्रह व घटनासुदृढता अवश्य तितकी होऊन, संरक्षक कार्यशक्तींना व इंद्रियांना विसावा मिळाल्यानें त्या कार्यक्षम झाल्यानंतर राहिलेलें संरक्षणकार्य पुन्हां झपाट्यानें चालू करिते. त्या वेळीं पुन्हां गुणाची वाढ झपाट्यानें दिसूं लागते. म्हणून गुण थांबलेला दिसला तरी औषधोपचार बंद न करितां तेहि. वाढत्या प्रमाणांत सुरु ठेविले असतां क्षोभ न होतां जीवनशक्ति व कार्यशक्ति यांचें सामर्थ्य वाढून आरोग्यसंपन्नता प्राप्त होते.

**औषधाच्या प्रमाण वगैरेंत बदल**

१७६ रोग्याला दिलेल्या औषधानें त्याला आराम न वाटतां रोगलक्षणें वाढलेलीं दिसतील किंवा आणखी कांहीं नवीन विकार उत्पन्न झाल्याचें दिसून येईल तर तेवढ्यानें औषधाचा दुरुपयोग होत आहे किंवा औषध चुकलें आहे अशी समजूत करून घेऊं नये. औषध बिनचूक लागू पडल्याचेंच तें लक्षण आहे असें समजावें; आणि ज्या विलयनाची योजना केली असेल तें विलयन रोग्याला असह्य आहे असें समजून, त्याच्या पुढील आराम देणाऱ्या अशा सूक्ष्म विलयनाची योजना करावी.

१७७ योजिलेल्या औषधानें रोग्याला कांहीं गुण वाटत नसेल व रोगलक्षणामध्येंहि कांहीं फेरफार झालेले दिसणार नाहींत तर योजिलेल्या औषधाच्या विलयनांत व औषध देण्याच्या वेळांच्या प्रमाणांत फेरफार करून पहावा व त्यानेंहि कांहीं गुण न दिसेल तर अन्य निष्पत्तीची योजना करावी. मात्र हा योजनेंतील बदल रोग्याचा किंवा त्याच्या भोंवतालच्या मंडळीचा आग्रह पडतो म्हणून किंवा त्याच्या स्वभावाच्या उतावीळपणाला भिऊन तात्काळ करूं नये. आपण योजिलेल्या औषधाचा किंवा विलयनाचा परिणाम कांहींच घडत नाहीं, अशी आपल्या मनाची पूर्ण खात्री झाल्यानंतरच बदल करावा.

**औषधांत बदल**

१७८ योजिलेल्या औषधाचा रोग्यावर कोणताच इष्टानिष्ट परिणाम न घडतां रोगलक्षणें मात्र सारखीं वाढतच जातात असें दिसेल तर त्याला फक्त तीन कारणें संभवतात. १ रोग्याच्या आंतड्यांत कृमि किंवा जंत झालेले असणें; २ प्रत्यक्ष किंवा आनुवंशिक कारणानें रोग्याचें रक्त उपदंश विकारानें दूषित झालेलें असणें; ३ रोग्याची असाध्यावस्था. अशा वेळीं कृमि, जंत वगैरेसाठीं नंबर १ व ज्योतिष्मति यांचा उपयोग करून पहावा. लक्षणांमध्यें आशाजनक फरक दिसला तर कृमिनाशक उपायच करावे. तसा फरक न दिसेल तर नंबर ७ ची साहाय्यक योजना करावी. तीहि निष्फळ ठरल्यास रोगी असाध्य आहे असें समजावें; परंतु निराश न होतां सर्व प्रकारें उपाययोजना करीत रहावें.

**रोगलक्षणें वाढण्याचीं कारणें व उपाय**

१७९ ज्या विलयनानें रोगलक्षणें वाढलेलीं दिसतात त्या विलयनाच्या परिणामाचें शमन करण्यासाठीं योजिलेल्या विलयनाचें तिसरें किंवा चवथें विलयन तयार करून तें अगदीं थोड्या प्रमाणांत १०।१५ मिनिटांच्या अंतरानें देत रहावें आणि वाढलेलीं लक्षणें कमी झाल्यावर मागें सांगितल्याप्रमाणें त्याला मानवेल अशा योग्य विलयनाची योजना करावी, किंवा शामक उपाय म्हणून चमचाभर लिंबाचा रस किंवा त्याचें ७।८ तोळे सरबत करून द्यावें.

**औषध तीव्र झाल्यास शामक योजना**

१८० एकाद्या रोग्याला दिलेल्या कोणत्याहि विलयनाच्या योगानें इत

लक्षणें कमी होऊन शैत्य वाढत आहे असें दिसेल तर किंवा रोग्यास पाण्याचा तिटकाराच आला असेल किंवा प्रवासादिक करणामुळें विलयन करण्याची गैरसोय असेल तर विलायनाऐवजीं सुक्या गोळ्याच द्याव्या. प्रथम विलयन घ्यावयाचें असेल तर ठराविक वेळीं १।१ गोळी द्यावी. द्वितीय विलयनाचेऐवजीं दुप्पट वेळानें १।१ गोळी द्यावी. विलयनाच्या गोळ्या असल्यास त्या विलयनाऐवजीं त्याची १।१ गोळी द्यावी. लहान मुलांना गोळ्याच देणें बरें.

**गोळ्याच केव्हां द्याव्या**

१८१ रोग्याला औषध देण्याच्या वेळा ठरविणें, हें रोगाचा तीव्रपणा, त्याच्या परिणामाचें स्वरूप, वाढीची गति आणि नवेजुनेपणा यांच्या अनुरोधानें ठरवावें लागतें. रोगाची वाढ झपाट्याची असेल व त्याच्या योगानें रोग्याला असह्य यातना होत असतील किंवा सांथीच्या विकारानें अथवा विषारानें रोग्यावर तात्काळ दुष्परिणाम होण्याची भीति असेल तर ५।५ मिनिटांनीं सुद्धां सुक्या गोळ्या किंवा लहान चमचा चमचा औषध देत जाणें आवश्यक असतें. विकाराचा जोर जसजसा कमी होत जाईल त्या मानानें ही वेळ वाढवीत ३-४ तासपर्यंत न्यावी. विकार फारसा जोराचा नसेल आणि त्या विकारामुळें रोग्याचे नित्य व्यवहार अडत असतील अशा विकारांत औषध देण्याच्या वेळा ५-६ तासांच्या अंतरानें ठराविण्यासहि हरकत नाहीं. मात्र जेवण झाल्याबरोबर लगेच किंवा गाढ झोंप लागली असतां झोपेंतून जागें करून औषध देऊं नये.

**औषधाचें प्रमाण व वेळा**

१८२ कोणत्याहि वेळीं विलयन देण्याचें प्रमाण वयमानानें अर्ध्या तोळ्यापासून १ तोळापर्यंत असावें. जास्त देऊं नये. हें इतकें औषध प्रकृतीचा क्षोभच करितें असें दिसेल तर तें निम्में प्रमाणानें देत जावें. त्यानेंहि क्षोभच होतो असें दिसेल तर रोग्याचा नैसर्गिक प्रकृतिधर्म कोणतेंहि विलयन सहन करण्यास असमर्थ झाला आहे असें समजून त्याला सुक्या गोळ्याच द्याव्या. वात किंवा मिश्र प्रकृतींच्या बाबतींत असें करण्याचा प्रसंग येण्याचा संभव असतो.

**औषधानें प्रकृति-क्षोभ झाल्यास योजना**

१८३ रोग्याच्या मलोत्सर्जनक्रिया नीट चालत नसल्यास, त्याला जेवणापूर्वी पंचम निष्पत्तीच्या, दोन ते पांचपर्यंत गोळ्या घोटभर पाण्यांतून द्याव्या.

**मलोत्सर्जनार्थ उपाय**

यानेंहि मलमूत्रोत्सर्जनक्रिया व्यवस्थित चालू झाल्या नाहींत, किंवा पोटांत उष्णता फार वाढल्यामुळें खडी धरत असेल तर ज्योतिष्मतीचें प्रथमविलयन दिवसांतून ३।४ वेळां द्यावें, म्हणजे आंतड्यांतील उष्णता शमन पावून त्या क्रिया व्यवस्थित सुरू होतील. कोणत्याहि कारणानें रेचकें देऊं नयेत. फारच खडी धरत असल्यास रेचक देण्यापेक्षां एनिमा (बस्ति) द्यावा.

१८४ कोणत्याहि रोग्याला एकीहून अधिक निष्पत्ति देण्याची आवश्यकता असेल तर विलंबी विकारांत त्या आळीपाळीनें द्याव्या.

**एकाहून जास्त औषधें कशीं द्यावीं**

अविलंबी विकारांत एकत्र दिल्या तरी हरकत नाहीं. विलयन करितांना एकीहून जास्त निष्पत्ति घालावयाच्या असल्या तरी, मागें सांगितल्याप्रमाणें ६ औंसच पाणी घ्यावें. जास्त घेण्याची जरूर नाहीं.

१८५ ज्या विकारांत शूल किंवा वेदना होतात, त्या विकारांवर पोटांत औषध द्यावेंच; शिवाय बाह्यतः विद्युत्चा उपयोग करून रोग्याला होणाऱ्या यातना शक्य तितक्या लवकर शमन होण्याची तजवीज करावी. या वेदना सुरू असतां, त्याच्या मेंदूला त्रास पोंचून तो अशक्त होतो आणि

**पोटांतील औषधास साहाय्यक योजना**

त्यामुळें त्याच्या रोगनाशकधर्मांत व्यत्यय येऊन गुण येण्याला फार विलंब लागतो. म्हणून ह्या वेदना बंद करण्याकडे विशेष लक्ष पुरवावें. त्याचप्रमाणें रोग्याच्या मानसिक व्यथेमुळेंहि औषधाचा गुण लवकर येण्यास फार अडचण पडते. म्हणून त्या दूर करण्याचे प्रयत्न सुद्धां रोग्याच्या इष्टमित्रांनीं अवश्य केले पाहिजेत.

१८६ रोग्याची प्रकृति सुधारत चालल्यावर, औषधाचें जें विलयन सुरू

**सुधारणेबरोबर औषधांत फरक**

असेल तें क्रमानें स्थूल करीत जावें. म्हणजे तिसरें विलयन सुरू असेल तर दुसरें करावें. मध्यंतरीं जरूर तर कांहीं दिवस दरम्यानचें २॥ वें हि करण्यास हरकत नाहीं. असें केल्यानें गुणाचा क्रम अव्याहत दिसत राहील.

१८७ योजिलेल्या निष्पत्तीचें वरीलप्रमाणें प्रमाण वाढवीत वाढवीत त्या निष्पत्तीच्या ५।७ गोळ्याहि एकदम एकाच वेळीं पाण्यांतून घेतल्या असतां, त्याच्या योगानेंहि प्रकृतीचा क्षोभ होत नाहीं असें दिसेल त्या वेळीं नैसर्गिक प्रकृति पूर्ण जोरदार बनली असें मानावयास हरकत नाहीं.

**निकोप झाल्याचें लक्षण.**

१८८ विद्युत्‌चा बाह्योपयोग करावयाच्या वेळीं, जरूरीपुरतें विलयन निराळ्या स्वच्छ भांड्यांत काढून घेऊन बाटली बंद करून ठेवावी. उघडी राहूं देऊं नये. त्याचा उपयोग करितांना तें बोटानें लावावें किंवा कापसाची घडी किंवा वस्त्राची घडी भिजवून ठेवावयाची असेल तेथें ठेवावी. बोटाचा उपयोग केला असल्यास तें स्वच्छ धुतल्याखेरीज पुन्हां त्यांत बुडवूं नये. त्याप्रमाणेंच घडीहि घट्ट पिळून घेऊन शक्य तितकी सबंध औषधांत न बुडवितां अन्य रीतीनें भिजवून घ्यावी.

**विद्युत्‌चा उपयोग**

१८९ विद्युत्‌चा उपयोग करितांना शरीराचे धन व ऋणभाग व मर्मस्थानें परिच्छेद १६६ मध्यें दाखविलीं आहेत व आकृतीमध्यें अंकांनीं दाखविलीं आहेत तीं पाहावीं.

**मर्मस्थान लक्षांत घेणें**

१९० सं. चि. पद्धतीचीं हीं औषधें सुरू असतां इतर दुसरीं कोणतीहि औषधें देऊं नयेत.

**इतर औषधें**

१९१ एकाद्या औषधानें प्रकृतिधर्माचा क्षोभ झाल्याचें दिसेल तर व तें असह्य असेल तर त्याच्या तात्कालिक शमनासाठीं फक्त कागदी लिंबाचें सरबत द्यावें. इतर वेळीं औषध सुरू असतां त्याचा उपयोग करूं नये.

**क्षोभशमन**

१९२ औषध सुरू असतां अफीण, गांजा, दारू अशा प्रकारचे कडक अंमल कधींहि करूं नयेत. तसेंच औषध घेतल्यानंतर लगेच चहा किंवा तमाखू यांचें सेवन करूं नये व त्यांची संवय असल्यास ती शक्य तितकी मोडावी.

**कुपथ्य**

## १९३ शरीरांतील पंचतत्त्वांचें कार्य व संबंध.

| | पृथ्वी | आप | तेज<br>जड व सूक्ष्म | वायू | आकाश |
|---|---|---|---|---|---|
| वर्ग | जड व दृश्य स्थिर व ग्राहक | जड व दृश्य चर व प्रवाहक | उभयधर्मी | सूक्ष्म अदृश्य, चर, प्रवाहक | सूक्ष्म, अदृश्य, स्थिर, ग्राहक |
| शरीरांतील प्रमुख भाग | अस्थि | वसादिरस | उष्णतारूप | प्राणवायु | पोकळी |
| शरीरपोषक द्रव्यरूप | अन्न | पाणी | अन्नादिकांत उष्णता प्रकाश | श्वासवायु | विश्रांति, निद्रा |
| कार्येंद्रिय | जठर | हृदय | यकृत प्लीहा | फुफ्फुसें | मेंदू |
| ग्रहणीय रस | अन्नरस | वसारस | अशुद्धरक्त व तेजयुक्त वायु | शुद्धरक्त | ज्ञानरस |
| प्रागतिकरस | वसारस | अशुद्धरक्त | शुद्धरक्त | ज्ञानरस | जिवनशक्ति ( जीवनरस ) |
| कार्यक्षेत्र | वसावाहिन्या व वसाग्रंथी | अशुद्ध-वाहिन्या | शुद्धवाहिन्या | ज्ञानतंतू | शरीर |
| प्राण | अपान | समान | उदान | प्राण | व्यान |
| प्राणकेंद्र | मलाशय | नाभी, पक्वाशय | कंठ, हृदय व शिरोभागाचा मध्य | हृदयापासून शिरोभाग | मेंदुत्रय |
| कार्यक्षेत्र ( प्राणाचें ) | वसावाहिन्या व अनिच्छावर्ती स्नायू | अशुद्ध-वाहिन्या व इच्छावर्ती स्नायू | शुद्धवाहिन्या स्नायू व ज्ञानतंतु | ज्ञानतंतु इच्छित क्रियाकारक | अनिच्छित क्रियाकारक ज्ञानतंतु |
| कर्मेंद्रिय | गुद | जननेंद्रिय | पाय | हात | तोंड |

| | पृथ्वी | आप | तेज<br>जड व सूक्ष्म | वायू | आकाश |
|---|---|---|---|---|---|
| कर्म | मलोत्सर्जन | मूत्रादि उत्सर्जन | चालणें | ग्रहण | शब्दोच्चार क-रणें व खाणें |
| ज्ञानेंद्रिय | घ्राण | जिव्हा | चक्षु | स्पर्शेंद्रिय ( त्वचा ) | कान |
| ज्ञानकर्म किंवा विषय | गंधज्ञान | रसज्ञान | पाहाणें | स्पर्शज्ञान | श्रवण (ऐकणें) |
| अंतःकरण | अहंकार | नियुक्तमन | सदसद्विवेक बुद्धि | प्रयोगीमन | आत्मा (जीव) |
| अंतःकरण कार्य | अभिमान | चिंतन | निश्चय | संकल्प विकल्प इच्छा | स्फुरण ( आत्मा ) |
| उत्सर्गरूप | मल | मूत्र | पित्त, ज्वर | उच्छ्वास व | निद्रानाश ( अस्वास्थ्य ) |

# आयुर्वेदाचीं मूलतत्त्वें

# व

# जीवितशास्त्र आणि संजीवनचिकित्सा.

१९४ मनुष्यप्राणि हा जन्मल्यापासूनच उपाययोजनांच्या चक्रव्यूहांत सांपडलेला असतो. क्षुधा, तृषा, शीतोष्ण, कृमिकीटकांचा उपद्रव इत्यादिकांपासून होणाऱ्या दुःखसंवेदनांच्या निवारणाच्या उपाययोजना नित्य निर्वाहक म्हणून आणि दाहशूलादिक लक्षणांनीं उत्पन्न होणाऱ्या रोगांच्या निवारणासाठीं प्रासंगिक उपाययोजना करणें ही गोष्ट मानवीसृष्टीला अपरिहार्य होऊन बसलेली आहे. आपलें जीवित सौख्यमय व चिरकालिक असावें ही मनुष्याची स्वाभाविक इच्छा असल्यामुळें, कोणतीहि उपाययोजना सौख्यनाशक आणि जीविताला घातक न होईल अशा प्रकारची असणें आवश्यक असतें. मनुष्याचा जन्म निसर्गनियमबद्धपणानें होत असतो, अर्थात् त्याचें अस्तित्वहि निसर्गनियमबद्ध असलें पाहिजे हें उघड असल्याकारणानें, प्राचीन आर्य तत्त्ववेत्त्यांनीं जीवमात्राच्या जीवितासंबंधीं ही निसर्गनियमबद्धता काय आहे, याविषयीं जी मीमांसा लाविलेली आहे, तिच्या आधारें जीवितशास्त्ररूपानें येथपर्यंत दिग्दर्शन करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यावरून सारांशरूपानें पुढीलप्रमाणें जो निष्कर्ष निघतो तो विचारपूर्वक लक्षांत घेतला असतां, कोणालाहि कोणत्या प्रकारची उपाययोजना योग्य आणि कोणत्या प्रकारची अयोग्य होय हें सहज ठरवितां येण्यासारखें आहे.

**आरोग्यासाठीं उपाययोजना**

१९५ घटनाकारिणी शक्ति एका अव्यक्त गुणघटकाशीं तादात्म्यता घेऊन अंशरूपानें स्वतः जीवभूतपणानें दुसऱ्या पंचमहाभूतात्मक गुणघटकांना आकर्षण करून घेते व त्या गुणघटकांशीं त्यांचें एकीकरण करून त्याला संवर्धित करिते. ह्याच रीतीनें उत्तरोत्तर अधिकाधिक घटक आकर्षून व त्यांचें एकीकरण करीत जाऊन त्याला अधिकाधिक

**पूर्वीच्या विवेचनाचा सारांश**

व्यक्तरूप देण्याचें ती कार्य करीत असते. ह्या कार्याचें पर्यवसान शरीर ह्या व्यक्त रूपानें प्राण्याचा जन्म होण्यांत होत असतें. जन्मानंतरहि अधिकाधिक सुदृढपणानें संवर्धन करीत असण्याचेंच कार्य तिच्याकडून होत असतें व त्याच्याच योगानें त्या प्राण्याचा जिवंतपणा व्यक्त होत असतो. हें सर्व घटनाकार्य कसें चाललें आहे तें दिसत नाहीं. परंतु त्याला पंचमहाभूतात्मक घटनासाहित्याची आवश्यकता असते. तें संपादन करण्याकरितां प्रयोगी

**प्रयोगी मंडळ दुय्यम व जीवनशक्तिप्रमुख**

मंडळ, ज्ञानेंद्रिय व कर्मेंद्रियें यांची घटना तिनें केलेली असते. प्रयोगी मनाच्या चालनेखालीं ह्या इंद्रियांचे व्यापार चाललेले असतात व तेच उघड दिसत असतात. त्यांनीं केलेल्या आहारविहारादिकांमुळें अंतर्गत संवर्धनप्रमुख कार्य चालत असतें, परंतु तें मन व बाह्यकर्में यांच्या कर्तृत्वामुळें घडतें असें भासतें व त्यामुळें मन आणि त्याच्या सत्तेखालील इंद्रियें हींच मुख्य आहेत अशी समजूत होते. परंतु वास्तविक ही समजुतीची दिशाभूल झालेली आहे.

१९६ जीवनशक्ति हीच जीवरूप बनलेली असल्यामुळें, जीवशरीराचा प्रत्येक घटक सजीव म्हणजे जीवनशक्तियुक्त असणें हेंच तिच्या अस्तित्वाचें द्योतक आहे. एकहि शक्तिहीन घटक ती घटनेमध्यें ठेवीत नाहीं. तो तात्काळ

**जीवनशक्तीचें संरक्षणकार्य**

शरीराबाहेर उत्सर्जित करून टाकण्याच्या मार्गाला लावीत असते. शरीरसंवर्धनाला जे नवे घटक घ्यावयाचे ते जीवनशक्तियुक्त पाहिजे असतात. शिवाय ते शरीरघटनारंभींच्या घटकांच्या समान व सजातीय गुणधर्माचे पाहिजे असतात. कारण धारण केलेलें शरीरघटनावैशिष्टय रक्षण करावयाचें हा घटनाशक्तीचा व्यक्तिवैचित्र्यनिदर्शनाचा नियम आहे. त्यामुळें शक्तिहीन आणि व्यक्तिवैशिष्टयप्रतिकूल अशीं शक्तियुक्त द्रव्येंहि घटनेला विजातीय म्हणून तिला तीं शरीराबाहेर उत्सर्जन करावीं लागतात. ह्यासाठीं तसें करितां येण्यायोग्य संरक्षकघटना तिनें अगोदरच बनवून ठेविलेली असते. घटनावैशिष्टयरक्षणाच्या नियमामुळेंच नित्य निर्वाहक अन्नादि पदार्थ सेवनानंतर त्यांतील कित्येक द्रव्यें मलमूत्ररूपानें उत्सर्जित केलीं जात असतात. आणि त्यामुळेंच आरोग्यनिदर्शक स्वाभाविक लक्षणें अनुभवास येत असतात.

ज्या पदार्थांच्या सेवनामुळें अस्वाभाविक लक्षणें उत्पन्न होतात तें पदार्थ अर्थातच आरोग्याला बाधक म्हणजे सुदृढ शरीर-संवर्धनाला विजातीय असतात. त्यामुळेंच असले पदार्थ निर्वाहक योजनेंत वर्ज्य व त्याज्य ठरलेले आहेत. आरोग्याला जें बाधक तें केव्हांहि आरोग्य-नाशकच होणार हें उघड आहे. म्हणून जीवनशक्ति तें घटनेमध्यें संमिश्र करीत नाहीं व त्याला उत्सर्जित करूं लागते; त्यामुळें अस्वाभाविक लक्षणें होत असतात. जीवितसंबंधीं जीवसृष्टीच्या उत्पत्तीची व अस्तित्वरक्षणाची अशी निसर्गनियमबद्ध स्थिति आहे. यासाठीं नित्य निर्वाहक म्हणून उपयोगांत आणावयाचे किंवा रोगनाशक प्रासंगिक म्हणून उपयोगांत आणावयाचे पदार्थ निरोगी स्थितींत बाधक नसणारेच असले पाहिजेत. याकरितां विजातीय द्रव्यांची शरीरांत भर घालून त्यांच्या उत्सर्जनाकडे जीवनशक्तीचा व्यय करणें हितकर नाहीं.

**आरोग्याला बाधक गोष्टी**

प्रयोगीमनाचा अविचारीपणा, हवापाण्याचा, दोष किंवा दुसऱ्यांचा संसर्ग इत्यादि अनेक कारणांमुळें शरीरांत विजातीय द्रव्यांचा प्रवेश होऊन त्यांचा शरीराच्या कांहीं भागामध्यें रसादि क्रियांच्या प्रवाहाबरोबर प्रसार होऊं लागतो. तो थांबवून त्यांचें उत्सर्जन करण्याची संरक्षकक्रिया जीवनशक्तीला सुरू करावी लागते. त्या कामीं तिचा व कार्यशक्तींचा व्यय होऊं लागतो व त्यांना दुर्बलता येऊं लागते. ही क्रिया सुरू झाली म्हणजे दाहशूलादि अस्वाभाविक लक्षणें होऊं लागतात. अशा वेळीं प्रासंगिक उपाययोजना करणें आवश्यक असतें. वास्तविक ही उपाययोजना म्हणजे जीवनशक्ति व कार्यशक्ति यांचा जो व्यय होत असतो तो होऊं न देणारी, झालेला भरून काढणारी आणि विजातीय द्रव्यांचें उत्सर्जन ज्या प्रकारें जीवनशक्ति करीत असेल त्याला विरोधक न होतां सहाय्यकच होईल अशा स्वरूपाची करणें आवश्यक व हितावह असतें. परंतु जीवितविषयक निसर्गनियमबद्धतेची वरील कल्पना व जाणीव मनुष्याला स्वाभाविकपणें नसते, त्यामुळें **रोगकारणें** नष्ट करण्याऐवजीं **रोगलक्षणें** नष्ट करणें म्हणजेच रोगनाश करणें असें मनुष्याला वाटतें व या समजुतीच्या आधा-

**उपाययोजनेचें स्वरूप**

रावरच मुख्यतः अनुभवसिद्ध वाटणाऱ्या आणि सांप्रत प्रचारांत असलेल्या अनेक प्रकारच्या औषधीयोजना करण्याचा परिपाठ पडलेला आहे.

१९७ आमची अति पुरातन अशी एतद्देशीय **आयुर्वेदिक चिकित्सा पद्धति** प्राचीन आर्य तत्त्ववेत्त्यांनीं लाविलेल्या ह्याच जीविताविषयक मीमांसेच्या पायावर मुळांत उभारलेली होती. वाग्भटादि ग्रंथांत निदान व चिकित्सेला आधारभूत म्हणून दिलेल्या कित्येक प्रमाणभूत अशा नियमदर्शक वाक्यांवरून ही गोष्ट उघड दिसत आहे. आम्ही ज्याला **जीवित** असें म्हणतों त्या स्थितीलाच **आयुः** हा शब्द उपयोगांत आणिलेला आहे. जीवित किंवा

**आयुर्वेद म्हणजेच जीवितशास्त्र**

आयु ह्या संबंधींचें ज्ञान म्हणजे वेद तो **आयुर्वेद** होय. "**शरीरेंद्रियसत्त्वात्मसंयोगोधारि जीवितम् । नित्यगश्चानुबंधश्च पर्यायैरायुरुच्यते ॥१॥** अशी आयुः ह्या शब्दाची व्युत्पत्ति दिलेली आहे. आत्मा हा "**नित्यः सर्वगतः स्थाणुः ।**" असा आहे. तो स्वतः कांहीं करीत नाहीं. त्याची शक्ति ( आदिशक्ति—चैतन्यशक्ति ) ही त्याच्या आधारानें सर्व कांहीं करीत असते. आत्म्याचा शरीराशीं संयोग तिच्याखेरीज झालेला नाहीं व शरीरहि इंद्रियांसहित दुसऱ्या कोणी केलेलें नाहीं. तिचें आत्म्यासह शरीरांत अस्तित्व असल्याशिवाय जीवित प्रतीतीस येणें शक्य नाहीं; अर्थात् **जीवित किंवा आयुः संबंधींचें ज्ञान** म्हणजेच **आयुर्वेद** हा ह्या श्लोकाचा अर्थ होतो. रुग्णस्थिति कशाला म्हणावयाची? "**रोगस्तु**

**रोग म्हणजे काय व त्याला उपाय**

**दोषवैषम्यं**"—वात, पित्त व कफ यांचें शरीरघटनेमध्यें जें वैशिष्ट्यपूर्ण प्रमाण असावयाचें तें बदलणें हा रोग. त्याप्रमाणेंच "**सर्वेषामेव रोगाणां कारणं कुपिता मलः ।**"—मल म्हणजे शरीरघटनेला निरुपयोगी व टाकाऊ अशीं विजातीय द्रव्यें शरीरांत संचित होऊन कुपित होणें म्हणजे उत्सर्जित केलीं न जाणें हें रोगाचें कारण सांगितलेलें आहे, असेच उल्लेख असलेले आढळतात. सुमारें चाळीस वर्षांपूर्वी नुकत्याच सुरू झालेल्या एका आयुर्वेदीय पुस्तकामध्यें, अतिप्राचीन काळीं रोगनाशक औषधोपचार कांहीं वनस्पतींचें दर्शन, स्पर्शन, सान्निध्य, अवघ्राण आणि क्वचित् रसपान अशा प्रकारांनीं करीत असत अशी माहिती दिलेली होती. तसेंच

कै. श्री. प्रभाकर बाळाजी ओगले यांनीहि आपल्या चिकित्साप्रभाकर या ग्रंथांत प्रस्तावनेमध्यें वैद्यशास्त्रोत्पत्तिविषयीं लिहितांना अशाच स्वरूपाची माहिती दिली आहे. ह्यावरून हें उघड दिसतें कीं जीवनशक्तीला अशा प्रकारची तिच्या समान सूक्ष्म प्रमाणानेंच शक्तिरूपी मदत पाहिजे असते व पुरेशी असते. अशा वनस्पति अर्थातच अगदीं थोड्या व निवडक असणार. परंतु वाग्भटामध्यें उल्लेखिल्याप्रमाणें त्या " **बहुकल्पं बहुगुणं संपन्नं योग्यमौषधम्** " दर्शनादि अनेक प्रकारांनीं, अनेक गुणदायक व शक्तिसंपन्न असल्याशिवाय अनेक रोगनाशक असूं शकणार नाहींत. या प्रमाणेंच " **प्रयोगःशमयेद्व्याधिमन्यमन्यमुदीरयेत् । नासौ विशुद्धः शुद्धस्तु शमयेद्यो नकोपयेत् ॥** " म्हणजे एका व्याधीचें शमन करून दुसऱ्या व्याधि उत्पन्न करील असा औषधीप्रयोग विशुद्ध नाहीं. तर व्याधीचें शमन करणारा असून दुसरा व्याधि न वाढविणारा औषधीप्रयोग हाच शुद्ध होय. तसेंच लंघनपाचनादि उपायांनीं रोग ( विजातीय द्रव्यें ) दाबून ठेवणें बरें नाहीं, तें उलटण्याचा संभव असतो म्हणून वमनविरेचनादि उपायांनीं उत्सर्जनच केलें पाहिजे, असें सांगितलेलें आहे. मनुष्याला जीवितरक्षणासाठीं खाद्यपेयविशिष्ट पदार्थसेवन करावयाचे असतात. त्यांच्या सेवनानें घटना व शक्ति वाढविणें हें कार्य साधून घ्यावयाचें असतें. असे पदार्थ पंचात्मक असतात, मुखानें सेवन करण्याच्या अशा पदार्थांना रसमय पदार्थ असें म्हणण्यांत येतें. ह्या रसाचे गोड, आंबट, खारट, कडू, तिखट, तुरट असे सहा भेद आहेत म्हणून त्यांना षड्रस म्हणतात. दोषसाम्य म्हणजे अरोगता रक्षण करितील अशा योग्य प्रमाणांत हे सहाहि रस सेवन केले पाहिजेत. कारण पहिले तीन वातदोषशामक परंतु कफदोषवर्धक, तर याच्या उलट दुसरे तीन कफदोषशामक परंतु वातदोषवर्धक असतात. त्याचप्रमाणें तिखट, आंबट व खारट हे तीन पित्तवर्धक तर राहिलेले गोड, कडू व तुरट हे पित्तशामक आहेत ह्या रसगुणधर्मानुसार वाढलेल्या दोषांचें शमन म्हणजे क्षीण झालेल्या दोषांचें संवर्धन करून दोषसाम्य म्हणजे निरोगीपणा उत्पन्न करण्याचा चिकित्सामार्ग आयुर्वेदोत्पत्तिकाळीं दर्शित केलेला होता. शिवाय हे रस म्हणजे नुसते दोषवर्धक किंवा केवळ शामक धर्माचेच नसून ते कमिअधिक प्रमाणांत शक्तिदायक आहेत असेंहि सांगितलेलें आहे. ह्यावरून आयुर्वेदो-

त्पत्तिकाळीं दोषसाम्य घडविणाऱ्या शक्तियुक्त रसांचा उपयोग करण्याचें धोरण उपाययोजनेमध्यें ठेविलेलें होतें हें उघड दिसतें.

**अयोग्य औषधांची कारण-मीमांसा**

१९८ प्रासंगिक उपाययोजना करितांना दोषसाम्य घडवून आणण्याचें धोरण मुख्य असतें. परंतु वाढलेल्या दोषाच्या विरोधी रसद्रव्याची निवड करण्याकडे लक्ष ठेवावें लागतें. त्यामुळें विरोधी उपाययोजना करणें हीच कल्पना मनांत रूढ होऊन ती दृढ होऊं लागते व त्वरित गुण यावा या हेतूनें तीव्रपणानें इष्ट गुणदायक द्रव्याचा उपयोग करून पाहाण्याचा मोह पडून त्या द्रव्यामध्यें शक्तिदायित्व आहे कीं नाहीं हें पाहाण्याकडे दुर्लक्ष होतें. रससाम्य दिसणारे सर्वच पदार्थ शक्तिदायक (जीवनशक्तिदायक) असतातच असें नाहीं, तर कांहीं घातकहि असतात. तो घातकपणा नाहींसा करण्यासाठीं त्याच्या जोडीस दुसऱ्या तद्विरोधी द्रव्याची योजना केली जाते. अशा तऱ्हेचीं संहारशक्तियुक्त किंवा विषमय खाद्यपेयोपयोगी वाटणारीं परंतु निरोगी मनुष्यालाहि रोगग्रस्त करणारीं द्रव्यें, जीविताच्या रक्षणाला वास्तविक अनवश्यकच नव्हे तर केवळ घातक असतात. परंतु अशा प्रकारच्या द्रव्यांचा रोगनाशासाठीं म्हणून मुख्यतः उपयोग केला जात आहे. त्यापासून गुण आल्याचा अनुभव येतो तो कसा ? असा प्रश्न विचारला जातो. जीवितविषयक निसर्गनियमबद्धता लक्षांत घेतां असें दिसून येईल कीं, आपण रोग म्हणून ह्मणतों तें जीवनशक्तीनें शरीरांतून विजातीय द्रव्य उत्सर्जित करून टाकण्याचें सुरू केलेलें कार्य असतें. त्या कामीं जीवनशक्ति व कार्यशक्ति यांचा व्यय होत असतो. अशा प्रसंगीं आणखी पडलेली विजातीय द्रव्यांची भर उत्सर्जन करण्याला ती असमर्थ असते म्हणून सुरू असलेलें संरक्षककार्य थांबवून नव्या विजातीय द्रव्याचा प्रसार न होऊं देण्याची खबरदारी ती घेऊं लागते. दोन्हीहि द्रव्यांचें उत्सर्जन होणें शक्तीच्या अभावीं अशक्य असल्याकारणानें तीं द्रव्यें नित्यक्रियांना अडचण होणार नाहीं अशा ठिकाणीं संग्राहक संरक्षणक्रियेनें संचित

करून ठेविते. * त्यामुळें पूर्व रोगलक्षणें नष्ट होऊन गुण आलेला दिसतो. तथापि शक्तिहीनता वाढते व त्यासाठीं शक्तिवर्धक औषधोपचार करण्याची आवश्यकता उत्पन्न होते. आरोग्यसंपन्नस्थिति राहण्याला शरीरांतील प्रत्येक घटक शक्तिसंपन्न असावा लागतो. त्यांत संचित झालेलीं हीं विजातीय द्रव्यें संहारशक्तियुक्त असल्यामुळें जीवनशक्तीला दौर्बल्य आणीत असतात. शक्तिसंपादनाभावीं वाढत्या दौर्बल्याचा परिणाम जीवनशक्तीच्या व त्याबरोबरच जीविताच्या नाशांत होणें ह्याशिवाय दुसरें कांहीं होणें संभवत नाहीं. अशा औषधाच्या सेवनानें ओढवलेलें मरण टळत असलें तरी त्याचा घातकपणा नष्ट होऊं शकत नाहीं. तात्काळ मरण आलें नाहीं तरी आयुर्मर्यादा कमी करण्यालाच तें कारणीभूत होणार ही गोष्ट निश्चित आहे. आयुर्वेदिक चिकित्सापद्धतीहि मूळच्या पायावरून घसरून सांप्रत अशाच प्रकारच्या बहुतक उपाययोजना करण्याकडे घसरत चालली आहे याबद्दल वाईट वाटतें.

---

* परंतु अशीं संचित झालेलीं द्रव्यें शक्तिसंपन्नता व अनुकूल परिस्थिति प्राप्त होईल त्याप्रमाणें जीवनशक्ति ती उत्सर्जनमार्गास लाविते. व त्या वेळीं त्या विजातीय द्रव्यांच्या तत्त्वविशिष्ट गुणधर्मांप्रमाणें रोगलक्षणें उत्पन्न होतात व हा औषधोपचारांचा परिणाम आहे हें लक्षांत न येतां निराळा रोग झाला असें वाटूं लागतें.

# “ संजीवनचिकित्सापद्धति ”

## रोगनिदान आणि उपाययोजना

१९९ या भागांत मुख्य मुख्य रोग, त्यांची कारणें, लक्षणें, आणि संजीवनचिकित्सापद्धतीप्रमाणें त्या रोगांवर औषधांची योजना, हीं देणार आहोंत. ज्याला रोग, आजार अथवा व्याधि असें म्हटलें जातें, तें खरोखर जीवनशक्तीचें शरीरसंरक्षणाचेंच कार्य असतें आणि आपली जीवनशक्ति तें कार्य कोणत्या प्रकारानें व पद्धतीनें अव्याहत करीत असते, याचें विवेचन मागील भागांत विस्तारानें केलेंच आहे. पुष्कळ वेळां आपलें अनियमित किंवा विजातीय खाणेंपिणें, जागणें, श्रमातिरेक व निसर्गविरुद्ध वर्तन हींच आजाराला सामान्यतः कारणें होतात. परंतु कांहीं वेळां आजाराचीं कारणें बाह्य गोष्टींमुळें उत्पन्न होतात व त्यावर आपला ताबा नसतो. तथापि शरीरांतील जीवनशक्ति ही रात्रंदिवस एकनिष्ठ पाहारेकऱ्याप्रमाणें अंतर्बाह्य जागरूक असते, आणि कोणत्याहि प्रकारच्या आजारांत ती आरोग्यसंरक्षणाचा आटोकाट प्रयत्न करीत असते. विजातीय द्रव्यें बाहेर घालविण्याच्या प्रयत्नांत तिला हातभार लावून तिचें कार्य सोपें करणें व तिला सतेज करून तिची रोगप्रतिकारशक्ति वाढविणें हें औषधाचें खरें काम आहे.

**औषधाचें काम**

२०० मनुष्यांतील प्रकृतिभेद पंचात्मक, प्रकृतिचें अधिष्ठान असलेली म्हणून जीवनशक्ति पंचात्मक, शरीरांतील कार्येंद्रियें पंचात्मक, त्यांचें कार्यक्षेत्र ठरलेलें आणि कार्यपद्धति नियमबद्ध व सुसूत्र असते, असें ठिकठिकाणीं आतांपर्यंत सांगितलें आहे. आजार हें जीवनशक्तीचें संरक्षणात्मक कार्य असतें असें आपण म्हणतों. मग अनेक व्याधि, त्यांचीं अनेक कारणें व अनेक लक्षणें, निरनिराळी औषधयोजना, यांत विस्तारानें काय सांगावयाचें रहातें ! खरोखर पूर्वीचे विवेचनाचा सूक्ष्म विचार केल्यास औषधयोजना ही गोष्ट फार सोपी असावी असें कोणी म्हणेल आणि

**अनेक विकार प्रास्ताविक**

वास्तविक तें खरेंहि आहे. तथापि या बाबतींत थोडा जास्त खुलासा करणें इष्ट आहे.

२०१ विकारांचीं निरनिराळीं दिसणारीं लक्षणें; भाषेच्या वाढीबरोबर त्यावरून पडलेलीं निरनिराळीं नांवें; मुख्यतः रोगलक्षणें शमविण्यावर भर असलेल्या आयुर्वेद, ॲलोपाथी वगैरे चिकित्सापद्धति यांमुळें अनेक रोग व त्यांचीं अनेक लक्षणें, त्यांचे असंख्य पोटभेद व त्यांवर शेंकडों औषधें असा प्रकार आढळतो. आजाराच्या मूळ कारणांवरून व्याधींचीं नांवें पडलीं आहेत. शेंकडों व्याधि आणि त्यांचे शेंकडों पोटभेद यांना स्वतंत्र नांवें भाषेंत प्रचलित झालीं आहेत. अनेक वर्षांच्या संस्कारांमुळें व दृश्य लक्षणें भिन्नभिन्न असल्यामुळें, प्रचलित भाषेप्रमाणें निरनिराळे रोग म्हणण्यांत येतात आणि रोगलक्षणें ज्या स्थानांत प्रत्यक्ष आढळतात त्या स्थानाप्रमाणें बहुशः औषधयोजना केली जाते.

**अनेक विकार व त्यांचीं नांवें**

२०२ संजीवनचिकित्सापद्धतीप्रमाणें, पंचतत्त्वांपैकीं, आजारी मनुष्याच्या कोणत्या तत्त्वांत बिघाड झाला आहे हें ठरवितां आलें आणि त्याच्या जोडीला रोगी कोणत्या प्रकृतीचा आहे, हें ठरवितां आलें म्हणजे काम भागतें. दृश्य लक्षणें कोणत्या स्थानांत आढळतात ही गोष्ट गौण असते. याचा अर्थ दृश्य लक्षणांकडे संपूर्णतेनें कानाडोळा करावा याचा असा नव्हे. बाह्य लक्षणें जीं जीं आढळतील, त्या सर्वांचा एकाच वेळीं विचार करून, विकार होण्याचें मूळ कारण काय, जीवनशक्तीला कोणत्या तत्त्वांत मदत पाहिजे आहे, कोणत्या तत्त्वाच्या कार्यक्षेत्रांत बिघाड झाला आहे व कोणतें कार्येंद्रिय दुर्बळ झालें आहे, रोगाच्या मूळ कारणामुळें एकाद्या तत्त्वाच्या कार्यक्षेत्रावर फार ताण पडून त्यामुळें अन्य तत्त्वांच्याहि कार्यक्षेत्रांवर व कार्येंद्रियांवर कांहीं परिणाम झाला आहे काय, आणि झाला असल्यास किती प्रमाणांत झाला आहे, याचा साकल्यानें विचार करणें जरूर असतें. मुख्यतः हें ठरविण्यासाठींच रोगलक्षणांची छाननी करणें जरूर असतें. चिकित्सा करतांना ध्यानांत ठेवण्यासारखी एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट अशी कीं, शरीराचे सर्व भाग व लहान मोठे सर्व घटक हे अशा तऱ्हेनें एक-

**सं. चि. प. प्रमाणें रोगनिदान**

त्रित झालेले असतात व शरीरांतील जीवनशक्ति अशा एकरूपतेनें शरीर व्यापून राहिलेली असते कीं, शरीराचे कोणत्याहि भागांत बिघाड झाला असला, तरी त्याचा परिणाम शरीराचे अन्य भागांत कमीजास्त प्रमाणांत होत असतो. शरीराचे कोणत्याहि भागावर आघात झाला किंवा कितीहि आकस्मिक रीतीनें एकादे भागांत बिघाड झाला, तरी त्याची जाणीव सर्व शरीरभर होते व त्याचा परिणामहि सर्व शरीरभर होत असतो. ही गोष्ट अगदीं साधी दिसली तरी चिकित्सेसारख्या महत्त्वाचे बाबतींत ती पुष्कळ वेळां दृष्टीआड होत असते. उदाहरणार्थ—कपाळ दुखत असलें तर फक्त कपाळावर उपाययोजना केली जाते. डोळे कान, नाक किंवा दांत यांचे विकारांत, केवळ त्या त्या इंद्रियांवर उपाययोजना केली जाते; सूज, धांवरें, अंतर्गळ अशा विकारांवर केवळ दूषित स्थानांवर उपाययोजना केली जाते. बाह्य उपाधींमुळें क्वचित् होणारी खरूज कांटा अशा सारख्यांवर स्थानिक योजना करणें एकादे वेळीं योग्य असलें, तरी डोळा, नाक, कान, दांत, सुजलेले अवयव हे शरीराचे जणूं स्वतंत्र अलग असे अवयव असावे; त्यांचा रक्ताभिसरणाशीं आणि पंचात्मक शरीराचे अन्य भागांशीं कांहींच संबंध नसावा; अशा भावनेनें उपाययोजना केली जाते ती केव्हांही सदोषच होय. सं. चि. पद्धतीला हें संमत नाहीं.

२०३ वस्तुतः एकाद्या भागाला सूज येते त्या वेळीं वसाग्रंथी अथवा वसावाहिन्या दूषित झालेल्या असतात किंवा कोणत्या तरी कारणानें रक्ताभिसरणाला अडथळा येतो, त्यामुळें अशुद्धाचें शुद्ध रक्त बनण्याची क्रिया नीट चालत नाहीं व दोषसंचय होऊन सूज येते. याच कारणानें कांहीं वेळां गळवें होतात; वसारस व रक्त यांमध्यें वारंवार अशुद्धपणा वाढत गेल्यामुळें बरेच दिवसांच्या परिणामानें गंडमाळेसारखे विलंबी विकार होतात. अशाच तऱ्हेचा दोषसंचय डोळ्यांचे भागांतील वसावाहिन्या व रक्तवाहिन्या यांत झाल्यास, डोळ्यांना लाली, खुपऱ्या, दृष्टिमंदत्व वगैरे निरनिराळे नेत्ररोग होतात; कानांचे भागांत विशेष दोषसंचय झाल्यास कानांचे विकार झाल्याचें आढळतें. वारंवार अपचन होण्यानें वसारस व त्यापुढील प्रागतिक रस दूषित होत जाऊन कोणत्या तरी भागामध्यें लस, पू, होण्याची

**रोगाचें मूळ**

प्रवृत्ति होते; कांहीं वेळां हिरड्या सुजून पायोरिआसारखे दातांचे विकार होतात. परंतु प्रकृतिभिन्नत्वाप्रमाणें अथवा स्थानपरत्वें निरनिराळ्या ठिकाणीं रोगलक्षणें दिसलीं तरी वस्तुतः वरील सर्व विकारांचें मुख्य कारण म्हणजे पचनशक्ति दुर्बल होऊन त्याचा परिणाम वसारस व रक्ताभिसरणक्रिया हीं दूषित होणें हें असतें व त्यामुळें निरनिराळे रोग उत्पन्न झाले असें वाटतें. तथापि या पूर्वींच्या विवेचनावरून एक गोष्ट निश्चित आहे कीं, वरील-सारखीं लक्षणें कोणत्याहि स्थानांत दिसलीं तरी त्यांचें बीज पृथ्वी व जल या तत्त्वांचें कार्य नीट प्रकारें न होणें व त्यांचे कार्यांत अडथळा होणें हें असतें आणि त्या त्या तत्त्वाला सजातीय मदत करणें म्हणजेच खरी उपाययोजना होय. पृथ्वीतत्त्वविशिष्ट प्रथमनिष्पत्तीनें **बरेचसे रोग** बरे होतात; व विशेषतः अभिसरणक्रियेचे म्हणजे जलतत्त्वां-तील बिघाडामुळें उत्पन्न होणारे बरेचसे विकार द्वितीय निष्पत्तीनें बरे होतात. अशा प्रकारें अनेक रोग ( वस्तुतः लक्षणें ) एका औषधानें बरे होतात या गोष्टींतील रहस्य खरोखर वरीलप्रमाणेंच आहे. कोणत्याहि एका तत्त्वांत बिघाड झाल्यास आणि तो बराच काळपर्यंत टिकून राहिल्यास त्याचा परिणाम त्याच्या लगतचें दुसरें तत्त्व दूषित होण्यांत पुष्कळ वेळां होतो व वेळीं त्याच्या नजीकची इतर तत्त्वांचीं कार्यक्षेत्रेंहि दूषित होत जातात. म्हणून लक्षणांवरून कोणत्या तत्त्वामध्यें बिघाड झाला आहे तें ठरवावें लागतें. तथापि लक्षणांचें स्थान ही गौण बाब असते. डोळ्यांच्या निरनिराळ्या विकारांत पृथ्वी अथवा जलतत्त्व यांमध्यें अथवा दोहोंमध्यें बिघाड असल्यास, ज्या-प्रमाणें बिघाड असेल त्या मानानें, पोटांतून नं. १ अथवा २ किंवा योग्य प्रमाणांत दोन्ही दिल्यानें गुण येतो. त्याप्रमाणेंच कानांचे विकारांत पृथ्वी अथवा आकाशतत्त्वांतील बिघाड बहुधा कारणीभूत असतो. म्हणून चपला ज्योतिष्मतीचा बाह्योपयोग व विशेषतः पोटांत नं. १ यांनीं गुण येतो. दातांतून पू किंवा रक्त येत असतें अथवा हिरड्या सुजतात. अशा विकारांत दातांना कितीहि दांतवणें किंवा मूल्यवान् टूथपेस्ट लावली तरी बेताचाच उपयोग होतो. परंतु पोटांत पृथ्वीतत्त्वांचें नं. १ व डोक्यावर ज्योतिष्मतीच्या घड्या अथवा ज्योतिष्मति किंवा सुप्रभेच्या गुळण्या यांनींच खरा टिकाऊ गुण येत असतो.

२०४ रोगपरंपरा कितीहि मोठी दिसत असली तरी मुळांत एकदोन तत्त्वांतच खरा बिघाड कसा झालेला असतो व त्यावर उपाययोजना किती साधी असते हें एकादें उदाहरण देऊन सांगतां येईल. उदा. वारंवार अपचन, अजीर्ण होईल असें खात गेल्यानें किंवा अनियमित आहारानें किंवा भूक-तहान मारल्यानें, अथवा चिंता वगैरेंनीं, प्रथम पचनाक्रिया बिघडते आणि आंतडीं दुर्बल होतात. पचनाक्रिया बिघडताना निरनिराळ्या पाचक रसांचे जरूर ते स्राव कमी अथवा दूषित होत असतात, आणि विशेषतः पृथ्वी व तेज या तत्त्वांच्या कार्येंद्रियांची शक्ति कमी होत जाऊन, विकारलक्षणांच्या परंपरेला सुरवात होत जातें. प्रथम पोटांत वात धरूं लागतो, कांहीं दिवसांनीं बद्धकोष्ठ अथवा संग्रहणी हे विकार होतात व वसारस व वसाग्रंथी या अंशाअंशानें दूषित होत जातात; म्हणजे पृथ्वीतत्त्वांत जास्त प्रमाणांत बिघाड होत असतो. पोटांत वात धरल्यानंतर कांहीं दिवसांनीं रक्ताशयकंप ( हृदयकंप ) होऊं लागतो व गलबलल्यासारखें होऊं लागतें, म्हणजेच त्याचा जलतत्त्वावर परिणाम होऊं लागतो आणि तो सतत होत गेल्यास ज्ञानतंतूंचा दाह होऊं लागतो. त्यामुळें वारंवार बेचैनपणा, झोप न येणें, डोळ्यांची व हातापायांची आग होणें, डोळ्यांपुढें अंधेरी येणें, वगैरे विकार होऊं लागतात. म्हणजेच वायुतत्त्वाच्या कार्यक्षेत्रांतहि उत्तरोत्तर बिघाड होऊं लागतो. कांहीं वेळां जल व वायु या तत्त्वांच्या कार्यांत जास्त बिघाड न होतां, तेजतत्त्वाच्या कार्यक्षेत्रांतच जास्त बिघाड होत गेल्यास, ताप येणें, पित्ताच्या वांत्या, कावीळ, चक्कर येणें वगैरे रोग झाल्याचें आढळतें. परंतु मुख्य रोगबीजें, पृथ्वीतत्त्वातील दोषांमुळें उत्पन्न झालेलीं असल्यामुळें वरील सर्व विकारांत पृथ्वीतत्त्वांचें सजातीय असें नं. १ हेंच औषध मुख्य होय व त्याच्या जोडीला जल, तेज,अथवा वायु या तत्त्वांच्या दोषांच्या प्रमाणांत कमीअधीक नं. २, ३ व ४ यांचा अधूनमधून उपयोग केल्यानें वरील रोग निःशेष बरे होतात. अशा रीतीनें, **संजीवनचिकित्सा** पद्धतीच्या तत्त्वाप्रमाणें, रोगांचें बीज कोणत्या तत्त्वांतील बिघाडांत आहे तें ठरविणें आणि प्रकृतिधर्मानुसार एक व त्याच्या जोडीला दुसरें एकादें औषध देणें,

**रोगबीज व रोगपरंपरा. उदाहरणें**

हें केलें म्हणजे बिनचूक उपाययोजना झाली. प्रचलित भाषेंतील **रोगाचें नांव ठरवितां आलें नाहीं** किंवा **अमुक रोग असें म्हणतां आलें नाहीं** तरी त्यावांचून अडत नाहीं. चिकित्सा करणारानें **कोणत्या तत्त्वांतील बिघाडामुळें** लक्षणें उत्पन्न झालीं आहेत आणि कोणत्या तत्त्वांचें कर्मेंद्रिय व कार्यक्षेत्र दोषांनीं व्यापलें गेलें आहे हें पाहिलें म्हणजे झालें. याप्रमाणें असंख्य विकार असले तरी पंचतत्त्वाच्या साच्यांत ते कोठें बसतात, हें निश्चित केलें म्हणजे काम भागतें. मात्र. चिकित्सा सुरू असतांना, अन्य क्षेत्रावर मूळ दोषांचा परिणाम घडतो आहे किंवा काय, घडत असल्यास किती प्रमाणांत घडत आहे, याकडेहि बारकाइनें पहावें लागतें. उदाहरणार्थ ताप आला असतां, तापाच्या किती जाती आहेत व त्यांपैकीं कोणत्या जातीचा ताप आहे, याची अत्यंत कसोशीनें छाननी करीत बसण्याची वस्तुतः फारशी जरूर नसते. मुख्यतः तापामध्यें तेजतत्त्वाचा विघाड हेंच कारण असतें व बरेच वेळां त्यालाहि पूर्वीचें कारण पृथ्वीतत्त्व दूषित होणें हेंच असतें. म्हणून नं. ३ व त्याचे जोडीस नं. १ हीं दिल्यानें बराचसा कार्यभाग होतो; तथापि आजूबाजूला तापाची सांथ असेल तर अथवा लक्षणचिकित्सेप्रमाणें, जिभेवर काळसर डाग दिसत असतील अथवा नाडींत अनियमितपणा, कंप किंवा कांहीं दोष आढळतील, तर रक्तावर परिणाम झालेला आहे असें समजून वरील औषधांचे जोडीला नंबर २ व सुप्रभा हीं देणें इष्ट असतें. वरील औषधांनीं कोणत्याहि जातीचा ताप असला तरी रोगी बरा होत असतो. आजपर्यंतच्या अनुभावानें असें निश्चित सांगतां येतें कीं, वरील उपचार चालू असले म्हणजे कोणत्याहि जातीच्या तापांत बहुधा वात होत नाहीं. परंतु विकाराची तीव्रता व तापाचें प्रमाण फार असल्यास मेंदूची शांतता राखण्याकरतां, वायुतत्त्वाच्या —सौदामिनी-या औषधाची डोक्यावर घडी घालून, मधून मधून उपयोग करणें श्रेयस्कर असतें. तसेंच तेजतत्त्वाच्या यकृतामध्यें बराच दोषसंचय झालेला असल्यास तेजतत्त्वाच्या ३ ब आणि योगभाविनी या औषधांच्या ( लक्षणें तीव्र असतांना ) घड्या घालणें आवश्यक असतें. कावीळ झाली असतांहि मुख्यतः नं. १ व ३ पोटांत देणें व ३ ब आणि योगभाविनी या औषधांचा बाह्योपयोग करणें, हीच उपाययोजना करावयाची असते.

**उपचाराविषयीं सामान्य सूचना**

२०५ वरील सर्व विवेचनावरून रोगांचीं निरनिराळीं नांवें व लक्षणें आढळलीं, तरी विशिष्ट औषधांनींच गुण कसा येतो याचा उलगडा होईल. तथापि प्रचारांतील भाषेप्रमाणें मुख्य विकारांचीं नांवें, त्यांचीं साधारण आढळणारीं कारणें, त्या त्या विकारांत दूषित होणारें मुख्य तत्त्व, विकाराचीं लक्षणें व उपच्चार या गोष्टी पुढें देत आहेंत. **मात्र हें वर्णन ढोबळ व त्रोटक स्वरूपाचें असून उपचाराची दिशा दाखविण्यासाठींच दिलें आहे.** उपचार दिले आहेत त्यामध्येंहि, **परिस्थित्यनुरूप फेरफार करणें योग्य होईल असें समजावें.** रोग्याजवळ समक्ष चौकशी करून रोग्याचा पूर्वेतिहास पाहून रोगलक्षणें कोणत्या तत्त्वांतील दोषामुळें उत्पन्न झालीं आहेत व त्यांनीं कोणतें कार्यक्षेत्र व्यापलें आहे वगैरे गोष्टी तारतम्यानें ठरवाव्या लागतात. तसेंच रोगांचा तीव्रपणा, मंद अथवा शीघ्र गति, हीं विचारांत घ्यावीं लागतात. तसेंच " औषधोपचार करतांना ध्यानांत ठेवावयाच्या गोष्टी " दिल्या आहेत त्याही विचारांत घेऊन चिकित्सा करावी लागते.

[ रोगांचीं नांवें ' अ ते ज्ञ ' या अक्षरानुक्रमानें दिलीं आहेत. ]

## २०६ अग्निमांध ( डिस्पेपशिया ).

**कारणें**— भूक लागली असतां न खाणें व तहान लागलीं असतां पाणी न पिणें, भूकेहून जास्त खाणें, जडान्नसेवन, शक्तीबाहेर श्रम, काळजी, जाग्रणें, पोषक आहाराऐवजीं चहा, चिवडा, तळलेले पदार्थ वगैरें रूक्ष व निःसत्त्व आहार, अतिमद्यपान, आमाशयांतील अर्बुद ( कॅन्सर ), आमाशयविस्तार आणि आमाशयविकार इत्यादि.

### मुख्य दूषिततत्त्व—पृथ्वी.

**लक्षणें**— क्षुधानाश, तोंडाला कोरड व चिकटपणा, पोट फुगणें, ढेंकरा येणें, खाल्यानंतर पोटाला तडस लागल्यासारखें किंवा पोटावर वजन ठेवल्याप्रमाणें वाटणें, मळमळणें, वांती होणें, मलावरोध, जिभेवर पांडुरकी बुरशी, अशक्तता, निरुत्साह इत्यादि.

**उपचार**— विकार १।२ महिन्यांच्या आंतील असेल तर मुख्यतः नं. १ द्यावा. तसेंच त्याला कारणीभूत हृद्‌विकार, यकृत्‌विकार किंवा मानसिक विकार यांपैकीं एकादा असल्यास अनुक्रमें नं. २,३ अथवा ४ नं. १ चे जोडीला द्यावें. मानसिक कारण असेल त्या वेळीं सौदा० घड्या कपाळावर घालाव्या. विकार जुनाट असल्यास वरील औषधांचींच पुढील विलयनें द्यावीं व योग० घड्या १४, – १६ काळीज ( हृदय – सोलरप्लेक्स ) शिंपीपोट आणि नाभिप्रदेश यांवर घालाव्या. आंतड्यांना सूज असली तर चपला –ज्योति० घड्या १८ ( कण्याचा मध्य ), २० ( कण्याचा खालचा मणका व माकडहाड ) यांवर घालाव्या.

**पथ्य**— विकाराचें स्वरूप तीव्र असेल, आणि पचनशक्ती अगदीं मंद झाली असेल, तर दूध किंवा तसाच पेयपदार्थ ( ताक कण्हेरी, मुसुंब्याचा रस, वगैरे ) १॥-२ तासांचे अंतरानें पचेल इतक्या प्रमाणांत द्यावा. पचनशक्ति वाढेल त्या मानानें प्रमाण वाढवावें आणि आस्ते आस्ते घनपदार्थ देत जावें. मधून मधून पाणी द्यावें. स्नान करावें. भूक लागली तरी अगदीं पोटभर खाऊं नये. वातूळ, तेलकट व जडपदार्थ वर्ज्य करावे.

## २०७ अजीर्ण– ( तीव्र )–मोडशी–( गॅस्ट्रायटिस् ).

**कारणें**— भुकेपेक्षां जास्त अथवा शिळे, नासके पदार्थ खाणें, विरुद्धाशन, अकालीं जेवणें, दूषीत पेय पदार्थ पिणें, खाण्याबरोबर दूषित पदार्थ पोटांत जाणें वगैरे.

### मुख्य दूषिततत्त्व—पृथ्वी.

**लक्षणें**— मळमळणें, वांती, पोटांत अतिशय कळा येणें, ढेंकरा येणें, गुरगुरणें, भोंवळ, डोकें जड होणें, घसा सुकणें, थोडाफार ताप, क्वचित् जुलाब होणें वगैरे.

**उपचार**— वारंवार उलट्या होत असतील तर नं. १ च्या ५।५ गोळ्या ५।१० मिनिटांच्या अंतरानें द्याव्या, व भरपूर पाणी देत असावें. पोटांतील विजातीय द्रव्यें पडून जाईतों उलटी थांबणार नाहीं. तथापि कांहीं वेळां विजातीय द्रव्यें पडून गेलीं असतांहि कांहीं खाल्लें प्यालें कीं लगेच उलटी होते. त्याचें कारण आमाशयाचा फार दाह झालेला असतो; तो अशक्त

झालेला असतो. म्हणून अशा वेळीं नं. १ च्या एकदम २०।२५ गोळ्यांचा डोस दिल्यास भरपूर शक्तीचा पुरवठा होऊन तात्काळ आराम पडतो. उलट्या थांबून भूक लागली म्हणजे अगदीं पाण्यासारखी पातळ कण्हेरी, दूध, ताक, मोसंब्याचा रस, यांपैकीं कांहीं देत जावें. १।२ दिवस भात, भाकरी वगैरे जडान्न देऊं नये.

## २०८ अंडवृद्धि ( वृषणविकार ).

[ अंडवृद्धि अनेक कारणांनीं होते. ]

(१) अंतर्गळ (हार्निया) या विकारांत आंतडें अंडकोषांत उतरून वृद्धि होते. ( अंतर्गळ पहा. )

(२) वृषणावर आघात झाल्यानें किंवा इतर विकारामुळें रक्तस्राव होतो व रक्त सांचून रक्तज वृद्धि होते. प्रथम कांहीं काल ही वृद्धि पाणी भरलेल्या पिशवीप्रमाणें डिळडिळीत असते; पुढें रक्त गोठून त्याला कठीणपणा येतो. तसेंच नालाची आघात वगैरेनीं वृद्धि होते व त्यामुळें वृषणवृद्धि होते.

### मुख्य दूषिततत्त्व-जल

**उपचार-** पोटांत नं. १।२। सुप्रभा; बाहेरून डिळडिळीतपणा असेल तर सुप्रभा व कठीणपणा आला असेल तर चपला लावावी किंवा घड्या घालाव्या.

(३) वृषणाचे भागांत विद्रधि ( गळूं ) होतो त्यामुळें वृद्धि होते.

### मुख्य दुषिततत्त्व-पृथ्वी व जल.

**उपचार-** पोटांत नं. १।२। सु० बाहेरून चपला.

(४) गरमीच्या विकारांत तृतीयावस्थेमध्यें वृषण विकृत होतें, व दगडाप्रमाणें कठीण होतें.

### मुख्य दूषिततत्त्व-जल.

**उपचार-** पोटांत नं. १।२।७; बाहेरून चपला.

(५) वृषणार्बुदें ( ट्यूमर्स ) झाल्यानें वृद्धि होते.

### मुख्य दूषिततत्त्व-पृथ्वी व जल.

**उपचार-** पोटांत नं. १।२। सु० बाहेरून चपला.

(६) सद्रववृद्धि ( हायड्रोसील ) यांत वृषणांत पाण्यासारख्या द्रवपदार्थाचा संचय होतो.

### मुख्य दूषिततत्त्व जल.

**उपचार**– पोटांत नं. १।२ सु; बाहेरून चपला.

## २०९ अतिसार हगवण ( डायेरिआ ).

[ ह्याचे दोन प्रकार आहेत. एक आशुकारि– तीव्र ( ॲक्यूट ), व दुसरा चिरकारि – जुनाट ( क्रॉनिक ) ]

### ( आशुकारि ).

**कारणें**– आमांश व कॉलरा यांची पूर्वावस्था, भयशोकादि मनोविकार, कोणत्याहि कारणानें आंतड्यांत उष्णता वाढणें, उष्णता पदार्थ फार खाण्यांत येणें, बाहेर गारठा असतो त्या वेळीं आंतड्यांत फाजील उष्णता होणें, सांथ येणें वगैरे.

### मुख्य दूषिततत्त्व—पृथ्वी.

**लक्षणें**– थोडा मुरडा होऊन, निरनिराळ्या रंगाचें नि त्याहून अधिक वेळां शौचास होणें, पोटांत दुखणें, पोट फुगणें. क्वचित वांति, क्षुधामांद्य, तहान, तोंडाला कोरड वगैरे.

**उपचार**– नं. १ व सुप्रभा प्रत्येकीं ४।४ गोळ्यांप्रमाणें १।२ तासांचे अंतरानें देणें. वरचेवर थंड पाणी भरपूर देणें. लघ्वी भरपूर झाली पाहिजे.

### चिरकारि.

**कारणें**– आशुकारि अतिसार बरा झाला अशा समजुतीनें तो बरा न होतांच उपचार बंद केले जातात व त्याचें पुढें चिरकारि विकारांत पर्यवसान होतें. मोठ्या आंतड्यांचा दाह, यकृत्‌विकार, मज्जातंतुविकार, प्लीहेचे विकार इत्यादि.

### मुख्य दूषिततत्त्व—पृथ्वी.

**लक्षणें**– शौचाला पातळ, भसरट होणें, दुर्गंधी येणें, कधीं बद्धकोष्ठ तर कधीं अतिसार, केव्हां पोट दुखणें, अग्निमांद्य वगैरे.

**उपचार**— हा विकार पृथ्वीतत्त्वाच्या कार्यक्षेत्रांतील असल्यामुळें नं. १ हें मुख्य औषध आहे. तसेंच वर दिलेल्या कारणांपैकीं मूळ कारण कोणतें आहे तें पाहून, त्याप्रमाणें जरूर तीं औषधें जोडीला द्यावीं. आंतड्याचा दाह अथवा सूज असल्यास पोटांत नं. २ चें द्वितीय किंवा तृतीय विलयन आणि सुप्रभा द्यावी. सुप्रभा अथवा चपला-घड्या पोटावर घालाव्या. यकृत किंवा प्लीहाविकार असतां नं. ३ व योग० पोटांत द्यावी व बाहेरून ३ व आणि योग० यांच्या घड्या घालाव्या. मज्जातंतुविकार असल्यास नं. ४ व सौदा० पोटांत द्यावी. सौदा० घड्या कपाळ व पाठीचा कणा यांवर घालाव्या. पूर्ण गुण येण्यास कांहीं महिने औषध घ्यावें लागतें.

**पथ्य**— दूध, ताक व पचनाला हलका आहार असावा. द्विदलधान्यें, तळलेले पदार्थ, केळीं, पेरू, शेंगदाणे वगैरे पदार्थ वर्ज्य करावे. अतिश्रम करूं नयेत.

## २१० अंतर्गळ— आंत्रवृद्धि ( हार्निया ).

[ अगदीं लहान मुलांपासून तों वृद्धांपर्यंत कोणालाहि हा विकार होऊं शकतो. ]

**कारणें**— आंतड्यांची दुर्बलता, आंतड्यांत वात धरणें, बद्ध कोष्ठ, ( स्त्रियांत गर्भारपणामुळें आंतड्यांवर भार पडणें; ) आंतड्यांत वात धरलेला असतां एखदम मोठें वजन उचलणें, उडी मारणें, वगैरे. आंतडें शिथिल व अशक्त होऊन खालीं अंडकोषांत उतरू लागतें व फुगा येऊं लागतो. अपूर्ण प्रकारांत आंतडें अंडकोषांत न उतरतां नुसता फुगा येतो.

### मुख्य दूषिततत्त्व—पृथ्वी.

**लक्षणें**— स्वस्थ बसलें असतां किंवा निजलें असतां आंतड्यावरील भार कमी झाल्यानें त्रास होत नाहीं; परंतु हिंडूं फिरूं लागलें कीं, आंतडें खालीं उतरून त्रास होतो. खोकला किंवा शिंक आल्यानें त्या भागीं त्रास होतो. ज्याला बरेच दिवस विकार आहे अशा रोग्याचें शारीरिक त्रासामुळें, आंतडें खालीं उतरून वृषणाभोंवतीं गुरफटतें व त्या वेळीं अतिशय वेदना होऊन वांत्या सुरू होतात. ती अवस्था अतिशय भयंकर असते.

**उपचार**— हा विकार फक्त ऑपरेशननेंच बरा होतो असें समजलें जातें, परंतु खालील औषधांनीं अनेकांचा हा विकार पूर्ण बरा झालेला आहे. आंतडें अंडकोशांत गुंतलें असल्यास व उलट्या होत असल्यास नं. १ व योग यांच्या प्रत्येकीं ४।४ गोळया १०।१० मिनिटांनीं द्याव्या. कमरे-खालीं उशी देऊन रोग्याला उताणें निजवून पीडित भागीं योग० च्या घड्या आराम पडेतों चालू ठेवाव्या व हळुहळू आंतडें पोटाचे बाजूनें सरकवून घ्यावें. आंतड्याचा वृषणाला गुंता पडला असेल अशा वेळीं थोड्या वेळांत तो न सुटल्यास व सातआठ प्रहर राहिल्यास मृत्यु येण्याचा फार संभव असतो. थोड्या वेळांत न सुटल्यास तज्ज्ञ डॉक्टरचा ( विशेषतः सर्जनचा ) सल्ला घेणें इष्ट होय. नंतर कायम बरें वाटण्याच्या दृष्टीनें नं. १ व योग० यांचें प्रथम विलयन द्यावें. विलयन १।२ गोळ्या घालून न करतां प्रत्येकीं ८।१० गोळ्या घालून करावें किंवा नं. १ व योग० यांच्या २।२ गोळ्या दिवसांतून ४ वेळां द्याव्या. योग० च्या घड्या ज्या बाजूला विकार असेल त्या बाजूवर दिवसा एकदोन वेळां व रात्रीं निजतांना घालाव्या. कांहीं रोग्यांना योग० ऐवजीं ज्योति० चा चांगला उपयोग होतो. तरी ज्या घड्यांचा जास्त उपयोग होतो असें आढळेल त्याच नेहमीं चालू ठेवाव्या.

**पथ्य**—ओझें उचलणें, ओरडणें, उडी मारणें, जास्त चालणें, चढ चढणें, वातुळ पदार्थ खाणें हीं पूर्ण गुण येईतों वर्ज करावीं. गुण आल्यानंतरहि या बाबतींत जपून वागावें.

## २११ अर्धाशिशि–सूर्यावर्त ( हेमिक्रेनिया ).

**कारणें**— जागरणें, उपोषणें, मादक, उत्तेजक किंवा तेलकट पदार्थसेवन, अति ऊन्ह लागणें, निद्रानाश वगैरे करणांनीं रक्त तापून उष्णता वाढते व ज्ञानतंतूंचा दाह होतो.

### मुख्य दूषिततत्त्व–जल.

**लक्षणें**— मस्तकाची एक बाजू, मानेच्या शिरा, भुंवया, आंख कान व डोळा यांत असह्य वेदना होतात. सकाळपासून दोनप्रहरपर्यंत वेदना वाढत जातात व सायंकाळीं कमी होत जातात. क्वचित् वांति होते.

**उपचार**— पोटांत नं. २ द्यावें. एकादे रोग्याला क्वचित् नं. ४ चा

उपयोग करावा लागतो. पोटभर पाणी पिण्यास द्यावें. उजवी बाजू दुखत असल्यास ९ शतदल ( मानेची पोंढी व वरील उंचवटा ) व १२ पैकीं छातीचे उजवे भागावर चपला लावावी. डावी बाजू दुखत असेल तर योग० वरील प्रमाणें ९।१० मानेचा वरचा मणका यांवर लावावी अथवा ९।१२ चे डावे भागावर ज्योति० लावावी.

## २१२ अर्धांगवात– ( पॅरॅलिस ).

[ ह्याचे पुष्कळ प्रकार असून स्थान व लक्षणें यांच्या भेदांमुळें, त्यांना निरनिराळीं नांवें दिलेलीं आहेत. शरीराच्या कांहीं भागाला लटकेपणा येणें हें ह्याचें मुख्य लक्षण आहे. ]

**कारणें**— मज्जातंतूंवर दाब पडणारीं अर्बुदें ( ग्रंथी ), गरमी, कृमी, विषारी द्रव्यें पोटांत जाणें, रक्तदाब ( हाय् ब्लडप्रेशर ), रक्तभारानें रक्त वाहिनी फुटून मेंदु किंवा पृष्ठवंश रज्जु यांत रक्तस्राव झाला असतां त्या भागांतील ज्ञानतंतूंचें कार्य बंद पडणें, तीव्र ताप, हिस्टेरिया यांमध्यें तात्पुरता लटकेपणा येतो. मेंदूंत विशिष्ट भागीं रक्तस्राव झाल्यानें डोक्याची एक बाजू व डोक्याचे खालील शरीराची उलट बाजू यांना अर्धांग होऊन ते भाग लटके पडतात.

**लक्षणें**— विकृत भागीं दिसणारीं लक्षणें ( १ ) इच्छित क्रियाशक्तीचा लोप किंवा मंदत्व म्हणजे चलनवलनाक्रिया कमी अथवा नष्ट होते. ( २ ) स्पर्शज्ञानलोप--जोरानें चिमटा घेतला तरी न कळणें; ( ३) रसाभिसरणक्रियेंत मंदत्व व त्यायोगें सूज आणि तो भाग थंड लागणें; ( ४ ) रक्ताभिसरण मंद झाल्यामुळें त्या भागांतील स्नायूंचें पोषण नीट न होऊन तो भाग कृश होत जाणें; (५) तोंडाची एक बाजू गेली असतां तोंड साफ न मिटणें, तोंडांतून लाळ गळणें; (६) कांहीं वेळां चालतां बोलतां सुद्धां हा विकार होतो. अगदीं अल्प झटका येऊन आपोआप बरें वाटतें. परंतु मागाहून पुन्हां जोराचा झटका येण्याचा संभव असतो. विकाराच्या तीव्रतेप्रमाणें शुद्धीवर येण्याला कमजास्त काळ लागतो. कांहीं रोगी कित्येक तास किंवा कित्येक दिवसपर्यंत बेशुद्ध असतात. अर्धांगवातानें निरनिराळ्या रोग्यांचें निरनिराळे अवयव लटके पडतात. तोंड वांकडे होतें (त्याला **अर्दित**

म्हणजे फेशल पॅरॅलिसिस म्हणतात) जीभ लुली पडते, एका बाजूचें अंग लटकें पडतें, कमरेखालीं सर्व भाग लटका पडतो, किंवा एकादाच पाय लटका पडतो.

**उपचार**— सर्व प्रकारच्या अर्धांगवातांवर विकाराची तीव्रता कमी होईपर्यंत नं. १ व २ यांच्या प्रत्येकीं ३।४ गोळ्या आळीपाळीनें दिवसांतून ६ वेळां द्याव्या. विकाराचा जोर कमी झाल्यावर प्रथम किंवा तोलेल तें विलयन द्यावें. मधून मधून चपलेच्या २।२ गोळ्या दिवसांतून १।२ वेळां द्याव्या. शिरोभाग व पाठीचा कणा यांवर सुप्रभेच्या घड्या घालाव्या. इच्छित क्रियाशक्ति नष्ट झाली असेल तर कपाळ व छाती यांवर सौदा० घड्या घालाव्या. आजाऱ्याच्या खाद्यपेयसेवन व उत्सर्जनक्रिया नियमित होऊनहि इंद्रियव्यापार सुरू होत नसल्यास, विकृत भाग व कणा यांवर चपलेच्या घड्या घालाव्या व पोटांत दिवसांतून १।२ वेळां योग० चें प्रथम विलयन द्यावें. कांहीं वेळां अर्धांगाचा अगदीं सौम्य झटका येऊन, थोड्या वेळानें पुन्हां पूर्ववत् बरें वटतें. परंतु अशा रोग्याला हा विकार पुन्हां अधिक तीव्र स्वरूपांत होण्याचा संभव असतो. म्हणून अशा मनुष्यांनीं आपली जीवनशक्ति संवर्धित करण्यासाठीं प्रकृतिनियामक औषध कांहीं दिवस सतत घेत असणें व आस्ते आस्ते त्याचें प्रमाण वाढवीत जाणें हितकर असतें. नं. २ च्या २।२ गोळ्या प्रकृतिनियामक औषधाबरोबर घ्याव्या.

## २१३ अपतंत्रक–गर्भाशयोन्माद ( हिस्टेरिया ).

( हा विकार मुख्यतः स्त्रियांना व विशेषतः ऐन तारुण्यांत होतो. )

**कारणें**— ज्ञानतंतूंना योग्य पोषक द्रव्यें न मिळणें, तीव्र कामेच्छा अथवा कामेच्छा तृप्त न होणें, अतिमैथुन, या मुख्य आणि इतर कांहीं कारणांनीं मनोदौर्बल्य आल्यानें हा रोग होतो.

### मुख्य दूषिततत्त्व—पृथ्वी व जल.

**लक्षणें**— अग्निमांद्य, पोटांत वायुगोळा उत्पन्न होणें, व तो गोळा घशाशीं आल्यासारखा रोग्याला वाटणें, अस्वस्थपणा, अति बडबड, हंसणें, खिदळणें, कांहीं वेळ मुकेपणा, सुस्कारे टाकणें, गुदमरल्यासारखें होणें, वेडेचार करणें, उचक्या, ढेंकरा, बेशुद्ध पडणें वगैरे. परंतु यांत अपस्माराचे रोग्याप्रमाणें पूर्ण बेशुद्धी नसते. डोळ्यांवर चकचकीत प्रकाश (बॅटरीचा फोकस)

पाडल्यास रोगी डोळे मिटून घेतो. हातापायांना कमिजास्त झटके येतात. यांत जीभ चावली जात नाहीं. रोगी एकटा असेल त्या वेळीं झटका बहुधा येत नाहीं. रोगी अडीअडचणींत सहसा पडत नाहीं. अपस्माराच्या रोग्याला बरें वाटत येतें तेव्हां झोंप लागत येते; तर हा रोगी बहुधा जागाच असतो.

**उपचार**— पोटांत नं. १ व २ द्यावें. क्वचित् नं. ४ द्यावा लागतो. कपाळावर सौदामिनीच्या घड्या रोज निजते वेळीं ठेवाव्या.

## २१३ अ. अपतानक– धनुर्वात– ( टेटॅनस् ).

२१३ अ **कारणें**– शरीराच्या कोणत्याहि भागाला पडून, आपटून अगर शस्त्रानें जखम होते व त्यांत माती, दगड, लांकूड वगैरेंचे कण भरतात. अशा वेळीं त्यांतून धनुर्वाताचे सूक्ष्म जंतूंचा शरीरांत प्रवेश होतो व त्यांमुळें हा विकार होतो.

### मुख्य दूषिततत्त्व—पृथ्वी व जल.

**लक्षणें– पूर्वलक्षणें**– चिडखोरपणा, झोंप कमी होणें, जखमेच्या ठिकाणीं वेदना व कंप, घसा दुखणें, जबडा व चेहेऱ्यानजीकचे स्नायु जखडणें व त्यामुळें चेहेरा वांकडा होणें वगैरे. नंतर सर्वांगांतील स्नायु ताणले जातात व त्यामुळें शरीर धनुष्याकृति होतें व म्हणून याला धनुर्वात म्हणतात. मागील अगर पुढील भागाची धनुष्याकृति होते. मधून मधून आवेग येतात व त्या वेळीं दांतखिळी बसते व सर्वांग ताठ होतें. ह्या विकारांत असह्य वेदना होतात. त्यांत क्वचित् स्नायू तुटतात व हाडेंहि मोडतात. त्यांत एक प्रकार फक्त मस्तकापुरताच असतो. त्यांत अर्दित होतें, नाडी जलद चालते व थोडा ताप भरतो, घाम अतिशय येतो.

**उपचार**—पोटांत नं. १।२ व विषहारिणी प्रत्येकीं ४।४ गोळ्या १।१ तासाचे अंतरानें द्याव्या. चपलेच्या ४।२ गोळ्या द्याव्या. विकाराचा जोर कमी झाल्यानंतर वरीलपैकीं प्रत्येकीं ४।५ गोळ्या घालून विलयन करून तें तास-दोन तासाचे अंतरानें द्यावें. हृदयावर सुप्रभेच्या घड्या व पाठीच्या कण्यावर चपलेच्या घड्या भरपूर घालाव्या.

कोणत्याहि भागाला मोठी जखम झाली म्हणजे तिचें पर्यवसान धनुर्वातांत होणें शक्य असतें. म्हणून अशी जखम झाल्याबरोबर सुप्रभाविलयनानें स्वच्छ धुवावी व पोटांत नं. २ सुप्रभा द्यावी.

## २१४ अपस्मार–फेफरे – ( एपिलेप्सी ).

**कारणें**— मुख्यतः रक्ताभिसरणाचे दोषामुळें हा विकार होतो. भीति, काळजी, आघात, गरमी वगैरेमुळें रक्तांत उष्णता वाढते व रक्ताभिसरण-क्रिया बिघडते, त्यामुळें ज्ञानतंतूंवर ताण पडतो व फेफरें येतें. जंतांमुळेंहि कांहीं वेळां वरीलप्रमाणें दोष उत्पन्न होतात.

### मुख्य दूषिततत्त्व–जल.

**लक्षणें**— ह्यांत दोन प्रकार आहेत. एका प्रकारांत रोगी थोडा वेळ मूर्च्छित होतो. आंचके येत नाहींत, डोळे ताठ होतात; पापण्यांची हालचाल थांबते. कांहीं वेळानें रोगी शुद्धीवर येतो. दुसऱ्या प्रकारांत डोळ्यांपुढें अंधेरी येणें, हातांचीं बोटें न कळत वेडींवांकडीं होणें, कंप, हातापायांना मुंग्या येणें, वगैरे लक्षणें प्रथम होऊन झटका येतो. डोळे व भुंवया वर चढतात. हातपाय आंखडतात. दांतांओंठांची व पापण्यांची जोरानें हालचाल होते, तोंड काळवंडतें आणि पूर्ण बेशुद्धी येते. कांहीं वेळानें तोंडांतून फेंस येऊं लागतो.

**उपचार**— (तात्कालिक) पोटांत नं. १।२ व सुप्रभा यांचें प्रथम विलयन ४।४ गोळ्या घालून करावें व ५।५ मिनिटांनीं १।१ चमचा पाजावें अथवा गोळ्याच द्याव्या. सौदा० घड्या कपाळ व मस्तक यांवर भरपूर ठेवाव्या. सुप्रभाघड्या पाठीचे कण्यावर व रक्ताशयावर घालाव्या.

विकार कायमचा जाण्यासाठीं वर्षसहामहिने औषध घ्यावें लागतें व तें रोग्याचे इतर विकार पाहून द्यावें. मुख्यतः नं. १।२ व सुप्रभा पोटांत द्यावें व सुप्रभा सौदा० घड्या कपाळ व मस्तक यांवर आलटून पालटून घालाव्यां.

## २१५ अर्बुदें–ग्रंथि ( ट्यूमर्स ).

**कारणें**—ठिकाठिकाणीं जमणारें विजातीय द्रव्य शरीराबाहेर अजिबात काढून टाकणें जीवनशक्तीला अशक्य होत जातें आणि तें एकादें विशिष्ट भागांत तिला सांठवून ठेवावें लागतें व त्यांच्या निरनिराळ्या भागीं लहान-मोठ्या गांठी तयार होतात. यालाच अर्बुदें किंवा ग्रंथी म्हणतात. या अर्बुदांचे दोन प्रकार आढळतात. एक फारसा उपद्रव न करणारीं असतात. त्यांना सौम्य अर्बुदें म्हणतात, व फार त्रासदायक होणाऱ्या दुसऱ्या प्रकार-

ऱ्या ग्रंथींना दुष्ट अर्बुदें म्हणतात. स्थानपरत्वें त्यांना निरनिराळीं नांवें आहेत. उदाहरणार्थ करट, कर्कटक, आष्ठिला वगैरे. कॅन्सर हाहि यांतीलच एक प्रकार आहे.

### मुख्य दूषिततत्त्व–पृथ्वी व जल.

**लक्षणें**—सौम्य अर्बुदें फक्त दिसावयाला वाईट दिसतात. दुष्ट अर्बुद-विकारांत प्रथम, अपचन, वात धरणें, ढेंकरा, वगैरे लक्षणें असून नंतर त्याच लक्षणांची तीव्रता वाढते व रक्ताशयावर परिणाम घडत जातो. औदासीन्य बेचैनपणा, फिकटपणा वगैरे लक्षणें होऊं लागतात.

**उपचार**—सौम्य अर्बुदांवर पोटांत नं. १ व बाहेरून चपला लावावी अगर घड्या घालाव्या. दुष्ट अर्बुदांवर पोटांत नं. १।२। सुप्रभा व बाहेरून चपला लावावी किंवा घड्या घालाव्या.

## २१६ अरोचक–अरुचि.

**कारणें**— जडान्नसेवन, एकाच प्रकारचे पदार्थ वारंवार खाणें, अग्निमांद्य, पडसें, बारीक ताप, जंत वगैरे.

### मुख्य दूषिततत्त्व–पृथ्वी.

**लक्षणें**–जिभेवर बुरशी, खाण्याची इच्छा नसणें वगैरे. ( हा विकार क्षुल्लक वाटतो परंतु याची उपेक्षा करूं नये. कारण पुष्कळ वेळां पुढें होणाऱ्या विकारांचें हें पूर्व चिन्ह असतें. )

**उपचार**–पोटांत नं. १ देणें.

**पथ्य**–हलकें अन्न व तें थोडेंथोडें खाणें.

## २१७ अलर्क विषबाधा ( हायड्रोफोबिया ).

**कारणें**— कुत्रा, कोल्हा, लांडगा, मांजर, खोंकड वगैरे जनावरें प्रथम पिसाळतात व तीं जनावरें पिसाळल्यानंतर चावलीं. असतां हा विकार होतो. पिसाळलेल्या प्राण्याच्या लाळेंत हें विष असतें.

### मुख्य दूषिततत्त्व—जल.

**लक्षणें**–कांहीं वेळां दंश झाल्यापासून एकदीड महिन्यानेंहि रोगलक्षणें दिसूं लागतात आणि दंशव्रण भरून आलेला असला तरी रोग सुरू

होतांच त्या जागीं दुखूं लागतें. रोगी अस्वस्थ व चिडखोर होतो. झोंप येत नाहीं व पुढें तोंडाला चिकटा येतो, लाळ जमूं लागते, पदार्थ गिळतानां त्रास पडतो, श्वासोच्छ्वास नीट होत नाहीं, कांहीं वेळां आंचके येऊं लागतात, रोगी वात झाल्याप्रमाणें बडबडतो. ताप १०० ते १०३ अंशांपर्यंत असतो. रोगी सारखा पाणी मागतो.

**उपचार**—पोटांत नं. २।४ विषहारिणी व सौदा० प्रत्येकीं ३।३ गोळ्या दिवसांतून ३।४ वेळां द्याव्या. दंशाच्या ठिकाणीं सुप्रभा-सौदा० व विषहा. घड्या ठेवाव्या.

## २१८ अवष्टंभ—बद्धकोष्ठ- ( कॉन्स्टिपेशन् ).

**कारणें**— खाल्लेल्या अन्नाचें पचन नीट न होणें, आंतड्यांत फाजील उष्णता, पाणी कमी पिणें, उष्ण व वातुळ पदार्थ खाणें, जाग्रणें, आंतड्यांत मळाचा सांठा होत जाऊन त्यांत विषारी पदार्थ तयार होणें वगैरे.

### मुख्य दूषिततत्त्व—पृथ्वी.

**लक्षणें**—मळ चिकट, लेंडीसारखा व अति कुंथून पडतो. कांहीं वेळा मळाचे अतिकठीण खडे पडतात. मळास अतिशय दुर्गंधी असते.

**उपचार**—मध्यम वयांत विकार झालेला असेल,तर नं. १ चें प्रथम किंवा द्वितीय ते पंचमषष्ठ विलयनापर्यंतहि लागू पडेल तें औषध चालू ठेवावें. वृद्ध व अशक्त माणसांना सुद्धां पुढील विलयनेंच द्यावीं लागतात. यकृतदोष असल्यास जोडीला नं. ३ व योग० द्यावी. केवळ सारक अथवा रेचक औषधां-प्रमाणें सदर औषधांचा तात्कालिक उपयोग होत नाहीं तर पचनाक्रियेंतील मूलभूत दोषांचें उच्चाटन होऊन क्रमानें गुण येत जातो व तो टिकाऊ असतो. वारंवार रेचक किंवा सारक औषधें घेतल्यानें, आंतडीं दुर्बल होत जातात व परिणामीं फायद्याऐवजीं तोटाच होतो. म्हणून वरील उपायांनीं विकाराच्या मुळांचें उच्चाटन करणें श्रेयस्कर असतें.

## २१९ अशक्तता.

**कारणें**—तीव्र विकारानंतर अशक्तता येते; परंतु कित्येक वेळां पुढें होणाऱ्या विकारांचें हें पूर्वस्वरूप असतें. कांहीं दृश्य कारण नसतां अशक्तता

वाटूं लागते. याचें खरें कारण शरीरांतील अंतर्गत शक्तीचा व्यय संरक्षण-कार्यांत व अंतर्गत झीज भरून काढण्यांत होऊन जीवनशक्तीवर फार ताण पडत असतो हें होय.

**मुख्य दुषिततत्त्व**–कोणतेंहि असूं शकतें. परंतु कोणत्याहि तत्त्वांत बिघाड झाला असला, तरी पृथ्वीतत्त्व व जलतत्त्व हीं थोडयाफार प्रमाणांत दूषित होतात.

**लक्षणें**—निरुत्साह, अंग गळल्यासारखें होणें, चिडखोरपणा, गलबला सहन न होणें, सुस्ती वगैरे.

**उपचार**–प्रकृतिनियामक आणि नं. १ व सुप्रभा देणें.

विकाराचीं बीजें शिल्लक असतांनाच शक्ति वाढविण्यासाठीं कांहीं लोक अनेक प्रकारचीं शक्तिवर्धकें घेत असतात. परंतु त्यांचा परिणाम बरेच वेळां अनिष्ट होतो. कांहीं वेळां पूर्वीच्या विकाराचा आकस्मिक जोर होतो व पुन्हां प्रकृति बिघडते. म्हणून विकाराचें कारण प्रथम नाहींसें करावें. विकार साफ मोडला म्हणजे नेहमींचा सात्त्विक आहार घेऊन, प्रकृति पूर्ववत् चांगली होते.

## २२० अष्ठीलाविकार ( प्रोस्टेट ग्लँड ).

[ मूत्राशय व मूत्रप्रसेक यांच्यामध्यें अष्ठीला ही आठिळेप्रमाणें गांठ असून यांतून मूत्रमार्ग असतो. याच्या विकारामुळें मूत्राशय, वृषण वगैरेंना विकार होतात. अष्ठीलादाह आशुकारि व चिरकारि आणि अष्ठीला-वृद्धि असें याचे प्रकार आहेत. अष्ठीला वृद्धि हा विकार ५० वर्षें वयाच्या नंतर आढळतो. ]

### अष्ठीलादाह ( आशुकारि )

**कारणें**— मूत्रमार्गाचा संकोच, मूतखडा, गार पदार्थांवर बसणें वगैरे ( या विकारांत पू झाल्यास तो मूत्रमार्ग उपगुद वगैरे बाजूच्या भागांत फुटून नाडीव्रण उत्पन्न होतात. )

### मुख्य दूषिततत्त्व–जल व पृथ्वी

**लक्षणें**—लघ्वी कष्टानें होणें, उपगुदाजवळ जडत्व, थोडा ताप, बद्धकोष्ठ, थोड्याशा हालचालीनें त्रास होणें, त्या भागीं स्पर्श सहन न होणें वगैरे.

**उपचार**—पोटांत नं. १।२। सुप्रभा, पाठीच्या कण्यावर चपला व निरणावर सुप्रभासौदा० आलटून पालटून घड्या घालणें.

## अष्ठीलादाह ( चिरकारि )

**कारणें**—वरीलप्रमाणेंच.

**लक्षणें**—वरीलप्रमाणेंच. परंतु सौम्य व जास्त वेळपर्यंत होत राहातात.

**उपचार**—वरीलप्रमाणेंच. परंतु औषधाचें प्रमाण कमी असावें व औषध जास्त काळपर्यंत चालू ठेवावें.

## अष्ठीलावृद्धि

**कारणें व लक्षणें** — अष्ठिलेमध्यें विजातीय द्रव्यांचा संचय झाल्यानें वृद्धि होते. लघ्वी साफ सुटत नाहीं. लघ्वी मूत्राशयांत नेहमीं सांचून राहिल्यामुळें त्यांतील क्षारांचा परिणाम मूत्राशयावर होऊन त्याचा दाह होतो व पुढें व्रण पडतात. मूत्रपिंडावरहि परिणाम होऊन वृक्कदाह होतो. रक्तांतील उत्सर्जनीय द्रव्यें, मूत्रपिंडांनीं शोषून घ्यावयाचीं, तीं तशीं घेतलीं जात नाहींत व तीं सांचून रक्त अत्यंत दूषित होतें.

**उपचार**— पोटांत नं. १।२। सुप्रभा; व निरणावर चपला घड्या.

## २२१ अस्थिमार्दव — मुडदुस ( रिकेट्स ).

[ हा मुख्यतः लहान मुलांना होणारा विकार आहे. ]

**कारणें**— हाडाची वाढ होणें व तीं चांगलीं चिवट व कणखर होणें हें आहारांतील खट ( कॅलशियम् ) या द्रव्याच्या योग्य पुरवठ्यावर अवलंबून असतें. मुलाचे आईचे खाण्यांत, त्याची कमतरता असली म्हणजे तिचे दुधांतही त्याची कमतरता असते. त्यामुळें, व लहान मुलांचे आहारांत त्याचा अभाव झाल्यामुळें मुलांचीं हाडें योग्य प्रमाणांत वाढत नाहींत व त्यांना यावा तसा कणखरपणाहि येत नाहीं. त्यामुळें तीं कमजोर ठिसूळ व नरम होतात. हाडांची जडघटना हें पृथ्वीतत्त्वाचें आणि चिवटपणा व मजबुती हें तेजतत्त्वाचें कार्य आहे. वर लिहिल्याप्रमाणें योग्य पृथ्वीघटकाचा अभाव या कारणाबरोबरच त्या तत्त्वाच्या कार्येंद्रियाची दुर्बलता हें हाडांच्या घटनेच्या दोषांचें कारण असतें. तेजतत्त्वाचें कार्येंद्रिय जें यकृत् त्याचे दोषामुळें त्यांतून पाचक रसांचा योग्य पुरवठा होत नाहीं.

### मूख्य दूषिततत्त्व-पृथ्वी व तेज

**लक्षणें**—आंगांत कडकी, कातडीला सुरकुत्या पडणें, कानाच्या खालच्या पाळीला चिमटा घेतला असतां न कळणें, बरगड्या दिसूं लागणें, हातपाय बारीक व पोट मोठें होणें, यकृत्, प्लीहा वाढणें, पांडुरोग्याप्रमाणें फिकटपणा येणें, पाठीचा कणा वांकलेला दिसणें, पायांची हाडें वाकलेलीं दिसणें, छातीच्या मध्यभागीं खड्डा पडलेला दिसणें व छातीच्या मध्यभागीं टेंगूळ आल्याप्रमाणें उंच दिसणें वगैरे.

**उपचार**—नं. १।३ यांचें प्रथम विलयन द्यावें अथवा सुरुवातीला गोळया द्याव्या व नंतर थोडे दिवसांनीं विलयन द्यावें. यकृतप्लीहा यांवर ३ ब व योग० घड्या घालाव्या. डोकीवर व पाठीच्या कण्यावर ज्योति० घड्या घालाव्या. या घड्यांनीं फार चांगला गुण वाटतो.

**पथ्य**—हरभरा किंवा उडीद, हें धान्य मोड आल्यावर चांगलें वाटून त्याचा पिष्टांश पाण्यांत कालवून सुमारें अर्धा कप दुधांत ( अर्धा कप पाणी घालून ) तें चांगलें उकळावें व त्यांत थोडी हळद व साखर घालून खिरी-प्रमाणें करून द्यावें. हरभरा किंवा उडीदाचे ७।८ दाणे घ्यावे.

## २२२ आंकडी–बालग्रह. ( कन्व्हल्शन्स् )

**कारणें**—पोटांत उष्णता वाढणें, वात धरणें, शौचास न होणें, आंतडीं व यकृतदोष वगैरे कारणांमुळें लहान मुलांना हा विकार होतो. ३।४ वर्षांच्या पुढील मुलांत आढळत नाहीं.

### मुख्य दूषिततत्त्व-पृथ्वी व जल

**लक्षणें**-आंचके येतात, डोळे चढतात, मुठी घट्ट वळतात, पाठीकडील बाजूला पाय व मान फिरतात व धनुष्याकृति होते.

**उपचार**—लहान मुलांना उपजल्यापासून थोडें थोडें पाणी पाजावें म्हणजे हा विकार सहसा होत नाहीं. आंकडी येतांच नं. १।२ व सुप्रभा ४।४ गोळ्या वरचेवर द्याव्या. यकृत् व प्लीहा यांवर योग० घड्या घालाव्या. बरें वाटल्या-नंतर नं. १, २ व योग० २।२ गोळ्या याप्रमाणें दिवसांतून ३।४ वेळां द्याव्या.

९५७८७ २७।१२।५३

## २२३ आगेरूं – अंग येणें ( रेक्टल् प्रोलॅप्स )

( मलद्वाराच्या नजीकचा आंतड्याचा भाग गुदावाटे बाहेर येणें याला अंग येणें असें म्हणतात. )

**कारणें**—कोठ्यांत उष्णता वाढणें, अवरोधक स्नायु ढिले होणें, मलावरोध, कुंथणें, अतिसार, संग्रहणी, कृमि, पाणी कमी पिणें, खोकला वगैरे.

**मुख्य दूषिततत्त्व—पृथ्वी**

**लक्षणें**—अंग बाहेर येणें, त्याला सूज, दाह, लाली, ठणका वगैरे.

**उपचार**— पोटांत नं. १ व सुप्रभा द्यावें. इतर विकार असतील त्याप्रमाणें जरूर तीं औषधें जोडीला द्यावीं. अंग आपोआप आंत जात नसेल तर तें धुऊन, पुसून त्याला सुप्रभा तेल लावावें व दाबून बसवावें. चपला ज्योति० घड्या कण्याचा खालचा मणका व माकडहाड यांवर घालाव्या.

## २२४ आघात,–मार बसणें. चेंचणें, खरचटणें, जखम वगैरे.

**उपचार**— विकाराच्या जागीं सुप्रभा घड्या घालाव्या. जखम वगैरे होऊन रक्तस्राव होत असेल, तर सुप्रभाच्या विलयनानें जखम धुऊन फाटलेली कांतडी जुळवून घेऊन त्यावर कापसाची घडी घालून जखम बांधून टाकावी आणि त्यावर घडी न सुकेल अशा बेतानें सुप्रभाविलयन सोडीत राहावें. जखम सोडून रोज घडी बदलीत जावें. जखम तीव्र असून रक्तस्राव जोराचा असेल, तर जखमेच्या नजीकच्या मर्मस्थानावर आणि रक्ताशयावर सुप्रभेच्या घड्या ठेवाव्या. पोटांतहि सुप्रभा व नं. २ द्यावें. जखम होऊन बराच वेळ होऊन गेला असल्यास व जखमेंत पू होण्याची प्रवृत्ति आढळून आल्यास, सुप्रभेऐवजीं प्रथम चपलेच्या घड्या घालाव्या व नंतर सुप्रभेचा उपयोग करावा.

## २२५ आतपमूर्च्छा ( सन्स्ट्रोक— हीटस्ट्रोक. )

**कारणें**— उष्ण प्रदेशांत उन्हाळे दिवसांत प्रखर उन्ह लागणें उष्ण वाऱ्याची झळ लागणें किंवा कृत्रिम उष्णतेच्या सतत तापानें हा विकार होतो. विशेषतः कान व आंख यांना गरम वारा लागल्यामुळें त्याचा परिणाम मेंदूवर होऊन हा विकार होतो.

### मुख्य दूषिततत्त्व-- जल व वायु.

**लक्षणें**-- उलटी, भोंवळ, बाह्य त्वचा थंड व घर्मयुक्त असून नाडी जलद चालणें. कांहींना एकदम जोराचा ताप भरून मूर्च्छा येते.

**उपचार**-- पोटांत नं. २।४ व सुप्रभा प्रत्येकीं ४।४ गोळ्या अर्ध्या तासाच्या अंतरानें द्याव्या. त्यांत मेंदूवर फार परिणाम होत असल्यानें, डोकीवर व पाठीचे कण्यावर सौदा० च्या घड्या साख्या सुरू ठेवाव्या. थंड पाणी वरचेवर भरपूर द्यावें. मूर्च्छा जोराची असल्यास, सुप्रभा घड्या रक्ताशयावर घालाव्या व पोटांत ५।५ मिनिटांनींहि औषध द्यावें. प्रखर उन्हाळ्याचे दिवसांत गरम वारे सुटतात. त्या वेळीं उन्हांतून चालतांना कानावरून फेटा बांधतात. व फेट्याचे आंत कांदा बांधून ठेवतात. असें करण्यानें हा विकार फारसा होत नाहीं.

## २२६ आंत्रपुच्छदाह ( अपेंडिसायटिस. )

[ लहान आंतडें व मोठें आंतडें यांच्या सांध्या वर म्हणजे पोटांत उजव्या बाजूला नाभीचे खालीं एक पुच्छाप्रमाणें भाग असतो. त्याला हा विकार होतो. साधारणपणें हा तरुण वयांत होतो. ]

**कारणें**-बद्धकोष्ठ, चर्वण नीट न करतां जेवणें, कुजकें, सडकें मांस खाणें, इत्यादि कारणानीं वरील पुच्छाला रक्ताचा पुरवठा कमी होतो व त्याचा दाह होतो.

### मुख्य दूषिततत्त्व—पृथ्वी.

**लक्षणें**—तीव्र प्रकारात भरपूर ताप येतो किंवा उष्णता कमी होते. वारंवार मलावरोध. पोट दुखणें, आंत्रदाहजन्य सूज, वेदना, गळवाप्रमाणें पू होऊन तें जठरावरणांत फुटल्यास जठरावरणाचा दाह होणें, एकसारखा तीव्र ताप, नाडी जोरानें चालणें; उष्णतामान ९५ चे खालीं जाणें परंतु नाडीची गति जास्त असणें, उचकी हीं लक्षणें विकाराची कष्टसाध्यता दाखवितात. ह्या विकारांत पू होण्यापूर्वीं इलाज केल्यास बरेंपणा वाटतो. पू झाल्यवर शस्त्रक्रियाच करणें इष्ट होय.

**उपचार**— **तीव्र प्रकारांत** पोटांत नं. १।२ व सुप्रभा यांचें प्रथम विलयन २।२ तासांचे अंतरानें द्यावें. पीडित भागावर चपला अथवा सुप्रभा

यांच्या घड्या घालाव्या. **सौम्यप्रकार– लक्षणें**–आंत्रपुच्छाला सूज येते, दाबलें असतां तो भाग ताठ लागतो व दुखतो. फारसा त्रास न होतां हा विकार वाढत जातो आणि कांहीं कारणांनीं हाच तीव्र होतो. म्हणून सुरुवात झालेली दिसतांच वरील प्रमाणेंच उपाय करावे. या विकारांत चपला विलयनाचा एनिमा दिवसांतून १।२ वेळां घेणें हितकर होतें.

## २२७ आमवात– संधिवात —( ऱ्हूमॅटिझम् )

**कारणें**—– अग्निमांद्य अति आंबट पदार्थ खाणें, विरुद्धाशन वगैरे कारणांमुळें रसक्रिया बिघडते व रक्तांत लॅक्टिक ॲसिड वाढतें. हा विकार आनुवंशिकहि असतो. थंड व सर्द हवेचे वेळीं हा विकार जास्त आढळतो.

### मुख्य दूषिततत्त्व— पृथ्वी व जल.

**लक्षणें**—– सर्वांग दुखूं लागतें, विशेषतः पाय व हात दुखूं लागतात, गलग्रंथी सुजतात व सांधे दुखूं लागतात. एकादे भागाचे सांध्यांत सूज जास्त असते. सुजलेला भाग गरम, लाल व फणफणलेला असून त्या ठिकाणीं तीव्र वेदना होतात. हात लावलेलाहि सहन होत नाहीं. एका सांध्यांतली सूज कमी होते व दुसऱ्या सांध्यांत वाढते, या प्रमाणें सर्व सांधे धरत जातात. ताप सुमारें १०१ ते १०३ पर्यंत असतो. कधीं जास्तहि असतो. घाम पुष्कळ येतो व त्याला आंबूस वास असतो. रोगी फिकट होत जातो. जिभेवर बुरशी येते. लघ्वी लाल असते. कांहीं रोग्यांचे रुधिराभिसरणावर फार परिणाम होतो व नाडी फार मंद चालते. रसक्रियेंत मुख्यतः बिघड होत असल्यामुळें इतर अनेक इंद्रियांत बिघाड होतो. ह्यांत मनुष्य सहसा दगावत नाहीं. परंतु रक्ताभिसरणक्रियेंत ( नाडींत ) अनियमितपणा, अतिशय क्षीणता वगैरे बिघाड झाला म्हणजे धास्ती असते. साधारणपणें १४ दिवसांत गुण वाटूं लागतो. लहानमुलांना विकार झाल्यास सांधे फारसे दुखत नाहींत.

**उपचार**—– पोटांत नं. १।२ व सुप्रभा द्यावें. मधून मधून चपलेच्या गोळ्या द्याव्या. सांध्यावर सुप्रभा सौदा० घड्या घालाव्या.

एकदां हा विकार झाला म्हणजे पुढें अनेक वर्षेंपर्यंत सर्द हवा वगैरे कारणानीं पुन्हा पुन्हा उद्भवतो. म्हणून बरें वाटल्या नंतरहि बरेच दिवस

औषध चालू ठेवावें, म्हणजे चांगला उपयोग होतो व वारंवार विकार होत नाहीं. जुनाट विकार असेल त्या वेळीं वरील औषधांची पुढील त्रिलयनें द्यावीं.

## २२८ आमसंग्रहणी. ( म्युकस डायेरिआ. )

**कारणें**— अपचन, आग्निमांद्य, बद्धकोष्ठ, यकृतदोष वगैरे.

**मुख्य दूषिततत्त्व— पृथ्वी.**

**लक्षणें**— शौचाच्या वेळीं आम पडणें, वारंवार शौचाला होणें, केव्हां-तरी आमयुक्त जुलाब होणें तर केव्हां खडा धरणें वगैरे.

**उपचार**— पोटांत नं. १ व योग० देणें; कांहीं रोग्यांना पोटांत चपला देण्यानें फायदा होतो. ३ बच्या घड्या पोटावर घालाव्या.

## २२९ आम्लपित्त व परिणामशूल— ( ॲसिडिटी. )

**कारणें**— अग्निमांद्य, अपचन, आमरस दूषित होणें व त्याचें प्रमाण वाढणें, यकृत वगैरे मधून दूषित पाचक रसस्राव होणें, वगैरे.

**मुख्य दूषिततत्त्व— पृथ्वी व तेज.**

**लक्षणें**— घशाशीं आंबटवणी येऊं लागते, आमरस बिघडून अन्नासह वांतीनें पडतो. जेवणा नंतर ४।५ तासांनीं घशाशीं जळजळणें सुरू होतें, पोटांत वात धरतो, डोळ्यांपुढें काजवे येऊं लागतात. याचा परिणाम रक्ता-शयावरहि होतो व धडधडूं लागतें. परंतु वांती होऊन पित्त पडून गेलें म्हणजे बरें वाटतें; घशाशीं जळजळूं लागलें असतां कांहीं खाल्लें असतां ( विशेषतः कोरडे पदार्थ ) थांबतें. तीव्र आम्लपित्त झालें असतां दांत आंबतात, आमाशयांत व्रण पडण्याचा संभव असतो व त्यामुळें पोटशूळ उत्पन्न होण्याचा संभव असतो. उलटी झाल्यानें पोट दुखणें थांबतें. कांहीं रोग्यांना दररोज सकाळीं उलटी होते किंवा करावी लागते. परंतु कांहींना १५।१५ दिवसानीं उलट्या होऊं लागतात, डोकें अतिशय दुखतें सांठलेलें पित्त पडून गेलें म्हणजे बरें वाटतें.

**उपचार**-- जेवणाचे पूर्वी व नंतर नं. १ च्या ४।४ गोळ्या घ्याव्या. कांहीं वेळां विकार तीव्र असला म्हणजे पोटांत कांहीं ठरत नाहीं. लगेच उलटी होऊन पडते. अशा वेळीं रोग्याला नुसतें वरचेवर दूध द्यावें व दिवसां-

तून ५।६ वेळां नं. १. ३ ब व योग० प्रत्येकीं ४।४ गोळ्या द्याव्या. दूध चांगलें पचूं लागलें म्हणजे क्रमानें उत्तरोत्तर जड आहार द्यावा. पोटावर ३ ब व योग० ( यकृत,प्लीहेवर ) घड्या घालणें हितावह असतें. कांहीं वेळां आम्लपित्त वाढून डोकें दुखूं लागतें, घशाशीं जळजळतें, कंप सुटतो, अस्वस्थता येते परंतु चटकन् उलटी होत नाहीं. अशा वेळीं आकंठ पाणी पिऊन ओकून टाकणें हितकर असतें. मात्र असें ओकून काढण्याची संवय होऊं देऊं नये.

**पथ्य**-- जेवणाचे वेळीं शक्य तोंवर कोरडे पदार्थ खावे. आंबटी, ताक वगैरे पातळ पदार्थ खाऊं नयेत. जेवतांना पाणी मुळींच पिऊं नये. जेवणानंतर २ तासांनीं पाणी प्यावें. पाणी पिण्यासंबंधीचा हा नियम फार महत्त्वाचा आहे. या योगें आम्लपित्त लवकर मोडतें. औषध ४।६ महिने सतत घेतलें असतां जुनाट विकारहि साफ बरा होतो. तेलकट, तुपट, तळलेले व वातूळ पदार्थ खाऊं नयेत.

## २३० आमांश ( डिसेंटरी )

**कारणें**— या विकराची सांथ, मलावरोध, थंडी, सर्दी, जडान्न किंवा सडकें अन्न खाणें, कोठ्यांत उष्णता वाढणें, दूषित हवापाणी वगैरे.

आशुकारि व चिरकारि असे ह्याचे दोन प्रकार आहेत.

### मुख्य दूषित तत्त्व— पृथ्वी.

**लक्षणें**— ( आशुकारि ) आंतड्यांना सूज येऊन क्षतें पडूं लागतात. पोटांत मुरडा होऊं लागतो. शौचाला वारंवार जावें लागतें. शेंबडाप्रमाणें आंव पडूं लागते. ती शेंबडाप्रमाणें पांढरी किंवा जरा तांबूस वर्णाची असते. कळ येऊन ५।५ मिनिटांनीं सुद्धां शौचाला होते. लघ्वी फार कमी होते.

**उपचार**— पोटांत नं. १ व सुप्रभा प्रथम विलयन द्यावें किंवा त्यानें विकार शमत न जाईल तर प्रत्येकीं २।४ गोळ्याहि थोड्या थोड्या अंतरानें द्याव्या. चपलेच्या घड्या पोटावर घालाव्या. रक्ती आंव असेल तर चपला व सुप्रभा यांच्या घड्या आलटून पालटून घालाव्या. थंड पाणी वरचेवर भरपूर द्यावें. पाणी भरपूर देणें अत्यंत जरूर आहे. भरपूर पाणी देत गेलें म्हणजे कांहीं वेळानें लघ्वीला जास्त होऊं लागतें तसें होऊं लागलें कीं गुण

पडत चालला असें समजावें. लघ्वीला जास्त झालें तरी भरपूर पाणी देतच राहावें. आहार अगदीं हलका असावा. ( दूध, ताक, कण्हेरी वगैरे. )

**लक्षणें**— ( चिरकारि ) बरेच वर्षें राहातो. दिवसांतून ४।२ वेळां कळ येऊन मलमिश्रीत आव पडते. कांहींना रक्तहि पडते.

**उपचार**— पोटांत नं. १ व सुप्रभा द्यावी. पहिल्यानें कांहीं दिवस गोळ्याच द्याव्या. नंतर प्रथम विलयन, पुढें पुढचीं विलयनें देणें हितावह होतें. बरेच वेळां रक्त गेलें तर थकवा येतो व नाडी क्षीण होते. तसें झालें तर पोटांत नं. २ च्या गोळ्या द्याव्या व रक्ताशयावर सुप्रभा घड्या घालाव्या. आमांशाची जोराची सांथ असेल व रोग्याचा विकार तीव्र असेल तर १५।-१५ मिनिटांनी नं. १ सुप्रभा यांच्या प्रत्येकीं ४।४ गोळ्या व जोडीला नं. २ वारंवार द्यावी. रक्ताशयावर व पोटावर सुप्रभा घड्या बराच वेळ घालाव्या लागतात. चपला घड्यांचाहि फार चांगला उपयोग होतो.

## २३१ आमाशयाधोमुखसंकोच

**कारणें**—हा लहान मुलांचा होणारा विकार आहे. त्यांत आमाशयाच्या अधोमुखाची वृद्धि व नजीकच्या स्रोतसांचा संकोच होतो.

**मुख्य दूषित तत्त्व— पृथ्वी व आकाश.**

**लक्षणें**— शौचाला होत नाहीं. मूल ओकूं लागतें व पोटांत अर्बुदा-प्रमाणें गांठ लागते.

**उपचार**— पोटांत नं. १ व चपला देणें. चपलाघड्या पोटावर घालणें.

## २३२ आमाशयविस्तार (डायलेटेशन ऑफ् दी स्टमक.)

**कारणें**— आमाशयाचे स्नायूंचें दुर्बलतेमुळें किंवा कॅन्सर, व्रण, दाह वगैरे कारणांनीं आमाशयाचे पुढील भागाचा संकोच होतो व मागील भागांतून पुढें पक्काशयांत अन्नांश ढकलण्याची क्रिया मंद होत जाऊन आमाशयाची आकुंचनप्रसरणाची शक्ति उत्तरोत्तर मंद होत जाते व आमा-शयाचा विस्तार होतो. याला मूळ कारणें वाजवीपेक्षां जास्त खाणें, दाह करणारे अति उष्ण किंवा अति थंड अथवा पचनाला जड, रुक्ष, निःसत्त्व पदार्थ वारंवार खाणें, मंदाग्नि हीं होत.

### मुख्य दूषिततत्त्व — पृथ्वी.

**लक्षणें**— पोट दुखणें, अपचन, ढेंकरा, वांती, पोटांत वात धरणें, मलावरोध, हांव लागणें वगैरे.

**उपचार**--पोटांत नं० १ व योग० बाहेरून चपलेच्या घड्या घालाव्या.

## २३३ इसब ( एक्झिमा )

**कारणें**— रक्तदोष, ज्ञानतंतुदोष, काळजी वगैरे. त्वचा हें स्पर्शज्ञानेंद्रिय म्हणजे वायुतत्त्वाचें ज्ञानेंद्रिय आहे. म्हणून वायुतत्त्वांतील बिघाड हें मुख्य कारण आहे.

### मुख्य दूषिततत्त्व— जल व वायु.

**लक्षणें**— याचे पुष्कळ प्रकार आहेत. तथापि मुख्य दोन प्रकार; एक ओला व दुसरा सुका. हा मुख्यतः पायावर अथवा हातांवर होतो. प्रथमतः अतिशय कंड सुरू होते व त्या ठिकाणीं बारीक, पुटकुळया येतात किंवा नुसती कंड सुटून खाजविल्यानें नुसता भुसा निघून जातो, व जळजळ होते. विकार हळूहळू पसरत जातो व कातडी काळसर होत जाते. मधूनमधून थोडे दिवस बरेपणा वाटतो, परंतु पुन्हां जोर होत असतो.

**उपचार** -- पोटांत नं० २।४ ची पुढील सूक्ष्म विलयनें द्यावीं. बाहेरून सौदा० किंवा चपला तेल लावावें. तेल दिवसांतून बरेच वेळां लावावें तेलाचा ओलावा साफ नाहींसा होऊं देऊ नये. किंवा तेलांत कापडाची अथवा कापसाची घडी भिजवून विकृत भागीं पट्टी बांधून ठेवावी. विकार सहा महिन्यांतला असेल तर महिना पंधरा दिवसांतहि उत्तम बरें वाटतें. विकार अनेक वर्षांचा असेल तर औषध वर्ष-सहा महिने सुद्धा घ्यावें लागते. सौदा० तेलाचा चांगला उपयोग होतो.

**विशेष सूचना**--औषध सुरू केलें म्हणजे कांहीं वेळां विकाराचा जोर एकदम वाढलेला दिसतो. तो भाग तडकल्यास रवा होऊन त्यांतून नासकें रक्तहि निघून जातें आणि थोडे दिवसांतच बरेपणा वाटतो. आजूबाजूचा आवर कमी होत जातो. जुनाट विकारांत बरेपणा वाटत असतां मध्येंच २।३ वेळां विकाराचा पुन्हां जोर होण्याची शक्यता असते. परंतु पहिल्या वेळेपेक्षां

बहुधा दुसऱ्या वेळेला विकाराचा जोर कमी असतो. पूर्ण गुण येईतों पोटांतील व बाहेरील औषधें चालू ठेवावीं.

## २३४ इंद्रलुप्त— (चाई)

ह्यांत कांहीं भागांचे केंस गळून पडतात व तो भाग गुळगुळीत होतो. यावर सुप्रभा तेल सतत कांहीं दिवस लावलें असतां केस येऊं लागतात.

## २३५ उचकी— हिक्का– ( हिक्काफ. )

( आकस्मिक अगर विलंबी कारणांनीं उचकी लागते )

**कारणें**—अपचन, पोटांत वात धरणें, भूक लागली असतां न खाणें, तहान मारणें वगैरे आकस्मिक कारणें असतात. आमाशयाचा दाह, व्रण अथवा यकृत् प्लीहाविकार, मज्जातंतुविकार वगैरेंनीं उचकी लागते किंवा आकस्मिक कारणांनीं लागलेली उचकी फार काळ राहिल्यास अथवा वारंवार लागूं लागल्यास आमाशय व आंतडीं वगैरेंचा दाह होऊन विलंबी बनतें. नैसर्गिक श्वासोच्छ्वासाचे वेळीं श्वासनलिका उघडणें, उरोदरपट ( डायफ्राम ) आकुंचन पावणें या क्रिया बिनविरोध चालू असतात, त्यांत वरील कारणांनीं बिघाड होतो व उचकी येते.

**दूषिततत्त्व कारणें पाहून ठरवावें लागतें.**

**लक्षणें**— उचकी सर्व लोकांना माहीत असते. ह्या शिवाय या विकारांत पोटाला ताण बसणें, छातींत दुखूं लागणें, अग्निमांद्य, बेचैनपणा, डोळे ताटकळणें वगैरे लक्षणें असतात.

**उपचार**— आकस्मिक उचकी लागली असतां कारण शोधून त्याचें निराकरण करावें. उदा० भुकेमुळें असल्यास थोडें खावें, तहान मारली गेली असेल तर थोडें पाणी प्यावें. इ०. नं० १ व योग० प्रयेकीं २।२ गोळ्या थोड्या अंतरानें द्याव्या. पोटावर ३ब व योग० घड्या घालाव्या. विलंबी विकारात नं० १।३ व योग० प्रथम अथवा द्वितीय विलयन द्यावें. यकृत व प्लीहा यांवर ३ब व योग० घड्या घालाव्या. कारणपरत्वें मूळ कारण नाहींसें होण्यासाठीं उपाययोजना करावी.

**पथ्य**—हलका आहार असावा. विकार थांबल्यानंतरहि ४।५ दिवस हलका आहार देणेंच योग्य असतें. वातुळ पदार्थ खाऊं नयेत.

## २३६ उन्हाळे— मूत्रकृच्छ्र.

**कारणें**—ऊन लागणें, पाणी कमी पिणें, फार चांगलें, उष्ण पदार्थ व जडान्नसेवन, जागरणें वगैरेमुळें कोठ्यांत उष्णता वाढणें.

**मुख्य दूषिततत्त्व**— जल व पृथ्वी.

**लक्षणें**— लाल, गरम, पिंवळट, कडक लघ्वी होणें. लघ्वीचे वेळीं जळजळ, थोडें थोडें व आगीसारखें शौचाला होणें.

**उपचार**— पोटांत नं० १।२ सुप्रभा; बेंबीचे खालील भागावर व पाठीच्या कण्याचे खालील भागावर सुप्रभा घड्या घालाव्या. कांहीं रोग्यांना पोटांत नं०३ द्यावा लागतो.

## २३७ उदकमेह— सोमरोग ( डायाबिटिस् इन् सिपिडस्. )

**कारणें**— मनावर तीव्र आघात, फार झोंप घेणें, सुखासीनता, वारंवार अपचन वगैरे.

**मुख्य दूषिततत्त्व**— पृथ्वी व जल.

**लक्षणें**—अति तहान, लघ्वीला वारंवार व पुष्कळ होणें, त्यामुळें निद्रानाश, अपचन अशक्तपणा, यांत मधुमेहाप्रमाणें लघ्वींतून साखर जात नाहीं.

**उपचार**— पोटांत नं० १।२ द्यावें. केव्हां तरी नं० ४ व सौदा० गोळ्या द्याव्या.

## २३८ उदर ( असायटिस्. )

[ याचे अनेक प्रकार आहेत. सामान्यतः पोटाचा आकार ज्या विकारांत फार वाढतो व टिकून राहतो, सूज येते, पोटावर सुरकुत्या पडत नाहींत, त्या सर्वांचा समावेश उदर या सदरांत केला जातो. ]

**कारणें**— सदोष आहार, अजीर्ण, अग्निमांद्य वगैरे मूळ कारणें असतात; त्याचा परिणाम रसक्रियेवर होऊन, रुधिराभिसरण नीट चालत नाहीं; आणि कोणत्याहि कारणांनीं अभिसरणाला अडथळे आले, म्हणजे त्या ठिकाणच्या वाहिन्यांत रसाचा जास्त संचय होतो व त्यांच्या आवरणांतून रसांतील द्रव झिरपून एकादे भागांत सांचूं लागतो. रक्ताशय, यकृत, प्लीहा, मूत्र-

पिंड वगैरेपैकीं जें इंद्रिय विकृत झालें असेल, त्या इंद्रियाचे स्थानपरत्वें याचे निरनिराळे प्रकार मानतात.

### मुख्य दूषिततत्त्व – पृथ्वी व जल.

**लक्षणें**— (१) रक्ताशयांतील दोष हें मुख्य कारण असल्यास, छातींत विशेष धडधड, थोडी मेहनत झाली तरी हांव लागणें, सुखा खोकला, डोकें दुखणें, पायांवर व पोटावर सूज, डोळे बटबटीत होणें वगैरे; (२) मुत्रपिंड दोष असल्यास लघ्वी थोडी, काळसर, लाल, रक्त पडणें, हात पाय, पोट व डोळे सुजणें वगैरे.

(३) यकृतदोष असल्यास प्रथम पोट फार मोठें होणें, शरीराचे इतर भाग सुकून गेल्यासारखे वाटणें, फिकटपणा, वांति, मलावरोध, क्वचित् थोडा ताप, कावीळ वगैरे.

**उपचार**— कोणत्याहि प्रकारांत मुख्यतः पोटांत नं० १।२ सुप्रभा व बाहेरून सुप्रभा; यकृत व मूत्रपिंड दूषित असल्यास, पोटांत नं० १।२।३ योग० व बाहेरून ३ब योग०; प्लीहा किंवा फुफ्फुसें दूषित असल्यास, पोटांत नं० १।२ योग० व मधून मधून नं० ४ देणें, पाठीच्या कण्यावर सुप्रभा सौदा० घड्या व पोटावर चपला व केव्हां तरी ज्योति० घड्या ठेवण्याचा फार चांगला उपयोग होतो.

## २३९ उपदंश ( सॉफ्ट शांकर. )

**कारणें**— घाणेरडेपणामुळें, आघातानें, नख वगैरे लागल्यामुळें, अति मैथुनानें, योनिदोषामुळें अथवा उपदंश असलेल्या स्त्रीपुरुष संयोगानें, हा विकार असलेल्या माणसाचे कपडे वापरल्याने किंवा त्यानें वापरलेल्या वस्तूंचे संसर्गानें हा विकार होतो.

### मुख्य दूषिततत्त्व — जल.

**लक्षणें**— शिश्नावर फोड येतात, ते चिघळतात. ठणका फार असतो. पू ,व्रण वगैरे होतात. उपदंश व गरमी या दोन रोगांत थोडा फरक आहे. मात्र हे दोन्ही विकार बऱ्याच रोग्यांना एकदम झाल्याचें आढळतें.

**उपचार**— नं० ७ हें या विकारावर उत्तम औषध आहे. परंतु या विका-

रांत नं०७ चे जोडीला नं० १।२ चें विलयन द्यावें म्हणजे लवकर गुण येतो. वृषणाला सुप्रभा विलयन किंवा तेल लावावें.

## २४० उवा.

**कारणें**— डोकें स्वच्छ न ठेवणें हें मुख्य कारण आहे.

**उपचार**— चपला किंवा सौदा० तेल डोकीला दिवसांतून ३।४ वेळां चबचबीत लावावें म्हणजे ४।८ दिवसांत कोणताही त्रास न होतां उवा व लिखा पडून जातात.

## २४१ उसण भरणें.— ( लॅंबेगो. )

**कारणें**—ओझें उचलतांना, धांवतांना, उड्या मारतांना किंवा जोरानें शिंक आली असतां स्नायूंना हिसका बसतो व लचक भरते. पोटांत वात धरणें, अग्निमांद्य वगैरे विकार झाले असतांहि हा विकार चटकन होतो.

### मुख्य दूषिततत्त्व–पृथ्वी व जल

**उपचार**—पोटांत नं. १।२ सुप्रभा; बाहेरून सुप्रभा किंवा सौदा०; कमरेंत उसण असल्यास बाहेरून चपला, ज्योति० ९।१०। व १४ यांवर लावावी.

## २४२ कंठस्थपिंडविकार ( थॉयरॉइड ग्लँडचा विकार )

(कंठस्थपिंड हा गळ्याच्या पुढच्या बाजूस असून ह्याचे दोन भाग असतात.)

**कारणें**—या पिंडांतून शरीराला उपयुक्त असा एक प्रकारचा स्राव होत असतो. हा पिंड विकृत होऊन त्याचा दाह व वाढ होते त्यामुळें त्यातून होणारा स्राव एक तर फार कमी किंवा फार जास्त होतो.

### मुख्य दूषिततत्त्व–तेज

**लक्षणें**-थकवा, अग्निमांद्य, थोड्या श्रमानें हांव लागणें, कंप, शब्द जड येणें, रुक्ष व निस्तेज त्वचा, शरीराला बेढबपणा येणें वगैरे.

**उपचार**–पोटांत न. ३ व योग० मुख्य व जोडीला नं. १।२ मधून मधून द्यावें. गळ्यावर चपलेच्या घड्या घालाव्या.

## २४३ कंठशालूक ( टॉन्सिलायटिस् )

[ यांत आशुकारि व चिरकारि असे दोन प्रकार आहेत. ]

**कारणें**–( आशुकारि ) रसक्रियेचा बिघाड, ताप, आमवात वगैरे विकारांत ( टॉन्सिल्स ) उपजिव्हिका ग्रंथी वाढून सुजतात व त्यांवर अंकुर येतात.

### मुख्य दूषिततत्त्व–जल

**लक्षणें**–रोग एकदम जडतो. घसा कोरडा पडतो व उष्णता वाढते. जोराचा ताप, डोके दुखणें, जिभेवर बुरशी, श्वासाला दुर्गंधी, गिळतांना वेदना, पिवळसर व चिकट लाळ सुटते. ग्रंथींत पू होऊन एक किंवा दोन्ही बाजूंस, विद्रधी होण्याचा संभव असतो. असें झाल्यास लक्षणें तीव्र होण्याचा संभव असतो. तोंड उघडतां येत नाहीं. विद्रधी फुटतो व त्यांतून पुष्कळ रक्तस्राव होतो. ह्यांच्या सांधीहि येतात.

**उपचार**—पोटांत नं. २ व सुप्रभा जोडीला. नं. १ द्यावें. चपला घड्या गळ्यावर घालाव्या. सुप्रभेच्या गुळण्या मधून मधून कराव्या.

**कारणं**—( चिरकारि ) आशुकारि विकार बरा झालासा वाटला तरी तो निःशेष बरा न होणें, आरंभापासूनच विलंबी विकार असणें, रसक्रियेचे नैसर्गिक कार्यांत बिघाड वगैरे.

### मुख्य दूषिततत्त्व—जल.

**लक्षणें**—गलग्रंथींचा दाह, त्या मोठ्या होणें, झोंपेंत तोंड उघडें राहणें, श्वासोश्वासाला अडचण, हांव लागणें, कोरडा खोकला, अशक्तपणा, वाढलेल्या गांठींतून रक्तस्राव होणें वगैरे.

**उपचार**—वरीलप्रमाणेंच करावें; परंतु औषधाचें प्रमाण कमी व विलयनें पुढील म्हणजे सूक्ष्म द्यावीं.

## २४४ कंपवात ( पॅरॅलिसिस ॲजिटन्स )

**कारणें**—हा उतारवयांत होणारा विकार आहे. अनेक कारणांनीं रसक्रिया बिघडते व त्यामुळें ज्ञानतंतु दुर्बल होतात आणि त्यामुळें निरनिराळ्या प्रकारचे वातविकार होतात. कंपवात हा एक वाताचाच प्रकार आहे. यांत ठराविक स्नायूंवरील ज्ञानतंतूंचें नियंत्रण कमकुवत होऊन स्नायूंचा ठराविक व जणूं तालबद्ध कंप होत असतो.

### मुख्य दूषित तत्त्व-जल व वायु

**लक्षणें**— एखादे भागाचा ठराविक प्रमाणांत कंप, मान व डोकें यांना सहसा कंप नसणें, स्नायु कठीण होत जाऊन आंखडत जाणें व त्यांच्या विचित्र हालचाली होणें, ठुसठुस व वेदना, पुढें ढकल्यास पुढेंच जात राहाणें व थांबतां न येणें, मागें ढकलल्यास मागेंच जाणें, अस्पष्ट शद्बोच्चार, रोगी विचारग्रस्त असेल त्या वेळीं कंप नसणें.

**उपचार**—पोटांत नं. २।४ सुप्रभा, बाहेरून रक्ताशयावर सुप्रभा, पाटीचा कणा व कंपित भागावर सुप्रभा सौदा० मधून मधून चपला ज्योति० पोटांत एकादेवेळीं नं. १ द्यावा.

## २४५ कफविकार

**कारणें**—धूम्रपान, वातुळ पदार्थ खाणें, अजीर्ण, पडसें फार दिवस टिकून राहणें, फुफ्फुसांची दुर्बलता, हवामानांतील आकस्मिक फरक वगैरे.

### मुख्य दूषिततत्त्व-पृथ्वी व जल

**लक्षणें**—खोकला, कफ घट्ट होणें, घशाशीं घुरघुरणें वगैरे.

**उपचार**—पोटांत नं. १।२।६ व सुप्रभा. कफ दाटला असून चटकन सुटत नसेल तर सौदा० च्या घड्या छातीवर व कपाळावर घालाव्या. पोटांत सौदा० दिली असता कफ चटकन पातळ होतो. मात्र वारंवार देऊं नये.

## २४६ कलायखंज ( लोकोमोटार ॲटॅक्सी )

**कारणें**—फिरंगरोग ( गरमी ), अतिमैथुन, पाठीच्या कण्यांतील ज्ञानतंतूंची दुर्बलता, कण्यावर आघात वगैरे.

### मुख्य दूषिततत्त्व-जल व वायु

**लक्षणें**—चालण्यांत अस्थिरता, पायांना कंप, डोळे मिटून किंवा अंधेरांत चालतां न येणें, पायांना मुंग्या येणें, कमरेला दोरा बांधल्यासारखें वाटणें, लघ्वीची धार नीट न पडणें, शौचाला नकळत होणें, नपुंसकत्व, मूत्रपिंड, गुदद्वार, आंतडी वगैरे ठिकाणीं कांहीं वेळां शूल व तदनुषंगिक विकार होणें.

**उपचार**—पोटांत नं. २।४।७ व योग० पाठीच्या कण्यावर विशेषतः खालील भागावर सु० सौदा० घड्या घालाव्या. मधूनमधून पोटांत नं० १ देणें.

## २४७ कवलू-पानथरी-प्लीहा-विकार- ( स्प्लीन विकार )

( प्लीहेचे आकुंचन, फाजील वाढ, सूज, पाचकस्राव कमीजास्त होणें, प्लीहोदर, प्लीहादोषामुळें पांडुरोग, ताप, मधुमेह, गुल्म वगैरे प्रकारचे प्लीहेचे विकार आहेत. )

**कारणें**--अपचन, अवरोध, रक्ताशयविकार, खाण्यापिण्यांत मधुर रसाची कमतरता अथवा आधिक्य, ताप, उपदंश, वीर्यनाश, स्वप्नावस्था, अशुद्ध हवापाणी वगैरे.

### मुख्य दूषिततत्त्व—वायु व पृथ्वी.

**लक्षणें**—प्लीहा लहान होते किंवा वाढूं लागते. वाढूं लागली म्हणजे वाढत वाढत नाभीचे खालीहि जाते. त्या जागीं स्पर्श केला असतां दुखतें. पांडुरोग तीव्र होतो. या अवस्थेंत विकाराचें स्वरूप, कमजास्त होत असतें. ही स्थिति कित्येक महिने किंवा वर्षेंहि टिकते. कधीं कधीं रक्ताची वांति होते किंवा मलमार्गें रक्त पडतें. अतिसार, मधुमेह, जलोदर वगैरे विकारहि होतात.

**उपचार**--पोटांत नं. ११४ देणें आणि कारणपरत्वें नं. २।२ देणें; बाहेरून सौदा० व ३ ब यांचा उपयोग करावा.

## २४८ कानांचे विकार—कान वाहाणें, कानांत गळूं किंवा फोड होणें वगैरे.

**कान वहाणें**-कारणें कानाचे भागावर जोराचा धक्का बसला असतां किंवा तीव्र पडशानें कान वाहूं लागतो.

### मुख्य दूषित तत्त्व-जल.

**लक्षणें**-कान वाहण्यापूर्वीं त्यात ठणका असतो. थोडा ताप येतो. कानांतून पू व क्वचित् रक्तहि येतें. हा विकार विशेषतः लहान मुलांना होतो. कांहीं लोकांना अनेक वर्षें असतो.

**उपचार**--पोटांत न० २ व सुप्रभा यावें. सुप्रभातेल कानांत घालावें. तेल घालण्यापूर्वीं कापसाच्या फायानें कानांतील पू स्वच्छ पुसून काढावा. व नंतर तेल घालावें. कानांत फोड, गळूं वगैरे झाल्यास वरीलप्रमाणेंच उपचार करावे व कर्णमूळाजवळ चपलाज्योति० लावावी.

## २४९ कांजिण्या ( व्हेरिसेला. )

**कारणें:—** सामान्यतः याची सांथ येते व बहुधा लहानपणीं हा विकार संसर्गानें होतो.

**मुख्य दूषिततत्त्व— जल.**

**लक्षणें—** साधारण ज्वर येऊन दुसरे तिसरे दिवशीं प्रथम पोटावर देवीप्रमाणेंच दाणे उभारून नंतर सर्वांगावर पसरतात. उभारण्यानंतर दुसरे दिवशीं पाणी भरूं लागतें व २।३ दिवसांनीं खपल्या धरूं लागतात.

**उपचार—** नं० २।३ व मधून मधून नं. १ व सुप्रभा देणें.

## २५० कावीळ; कामला ( जॉंडिस. )

[ रक्तामध्यें पित्तकण मिसळून त्यानें त्वचेचा व रसांचा रंग पिवळा होतो. ]

**कारणें—** यकृतामधून उत्पन्न होणारें पित्त स्वाभाविकपणें आंतड्यांत उतरावयाचें, परंतु त्याचा कोणत्या तरी कारणानें निरोध होतो व तें पित्ताशयांत सांचून राहतें आणि तेथून तें रक्तांत शोषलें जातें. पित्ताचे खडे बनणें, अर्बुदें, कृमि, पित्तवाहिन्यांचा दाह किंवा संकोच, तसेंच सांथीचे तापांचीं किंवा अन्य रोगांचीं विषें, पारा, सोमल वगैरे विषें, मानसिक आघात वगैरे.

**मुख्य दूषिततत्त्व— पृथ्वी व तेज.**

**लक्षणें—** डोळे, नखें व कांतडी पिंवळी होणें, लघ्वी पिंपळी, अपचन, मळमळ, उलटी, मलावरोध तर केव्हां अतिसार, सुस्ती, बेचैनपणा, अंग मोडून येणें, ताप, तहान, डोकें दुखणें, खाज सुटणें, नाडी व श्वास मंद असणें, घाम वगैरे.

**उपचार—** पोटांत नं० १।३ व योग०; यकृत व प्लीहा यांवर ३ ब व योग०च्या यांच्या घड्या घालाव्या. नाडीची गति मंद असल्यास नं०२ द्यावा. यकृताला सूज असल्यास चपला घड्या घालाव्या.

## २५१ काळपुळी— चाळणपुळी ( कार्बंकल. )

**कारणें—** काळजी, मानसिक विकार, रसक्रियेचा बिघाड, आघात इत्यादि.

### मुख्य दूषिततत्त्व-- जल व वायु.

**लक्षणें**-- प्रथम गळवाप्रमाणें उठाव होऊन त्यांत जळजळ आणि ठणका उत्पन्न होतो. वेदना तीव्र असतात, वर्ण काळसर तांबूस असतो. पिकल्यावर छिद्र पडतें. छिद्र एक किंवा चाळणीसारखीं अनेक असतात. हा विकार बहुतकरून मानेवर किंवा पाठीवर होतो. ताप असतो. पुवाला अत्यंत दुर्गंधी येते. मधुमेहाच्या रोग्याला हा विकार झाला तर बहुधा प्राणघातक ठरतो.

**उपचार**— पोटांत नं० २।४ व मधून मधून नं० १ व ३ द्यावें. वरून सुप्रभेच्या घडया वरचेवर घालीत राहावें. पू झाल्यावर दाबून पिळून काढून सुप्रभा विलयनानें स्वच्छ धुऊन घडया घालाव्या. ह्या औषधानें फारच लवकर गुण येतो.

## २५२ कोड ( ल्यूकोडर्मा. )

[ हा त्वचादोष आहे. शरिराच्या एकाद्या भागाची त्वचा पांढरट, लालसर, अगर काळसर होते व विद्रूपपणा दिसूं लागतो. ]

**कारणें**— ज्ञानरसवाहिन्यांत विजातीय द्रव्यें सांठतात. व तीं एकत्र बरींचशीं जमलीं म्हणजे त्वचेचा रंग पालटतो.

### मुख्य दूषिततत्त्व—वायु व जल.

**लक्षणें**--स्पष्टच असतात.

**उपचार**-- पोटांत नं० ४ व बाहेरून सौदा०; पोटांत मधून मधून नं. १।२ द्यावा.

## २५३ खरूज, खवडा. कंडू, गळूं वगैरे.

**कारणें**— वसादोष व रक्तदोष हें मुख्य कारण असतें.

### मुख्य दूषिततत्त्व— पृथ्वी व जल.

**उपचार**— पोटांत नं० १।२ सुप्रभा; सुप्रभातेल लावावें. गळवावर सुप्रभा घडयांचा चांगला उपयोग होतो.

## २५४ खोकला

[ कफविकारांत खोकला असतोच; परंतु इतर कारणांनींदेखील खोकला येतो. ]

**कारणें**— खवखवणारे पदार्थ खाण्यांतून जाण्यानें किंवा दूषित हवेंत श्वासोच्छ्वास करण्यानें, घसा, श्वासनलिका, घशांतील गांठी किंवा पडजीभ याचा दाह होतो व त्यामुळें खोकला लागतो.

**मुख्य दूषिततत्त्व— जल.**

**उपचार**— खोकला कोरडा असेल तर नं० २ व सुप्रभा, कफ असेल तर जोडीला नं० ६ द्यावा. ज्योति० ९।१० यांवर लावावी. गळ्यावर सुप्रभा किंवा चपला घड्या घालाव्या.

## २५५ गजकर्ण

**कारणें**— इसबाप्रमाणेंच हा एक त्वचारोग आहे. हा विकार स्पर्श-जन्य आहे. गजकर्ण खाजवितांना त्याचे जंतू नखांत राहतात व त्यामुळें शरीराच्या अन्य भागावर खाजविलें असतां विकार चरत जातो. अशा मनुष्यानें नेसलेलें अगर वापरलेलें वस्त्र दुसऱ्यानें वापरल्यानेंहि त्याला हा विकार होतो.

**मुख्य दूषिततत्त्व— जल व वायु.**

**लक्षणें**— त्वचा लाल होते, थोडी सुजते व त्याचा पांढरा पापुद्रा निघतो. खाज फार असते. खाजविल्यावांचून चैन पडत नाहीं आणि खाजविल्यावर आग होते. वारंवार खाजवून त्वचा काळसर होते.

**उपचार**— पोटांत नं० २ व मधून मधून नं० ४ द्यावा. बाहेरून सुप्रभा सौदा०; सुजमटपणा मोडण्यासाठीं चपलाहि लावावी.

## २५६ गंडमाळा ( स्क्रॉफ्यूला. )

[ गळ्याच्या एका किंवा दोन्ही बाजूंच्या गांठी वाढतात व त्यांची एक माळच झाल्यासारखी दिसते. म्हणून याला गंडमाळ असें म्हणतात. ]

**कारणें**—क्षयाचे जंतूंची संसर्गबाधा, रसक्रियेंतील वसारसाचा अशुद्धपणा.

**मुख्य दूषिततत्त्व— पृथ्वी व जल.**

**लक्षणें**—प्रथम गळ्याच्या भागांतील वसाग्रंथी वाढतात. नंतर कांहीं महिन्यांनीं किंवा वर्षांनीं इतर— खाकेंतील मानेंतील वगैरे वसाग्रंथी वाढतात. कांहीं गांठीं पिकून फुटतात व त्यांतून पू व रक्त वाहतें. मनुष्य कृश होत जातो. बारीक ताप येऊन अशक्तपणा वाढत जातो. क्षुधा मंद होते.

**उपचार—** पोटांत नं० १।२ सुप्रभा; बाहेरून गांठीवर सुप्रभा १ व मधून मधून चपला ज्योति० घड्या.

## २५७ ग्रंथिक सान्निपात ( प्लेग. )

**कारणें—** हा रोग प्रथम उंदरांना होतो व त्यांच्या आंगावरील पिसवा माणसांना डसून त्यांचेमार्फत या रोगाचा फैलाव माणसांत होतो. याचे दोन प्रकार आहेत. एकांत जांघेंत अथवा कांखेंत गांठीं येतात, व दुसऱ्यांत फुफ्फसदाह होतो.

**मुख्य दूषिततत्त्व— ग्रंथीयुक्त, प्लेगांत– पृथ्वी, जल व तेज. व न्यूमॉनिक प्लेगांत– पृथ्वी, जल व वायु.**

**लक्षणें—** ताप सडकून भरतो. वांति व डोकें दुखणें; डोळे लाल होणें, बलक्षय, ग्लानी, धडपड, बधिरता, वाताचा झटका, अतिसार किंवा मलावरोध वगैरे लक्षणें होतात. दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशीं मानेंत, काखेंत किंवा जांघेंत किंवा क्वचित् इतरत्रहि गांठ येऊन ती सुजते आणि त्यांत असह्य वेदना होतात. सहा ते दहा दिवसांत रोग हटूं लागतो. गांठ पिकून फुटते किंवा बसते. **न्युमॉनिक प्लेगांत** गांठीं येत नाहींत. ताप, बलक्षय व श्वास अतिशय असून खोकला येतो व बेडक्यांतून रक्त पडतें. फुफ्फुसदाहाचीं सर्व लक्षणें होतात. या प्रकारांत मृत्यूचें प्रमाण जास्त असतें.

**उपचार—** पोटांत नं० १।२।३ सुप्रभा यांचें प्रथम विलयन वरचेवर द्यावें. मधून मधून चपलेच्या गोळ्या दर वेळीं ४।४ प्रमाणें दिवसांतून १।२ वेळां द्याव्या. गांठीवर आणि यकृतप्लीहेवर योग० व तृतीय ब यांच्या घड्या वरचेवर लावाव्या. रक्ताशयावर सुप्रभा घड्या आणि मस्तकावर सौदा० घड्या आवश्यकतेप्रमाणें घालाव्या लागतात. न्यूमॉनिक प्लेगांत छातीवर व कपाळावर सौदा० घड्या वरचेवर घालव्या; पोटांत प्रथम विलयनाऐवजीं तारतम्यानें गोळ्या व त्याहि जास्त प्रमाणांत द्याव्या.

## २५८ ग्रंथिक ज्वर ( ग्लॅंडयूलर फिवर. )

[ विशेषतः सोळा वर्षांचे आंतील मुलांस हा रोग होतो. ]

**कारणें—** सांथ, वसा रस दूषित असणें वगैरे.

### मुख्य दूषिततत्त्व— पृथ्वी व तेज.

**लक्षणें**— गळ्यांतील गांठी सुजून गळा ताठल्यासारखा होतो. गिळणें कठीण होतें, ताप असतो, यकृत व प्लीहा वाढतात, ४।५ दिवसांत गांठी बऱ्या होऊं लागतात व ताप कमी होऊं लागतो.

**उपचार**— पोटांत नं० ११३ व सुप्रभा; गांठीवर सुप्रभा किंवा चपला.

## २५९ गरमी– फिरंगरोग– ( सिफिलिस्. )

**कारणें**— हा रोग सांसर्गिक आहे. गरमी झालेल्या माणसाचे संसर्गानें किंवा संयोगानें हा विकार जडतो. हा विकार झालेल्या माणसानें वापरलेल्या वस्तु, वस्त्रप्रावरण, भांडींकुंडीं यांच्या संसर्गानेंहि रोग जडतो. आनुवंशिकतेनें हा संततीला होतो.

### मुख्य दूषततत्त्व— जल व पृथ्वी.

**लक्षणें**— हा विकार झालेल्या स्त्रीपुरुषांचें संगानंतर थोडे दिवसांत शिस्नावरील मणी, त्यावरील त्वचा, शिवण यांपैकीं कोठें तरी व स्त्रियांत योनिमुखावरील स्थूलौष्ठ किंवा सूक्ष्मौष्ट यांवर फोड येतो व त्यांचीं विषबिजें सर्व शरीरांत पसरतात व सर्व शरीरभर पुळ्या येतात. तोंड, नाक, खांदा, गुदद्वार वगैरे भागांत श्लेश्मल व्रण पडतात. त्वचेवरील पुटकुळ्यांत वेदना व कंडू नसतो. शरीरांतील वसाग्रंथी दूषित होऊन वाढतात. या विकारामुळें रसक्रियेंत फारच बिघाड होतो. नेत्ररोग, सांधे दुखणें, सुजणें, मज्जातंतुविकार, अशा अनेक प्रकारचा त्रास होतो. लहान मुलांस आनुवंशिक विकार असल्यास त्यांचें मृत्यूसंख्येचें प्रमाण जास्त असतें व जीव जगतात त्यांस गर्मीचीं लक्षणें दिसूं लागतात. मूल निरक्त होऊन सुकत जातें, सर्वांगावर तांबूस चट्टे, त्वचेवर पुटकुळ्या, नेहमीं पडसें, नाकांत व्रण वगैरे,

**उपचार**— या विकारावर नं० ७ हें उत्तम औषध आहे. याशिवाय प्रकृतिनियामक औषधाबरोबर नं० २ चा उपयोग करावा. सुप्रभाहि मधून मधून द्यावी. प्रथम स्थूल प्रमाणांतच औषध द्यावें व हळूहळू सूक्ष्म विलयनें द्यावीं. म्हणजे शरीरांत भिनलेले सर्व दोष नाहींसे होतात. व्रणांना सुप्रभा विलयन अथवा तेल यांचा उपयोग करावा.

पथ्य—तेलकट, उष्ण व वातुळ पदार्थ खाऊं नयेत. आईला विकार असतां मुलाला आईचें दूध देऊं नये.

## २६० गालगुंड—पाषाणगर्दभिक गालफुगी ( मम्स् )

[ हा विकार विशेषतः लहान मुलांना होतो ]

**कारणें**—सांथ, वसादोष.

**मुख्य दूषिततत्त्व— पृथ्वी व जल.**

**लक्षणें**— कानाची खालची बाजू घसा, व मान दुखते. कर्णमूळ-ग्रंथींचा दाह होऊन सूज येते. गाल सुजतो, ताप येतो. गिळण्यास व चावण्यास त्रास पडतो. जिभेवर बुरशी असते. ३।४ दिवसांत ताप निघतो.

**उपचार**— पोटांत नं० १।२ व सुप्रभा० बाहेरून चपला ज्योति० घ्याव्या.

## २६१ गिर्यातिसार ( हिलडायेरिया. )

[ हा विकार उन्हाळ्यांत थंड हवेकरतां गिरिशिखरावर जाऊन राहाणाऱ्या लोकांना होतो. पहाटेपासून तों सकाळीं १०।११ वाजेपर्यंत ४।५ वेळां किंवा अधिक वेळांहि पुष्कळ व पातळ शौचाला होतें. ]

**कारणें**— हवेंतील फरकामुळें, यकृत, प्लीहा, आणि इतर स्रावक पिंड कार्यहीन होतात.

**मुख्य दूषिततत्त्व— पृथ्वी.**

**लक्षणें**— पोटांत वात धरणें, गुरगुरणें, अपचन, वारंवार शौचाला होणें. गिरिशिखरावरून खालीं आल्याबरोबर हा विकार थांबतो.

**उपचार**— नं० १ प्रथमविलयन किंवा २।२ गोळ्या दिवसांतून ३।४ वेळां द्याव्या.

## २६२ गुदभेद ( फिशर ऑफ दी एनस्. )

**कारणें**— बद्धकोष्ठ, मळाची खडी, आंतड्यांची दुर्बलता. वगैरे.

**मुख्य दूषिततत्त्व— पृथ्वी.**

**लक्षणें**— मळाच्या घट्टपणामुळें शौचाचे वेळीं गुदाचे मागील बाजूची श्लेष्मलत्वचा खरचटते व तिला भेगा पडतात. असें वारंवार होत

गेल्यानें ती भेग मोठी होत जाऊन त्वचा फाटते. शौचाचे वेळीं तीव्र वेदना व नंतर बराच वेळ ठणका राहणें, रक्तस्राव होणें वगैरे.

उपचार— पोटांत नं० १ व सुप्रभा देणें; सुप्रभा घड्या किंवा तेल विकृत भागीं लावावें. मधून मधून ज्योति० गोळ्या पोटांत देणें.

## २६३ गुल्म ( ॲब्डॉमिनल-मिडिया स्टायनल-ट्यूमर्स )

( पोटांतील भागांत अनेक प्रकारच्या ज्या गांठी होतात त्या सर्वांचा समावेश गुल्म या नांवानें केला जातो. आमाशय, यकृत, पित्ताशय, प्लीहा, वृक्क, लहान आंतडीं, मोठीं आंतडी स्त्रियांच्या गर्भाशय वगैरे भागांत निरनिराळ्या कारणांनीं उत्पन्न होणाऱ्या ग्रंथींना गुल्म म्हणतात. )

**कारणें**—विजातीय द्रव्यांचा संग्रह होऊन गांठ वाढणें.

### मुख्य दूषिततत्त्व— पृथ्वी

**लक्षणें**:—वात धरणें, टोंचल्यासारखें होणें, बेचैनपणा, धांव लागणें, अग्निमांद्य; नुसता वात वाढून **वातगुल्म** होतो. हा विशेषतः प्लीहेचे भागीं डाव्या बाजूला आढळतो. ही गांठ सतत लागत नाहीं व आजूबाजूला फिरत असते.

**उपचार**—मुख्य दूषिततत्त्व व गुल्माचें स्थान यांचे अनुरोधानें उपचार करावे. उदा० यकृत गुल्मावर नं. १।३। योग.; प्लीहागुल्मावर नं. १।४ सौदा०; आंतड्यांतील गुल्मावर नं. १ याप्रमाणें तारतम्यानें पोटांत व बाहेरून योग्य तें औषध द्यावें.

## २६४ गोंवर ( मीझल्स )

**कारणें**—विशेषतः लहान मुलांना होणारा हा सांथीचा विकार आहे.

### मुख्य दूषिततत्त्व—वायु

**लक्षणें**—घसा दुखणें, खोकला, नाकांतून पाणी, शिंका, डोळे लाल होणें, कपाळ दुखणें, हातपाय मोडल्यासारखें होणें, प्रथम ताप येऊन चवथे दिवशीं तोंडावर व मानेवर पुरळ येऊन सर्वांगावर पसरतो. तोंड खुजमट दिसतें, तीन दिवस उभारण होऊन नंतर तें मावळूं लागते. कफ व फफ्फुसदाह ( न्यूमोनिया ) होण्याचा संभव असतो. कांहींना मलावष्टंभ असतो.

**उपचार**—पोटांत नं. २।३ योग० न्यूमोनिया अगर कफ असेल तर नं. ६ व केव्हां तरी सौदा० द्यावी. घड्या कपाळ व छाती यांवर घालाव्या.

## २६५ घटसर्प ( डिफ्थेरिया )

[ हा सांथीचा तीव्र विकार असून याचा प्रसार युरोपांत विशेष आढळतो. या देशांत हा विकार क्वचितच होतो. ]

**कारणें**—हा सांसर्गिक कृमिरोग असून याच्या सांथी येतात.

### मुख्य दूषिततत्त्व—पृथ्वी व तेज.

**लक्षणें**—जोराचा ताप येऊन घसा धरतो. गळ्याचे आंतील भागांत चिकट पापुद्रा धरत जाऊन तो सबंध घसा व श्वासनलिका व्यापतो व त्या ठिकाणीं दाह होतो. वसाग्रंथी दूषित होतात. कफहि होतो.

**उपचार**–पोटांत नं. १।३ व बाहेरून दूषित भागीं चपला ज्योति० घड्या घालाव्या.

## २६६ घसा येणें ( फॅरिंजायटिस् )

**कारणें**—अशुद्ध हवा, हवेंत एकदम फेरफार होणें, गारठा, मद्यपान, धूम्रपान, बोलणें यांचा अतिरेक इत्यादि.

### मुख्य दूषिततत्त्व—पृथ्वी व जल

**लक्षणें**—पडजीभ व घसा आरक्त असून त्यांचा दाह होतो. थोडा ताप, जिभेवर बुरशी, लाळ सुटणें किंवा तोंड कोरडें होणें, आवाज बसणें, गिळतांना त्रास होणें, वगैरे.

**उपचार**–पोटांत नं. १।२ सुप्रभा; सुप्रभेच्या गुळण्या व मानेची पोंढी आणि घसा यांवर सुप्रभा घडी.

## २६७ जंघापृष्ठशूल ( सायटिका )

( हा मज्जातंतूंचा विकार आहे. कमरेपासून पावलापर्यंत मागील बाजूला मज्जातंतूंची सरणी जाते तिचा हा शूल असतो. एका किंवा दोन्ही पायांनाहि होतो. )

**कारणें**—हवामानांतील आकस्मिक फरक, लचक भरणें, अति चालण्यामुळें ज्ञानतंतूंचा दाह वगैरे.

### मुख्य दूषिततत्त्व—जल व वायु

**लक्षणें**—कमर, कुला व पाय यांत चमकल्याप्रमाणें, भाजल्याप्रमाणें किंवा टोंचल्याप्रमाणें वेदना होऊन त्या आजूबाजूला पसरतात. चालणें व उभें राहणेंहि अशक्य होतें.

**उपचार**—पोटांत नं. २।४ व सौदा०, सुप्रभा सौदा० घड्या (२०।२१) व वेदना असलेला पावलापर्यंतचा भाग यांवर घालाव्या अथवा सुप्रभा-सौदा० तेलाचा उपयोग करावा.

## २६८ जंत–कृमि ( वर्म्स् )

**कारणें**–अपचन हें मुख्य कारण असतें. तसेंच दूषित पाण्यांतून जंतांची बीजें शरिरांत प्रवेश करतात.

### मुख्य दूषिततत्त्व— पृथ्वी.

**लक्षणें**—नाकाला थोडी कंड, गुदद्वाराजवळ शिवाशिवणें, पोटांत दुखणें अतिसार, अग्निमांद्य, शौचाला भसरट पांढरें होणें, मळमळ, वांती, बेंबी-पासून वरपर्यंत दिसणारा पन्हळ नाहींसा होणें व तो भाग सपाट होणें वगैरे लक्षणें असतात. गोल, चपटे, तंतूसारखे अशा अनेक प्रकारच्या जातींचे जंत असतात.

**उपचार**—सर्व प्रकारच्या जंतांवर नं. १ आणि ज्योति० हीं दोन उत्तम औषधें आहेत. सकाळ-संध्याकाळ प्रत्येकीं १०।१० गोळ्या ३।४ दिवस द्याव्या लागतात. यांनीं जंत मरून पडलेले आढळणार नाहींत. परंतु ते मळांतून सावकाश कुजून पडून जातात व जंतांचीं लक्षणें कमी होऊं लागतात.

## २६९ डबा–ससर्णी–उडतें ( ब्रॉंको न्यूमोनिया )

( हा विकार ४।५ वर्षांच्या आंतील मुलांस होतो. )

**कारणें**—आंतड्यांत आम वाढणें, यकृताचा दाह, सूज, श्वासनलिका-दाह व शुष्कपणा वगैरे.

### मुख्य दूषिततत्त्व–तेज व जल.

**लक्षणें**— श्वासोच्छ्वासाला अडचण, पोट हाबकणें, ताप, खोकला, श्वास जोरानें घ्यावा लागणें; दाह व उष्णता वाढत जाऊन श्वासनलिकेंतील कफ

शुष्क होत जाऊन श्वसनमार्ग बंद पडत जाणें वगैरे. हा विकार पुष्कळ वेळां एकाएकीं होऊन झपाट्यानें वाढतो, खोकेची उबळ येते व त्याबरोबर वांतीनें थोडासा कफ पडतो. कफाबरोबर कधीं रक्तहि पडतें, मुलाला ग्लानी किंवा झोंप आली असतां श्वासोच्छ्वास वाढून कफाचा शुष्कपणा झपाट्यानें वाढून मूल दगावण्याचा संभव असतो; म्हणून झोंप येऊं देऊं नये. ताप व पोट हाबकणें हीं लक्षणें दिसतांच पुढील उपचार करावे.

**उपचार**— नं. २।३ व योग० यांचें विलयन ४।४ गोळ्या प्रत्येकीं घालून करावें आणि १०।१० मिनिटांनीं चमचाचमचा देत राहावें. याचे जोडीस मधून मधून नं. १ व ६ द्यावें. ३ ब व योग० घडया अर्धा ते एक तासपर्यंत सतत घालाव्या. आराम पडला म्हणजे बंद ठेवून २।३ तासांचे अंतरानें पुन्हां घालाव्या. **डोक्यावर, कपाळावर** व **छातीवर** सौदामिनी घडया घालाव्या. घड्यांचा उपयोग फार चांगला होतो. यासाठीं घड्या भरपूर घालाव्या. पाणी वरचेवर पाजीत राहावें. शौचास साफ होण्यासाठीं पिचकारी द्यावी.

## २७० डांग्या खोकला ( हूपिंग कफ्. )

[ लहान मुलांना होणारा हा सांसर्गिक विकार आहे. )

**कारणें**— हवामानांतील एकदम फरक, सांथ; गोंवर, देवी वगैरे येऊन गेल्यानंतर याचा संभव असतो.

### मुख्य दूषिततत्त्व— जल व तेज.

**लक्षणें**— सुरुवातीला १०० ते १०२ ताप येतो. पडसें व खोकला येतो, खोकल्याचे एकामागून एक असे १०।१५ वेळां ठसके येतात. खोकतांना चेहेरा लाल होतो, शिरा फुगतात, नंतर मूल खूप जोरानें श्वास घेतें व हूप असा आवाज होतो. थोडासा बेडका पडतो किंवा वांति होऊन जरा बरें वाटतें. हा रोग बरा होण्यास सुमारें १॥–२ महिने लागतात असें समजतात. परंतु खालील उपचारांनीं ५।६ दिवसांत गुण वाटतो.

**उपचार**—पोटांत नं. २।३।६ योग० गोळ्या अगर प्रथम विलयन ३।३ तासांचें अंतरानें द्यावें. मधून मधून नं. १ द्यावा. बाहेरून सुप्रभा सौदा० घडया-मानेची पोंढी, काळीज व छाती यांवर घालाव्या. थंड पाणी भरपूर पिण्यास द्यावें.

## २७१ डोकें दुकणें,–शिरःशूल ( हेडएक् )

**कारणें**–पडसें, दृष्टिदोष, आम्लपित्त, ताप, पित्ताचें आधिक्य, जागरणें, अजीर्ण, फार श्रम, बध्दकोष्ठ इत्यादि.

**मुख्य दूषिततत्त्व-पृथ्वी, जल अथवा तेज, परिस्थित्यनुरूप असतें**

**उपचार**–दृष्टिदोष हें कारण असल्यास नेत्रविकाराचे उपचार, आम्लपित्ताच्या विकारामुळें दुखत असल्यास आम्लपित्तावरील उपचार, तापादिक कारणें असतां त्या त्या विकारांप्रमाणें योग्य उपचार करावे. कोणत्याहि कारणानें डोकें दुखत असलें तरी पोटांत नं. १।२ व बाहेरून सौदा० किंवा ३ व यांच्या घडया कपाळावर घातल्यास आराम वाटतो. ज्योति० तेल डोकीवर व कानांत घालावें. त्यानें डोक्याला थंडावा येऊन झोंपही उत्तम लागतें.

## २७२ डोळ्यांचे विकार ( आयजिडिसीज )

( १ ) **डोळे येणें—कारणें**–गार वारा लागणें, उन्हांत हिंडणें, धूर लागणें, धुरळा जाणें, जागरणें, सांथ वगैरे.

**मुख्य दूषिततत्त्व– जल.**

**लक्षणें**—डोळयांचा दाह होऊन ते सुजतात व लाल होतात. डोळ्यांत वाळू किंवा रेति भरल्याप्रमाणें खूप लागतें, उजेडाकडे पहावत नाहीं, डोळ्यांतून चिकट स्राव होतो. पू येऊन त्यानें डोळे चिकटतात. नाकांतून पाणी वाहूं लागतें. एकादे वेळीं डोळयांतून तांबडें पाणी येतें. विकार तीव्र असल्यास किंवा वेळीं योग्य उपचार न झाल्यास डोळयांत फुलें व व्रण पडतात. डोळे जाण्याचाहि संभव असतो. ( विशेषतः लहान मुलांत डोळे जाण्याचें प्रमाण जास्त आढळतें. )

**उपचार**–पोटांत नं. २ व सुप्रभा; बाहेरून डोळयांवर सुप्रभेच्या घड्या वरचेवर घालीत असावें. भुंवया, आंख, मानेची पोंढी या जागीं सुप्रभा विलयन लावावें व डोळयांतील बुबळावर सोडावें. नं. २ चे विलयनानें डोळे धुवावे. सुप्रभेचा समाधानकारक उपयोग होत नाहींसें आढळून आल्यास चपला ज्योति० बाह्योपचारासाठीं वापरणें.

( २ ) **खुपऱ्या–कारणें**—जागरणें, मस्तकांत उष्णता, रक्तभिसरणांतील दोष.

### मुख्य दूषिततत्त्व—पृथ्वी व जल

**लक्षणें**—पापण्या सुजणें, आंतील बाजू जाड होणें, आंतील बाजूचा दाह.

**उपचार**—पोटांत नं. १।२ सुप्रभा; डोळ्यांवर चपला घड्या घालाव्या. थोड्या वेळानें एकादी ज्योति० घडी घालावी. चपलाविलयनाचें पाणी डोळ्यांतहि घालावें. सुप्रभेचाहि उपयोग मधून मधून करावा. जुनाट विकार असतां उपचार ३।४ महिने चालू ठेवावे लागतात.

( ३ ) **सारा येणें–कारणें**–रक्तांतील दोष व खुपऱ्या हेंच पुष्कळ वेळां कारण असतें.

### मुख्य दूषिततत्त्व—जल

**लक्षणें**–दृष्टिमांद्य येतें, बुबुळाचे भागावर पांढरट भुरकट असा थर जमतो.

**उपचार**— खुपऱ्यांप्रमाणेंच करावे.

( ४ ) **फूल पडणें–कारणें** खुपऱ्या, डोळयाला मार वगैरेमुळें इजा होणें, डोळे येणें इत्यादि.

### मुख्य दुषिततत्त्व–जल

**लक्षणें**—बुबुळाचे काळया भागावर लहान लहान अगर मोठे पांढऱ्या रंगाचे एक अगर अनेक डाग दिसतात.

**उपचार**—पोटांत नं. २ द्यावें. सुप्रभा किंवा चपला यांच्या घडया घालाव्या.

( ५ ) **डोळ्यांत व्रण पडणें–कारणें**–डोळे येणें, खुपऱ्या, आघात वगैरे.

### मुख्य दूषिततत्त्व–जल

**लक्षणें**—कांहीं व्रण सुईनें टोंचल्याप्रमाणें अगदीं लहान असून मोठ्यांत मोठा व्रण उडदाच्या डाळीएवढा असतो. जास्त उजेडापासून त्रास होणें. व्रण मोठा असला तर दिव्याच्या ज्योतीकडे पहाणें शक्य होत नाहीं.

**उपचार**— पोटांत नं०२ व बाहेरून सुप्रभा घड्या घालणें.

( ६ )**मोतिबिंदु–बुबुळ वाढणें, किंवा आवळलें जाणें, बाहुली सुजणें, शिरा वाढणें, वडस,** वगैरे सर्व नेत्ररोगांवर पोटांत नं०१।२ सुप्रभा देणें आणि डोळयावर चपला ज्योति० किंवा सुप्रभा घड्या; थोड्या

कोमट पाण्यांत नं० २ च्या १।२ गोळ्या घालून त्या पाण्यानें डोळे धुवावे. डोळा बुडवून धुण्याजोगा काचेचा पेला किंवा तशाच बेताची चांदीची वाटी घ्यावी.

## २७३ ताप– ज्वर– ( फीवर. )

खाण्यापिण्यांत अतिरेक, पचनाला जड व निःसत्त्व पदार्थ खाणें, दूषित हवा अथवा पाणी वगैरे कारणांनीं शरीरांत विजातीय द्रव्यांची वाढ होते, व श्वासोच्छ्वास, मल मूत्र, घाम वगैरे रूपांनीं त्यांचा निचरा होणें कठीण झालें म्हणजे जीवनशक्ति या विजातीय द्रव्यांची एक प्रकारची ज्वलनक्रिया सुरू करते व शरीरांत उष्णतेची वाढ होते आणि ९८।। चे वर उष्णतामान चढतें. वस्तुतः अशा प्रकारचा ताप येणें हा जीवनशक्तीचा शरीर-संरक्षणाचाच एक मार्ग आहे. ताप आला म्हणजे अरुचि उत्पन्न होते. याचें कारण त्या वेळीं न खाण्याबद्दल अथवा खाणेंच झाल्यास अगदीं थोडें व हलकें खाण्याबद्दल जीवनशक्ति इषारा देत असते. तहान लागते याचें कारण शरीराला पाण्याची फार जरूरी आहे व तें पीत जा असा इशारा असतो.

विजातीय द्रव्यांची वाढ ही शरीराचे निरनिराळे भागांत होत असून त्या ठिकाणच्या कार्यशक्तींवर विशेष भार पडत असतो. उदा० अग्निमांद्य, अजीर्ण, बद्धकोष्ठ वगैरेमुळें आंतड्यांवर व पचनशक्तीवर फाजील ताण पडत असतो व हीं तापाचीं कारणें असलीं म्हणजे तीं कार्येंद्रियें म्हणजे पृथ्वी-तत्त्व दूषित झालेलें असतें. रक्तांत विजातीय द्रव्यांची वाढ होऊन ताप आला असतां रक्ताशयावर फाजील ताण पडत असतो व मुख्यतः जल-तत्त्व दूषित झालेलें असतें. यकृतांत दोष उत्पन्न होऊन अथवा पित्ताधिक्य होऊन ताप आला असतां, मुख्यतः तेजतत्त्व दूषित झालेलें असतें. श्वासो-च्छ्वासाबरोबर विजातीय द्रव्यें जाऊन अथवा प्लीहा दूषित होऊन ताप येतो, तेव्हां मुख्यतः वायुतत्त्व दूषित झालेलें असतें. याप्रमाणें एकाद्या तत्त्वां-तील मूळ बिघाड हें कारण असलें तरी सबंध शरीरावर परिणाम घड-तोच व ताप येणें हें जीवनशक्ति संरक्षणकार्य तीव्रपणानें करीत आहे याचें निदर्शक असतें.

दोषांचें अथवा विजातीय द्रव्यें सांठण्याचें स्थानभिन्नत्वानें निरनिराळीं

तत्त्वें दूषित होतात. तसेंच विजातीय द्रव्यांचें प्रमाण, सांठा, स्वरूप, जीवनशक्तीचा जोर वगैरे कारणांनीं तापाचे निरनिराळे प्रकार व स्वरूप आढळतें. तथापि सबंध शरीरभर ताप येतो व दोषांचे कमजास्त प्रमाणानुसार लगतचीं तत्त्वेंहि दूषित होत असतातच. यामुळें एकाच मुख्य तत्त्वानुसार औषधयोजना न करतां नजीकच्या तत्त्वानुसारहि करणें हितकर असतें. यामुळें सर्व दूषिततत्त्वें औषधाची मदत मिळाल्यानें आपापलीं कामें चांगलीं करूं लागतात व लवकर गुण येतो.

जीवनशक्ति जें संरक्षणकार्य करीत असते, तें प्रामुख्यानें तेजतत्त्वाच्या शुद्ध रक्त या रसाच्या द्वारा करीत असते. त्यामुळें त्या रसाच्या कार्यशक्तीवर विशेष ताण पडलेला असतो. यामुळें कोणत्याहि तापामध्यें यकृत व प्लीहा यांचे आकार व व्यापार यांवर विशेष परिणाम झालेला आढळतो. म्हणून तृतीय निष्पत्ति हें तापावरील मुख्य औषध असतें.

तापाचीं कारणें, सुरवातीचीं व नंतरचीं लक्षणें, व तीं टिकण्याचा काळ यावरून तापाला निरनिराळीं नांवें दिलीं जातात. निरनिराळ्या जातीच्या तापासंबंधींची माहिती वर्णानुक्रमानें दिली आहे.

## २७४ तुंगाक्ष गलगंड ( एक्स ऑप्थालमिक गॉयटर )

**कारणें**—आकस्मिक मानसिक क्षोभ, दुःख, आघात वगैरे कारणांनीं कंठस्थ ग्रंथी वाढून त्यातून फाजील स्राव होणें.

### मुख्य दूषिततत्त्व—वायु व जल

**लक्षणें—गलगंड**—गळा मोठा होणें, गिळतांना गलगंड उचलला जाणें, आवाजांत बदल होणें वगैरे. **तुंगाक्ष गलगंड** याचें मुख्य लक्षण म्हणजे डोळे वटारल्याप्रमाणें दिसतात, रक्ताभिसरणाची गती फार वाढते. डोळे भिटतां न येणें, कंप, फिकटपणा, घाम जास्त येणें वगैरे.

**उपचार**— पोटांत नं. २१४ व सौदा० सुप्रभा घड्या गळा व पाठीचा कणा यांवर घालणें.

## २७५ तोतरेपणा.

**कारणें**— जिभेचा जडपणा.

### मुख्य दूषिततत्त्व—आकाश व जल.

**उपचार**— पोटांत नं. २ व चपला यांच्या गोळया आळीपाळीनें द्याव्या. लहान मुलांना उत्तम गुण वाटतो. चपलेच्या गुळण्या कराव्या, मानेची पोंढी व शंख यांना चपलाविलयन लावावें.

## २७६ दमा—तमकश्वास ( अस्थमा )

**कारणें**— लहान मुलांत— डांग्या खोकला, गोंवर ब्रांकोन्यूमोनिया वगैरे विकार होऊन त्यांचें पर्यवसान दम्यांत होतें. पडसें, यकृत व प्लीहा, यांचे विकार, फुप्फसांचा कमकुवतपणा, तेलकट पदार्थ व इतर विषमान्न वारंवार खाणें वगैरे दम्याला कारण होतात. हा विकार पुष्कळ वेळेला आनुवंशिकहि असतो.

### मुख्य दूषिततत्त्व—पृथ्वी व वायु.

**लक्षणें**—बहुतकरून रात्रीं सुरवात होते. दम कोंडल्याप्रमाणें होतो. उच्छ्वसन अधिक कालपर्यंत लांबतें. तारा वाजल्याप्रमाणें आवाज येतो, श्वसनाला अडचण पडते, थोडा खोकला व चिकट कफ असतो. विकार फार तीव्र असला म्हणजे रोगी गुदमरल्यासारखा होऊन अगदीं कासावीस होतो. सर्वांगाला घाम येतो व आंगाची आग होते. कांहीं रोग्यांना दमा लागल्यापासून कांहीं तासांनीं घाम येतो. प्रकृतिभिन्नत्वाप्रमाणें निरनिराळ्या ऋतूंत रोगाचें प्रमाण कमजास्त आढळतें.

**उपचार**—पोटांत नं. १।४।६ योग० द्यावें. यकृतबिघाड आढळल्यास ३ ब घडया यकृतप्लीहेवर घालाव्या. दम्याचा जोर असेल त्या वेळीं छातीवर चपलाघडया तास अर्धा तास घातल्यानें पुष्कळच आराम वाटतो. लहान मुलांना तर तात्काळ गुण वाटून स्वस्थ झोंप लागते. एकाद्याला यानें गुण वाटत नसेल तर सुप्रभा सौदा० चा उपयोग होतो. कफ सुटत नसेल तर सौदा० ४ गोळया पोटांत द्याव्या.

**पथ्य**—अगदीं लहान आहार ठेवावा पाणी भरपूर द्यावें.

## २७७ दंतरोग—पू येणें, रक्त येणें. दाढदुखी, दांत येणें

**पू व रक्त येणें—कारणें**—वारंवार अजीर्ण होणें, ताप येऊन त्यानंतर

हिरड्या सुजणें, अति थंड किंवा अति उष्ण पदार्थ वारंवार खाणें. उदा० बर्फ किंवा त्याचे पदार्थ, फार गरम चहा वगैरे.

### मुख्य दूषिततत्त्व–पृथ्वी व जल

**उपचार**—पोटांत नं. १।२ द्यावें. सकाळीं व रात्रीं निजण्यापूर्वी तोंड स्वच्छ धुवून सुप्रभा तेल हिरड्यांना चोळून लावावें व चुळा भरून तोंड स्वच्छ धुवावें अथवा सुप्रभाविलयनाच्या गुळण्या कराव्या. ज्योति० तेल डोकीला जिरवावें.

( २ ) **दाढ दुखी–कारणें**—दांत, दाढा किडणें, हवामानांतील अति उष्णता किंवा थंडी, तसेंच शरीरांतील उष्णता किंवा थंडी अति वाढणें.

### मुख्य दूषिततत्त्व–पृथ्वी व जल

**उपचार**—पोटांत नं. १।२ देणें, उष्णतेनें दाढ दुखत असेल तर ज्योति० घड्या बाहेरून घालाव्या, थंडीमुळें दुखत असतां चपलाघड्या व गुळण्या कराव्या.

( ३ ) **दांत येणें**—लहान मुलांना प्रथम दांत येतांना उलट्या व जुलाब होऊं लागतात. अशा वेळीं नं. १ च्या २।२ गोळ्या दिवसांतून ५।६ वेळां द्याव्या.

## २७८ देवी-मसूरिका ( स्मॉल पॉक्स )

[ विशेषतः लहान मुलांना होणारा हा तीव्र सांसर्गिक विकार आहे. ]

**कारणें**—संसर्ग, सांथ, वसा रसांतील बिघाड, सांथीचे दिवसांत दूषित हवापाणी वगैरेमुळें हा विकार जास्त फैलावतो.

### मुख्य दूषिततत्त्व–पृथ्वी

**लक्षणें**—थंडी वाजून ज्वर येतो, मस्तक दुखतें, जिभेवर बुरशी येते, तोंड उभारल्यासारखें दिसतें, सर्वांग विशेषतः पाठ व कमर चेंचल्याप्रमाणें दुखते, पोटावर दाबलें असतां तें दुखतें, कित्येकदां वांतीहि होते, ताप निघत नाहीं. तिसऱ्या दिवशीं कपाळ व मनगट यांवर लाल पुरूळ दिसूं लागतो व सर्वांगावर उभरण होऊं लागते. नंतर तीन दिवसांनीं त्यांत पाणी भरून, टपोर मोत्याप्रमाणें फोड दिसूं लागतात. पुढें दोन दिवसांनीं पाणीदार होऊन पू होतोपुढें २।३ दिवसांनीं काळसर रंग येऊन देवी मावळूं लागतात व नंतर

२।३ दिवसांनीं खपल्या पडूं लागतात. ५।६ दिवसानंतर ताप कमी होऊं लागतो. खपल्या पडल्यानंतरहि देवींचे वण शिल्लक राहतात. देवींना खाज भयंकर असते; डोळ्यांत देवी आल्या म्हणजे मुलें डोळे मिटून ठेवतात व त्यामुळें डोळे जाण्याचा संभव असतो. घशांत देवी आल्या म्हणजे घसा सुजतो.

**उपचार**— पोटांत नं० १।२।३ व सुप्रभा. या विकारांत मुख्य दूषित-तत्त्व पृथ्वी हें असलें तरी विकार तीव्र असल्यामुळें नाडी जलद चालते. ताप जोराचा असतो म्हणून नं० १ बरोबर नं० २ व ३ द्यावें लागतें. डोळ्यांत देवी आल्यास डोळे उघडून नं० २ अथवा सुप्रभाविलयन दिवसांतून १।२ वेळां घालावें. घशांत, लघ्वीचे अथवा शौचाचे मार्गांत देवी असल्यास दाह फार होतो. अशा वेळीं सुप्रभाविलयन लावावें अथवा घडी ठेवावी देवींचें उभरण होऊं लागलें म्हणजे देवीवर दूध लावावें म्हणजे पाणी चांगलें भरतें व देवींचा उठाव पूर्ण होतो. दुधांत सुप्रभाविलयन घातल्यास जास्त चांगलें. देवी न भरल्यास शरीरांत अंतर्गत भागांत फार त्रास होतो, व भयंकर दाह होऊन रोगी दगावण्याचा संभव असतो.

## २७९ धावरें– तांबडा– विसर्प ( एरिसिपेलस्. )

**कारणें**— धावऱ्याच्या विशिष्ट जंतूंचा उपसर्ग. एकाद्या जखमेंतून या जंतूंचा बरेच वेळां प्रवेश होतो. संसर्ग, उष्ण, खारट, अथवा आंबट पदार्थ वारंवार जास्त खाण्यांत आल्यानें रसक्रिया बिघडणें आघात वगैरे-मुळें रक्ताभिसरण बिघडणें वगैरे.

**मुख्य दूषिततत्त्व-- जल.**

**लक्षणें**-- थोड्याफार फरकानें या विकाराचे पुष्कळ प्रकार दिसून येतात. शरिराच्या बाह्य भागांत अगर आंतल्या भागांतहि हा विकार होतो व जलद पसरत जातो. एकदम थंडी भरून ताप येणें, वांति, तांबूस रंगाची सूज व दाह होऊन त्वरेनें अन्य भागीं पसरत जाणें, सुजेच्या कडेवर कांहीं पुटकुळ्या येतात व कांहीं वेळां गांठ उत्पन्न होते. धावरें डोळ्याच्या पाप-ण्यांना असल्यास फार सूज येऊन डोळे उघडत नाहींत. लघ्वी लाल होते व नाडी जलद चालते. अपचन, बद्धकोष्ठ किंवा जुलाब होतात. या विकाराच्या

दुसऱ्या प्रकारांत शरीरांत लांबट अशी गांठ निर्माण होते. त्यावर उपचार केले म्हणजे ती तेथून नाहींशी होते व दुसरीकडे लागूं लागते. ह्यांत इतर ज्वरादिक लक्षणें कमी असतात. परंतु जर त्यांत पू होऊं लागला तर ताप व वेदना सुरू होतात.

**उपचार**— पोटांत नं० २ व सुप्रभा; बाहेरून सुप्रभाघड्या. ह्या विकारांत तेलाचा स्पर्श झाला तर विकार वाढतो.

ताप असेल तर नं० ३. व वांति, जुलाब वगैरे होत असतील तर नं० १ हीं औषधें द्यावीं.

## २८० नपुंसकत्व.

**कारणें**-- अतिस्त्रीसंग, मुष्टिमैथुन, अतिमद्यपान, मेदोवृद्धि वगैरे.

**मुख्य दूषिततत्त्व-- पृथ्वी व वायु.**

**लक्षणें**— शिस्नाचे उत्थान न होणें, त्याला शैथिल्य येणें, विषयवासना कमी होणें.

**उपचार**— पोटांत नं० १।४ सौदा० काळीज शिंपीपोट ( १४ ) नाभिप्रदेश ( १६ ), शतदल व मानेचा पहिला मणका ( ९-१० ), यांवर प्रकृतिधर्माप्रमाणें निरानिराळ्या विद्युत्‌चा उपयोग करावा लागतो. शीतप्रकृतीच्या मनुष्याला सुप्रभा- सौदा० आणि पित्तप्रकृतीच्या मनुष्याला योग० लावावी.

## २८१ नवज्वर— तंद्रिक सन्निपातज्वर ( टायफस्. )

**कारणें**— हा तीव्र सांसर्गिक ताप आहे.

**मुख्य दूषिततत्त्व-- पृथ्वी, जल व तेज.**

**लक्षणें**— मळमळ, वांति, मस्तकशूल वगैरे लक्षणें होऊन फार जोराचा ताप एकदम भरतो. सर्वांग ठेचल्याप्रमाणें दुखते. बद्धकोष्ठ, जिभेवर पांढरी बुरशी, जिभेचें टोंक व कडा लाल होतात. मध्यभागीं बुरशी असते. अशक्तपणा येतो, मेंदूवर जास्त परिणाम घडतो व रोगी बडबडतो, डोळ्यांवर सारखी झांपड असते, चेहेरा काळवंडलेला असून मान, खांदे, डोळे ओढलेले असतात, लघ्वी लाल व अगदीं थोडी होते. हा ताप ११ पासून १४ व्या दिवशीं उतरतो. यांत कांहीं रोग्यांना अतिसार होतो. ताप निघतांना बराच घाम येतो.

**उपचार**— पोटांत नं० १।२।३ सुप्रभा द्यावें. विलयनाऐवजीं नं० २ च्या गोळ्याच ४।४ प्रमाणें दिवसांतून ३।४ वेळां द्याव्या. कपाळ व मस्तक यांवर सौदा० घड्या भरपूर घालाव्या.

## २८२ नाकाचे विकार— ( घोळणा फुटणें, पनिस )

( १ ) **नाकाचा घोळणा फुटणें**— नाकांतून रक्तजाणें– **कारणें.**– जोरानें नाक शिंकरणें, खोकेची उबळ फार वेळ टिकणें, आघात, मस्तकाकडे रक्तप्रवाह जास्त जाणें वगैरे कारणांनीं हा विकार होतो. कित्येकदां तापासारख्या आजारांतून बरेपणा वाटण्याचे वेळीं मस्तकाकडील फाजील रक्तसंचयामुळेंहि, घोळणा फुटतो. तसेंच मूळव्याधींतील रक्तस्राव किंवा विटाळ बंद होणें आणि उष्ण किंवा मादक पदार्थांचें सेवन रक्तपित्तविकार वगैरेदि कारणें असतात.

### मुख्य दूषिततत्त्व--तेज.

**उपचार**— पोटांत नं० २।३ व सुप्रभा देणें; बाहेरून नाकाचा भाग व रक्ताशय ( हार्ट ) यांवर सुप्रभा लावणें, नाकातहि विलयन घालावें. मस्तकावर सुप्रभाविलयन वारंवार लावून डोकें थंड राखावें. रक्तस्राव फार होत असेल तर रोग्याला उताणें निजवून मानेखालीं उशी देऊन डोकें मागें तिर्कस राहील असें करावें व घड्या भरपूर घालाव्या.

( २ ) **पीनस**— कारणें– विलंबी पडसें, ज्वर; आघात, उपदंश, किंवा नाकांत एकादा कठीण पदार्थ भरून राहिल्यानें आंत व्रण होणें, नाकांतील वसाग्रंथींचा व त्वचेचा दाह वगैरे.

### मुख्य दूषिततत्त्व— पृथ्वी व जल.

**लक्षणें**— पू येणें, पुवाच्या खपल्या धरणें, कपाळ व कानाचा भाग यांत ठणका, रक्तमिश्रित पू व त्याला फार दुर्गंधी येणें, श्वसनाला अडथळा झाल्यामुळें तोंड उघडें राहणें वगैरे.

**उपचार**-- पोटांत नं० १।२ सुप्रभा; बाहेरून सुप्रभा घड्या, नाकांत सुप्रभा व मधून मधून चपला विलयनाचे थेंब सोडणें.

## २८३ नारू ( गिनिवर्म. )

**कारणें**:— हा एक तंतूप्रमाणें दिसणारा २।३ फूट लांबीचा जंतू असून

त्याचीं अंडीं पाण्याबरोबर पोटांत जातात व वाढ होऊन उपत्वचेंत प्रवेश करतात व कांहीं दिवसांनीं तेथून त्वचा फोडून बाहेर पडूं लागतात.

### मुख्य दूषिततत्त्व— पृथ्वी.

**लक्षणें**—नारू त्वचेंतून बाहेर पडूं लागला म्हणजे ती जागा फणफणते. त्वचेंत बारीक दोऱ्यासारखें नारूचें गुंडाळें दिसूं लागतें. चांचपून पाहिलें असतां हाताला लागतें. जागा सुजते, ताप येतो, नारू बाहेर पडतांना वेदना होऊं लागतात. कांहीं लोकांना वांति जुलाब वगैरेहि होतात.

**उपचार**— पोटांत नं० १ व बाहेरून नं० १च्या १५।२० गोळयांच्या विलयनाच्या घडया. याप्रमाणें पोटांत व बाहेरून औषध दिलें म्हणजे नारू आखडतो व कुजून बाहेर पडतो.

## २८४ नाळगूद.

**कारणें**—पचनक्रियेचा बिघाड, यकृत, प्लीहा दोष, वृक्कदाह वगैरे.

### मुख्य दूषिततत्त्व— पृथ्वी व जल.

**लक्षणें**— या विकारांत लघ्वी कमी होते व तिचें घनत्व वाढतें, लघ्वीं-तून अल्ब्युमिन जातें, सर्वांगाला सूज येते, मात्र डोळयांच्या पापण्यांना सूज येत नाहीं. कातडीखालीं पाणी न होतां ही सूज असते. थोडा ताप असतो, सूज असून रोगी हिंडूं फिरूं शकतो. मात्र अशक्तपणा वाढत जातो.

**उपचार**—पोटांत नं. १।२ सुप्रभा द्यावें.

**पथ्य**—दूध भरपूर पिणें उत्तम; इतर हलका आहार असावा. गव्हाच्य कोंड्याची भाकरी खावी.

## २८५. पडसें-सर्दी.

**कारणें**—हवेंतील फरक, अजीर्ण, आंवळे, चिंचा वगैरे आंबट पदार्थ खाऊन वर पाणी पिणें, अति पोहणें, जाग्रणें वगैरे.

### मुख्य दूषिततत्त्व—पृथ्वी व जल

**उपचार**—कोणत्याहि कारणानें पडसें आलें तरी पोटांत नं. २ च्या गोळ्या किंवा प्रथम विलयन द्यावें. थंडीमुळें असल्यास जोडीला चपला देणें. इतर कारणें असल्यास सुप्रभा देणें.

## २८६ पडशाची सांथ ( इन्फ्ल्यूएंझा )

**कारणें**—थंडीच्या दिवसांत याच्या सांथी येतात. हा विकार एकदां झाला म्हणजे थोड्याफार फरकानें पुन्हां पुन्हां येत असतो.

### मुख्य दूषिततत्त्व-- जल व तेज.

**लक्षणें**-- सर्वांग अतिशय दुखून जोराचा ताप येणें, पडसें, खोकला. या तापांत कमालीचा अशक्तपणा येत असतो. विकार सौम्य असला तर २।३ दिवसांत ताप निघतो. विकार तीव्र असला तर फुफ्फुसदाह, श्वासनलिकादाह, पचनेंद्रियांचे विकार, यांपैकीं कांहीं विकार दिसून येतात. तीव्र स्वरूपांत ताप जोराचा व थंडी वाजून भरतो. घसा धरणें, डोळे सुजणें, पाठींतून रेपा येणें, सांधे दुखणें, कपाळशूळ, हलकपणा, छातींत आवळल्यासारखें होणें, लघ्वी थोडी व कडक होणें वगैरे.

**उपचार**— पोटांत नं० २।३ सुप्रभा देणें. मधून-मधून नं० १हि द्यावा. कपाळ व छाती यांवर सौदा० घड्या घालाव्या.

## २८७ परमा– ( गनोरिया. )

**कारणें**— हा सांसर्गिक विकार आहे. या रोगानें पछाडलेल्या स्त्रीपुरुषांचे संबध घडल्यानें हा विकार पसरत जात असतो.

### मुख्य दूषिततत्त्व– जल.

**लक्षणें**—संग झाल्यापासून थोडे दिवसांतच लघ्वींतून पू जाऊं लागतो. पू जाण्यापूर्वी लघ्वीला होतांना तिडिक येते व जळजळ होते. प्रथम पुवाचा स्राव पातळ असतो. परंतु तो पुढें दाट व पिवळा होतो. मूत्रमार्गांतील श्लेश्मल त्वचेचा दाह होऊन ती सुजल्यानें लघ्वी होण्यास अडथळा होऊन ती तुंबते किंवा लघ्वीच्या मार्गानें रक्तस्रावहि होतो. वेळेवर योग्य उपचार न झाल्यास विकार वाढत जातो. विकार आंगांत मुरला असतां बद, मूत्रस्रोतसांत गळूं होणें, नाडीव्रण, अष्ठीलादाह, स्त्रियांस योनिदाह, गर्भाशयदाह वगैरे विकार होतात.

**उपचार**—नं० ७ हें मुख्य औषध आहे. याच्या जोडीला नं० १।२ व सुप्रभा द्यावें. विकार तात्कालिक असेल तर प्रथम विलयन द्यावें आणि जुनाट विकार असेल तर पुढील सूक्ष्म विलयनें द्यावीं. विकार तात्कालिक

असतां गुह्यभाग सुप्रभा व नं० ७ ह्याच्या विलयनानें रोज दोन वेळां स्वच्छ धुवावा.

## २८८ पांडुरोग

**कारणें**— ( हा एक क्षयाचाच प्रकार आहे. ) सांथीचे किंवा अन्य कारणांनीं जोराचे ताप येणें, अत्याहारादि कारणानें पाचक पित्तरसाचा व्यय होऊन त्याचें न्यूनत्व होणें, अग्निमांद्यादिकांनीं प्लीहा विकृत होणें, मद्यपानातिरेक, तेलकट रुक्ष पदार्थ सेवनाचा अतिरेक, मोकळी हवा व सूर्यप्रकाश न घेणें व चिंता वगैरे मानसिक व्यथा इत्यादि.

### मुख्य दूषिततत्त्व–तेज

**लक्षणें**— तोंड, ओंठ, जीभ, डोळे व नखें फिकट होणें, चेहरा व सर्वांग निस्तेज होणें, तोंड सुजमट, तळहात व तळपाय पांढरे होतात, अंग गार लागतें, हुषारी नाहींशी होते, सुस्ती वाढते, छातींत धडधडतें, टाळू व कानशीलें दुखतात व कांहीं खाल्ल्यानें किंवा स्वस्थ पडून राहिल्यानें थांबतात.

**उपचार**— पोटांत नं. १।३ व योग०; मधून मधून नं. २ व ४ बाहेरून यकृत व प्लीहा यांवर ३ ब व योग० च्या घड्या घालाव्या.

## पित्ताशय विकार–पित्ताशय दाह, पित्ताश्मरि.

( १ ) **पित्ताशय दाह.** ( कॉलेसिस्टायटिस् ) **कारणें**—पित्ताशयांतील अश्मरी किंवा इतर विजातीय द्रव्यें, कृमि वगैरेमुळें पित्ताशय व पित्तवहनलिका यांचा दाह होतो.

### मुख्य दूषिततत्त्व—तेज

**लक्षणें**— पोटाच्या उजव्या बाजूला सूज व वेदना, वांति, मलावरोध, ताप वगैरे.

**उपचार**— पोटांत नं० १।३ योग० बाहेरून विकृत भागावर योग० घड्या घालाव्या.

( २ ) **पित्ताश्मरि ( गॉलस्टोन्स )**

**कारणें**—अवेळीं व अनियमित खाणेंपिणें, बैठें काम नेहमीं करणें आणि व्यायामाचा अभाव, बद्धकोष्ठ, अपचन, वगैरे कारणांनीं पित्ताशय व पित्त-

नालिका यांना दुर्बलता येत जाते व त्यांची कार्यक्षमता कमी होत जाऊन पित्ताचा अवरोध होतो व त्याचे कण सांचूं लागतात व खडे बनतात.

**मुख्य दूषिततत्त्व— पृथ्वी व तेज,**

**लक्षणें**— अपचन, थोडा ताप, घाम येणें, फिकटपणा वगैरे लक्षणें खडे स्थिर असतांना दिसूं लागतात. परंतु खडे सरकूं लागून पित्तवहनालिका व स्रोतसें वगैरें मार्गांनीं जाऊं लागले म्हणजे वाटेंत खरचटत जातात. त्या वेळीं तीव्र वेदना होतात. पाठींतून, खांद्यांतून वगैरे वरचे भागांतहि भोंसकल्या-प्रमाणें असह्य कळा मारतात. आंगाला घाम सुटतो, उलट्या होतात. क्वचित् उचकी, मुर्च्छा वगैरेहि येते. कण अगर खडा निसटून गेल्यावर बरें वाटतें.

**उपचार**—पोटांत नं. १।३योग० देणें, ३ ब व घड्या यकृत व पित्ताशय यांवर भरपूर घालाव्या. वेदना होत असतांना घड्या सारख्या चालू ठेवाव्या व नंतरही पोटांत बरेच दिवस वरीलप्रमाणेंच औषध देऊन घड्या दिवसां-तून एक वेळ तरी घालीत जावें.

## २९० पैण–आगपैण

[ पैण ही फार करून डोकींत होते. मान, पाठ हात व पाय यांवरहि क्वचित् आढळतें. हिची लस लागून इतरत्रहि फोड येतात. ]

**कारणें**–वसा व रक्त यांत विजातीय द्रव्यांची वाढ, अपचन, बद्धकोष्ठ वगैरे.

**मुख्य दूषिततत्त्व–पृथ्वी व वायु.**

**लक्षणें**— लहान अगर मोठ्या आकाराचे अगदीं जवळ जवळ फोड येऊन त्यांना अतिशय खाज असते. ती जागा फणफणून तापते. लस येते.

**उपचार**—पोटांत नं. १।२ सुप्रभा; मधून मधून नं. ७ हि द्यावा. पैणीचा भाग रोज दोन वेळां स्वच्छ धुऊन त्यावर चपला तेल चबचबीत लावावें. रोज ३।४ वेळा सुद्धां तेल लावावें. ८।१० दिवसांत बरें वाटतें. तथापि पुढेंहि कांहीं दिवस औषध चालू ठेवावें. नाहीं तर पुन्हां होण्याचा संभव असतो.

## २९१ पोटदुखी–पोटशूळ

**कारणें**—अजीर्ण, अपचन, वातूळ व तेलकट पदार्थ खाल्ल्यानें पोटांत

वात धरणें वगैरे कारणांनीं आकस्मिक पोट दुखतें. तसेंच आम्लपित्त वगैरे कारणें वारंवार होत गेल्यास विकार या स्वरूपांत पोट दुखूं लागतें.

### मुख्य दूषिततत्त्व–आकाश व जल.

**उपचार**—पोटांत नं. १ व ३ ब यांच्या गोळ्या वरचेवर २।३ वेळां द्याव्यात. म्हणजे आकस्मिक पोट दुखणें थांबतें, परंतु पोटदुखीचा विकार म्हणून जडला असल्यास नं. १ व सुप्रभा मधून मधून नं. २ कांहीं दिवस द्यावें लागतें.

## २९२ फुफ्फुसदाह - श्वसनकज्वर ( न्युमोनिया )

**कारणें**—थंड वाऱ्याचा झोत छातीला लागणें; हवेंत एकदम गारठा होणें, घाम आला असतां वारा लागणें, संसर्गदोष, जोराचा ताप, अति थंड पेय अगर खाद्य पदार्थ खाणें वगैरे.

### मुख्य दूषिततत्त्व— जल व वायु.

**लक्षणें**—छातींत रोगस्थानीं दुखणें, कळा मारणें, कफ न सुटणें, १०३ ते १०४ पर्यंत सतत ताप, कफ चिकट व शुष्क होणें व तो न सुटणें अथवा फार प्रयासानें सुटणें, कफाबरोबर थोडें रक्तहि कांहीं वेळां पडणें, नाडीची गति वाढणें, वात होणें, रक्ताशयावर भार आल्यासारखा वाटणें, नाडी व श्वास यांचें स्वाभाविक प्रमाण ४:१ असें असतें तें २:१ पर्यंत होतें.

**उपचार**—पोटांत नं० २।४।६ सौदा० वरचेवर द्यावें. मधूनमधून त्याचे जोडीस नं० १।३ द्यावें. सबंध छातीच्या भागावर व पाठीवर सौदा० घड्या घालाव्या. कपाळावरहि सौदा० घड्या घालाव्या. तासअर्धातास घड्या घातल्यावर १।२ तास थांबून पुन्हां घड्या घालाव्या. याप्रमाणें भरपूर घड्या घातल्यानें रोग्याला फार आराम वाटतो. पाणी भरपूर द्यावें.

## २९३ फुफ्फुसावरणदाह ( प्ल्यूरसी )

**कारणें**— थंडी, गार वारा वारंवार ताप येणें, देवीगोंवर वगैरे.

### मुख्य दूषिततत्त्व— जल व वायु.

**लक्षणें**— थंडी वाजून ताप येणें, श्वासोच्छ्वासाचे वेळीं तीव्र वेदना होणें, श्वास लागणें, नाडी जलद चालणें, शुष्क खोकला, बेचैनपणा वगैरे.

फुप्फुसांवर जी आवरावचा असते तिला सूज येते व त्यामुळें त्यांत द्रव-पदार्थ तयार होतो.

**उपचार**— पोटांत नं. २।४ सुप्रभा; छातीवर चपला घड्या भरपूर घालाव्या.

## २९४ ब्रॉंकोन्यूमोनिया

[या विकारांत सूक्ष्म श्वासनालिकाग्रें व सूक्ष्म वायुकोश यांचा दाह होत असतो.]

**कारणें**—देवी, गोंवर, डांग्या खोकला, दोषी ताप ह्यांसारख्या विकारांमुळें, वरील इंद्रियांना आलेलें दौर्बल्य, गार वारा, सर्दी, संगर्गदोष, वगैरेमुळें हा विकार होतो. लहान मुलें व वृद्ध, अशक्त, रोगी यांस विशेषतः हा विकार होतो.

### मुख्य दूषिततत्त्व— जल व वायु.

**लक्षणें**—संतत ताप, श्वास, नाडीची गति वाढणें, अतित्रासदायक खोकला, चिकट, शुष्क कफाचा बेडका त्रासानें पडणें, लहान मुलांना झांपड जास्त असते व श्वास जास्त वाढल्यास तीं कुंथू लागतात.

**उपचार**—पोटांत नं. २।६ सौदा० द्यावें. मधून मधून नं. १।२ जोडीला द्यावें. छाती व कपाळ यांवर सौदा० घड्या घालणें.

## २९५ बेरिबेरी

**कारणें**—खाण्यांत पालेभाज्या, मोड आलेलीं धान्यें, फळें, कोंड्यासकट धान्याचे पदार्थ यांचा अभाव हें मुख्य कारण आहे. समुद्रावर सफरीस असलेल्या लोकांस फार दिवस ताजा भाजीपाला, फळें वगैरे मिळत नाहींत म्हणून त्यांस हा रोग विशेषतः होतो.

### मुख्य दूषिततत्त्व— पृथ्वी व वायु.

**लक्षणें**—मज्जातंतुविकृति, हातापायांची अशक्तता, त्यांत वेदना, सूज मांसक्षय हीं लक्षणें प्रामुख्यानें असतात. हातापायांची आग होते व अर्धांगाप्रमाणें क्वचित् लटकेपणाहि येतो.

**उपचार**—पोटांत नं. १।४ सुप्रभा, कपाळ व पाठीचा कणा यांवर सौदा० घड्या.

**पथ्य**—तांदुळाचा कोंडा, पालेभाज्या, फळफळावळ हीं खाण्यांत जास्त ठेवावीं.

## २९६ भगंदर ( फिस्चुला इन एनो )

**कारणें**—मलद्वारांत क्षत पडणें, कुल्यावर मार बसणें, मूळव्याध, थंड जाग्यावर एकसारखें बसणें वगैरे.

**मुख्य दूषिततत्त्व-पृथ्वी व जल**

**लक्षणें**— गुदाच्या आंतील बाजूस एक गळूं होतें व तें फुटून त्या ठिकाणीं व्रण पडतो आणि तो लवकर बरा होत नाहीं. त्यांतून पू येऊं लागतो.

**उपचार**— पोटांत नं० १।२ सुप्रभा. सुप्रभेच्या घड्या विकृत भागावर घालाव्या अथवा सुप्रभा तेल लावावें.

## २९७ भोंवळ; चक्कर ( गिडिनेस. )

**कारणें**— पित्ताधिक्य, उन्हांतून फार हिंडणें, आम्लपित्त, पोटांत वारंवार वात धरणें वगैरे.

**मुख्य दूषिततत्त्व-- पृथ्वी व जल.**

**उपचार**— पोटांत नं० १।२ सुप्रभा; सौदा० घड्या कपाळावर आणि सुप्रभा घड्या रक्ताशयावर.

## २९८ मधुमेह. ( डायाबिटिस् मेलिटस्. )

**कारणें**—खाल्लेल्या अन्नाचे योग्य रस न बनणें, चरबी वाढणें, अजीर्ण, पचनक्रियेचा बिघाड, यकृत व प्लीहा यांतून योग्य प्रकारें पाचकस्राव न होणें, वगैरे.

**मुख्य दूषिततत्त्व—पृथ्वी व वायु.**

**लक्षणें**— रक्तांत आणि मूत्रात शर्कराधिक्य, बहूमूत्रता, तहान लागणें, अशक्तपणा, हाव लागणें, कृशता वाढणें, त्वचा रुक्ष होणें, गळवें वगैरे. मूत्र फिकट स्वच्छ असून त्याचें विशिष्टगुरुत्व व प्रमाण हीं दोन्ही वाढलेलीं असतात. विशिष्टगुरुत्व १०२५ पासून १०४५ पर्यंतहि चढतें. साखर प्रत्येक औंसाला २ ते ४० ग्रेनपर्यंतहि आढळते. कांहीं ॲसिडेंहि जात असतात.

**उपचार**— पोटांत नं० १ प्रथम विलयन किंवा विकार तीव्र असतां गोळ्या द्याव्या. जेवणानंतर १॥ ते २ तासांनीं सौदा० गोळ्या द्याव्या. क्वचित् एकाद्या रोग्याला नं० २ देण्याची अवश्यकता असते.

## २९९ मधुरा-विषम-आंत्रिकज्वर ( टायफॉईड )

**कारणें**—विशिष्ट जंतूंपासून याचा उद्भव होतो. हा विकार झालेल्या माणसाच्या मलमूत्रादिकांतून हे जंतु फैलावतात व हवा, पाणी, भाजी-पाला, इत्यादिकांच्या द्वारा शरीरांत शिरतात. लहान आंतड्याच्या शेवटच्या भागांत लहान वसाग्रंथी आहेत. त्यांचा या जंतूमुळें दाह होतो, व हेंच तापाचें मुख्य कारण आहे. शिवाय इतर तापांत जडान्न खाणें, घाम बंद करणें वगैरेमुळेंहि त्याचें स्वरूप पालटून विषमाचें स्वरूप येतें.

### मुख्य दूषिततत्त्व-- पृथ्वी व तेज.

**लक्षणें**—कांहीं रोग्यांना जुलाब होऊन नंतर तापाची सुरवात होते अथवा कांहींना तापानंतर २।३ दिवसांनीं जुलाब होतात. मात्र कांहीं रोग्यांना जुलाब होत नाहींत असेंहि आढळतें. दाह, भ्रम, जिभेला कोरड, अतिसार किंवा बद्धकोष्ठ, वांति, झोंप न येणें वगैरे लक्षणें इतर तापांप्रमाणेंच असतात. परंतु या तापांत ७ ते १२ दिवसांच्या दरम्यान पांढऱ्या मोहरीप्रमाणें गळा व छाती यांवर पुरूळ दिसूं लागतो अथवा लहान लहान डाग दिसूं लागतात. थोड्याशा वेळानें ते मावळून दुसरीकडे उठतात. या तापांत सामान्यतः रोज २ डिग्री ताप सकाळपासून संध्याकाळपर्यंत वाढत जातो व दुसरे दिवशीं सकाळपर्यंत १ डिग्री उतरतो. याप्रमाणें सारखा क्रमानें पहिल्या आठवड्यांत चढतो. व १०४ ते १०५ पर्यंत होतो. दुसऱ्या आठवड्यांत साधारणतः स्थिर राहतो. परंतु थोडा खोकला सुरू होतो व वाताचीं लक्षणें दिसूं लागतात. अशक्तपणा बराच येतो. तिसरे आठवडयांत जुलाब होण्याचा संभव असतो. तिसरे आठवडयाचे अखेरीस ताप क्रमानें १।१ डिग्री कमी होऊं लागतो व २१ वे दिवशीं निघतो. त्यानंतर थोडे दिवस फार जपावें लागतें. कारण अल्पशा कुपथ्यानेंसुद्धां उलटतो व पुन्हां ७।१४।२१ असे दिवस घेत असतो.

या तापांत पोट दाबून पाहिलें असतां आंतड्यांचा भाग विशेषतः खालचा भाग दुखतो. जिभेवर जांभळट अथवा काळे डाग दिसतात. तसेंच जिभेचें टोंक व कडा लाल होतात व मध्यभागीं बुरशी असते. ताप निघतांना बराच घाम येतो.

**उपचार**--पोटांत नं. १।३ सुप्रभा प्रथम विलयन द्यावें. वाताचा जोर असल्यास वरील औषधांतच नं. २ घालावें. खोकला असतां नं. ६ जोडीला देणें. कपाळ व मस्तक यांवर मधून मधून सौदा० घड्या घालाव्या. ३ ब व योग० यांच्या घड्या यकृत व प्लीहा यांवर घालाव्या. न्यूमोनिया किंवा कफ झाल्यास सौदा० घड्या, छाती, पाठ व कपाळ यांवर घालाव्या.

**पथ्यकर आहार**--दूध, ताक, गाळलेली पातळ कण्हेरी, मुसुंब्याचा रस वगैरे द्यावें. थंड पाणी वरचेवर व भरपूर द्यावें.

## ३०० मस्तिष्कज्वर ( मेनिंजायटिस् )

[ यांत मेंदूचे आवरणाचा व मेंदूचा दाह होतो व ताप भरतो. ]

**कारणें**—याच्या सांथी येतात. सूर्याची झळ, फाजील मानसिक श्रम, हवेचें उष्णतामान आकस्मिक वाढणें, थंडी, सर्दी, संधिवात, धांवरें, क्षयाचे जंतूचा मेंदूवर परिणाम वगैरे.

### मुख्य दूषीततत्त्व—जल व वायु

**लक्षणें**—डोकें व मान अतिशय दुखणें, पाठीचा कणा दुखूं लागणें, मान जखडणें, घेरी, वांति मूर्च्छा, हातपाय ताटकळणें, तिरवेपणा, ताप १०० ते १०५ पर्यंत चढतो.

**उपचार**—पोटांत नं. २।४ योग० गोळ्या वरचेवर द्याव्या. सुप्रभा सौदा० घड्या पाठीचा कणा, व मस्तक यांवर आळीपाळीनें घालाव्या. थंड पाणी वरचेवर द्यावें.

## ३०१ मस्तिष्कदौर्बल्य ( न्यूरास्थेनिया )

**कारणें**—अतिश्रम, शोक, चिंता, आकास्मिक आघात, व्यसनें, मद्यपान किंवा स्त्रीसंग यांचा आतिरेक वगैरे.

### मुख्य दूषिततत्त्व-तेज व वायु.

**लक्षणें**—क्षुधानाश, मलावरोध, निद्रानाश, चिडखोरपणा, डोकें दुखणें, कानांत आवाज होणें, चंचलपणा, निरुत्साह, खिन्नसा वगैरे.

**उपचार**—पोटांत नं. ३।४ योग० सौदा० घड्या मस्तक व कपाळ यांवर घालाव्या.

## ३०२ मुखपाक-तोंड येणें

**कारणें**—आंतड्यांचा दाह, अपचन, रुक्ष व उष्ण पदार्थ खाणें, अति थंड अगर उष्ण पेयें वारंवार पिणें वगैरेमुळें पचनाक्रियेचा बिघाड, रक्ताभिसरणांत बिघाड, यकृत, प्लीहा, अगर पक्वाशय यांचा दाह, ताप येणें, कोणताहि मोठा विकार होणें वगैरे.

### मुख्य दूषिततत्त्व—पृथ्वी व जल

**लक्षणें**—तोंडाला फोड येणें, भाजल्यासारखें वाटणें, खातांना अथवा पितांना टोंचल्याप्रमाणें होणें, जळजळ, लाली, तोंडांतील त्वचेला विशेषतः जिभेला चरे पडणें, हिरड्या सुजणें वगैरे.

**उपचार**—सौम्य स्वरूप असल्यास ४।५ दिवसांत फारसा उपाय न करतां आपोआप बरें वाटतें. परंतु तीव्र स्वरूप असल्यास त्रास होतो. सौम्य स्वरूप असल्यास किंवा आकस्मिक कारण असल्यास सुप्रभेच्या गुळण्या कराव्या. तीव्र अथवा चिरकारी विकारांत पोटांत नं. १।२ सुप्रभा द्यावें व सुप्रभा गुळण्या कराव्या. यकृताचा बिघाड हें मूळ कारण असल्यास योग० व प्लीहेचा बिघाड असल्यास सौदा० या औषधाचें गुळण्यांनीं त्वरित गुण येतो.

## ३०३ मुतखडा

**कारणें**—दगडाचे अथवा वाळूचे कण असलेलें पाणी वारंवार पिण्यांत येणें, विषमान्न खाणें, पचनक्रियेंतील बिघाडामुळें रक्तांत क्षारांचा फाजील संचय होतो व त्यांचा निचरा मूत्ररूपानें होत असतांना त्यांतील कण पित्ताशयांत अगर मूत्राशयांत सांचत जातात आणि त्या कणांचें एकत्रीकरण झालें म्हणजे खडे बनतात.

### मुख्य दूषिततत्त्व—पृथ्वी व जल

**लक्षणें**—लघ्वी साफ न सुटणें, लघ्वीचे वेळीं कळा मारणें, जळजळ, लघ्वी थोडी होणें, निरणांत वेदना वगैरे.

**उपचार**—पोटांत नं० १।२ सुप्रभा, मधूनमधून नं० ३।५ द्यावें ३ ब व योग० घड्या यकृत् प्लीहा व निरण यांवर ठेवाव्या.

## ३०४ मूळव्याध– अर्श ( पाईल्स् )

**कारणें**––बद्धकोष्ट, शौचाचे वेळीं कुंथण्याची संवय, अग्निमांद्य वगैरेमुळें वारंवर पोटांत वात धरणें, अपानवायु दूषित होणें, मळाचा वारंवार खडा बनणें, अतिसार, संग्रहणी, अति रूक्ष व उष्ण अगर थंड पदार्थ वारंवार खाणें, सायकल अगर घोडा वगैरेवर फार बसणें वगैरे अनेक कारणांनीं गुद व उपगुद यांतील अशुद्धवाहिन्यांचा विस्तार होतो आणि गुदाच्या वळ्यांना मोडासारखे मांसाचे अंकुर येतात.

### मुख्य दूषिततत्त्व— पृथ्वी व जल.

**लक्षणें**––शौचाच्या वेळीं मधूनमधून रक्तस्राव होणें, गुदद्वाराची आग-ठणका, ठुसठुस, कमर व मांड्या दुखणें वगैरे.

**उपचार**—पोटांत नं. १।२ सुप्रभा, व मधून मधून ज्योति० द्यावी; बाहेरून आग होत असेल तर किंवा स्पर्शाला मोड लागत असतील तर ज्योति० किंवा सुप्रभा तेल लावावें.

**पथ्य**––दूध, लोणी वगैरे भरपूर खाण्यांत असावें. उष्ण व तेलकट विशेषतः तिखट पदार्थ व जागरणेंहि वर्ज करावींत.

## ३०५ मेदोरोग ( ओबेसिटी. )

**कारणें**— मेदोत्पादक पदार्थांचें अतिसेवन ,आनुवंशिकता, खाल्लेल्या अन्नाचे रस योग्य प्रमाणंत न बनतां मेद वाढत जाणें, पचनक्रिया व रक्ताभिसरण यांत बिघाड, व्यायाम अगर अंगमेहेनत यांचा अभाव, सुखासीनता वगैरे.

### मुख्य दूषिततत्त्व— पृथ्वी.

**लक्षणें**— स्थूलता वाढत जाणें, अशक्तपणा, जडपणा, उठतांबसतांना त्रास होणें, श्वास लागणें वगैरे.

**उपचार**–– पोटांत नं० १ व मधूनमधून चपलेच्या गोळ्या देणें.

## ३०६ यकृतविकार– ( लिव्हर डिसीजीस् )

[ यकृत हा शरीरांतील फार महत्त्वाचा पिंड आहे. त्याचें सुस्थितीवर व कार्यक्षमतेवर शरीरस्वास्थ्य बऱ्याच अंशी अवलंबून असतें. त्याला स्वतंत्र

असे कांहीं विकार होतात व त्याखेरीज इतर अनेक विकारांत त्यावर ताण पडून इतर विकारांचे वेळीं यकृतांत बरेच वेळां दोष निर्माण होतात. पंडुरोग, उदर, कावीळ वगैरे विकारांची चर्चा अन्यत्र केलीच आहे. परंतु या ठिकाणीं यकृताला प्रत्यक्ष होणाऱ्या अशा विकारांचा निर्देश करीत आहों. यकृताला वृद्धि, आकुंचन, दाह, चरबी वाढणें, पित्तसंचय, रक्तसंचय, पू होणें वगैरे विकार होतात. ]

**वरील सर्व विकारांची सामान्य कारणें**—अति उष्ण, रुक्ष, तेलकट पदार्थ वारंवार खाणें, दारू पिणें, मोकळी हवा व सूर्यप्रकाश यांत न हिंडणें फिरणें, सांथी अगर अन्य कारणांनीं ताप येणें वगैरे.

## मुख्य दूषिततत्त्व—तेज

( १ ) **यकृतांत रक्तसंचय—लक्षणें**—यकृताच्या भागांत जडत्व आणि घनपणा जाणवतो. दाबलें म्हणजे दुखतें. उजव्या खाद्यांत दुखूं लागतें, जेवणानंतर पोटांत जास्त दुखतें, अपचन बद्धकोष्ठ, लघ्वी लाल होणें, डोकें दुखणें, शरीर निस्तेज व अशक्त दिसणें वगैरे.

**उपचार**— पोटांत विशेषतः नं० २।३ व योग० मधून मधून नं० १ व ३ ब द्यावे. ३ ब व योग० घड्या यकृत व प्लीहा यांवर घालाव्या.

( २ ) **यकृताचा दाह— लक्षणें**— यकृत मोठें होतें, ताप येतो, यकृताचे भागीं दाबल्यास दुखतें व एरवींही दुखूं लागतें. रोग्याला डाव्या कुशीवर निजवत नाहीं, कपाळ दुखतें. डोळे थोडे पिंवळे दिसतात व दुखूं लागतात. कोरडा खोकला, जिभेवर बुरशी वगैरे.

**उपचार**—पोटांत नं० २।३ सुप्रभा बाहेरून सुप्रभा सौदा० घड्या यकृत् प्लीहा यांवर घालाव्या.

( ३ ) **यकृतांत पू होणें. लक्षणें**—( यांत मुख्य दूषिततत्त्व—जल ) यकृतांत एकाद्या गळवाप्रमाणें पू होतो. ताप कमजास्त येतो. या तापांत घाम वारंवार व भरपूर येतो. छाती, यकृत व पोट यांत वेदना होतात. यकृत खूपच वाढतें, रोगी सशक्त असून पू थोडा असल्यास आंतल्याआंतच शोषणक्रियेने शोषला जाऊन रोग्याला आराम पडतो. परंतु तसें न झाल्यास पुवामुळें इतर इंद्रियांस अनेक भयंकर विकार उत्पन्न होतात. वेळींच ऑपरेशन करणें फायदेशीर असतें.

**उपचार**--पोटांत नं० १।२ सुप्रभा; चपला घड्या यकृतावर घालाव्या म्हणजे सूज मोडते. बहुधा पू होण्याची भीति राहात नाहीं.

( ४ ) **यकृतांत चरबी वाढणें-लक्षणें**-- ( मुख्य दूषिततत्त्व पृथ्वी ) शरीरांत चरबी वाढली म्हणजे ती यकृतांतहि वाढते. अथवा शरीर क्षीण होऊन यकृतांत चरबी वाढते.

**उपचार**—पोटांत व बाहेरून चपलेचा उपयोग करावा. पोटांत मधून-मधून नं० ३ ब गोळ्या द्याव्या.

( ५ ) **पित्तसंचयामुळें यकृतवृद्धि-लक्षणें**-यांत ताप वगैरे लक्षणें विशेष नसतात, परंतु पित्त वाढल्यानें तें रक्तांत मिसळूं लागतें व चक्कर येणें, डोकें दुखणें, वांति, रेच वगैरे लक्षणें होतात.

**उपचार**—पोटांत नं. १।२।३ देणें. यकृतावर चपला घड्या.

( ६ ) **उपदंश** ( गरमी ) **विकारामुळें यकृत वृद्धि-लक्षणें**-यांत रोग्याला सर्व नेहमींचे व्यवहार करतां येतांत विशेष त्रास जाणवत नाहीं.

**उपचार**-विशेषतः नं. ७ द्यावा व वरील औषधें जोडीला द्यावीं.

( ७ ) **यकृतसंकोच-लक्षणें**-यकृताच्या भागांत मोठ्यानें ठोकून पाहिलें असतां यकृत् लहान झाल्याचें आढळतें. अजीर्ण अपचन, कांहीं वेळां रक्ताची उलटी आणि शौचांत मूळव्याधीप्रमाणें रक्त पडणें, कावीळ, अव-ष्टंभ किंवा अतिसार, शक्तिक्षीणता, वगैरे.

**उपचार**--पोटांत नं. १।२।३ द्यावें. यकृतावर ३ ब व योग० घड्या घालाव्या.

## ३०७ रक्तदाब विकार ( ब्लड प्रेशर )

[ शारीरिक क्रियांना आवश्यक अशी (१) रक्ताशयाची कार्यक्षमता, (२) शुद्ध रक्ताची संततगति (३) रक्ताचा प्रमाणबद्ध पुरवठा यांच्या योगानें रक्तवाहिन्यांवर स्वाभाविक असा विशिष्ट ताण पडतो तो रक्तदाब होय. वरील तीन गोष्टींपैकीं कोणत्याहि एका किंवा अधिक कार्यांत बिघडाबिघड होते तेव्हां त्याला विकाराचे स्वरूप येतें. १ रक्तदाबाधिक्य आणि २ रक्त-दाबन्यूनत्व असे याचे दोन प्रकार होतात. ]

(१) **रक्तदाबाधिक्य** (हायब्लडप्रेशर) **कारणें**-अनियमित वागणुकी-

३१ २४१

मुळें पचनादि रसक्रिया आणि मलमूत्रादि उत्सर्जनक्रिया योग्य प्रकारें होत न गेल्यामुळें रक्तामध्यें उत्सर्जनीय द्रव्यांचा संचय होत जाणें हें या विकाराचें मुख्य कारण आहे. वारंवार अजीर्ण होण्यासारखे अत्याहार, जडान्नसेवन अन्नपानादिकांतून शरीराला अनअवश्यक अशा द्रव्यांचा आणि शिसें वगैरे सारख्या अपायकारक विषरूप द्रव्यांचा प्रवेश, आंतड्यांचे, मूत्रपिंडाचें विकार, मद्यपानादि व्यसनें, मुखरोग, नासारोग, मनोविकार, स्वार्जित अथवा वडिलार्जित गरमीसारखे विकार हीं या विकाराचीं उत्तेजक कारणें असतात.

## मुख्य दूषिततत्त्व— जल व पृथ्वी.

**लक्षणें**—कोणतेंहि बाह्य लक्षण दृग्गोचर नसतांनाहि हा विकार असूं शकतो. छातींत धडधडणें, डोकें चढल्यासारखें वाटणें, चक्कर येणें, हीं लक्षणें साधारणतः असतात. मधुमेहाच्या रोग्याला हा विकार बहुधा असतो.

**उपचार**—पोटांत नं. २ व सुप्रभा प्रथमविलयन आणि दिवसातून १।२ वेळां चपला गोळ्या. बाहेरून रक्ताशयावर सुप्रभा घड्या व मस्तकावर ३ व घड्या घालाव्या.

**( २ ) रक्तदाबन्यूनत्व** ( लो ब्लडप्रेशर ) **कारणें**—अन्नपानादिद्वारा शरीराला आवश्यक अशा पोषक द्रव्यांचा पुरवठा न होणें, दीर्घ किंवा इन्फ्ल्यूएंझासारखे जोराचे ताप, क्षय, दमा, अति खोकला, घटसर्पासारखे विकार, शरीरांतर्भागीं रक्तस्राव होणें, अशा कारणांनीं रक्ताशय विकृत व अशक्त होणें; श्रमातिरेकानें, मनोदौर्बल्यामुळें, आघात अपघातादिकांनें, किंवा किंवा दुसऱ्या एकाद्या तीव्र आजारामुळें अशक्तपणा वाढणें इत्यादि या विकारांचीं कारणें आहेत.

## मुख्य दूषिततत्त्व— जल व वायू.

**लक्षणें**—छातींत धडधडणें, हातापायांची व डोळ्यांची आग, गलबलल्यासारखें होणें, थकवा, गळल्यासारखें होणें, नाउमेद, स्मरणशक्ति कमी होत जाणें वगैरे लक्षणें असतात.

**उपचार**—पोटांत नं. २।४ व सुप्रभा, प्रथमविलयन आणि दिवसांतून १।२ वेळां चपला गोळ्या. मधून मधून चपलेऐवजीं सौदा० पोटांत द्यावी. मस्तकावर ३ व घड्या आणि रक्ताशयावर सुप्रभेच्या घड्या घालाव्या.

## ३०८ रक्तपित्त

**कारणें**—अतिउष्ण पदार्थसेवन, जागरणें, उन्हांत हिंडणें, आगी जवळचें काम, यकृताचे विकार वगैरे कारणांनीं पित्त वाढतें व तें बिघडून रक्तांत फाजील प्रमाणांत मिसळतें व त्यामुळें रक्त दूषित होतें. यांत मुख्यतः यकृतांतील बिघाड कारणीभूत असतो.

**मुख्य दूषिततत्त्व— जल व तेज.**

**लक्षणें**—तोंडातून किंवा मलमार्गानें रक्त पडतें, नाकाचा घोणा फुटून किंवा साध्या प्रणांतून सुद्धा फारच रक्तस्राव होतो. रक्त पडण्यापूर्वी कांहीं दिवस डोळयापुढें अंधेरी येणें, चक्कर येणें, वगैरे लक्षणें होतात.

**उपचार**—पोटांत नं. २१३ सुप्रभा; रक्ताशयावर सुप्रभा घड्या व यकृत् प्लीहा यांवर ३ ब व योग० घड्या घालाव्या.

**पथ्य**—उष्ण पदार्थ वर्ज करून, सात्त्विक व रक्तवर्धक असा आहार ठेवावा. आगीजवळ किंवा उन्हांत काम करणें वर्ज्य करावें.

## ३०९ रक्तपिती– वातरक्त– गलितकुष्ठ, महारोग ( लेप्रसी. )

**कारणें**— विशिष्ट जंतूंपासून हा रोग होतो. विरुद्धाशन किंवा गरमी यामुळें रक्त बिघडतें. वंशपरंपरेनें मुलांना हा रोग होतो. परंतु बाल्यावस्थेंत होत नहीं. १५ ते २० वर्षें वयानंतर तो दिसूं लागतो. हा स्पर्शसंचारी विकार आहे.

**मुख्य दूषिततत्त्व— जल व वायु.**

**लक्षणें**— याचे मुख्य दोन प्रकार आहेत. एकांत त्वचेवर गांठी येतात व दुसऱ्यात स्पर्शज्ञान नाहींसें होऊन त्वचा बधिर होते. पहिल्याला **ग्रांथिकवातरक्त** व दुसऱ्याला **शून्यवातरक्त** अशीं नावें आहेत. कोणास एकाच प्रकारची रक्तपिती होते. परंतु मागूनपुढून बहुतेकांस हे दोन्ही प्रकार होतातच. त्वचेचा रंग पालटतो, त्वचा तुकतुकीत अगर रूक्ष दिसूं लागते. दाह, ठणका, कंडू वगैरे सुरू होतात, अशक्तपणा येतो. जखम झाल्यावर ती चरत जाते व लवकर भरून येत नाहीं. सूज, चट्टे, अंग झडणें, लस वाहणें वगैरे लक्षणें पुढें होतात व रोग्याकडे पहाणेंहि किळसवाणें वाटतें.

**उपचार**— पोटांत नं० १।२।४ सौदा० व मधून मधून सुप्रभा देणें, सुप्रभा व सौदा० यांचें विलयन आळीपाळीनें सर्वांगास लावावें.

## रक्ताशयविस्तार ( डायलेटेशन ऑफ दि हार्ट )

[ या विकारांत रक्ताशयाची पोकळी वाढते. ]

**कारणें**— मद्यपान, मादक पदार्थ खाणें, मानसिक आघात, वासनांचें अतिशय उद्दीपन, अतिश्रम, ताप, एकदम बलक्षय, ह्या कारणांनीं रक्ताशय अशक्त होऊन त्याचा विस्तार होतो. याचप्रमाणें रक्ताभिसरणांतील अडथळ्यांमुळें रक्ताशयांतील पडदे व द्वार यांच्या बिघाडामुळें रक्ताशयावर जास्त कामाचा ताण पडल्यानें विस्तार होतो. फुफ्फुसांचे व मूत्रपिंडाचे विकारामुळेंहि असा जास्त ताण पडून हा विकार होतो.

### मुख्य दूषिततत्त्व--जल.

**लक्षणें**— थोड्या श्रमानें दम लागतो. झोंप नीट येत नाहीं, धडधडणें, नाडी अनियमित, शिरा भरलेल्या दिसणें, नाडीचे टोके मस्तकांत व कानांत ऐकूं येणें, विकार जास्त झाला म्हणजे पायांपासून सूज सुरू होऊन नंतर सर्वांगाला येते.

**उपचार**—पोटांत नं. १।२ सुप्रभा; बाहेरून रक्ताशयावर सुप्रभा घड्या घालाव्या.

## ३११ रक्ताशयशूल ( अंजायना पेक्टोरिस् )

[ ह्यांत रक्ताशयांत ( हार्ट ) तीव्र शूळ उत्पन्न होऊन श्वास कोंडतो व मरण येईल कीं काय असें रोग्यास वाटतें. ]

**कारणें** —धमनीविकार, तसेंच वातरक्त, गरमी, इन्फ्ल्युएंझा, श्रमातिरेक, मनःक्षोभ वगैरे.

### मुख्य दूषिततत्त्व– जल.

**लक्षणें**—अकस्मात तीव्र शूळ येऊन छाती रोखल्याप्रमाणें वाटते; रोगी निश्चेष्ट होतो. हा शूल रक्ताशयापासून, डाव्या बाजूकडे, मानेंत व हाताकडे जातो. श्वास रोखल्याप्रमाणें होतो. चेहेरा सचिंत असून फिकट होत. हा शूळ वारंवार येतो. पहिल्या शूळांतहि कदाचित् मृत्यु येण्याचा संभव असतो,

केव्हां केव्हां शूळ न येतांच श्वासावरोधिक लक्षणें असतात. रोग्याचे हातपाय एकदम थंड पडतात, रोगी घाबरतो, कंप सुटतो.

**उपचार**—पोटांत नं. १।२ सुप्रभा; बाहेरून रक्ताशयावर सुप्रभा घाव्या.

रक्ताशयाच्या इतरहि सर्व प्रकारच्या विकारांत वरील चिकित्साच उपयुक्त आहे.

## ३१२ वसाग्रंथिवृद्धि ( लिंफॅडिनोमा )

**कारणें**—वसादोष हें मुख्य कारण आहे. रक्ताचा अशुद्धपणा जास्त होणें व तो शोषून घेण्याइतकें वसाग्रंथींना सामर्थ्य नसणें, खाल्लेल्या अन्नाचें योग्य पचन न होणें व योग्य रस न बनणें, यकृत, प्लीहा, लालापिंड वगैरेमधून पाचक रसांचा योग्य पुरवठा न होणें, गरमी वगैरे.

### मुख्य दूषिततत्त्व—पृथ्वी

**लक्षणें**—वसाग्रंथी वाढतात, परंतु दुखत नाहींत. प्रथम गळ्याच्या व व एकाच बाजूच्या वसाग्रंथी वाढतात. नंतर खाक, जांघ व अखेरीस सर्वांगावरच्या वसाग्रंथी वाढतात. उरांतील वसाग्रंथी वाढल्यास फुप्फुसावरण-दाहादि विकार होतात, ज्ञानतंतूंवर त्या ग्रंथींचा भार पडल्यास वेदना होतात, सूज येते, म्हणून तापहि येतो.

**उपचारः**—हा विकार लवकर बरा होणारा नाहीं. पोटांत नं० १ च्या गोळ्या द्याव्या. मधून मधून चपला व नं. २ द्यावा. चपलेच्या घड्या गाठींवर व पाठीच्या कण्यावर घालाव्या.

## ३१३ वसाधिक्य ( लिंफ्याटिझम् )

**कारणें**—पाचक रसांची अशुद्धता, वसादोष, विरुद्धाशन, कंद खाणें वगैरे.

### मुख्य दूषिततत्त्व— पृथ्वी.

**लक्षणें**—या विकारांत शरीरांत वसेचें आधिक्य होतें. जत्रुस्थ पिंड विकृत होऊन वाढतो, या पिंडाचा भार श्वासनलिकेवर पडून लहान मुलांत घशाजवळ नेहमीं घुरगुरूं लागतें व मोठ्या माणसांत या विकारामुळें दमा लागतो, प्लीहा वाढते.

**उपचार**—पोटांत नं. १ आणि मधूनमधून चपलेच्या गोळ्या खाव्या. थोडेच दिवसांत उत्तम गुण दिसूं लागतो.

## ३१४ व्रण–क्षत ( अल्सर )

[ शरीराच्या बाहेरील अगर आंतील भागांत व्रण पडतात. केवळ त्वचेशीं संबंध असणारे बाहेरील व्रण लौकर बरे होतात. परंतु आमाशय, आंतडें, यकृत, प्लीहा वगैरे भागीं होणारे आंतले भागांतील, व शरीरांशीं संबंधित असणारे बाहेरचे भागांतील नाडीव्रण, तसेंच हाडांना होणारे हाडीव्रण फार उपद्रवकारक असतात.

**कारणें**—रक्त किंवा पित्त बिघडणें, अपचन, अग्निमांद्य आम्लपित्त, वगैरेमुळें अन्न कुजत राहाणें, नाजुक श्लेष्मल त्वचा अशक्त होणें वगैरेमुळें क्षतें पडतात.

### मुख्य दूषिततत्त्व–पृथ्वी व जल

(१) **लक्षणें**—(१) **अंतर्गत भागांतील व्रणाची लक्षणें**—खाल्ल्यावर कांहीं वेळानें तीव्र वेदना होतात. जेवल्यानंतर लगेच किंवा १॥ । २ तासांनीं वांति होते. वांति झाल्यावर वेदना कमी होतात. व्रणातून क्वचित् रक्तस्रावहि होतो. व रक्ताची उलटी होते. बहुधा भूक चांगली असते. ( २ ) **बाह्य व्रणाचीं लक्षणें**—पू, लस, कांटवणी येतें, चरत जातो, दाह होतो.

**उपचार**—पोटांत नं. ११२ सुप्रभा; बाहेरून सुप्रभा विलयनाच्या घड्या अथवा तेल लावावें.

## ३१५ वृक्कदाह–मूत्रपिंडदाह (ब्राइटस् डिसीज; अल्ब्यूमिन्यूरिआ)

**कारणें**— उष्ण हवामान असतां अति थंड पेयें पिणें किंवा अति थंड पदार्थ खाणें, तीव्र ताप, अतिमादक पदार्थांचें सेवन, जडान्न अथवा अतिविषमान्न वारंवार खाणें, जागरणें वगैरे.

### मुख्य दूषिततत्त्व–जल व पृथ्वी.

**लक्षणें**— पाठींत वेदना, वांति, डोकें दुखणें, आणि थंडी भरून ताप हीं पूर्वरूपें असतात. नंतर सर्वांगाला सूज येते. मात्र डोळ्यांच्या पापण्यांना येत नाहीं नाडी जलद व ठसकेदार चालते. लघ्वीला थोडें थोड व तांबूस असतें. लघ्वींत अल्ब्यूमिन वगैरे जातें, तहान लागते, रक्ताशयावर भार येऊन त्याची वृद्धि होते.

**उपचार**— पोटांत नं. १।२ सुप्रभा, पाठीचा कणा व पोट यांवर चपलेच्या घड्या घालाव्या, पाणी भरपूर पिण्यास द्यावें.

## ३१६. वृक्कविद्रधि ( मूत्रपिंडांत पू होणें ).

**कारणें**—कृमी, तीव्र सांसर्गिक रोग, मधुमेह, रक्तदोष मूलस्रोतसावर दाब पडणें; मूतखडा वगैरे.

### मुख्य दूषिततत्त्व— पृथ्वी व जल.

**लक्षणें**—मूत्रपिंडाचे भागांत विशेषतः पाठीकडील बाजूला वेदना, लघ्वींतून रक्त, पू किंवा श्लेष्म जाणें, लघ्वी चिकट व दर्पयुक्त, ताप, घाम सुटणें वगैरे.

**उपचार**—पोटांत नं. १।२ सुप्रभा; पाठीच्या कण्यावर व मूत्रपिंडाचे भागीं पोटावर सुप्रभा सौदा० घड्या आलटून पालटून घालाव्या, म्हणजे पू वाहून जाईल. पाणी भरपूर द्यावें.

## ३१७ वृक्काश्मरि-शर्करा (रीनल कॅल्क्युलस )

[ बस्तीप्रमाणें वृक्कांत ( मूत्रपिंडांत ) मुतखडे होतात. हे बारीक असल्यास त्यांना 'शर्करा' म्हणतात.]

**कारणें**—मूत्रांत कांहीं क्षारांचें प्रमाण वाढत जाऊन, त्यांचे कण सांचत राहिल्यानें हे मुतखडे होतात.

### मुख्य दूषिततत्त्व— पृथ्वी व जल.

**लक्षणें**—पाठींत व कुशींत दुखणें व तें हालचालीनें तीव्र होणें, क्वचित् लघ्वींतून रक्त जाणें, एकादा खडा मूत्रस्रोतसांत अडकल्यास अत्यंत तीव्र शूल होतो. हा शूल पाठीमागें कमरेच्या वर उत्पन्न होतो. हा शूल पाठीमागें कमरेच्यावर उत्पन्न होऊन खालीं वृषणाकडे व मांडीच्या आंतल्या बाजूपर्यंत खालीं जातो. त्या बाजूस पोट दुखतें व तीव्र वेदना होऊन वेळीं मूर्च्छा येते. सर्वांगाला घाम सुटतो. नाडी क्षीण लागते. उलट्या होतात. हा शूल कांहीं तासांपासून कांहीं दिवसहि राहतो.

**उपचार**—पोटांत नं. १।२ सुप्रभा; बाहेरून चपलेच्या घड्या, पाठीचा कणा आणि मूत्रपिंड यांवर घालणें.

## ३१८ विषूचिका, पटकी, महामारी ( कॉलरा )

**कारणें**—विशिष्ट जंतूमुळें हा विकार होतो. ह्या रोगानें पछाडलेल्या मनुष्याचे मलमूत्रांतून हे जंतु पाण्यांत जातात व पिण्याच्या पाण्यांतून पोटात जातात. याच्या साथी येतात. तसेंच कोणत्याहि प्रकारें नासकें शिळें अन्न, अपक्व किंवा सडकीं फळें खाणें यामुळें या रोगास उत्तेजन मिळतें.

### मुख्य दूषिततत्त्व–पृथ्वी.

**लक्षणें**—प्रथम उलट्या व जुलाब होऊं लागतात. हातापायांतून पेटके येतात, लघ्वी कमी होते. शरीर गार पडूं लागतें व काळें दिसूं लागतें, नाडी मंद चालते व चैन पडत नाहींसें होतें. लघ्वी अजीबात बंद होणें व ताप येणें हीं लक्षणें वाईट असतात व वेळींच उपचार न झाल्यास रोगी मृत्युमुखीं पडतो जुलाब व उलट्या होणें हें या रोगाचें मुख्य लक्षण असतें. पहिला जुलाब किंचित् मलयुक्त असतो. परंतु नंतर होणारे जुलाब हे पाण्यासारखे पातळ व तांदुळाच्या धुणासारखे होतात. उलट्याहि पाण्यासारख्या होतात व कांहीं खाण्यांत आलें तर तें पडून जातें. पेटके येऊन स्नायूंस ओढ लागते व ते लांकडासारखें कठीण होतात. लघ्वी कमी किंवा बंद होते. श्वासोच्छ्वास मंद होत जाऊन शरीर गळून जातें, अंग बर्फासारखें थंड लागतें. शरीर घामानें भिजून जातें पण रोग्याच्या आंगाची आग होते, रोगी अत्यंत अशक्त व हैराण होतो.

**उपचार**—यावर प्रथमनिष्पत्ति हें उत्तम औषध आहे. ( विकाराच्या तीव्रतेच्या मानानें नं. १ च्या १० ते १५ गोळ्याहि दर वेळीं द्याव्या लागल्या आहेत. ) १०।१० मिनिटांनीं १० ते १५ गोळ्या देऊन वर थंड पाणी भरपूर पिण्यास द्यावें. वेळीं केवळ एकदांच औषध देऊनहि उलटी जुलाब बंद झाले तरी १०।१० मिनिटांनीं ४।५ वेळां औषध द्यावेंच. उलट्या व जुलाब पूर्ण थांबले म्हणजे गोळ्या तासादोन तासांचे अंतरानें द्याव्या. अंग गार होऊं नये आणि नाडी क्षीण होऊं नये म्हणून नं. २ व सुप्रभा यांच्या गोळ्याहि द्याव्या. गोळ्या २।३ वेळ देऊनहि उलट्या व जुलाब होतच असतील तर गोळ्यांचें प्रमाण दुप्पट किंवा तिप्पट करावें. **थंडपाणी मात्र वरचेवर भरपूर देत रहावें.** बरें वाटल्यावर ३।४

दिवस ताक, पेज, दूध, कॉफी वगैरे अन्नावर रोग्यास ठेवावें व नंतर थोडा हलका आहार द्यावा.

या विकाराचे सांथीचे दिवसांत कांहीं रोगी एकदम थकतात व उलटी-जुलाब हीं लक्षणें न होतांच शक्तिपात होऊन मरतात. म्हणून सांथीचे दिवसांत नं. १ अथवा चपलेच्या गोळया दिवसांतून एकादे वेळीं प्रतिबंधक औषध म्हणून देणें हितावह आहे. एकदम शक्तिपात वाटतांच वरीलप्रमाणें पटकीचे सर्व उपचार सुरू करावे.

## ३१९. शीतज्वर—हिंवताप—पाळीचा ताप( मलेरिया).

**कारणें**—हिंवतापाचें विष विशेषतः डांसांमार्फत शरीरांत शिरतें. दलदलीचे प्रदेशांत किंवा वारंवार घाण पाणी सांचतें अशा ठिकाणीं डांस होतात व त्यांच्यामार्फत हिंवतापाचे जंतु शरीरांत प्रवेश करतात आणि ताप येऊं लागतो.

### मुख्य दूषिततत्त्व–तेज

**लक्षणें**— अतिशय थंडी वाजणें, थंडीनें आंग कांपणें, दांतखडी वाजूं लागणें, हात, पाय व पाठ ठणकणें, जांभया येणें, लघ्वी आरक्त होणें, वगैरे. याप्रमाणें १।२ तास थंडी वाजत असते व या वेळात ताप सारखा वाढत असतो. तहान वाढते, मस्तक दुखतें, वांति होते. कांहीं तासांनीं घाम येऊं लागतो व सर्व लक्षणें कमी होऊन ताप निघतो ताप निघाल्यावर रोगी पूर्वीप्रमाणें हुशारींत येतो. हा ताप दररोज, एक दिवसा आड, दोन दिवसां आड- तीन किंवा चार दिवसांआड येतो. तीन दिवसाआड किंवा चार दिवसांआड येणारा ताप पुष्कळ वेळां वर्षवर्ष सुद्धां येत राहतो. दीर्घकाळ ताप आल्यानें यकृत व प्लीहा वाढतात, रोगी फिकट व निस्तेज होतो. अशक्तपणा येतो.

**उपचार**—पोटांत नं. १।३ व विषहारिणी आणि मधून मधून नं. २ व सुप्रभा द्यावें. ताप पूर्ण भरला म्हणजे यकृत, प्लीहा यांवर ३ ब व योग० यांच्या घडया घालाव्या. यकृत व प्लीहा वाढली असेल तर ताप नसेल तरी सुद्धां दररोज सदरील औषधाच्या घडया ठेवित जावें.

## ३२० संग्रहणी ( स्प्रू )

( ह्या विकारांत, आंतड्यांचा ग्रहणी म्हणून जो भाग आहे त्याचा दाह होतो व त्याला सूज येते. )

**कारणें**—जंत विशेषतः लहान जातीचे किरमे–जंत होणें, जीवनद्रव्य नसलेलें अन्न खाणें, तळलेलें, शिळे, निःसत्त्व पदार्थ वारंवार खाणें व त्यामुळें अग्निमांद्य, पाचक रसांचा स्राव कमी होणें वगैरे.

**मुख्य दूषिततत्त्व— पृथ्वी.**

**लक्षणें**—ह्यांत अनेक लक्षणें होतात. अजीर्ण, पोट फुगणें, अतिसार, अशक्तपणा, क्षीणपणा, दिवसास विकार जास्त असणें, तोंड येणें वगैरे.

**उपचार**—पोटांत नं. १ योग० व मधूनमधून ३ ब देणें.

## ३२१ संततज्वर–पैत्तिकज्वर ( रेमिटंट फीवर )

**कारणें**—उन्हाळा व पावसाळा या दिवसांत हा ताप जास्त आढळतो. डांसांमार्फत याचे जंतु शरीरांत प्रविष्ट होतात. हा मलेरियाचाच प्रकार आहे.

**मुख्य दूषिततत्त्व–पृथ्वी व जल.**

**लक्षणें**—बद्धकोष्ठ किंवा अतिसार, वांति, डोळे पिवळट होणें, अस्वस्थता हीं लक्षणें विशेष असतात. जिभेवर पांढरट पिंवळट अशी बुरशी असते. शिंपी पोटाजवळ दाबलें असतां तेथें विशेष दुखतें. हा ताप दिवसांत अनेक वेळां कमजास्त होत असतो. ४।५ दिवसांनतर घाम येऊन ताप थोडा कमी होतो. परंतु वारंवार वाढत असतो. दहा अकरा दिवसांत तापाचा जोर कमी होतो. व साधारणपणें चौदा दिवसांत हा ताप निघतो.

**उपचार**—पोटांत नं. १।३ सुप्रभा व मधून मधून नं. २ व विषहारिणी द्यावें. कपाळावर सौदा० घड्या, यकृत व प्लीहा यांवर ३ ब योग० यांच्या घड्या घालाव्या.

## ३२२ संधिक सन्निपात ज्वर ( डेंग्यु )

**कारणें**—याची सांथ येते.

**मुख्य दूषिततत्त्व— पृथ्वी व तेज.**

**लक्षणें**—ताप येतो व सर्व सांधे धरतात. प्रथम एका सांध्यांत दुखूं लागतें. नंतर एका मागून एक किंवा सर्व सांधे एकदम दुखूं लागतात व

सुजतात. हालचाल करण्यास अडचण पडते. अशक्तपणा फार येतो. ताप गेल्यावरहि कित्येक दिवस सांधे दुखत राहतात व या रोगाच्या तीव्र वेदनांमुळें याला 'हाडमोड्या' ताप म्हणतात.

**उपचार**—पोटांत नं. ११३ योग० मधून मधून नं. २ व सुप्रभा द्यावें. कपाळ व छाती यांवर सौदा० घड्या घालाव्या. सांध्यांना चपलाविलयन लावावें.

## ३२३ स्नायुविक्षेप कंप (कोरिया.)

[ विशेषतः लहान मुलांचा हा रोग आहे. ]

**कारणें**—आमवात, रक्ताशयाचा विकार वगैरे कारणांनीं स्नायूवरील ज्ञानतंतूंचा ताबा कमी होऊन त्याचा कंप अगर अनिच्छित हालचाल सुरू होते.

### मुख्य दूषिततत्त्व—वायु व पृथ्वी.

**लक्षणें**— हातापायांना कंप, नाडीची गति वाढणें, मनोविकारांचें आकस्मिक उद्दीपन, अनिच्छितपणें शरीराचा एकादा भाग हालतो. सुरवातीला बहुतकरून चेहेऱ्याचे स्नायु हालूं लागतात. व मूल ताडाचे चाळे करतें असें वाटत. पुढें इतरहि अवयव बोटें, हात पाय वगैरे हालूं लागतात. स्थिरपणें उभें राहातां येत नाहीं. हात हालत राहिल्यास जेवणासहि अडचण पडते.

**उपचार**— पोटांत नं० ११४ व मधून मधून नं० २ द्यावा. सुप्रभेच्या घड्या रक्ताशयावर व सौदा० घड्या कपाळावर घालाव्या.

## ३२४ स्वप्नावस्था (वेट ड्रीम्स)

[ हा विकार मुख्यतः १६ ते ३० वर्षें वयाच्या तरुणांना होतो.]

**कारणें**-शृंगारिक कादंबऱ्या, नाटकें वगैरे वाङ्मय वाचणें, योग्य वयांत येण्यापूर्वी स्त्रीसंग करणें, कामुक विचारांचें प्राबल्य, कामुक विषयचिंतन व ध्यास, जागरणें, तेलकट, तळलेले व वातुळ पदार्थ खाणें, चहा फार पिणें, धूम्रपान वगैरे.

### मुख्य दूषिततत्त्व-- पृथ्वी व तेज.

**लक्षणें**—महिनापंधरा दिवसांनीं स्वप्नावस्था होणें याला विकार समज-

ण्याचें कारण नाहीं. परंतु आठवड्यांतून २।३ वेळां झाल्यास किंवा त्याहून जास्त वेळां झाल्यास विकार म्हणून उपचार करावे. निरुत्साह, अशक्तपणा, व खिन्नता वाटूं लागणें, डोळ्यांच्या पापण्या काळवडणें, चेहरा फिकट होणें, अग्निमांद्य वगैरे.

**उपचार**--पोटांत नं. १।३ योग० निरणावर योग० घड्या घालाव्या. निजण्यापूर्वी टाळूपासून शंखापर्यंत कोन, गळा सुद्धां सुप्रभा विलयन नें १।२ वेळां धुवावें. तसेंच शिस्न व वृषण यांनाहि तें विलयन लावावें.

## ३२५ सुषुम्नावरणदाह ( स्पायनल मोनेंजायटिस् )

[ पृष्ठवंश रज्जू ( सुषुम्ना ) हा मेंदूप्रमाणेंच तीन आवरणांनीं वेष्टित आहे. त्या आवरणाचा दाह या विकारांत होतो. ]

**कारणें**---पुष्कळ वेळां मेंदूच्या आवरणाचा दाह खालीं सरकून सुषुम्नेच्या आवरणाचा दाह होतो. इतर कांहीं सांधीचे विकारांतहि दाह होतो.

**मुख्य दूषिततत्त्व—वायु व जल.**

**लक्षणें**—थंडी वाजून ताप येणें, विकृतज्ञानतंतूसंबंधीचें स्नायू आंखडणें व वेदना होणें, धनुर्वाताप्रमाणें शरीर वाकणें, मलमूत्रांचा अवरोध, उरःस्तंभ वगैरे. याच्या चिरकारी विकारांत हीं बहुतेक सर्व लक्षणें असतात. विकार आस्ते आस्ते वाढत जातो.

**उपचार**—पोटांत नं. १।२।४ सुप्रभा; पाठीचा कणा, मानेची पोंढी व मस्तक यांवर सुप्रभा सौदा० घड्या आलटून पालटून घालाव्या.

## ३२६ स्वेद ( घाम ) विकार.

**कारणें**— त्वचेंतून नैसर्गिकपणें रक्तांतील बरींच विजातीय द्रव्यें बाहेर टाकलीं जातात. परंतु कोणत्याहि बिघाडामुळें मूत्रपिंड आपलें काम योग्यपणें करीतनासे झाले म्हणजे सहाजिकच घामाचे रूपानें विजातीय द्रव्यांचा निचरा सुरू होतो व फार घाम येऊं लागतो.

**मुख्य दूषिततत्त्व— जल.**

**लक्षणें**— वारंवार व फार घाम येणें व त्याला आंबूस, कुजकट घाण येणें. स्वाभाविक घामाहून जास्त दर्प किंवा घाण येईल तरच तो विकार समजावा. **उपचार**— पोटांत नं०२ व सुप्रभा देणें.

**पथ्य**— भरपूर पाणी पिणें; लघ्वीला होऊं लागतांच जाणें.

## ३२७ क्षय— राजयक्ष्मा— शोष. ( कन्झमूशन्. )

[ या विकाराला रोगांचा राजा म्हणतात, तें अगदीं अन्वर्थक आहे. नांवाप्रमाणें हा शरीरघटकांचा क्षय व ऱ्हास करीत असतो व ही क्रिया चालू असतांना नेहमींप्रमाणें नवीन शरीरघटक योग्य प्रमाणांत तयार होत नाहींत व सर्व शरीर रोगमय होऊन जातें. त्यामुळेंच हा विकार कष्टसाध्य किंवा असाध्य मानतात. याचे मुख्यतः दोन भेद पडतात. एक आशुकारि अथवा वेगवान ( गॅलपिंग कंझमशन् ) व दुसरा चिरंजी अथवा मंदगति व त्या प्रत्येकाचें स्थान व कारणपरत्वें चार भेद आहेत. १ आंत्रक्षय २ रक्तक्षय ३ कफक्षय ४ धातुक्षय. ]

## ३२८ आंत्रक्षय

**कारणें**—वेळीं अवेळीं पचनाला कठीण असे तळलेले, शिळे किंवा नासके पदार्थ वारंवार खाणें, अति थंड किंवा अति उष्ण पेयें वारंवार भलत्या वेळीं पिणें, अतिमद्यपान किंवा धूम्रपान, चहा, कॉफी वगैरेचा अतिरेक, वगैरे प्रकार होत असतांना जीवनशक्ति शक्यतोंवर त्यांचा दुष्परिणाम टाळण्यासाठीं, प्रयत्न करते व इतर ठिकाणचीही शक्ति एकवटून पचनक्रियेला आटोकाट मदत करिते. तेवढ्यानें न भागल्यास, केव्हा तरी जुलाब होणें, पोट दुखणें, फुगणें, अरुचि उत्पन्न करणें, वांति वगैरे प्रकारांनीं शरीररक्षणाचें कार्य तिला करावें लागतें. परंतु एकसारखे शरीराला अपायकारक असे वर सांगितलेले प्रकार होत गेले म्हणजे तिचा नाइलाज होतो व आंतडीं व आमाशय यांना दुर्बलता येते. अन्नपचनाचें काम नीट होत नाहीं; वसारस भरपूर बनत नाहीं. बनतो तोहि विजातीय द्रव्ययुक्त बनतो; वसाग्रंथी व वसावाहिन्या यांवर फाजील ताण पडून तींहि कमकुवत बनतात व उत्तरोत्तर रक्तादि सर्व रस व त्यांपासून बनणारे घटक निस्तेज व कमकुवत बनत जाऊन, शरीराची होणारी झीज भरून येत नाहींशी होते; त्यामुळें रक्त, वजन व उत्साह कमी होत जातात. या सर्व परंपरेला मूळ कारण आंतड्यांची व पचनशक्तीची दुर्बलता हें असतें म्हणून याला **आंत्रक्षय** म्हणतात.

## मुख्य दूषिततत्त्व— पृथ्वी

**लक्षणें**— क्षुधानाश, मळमळ, निरुत्साह, संग्रहणी, अतिसार, बद्ध कोष्ठ, आमांशासारखें मधून मधून शौचाला होणें, ९८॥ ते १००॥ पर्यंत सामान्यतः ताप, डोळ्यांची आग, खांदे गळल्यासारखे वाटणें, जिभेवर बुरशी, दिवसानुदिवस कृषता वाढणें वगैरे.

**उपचार**—पोटांत नं. १ हें मुख्य औषध आहे. त्याचे जोडीला ज्या तत्त्वाचे कार्यक्षेत्रांत जास्त बिघाड झाला असेल त्या तत्त्वाचें औषध जोडीला द्यावें. उदा० बऱ्याच रोग्यांचें यकृत व प्लीहा यांवर ताण पडून, तीं वाढतात, आकसतात अथवा सुजतात. म्हणून अशा वेळीं नं. ३ व योग० पोटांत द्यावें; व बाहेरून ३ ब व योग० यांच्या घड्या यकृत व प्लीहा यांवर घालाव्या बहुधा रक्ताभिसरणावर परिणाम झालेला असतोच म्हणून नं. २ व सुप्रभा हीं द्यावीं.

## ३२९ रक्तक्षय ( ॲनिमिया )

**कारणें**—याची कारणपरंपरा सामान्यतः आंत्रक्षयाप्रमाणेंच असते. परंतु यांत विशेषतः रक्तावर परिणाम होत असतो. रक्तातील रक्तगोलक कमी होऊन पांढरे गोलक वाढत जातात. अशुद्धाचें शुद्ध रक्त बनावें तसें बनत नाहीं. लोह असणारे पदार्थ खाण्यांत कमी असणें, अतिमद्यपान, रक्ताशयाची दुर्बलता, फार श्रम पडणें, एकसारखी काळजी, भय, शोक, मानसिक धक्का, ताज्या पालेभाज्या, फळें दूध वगैरेचा खाण्यांत अभाव; **स्त्रियांचें बाबतींत** या कारणाशिवाय बाळंतपणांत अतिरक्तस्राव, आर्तव दोष म्हणजे कमी अथवा अधिक स्राव–अनियमितपणा वगैरे. गरोदरपणीं जास्त पौष्टिक, सकस पदार्थांची आवश्यकता असते; परतु तसें अन्न न मिळतां निःसत्त्व आहार मिळणें हीं मुख्य कारणें असतात.

## मुख्य दूषिततत्त्व—जल

**लक्षणें**—हातापायांची, डोळ्यांची केव्हां आग तर केव्हां जास्त थंडपणा, बारीक ताप, डोळ्याच्या पापण्यांचा आंतील भाग व बुबुळांचा पांढरा भाग निस्तेज होणें, नखें निस्तेज व फटफटीत, आंगांत जागोजाग ठणकणें;

सांध्यांना रग लागणें, छातींत धडधडणें, डोळ्यांपुढें मधून मधून काळोखी येणें, गलबलल्यासारखें होणें, हिरिरीनें काम करावेसें वाटणें परंतु थोड्या कामानेंच अति थकवा येणें व गळल्यासारखें वाटणें, वगैरे.

**उपचार**—मुख्यतः पोटांत नं. २ व सुप्रभा; परंतु यांत बहुधा पृथ्वीतत्वाचाहि बिघाड असतोच म्हणून जोडीला नं. १ द्यावा. रक्ताशय व पाठीचा कणा यावर सुप्रभेच्या घड्या घालाव्या.

## ३३० कफक्षय ( थायसिस् )

**कारणें**—कारणपरंपरा सामान्यतः आंत्रक्षयांत वर्णन केलेल्याप्रमाणेंच असते. परंतु मुख्यतः वातुळ, तेलकट, भाजकट, कफकर पदार्थ वारंवार खाणें, अति धूम्रपान, फुप्फुसांची दुर्बलता, सदोष श्वसन, तोंडानें श्वासोच्छ्वास करणें, श्वासमार्गे फुप्फुसांत धुरळा, कोळशाचे कण, कापसाचे तंतू, इतर दूषित कण, धूर, घाणेरडे दर्प जाणें वगैरे गोष्टी वारवार होणें, क्षयरोग्याचा संसर्ग वगैरे प्रमुख कारणें असतात,

### मुख्य दूषिततत्त्व–वायु

**लक्षणें**—कफ, खोकला जास्त असणें, प्रथम कांहीं महिने सकाळीं थोडा कफ पडतो. पहिल्यापहिल्यानें कफ अगदीं फेंसासारखा पडतो. कफाला घाण येणें, फुप्फुसांचा दाह, त्यांत क्षतें पडणें, कफाबरोबर रक्त पडणें धाप लागणें, बरगड्या वर येणें अथवा चेपलेल्या दिसणें, हाडें दुखणें, तोंडाला खारटपणा, ताप वगैरे.

**उपचार**—पोटांत नं० ४ व ६ द्यावें व जोडीला नं० १।२ व सुप्रभा यांचाहि उपयोग करावा. कारण या विकारांत पृथ्वी व जलतत्त्व दूषित होतच असतात. बाहेरून छातीवर सुप्रभा सौदा० व कपाळावर सौदा० घड्या ठेवाव्या.

## ३३१ धातुक्षय.

**कारणें**— शुक्र ( वीर्य ) या धातूवर शरीराची कांति, बल व उत्साह अवलंबून असतात, त्याचा वारंवार अपव्यय होणें, स्वप्नांत वारंवार धातुपात होणें, एकसारखें कामुकविकारानीं मनस्वास्थ्य बिघडून, धातु पातळ व क्षीण होणें, अतिमैथुन, मुष्टिमैथुन, अनाचारी स्त्रीसंग वगैरेनीं शुक्र दुर्बल होतें

व त्यामुळें शरीरांतील बल, उत्साह व ओज कमी होत जाऊन रसक्रिया बिघडते. प्रथम प्रथम धातूंचा जो व्यय होत असतो, तो जीवनशक्तीकडून, अन्य ठिकाणच्या कार्यशक्तीपैकीं शक्ति खर्च करून, भरून काढला जातो. परंतु यांप्रमाणें वरचेवर होत जाऊन तेंहि अशक्य होत जातें व रसक्रिया व तिचें सामर्थ्य घटत, आटत जातें.

## मुख्य दूषिततत्त्व–पृथ्वी व तेज,

**लक्षणें**— वारंवार धातुपात होणें, मनांत कामुकभावना येतांच वीर्यपात, वीर्य पातळ व क्षीण होणें, निद्रानाश, मनाचा दुबळेपणा, डोळे खोल व निस्तेज, डोळयांच्या कडा काळवंडणें, गाल निस्तेज व फिक्कट दिसणें, अशक्तता वाढणें, अग्निमांद्य, प्लीहावृद्धि, ताप वगैरे.

**उपचार**— पोटांत नं० १।३ व सुप्रभा व मधून मधून नं० ४ देणें. चपला ज्योती० घडया काळीज व शिंपीपोट, ते नाभिप्रदेशापर्यंत व पाठीचा कणा यांवर घालाव्या. योग० विलयन उसेपोट (१७) कण्याचा खालचा मणका (२०) व माकडहाड यांवर लावावें. रात्रीं निजण्यापूर्वीं टाळूपासून शेंखापर्यंत कानसुद्धां सुप्रभा विलयनानें एकदोन वेळां चुवावे.

## ३३२ क्षयाचे इतर प्रकार.

क्षयाचे जंतु शरीराच्या कोणत्याहि दुर्बल भागांत प्रवेश करून त्या ठिकाणीं वाढतात. याप्रमाणें शरीराचे एकादे भागांत क्षयाच्या गांठी तयार होतात. हाडाला क्षय होतो व त्या ठिकाणाहून वाढत जाऊन सर्व शरीरभर तो आपला अमल बसवितो व ताप खोकला, अशक्तपणा वगैरे सर्व लक्षणें होऊं लागतात. या सर्वांवर उपचार वरीलपैकीं तारतम्यानें करावे. विशेषतः पोटांत नं. १।२ सुप्रभा व बाहेरून सुप्रभा हीं फार उपयुक्त ठरतात. क्षयाच्या कोणत्याहि प्रकारांत पाठीच्या कण्यावर चपला ज्योति० घडया मधून मधून घालणें चांगलें असतें.

## ' स्त्रियांचे विशिष्ट विकार '

### ३२३ आर्तवाधिक्य (विटाळ जास्त प्रमाणांत जाणें)

**कारणें**--अपचन, वसादोष, गर्भाशयाचा अशक्तपणा, रक्तांतील बिघाड वगैरे.

**मुख्य दूषिततत्त्व--पृथ्वी व जल**

**लक्षणें**--महिना पूर्ण होण्याचे पूर्वीच विटाळ जाणें, ८।१० दिवस सुरू राहणें व त्यामुळें अशक्तपणा येणें, छातींत धडधडणें, कमर व मांड्या दुखणें वगैरे.

**उपचार**--पोटांत नं. १।२ सुप्रभा.

### ३३४ आर्तवाभाव किंवा न्यूनार्तव

**कारणें**--रक्ताभिसरणाचा दोष, शरीराचे वरचे भागांत अभिसरण जास्त होऊन त्या मानानें खालचे भागांत कमी होणें, रक्तपित्त व त्यामुळें नाकांतून, उलटी होऊन किंवा मलामार्गे रक्त पडणें, आहारांत रक्तोत्पादक पदार्थांची कमतरता, पंडुरोग वगैरे.

**मुख्य दूषिततत्त्व--पृथ्वी व जल**

**लक्षणें**--सांधें धरणें, एकाद्या भागावर किंवा अंगास सूज येणें, गळूं, उठाणूं, हिरड्या सुजणें, छातींत धडधडणें, पाळीचे वेळीं नाकाचा घोणा फुटणें, वांतीनें, किंवा मलद्वारानें रक्त पडणें.

**उपचार**--पोटांत नं. १।२ सुप्रभा, रक्ताशय व पाठीचे कण्यावर सुप्रभा घड्या घालाव्या.

### ३३५ आर्तवशूळ,-विटाळशूळ,-कष्टार्तव-पीडितार्तव

**कारणें**--गर्भाशयांत दोष असतो. गर्भाशयाचा दाह, स्त्रीअंडांतील दोष, फलवाहिनीच्या मार्गांतील अडचण वगैरे.

**मुख्य दूषिततत्त्वें--पृथ्वी व जल.**

**लक्षणें**--विटाळ जाण्याचे वेळीं पोटांत अतिशय दुखतें, त्यामुळें जेवण-

खाणेहि सुचत नाहीं. विटाळ कमी जाण्याची तक्रार असते. उचक्या, ढेंकरा वगैरेहि लक्षणें असतात.

**उपचार**— पोटांत नं. १।२ सुप्रभा, निरणावर चपला घड्या. औषध कांहीं महिने सुरू ठेवावें लागतें. पहिल्या पाळीला थोडासा फरक पडून पुढें प्रत्येक पाळीला थोडा थोडा फरक पडत जाईल.

## ३३६ आंगावर दूध कमी किंवा जास्त येणें

**कारणें**-- पचनक्रियेंतील दोष, वसादोष, निरक्तता वगैरे.

**मुख्य दूषिततत्त्व-पृथ्वी**

**उपचार**— पोटांत नं. १ व योग० देणें. मधून मधून नं. २ द्यावा.

## ३३७ ताळू लागणें

**कारणें व लक्षणें**— मुलांची ताळू स्तनाला लागून त्यामुळें स्तनाला सूज येते व ताप येतो. स्तनांत गांठी लागतात. स्तनांतील दूध बिघडतें व पूमिश्रित दूध येतें. स्तनांत वेदना होतात.

**मुख्य दूषिततत्त्व-पृथ्वी.**

**उपचार**— पोटांत नं. १।२ सुप्रभा; बाहेरून चपला घड्या घालाव्या. स्तनांतून दूध वरचेवर पिळून टाकावें. मुलाला पिऊं देऊं नये. हें दूषित दूध मूल प्यालें असतां त्याला ताप येऊं लागतो.

## ३३८ थानपुळी

स्तनाला पुळी ( गळूं ) होते व ती फुटून त्यांतून रक्त व पू येतो.

**उपचार**—पोटांत नं० १।२ सुप्रभा व बाहेरून सुप्रभा व चपला यांच्या घड्या घालाव्या.

## ३३९ धुपणी-प्रदर

**कारणें**—गर्भाशयाचा दाह, अपचन, अतिश्रम, जागरणें, अति फिरणें, वसादोष वगैरे. हिचे दोन प्रकार असतात. तांबडी व पांढरी.

**मुख्य दूषिततत्त्व-पांढरी धुपणी-पृथ्वी.**

**तांबडी धुपणी-पृथ्वी व जल.**

**लक्षणें**—कमर व मांड्या दुखतात. डोळयांच्या पापण्या व बाजू यांवर काळेपणा येतो. अशक्तपणा येतो, या विकाराची उपेक्षा केल्यास बारीक ताप

वगैरे सुरू होऊन पुढें] रक्तक्षय होण्याचा संभव असतो. म्हणून वेळींच उपचार करावे.

**उपचार**--पांढरी धुपणी असतां पोटांत नं. १ सुप्रभा, तांबडी असतां, नं. १।२ सुप्रभा.

## ३४० नासावणें–गर्भपात

[ नासावणें म्हणजे अपूर्ण महिन्यांच्या गर्भाचें पतन. पहिल्या ३।४ महिन्यांत गर्भ पडला तर त्याला गर्भस्राव म्हणतात. चवथ्या महिन्यापासून सातव्या महिन्यापर्यंत गर्भ पडल्यास त्याला गर्भपात म्हणतात आणि त्याच्या पुढें नवव्या महिन्यापर्यंत गर्भ पडल्यास त्याला अपुरा जन्म म्हणतात. ]

**कारणें**—ह्याची पुष्कळ कारणें आहेत. शोक, हर्ष वगैरे तीव्र मानसिक विकार, अपघात, पोटांत वायूचा किंवा कृमींचा जोर, आमांश, कॉलरा, तीव्र ताप वगैरे विकार, स्त्री अशक्त असून गर्भाचें पोषण नीट न होणें, उपदंश वगैरे.

### मुख्य दूषिततत्त्व–पृथ्वी व जल

**उपचार**—रक्तस्राव सुरू झाला म्हणजे गर्भपात टळणें कठीण असतें. यावर नं. १।२ व सुप्रभा ४।४ गोळ्या १५।१५ मिनिटांनीं द्याव्या व वरचेवर पाणी पिण्यास द्यावें. तसेंच निरणावर योग० घड्या घालाव्या. गर्भपात टाळण्यासारखा असेल तर कांहीं तासांत वेदना कमी होऊन बरें वाटतें. नाहीं तर वेग फार वेळ न येतांच कमी त्रासानें गर्भपात होतो. गर्भपाताची खोडी असणाऱ्या स्त्रियांना गरोदरपणांत नं. १ नेहमीं सुरू ठेवावा. या योगानें गर्भाचें पोषण नीट होऊन गर्भपात टळतो. इतर आजार असेल तर त्यावर योग्य चिकित्सा करावी.

## ३४१ प्रसववेदना

प्रसूतीचे वेळीं प्रसववेदना होणें बंद होतें किंवा त्यांचा जोर कमी होतो. अशा वेळीं नं. १ व सुप्रभा प्रत्येकीं ८।१० गोळ्या घालून विलयन तयार करून ठेवावें व त्यांतील १।१ चमचाप्रमाणें दर १५।२० मिनिटांनीं द्यावें. पाणीहि वरचेवर द्यावें. त्यानें उपयोग न झाल्यास ४।४ प्रमाणें गोळ्या द्याव्या.

## ३४२ बाळंतरोग–सूतिकारोग–बाळंतताप

( बाळंत झाल्यानंतर कांहीं दिवसांनी या विकाराची सुरुवात होतें )

**कारणें**—आहारांतून पोषक द्रव्यांचा विशेषतः रक्तोत्पादक द्रव्यांचा अभाव हें मुख्य कारण असतें. बाळंतपणांत जास्त रक्तस्राव, अन्य आजारामुळें पूर्वींपासूनचा अशक्तपणा, योग्य काळजी घेतली न जाणें वगैरे.

**मुख्य दूषिततत्त्व–पृथ्वी व जल.**

**लक्षणें**–– अंग मोडून येणें, ज्वर, कंप, तहान, अंग जड होणें, सूज, विशेषतः हात पाय यांना असणें, पोटांत दुखणें, अतिसार हीं लक्षणें होऊन क्षीणता व फिकटपणा वाढत जाणें.

**उपचार**— पोटांत नं० १।२।३ व योग० देणें.

**पथ्य**–– दिवसांतून ५।६ वेळां थोडें थोडें दूध द्यावें. इतर आहारहि सात्त्विक असावा.

## ३४३ सल

[ गर्भाची वाढ थांबून गर्भ मूढ स्थितींत पोटांत राहातो व तो पडून न गेल्यानें त्रास होतो. ]

**कारणें** —स्त्री-पुरुषांच्या वयांत अतिशय फरक, डोहाळे न पुरविणें, आईबाप रोगट असणें वगैरे.

**मुख्य दूषिततत्त्व–– पृथ्वी.**

**लक्षणें**— गर्भाची वाढ थांबते, गर्भाशय पोचट व रिकामा लागतो. स्तनांची वाढ थांबते पोटांत जड भार लागूं लागतो. व पोट थंड लागतें. बेचैनपणा, थंडी वाजणें, केव्हां केव्हां घाणेरडा पिंवळा स्राव होणें वगैरे.

**उपचार**––पोटांत नं० १।२ योग देणें. कांहीं दिवसांत सलांत जीवनशक्ति असल्यास वाढ सुरू होते व नसल्यास लवकर पडून जातो.

## ३४४ गुरेंढोरें व इतर पाळीव जनावरें यांच्या रोगांवर उपाय

मनुष्यांप्रमाणेंच जनावरांसहि या औषधांचा उत्तम उपयोग होतो असा अनुभव आला आहे. जनावरांचे कांहीं रोग व उपाययोजना खालीं दिली आहे.

**औषधांचे प्रमाण मनुष्याच्या प्रमाणाचे** १० ते १२ पट या प्रमाणें समजावें. उदा० मनुष्यास प्रथमविलयन द्यावयाचें त्या वेळीं १५ तोळे पाण्यांत १ गोळी घालून करावयाचें त्याऐवजीं १० गोळ्या घालून करावें अथवा मनुष्यास ४ गोळया द्यावयाच्या असतील त्या ठिकाणीं जनावरास सुमारें ४० गोळ्या द्याव्या.

बाह्योपयोगाकरतां विद्युत्चें विलयन मनुष्याकरतां करावयाचे प्रमाणांतच करावें. जास्त गोळया घालण्याची गरज नाहीं.

## रोगांचीं लक्षणें व उपाय

**काळपुळी**-- ( धांवरें, फऱ्या, घाट्या, ओळंबे. )

जनावरास ताप भरतो, कंप सुटतो, तोंडाजवळ माशा येऊं लागतात, खांद्यावर व ढुंगणावर सूज येऊं लागते.

**उपचार**-- पोटांत नं. १।२ देणें. बाहेरून सुप्रभाविलयन लावावें. जनावर सुकत जातें, ढांस लागते, उठवत नाहींसें होतें. **उपचार** नं. १।२ देणें.

**नरडपेंव** ( घटसर्प, गालसुजी, गालगट्टू. )

ताप भरतो, कंप असतो, घशावर वाटोळी ताठ सूज असतें, लाळ गळत असते, सूज वाढत जाते. **उपचार**- पोटांत नं. १।२ द्यावें. टकलें, कणा व गळा यांस चपला-ज्योति० विलयन आळीपाळीनें लावावें.

**पायलाग**-( तोंडखुरी, काळब्यानी, मोत्राखर्वा) ताप भरतो, लाळ गळूं लागते, जनावर पाय आपटूं लागतें, पायांत तोंडांत फोड येतात. **उपचार**- पोटांत नं. १ देणें, बाहेरून सुप्रभाविलयन लावावें.

**फांशी**-( Anthrux पेय, सुझ्या, पेंव, लाख्या, गोळी )

नाकांतुन रक्तमिश्रित पाणी गळूं लागतें, पोट फुगतें, लघ्वी काळसर होते, घसा सुजतो, लाळ सुरू होते.

**उपचार**-पोटांत नं. १।२ देणें, बाहेरून सौदा० विलयन लावावें.

**फेपशा**-( प्लूरो न्यूमोनिया ) दम भरतो, श्वासोच्छ्वास कष्टानें होतो. हगवण लागते. **उपचार**-पोटांत नं. १।६ देणें, बाहेरून सौदा० विलयन वारंवार लावावें, अल्प प्रमाणांत एकादे वेळीं पोटांत द्यावें.

**फोडाळणें**—कण्याचे आंतील भागास फोड येतात. पोटांत नं. २ देणें.

**रक्तमूत्र**---पोटांत नं. ११२ सुप्रभा देणें.

**कुत्र्याचे मांजराचे केंस झडणें**—पोटांत नं. १, बाहेरून सुप्रभाविल-यन लावावें.

**पोपटाचे पंख झडणें**—पोटांत नं. ११४ देणें, बाहेरून सुप्रभाविल-यन लावावें.

---

# परिशिष्ट

## पोषक आहार

३४५ आपलें अस्तित्व दीर्घ काळ असावें ही मनुष्याची स्वाभाविक आकांक्षा असते. ती लोभमूलक असली तरी निसर्ग हेतुबद्ध आहे हें मागील मीमांसेवरून उघड दिसण्यासारखें आहे. मनुष्याची उत्पत्ति करितांनाच, जीवनशक्तीनें त्याच्या शरीरामध्यें, तें दीर्घकाल अस्तित्वांत राखण्याला योग्य व आवश्यक त्या सोयी मोठ्या चातुर्यानें व दक्षतेनें करून ठेविलेल्या असतात. शरीरघटकांशीं जीवनशक्तीचें तादात्म्य होतें व ती आत्मसंवर्धन करण्यासाठीं व प्रकृतिवैशिष्ट्य आणि आरोग्य टिकविण्यासाठीं, पंचमहाभूतांचीं पांच अंतःकरणें, पांच कार्यशक्ति व पंचप्राण, त्यांचीं कार्येंद्रियें व कार्यक्षेत्रें आणि त्यांच्या क्रियाव्यापारांची सुव्यवस्थित घटना करीत असते. जन्मानंतर वाढत्या घटनेसाठीं खाणें, पिणें, हवा वगैरेनीं पंचात्मक साहित्याची नित्य भर व्हावयास पाहिजे असते. तो पुरवठा करण्यासाठीं प्रयोगी मंडळाची ( मन व अहंकार ) पांच ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें यांसह योजना केलेली असते व त्यांच्या कर्तृत्वाला आवश्यक शक्तीचा पुरवठा आपल्या भांडारांतून ती

**जीवितहेतु व आपली जबाबदारी**

करीत असते. त्यानें आपली जबाबदारी लक्षांत घेऊन ती कामगिरी योग्य रीतीनें केली असतां, दैवी आपत्तीशिवाय जीविताला अकालीं अपाय होण्याचें कारण नाहीं. ही गोष्ट जीवितशास्त्रदृष्ट्या विचार केला असतां कोणाच्याहि ध्यानीं येण्यासारखी आहे. परंतु प्रयोगी मंडळाला बरेच वेळां मुख्यतः पुढील गोष्टींची जाणीव नाहींशी होते. आपल्याला अस्तित्वांत आणणारी, आपलें अस्तित्व अबाधित राखण्याचें कार्य अहर्निश अविश्रांतपणें करणारी आणि आपल्या जीविताचा आधार व आपल्या बाह्य कर्तृत्वाला सामर्थ्य देणारी कोणी दिव्यशक्ति आहे; तिच्यामुळें आपल्याला सुखादिकांचा आनंद उपभोगावयास मिळतो, यासाठीं तिच्या संवर्धनप्रमुख कार्याला सहाय्यक असें खाद्यपेयादि शक्तियुक्त साहित्य पुरविण्याची आपल्यावर जबाबदारी आहे व ती पार पाडली तरच सौख्य व आनंद फार काळ टिकेल. ही जाणीव नसल्यामुळें त्याच्याकडून तात्कालिक सुखदायक व प्रिय वाटणाऱ्या ऐच्छिक क्रिया केल्या जातात. ज्या वेळीं त्या जीवनशक्तीच्या कार्याला विरोधक व बाधक प्रकारच्या होतात, त्या वेळीं तिला अस्वाभाविक संरक्षणकार्य सुरू करावें लागतें. अशा वेळीं जीं लक्षणें होतात तीं विजातीय द्रव्यांचें प्रमाण व बाधकपणा यांचे मानानें सौम्य किंवा तीव्र दुःखदायक होतात, आणि हीं दुर्लक्षणें नष्ट करण्याच्या उपाययोजना करण्याचा प्रसंग येतो. म्हणून असा प्रसंग न येण्यासाठीं आपले नित्य निर्वाहक आहारविहार व आचारविचार आरोग्याला बाधक व जीविताला घातक न होतील असे नियमित व व्यवस्थित ठेविले पाहिजेत.

**युक्त आहार**

३४६ नित्य निर्वाहक साहित्य म्हणून पंचमहाभूतविशिष्ट अन्नादि द्रव्यांची शरीरांत जी भर घालावयास पाहिजे असेल तीः— १ शरीराच्या अंतर्बाह्य घटनेच्या संवर्धनाला उपयुक्त, २ अधिकाधिक सुदृढता प्राप्त होण्याला आवश्यक, ३ जीवनशक्तीच्या प्रकृतिवैशिष्ट्यानुसार वाढती घटना बनविण्याला लायक व सेंद्रियशक्तिसंपन्न व ४ शरीराची झीज भरून काढण्यालायक अशी पाहिजे ( परिच्छेद २५ पहा ). रसक्रियेनें पृथ्वीतत्त्वाचे घटक, जलतत्त्वाच्या संस्कारानें त्या तत्त्वाच्या रसांत, जलतत्त्वाचे घटक तेजतत्त्वाचे रसांत असे उत्तरोत्तर वरच्या सूक्ष्म तत्त्वांचे

रसांत संस्कार पावत जात असतात. पृथ्वीतत्त्वापासून वरील सूक्ष्म तत्त्वांतील घटनाशक्ति एकेका कलेनें जास्त असते. पृथ्वीतत्त्वाचे घटकांवर जलतत्त्वाचा संस्कार होत असतांना त्या पैकीं कांहीं घटक संस्काराला योग्य असे असतात ते जलतत्त्वांत उत्क्रान्त होतात व कांहीं दुर्बल ठरतात व त्यांवर संस्काराचा परिणाम होऊं शकत नाहीं. याप्रमाणें उत्तरोत्तर वरच्या तत्त्वांचे संस्कार होत असतांना घडत असतें. अशा वेळीं जे शक्तिहीन दुर्बल घटक असतात ते त्याज्य ठरतात. अशाच रीतीनें प्रत्येक तत्त्वांतील घटक त्याज्य होत असतात. ५ निसर्गाच्या जागतिक घडामोडीमुळें हवा, पाणि इत्यादि पदार्थ दूषित होतात. ते आपल्याला न कळत शरीरांत प्रविष्ट होऊन रोगोद्भवाला कारण होण्याचा संभव असतो. त्यांचा तात्काळ सहज रीतीनें परिहार करितां येण्या-इतकी रोगप्रतिबंधक शक्ति संग्रहित असणें आवश्यक असतें. त्यासाठींहि जविनशक्ति ही जास्तींतजास्त सामर्थ्यवान् राहील असेच पदार्थ आपले नित्य आहारांत असणें जरूर आहे.

**विश्रांति, निद्रा**

३४७ आकाश, वायु, व सूक्ष्मतेज ह्या सूक्ष्मधर्मी तत्त्वांच्या द्रव्यांचें ग्रहण (परिच्छेद ८७-९० पहा) करणें खरोखर कष्टाचें नसून जीवनशक्तिसंवर्ध-नाला फार उपयुक्त असतें. आकाशतत्त्वाचें ग्रहण म्हणजे मोकळ्या जागीं विश्रांति किंवा निद्रा घेण्यानें होत असतें. अशा मोकळ्या हवाशीर ठिकाणीं विश्रांति घेण्यांत तिन्ही सूक्ष्म तत्त्वांचें सहजीं संपादन होतें. आकाशतत्त्वाची तर भर होतेच, परंतु त्याच वेळीं वायु व तदाश्रित तेज यांचीहि भर होते. ह्या काळांत बाह्य ऐच्छिक क्रियांकडे होणारा शक्तीचा व्यय थांबतो व ती शिल्लक राहते व आकाशाची ५, वायूची ४, सूक्ष्मतेजाची १॥, कलात्मक अशी एकूण १०॥ कलात्मक ( १५ पैकीं ) शक्तीची भर पडते. आजारीपणांत विश्रांतिग्रहणाचा किती हितकर परिणाम होतो हें सर्वांना माहीतच आहे. निष्कारण गमती-खातर किंवा मनाच्या करमणुकीसाठीं शक्ति खर्च करण्यापेक्षां विश्रांति घेणें हितकर आहे.

३४८. घ्राणेंद्रिय हें जसें वायूचें ग्रहण व उत्सर्जन करण्याचें इंद्रिय आहे, त्याप्रमाणेंच स्पर्शेंद्रिय म्हणजेच त्वचा हेंहि रोमरंध्रांच्या द्वारा वायूचें ग्रहण

करून स्वेद, घाम वगैरे रूपानें मलद्रव्यांचें उत्सर्जन करीत असतें. मनुष्याला मूर्च्छा वगैरेसारख्या कारणांनीं श्वसनक्रियेला व्यत्यय येतो. अशा वेळीं अंग उघडें करून वारा घालण्याचा अनुकूल उपयोग होतो, ही गोष्ट पुष्कळांच्या परिचयाची आहे. त्वचा ही प्राणेंद्रियाच्या खालोखाल श्वसनकार्य करणारी आहे. हल्लीं कपड्यांनीं सर्व काळ आंग आच्छादून ठेवण्याची संभावितपणाची चाल पडलेली असल्यामुळें त्वगिंद्रियाकडून हें कार्य चांगल्या रीतीनें होऊं शकत नाहीं. उद्योगधंद्यासाठीं असें आच्छादित रहाणें अवश्य असलें तरी दिवसांतून शक्य तितका वेळ उघड्या आंगावर मोकळी हवा घेणें आणि त्या प्रमाणेंच भरपूर उजेड व शक्य तोंवर कांहीं वेळ आंगावर सूर्यकिरण येणें हिताचें आहे. त्या योगानें कांति, उमेद व ओज यांची वृद्धि होऊन शक्ति वाढते. तापट उघड्या जागेंतील आणि निवाऱ्याच्या व सावटाच्या कोंदट जागेंतील झाडें झुडपें यांमधील फरक लक्षांत घेतला असतां, उघडी हवा, उजेड व उन्ह यांचें महत्त्व चटकन पटण्यासारखें आहे. परंतु त्यांचा योग्य उपयोग होण्यासाठीं स्नानादि उपायांनीं त्वचा व रोमरंध्रें दररोज स्वच्छ व मोकळीं राखणें तितकेंच अगत्याचें आहे.

**हवा, सूर्यकिरण**

३४९. विश्रांति, हवा उजेड व उन्ह यांच्या सेवनानें सूक्ष्म तत्त्वांची भर होते, त्याप्रमाणेंच जडतत्त्वांची भर होण्यासाठीं खाद्यपेयविशिष्ट अशा अन्नपानादि पदार्थांचें सेवन करावें लागतें. जडापैकीं जल व सूक्ष्मापैकीं वायु त्या चरतत्त्वांच्या योगानें शरीरांतील रसक्रिया व प्राणक्रिया होत असतात. श्वसनाच्या योगानें एका क्षणाचीहि उसंत न घेतां (२४ तासांत २१६०० वेळां) शरीरामध्यें वायूची ये-जा चाललेली असते. या योगानें वायुतत्त्वाची जशी सतत भर पडत असते त्या प्रमाणेंच जलतत्त्वाचीहि भर पडत असणें अवश्य आहे. जुना वायु मलद्रव्यांसह उच्छ्वासानें बाहेर टाकणें व नवा तेजसंपन्न आंत घेणें हें कार्य जसें चालत असतें, त्याहून जलासंबंधींचा प्रकार त्याच्या जड धर्मानुसार थोडा निराळा आहे. जलाचें उत्सर्जन मलद्रव्यांसह घाम, स्वेद, मूत्र वगैरे रूपानें नियमित वेळानें होत असतें आणि त्याचें सेवनहि तसेंच नियमित वेळानें करावें लागतें. तहान लागणें, शोष पडणें, घसा सुकणें, तगता वाटणें, कासा-

**पाणी**

वीस किंवा हलकेपणा येणें, बेचैनपणा येणें इत्यादि लक्षणें जलाच्या सेवनाची आवश्यकतादर्शक असतात. जीवितक्रियांना जलाभावामुळें अडथळा येऊं लागला म्हणजे अशीं लक्षणें होतात व पाणी प्याल्याबरोबर हुषारी वाटते. पाणी बाधेल या भीतीनें पुष्कळ जणांना तहान मारण्याची संवय लागते. परंतु त्यामुळें रक्तादि रसांमध्यें, मलद्रव्यें संचित होऊन रहातात व तेंच पुढील आजाराचें कारण होत असतें.

३५० खाद्यपेय पदार्थांच्या द्वारा व प्रत्यक्ष पाणी पिणें ह्या रूपानें मनुष्यमात्राला सामान्यतः सहा ते आठ पौंडपर्यंत जलरूप द्रव्याची आवश्यकता असते. दररोज घाम, मूत्र वगैरे रूपानें इतका जलांश शरीराबाहेर उत्सर्जित होत असतो. म्हणून तितक्या प्रमाणांत पुन्हां त्याची भर होणें आवश्यक असतें. अन्नादिकांच्या द्वारा यापैकीं ४ ते ५ पौंडांची भर होत असते. राहिलेल्या २।३ पौंडाची भर प्रत्यक्ष पाणी पिण्यानें केली पाहिजे. खाद्य म्हणजे चर्वण करून खाण्याच्या पदार्थांचें पचन होण्यास निरनिराळे पाचक रस त्यांत मिसळावे लागत असतात. हे पदार्थ जितके रूक्ष व घट्ट (भाकरी, उसळ इ.) असतील तितके लाळ वगैरे रस जास्त व पातळ असावे लागतात. ते तसे योग्य व भरपूर प्रमाणांत तयार होण्यास भरपूर पाण्याची आवश्यकता असते. त्याप्रमाणेंच रक्तादि रसाचें अभिसरण होण्यायोग्य पातळपणा त्यामध्यें रहाण्यासाठींहि भरपूर पाणी पाहिजे असतें. त्याखेरीज शरीरभर पोषक द्रव्यें पोंचून उत्सर्जनीय द्रव्याचें उत्सर्जन होऊं शकत नाहीं. जेवणापूर्वी सुमारें अर्धा तास पाणी प्यावें. त्या योगें पचन चांगलें होतें. जेवणामध्यें पाणी पिण्याचें कारण नाहीं. कारण आमटी वगैरे पातळ पदार्थ आणि लाळ वगैरे पाचक रस एवढ्यानें हलक्या अन्नांचें सहज पचन होतें. त्यांत पाणी मिसळल्यानें पाचक रसांचा पाचकपणा कमी होतो व पचन नीट होत नाहीं. जडान्न किंवा शुष्क आहार असेल तर मात्र जेवतांना मधूनमधून पाणी पीत जावें. जेवणानंतर एका तासानें भरपूर पाणी पिणें उत्तम. पचावयाचा शिल्लक राहिलेला अन्नांश पचण्याला त्याचा फार उपयोग होतो.

**पाणी किती प्यावें व कां**

प्रकृतिभेदानुसार पाण्याची कमीअधिक आवश्यकता असते. शीत प्रकृतीच्या मनुष्याला पाणी फार लागत नाहीं. उष्ण प्रकृतीच्या मनुष्याला, पित्तप्रकृतीच्या मनुष्यांहून पाणी अधिक लागतें. वातप्रकृतीच्या मनुष्यांना ऋतुमानानुसार कमी अधिक लागतें. पावसाळ्यापेक्षां उन्हाळ्यांत पाणी अधिक पाहिजे. थंडीच्या दिवसांत गारठ्यामुळें तहान भासत नाहीं परंतु पाणी पिण्याची आवश्यकता असते. पाण्याची आवश्यकता असते त्या वेळीं घसा सुकतो.

३५१ अन्नाशिवाय नुसत्या पाण्यावर मनुष्य कित्येक दिवस जगूं शकतो. परंतु पाण्याशिवाय फार दिवस जगणार नाहीं. आजारी स्थितींत तर मलद्रव्यांच्या उत्सर्जनासाठीं पाणी वरचेवर भरपूर पिण्याची फार आवश्यकता असते. लघ्वीला नेहमीप्रमाणें किंवा अधिक प्रमाणांत भरपूर व स्वच्छ होईल इतक्या प्रमाणांत पाणी मिळत गेलें असतां दुसरा कांहीं उपद्रव न होतां रोगी लवकर सुधारत जातो व शक्ति टिकून राहते.

**पाण्याची जरुरी**

३५२ अन्नादि पदार्थ शिजविण्यासाठीं व पिण्यासाठीं जें पाणी घ्यावयाचें तें शक्य तितकें निर्दोष व शुद्ध असलें पाहिजे. झऱ्याचें किंवा उघडया व्रिन सांवटळ जागेंतून वाहणारें किंवा नित्य उपसा होत असलेल्या विहिरीचें ताजें गाळून घेतलेलें पाणी उत्तम होय. निसर्गदत्त शुद्ध ताजें पाणी आरोग्यदायक असतें. पाणी उकळून पिणें चांगलें अशी पुष्कळांची समजूत आहे. परंतु तें उकळल्यानें त्याची स्वाभाविक चव नष्ट होऊन तें बेचव होतें. त्याच्यामध्यें पित्तकरपणा उत्पन्न होऊन मलावष्टंभ करण्याचा धर्म उत्पन्न होतो. पाण्याचा अष्टमांश काढा करून घेतला असतां मळाची खडी बनते. सांथीचे आजार सुरू असतां मात्र तें आदल्या दिवशीं उकळून ठेवावें. थंड झाल्यावर त्यांत थोडी तुरटी ( २५।३० पौंडांना १ गुंज ) टाकावी म्हणजे सर्व गाळ तळाशीं बसतो व नंतर दुसऱ्या दिवशीं तें चांगलें गाळून घ्यावें. डॉ. भडकमकर हे आपल्या “ **आरोग्य** ” पुस्तकांत लिहितात, “ पाण्यांत क्षार व प्राणवायु वगैरे पदार्थ विरघळलेले असतात. ते आरोग्यवर्धक असतात व पाणी तापविल्यानें ते नाहींसे होतात. सबब नेहमींच पाणी

**पिण्याचें पाणी कसें वापरावें**

तापवून पिणें इष्ट नाहीं. जेथें पाण्याच्या शुद्धतेची खात्री नसेल तेथें तें गाळून प्यावें अगर फिल्टर करावें पण उकळूं नये. ”

**इतर पेय पदार्थ**

३५३ याप्रमाणें जलतत्त्वाची भर करावयाची ती मुख्यतः शुद्ध पाण्यानेंच करणें उत्तम होय. चहा, कॉफी वगैरे उत्तेजक पेयें तसेंच सोडा लेमन वगैरे पेयें हीं घेतांना कितीहि चांगलीं लागलीं तरी निःसंशय अहितकारक असतात. शरीरपोषणाला व धारणाला दुधासारखी अमोलिक वस्तु नाहीं. यासाठीं वरील पेयांचेऐवजीं दूध अगर ताक पिणें हें फार श्रेयस्कर आहे. तसेंच ऋतुमानाप्रमाणें तयार होणारीं रसपूर्ण ताजीं फळें संत्रा, पपनस, मोसंबी, द्राक्षें, जांभूळ, करवंदे, कालिंगड वगैरे शक्य तितकीं खाणें हितावह आहे. शाळयाचें पाणी, उसाचा ताजा रस यासारखीं निसर्गदत्त पेयें अत्यंत जीवनशक्तियुक्त असून हितकर असतात.

**आहारविषयक दिग्दर्शन**

३५४ शरीराची सर्व जड घटना पृथ्वीतत्त्वाविशिष्ट द्रव्यांच्या योगानेंच मुख्यतः व्हावयाची असते. म्हणून त्या तत्त्वाचे खाद्य पदार्थ हाच मुख्य आहार होय. हा आहार घटनासाहित्ययुक्त आणि घटनाशक्तियुक्त असावयास पाहिजे. उद्भिज सृष्टि म्हणजे वनस्पतिसृष्टि हें जीवसृष्टीचें पोषक व संवर्धक असें नैसर्गिक अन्न आहे. परंतु प्रकृतिवैशिष्ट्यानुरूप कोणाला कोणता आहार योग्य होईल हें अनुभवानें ठरविणें आवश्यक आहे. शास्त्र म्हणून कितीहि योग्य मीमांसा केली तरी ज्यानें त्यानें आपल्याला कोणता आहार पोषक व हितकर होतो आणि कोणता बाधक होतो हें लक्षांत घेऊन वागलें पाहिजे.

**योग्य आहाराची निवड**

३५५ मनुष्यांतील प्रकृतिभेदाप्रमाणें त्यांचें जसें वर्गीकरण करतां येतें तसेंच उद्भिज्जांचें स्वरूप, गुण, रस वगैरे वरून पंचात्मक वर्गीकरण ठोकळ मानानें ठरवितां येतें व त्याचे जोडीला अनुभवाचा उपयोग करून आपणांला कोणता पदार्थ पोषक, सजातीय व हितावह होतो हें पाहून त्या प्रमाणें आहार ठेवणें फारसें कठीण नाहीं. जनावरें रानांत चरत असतांना कांहीं वनस्पतींना तोंडहि लावीत नाहींत व निसर्गदत्त प्रेरणेनें सजातीय

आहार घेतात व विजातीय वर्ज्य करितात. चुकून एकादि विजातीय वनस्पति इतरांबरोबर पोटांत गेलीच तर स्वंय करितांना ताबडतोब थुंकून टाकून देत असतात. माणसाच्या कृत्रिम रहाणीमुळें अशा नैसर्गिक प्रवृत्ति बऱ्याच अंशीं नाहीशा होत असतात. यासाठीं अनुभव व समयज्ञतेनेंच आपणाला योग्य आहार कोणता तें ठरवावें लागतें. मागें प्रकृतिभेदाचें विवेचन करितांना कोणत्या प्रकृतीला कोणता आहार युक्त होईल, त्याचें दिग्दर्शन केलेंच आहे. एकदल, द्विदल धान्यें, कांहीं वनस्पतींचीं फळें, कांहींचीं मुळें, फुलें, पानें, कांहींच्या पानांसह कोंवळ्या फांद्या, कांहीं कंद हीं आपण आहारांत उपयोगांत आणीत असतों. हे सर्व पदार्थ सर्वत्रच सारखे व उत्तम होतात असें नाहीं. जमीन, पाणी, हवामान यांच्या भिन्नतेनुसार त्यांची निपज होत असते. निरनिराळ्या देशांत किंवा प्रदेशांत उत्पन्न होणाऱ्या आहारोपयुक्त पदार्थांच्या सेवनानें तत्तद्देशीय रहिवासी आपला चरितार्थ चालवीत असतात. अशी पिढीजात संवय लागलेली असल्यामुळें त्या त्या प्रदेशांतील संततीला आनुवंशिक धर्मानें तोच आहार हितकर होतो.

**सर्वांगपूर्ण आहार**

३५६ आहार पाचकरस सहा प्रकारचे असतात. अन्नहि अर्थात् षड्रस, युक्त पाहिजे असा निसर्गच दिसतो. गोड, आंबट, खारट, कडू, तिखट, तुरट, असे हे षड्रस आहारमध्यें योग्य प्रमाणांत एकत्र झाले असतां पदार्थांचा स्वाद व रुचि तृप्तिदायक होते. ह्यापैकीं एकाद्या रसाचें न्यूनाधिक्य झालें तर पदार्थ बेचव लागतो व कित्येकदां खाववत नाहीं. षड्रसांपैकीं कडू व तुरट रसांचें प्रमाण कमी असावें लागतें. धान्यें, फळें इत्यादिकांच्या बाह्य त्वचेंत बहुधा तुरटपणा असतो व तेवढा पुरेसा असतो आणि त्याची शरीराला जरूरी असते, म्हणून तो टाकून देऊं नये. आंबा, पेरू, मोसंबे वगैरे कांहीं फळें स्वाभाविकच गोड किंवा रुचकर असतात. परंतु कांहींना रुचि येण्यासाठीं मीठ, तिखट इत्यादि दुसऱ्या रसांची जोड द्यावी लागते. कांहीं जात्या उग्र किंवा बेचव असतात. परंतु भाजल्यानें किंवा शिजविल्यानें गोड किंवा रुचकर होतात. धान्यें व कडदणें, त्यांपैकीं तांदूळ हे शिजवून व इतर एकदल धान्यें दळून, त्यांच्या पिठाचे भाकरी इत्यादि पदार्थ केल्याशिवाय खाण्यायोग्य होत नाहींत.

परंतु असें करतांना त्यांचा कोंडा फुकट घालवूं नये. त्यांमध्यें जीवनसत्त्वें असतात आणि तांदूळ जास्त सडल्यानें शुभ्र दिसले तरी कोंडा फुकट जाण्यानें पोषणदृष्ट्या त्याचें मूल्य कमी होत असतें. म्हणून तांदूळ, गहूं वगैरेचा कोंडा शक्य तितका खाण्यामध्यें आणावा. कडदणांपैकीं हरभरा मूग, इत्यादि धान्यें डाळ करण्यापेक्षां सर्वच शिजवून त्यांत मीठ, तिखट इत्यादि दुसरीं रसद्रव्यें घालून खाणें जास्त चांगलें. त्याप्रमाणेंच पालेभाज्या, फळ, मूळ, कंद इत्यादि पदार्थांपैकीं बरेच पदार्थ शिजवावे व रसमिश्रित करावे लागतात. परंतु तसें करितांना अगदीं जरूरीपुरतेंच बेताचें शिजवावे. फार शिजल्यानें त्यांतील जीवनसत्त्वांश नाहींसा होतो. ह्या पदार्थांपैकीं हिरवे खातां येण्यासारखे असतील ते शक्य तोंवर हिरवेच खावे. चटणी, कोशिं-बीर वगैरे रूपानें असे हिरवे पदार्थ खाणें जास्त हितकर आहे. भाजीपाला वगैरे तयार करितांना मुख्य दृष्टि निरनिराळ्या रसांची उणीव राहूं नये एव-ढीच ठेवावी. मसाले वगैरे उत्तेजक व केवळ जिव्हालौल्य पुरविणारे पदार्थ वारंवार खाणें इष्ट नाहीं.

३५७ आहार हा शरीरघटना, सुदृढता, जोरदार जीवनशक्ति आणि आरोग्य राहण्यासाठीं पाहिजे असतो. म्हणून आहारांतील पदार्थ घटना-साहित्य युक्त आणि जीवनशक्तियुक्त असावे लागतात. जीं धान्यें रुजत घातलीं असतां रुजत नाहींत त्यांमधील जीवन-शक्ति नष्ट झालेली असते. अशा प्रकारचीं जुनीं, कीड लागून नासलेलीं, सडलेलीं धान्यें केव्हांहि खाणें हितकर नाहीं. भाजी, फळें, वगैरे पदार्थहि असेच ताजे, रसभरित, न सुकलेले, न नासलेले उपयोगांत आणिले पाहिजेत. मोड येण्यानें पदार्थांतील जीवनशक्ति व घटना-संवर्धक शक्ति जागृत होत असते. यासाठीं कडधान्यें वगैरेंना मोड आणून त्यांचा भाजीपाल्यांत उपयोग करणें जास्त चांगलें. धान्य भाजून त्याच्या उसळी वगैरे करण्यापेक्षां मोड आणून करणें जास्त हितावह असतें.

**आहार जीवनशक्ति-युक्त**

३५८ प्रत्येक आहारोपयोगी पदार्थ जरी पंचात्मक असला तरी त्यामध्यें

सहाही रस मानवी सृष्टिपोषक अशा योग्य प्रमाणांतच असतात असें नाहीं.

**षड्रस**

कांहींमध्यें एकाचें तर कांहींमध्यें दोहोंचें व कांहींमध्यें तिहींचें आधिक्य असतें. परंतु तेंहि योग्य प्रमाणांतच असतें असें नाहीं. म्हणून असे पदार्थ न्यून असलेल्या रसाच्या मिश्रणानें रुचकर करून घेतले पाहिजेत. आहारामध्यें एकाद्या रसाचें आधिक्य झालें असल्यास कांहीं दिवस त्या रसाचा वीट येतो आणि न्यूनत्व झालें असल्यास तो रस अधिक प्रमाणांत सेवन करण्याची आवश्यकता भासूं लागते. विवाक्षित रसाची आवश्यकता असणें व चटक यांतील फरक जिव्हा-लौल्यामुळें चटकन् लक्षांत येत नसला तरी बारकाईनें लक्ष ठेवल्यास तो समजूं लागेल. मात्र त्या दृष्टीनें विचार केला पाहिजे. सारांश, आहार हा सहाहि रसांची योग्य प्रमाणांत भर होईल असा सर्वांगपूर्ण असला पाहिजे.

२५९ आहारोपयोगी पदार्थ शिजवितांना ते उघडे न घेण्याची योग्य खबरदारी घेतली पाहिजे. कारण ते शिजत असतांना उष्णतेच्या योगानें त्यांतील

**खाद्य पदार्थ शिजवून अगर कच्चे खाणें**

जलांशांची वाफ होत असते व ती पदार्थ उघडा असेल तर हवेंत मिसळून जाते; पदार्थामधील सूक्ष्म-तत्त्वविशिष्ट द्रव्यें हींच मुख्यतः शक्तियुक्त व शक्ति-दायक असतात व तीं सूक्ष्मत्वामुळें वाफेमध्यें मिस-ळून उडून जातात. त्यामुळें मुख्य उपयुक्त द्रव्यें तींच पदार्थांतून नाहींशीं होतात. यासाठीं पदार्थावर झांकण ठेवून तो शिज-वावा, विस्तव मंद ठेवावा, आणि शिजल्यावर कांहीं वेळ तो झांकणासह त्यांतील वाफ जिरण्यासाठीं उतरून ठेवावा. फळें, मुळें, कंद इत्यादि जे पदार्थ सबंद, मुभिरांत किंवा मंद विस्तवांत भाजून घेऊन खाण्याकडे उप-योगांत आणितां येण्यासारखे असतील ते तसे भाजून घ्यावे. ह्या योगानें त्यांतील सूक्ष्मद्रव्यें पचनयोग्य होऊन उडून जात नाहींत. न शिजवितां किंवा न भाजतां खातां येण्यासारखें पदार्थ तसेच खाणें उत्तम. नैसर्गिक स्थितींत फळें अगर कंद खाण्याची थोडे दिवस संवय करावी म्हणजे त्यांतील खरा स्वाद कळूं लागतो. खाद्यपदार्थांपैकीं शक्य तितके निसर्गसिद्ध स्थितींत खाण्याची संवय केल्यानें त्यांतील थोडाहि जीवनसत्त्वांश नष्ट होत नाहीं.

३६०. आपली आर्यांची प्राचीन आहाराची पद्धति अशीच तात्त्विक विचारदृष्ट्या ठरविलेली होती. उपयुक्ततेलाच त्या पद्धतीमध्यें अधिक महत्त्व दिलेलें आहे. ही पद्धति जुनी असली तरी आजहि ती नवी करून उपयोगांत आणणें हिताचें आहे. ह्या पद्धतीमध्यें १ भात, वरण, भाज्या, उसळी वगैरे कांहीं शिजविलेले पदार्थ; २ फळें, मुळें, कंद इत्यादि भाजून त्यांचे भरीत वगैरे केलेले पदार्थ; ३ वांटून तयार केलेल्या चटण्या आणि ४ बारिक चिरून तयार केलेल्या कोशिंबिरी हे प्रकार मुख्यतः येतात. षड्सांप्रमाणेंच स्नेहविशिष्ट पदार्थांची आहारामध्यें आवश्यकता असते. ती उणीव भरून काढण्यासाठीं भाजी वगैरे पदार्थांमध्यें फोडणीच्या रूपानें अल्पप्रमाणांत तेल मिसळण्याची आणि भात, भाकरी इत्यादि पदार्थांबरोबर तूप सेवन करण्याची चाल पडली आहे. भरीत, कोशिंबीर ह्यामध्यें दहीं मिसळण्याची चाल आहे तीहि उपयुक्त म्हणूनच पडलेली आहे. मनुष्याला दूध पिणें, जेवणामध्यें दही, ताक इत्यादि मिळून निदान एक पौंड दुधाचे पदार्थ सेवन केले जाणें हिताचें आहे. मनुष्याचा दूध हाच पहिला व उपजत आहार असतो. दुधाच्या दुर्भिक्षतेमुळें, तें पिण्याची संवय नाहींशी झाली असल्यामुळें एकादेच वेळीं प्यालें तर कांहीं तरी विकार झालेला आढळतो. त्यामुळें तें बाधक समजण्यांत येतें. परंतु ४।६ दिवस थोडेंथोडें पिण्याची संवय केली म्हणजे तेंच पोषक होऊं लागतें. लहान मुलांना अन्न सुरू केले असलें तरी दूध दिवसांतून निदान २।३ वेळां तरी देणें हिताचें असतें. त्याप्रमाणें वृद्ध माणसांना धान्यादिकांचें पदार्थ दातांच्या दौर्बल्यामुळें पचत नाहींत. त्यांना दूध अवश्य दिलें पाहिजे. त्याप्रमाणेंच आजारी माणसाला दुधाशिवाय पोषक व पचनास हलका दुसरा पदार्थ म्हणजे कांजी वगैरे कृत्रिमपणानें तयार करावा लागतो. दूध निसर्गसिद्ध पोषक असतें आणि बेतशीर तापवून साय काढून दिलें असतां तें उपयुक्त होतें. अगदीं ताजें काढलेलें निरसें दूध ताबडतोब फक्त गाळून पिणें हें उत्तम होय. मनुष्याला आहारामध्यें स्निग्ध पदार्थांची आवश्यकता असते. त्यासाठीं तेलापेक्षांहि तूप, लोणी हे दुभत्याचे पदार्थ अन्नाबरोबर खाणें चांगलें. आनुवंशिक मांसाहारी लोकांना सुद्धां

**प्राचीन आहार पद्धति**

धान्यादि आहाराची आवश्यकता असतेच. त्यांनीहि वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें व मानवतील ते आहार अनुभवानें निश्चित करावे.

**निसत्त्व आहार**

३६१ थालीपीठ, चुरमुरे, चिवडा, भजीं इत्यादि दोनदां भाजलेले, खमंग तळलेले पदार्थ दुसऱ्या रसमय पदार्थांच्या मिश्रणानें चविष्ट केलेले म्हणून प्रिय वाटतात. परंतु त्यांतील सूक्ष्म व जड पिष्टमय द्रव्येंहि दग्ध होऊन ते पदार्थ निःसत्व झालेले असतात. ते खाणे केव्हांहि इष्ट नाहीं. असे पदार्थ आणि त्याप्रमाणेंच शिळे, आंबवलेलें, बुरशी आलेले, दुर्गंध येऊं लागलेले, उघडे राहिलेले पदार्थ बाधक असतात.

**आहार व प्रकृति धर्म**

३६२ मनुष्याला आहारोपयोगी ठरलेले पदार्थ सर्वांनाच एकसारखेच मानवतात असें नाहीं. निसर्गसिद्ध तत्त्वाधिक्यवैशिष्ट्यानुसार त्यांच्यामध्यें गुणभिन्नत्व असतें. तांदूळ, तुरीची डाळ, मूग कुळीथ इत्यादि पदार्थ कांहीं सामान्यतः सर्वांना मानवतात. प्रकृतिवैशिष्ट्यानुसार आपल्याला मानवणारे पदार्थ सेवन करणें चांगलें. धान्य, फळें, भाजीपाला इत्यादि कोणत्या प्रकृतीला कोणते पदार्थ मानवण्यासारखे आहेत तें प्रत्येकानें स्वतः-करतां अनुभवानें ठरविणें हेंच योग्य होय.

**आहार—मितप्रमाण**

३६३ आहाराबद्दल विशेष नियम ठेवावा तो **मिताहाराचा** पोटांत समावतें म्हणून खाणें केव्हांही अनिष्ट. जेवल्यानंतर ग्लानि येईल इतकें केव्हांहि खाऊं नये. अन्न जास्त खाल्ल्यानें जितका अपाय होतो व आजाऱ्यांची संख्या वाढलेली दिसते, तितकी कमी खाल्ल्यानें केव्हांच दिसत नाहीं. तसेंच खाणें तें पूर्ण चर्वण करून खात जावें म्हणजे लालारस योग्य प्रकारें अन्नांत मिसळून पचन उत्तम होतें. दातांचा चर्वणा-साठीं पूर्ण उपयोग करावा. म्हणजे दांत मजबूत राहातातच व कोठ्यावरहि पचनासाठीं फाजील ताण पडत नाहीं. जास्त चर्वणानें केव्हांच अपाय होत नाहीं. कमी चर्वण झाल्यानें मात्र तावडतोब दिसला नाहीं तरी अपाय होतोच, हें लक्षांत ठेवावें.

२६४ आजारीपणा म्हणजे जीवनशक्तीचें संरक्षणकार्य आहे. हें पटल्यानंतर आजाऱ्याचा आहार कसा असावा याबद्दल फार अडचण पडत नाहीं.

**आजाऱ्याचा आहार**

बऱ्याच विकारांत जिभेला बुरशी व अरुचि येत असते व खाण्यावर वासना नसते. फक्त तहान लागते अशा वेळीं पाणी मुबलक प्यावें. खाण्याची वासना नसणें याचाच अर्थ जीवनशक्तीची न खाण्याबद्दलची आज्ञा होय म्हणून न खाणेंच इष्ट. थोडीशी वासना गेल्यास त्या वेळीं आपल्या नित्य आहारांतलेच पदार्थ अत्यंत अल्प प्रमाणांत खावे. जे पदार्थ आपण चांगल्या आरोग्यांतहि खात नाहीं, ते आजारीपणांत खाणें हितकर नाहीं. साबूदाणा, आरारूट वगैरेची लापशी खाण्यापेक्षां नित्याच्या खाण्याच्या तांदुळाची कांजीच जास्त हितावह असते. मोसंब्याचा रस आजारी माणसाला अहितकारक नसला तरी त्याची जरूरी काय ? विशेषतः गरीबांनीं त्यावर सामर्थ्याहून अवास्तव जास्त खर्च करून तशा फळांचे रस हेच आजाऱ्याला चांगलें अन्न मानणें हें चूक आहे. त्याहून नित्य पदार्थांपैकीं तांदुळाची किंवा गव्हाची पातळ पेज, भाजीपाल्यांचें पाणी, बेताचे प्रमाणांत दूध अगर ताजें ताकहि खरोखर इष्ट व हितावह होतात.

नुसतें दूध, नुसतें ताक वगैरे पदार्थ केवळ पथ्य म्हणून घेण्याचें कांहींच कारण नाहीं. त्यांपासून खरोखर फायदा होत नाहीं· एकादे रोग्याला तो झाल्यासारखा वाटतो, परंतु तो त्याला अल्पाहाराची आवश्यकता असल्यामुळेंच होत असतो. वारंवार प्यालेलें दूध, ताक वगैरे पचविण्यांत जीवनशक्तीचा कांहीं तरी व्ययच होतो. त्याहून हे पदार्थ अल्प प्रमाणांत व इतर नित्याचे पदार्थ अल्प प्रमाणांत घेणेंच जास्त हिताचें आहे.

आमांश, कॉलरा, टॉयफॉईड वगैरे ज्या विकारांत आंतड्यांवरच फार परिणाम घडत असतो अशा विकारांत मात्र केवळ प्रवाही असेच पदार्थ द्यावे. उदाहरणार्थ कांजी देणें, तीहि चांगली गाळून अगदीं पातळ अशीच द्यावी. अशा विकारांत नित्याचें अन्नांतील म्हणून थोडा भात अगर थोडी भाकरी खाणेंहि अत्यंत अनिष्ट व घातुक होईल.

**आजाऱ्याला पौष्टिक (टॉनिक)**

३६५ आजारांतून बरा होत असतांना नेहमींहून भिन्न असा कांहींहि आहार देण्याची गरज नाहीं. जीवन शक्तीकडून आजाराच्या रूपानें विजातीय द्रव्यें बाहेर टाकलीं गेली म्हणजे हळुहळु ताकद वाढतच जाते व लौकरच पूर्ववत् निरोगी स्थिती प्राप्त होतें. संजीवन चिकित्सा पद्धतीचीं औषधें चालू असतां मागाहून टॉनिक देणेची आवश्यकता भासत नाहीं. तथापि अनेक लोक या बाबतींत टॉनिक पदार्थोंची विचारणा करतात. म्हणून त्यासाठीं आमचे पद्धतीचें नियमानुसार १।२ सुचवीत आहों. हीं अगदीं अनुभवसिद्ध व गुणकारी आहेत.

८।१० उत्तम भातगोटे भिजत घालावे १ दिवसानंतर ते चांगले वांटून पाण्यांत अगर दुधांत मिसळून चांगले फडक्यावर गाळून घ्यावे म्हणजे फरळें आंत जाणार नाहींत. त्यानंतर अगदीं मंदाग्नीवर थोडा वेळ शिजवून चवीसाठीं थोडी साखर घालून ती खीर घ्यावी. जास्त दाणे घालणें हितावह होत नाहीं. अंकुर फुटूं लागणारे थोडे दाण्यांनीच चांगले कार्य घडतें. शिजवितांना उकळूं देऊं नये.

वरील प्रमाणेंच गव्हाचे ८।१० दाणे भिजत घालून खीर करावी. मात्र त्याचीं टरफलें शक्य तितकीं वांटून एकजीव करून घ्यावीं. हीं पोटांत गेलीं तरी अपाय होत नाहीं; म्हणून गाळण्याची गरज नाहीं. जोंधळ्याचीहि वरील प्रमाणेंच खीर घ्यावी.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ........

# जीवितशास्त्र व संजीवन-चिकित्सापद्धति.

## सूची


| शब्द | परिच्छेद |
|---|---|
| अग्निमांद्य | २०६ |
| अंग येणें | २२३ |
| अंजायना पेक्टोरिस | ३११ |
| अजीर्ण ( तीव्र ) | २०७ |
| अंडवृद्धि | २०८ |
| अंतर्गळ | २१० |
| अतिसार | २०९ |
| अतींद्रियशक्ति | २४ |
| अतींद्रियशक्ति व तिचें सामर्थ्य | १८ |
| अदृश्य अनिच्छित क्रिया | ३ |
| अदृश्य व सूक्ष्म घटना | २२ |
| अर्धशिशी | २११ |
| अर्धांगवात | २१२ |
| अनिच्छिताक्रिया | ५;३ |
| ॲनिमिया | ३२९ |
| अन्नरस, पृथ्वी तत्त्वावर जलतत्त्वाचा संस्कार | ४७ |
| अनंतगुणसंपन्न पण एकरूप | १४ |
| अनंतविधता | १४ |
| अनेक विकार व त्यांचीं नांवें | २०१ |
| अनेक विकार, प्रास्ताविक | २०० |
| अपतंत्रक | २१३ |

| शब्द | परिच्छेद |
|---|---|
| अपतानक | २१३ अ |
| अपस्मार | २१४ |
| अपान व त्याचें कार्य | ७२ |
| अपान, पृथ्वी तत्त्वाचा प्राण | ७२ |
| अपान, प्राणशक्तिविशिष्ट | १५५ |
| अपेंडिसायटिस् | २२६ |
| ॲब्डॉमिनल मिडिया-स्टायनल टयूमर्स | २६३ |
| अर्बुदें | २१५ |
| अयोग्य औषधाची कारणमीमांसा | १९८ |
| अरुचि | २१६ |
| अरोचक | २१६ |
| अलर्क विष बाधा | २१७ |
| अल्ब्यूमिन्यूरिया | ३१५ |
| अल्सर | ३१४ |
| अव्यक्तत्व | १० |
| अवष्टंभ | २१८ |
| अविलंबी क्रिया | ११६ |
| अशक्तता | २१९ |
| अर्श | ३०४ |
| अशुद्धरक्त, तेजतत्त्व | ५७ |
| अशुद्धरक्त रस | ५४ |

अष्ठीलादाह २२०
अष्ठीलावृद्धि २२०
अष्ठीलाविकार २२०
अस्थमा २७६
असाध्यस्थिति १२२
अस्तित्व १३
अस्थिमार्दव २२१
असायाटिस् २३८
अहंकार ७६,८२
आकाशाचा प्राण ६५
आकाशतत्त्व व कार्य २७
आकाश व पृथ्वी-
तत्त्वाचें घटनाकार्य ४५
आकाशतत्त्व, ज्ञानरस ६२
आकाशशक्तीचें केन्द्रस्थान ६२
आकाश; सेव्य पदार्थ ८९
आकाशाचा प्राण, व्यान ६५
आकाशतत्त्वी, चपला १५३
आंकडी २२२
आगपैण २९०
अंगावर दूध कमी
किंवा जास्त येणें ३३६
आगेरूं २२३
आघात २२४
आजाऱ्याला पौष्टिक (टॉनिक) ३६५
आजार ९४
आजाऱ्याचा आहार ३६४
आतपमूर्च्छा २२५
आर्तवाधिक्य ३३३
आर्तवाभाव ३३४
आर्तवशूळ ३३५
आलपुच्छदाह २२६
आंत्रवृद्धि २१०
आंत्रक्षय ३२८
आंत्रिक ज्वर २९९
आदिशक्ति १७
आत्मा (अंतःकरणांतील) ७६
आमरस ५०
आम्लपित्त २२९
आमवात २२७
आमसंग्रहणी २२८
आमांश २३०
आमाशयाधोमुखसंकोच २३१
आय-डिसीजेस् २७२
आयुर्वेद म्हणजेच जीवितशास्त्र १९७
आरोग्यनाशाचीं कारणें ११४
आरोग्यहीनता ( गर्भापासून ) ११०
आरोग्यासाठीं उपाययोजना १९४
आरोग्याला बाधक गोष्टी ११६
आशुकारी क्रिया ११६
आहारविषयक दिग्दर्शन ३५४
आहार, जीवनशक्तियुक्त ३५७
आहार व प्रकृतिधर्म ३६२
आहार, मितप्रमाण ३६३
आंतरस, पित्तरस व
स्वादुरस, व त्यांचें कार्य ५०
आज्ञाचक्र ८०

## इ

इच्छित क्रिया ५
इच्छित क्रियाकारक ज्ञानतंतु ७३
इच्छित क्रियेचें रूप ५
इडा ७९
इतर पेय पदार्थ ३५३
इन्द्रलुप्त २३४
इन्द्रिय-घटक १८
इन्द्रिय-घटक व
घटकांचें संवर्धन ३६
इन्द्रियशक्ति १८
इन्फ्लूएन्झा २८६
इसब २३३

## उ

उचकी २३५
उडतें २६९
उत्पत्तिकारिणीशक्ति ३३
उत्सर्जनक्रिया १२५
उत्सर्जनक्रिया ( प्रासंगिक ) १२०
उदकमेह २३७
उदर २३८
उदान ६९
उदान व त्याचें कार्य ६९; ७०
उदान; प्राणशक्तिविशिष्ट १५९
उन्हाळे २३६
उपचाराविषयीं सामान्य सूचना २०५
उपदंश २३९
उपयोग, विद्युत्‌चा १८८
उपाय ( मलमूत्रोत्सर्जनार्थ ) १८३
उपाययोजना १३०
उपाय; रोगलक्षणें वाढल्यास १७८
उवा २४०
उसण भरणें २४१
उष्ण प्रकृति ९८
उष्णप्रकृतिनियामक १३८
उष्णपित्त प्रकृति १०४
उष्णवात प्रकृति १०५

## ऋ

ऋण व धन भाग १६६
ऋणविद्युत् १५२
ऋणविद्युत् ( ज्योतिष्मति ) १५५

## ए

एक्स ऑथॉल्मिक गॉयटर २७४
एक्झिमा २३३
एपिलेप्सि २१४
एरिसिपेलस् २७९

## ओ

ओबेसिटी ३०५

## औ

औषध तीव्र पडल्यास
शमनार्थ योजना १७९
औषधाचें काम १९९
औषधाचें प्रमाण
व वेळा १८१

औषधांत बदल १७७

औषधांत बदल प्रमाण वगैरेंत १७६

औषधी, पंचतत्त्वात्मक १३१

औषधें कशीं वापरावीं १६३

## क

कंठशालूक २४३

कंठस्थपिंडविकार २४२

कंडू २५३

कन्व्हल्शन्स २२२

कंप ३२३

कंपवात २४४

कफविकार २४५

कफक्षय ३३०

कर्मप्रवृत्ति व तिचें कार्य ८

कर्मेंद्रियकार्यविस्तार ७४

कर्मेंद्रियें व त्यांचें कार्य ७४

कर्मारंभ ८

कृमि २६८

कलायखंज २४६

कवळू २४७

कष्टसाध्य स्थिति १२२

कष्टार्तव ३३५

कांजिण्या २४९

कान फुटणें २४८

कान वाहणें २४८

कानाचे विकार २४८

कार्बंकल २५१

कानांत गळूं फोड वगैरे २४८

कामला २५०

कार्यप्रवाह ( सृष्टीचा ) ११

कार्यशक्ति, कार्येंद्रिय व कार्यक्षेत्र ४२

कार्यक्षेत्र ४२

कार्येंद्रिय ४२

कारणें, आरोग्यनाशाचीं ११४

कॉलरा ३१८

कावीळ २५०

काळपुळी २५१

कॉन्स्टिपेशन २१८

कुपथ्य १९२

कोड २५२

कोरिया २२३

कोलेसिस्टायटिस् २८९

## ख

खरचटणें २२४

खवडा २५३

खाद्य पदार्थ शिजवून अगर कच्चे खाणें ३५९

खुपऱ्या २७२

खोकला २५४

## ग

गजकर्ण २५५

गंडमाळा २५६

गंधज्ञान ७३ (५)

गनोरिया २८७
गर्मी २५९
ग्रंथि २१५
ग्रंथिक सन्निपात २५७
गर्भपात ३४०
गर्भापासून आरोग्यहीनता ११०
गर्भापासून जीवनशक्तीचें
घटनात्मक व संरक्षणकार्य १११
गर्भशयान्मिाद २१३
गरोदरपणांत प्रथमानिष्पत्ति १३५
गलगंड २७४
गालितकुष्ट ३०९
ग्लॅंडयूलर फीवर २५८
गळूं २५३
गॅस्ट्रायटिस् २०७
गालगुंड २६०
गॉयटर २७४
गॉलस्टोन २८९
गिडिनेस २९७
गिनिवर्म २८३
गिर्यातिसार २६१
गुणघटक १२
गुणघटकांचें साम्य व वैशिष्ट्य ३४
गुणाधारतत्त्व १३
गुद ७४(५)
गुदभेद २६२
गुरांचे विकार ३४४
गुल्म २६३
गोंवर २६४
गोळ्याच केव्हां घ्याव्या १८०

## घ

घटक १०
घटकांचें संवर्धन व इंद्रियघटक ३६
घटनाकर्तृत्वप्रबल घटनासाहित्य ३७
घटनाकारिणीशक्ति १७
घटनात्मक व संरक्षण-
कार्य-गर्भापासून ११०
घटना व विकास ९२
घटना व विघटनाशक्तींचें कोष्टक ३३
घटनाविघटनाशक्ति १५
घटसर्प २६५
घसा येणें २६६
घ्राणेंद्रिय ७३ (५)

## च

चक्कर २९७
चतुर्थ निष्पत्ति १४५;१४६
चपला १५३
चपला—उपयोग १५४
चक्षुरिंद्रिय ७३ (३)
चाई २३४
चाळणपुळी २५१
चिकित्सा करतांना लक्षांत
ठेवण्याच्या मुख्य गोष्टि
१६८ ते १९३
चित्त ७६
चेंचणें २२४

## ज


जखम २२४
जंघापृष्ठशूल २६७
जठर ५२
जड व दृश्य घटना २२
जंत २६८
जनावरांचे विकार ३४४
जन्मापूर्वीचें व नंतरचें
संवर्धन कार्य ४६
जलकार्यशक्तीचें कार्य ५३
जलतत्त्व व कार्य ३०
जलतत्त्व व रसाक्रिया ४३
जलतत्त्व—वसारस ५३
जलतत्त्वसहाय्यक द्वितीय
निष्पात्ति १३९
जलतत्त्वावर पृथ्वीतत्त्वाचा
संस्कार ४७
जलतत्त्वाचा प्राण-समान ७१
जलतत्त्वावर भार १२७
जलतत्त्वी सुप्रभा १५७
जलशक्तीचें कार्येंद्रिय
व कार्यक्षेत्र ५५
जलशक्तीचें संरक्षणकार्य
व संरक्षक इन्द्रियें ५६
ज्वर २७३
जाठररस व पक्काशय ४९
जॉंडिस २५०
जास्त औषधें (एकाहून जास्त)
कशीं द्यावीं ? १८४
जिवंतपणाची अंतर्गतक्रिया २
जिवंतपणाचीं बाह्य लक्षणें १
जीवनशक्ति व संरक्षण,
संवर्धन व संपादन ४०
जीवनशक्ति व संहारशक्ति १५
जीवनशक्तीचें संरक्षणकार्य १९६
जीवनशक्ति व ज्ञानरस ६३
जीवनशक्तीच्या उपशक्ति ४२
जीवनशक्तीचें कार्य १९
जीवनशक्तीचें केन्द्रस्थान ७७
जीवनशक्तीचें घटनात्मक
व संरक्षण कार्य १११
जीवनशक्तीचें नियमबद्ध कार्य ९१
जीवनशक्तीचें नियुक्त कार्य प्रयोगी
व नियुक्त मंडळाच्या द्वारा ११२
जीवनशक्तीला सहाय्यक उपाय १७३
जीवबीज १०.३८
जीवात्मा ८३
जीवितक्रिया ३
जीवितहेतु व आपली
जबाबदारी ३४५
ज्योतिष्मति १५५,१५६


## ट


ट्यूमर्स २१५
टायफस २८१
टॉयफॉईड २९९

टॉन्सिलायटिस् २४३
टिटॅनस २१३ अ

## ड

डबा २६९
डांग्या खोकला २७०
डायलेटेशन् ऑफ दी हार्ट ३१०
डायाबिटिस् इनसिपिडस् २३७
डायाबिटिस् मिलिटस् २९८
डायेरिया २०९
डिप्थेरिया २६५
डिसेंटरी २३०
डिस्पेपशिय २०६
डेंग्यू ३२२
डोकें दुखणें २७१
डोळयांचे विकार २७२
डोळयांच्या शिरा वाढणें २७२
डोळयांत व्रण २७२
डोळे येणें २७२

## त

तमकश्वास २७६
सत्त्व व तमोगुण,
घटकांचें कार्य २४
तमोगुणवर्ग २३
तृतीय निष्पत्ति १४२,१४३
तृतीय ब निष्पत्ति १४४
तांद्रिक सन्निपात २८१
तांबडा २७९
ताप २७३
ताळू लागणें ३३७
त्रिदोषांचें बीज ५९
तीव्र अविलंबी क्रिया ११६
तीव्र आजारांत योजना १७२
तुंगाक्ष गलगंड २७४
तेजतत्त्व-अशुद्ध रक्त ५७
तेजतत्त्व व कार्य २९
तेजतत्त्वाचा प्राण उदान ६९
तेजतत्त्वावर भार १२८
तेजशक्तीचें कार्य ५७
तेजशक्तीचें कार्येंद्रिय
व कार्यक्षेत्र ५८
तोंड येणें ३०२
तोतरेपणा २७५

## थ

थानपुळी ३३८
थॉयरॉइड ग्लॅंडचा विकार २४२
थायासिस् ३३०

## द

दंतरोग २७७
दमा २७६
दृश्य अनिश्चित क्रिया ३
दृश्य व जड घटना २२
दाढदुखी २७७
दांत हालणें २७७
दांतांतून पू येणें २७७

दांतांतून रक्त येणें २७७
द्वितीय निष्पत्ति १३८ ते १४१
देवी २८८

## ध

धन ऋण भाग १६६
धन विद्युत् १५२, १५३
धन विद्युत्-चपला १५३
धनुर्वात २१३ ( अ )
धनाविद्युत्-सुप्रभा १५७
ध्वनिज्ञान ७३ ( १ )
धाकटा मेंदु ६२
धातुक्षय ३३१
धांवेरें २७९
धुपणी ३३९

## न

नपुंसकत्व २८७
नंबर १ १३२ ते १३७
,, २ १३८ ते १४१
,, ३ १४२ ते १४३
,, ३ ब १४४
,, ४ १४५, १४६
,, ५ १४७
नंबर ६ १४८
,, ७ १४९
,, ८ १५०
नवज्वर २८१
न्यूनार्तव ३३४
न्यूमॉनिक प्लेग २५७
न्यूमोनिया २९२
न्यूरास्थेनिया ३०१
नाकाचे विकार २८२
नाकाचा घोळणा फुटणें २८२
नाभिप्रदेश ७१
नारू २८३
नासावणें ३४०
नाळगूद २८४
निकोप झाल्याचें लक्षण १८७
निद्रा ८९
नियमबद्ध कार्य, जीवनशक्तीचें ९१
नियुक्त कार्य, जीवनशक्तीचें ११२
प्रयोगी व नियुक्त मंडळाच्या द्वारा
नियुक्तमन ७६
नियुक्त मंडळ ७६
नियुक्तमंळाच्या द्वारा
नियुक्तकार्य, जीवनशक्तीचें ११२
निरिंद्रिय घटक ३६
निरिंद्रियशाक्ति १८, २४
निःसत्त्व आहार ३६१

## प

पक्काशय ५२
पक्काशय व जाठररस ४९
पचनक्रिया ४७
पंचतत्त्वात्मक औषध १३१
पंचप्राण व प्राणक्रिया ४४
पंचम निष्पत्ति १४७

पंचमहाभूतांचा व आपला संबंध ३२
पंचमहाभूतांच्या आदिशक्ति
व कार्य ३३
पंचमहाभूतें व त्यांचे वर्ग २६
पंचवायु ६४
पटकी ३१८
पडशाची सांथ २८६
पडसें २८५
परब्रह्म १३
परमा २८७
परमात्मतत्त्व १३
परिणाम शूल २२९
परिवर्तन व प्रकृतिवैशिष्ट्य ९५
पॅरोलिसिस् २१२
पॅरोलिसिस् ॲजिटन्स २१२
पृथ्वी कार्यशक्तिचें कार्येंद्रिय
व कार्यक्षेत्र ५२
पृथ्वीतत्त्व व कार्य ३१
पृथ्वीतत्त्वसहाय्यक
प्रथम निष्पत्ति १३३
पृथ्वीतत्त्वाचा प्राण ७२
पृथ्वीतत्त्वावर जल
तत्त्वाचा संस्कार ४७
पृथ्वीतत्त्वार भार १२६
पृथ्वीतत्त्री ज्योतिष्मति १५५
पृथ्वी व आकाश
तत्त्वाचें घटनाकार्य ४५
प्रकृति-उष्ण ९८
प्रकृति उष्णपित्त १०४
,, उष्णवात १०५
,, कशी ठरवावी ९६
,, नियामक चिकित्सा १६८
,, भिन्नतेनुसार सामान्य
प्रमाण १०७
,, भेद ९३
,, पित्त ९९
,, वात १००
,, वातापित्त १०६
प्रकृतिवैशिष्ट्यपरिवर्तन ९५
,, शीतपित्त १०२
,, शीतवात १०३
,, शीतोष्ण १०१
प्रथम निष्पत्ति १३२ ते १३७
प्रदर ३३९
प्रयोगी मन ८२
प्रयोगी मनाचें कार्य ८५
प्रयोगी मनाचें संरक्षण
कार्य, स्वाभाविक ९०
प्रयोगी मंडळ ७६
प्रयोगी मंडळ दुय्यम
जीवनशक्तीप्रमुख १९५
प्रयोगी मंडळाचे द्वारा
नियुक्त कार्य, जीवनशक्तीचें ११२
प्रसववेदना ३४१
पाइल्स ३०४
पाणि ३४९
पाणि किती प्यावें व कां ? ३५०
पाण्याची जरूरी— ३५१

प्राचीन आहारपद्धति ३६०
पानथरी २४७
पाय ७४ (३)
पाषाणगर्दभ २६०
प्राणक्रिया व पंचप्राण ४४
प्राणाक्रियाविस्तार ६४ ते ७२
प्राणवायूचें कार्य ६८
प्राणवायु-वायुतत्त्वाचा प्राण ६७
प्राणशक्ति ६४
प्राणशक्ति व विद्युत् १५१
प्राणशक्तिविशिष्ट सौदामिनी १६१
प्रासंगिक उत्सर्जनक्रिया १२०
पाळीचा ताप ३१९
पिंगला ७९
पिंडाची घटना व विकास ९२
पिण्याचें पाणी कसें असावें ३५२
पित्तप्रकृति ९९
पित्तप्रकृतिनियामक १४२
पित्ताशयदाह २८९
पित्ताश्मरी २८९
पित्ताशयविकार २८९
पित्तरस, स्वादुरस, आंत्ररस, आणि त्यांचें कार्य ५०
पिनस २८२
पीडितार्तव ३३५
प्लीहा २४७
प्ल्यूरसि २९३
पूर्वीच्या विवेचनाचा सारांश १९५
प्लेग २५७
पैण २९०
पैत्तिक ज्वर ३२१
पोटदुखी २९१
पोटशूळ २९१
प्रोस्टेट ग्लँड २२०

## फ

फॅरिंजायटिस् २६६
फिरंगरोग २५९
फिवर २७३
फिशर ऑफ दी एनस् २६२
फिश्चुला इन एनो २९६
फुफ्फुसदाह २९२
फुफ्फुसावरणदाह २९३
फूल पडणें २७२
फेफरें २१४

## ब

बदल, औषधाचें प्रमाणांत वगैरे १७६; १७७
बद्धकोष्ठ २१८
ब्लडप्रेशर ३०७
बालग्रह २२२
बाह्य सहज कर्म ५
बाहुली सुजणें २७२
बाह्येंद्रियांची कर्मप्रवृत्ति ६
बाळंतताप ३४२
बाळंतरोग ३४२
ब्राइटस् डिसीझ् ३१५

ब्रांकोन्यूमोया २६९
बीज व मनुष्याची उत्पत्ति ३९
बीज व विकास १०
बीजाचें मूळ ९
बुद्धि ७६
बब्बुळ वाढणें किंवा
आवळलें जाणें २७२
बेरिबेरी २९५

### भ

भगंदर २९६
भोंवळ २९७

### म

मधुमेह २९८
मधुरा २९९
मन ७६
मम्स् २६०
मलेरिया ३१९
मस्तिष्कदौर्बल्य ३०१
मसूरिका २७८
महामारी ३१८
महारोग ३०९
मार बसणें २४४
मीझल्स २६४
मुखपाक ३०२
मुडदुस २२१
मुतखडा २०३
मूत्रकृच्छ्र २३६
मूत्रपिंड दाह ३१५
मूत्रपिंडांत पू होणें ३१६
मूत्रेंद्रिय ७४ (४)
मूळव्याध ३०४
म्यूकस् डायेरिया २२८
मेंदु, कुक्षिस्थ ८२
मेंदुज्वर ३००
मेंदु, धाकटा ६२
मेंदु, मध्यम ८४
मेदोरोग ३०५
मेनिंजायटिस् ३००
मोडशी २०७
मोतिबिंदु २७२

### य

यकृत् वृद्धि ३०६
यकृत् संकोच ३०६
युक्त आहार ३४६
योगभाविनी १५९,१६०
योग्य आहारांची निवड ३५५
योजना—उपाय १३०
योजना, औषधानें क्षोभ झाल्यास १८२
योजना, तीव्र आजारांत १७२
योजना, शमनार्थ १७९
योजना, सहाय्यक
पोटांतील औषधास १८५
योजना-स्थूल १६९,१७०
योजना सूक्ष्म १६९, १७१
योजना सांथीचे आजारांत १७२

## र


रक्तदाबविकार ३०७
रक्तपित्त ३०८
रक्तभिती ३०९
रक्तक्षय ३२९
रक्ताशयविस्तार ३१०
रक्तशयशूळ ३११
रजोगुणवर्ग २३
रजोगुण, व सत्त्व-
घटकांचें कार्य २५
रक्तक्रियाविस्तार ४७
रसक्रियेचें परस्परावलंबी कार्य ५९
रसनेंद्रिय ७३ (४)
रसज्ञान ७३ (४)
राजयक्ष्मा ३२७
रिकेटस् २२१
रीनल कॅल्क्यूलस २१७
रूपज्ञान ७३ (३)
रेक्टल प्रोलेप्स २२३
रेखाचित्र १६७
रेमिटंट फीवर ३२१
रोग ९४
रोगनिदान १०९
रोगबीज व रोगपरंपरा-उदाहरणें २०४
रोग म्हणजे काय ? ११५
रोग म्हणजे काय
व त्याला उपाय १९७
रोगलक्षणें वाढण्याचीं कारणें १७८
रोगलक्षणें वाढल्यास उपाय १७८
रोगसूचक लक्षणें १२४
रोगाचें मूळ २०३


## ल


लंबॅगो २४१
लयकारिणी शक्ति १६
लहान मुलांना प्रथम निष्पत्ति १३६
लक्षणें रोग वाढण्याचीं कारणें १४८
लक्षणें, रोगसूचक १२४
न्यूकोडर्मा २५२
लिंफॅटिझम् ३१३
लिंफॅडिनोमा ३१२
लिव्हर डिसीजस् ३०६
लेप्रसी ३०९
लोको मोटार ॲटॅक्सी २४६


## व


वडस २७२
वर्णाबद्दल (शरीराचे) टीप १०८
वर्मस् २६८
वसाग्रंथी व वसावाहिन्या
आणि त्यांचें कार्य ५१
वसाग्रंथीवृद्धि ३१२
वसाधिक्य ३१३
वसारस ४८
वसारस-जलतत्त्व ५३
वसावाहिन्या व त्यांचें कार्य ५१
व्रण ३१४

वृक्कदाह ३१५
वृक्कविद्रधी ३१६
वृक्काश्मरी ३१७
वृषणविकार २०९
व्यक्तघटना १०
व्याधि ९४
व्यान ६५
व्यान प्राणशाक्ति विशिष्ट-चपला १५३
व्यान व त्याचें कार्य ६५
व्यानाचें कार्य, आणखी ६६
वागींद्रिय ७४ (१)
वातप्रकृति १००
वातप्रकृतिनियामक १४५
वातपित्त प्रकृति १०६
वातरक्त ३०९
वायुतत्त्व व कार्य २८
वायुतत्त्वाचा प्राण ६७
वायुतत्त्वाचा प्राण-प्राणवायु ६७
वायुतत्त्वी सौदामिनी १६१,१६२
वायुतत्त्वावर भार १२९
वायुशक्तीचें कार्येंद्रिय व कार्यक्षेत्र ६१
विकार ९४
विघटना घटना १५
विघटनाकारिणी शक्ति १७
विघटना घटना व शक्तीचें कोष्टक २३
विटाळशूळ ३३५
विद्युत्चा उपयोग १८८
विद्युत धन व ऋण १५२
विद्युत् प्राणशक्ति १५१
विभेदक क्रिया ११८
विलयनें पोटांत देण्यासाठीं १६४
विलयनें बाह्योपयोगासाठीं १६५
विलंबी क्रिया ११७
विलंबि विकारांत सुधारणा १७५
विश्रांति ८९
विश्रांति-निद्रा ३४७
विश्वरूप १७
विषम २९९
विषहारिणी १५०
विषूचिका ३१८
विसर्प २९९
वेणिस्थान ७८
वेणिस्थान-मेंदु ८४
वेट् ड्रीम्स ३२४

## श

शर्करा ३१७
शतदल ६२
शतदल, मेंदु ७८, ८४
शरीर आणि जीवित २१
शरीरसंवर्धन ५
शरीराचे वर्णनाबद्दल टीप १०८
श्रवणेंद्रिय ७३ (१)
श्वसनकज्वर २९२
श्वसनक्रिया १
शिरःशूल २७१
शिरोब्रह्म ७७
शीत प्रकृति ९७

शीतज्वर ३१९
शीत प्रकृतिनियामक १३२
शीतपित्तप्रकृति १०२
शीतवातप्रकृति १०३
शीतोष्णप्रकृति १०१
शुद्धरक्त तेजशक्तीचें
कार्येंद्रियें व कार्यक्षेत्र ५८
शोष ३२७

## ष

षष्ठ निष्पत्ति १४८
षड्रस ३५८

## स

संग्रहणी ३२०
संग्राहक क्रिया १२१
संजीवनचिकित्सापद्धति-
प्रमाणें रोगनिदान २०२
सत्त्वगुणवर्ग २३
सत्त्व व तम् गुण घटकांचे कार्य २५
संतत ज्वर ३२१
सर्दी २८५
संधिक सन्निपात ज्वर ३२२
संधिवात २२७
सन्स्ट्रोक २२५
सप्तम निष्पत्ति १४९
संपादन १०
संपादन व जीवनशक्ति ४०
संपादन व संरक्षण यांत
अंत:शक्तीचें महत्त्व ७
स्प्रू ३२०
समभावी-योगभाविनी १५९;१६०
समान ७१
समान प्राणशक्ति विशिष्ट-सुप्रभा १५७
समान व त्याचें कार्य ७१
संयोजक क्रिया ११९
संरक्षण कार्य-स्वाभाविक
प्रयोगी मनाचें ९०
संरक्षण १०
संरक्षणकार्य विजातीय द्रव्य ११३
संरक्षण व जीवनशक्ति ४०
सल ३४३
संवर्धनकार्य ७; ४१
जन्मापूर्वी व नंतरचे
संवर्धनक्रिया ४
संवर्धन घटकाचे व
इंद्रियघटक ३६
संवर्धन, संपादन संरक्षण व
जीवनशक्ती ४०
सर्वांगपूर्ण आहार ३५६
ससणी २६९
सहजाक्रिया ३
सहस्रदल ७७
सहाय्यक उपाय-जीवनशक्तीला १७३
सहाय्यक योजना-पोटांतील
औषधांस १८५
सहाय्यक चिकित्सा १६८
संहारशक्ति व जीवनशक्ति १५

| | |
|---|---|
| सॉफ्ट शांकर | २३९ |
| स्क्रॉफ्यूला | २५६ |
| स्थूल योजना | १६९, १७० |
| स्नायुविक्षिप | ३२३ |
| स्पर्शज्ञान | ७३ ( २ ) |
| स्पर्शेंद्रिय | ७३ ( २ ) |
| स्पायनल मिनिंजायटिस | ३२५ |
| स्प्लीन | २४७ |
| स्मृतिपटल | ८१ |
| सृष्टिघटनासाहित्य | २० |
| सृष्टीचा कार्यप्रवाह | ११ |
| स्वप्नावस्था | ३२४ |
| स्वादुरस, पित्तरस ,आंत्ररस व त्यांचें कार्य | ५० |
| स्मॉलपॉक्स | २७८ |
| सायाटिका | २६७ |
| सारा येणें | २७२ |
| साहित्य व सृष्टिघटना | ३४ |
| साहित्यघटना | २० |
| सार्वजनिक आजारांत योजना | १७२ |
| स्थितिकारिणी शक्ति | १६ |
| स्थितिस्थापकत्व व घटनासाहित्य | ३४ |
| सिफिलिस् | २६९ |
| सुधारणा विलंबी विकारांत | १७५ |
| सुधारणेचा क्रम | १७४ |
| सुधारणेबरोबर औषधांत फरक | १८६ |
| सुप्रभा विद्युत् | १५७, १५८ |
| सुषुम्ना | ७८ |
| सुषुम्नावरणदाह | ३२५ |
| सूतिकारोग | ३४२ |
| सूर्यावर्त | २११ |
| सूक्ष्मयोजना | १६९. १७१ |
| सूक्ष्म व अदृश्य घटना | २२ |
| सेव्य पदार्थ आकाश | ८९ |
| सेव्य पदार्थ तेज | ८७ |
| सेव्य पदार्थ; पृथ्वी जल | ८६ |
| सेव्य पदार्थ-वायु | ८८ |
| सेव्य पदार्थांची निवडा निवड व ती करण्याचें ज्ञान | ८६ |
| स्वेद विकार | ३२६ |
| सेंद्रिय घटक व प्रकार | ३७ |
| सोमरोग | २३७ |
| सौदामिनी | १६१,१६२ |
| सौम्य अविलंबि क्रिया | ११६ |

## ह

| | |
|---|---|
| हगवण | २०९ |
| हवा,सूर्यकिरण | ३४८ |
| हृदयकमल | ८२ |
| हात | ७४ (२) |
| हार्नियां | २१० |
| हायड्रोफोबिया | २१७ |
| हिक्का, हिक्काफ् | २३५ |
| हिल डायेरिया | २९१ |
| हिंवताप | ३१९ |
| हिस्टेरिया | २१३ |
| हीटस्ट्रोक | २२५ |
| हूपिंग कॉफ् | २७० |

ऱ्हूमॅटिझम् २२७
हेडएक २७१
हेमिक्रोनिया २११
व्हेरिसेला २४९

क्ष

क्षत ३१४
क्षय ३२७
क्षयरूपक्रिया १२३
क्षोभ झाल्यास योजना १८२
क्षोभशमन १९१

ज्ञ

ज्ञानरस ६०
ज्ञानरस आकाशतत्त्व ६२
ज्ञानरस व जीवनशक्ति ६३
ज्ञानेंद्रियकार्य विस्तार ७३


वा. क्र. ९०५८